# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २९-१०-२००२ ते १९-०४-२००३**

**रजिष्टर क्र. ०७**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २९-१०-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंगळवार, दि. २९/१०/२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणिन ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
११) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिसन
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
२१) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२२) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२३) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२४) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२५) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२६) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२७) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२८) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२९) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
३०) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३१) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
३२) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
३३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३४) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३५) स.स.डॉ. कराड भागवत पांडुरंग
३६) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३७) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३८) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३९) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
४०) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
४१) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४२) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४३) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४४) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४५) स.स.श्री. तायडे पांउुरंग यशवंतराव
४६) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४७) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४८) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४९) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५०) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
५१) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५२) स.स.श्री. दिसरडा प्रशांत सुभाष
५३) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
५४) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५५) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५६) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५७) स.स.सौ. संगिता बाळु मर्दे
५८) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५९) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
६०) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
६१) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
६२) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
६३) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६४) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६५) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खून
६६) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहेमद
६७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६८) स.स.सौ. सिद्दिकी नर्रम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
६९) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
७०) स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खॉ
७१) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
७२) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७३) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
७४) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७५) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल

७६) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७७) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
७८) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
७९) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
८०) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

**विषय क्र. १ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ आणि महानगरपालिका (महापौर पदाचे आरक्षण) नियम १९९४ चे तरतूदीनुसार आणि महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग एक अ मध्ये उपविभाग दिनांक १६ ऑक्टोंबर २००० पृष्ठ क्र. ५९ वरील नगरविकास विभागकडील अधिसूचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर पद महिलासाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे बाबत.

**संवाद :**

श्री. जबिंदा दलबिरसिंग : मतदानाचा हक्क किती सदस्यांना नाही त्यांची नावे वाचून दाखवावी.

मा. महापौर : ज्या सदस्यांना मतदानाचा हक्क नाही. त्यांची नावे सचिव यांनी वाचून दाखवावी.

नगरसचिव : प्रभाग क्र. १७, ३९ सध्या रिक्त आहे. तसेच प्रभाग क. ७१ शरीफ कॉलनी किराडपुरा प्रभागाचे स. स. श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन यांना मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मतदान करण्याचा हक्क नाही असे एकूण ०३ वगळून उर्वरित ८० प्रभागचे सदस्य मतदान करू शकतील.

पिठासिन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) अन्वये महापौर पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक १०/१०/२००२ राजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५, व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १८/१०/२००२ ते २५/१०/२०००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्किारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २५/१०/२००२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजे पर्यंत मापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
सौ. सिध्दीकी नईम सुलताना सिध्दीकी म. फसियोद्दिन

सौ. निखात परवीन ईजाज अली
सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
सौ. मोरे जयश्री कुमारराव
श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर
सौ. साधना गणेश सुरडकर

सभा कामकाज नियमावलइचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशपत्राची छाननी करण्यता येत आहे. त्या महापौर नगरसचिव यांच्या मदतीने छाननी करतात.

वरील प्रमाणे छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील नामनिर्देशन पत्रे वैद्य ठरलेली आहेत.

सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
सौ. सिध्दीकी नईम सुलताना सिध्दीकी म. फसियोद्दिन
सौ. निखात परवीन ईजाज अली
सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
सौ. मोरे जयश्री कुमारराव
श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर
सौ. साधना गणेश सुरडकर

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपल्या उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकांला या दोहोंपेकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधीत म्हणजेच १२.२५ वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना महापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.२५ वाजेपर्यंत परत घेता येईल मात्र वेळेनंतर महापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

महापौर पदासाठी ०७ उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे |
|---|---|
| ०१ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान |
| ०२ | सौ. सिध्दीकी नईम सुलताना सिध्दीकी म. फसियोद्दिन |
| ०३ | श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर |
| ०४ | सौ. साधना गणेश सुरडकर |

आता महापौर पदाच्या निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे |
|---|---|
| ०१ | सौ. निखत परवीन ईजाज अली |
| ०२ | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग |
| ०३ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |

मतदानाबाबत गोपनीयता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिका सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतीवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका ०१ (एक) तासात तयार होतील व मतदानाला सुमारे ०१.३५ वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करून घ्यावी व त्यानंतर नगर सचिव यांनी सर्व स. सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

मतपेटीजवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे व मतपेटीला कुलूप लावून तिची चाबी माझेकडे आणून द्यावी. व मतपेटी मोहोरबंद करून घ्यावी (पिठासीन अधिकारी स्वतःच्या सहिने मतपेटी मोहोरबंद करून घेतात.)

सभाकामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५१ अनवये मतमोजीणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापूर्वी म्हणजेच आताच त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करू नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदानासंबंधीच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

नगरसचिव : नमूना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्यात आलेली आहे. मतदानासंबंधीच्या सूचना पुढील प्रमाणे आहेत.

०१) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नावे पुकारण्यात येतील.

०२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

०३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

०४) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५० अन्वये कोणतयाही सभासदाला एका पेक्षा जास्त इच्छुकांना आपले मत देता येणार नाही. मतदान करतेवेळी प्रत्ये सभासद मतदान पत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकांना मत द्यावयाचे असेल त्यांच्या नांवा समोर फुली करील (X)

०५) सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैद्य समजली जाईल.

- जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केलेली असेल अथवा...
- जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल अथवा...
- जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरउपयोगी आहे.

श्री अविनाश कुमावत : फकत उजव्या बाजूने मतदान केल्यास ग्राह्य धरले जाईल असे दिले परंतु डाव्या बाजूने सुध्दा मतदानाची फुली केल्यास ते सुध्दा मतदान ग्राह्य धरावे अशी माझी विनंती आहे. मा. उच्च न्यायालयाने तसे आदेश केलेले आहे. दोन वर्षात नियमावलीत महानगरपालिकाने बदल केलेला नाही हा खरा तर न्यायालयाचा अवमान आहे. आतापर्यंत याबाबतीत मी सभागृहात १०-१२ वेळेस सूचना केलेली आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमावलीत बदल केला नाही तर दावा दाखल करील याची नोंद व्हावी. प्रत्येक वेळी नियमावली बनवण्याचे काम चालू आहे असे उत्तर दिले जाते.

श्री. जयवंत ओक : न्यायालयाने निर्देश दिल्यानंतर नियमावलीत बदल करणेचे काम हे सचिवाचे आहे. स. सदस्य श्री. कुमावत प्रत्येक निवडणूक बैठकीत हा मुद्दा उपस्थित करीत आहे. त्यांचे सूचनेची दक्षता घेवून तात्काळ नियमावलीत बदल करण्याची कार्यवाही करावी. नसता उच्च न्यायालयाचा अवमान आहे.

मा. महापौर : नगरसचिव यांनी यासंबंधी माहिती द्यावी.

नगरसचिव : नियमावलीत दुरुस्ती करण्यासंबंधी जेव्हा मा. उच्च नयायालयाचे आदेश झाले होते, त्याबाबत विधी विभागाला कळविण्यात आलेले आहे. विधी विभागाकडून मा. उच्च न्यायालयचे निवृत्त न्यायमुर्ती मा. श्री. चपळगांवकर साहेब यांचेकडे हे काम सोपविण्यात आलेले आहे. नियमावली दुरुस्त करण्याची कार्यवाही चालू असून याबाबत अनेक बैठका देखित झालेल्या आहेत व बरीच कामे देखील झालेली आहेत. नियमावली दुरुस्त करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर दुरुस्त नियमावली सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

पिठासीन अधिकारी : नमूना मतपत्रिका फलकावर चिपकाविण्यात आलेली आहे. आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभाग निहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाजा नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी ०१ (एक) तासाचा कालावधी देण्यात येत असून सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता दुपारचे ०१.५५ वाजले असून मतदान दुपारी ०२.५५ वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५(एफ) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर महापौर पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सभासदांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्र./मनपा/नस/२००२/५७५ दिनांक २५/१०/२००२ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी काम नेमून दिलेली आहेत त्यांनी ती

कामे जबाबदारीने पार पाडावीत जनसंपर्क अधिकारी यांनी प्रभाण निहाय सदस्यांची नांवे पुकारावीत.

जनसंपर्क अधिकारी : (नांव पुकारल्यानुसार) वॉर्ड क्र. ०१ च्या सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ६९ चे सदस्य यांनी विनंती केल्यावरून पिठासीन अधिकारी यांनी त्यांना मतदानास परवानगी दिली. त्यानुसार त्यांनी मतदान केले. यानंतर वॉर्ड क्र. ०२,०५,०७ च्या सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ६१ चे सदस्यांनी विनंती केल्यावरून त्यांना पिठासीन अधिकारी यांनी परवागनइ दिल्यानंतर त्यांनी मतदान केले. तयानंतर वॉर्ड क्र. ०८, ०९, १० च्या स. सदस्यांनी मतदान केले वॉर्ड क्र. ११ चे स. सदस्यांनी मतदनीसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी विधी सल्लागार श्री. शिरसाठ यांना मदत करण्या सूचना केली व त्या नुसार त्यांनी मतदान केले. तसेच वॉर्ड क्र. १२ चे सदस्य यांनी सुध्दा मतदनीसची लेखी मागणी केल्यानुसार पिठासीन अधिकारी यांनी मुख्यलेखाधिकारी श्री. खैरनार यांना मदतनीस दिले व त्यांनी मतदान केले, त्यानंतर वॉर्ड क्र. १३ चे सदस्यांनी मतदान केले. त्यानंतर वॉर्ड क्र. १४ स. सदस्यांनी मदतनिसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी उप-आयुक्त श्री. कांबळे यांना मदतनीस दिले व त्यानंतर त्यांनी मतदान केले. त्यानंतर वॉर्ड क्र. ८२ चे सदस्यांनी विनंती केल्यावरून त्यांना मतदानाची परवानगी देण्यात आली व त्यांनी मतदान केले. तयानंतर वॉर्ड क्र. १५ चे सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. १६ च्या स. सदस्यांनी मदतनीसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकारी सौ.कुलकर्णी यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार त्यांनी मतदान केले, वॉर्ड क्र. १८ चे सदस्यांनी मतदान केले तसेच वॉर्ड क्र. १९ चे सदस्यांनी मदतनीसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी श्री. शहापुरकर क. लि. यांनी मदत करावी अशा सूचना दिल्या त्यानुसार त्यांनी मतदान केले. यानंतर वॉर्ड क. २०,२१,२२,२३, २४, २५, २६, २७, २८, २९ व ३० चे स. सदस्यांनी मतदान केले, वॉर्ड क्र. ३१ चे स. सदस्यांनी नांव पुकारल्यानंतर पिठासीन अधिकारी हे मतदानाला जाण्यापूर्वी तात्पुरते पिठासीन अधिकारी म्हणून स. सदस्य श्री. आनंद तांदुळवाडीकर यांनी काम पाहण्याची सूचना केल्यानुसार त्यांनी प्रभारी पिठासीन अधिकारी म्हणून पद ग्रहण केले, वॉर्ड क्र. ३१, ३२, ३३, ३४, ३६, ३७, ३८, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१ च्या स. सदस्यांनी मतदान केले. तसेच वॉर्ड क्र. ५२ च्या स. सदस्यांनी मदतनीसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी श्री. सुनिल ढेकळे, लघुलेखक यांनी मदत करण्याच्या सूचना दिल्या व त्यानुसार त्यांनी मतदान केले. यानंतर वॉर्ड क्र. ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२ चे स. सदस्यांनी मतदान केले. वॉड क्र. ७३ चे स. सदस्यांनी मदतनिसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी सौ. उबाळे, वैद्यकीय अधिकारी यांनी मदत करण्याच्या सूचना केल्या त्यानुसार मतदान झाले, यानंतर वॉर्ड क्र. ७४,७५, ७६, ७७, ७८, ७९ चे स. सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ८० चे स. सदस्यांनी मदतनीसची लेखी मागणी केल्यानुसार त्यांना पिठासीन अधिकारी यांनी श्री. डी. जी. मुळे

लघुटंकलेखक यांनी मदत करण्याच्या सूचना केल्या त्यानुसार मतदान झाले, त्यानंतर वॉर्ड क्र. ८१, ८३ चे सदस्यांनी मतदान केले.

पिठासीन अधिकारी : ज्या स. सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांनी नांव पुन्हा पुकारण्यात यावी.

जनसंपर्क अधिकारी : (नांवे पुकारल्यानुसार) वॉर्ड क्र. ०३ चे सदस्यांनी मतदान केले, वॉर्ड क्र.०४ च्या सदस्यांनी मतपत्रिका फाटल्यामुळे त्यांना पिठासीन अधिकारी यांच्या सूचनेनुसार दुसरी मतपत्रिका देण्यात आली. त्यानुसार त्यांनी मतदान केले. फाटलेली मतपत्रिका सील करून ठेवण्यात आली, त्यानंतर वॉर्ड क्र. ०६ च्या सदस्यांनी मतदान केले. त्यानंतर वॉर्ड क्र. ३५ चे सदस्याचे नाव पुकारल्यानंतर तात्पुरते पिठासीन अधिकारी म्हणून का पाहात असलेले स. स. श्री. आनंद तांदुळवाडीकर हे मतदानास जाण्यासाठी उठतात व महापौर श्री. विकास जैन हे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात, त्यानंतर वार्ड क्र. ३५ चे सदस्यांनी मतदान केले.

पिठासीन अधिकारी : आता दुपारचे ०२.५५ वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नये व मतपेटीजवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी. उमेदवारांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करू नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे. ही विनंती.

मतपेअीजवळील मतदान अधिकारी मतपेटीला सील असल्याचे सभागृहाला दाखवून देतात व मतपेटी मा. पिठासीन अधिकारी यांच्या समोर ठेवतात. मतपेटी उघडण्यात येवून मपत्रिकेच्या पाठीमागे पिठासीन अधिकारी यांची स्वाक्षरी घेतात व मतपत्रिका मोजून मतदान अधिकारी निकाल तयार करता व पिठासीन अधिकारी यांचेकडे देतात.

पिठासीन अधिकारी : मतमोजणीचे काम पूर्ण झाले आहे, एकूण मतदान ८०, अवैद्य मते निरंक, वैद्य मते ८० उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| ०१ | सौ. निखत परवीन ईजाज अली | ३० मते |
| ०२ | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | ५० मते |
| ०३ | सौ. मोरे जयश्री कुमारराव | ०० मते |

माझ्या महापौर कार्यकाळामध्ये सर्व पदाधिकारी स. सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांनी महापौरांना जी सहकार्याची अपेक्षा असते असे सहकार्य सभागृहाने दिले त्यामुळे मी आपणा सर्वाचें मनपासून धन्यवाद करतो. त्याचप्रमाणे आपणा सर्वांच्या सहकार्याने चालू वर्षातील नविन योजना आखून घेवू शकतो. माझ्या कारकिर्दित एक्सप्रेस लाईन, बायो मेडीकल वेस्ट, संभाजी महाराजांचा पुतळा उभारणे, अशोक स्तंभ आणि कालच नगररचना विभागात एक खिडकी योजना उद्‌घाटन केले ही योजना

कोणत्याच महानगरपालिकेत नाही. त्यामुळे अभिनंतदनास पात्र आहे. वेळोवेळी मला सर्वांनी सहकार्य केले माझे कडून स. सदस्य, अधिकारी, पदाधिकारी यांची मने दुखावली असतील तर त्याबद्दल मी क्षमा मागतो. व यापुढेही चांगल्याप्रकारचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो एक दोन कामे माझ्या कारकिर्दीत झाली नाही ती येणाऱ्या महापौरांच्या कारकिर्दीत व्हावी अशी अपेक्षा आहे. पुन्हा एक वेळेस ज्येष्ठ सदस्य, आजी, माजी पदाधिकारी यांचे मनापासून धन्यवाद करतो.

मतमोजणीच्या निकालावरून मी असे घोषित करतो की, महापौर पदासाठी सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग यांची निवड झाली असून मी त्यांचे अभिनंदन करतो. व त्यांनी महापौर पदाचे आसन गृहण करावे अशी त्यांना विनंती करतो.

**ठराव क्र. १ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या मतदानानुसार आणि मतमोजणीच्या निकालावरून सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग यांना सर्वांपेक्षा जास्त मते म्हणजे ५० मते पडल्याने महापौर पदावर त्यांची बहुमताने झालेल्या निवडीस मान्यता देण्यात येते.

नूतन महापौर यावेळी आसन गृहण करतात व तत्कालीन महापोर व प्रशासनातर्फे त्यांचे स्वागत करण्यात येते व त्यानंतर नूतन महापौर त्यांच्या निवडीबद्दल सभागृहास धन्यवाद देतात.

**विषय क्र. २ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या उप-महापौर पदावर निवड करणे बाबत.

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये उपमहापौर पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक १०/१०/२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५, व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १८/१०/२००२ ते २५/१०/२००२ पर्यंत नामनिर्देश पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २५/१०/२००२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत उप-महापोर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

श्री. स. सलीम स. युसूफ
श्री. निकाळजे प्रकश भाऊराव
सौ. साधना गणेश सुरडकर
श्री. स. अली मिरा सलामी
श्रीमती निखत परवीन ईजाज अली.
श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येत आहे. (मा. महापौर नगर सचिव यांच्या मदतीने छानननी करतात.)

वरील प्रमाणे छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील नामनिर्देशन पत्रे वैद्य ठरलेली आहेत.

श्री. स. सलीम स. युसूफ
श्री. निकाळजे प्रकश भाऊराव
सौ. साधना गणेश सुरडकर
श्री. स. अली मिरा सलामी
श्रीमती निखत परवीन ईजाज अली.
श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सूचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसले तर इच्छकांना या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्यांच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधीत म्हणजे ०४.०० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना उप महापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव ०४.०० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

उपमहापौर पदासाठी ०६ उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

श्री. स. सलीम स. युसूफ
सौ. साधना गणेश सुरडकर
श्री. स. अली मिरा सलामी
श्रीमती निखत परवीन ईजाज अली.
श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक

आता उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे |
|---|---|
| ०१ | श्री. निकाळजे प्रकश भाऊराव |

यानंतर स. सदस्य श्री. स. अली मिरा सलामी, श्री. भगवान घडमोडे, श्री. स. सलीम स. युसूफ, श्री. अफसरखॉन, सौ. निखत अली, श्री. दानवे अंबादास, श्री, कदीर मौलाना, श्री. राधाकृष्ण गायकवाड, डॉ. भागवत कराड, श्री. सुनिल मंगरे, श्री. अविनाश कुमावत, री. राजु शिंदे यांची समयोचित भाषणे झाली.

पिठासीन अधिकारी : श्री प्रकाश भाऊराव निकाळजे यांचे योग्य रितीने भरलेले एकच नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४८ अन्वये मी. प्रकाश भाऊराव निकाळजे यांची उपमहापौर पदावर

बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपमहापौर पदाचे सुत्र स्विकारून पदग्रृहण करावे व त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव क्र. २ :**

उपमहापौर पदासाठी श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे यांचे योगय रितीने भरलेले एकच नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिलयामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४८ अन्वये त्यांची उपमहापौर पदावर बिनविरोध झालेल्या निवडीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे यांनी उप-महापौर पदाचे पदग्रहण केले यावेळी मा. महापौर तत्कालीन उपमहापौर व प्रशासनातर्फे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. त्यानंतर नुतन उपमहापौर श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे यांनी सर्वांचे अभार व्यक्त केले व समायोचित भाषण केले.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-११-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार, दिनांक २०/११/२००२ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. सभेले संबंधित अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५) स.स.श्री. वाणि ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिसन
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
२१) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२७) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२८) स.स.डॉ. कराड भागवत किसनराव
२९) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३०) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३१) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
३२) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३३) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास

३४) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३६) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३७) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३८) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३९) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४०) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४१) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४२) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४३) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४७) स.स.श्रीमती शहीन जफर महमुद जफर
४८) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४९) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५०) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५१) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५२) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५३) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५४) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
५५) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५६) स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खॉ
५७) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५८) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५९) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६०) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६१) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६२) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
२) स.स.सलमा बानो मीर महमंद अली

**संवाद :**

श्री. काशिनाथ कोकाटे : सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती श्री. यादवराव पाटील यांचे नुकतेच दु:खद निधन झाले तयांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. सुदाम सोनवणे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.

श्री. नंदकुमार फुलारी : सिध्दार्थ उद्यानातील वाघीणीचा दु:खद मृत्यू झाला अशा प्राण्यांना मृत्यू झाल्यास त्यांना सुध्दा सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

याच वेळी स्व. यादवराव पाटील यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : मा आयुक्त आजच्या सभेला उपस्थित नाही. त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात यावी.

श्री. तकी हसन खान : ॲक्ट. मध्ये तसे काही नाही मा. आयुक्त नसतांना सुध्दा सभा घेता येऊ शकते. यापूर्वीही प्र. आयुक्त म्हणून उप-आयुक्त हे सभेला उपस्थित होते. आजही आहेत. म्हणून सभा तहकूब करणे योग्य वाटत नाही.

श्री. सोनवणे सुदाम : मागील बैइकीत ही मा. आयुक्त हे नसल्यामुळे प्र. आयुक्त म्हणून उपआयुक्त (म.) हे उपस्थित होते. आयुक्त नाहीत म्हणून सभा तहकूब करणे यास सहमत नाही. आयुक्तांच्या जगावेर उपआयुक्त हे बसलेले आहे. याची कल्पना सभागृहाला आहे. आयुक्तांच्या वतीने ते उत्तर देतील. विषय क्र. १ मध्ये इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले आहे. यामध्ये चर्चा करावयाची आहे. याबाबत मा. आयुक्तांनी देखील तयारी करून यावे. त्यासाठी सभा तहकूब करावी.

श्री. अफसरखॉन : स. सदस्यांच्या भावनेशी मी सहमत आहे. सभा तहकूब करावी.

मा. महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येत आहे.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा तहकूब केल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले. यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८-१२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार, दि. २९/१०/२००२ रोजी (दिनाक २०/११/२००२ ची तहकूब सभा) मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१०) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१३) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१५) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिसन
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२१) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२२) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२३) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२४) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२५) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२८) स.स.श्री. विकास रतनलाल जैन
२९) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३०) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३१) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३२) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३३) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन

३४) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३५) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३६) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३८) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३९) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४०) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४३) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४४) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
४५) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४६) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४७) स.स.श्री. अशरफ युनूस मोतीवाला
४८) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४९) स.स.सौ. संगिता बाळु मर्दे
५०) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५१) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
५२) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५५) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
५६) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५७) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५८) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५९) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
६०) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६१) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
६२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६४) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६५) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६६) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६७) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६८) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
६९) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७०) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## <u>स्विकृत सदस्य</u>

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

**संवाद :**

सौ. निखत परवीन : या महानगरपालिकेतील जेष्ठ वाहन चालक पै. शे. मोईन शे. बशीर उर्फ बब्बु यांचे नुकतेच निधन झाले सभागृहातर्फे त्यांना ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली देण्यासाठी ०२ मिनिटे उभे रहावे.

याच वेही सभागृहातर्फे जेष्ठ वाहन चालक पै. शे. मोईन शे. बशीर यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली

अविनाश कुमावत : उत्तम नगर भागात दीड महिण्यापासून ड्रेनेज लाईन खराब झालेली असून घाण पाणी वाहते आहे. तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून एकूण १५ रुग्ण डेंग्यू या आजाराने पिडीत आहेत. प्रशासन कडे वारंवार पत्र देऊनही कार्यवाही अद्याप झालेली नाही. ही अनाधिकृत वसाहत आहे म्हणून काम करता येत नाही असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यापूर्वी केलेल्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे व्हावी अशी आमची मागणी आहे. स्वेच्छा निधी देण्यास आमची परवानगी राहील.

कार्य. अभियंता (ड्रेनेज) : उत्तमनगर हि अनाधिकृत वसाहत असल्यामुळे शासन निर्देशाप्रमाणे जो पर्यंत गुंठेवारी होत नाही तो पर्यंत तेथील नवीन किंवा देखभाल दुरुस्तीचे कोणतेही कामे करता येणार नाही असे आदेश आहेत.

श्री. अविनाश कुमावत : नवीन कामे सुरू करू नये परंतु अगोदर झालेल्या कामावर देखभाल दुरुस्तीचे कामे करावीच लागणार असून तसा ठरावही या सभागृहाने घेतलेला आहे. शासन जी. आर मध्ये तसा उल्लेख नाही. देखभाल दुरुस्तीचे कामे करता येतात.

श्री. अफसर खॉन : स्वेच्छा निधीतून देखभाल दुरुस्तीचे कामे करता येतात. नवीन कामे करता येणार नाही. शासनाचे आदेश आहे. लोकांच्या सोयी सुविधेसाठी हे काम स्वेच्छा निधीतून करण्यांत यावे.

कार्य अभियंता (ड्रेनेज) : देखभाल दुरुस्तीची कामे सुध्दा करता येत नाही असे आदेश आहेत.

श्री. सुदाम सोनवणे : अनाधिकृत वसाहतीमध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करता येत नाही. असे शासनाचे आदेश आहे असे उत्तर अधिकारी यांनी दिले या प्रमाणेच मागील एका बैठकीत प्रश्न उपस्थित झालेला होता. त्यावेही मा. आयुक्त यांनी जी. आर. वाचून दाखविला होता. अनाधिकृत वसाहतीमध्ये अगोदर झालेल्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येणार नाही असा उल्लेख त्या जी. आर. मध्ये नव्हता व सभागृहाचा जो गैरसमज झाला होता तो दूर झालेला होता. अगोदर झालेल्या कामावर दुरुस्तीची कामे करू नये असा उल्लेख शासनाच्या जी. आर. मध्ये नसतांना अधिकारी सभागृहाची दिशाभूल करून विकास कामे न होऊ देण्याचा प्रयत्न करीत आहे. नवीन व जुन्या कामावर दुरुस्तीची कामे करू नये असा शसन जी. आर. जरी असेल तरी सुध्दा महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून स्वत: च्या बळावर चालते असे असतांना शासनाचे येणाऱ्या आदेशाचे किती पालन करायचे हा सुध्दा अधिकार या सभागृहाला आहे. या अगोदर अनाधिकृत वसाहतीमध्ये सुध्दा सुविधा दिलेल्या आहे. त्यावेळी सुध्दा त्या वसाहती अनाधिकृत होत्या शासनाच्या जेंव्हा लक्षात आले तेंव्हा अशा वसाहतीमध्ये

कामे करू नये असे शासनाचे जी.आर. काढलेला आहे. नेहमीच शासनाचे आदेशाचे पाल केल्यास या शहरातील नागरिकांचे आरोगय धोक्यात येईल. व या मनपाची बदनामी होईल. म्हणून अगोदर केलेल्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे मग तो कोणताही भाग असता तेथील कामे करण्यासाची आपण आदेश करावेत व अशी कामे ही स्वेच्छा निधीतून न होता महानगरपालिका फंडातून केली पाहिजे असेही आदेश द्यावेत.

मा. महापौर : स. सदस्य श्री. कुमावत यांचे वॉर्डात उत्तमनगर येथे ड्रेनेज लाईनचे काम तात्काळ करण्यात यावे जे की, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : मागील महिण्याची सभा कोणत्या कारणामुळे तहकूब करण्यात आलेली होती. मागील बैठकीत आयुक्त उपस्थित नव्हते म्हणूनसभा तहकूब केली आजही मा. आयुक्त सभेला उपस्थित नाही. तरी सुध्दा सभा चालविणार आहात का? आजची सुध्दा सभा तहकूब करावी असे माझे मत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : दोन मुद्दे या सभागृहात उपस्थित झालेले आहे. पहिला मुद्दा असा की, अनाधिकृत वस्तीमध्ये काम करण्या संदर्भात त्यानुसार सभागाहचे असे मत आहे की, आपण मा. आयुक्त यांना ड्रेनेज लाईनचे काम करण्याचे तात्काळ आदेश द्यावे. मागच्या वेळेस सुध्दा आयुक्तांनीच खुलासा केलेला होता. यावेळेसही मा. आयुक्तांनीच खुलासा करावा कि, काम करता येणार आहे किंवा कसे? अधिकाऱ्यांनी खुलासा केला काम करता येत नाही. हे कितपत योग्य आहे. संबंधित अधिकारी आदेशाचे पालन करणार नाही अशी शंका आम्हाला वाटते म्हणून आयुक्तांनी खुलासा करून त्वरित हे काम करण्यात यावे. दुसरा मुद्दा असा की, आताच स. सदस्य श्री. घोडेले यांनी मुद्दा उपस्थित केला की, मागील बैठकीत आयुक्त उपस्थित नव्हते म्हणून सभा तहकूब केलेली होती. आज ही आयुक्त नाही यापूर्वीही ही म्हणजेच गेल्या ४ महिण्यापासून बऱ्याच बैठकीमध्ये आयुक्त उपस्थित नव्हते व सभा तहकूब करावी म्हणून विनंती केलेली आहे. गेल्या अडीच वर्षामध्ये या शहरातील कामाचा अहवाल बघितला तर तो शुन्य आहे. अडीच वर्ष गेली. अडीच वर्षे राहिलेली आहे. अडीच वर्षानंतर जेंव्हा आपण जनते समारे जाऊ त्यावेळी ती सज्जन जनता विविध प्रश्नाच्या बाबतीत आपल्याला जाब विचारणार आहे. मागील वेळेस सुध्दा माझा असा प्रश्न होता की, आयुक्त असो किंवा नसो परंतु जे या सभागृहात आयुक्तांच्या खुर्चीवर आयुक्त म्हणून बसलेले असतात त्यांना सर्व अधिकार असावेत गेल्या दोन महिण्यापासून या महापालिका सक्षम आयुक्त नाही. अडीच वर्षाच्या काळात एकूण १५ ते १६ आयुक्त या महानगरपालिकेस लाभलेले आहे. हे दुर्वैवाने सांगावे लागते. या शासनाने अडीच वर्षाच्या काळात या महापालिकेत शाकीय अनुदान दिले तर नाहीच परंतु कायम स्वरुपी आयुक्त सुध्दा दिलेले नाही. सत्ताधारी पक्षाचे काही स. सदस्य या सभागृहात आहे. ज्या जनतेनी आपणांस निवडून दिलेले आहे. त्याचेशी विविध विकास कामाच्या संबंधित आपण सर्व संलग्न आहेत. १६ आयुक्त अडीच वर्षामध्ये या महानगरालिकेस दिले जात असेत तर महापौर तसेच या सभागृहाने जनतेचे प्रश्न कोणत्या पध्दतीने सोडवायचे हा महत्वाचा प्रश्न उभा आहे. वत्तपत्रात बातम्या येतात, पदाधिकारी, मा.

महापौर, मुख्य मंत्र्यांना पत्र देऊन या महानगरपालिकेस कायम स्वरुपी आयुक्तांची मागणी करतात. त्यांची सुध्दा दखल घेण्यात आलेली नाही. म्हणून मी या शासनाचा येथे निषेध करतो. शासन अनुदान तर देऊ शकले नाही परंतु कायम स्वरुपी आयुक्त या महापालिकेस शासन न देऊ शकले नाही. ही दुर्दैवाची बाब आहे. दोन महिण्यापासून आयुक्त रजेवर आहेत ४० दिवसाची त्यांची रजा होती त्यानंतर आता पर्यंत त्यांनी वेळोवळी रजा वाढवून घेत आहे कायम स्वरुपी आयुक्त नसल्याने कोणतीच विकास कामे होत नाही. याचे परिणाम शासनास भोगावे लागणार नसून तुम्हा आम्हाला भोगावे लागणार आहे. जनतेने तुम्हा आम्हाला निवडून दिलेले आहे. त्यांची कामे होत नसेल तर जनता आपल्याला प्रश्न विचारणार आहे. म्हणून या शासनाचा मी येथे निषेध करतो.

श्री. अविनाश कुमावत : गेल्या तीन महिण्यापासून ड्रेनेज लाईन फुटलेली असतांना आज ही अधिकाऱ्यांना विचारणा केल्यास संचिका सादर करून कार्यवाही करण्यता येईल असे उत्तर दिले जाते. आयुक्त म्हणून उप-आयुक्त या ठिकाणी बसलेले आहे. ड्रेनेज लाईनचे दुरुस्तीचे काम करणार की नाही याचा खुलासा आताच व्हावा.

श्री. सुदाम सोनवणे : आयुक्तांनी खुलासा करावा की हे काम करता येईल किंवा कसे?

श्री. शेख इलियास किरमाणी : ५ ते ६ महिण्यापासून स्वेच्छानिधीतून होणाऱ्या कामाच्या संचिका सहिसाठी आयुक्तांकडे पडलेल्या आहेत.

श्री. स. अली सलामी : मा. आयुक्त येत नाही म्हणून विकास कामे होत नाही. आयुक्तांचे अधिकार उप आयुक्तांना दिलेले नाही. बैठकी करिता उप-आयुक्त बसलेले आहे. असे वाटते प्र. आयुक्तांनी तसा त्यांना चार्ज दिलेला आहे. काय? खुलासा व्हावा याच वेळी मा. महापौर यांचे डायस समारे बरेच स. सदस्य एकत्र येवून मोठमोठ्याने बालतात काहीही एकू येत नाही. प्र. आयुतांना सभास्थानी बोलवावे अशी स. सदस्य मागणी करतात.

मा. महापौर : सर्वांनी आप-आपल्या जागेवर बसावे एका वेळी एकाच स. सदस्यांनी बोलावे. जो प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्या बाबतीत प्रशासनाचा खुलासा घेण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : मा. आयुक्त कायम स्वरुपी नसल्यामुळे मोठमोठाले घोटाळे या महापालिकेत झालेले आहेत. वृत्तपत्रात सुध्दा तशा बातम्या प्रसिध्द झालेल्या असून त्याची दखल घेतली जात नाही. (वृत्तपत्र सभागृहात दाखवितात)

मा. उप-महापौर : प्र. आयुक्त म्हणून उप-आयुक्त (म) हे बसलेले आहे आपण केलेल्या प्रश्नाचा खुलासा ते करतील.

श्री. सुदाम सोनवणे : उप-आयुक्त यांनी आयुक्त म्हणून जबाबदारीने खुलासा करावा समाधान कारक उत्तर द्यावे. जनतेची कामे झाली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे.

श्री. सुनिल मगरे : प्र-आयुक्त म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे चार्ज असतांना त्यांचे ऐवजी उप-आयुक्त हे सभागृहाचे बघू शकता का? नियमाने बरोबर आहे का?

प्र. आयुक्त (उप आयुक्त म.) : स. सदस्य श्री. कुमावत यांनी जो प्रश्न उत्तमनगर येथे ड्रेनेज लाईन दुरुस्तीचा उपस्थित केला सदरचे किरकोळ काम व अशी अनाधिकृत वसाहतमधील कामे करण्यासाठी, यापूर्वीचे मा आयुक्त यांनी

फेब्रुवारी २००२ मध्ये शासनाकडून परवागनी मागविलेली आहे. परंतु शासनाने अद्याप परवानगी दिलेली नाही. आगामी ८ दिवसाच्या आत शासनाकडून अशा भगामध्ये कामे करण्यासाठी परवानगी घेऊन कामे करण्यात येती्ल. व सदरचे काम सुध्दा पूर्ण करण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : प्र. आयुक्त म्हणून उप-आयुक्त (म) यांना आयुक्तांचे सर्व अधिकार दिलेले आहेत का? श्री. भगवान घडामोडे आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता ठेवणे महापालिकेचे कर्तव्य आहे म्हणून ड्रेनेज लाईनचे काम तात्काळ करावे. महापालिकेची जबाबदारी आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : नागरिकाचे आरोग्य धोक्यात येणार नाही या दृष्टीने तात्काळ तेथील काम करण्यात यावे. उपआयुक्त (म) यांना अधिकार दिलेले आहे का?

मा. महापौर : प्र. आयुक्त यांचेशी यबाबतीत चर्चा करण्यात येईल.

मा. महापौर : सभा ३० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ १२.४० वाजता पुन्हा सभा १.२५ वा सुरू)

श्री. किशनचंद तनवाणी : स. सदस्य श्री. कुमावत यांनी विचारणा केलेल्या कामाच्या बाबतीत काय निर्णय झाला.

मा. महापौर : स. सदस्य श्री. कुमावत यांनी उत्तमनगर येथील ड्रेनेज कामाची दुरुस्ती बाबत केलेल्या सुचनेप्रमाणे जनतेचे आरोग्याचा विचार करून हे दुरुस्तीचे काम तातडीने करून घ्यावे. व त्याचा अहवाल ०३ दिवसामध्ये सादर करावा.

श्री. विकास जैन : आपल्या आदेशाचे अधिकारी पालन करतील का? अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. ०३ दिवसात होणार की नाही.

कार्य. अभियंता (ड्रेनेज) : मी सदर कामाची संचिका फार तर सादर करू शकतो. आजच संचिका सादर करण्यांत येईल.

श्री. अविनाश कुमावत : प्रशासन काम करण्यास तयार नसेल तर प्रत्येक नगरसेवकांकडून १००/- रुपये जमा करून काम करून घ्यावे काय अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : तीन दिवसांच्या आता करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहे. काम करण्याची जबाबदारी आता प्रशासनाची आहे. महापौरांच्या आदेशाचे पालन होते की, नाही याची अहवालाद्वारे माहिती मिळेलच.

प्र. आयुक्त (उप आयुक्त म.) शासनाचे २६ फब्रुवारी २००१ चे जे परिपत्रक आहे त्या संदर्भातील शासनाचे २४ जानेवारी २००२ पत्रानुसार अनाधिकृत वस्त्यामध्ये जी देखभाल दुरुस्तीची जी कामे घ्यावयाची आहे त्या कामाच्या संदर्भात आताच स. सदस्य श्री. कुमावत यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात शासनाकडे जे संबंधित कार्यकारी अभियंता आहे. त्यांना तात्काळ पाठवून मंजुरी घेऊन ते काम करण्यात येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : काम १५ हजार रुपयाचे असून २०,०००/- खर्च करून त्या कामाची शासनाकडून मंजुरी आणायची हे कितपत योग्य आहे.

श्री. कदीर मौलाना : एक स. सदस्य यांनी उत्तमनगर भागाता काम करण्या बाबतचा मुद्दा उपस्थित केला त्यानंतर सभागृहात काही सदस्यांनी चर्चा करून शासनाचा निषेध ननोंदविला. परंतु शासनाचा निषेध करणे योग्य नसून मी निषेधाचा निषेध करतो. कायम स्वरुपी आयुक्त न दिल्याने व शासनाने अनुदान न

दिल्याने निषेध केलेला आहे तोा योग्य नाही गेल्या ३ वर्षात शासनाने या महानगरपालिकेस ४ ते ५ आयुक्त दिलेले आहे सतत बदल्या झालेल्या आहे यास महापालिका दोषी असून शासनाचा दोष नाही. महापालिकेची सत्ता चालविणे होत नसेल, आपण कार्यक्षम नसाल तर महापालिकेतून चालते व्हावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : शासनाच्या नियमाप्रमाणे अनाधिकृत वसाहतीमध्ये विकास कामे करता येत नाही असे कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केलेला आहे. जे नगरसेवकांचे स्वेच्छानिधी संबंधीची नियमावली आहे त्यास स्पष्ट आदेश दिलेले आहे की, ज्या ज्या वसाहतीमध्ये या अगोदर कामे केलेली आहे त्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येतील. असे स्पष्ट जी. आर. मध्ये दिलेले असतांना जाणीवपूर्वक अधिकारी / प्रशासन यांनी त्यांचा वेगळा अर्थ काढून नागरिकांना त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधापासून वंचित ठेवलेले आहे. म्हणून अशा अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही व्हावी. स्वेच्छानिधीची नियमावली सभागृहात वाचून दाखवावी जेण करून सर्व प्रश्न मार्गी लागतील. काम करू नये असे जी. आर. मध्ये दिलेले नाही. म्हणून शासनाचा यात काहीही दोष नाही.

श्री. अंबादास दानवे : अनाधिकृत वसाहतीमध्ये सुविधा देण्याच्या विषयावर मी चर्चा करणार आहे. शासनाच्या निषेध करण्यात आला, निषेधाचा निषेध करण्यात आला. गेल्या अडीच वर्षात या महापालिकेत १६ आयुक्त येऊन गेलेले आहे. माहिती घेतली असतांना जवळपास ४०० ते ५०० संचिका मंजूर होण्याच्या बाकी असून संचिकेवर सह्या करण्याचे अधिकार आयुक्तांना असतात. महापौरांना नाही हे सभागृहाने लक्षात घ्यावे. १६ आयुक्त दिलेले असून २-२, ३-३ महिने एक एक आयुक्तांनी काम केलेले असून खऱ्या अर्थाने कोणतेही काम झालेले नाही सेना-भाजप युतीचे जेंव्हा शासन होते त्यावेळी या महापालिकेस २७ कोटी रुपये दिलेले होते. महानगरपालिकेची परिस्थिती चांगली असतांना सुध्दा दिलेले होते. व तया रक्कमेतूनच अनाधिकृत वस्त्यामध्ये महापालिकेने सोयी सुविधा नागरिकांना दिलेल्या आहे. परंतु गेल्या अडीच वर्षापासून लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर अनुदान दिले नाहीच परंतु ज्या सुविधा अनाधिकृत वसाहतीमध्ये दिल्या जात होत्या त्या बंद केलेल्या आहे. या सभागृहात अधिकारी यांनी काम केले जाईल असे आश्वासन दिले तरी हे काम होऊ शकणार नाही कारण शासनाने बंधन घातलेले आहे. म्हणून शासनाचा निषेध करणे बरोबर आहे. या शहराचे विकासाचे प्रश्न असेल ते प्रश्न सोडण्यास हे सरकार अपयशी ठरलेले असून केंद्रशासनाच्या माध्यमातून बरेच अनुदान राज्य सरकाकडे दिलेले असून प्रतयेक महानगरपालिकेला किती अनुदान देण्यात यावे नावासह या बाबत राज्य शासनाकडे अनुदान दिलेले आहे. कोणत्या शहराला किती अनुदान द्यायचे हे ठरलेले असतांना सुध्दा या महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून अनुदान या महापालिकेस आलेले नाही. म्हणून पुन्हा एकदा मी माझ्या पक्षाच्या वतीने या शासनाचा निषेध करतो.

श्री. किशोर तुळशीबागवाले : गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी महापालिकेने केलेली नाही त्या बाबतीत अंमलबजावणी झालेली असती तर हा प्रश्न निर्माण झाला

नतसा यात शासनाची काहीही चूक नाही. शासनाचा निषेण करणे बरोबर नाही. सभागृहात राजकारण योग्य नाही.

श्री. भगवान घडामोडे : स. सदस्य श्री. कुमावत यांनी त्यांचे वार्डातील ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याचा प्रश्न उपस्थित केला त्या विषयास अनुसरून चर्चा होऊन शासनाचा निषेध केला या भागातील ड्रेनेज लाईन फुटलेली असून तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तात्काळ काम करण्यात यावे.

श्री. कदीर मौलाना : शासनाचा निषेध करणे बरोबर नाही. शासनाचा यात दोष नाही. याच वेळी मा. महापौर यांचे डायस समोर स. सभासद मोठमोठ्याने चर्चा करतात काहीही ऐकू येत नाही.

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेही एकाच स. सभासदाने बोलावे.

श्री. किशनचंद तनवाणी : स्वेच्छा निधीची नियमावली सभागृहात वाचून दाखववावी.

कार्य. अभियंता (ड्रेनेज) : मापालिका नगरसेवक स्वेच्छानिधीतून घ्यावयाचे कामाचे संदर्भातील मार्गदर्शक तत्वे परिपत्रक राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रत्येक नगरसेवकास नगरसेवक स्वेच्छानिधी म्हणून महानगरपालिका मध्ये प्रत्येक नगरसेवकास नगरसेवक स्वेच्छानिधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यता येत असलेली तरतूदीचा विनियोग योग्य अशा नागरी सोयी सुविधासाठी व्हावा यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावी व कोणती कामे घेण्यात येऊ नये याचा उल्लेख सोबतच्या प्रपत्र अ व ब मध्ये करण्यात आलेला आहे. सोबतच्या प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली कामेच नगरसेवक स्वेच्छाधितून घ्यावयाची असून त्यापैकी कोणती कामे आपआपल्या स्वेच्छानिधीतून घेण्यात यावीत हे ठरविण्याचा निर्णय संबंधीत त्या त्या नगरसेवकाचा असेल परंतु अशा कामाची रक्कम अंदाजित २.०० लक्ष रुपयाच्या वर असू नये. प्रपत्र अ नुसार नगरसेवकांनी त्यांचे स्वेच्छानिधीतून काम सुचविल्यानंतर महानगरपालिका अशी कामे इतर विकास कामाच्या विहित व कार्यपध्दतीनुसार करते. त्याच नियम व कार्यपध्दतीनुसार महापालिकेने हि कामे करावयाची आहे. फक्त निधी सोबतच्या नमूद केलेल्या प्रपत्र अ च्या बाबीसाठीच खर्च केला जाईल. प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या बाबीवर खर्च केला जाणार नाही. याची सर्व महापालिकांनी दक्षता घ्यावी. परिशिष्ठ ब मध्ये नगरसेवकांचे स्थानिक विकास मार्गदर्शन तत्वात बसत नसणार या कामाची नमूना यादी यामध्ये १ ते १५ दिलेले आहे १५ क्रमांकावर दिलेले आहे की, अनाधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छानिधी कोणत्याही कामासाठी वापरता येणार नाही.

श्री. प्रशांत देसरडा : जी. आर मध्ये नियम क्र. ३४ मध्येकाय दिलेले आहे ते वाचून दाखववावे.

कार्य. अभियंता (ड्रेनेज) : परिशिष्ठ अ मध्ये स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत नगरसेवक स्वेच्छानिधीतून घेण्यासठी अनुज्ञेय कामाची यादी यातील नियम क्र. ३४ मध्ये असे दिले की दिनांक २७ जानेवारी २००१ पूर्वी अनाधिकृत वस्त्यामध्ये नगरसेवक यांचे स्वेच्छानिधीतून केलेल्या कामाच्या दुरुस्तीसाठी.

श्री. संजय शिरसाठ : २ कोटीची कामे महापालिकेच्या फंडातून करण्यात यावी. हि सर्व कामे अे-१ ची आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : अधिकाऱ्यांची कामे करण्याची इच्छा नाही, प्रशासन कमकुवत झालेले आहे शासनाची मान्यतेनुसार कामे होत नाही, सर्वसाधारण सभेने ठराव पास केल्यानंतर त्यानुसार सुध्दा कामे प्रशासन करीत नाही. मनमानी पणाने प्रशासन कामे करीत आहे हे धोरण बरोबर नाही. नगरसेवक यांना वेठीस धरण्याचे काम अधिकारी करीत आहे.

कार्य. अभियंता (ड्रेनेज) हा विषय लेखा विभागाशी संबंधित आहे. मान्यता मिळावयास पाहिजे. ०५ मिनिटातच खुलासा करण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : आयुक्त तसेच अनाधिकृत वस्त्यामध्ये कामे करण्याच्या बाबतीती १ तासापासून चर्चा चालू आहे. अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करता येत नाही यावर अधिकाऱ्यांनी स्पष्ट खुलासा केलेला आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : या पूर्वीचे महापौर यांनी अनाधिकृत वस्त्यामधील कामे करण्याच्या संदर्भात जी वसाहत जवळपास २० वर्षापूर्वीची असेल अशा वस्त्यामध्ये विकास कामे स्वेच्छानिधीन करण्याचा निर्णय घेतलेला असतांना आता कामे करता येत नाही असे सांगितले जाते. या अगोदर ज्या ज्या ठिकाणी कामे केलेली आहे त्या भागात देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात यावी. उत्तमनगर सारखेच माझ्या वॉर्डातील समस्या आहेत कामे होत नसतील तर मी उपोषणास बसत आहे.

(याचवेळी मा. सदस्या श्रीमती मानकापे ह्या मा. महापौर यांच्या डायसमोर येऊन बसतात.)

मा. महापौर : आपला प्रश्न आपण आपल्या जागेवरून मांडावा योग्य ते आदेश प्रशासनास दिले जातील.

(याच वेळी स. सदस्या श्रीमती मानकापे ताई या आपल्या जागेवर जाऊन बसतात.)

श्री. जयवंत ओक : अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करता येणार की नाही यावर चर्चा चालू आहे. जी आहे जी. आर मध्ये दिले कामे करता येतात अधिकारी कामे करता येत नाही असे उत्तर देतात. ड्रेनेज लाईनचा प्रश्न उपस्थित झाला. काम कसे करता येईल याबाबतीत निर्णय घ्यावा. आदेश देऊन अर्थ नाही. तत्कालीन महापौर यांनी १० वेळेस आदेश देऊन अनाधिकृत वस्तीतील कामे व्हावीत म्हणून निर्णय घेतला का कामे होत नाही. शासनाने अनाधिकृत वसाहतीमध्ये विकास कामे करण्याचे बंद केलेले आहे. स्वेच्छानिधी असेल, महापालिका फंडातून अनेक, खासदार, आमदार निधी असेल सर्व कामे करता येत नाही. परंत यातून मार्ग काढण्यासाठी या सभागृहाने योग्य तो निर्णय घेऊन ड्रेनेज लाईन तसेच पाणीपुरवठा लाईनची जी अगोदरची कामे केलेली आहे अशा सर्वच भागात देखभाग दुरुस्तीची कामे करता येतील असा ठराव पास करावा असे माझे मत आहे. तसा ठराव पास करून आयुक्तांना उद्यापासून अशा वसाहतीमध्ये स्वेच्छानिधी, महापालिका फंडातून किंवा खासदार, आमदार निधीतून कामे करण्या संदर्भात आदेश द्यावेत. महापालिका स्वबळावर चालते. शासनाचा निधी वापरत नाही. शासनाचे सर्व नियम प्रशासन अंमलात आणते का. स्वच्छानिधी कसा वापरायचा हा आपला अधिकार आहे. नागरिकांचे समस्या सोडवण्यासाठी हा निर्णय घेतला असे शासनास कळवावे.

सौ. निखत परवीन : माझ्या वॉर्डात ड्रेनेज लाईनचे काम होते अद्याप केलेले नाही. अनाधिकृत वस्त्यातील कामाच्या बाबतीत चर्चा चालू आहे. परंतु अधिकृत वस्त्यामधील सुध्दा कामे होत नाही. विचारणा केली असता बजेट संपले असे सांगितले जाते. ड्रेनेज लाईन तसेच पाणी पुरवठ्याच्या लाईन जुन्या झालेल्या आहेत. त्या बदलण्यात याव्यात.

श्री. कदीर मौलाना : स्वेच्छा निधीतून कामे करण्यात यावी.

श्री. तकी हसन खॉन : शासनाचा स्चेच्छा निधी वापरण्या संबंधिचा जी. आर. वाचनू दाखववावा. याच वेळी स. सदस्य श्री स. सलीम स. युसूफ यांनी मा. महापौर यांचे डायस समोर ठेवलेला राजदंड उचलून दोन्ही हातात धरून उचलतात नुसती चर्चा चालू आहे निर्णय काहीच होत नाही असे मोठमोठ्याने बोलत होते.

मा. महापौर : स. सदस्य श्री. स. सलीम स. युसूफ यांनी राजदंड उचलून महापोर तसेच सभागृहाचा अवमान केलेला आहे म्हणून त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व निलंबित करण्यात येते. कृपया त्यांनी तात्काळ सभागृहाबाहेर जावे. (याच वेळी स. सभासद श्री. स. सलीम स. युसूफ सभागृहा बाहेर जातात.)

श्री. प्रशांत देसरडा : विषयपत्रिकेला सुरुवात करावी चर्चा नंतर करता येईल.

श्री. सुदाम सोनवणे : दीड ते दोन तसापासून एकाच विषयावर चर्चा चालू असतांना निर्णय काहीच झालेला नाही. नुसत्या चर्चेला अर्थ नाही. राजदंड पळविण्याचा प्रयत्न एका सदस्यांनी केलेला आहे. त्याबद्दल त्यांनी जे कृत्य केले त्यांचा मी येथे निषेध करतो. स. सदस्य असा उद्रेकपणा का करतात यांची सुध्दा कारणे शोधणे गरजेचे आहे. या महापालिकेस कोणी मालक राहिलेले नाही. व त्याच बरोबर स. सदस्य सुध्दा सभागृहात शिस्तीचे पालन करत नाही. शहरात नागरिकांसमोर स. सदस्यांची अशी प्रतिमा झालेली आहे की, ज्यांनी महापौर पद उपभोगले त्यांना सभागृहात येण्याची लाज वाटते. यास स. सदसयच जबाबदार नाही तर प्रशासन सुध्दा जबाबदार आहे. सभागृहात नुसती चर्चा होते विषय मंजूर होतात. आपण आदेश देतात. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालते प्रसिध्दी माध्यमातून जनतेसमोर बदनामी होत आहे. मी महापौर असतांना अशाच प्रकारचा एक प्रश्न उपस्थित झालेला होता. कटकट गेट येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचा तो प्रश्न होता. त्यावर चर्चा होऊन अनाधिकृत वसाहत आहे. म्हणून ड्रेनेज लाईन टाकता येत नाही असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिलेले होते. अगोदरची कामे कशी करण्यात आलेली आहे ती महापालिका फंडातून केलेली आहे. असे उत्तर प्रशासनाने दिलेले होते. काम करता येत नसेल तर अगोदरच्या झालेल्या कामावरील खर्च हा अधिकाऱ्यांच्या वेतनातून कपात करावा असे आदेश मी दिलेले होते. त्यानुसार काम करण्यात आले होते. याचे श्रेय ही जनतेसमोर जाते. जो जी. आर शासनाने काढलेला आहे तोा शासनाचा नाही तो निर्णय हा या आयुक्तांचा आहे. आयुक्त हे सुध्दा शासनाचे प्रतिनिधी आहे. शासनाच्या सल्यानुसार जे कुणी असेल तो प्रतिनिधी काम करीत असताता जी. आर मध्ये कुठेही उल्लेख नाही की, जुन्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे करू नये. परंतु जाणून बुजून विकास कामे होऊ नये. या महापालिकेची व त्याच बरोबर शिवसेना व सत्तारुढ पक्षाची बदनामी या शहराच्या नागरिाकांसमो व्हावी असे डायरेक्शन

या महापालिकेच्या आयुक्तांना शासनाने दिलेले असावे. अशी माझी शंका आहे. जी. आर. मध्ये उल्लेख नसतांना स्वेच्छानिधीतून सुध्दा अशी कामे करता येत नाही असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले. महापौर हे या शहराचे प्रथम नागरिक आहे. महापौरांनी घेतलेला निर्णय योग्य असो किंवा अयोग्य असो अधिकाऱ्यांनी त्याची अंमलबजावणी करावयास पाहिजे. असे माझे मत आहे. एक १५ हजार रुपयाचे कामासाठी ३ तासापासून चर्चा होते. व याची प्रसिध्दी जनतेसमोर आणतो आहे हे बरोबर नाही. १२८ कोटीचे बजेट असतांना १५०००/- रुपयाचे काम होत नसेल तर माझी अशी विनंती राहील की, शासनाला एक पत्र देऊन सभागृहाची बदनामी शासनाच्या माध्यमातून आमच्यावर येत आहे म्हणून ही महापालिका बरखास्त करावी किंवा आमचे राजीनामे घ्यावे. या ठिकाणी सेनेचे महापौर आहे म्हणून काही सदस्यांनी निषेधाचा निषेध केलेला आहे. निवडणूक होईपर्यंत महापौरांना पक्ष असतो परंतु एकदा निवडून आल्यानंतर व सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी बसल्यानंतर ते कोणत्याही पक्षाचे महापौर नसतात जनतेचे महापौर असतात. शहराचा विकास कसा होऊ शकेल हा दृष्टीकोन समारे ठेवून महापौरांनी निर्णय घ्यावयाचे असतात. त्यास साथ सुध्दा शासनाची लागते. परंतु या शहरातील जनतेसमारे या महापालिकाची जाणूनबुजून बदनामी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. युतीचे शासन होते तेंव्हा या महापालिकेस २७ कोटीचे अनुदान मिळालेले होते. आणि साडेचार वर्षात फक्त दोन आयुक्त आलेले आहेत होते. जे या मतदार संघातून निव्डून आलेले आहे त्या लोकप्रतिनिधींना सुध्दा शहराची काळजी असते. परंतु या शहराचे मतदार संघातील आमदार (मंत्री) हे महापालिकेची जनतेसमारे बदनामी काशी होईल या दृष्टीने काम करीत आहे जे या शहराचे स्थानिक आमदार आहेत त्यांना येथील जनतेने कामे होण्यासाठी निवडून दिलेले आहे विकास कामे महापालिकेच्या माध्यमातून होत नेसल तर सर्व सदस्यांनी राजीनामे तयार ठेवून विभागीय आयुक्तांची भेट घेऊन महापालिकेस कायम स्वरुपी आयुक्तांची मागणी करू. कायम स्वरुपी आयुक्त देण्यात येत नसेल तर जे दोन उपआयुक्त आहेत त्यांचेपैकी एक उप-आयुक्त यांचेकडे आयुक्तांचा पूर्णपणे कार्यभार सोपविण्याची मागणी करण्यात येईल. हे ही होत नसेल तर शिवसेनेच्या माध्यमातून न्यायालयात जनहित याचिका दाखल करून कार्यवाही करण्यांत येईल. जे स्थानिक लोकप्रतिनिधी आहे ज्या लोकांनी त्यांना निवडून दिले त्या लोकांसाठी त्यांनी विकास कामे करण्याच्या दृष्टीन लक्ष देण्याची गरज आहे. गुंठेवारी कायदा लागू केला किती लोकांनी प्रतिसाद दिलेला आहे याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. गुंठेवारी कायद्यामध्ये जनतेला काहीही फायदा नसून त्यांची आर्थिक हानी होणार आहे. तरी सुध्दा लोकांनी प्रतिसाद दिलेला आहे. आताच मा. आयुक्तांना दूरध्वीवरून सभागृहात येण्यास सांगितले तर नगरसेवक शिस्तीचे पालन करीत नाही म्हणून मी सभागृहात उपस्थित राहू शकत नाही असे उत्तर आलेले आहे. परंतु तसा प्रकार होणार नाही अगोदरच वेगवेगळ्या माध्यमातून या सभागृहाची प्रतिमा खराब झालेली आहे. मा. आयुक्तांना अशी विनंती करेन की, ज्या लहान कामाच्या संचिका आहेत त्या तात्काळ मंजूर कराव्यात. वर्क ऑर्डरवर सही होत नाही. माझ्याच वॉर्डातील एक काम

स्वेच्छा निधीतले आहे. ३ महिने झाले आयुक्त नसल्याने सही होत नाही. आयुक्तांनी वेळेवर कार्यालयात येऊन संचिकेवर सह्या केल्यास विकास कामे होतील व सदस्यांना बोलण्याची सुध्दा संधी मिळणार नाही. जो विषय आजच्या बैठकीत उपस्थित झाला त्यासाठी कायम स्वरुपी आयुक्त असण्याची गरज आहे. आयुक्त येत नसेल तर सभा तहकूब करावी व त्यांचेशी चर्चा करून त्यांना सभेला बोलविण्याची कार्यवाही करावी.

श्री. भगवान घडामोडे : जनतेची विकासाची कामे होण्यासाठी जनतेनी आपणा सर्वांना निवडून दिलेले आहे. जनतेची कामे हो नसेल तर नगरसेवक सभागृहात प्रश्न मांडणार नाही तर कुठे मांडणार? पक्षाचे विचार मांडायचे असतील बाहेर व्यासपीठ आहे. तेथे विचार मांडता येतील. शासन जी. आर. आहे त्यात कोणती कामे करता येत नाही ते दिलेले आहे. परंतु क्र. ३४ मध्ये असे दिले की, मागील स्वेच्छा निधी मधून विकास कामे केलेली आहे. त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येतात. निधीतून जी कामे केलेली आहे त्याच कामावर दुरुस्तीचे काम करता येईल. म्हणजेच शासनाने पायबंद घातलेला आहे. पक्ष बाजूला ठेवून एकमताने प्रश्न मांडून कामे करण्याचे प्रयत्न करावेत. मागील बॉडीमध्ये मी सदस्य होतो. नगरसेवक स्वेच्छानिधीतून गरीब मुलांना संगणक तसेच वाहन चालक प्रशिक्षण देता येत होते. ते सुध्दा शासनाने बंद केलेले असून सत्ताधारी शासनाचे सुध्दा त्यांचेच पक्षातील काही सदस्यांचा शासनावर याबाबतीत रोष आहे. परंतु बोलून दाखविता येत नाही. शासनाने खरोखरच संगणक तसेच वाहनचालक प्रशिक्षण बंद करून मोठी चूक केलेली आहे. प्रत्येक वेळी सभागृहात चर्चा होते. गोंधळ होतो. त्यामुळे जनतेसमारे बदनामी होते. व नगरसेवक चांगली वागणूक देत नाही म्हणून आयुक्त रजेवर असा गैरसमज जनतेमध्ये होतो. सध्याचे जे आयुक्त आहे, त्यांना कोणत्याही नगरसेवकांनी त्रास दिलेला नाही नसता त्यांनी तसा खुलासा करावा. विनाकारण सभागृहाला कुणी बदनाम करीत असेल तर या सभागृहातील सर्वच सदस्यांनी एकत्र येऊन शासनास उत्तर द्यावयास पाहिजे. यासभागृहाची प्रतिमा बाहेर बदनाम होते आहे. नगरसेवकांचे स्वत: चे कोणतेही वैयक्तिक काम आयुक्तांना सांगितलेले नाही. जनतेसाठीच सदस्य कामे घेऊन येतात. स. सदस्य श्री. घोडेले तसेच श्री. कुमावत यांचे वॉर्डात ड्रेनेज लाईन चोकअप झालेल्या आहेत. जनतेचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. आरोग्याच्या दृष्टीकोनातून जनतेला पाणी, ड्रेनेज तसेच स्वेच्छतेच्या बाबतीत संरक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. जबाबदारी झटकून चालणार नाही काम होत नसेल तर शासनाची सर्व सदस्यांनी जाऊन कायम स्वरुपी आयुक्त देण्याची मागणी केली पाहिजे अशा पध्दतीने चालत राहिले तर येणारा अडीच वर्षांचा कार्यकाळ सुध्दा असाच जाणार असून कोणतीच कामे होणार नाही. खूप चर्चा झालेली आहे. महापौरांनी आदेश दिले तरी काम होऊ शकत नाही. अधिकाऱ्यांनी स्वत: असे उत्तर दिलेले आहे. काम करता येत असेल तर अधिकाऱ्यांनी तसा खुलासा करून या विषयावरील चर्चा बंद करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करण्या संदर्भात बऱ्याच वेळ पासून चर्चा चालू असून बऱ्याच स. सदस्यांनी आपआपले मत मांडलेले

आहे. ज्या जनतेने आम्हाला निवडून दिलेले आहे. त्यांची कामे करण्यासाठी जे कर्तव्य म्हणून स. सभासद त्यांचेवरील जबाबदारी पार पाडत आहे. कर्तव्य म्हणून जनतेसाठी बाजू मांडण्याचे प्रयत्न सदस्य करीत असतात. १ ते २ वेळेस सभा तहकूब करण्यात आलेली आहे. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले आहे. मी उललेख करेल की, शासनाने जी स्वेच्छानिधीच्या संदर्भात नियमावली तयार केलेली आहे. त्यात कुठेही उल्लेख नाही की, कामे करता येणार नाही परंतु यापूर्वी अनाधिकृत वस्त्यामध्ये ड्रेनेज लाईन तसेच पाण्याच्या लाईनच टाकलेल्या आहेत अशा आगोदर केलेल्या कामावर देखभाल दुरुस्तीची कामे करता येतात असे स्पष्ट आदेश शासनाच्या नियमावलीमध्ये दिलेले आहे. असे असतांना जर कामे करण्यास अधिकारी तयार नसतील तर योग्य नाही. आताच एकच, सदस्यांनी उल्लेख केला की, अनाधिकृत वस्त्यामध्ये कामे करता येत नसतील तर तसा ठराव घेऊन निर्णय घ्यावा. परंतु यापूर्वीही तशा प्रकारचा ठराव या सभागृहाने पारील केलेला आहे. म्हणून आता पुन्हा ठराव करण्याची गरज आहे. असे मला वाटत नाही. महापालिका स्थानिक स्वराज्य संस्था असेल तरी सुध्दा शासनाच्या नियमाच्या अधिन राहून विकास कामे करून घेण्याची जबाबदारी या सभागृहाची तसेच प्रशासनाची आहे. शिवसेनेचे महापौर म्हणून निवडून आलेले जरी असतील तरी त्या आज शहराचे प्रथम नागरिक म्हणून आहे. सर्व शहरातील नागरिकांचे महापौर आहे. वैयक्तिक पक्षाचे नांवे घेवून फक्त शिवसेना भाजप पक्षाचे महापौर आहे असे आम्ही कदापी म्हणणार नाही. परंतु दुसरी बाजू अशी की, मुंबई, ठाणे, अमरावती येथे महापालिका असून तेथे सुध्दा शिवसेनेचीच सत्ता आहे. असे असतांना तेथील आयुक्तांची परिस्थिती काय आहे. या महापालिकेत आयुक्त का कायमचे राहत नाही याचा सुध्दा अभ्यास कराण्याची गरज आहे. इतर माहापालिकेत आयुक्त राहतात व या महापालिकेत काम करण्यास तयार नसतात यास सभागृह सुध्दा जबाबदार असू शकते. म्हणून शासनास दोष देणे बरोबर नाही या मागील परिस्थिती पाहता तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेब होते कार्यक्षम आयुक्त म्हणून त्यांची किर्ती आहे. का बदली करण्यात आली कुणी बदली केली याची सुध्दा माहिती घेणे आवश्यक आहे. स्थानिक आमदार व मंत्र्यांनी काय कामे करावयाची याबाबतीत हस्तक्षेप करण्याची या सभागृहाला आवश्यकता नाही. महापालिकेच्या कामात मंत्र्यांनी कुठल्याही प्रकारचा आजपर्यंत हस्तक्षेप केलेला नाही. मी मंत्री आहे उद्‌घाटनाला येणार नाही अशी भूमिका कधीही स्थानिक आमदारांनी केलेली नाही. मा. मंत्री महोदय श्री. दर्डा साहबे यांनी जवळपास या शहरासाठी एकूण ६७ कोटी रुपयाची कामे आजपर्यंत केलेली आहे. त्यासाठी आपण सुध्दा सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. म्हणून २०-२५ हजाराची कामे असतील ती कामे करून घेण्याची जबाबदारी या सभागृहाची आहे. महापौरांनी निर्णय घ्यावा व त्या कामास सुरुवात करून ती काम करून घेण्यात यावी. नियमाप्रमाणे अधिकारी कामे करण्यास पुढे होत नसतील तर हे सभागृह एकजुटीने काम करण्यास सहकार्य करेल यात शंका नाही. यापूर्वी एम.एस.ई.बी. विभागाने महापालिकेकडे १३० कोटी थकीत रक्कमेबाबत नोटीस दिलेली होती वृत्तपत्रात तसे दिलेले होते तेंव्हा सर्व पक्षाचे सदस्य एकजुटीने जाऊन

विद्युत पुरवठा कट न करून देण्याचा निर्णय घेतला व तशी मागणी केली तसेच या शहराचे पालकमंत्री श्री. डॉ. पद्मसिंह पाटील तसेच उर्जा राज्यमंत्री मा. दर्डा साहेब यांनी सुध्दा हस्तक्षेप केलेला होता. त्यांचा मोठा सहभाग यात होता म्हणून विद्युत पुरवठा खंडीत होऊ शकला नाही याची जाणीव सभागृहाला असावी म्हणून शासनास दोषी ठरवून चर्चा करणे किंवा निषेध करणे योग्य नाही. लहान कामाच्या बाबतीत नियमात बसत असेल तर सभागृहाने तसा निर्णय घ्यावा. व नियमाने कामे प्रशासन करण्यास तयार तसेल तर योगय ती कार्यवाही करण्याचा या सभागृहाने निर्णय घ्यावा. सर्व सदस्य आपल्याला सहकार्य करतील यात शंका नाही.

श्री. तकी हसन खॉन : शासनाने अनाधिकृत वसाहतीमध्ये विकास कामे करण्याचे बंद केलेले आहे. ठराव घेऊन उपयोग नाही. म्हणून अशा वस्तयामध्ये विकास कामे करणे शक्य होत नाही आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केलेला आहे. तयाचे कारण शासनाने गुंठेवारी कायदा लागू करण्याबाबत कळविलेले आहे. याबाबतीत कोणत्याही प्रकारची माहिती स्थानिक नागरिकांना होत नाही किती रक्कम गुंठेवारीची भरणा करावयाची याचा ताळमेळ लागत नाही त्यामुळे प्रतिसाद सुध्दा कमी प्रमाणात मिळत आहे. माझ्या माहिती प्रमाणे १०० संचिका तशाच पडून आहे. गुंठेवारी कायदा लागू करण्यासाठी एक विशेष कर्मचारी नियुक्त करून अनाधिकृत वस्त्यामध्ये जाऊन गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करण्यांत यावी. जेणेकरून अशा लहान लहान विकास कामे करण्यासाठी अडवणूक होणार नाही. अडीच वर्ष गेले आणखी अडीच वर्ष असेच जातील नुसती चर्चा करून अर्थ नाही. गुंठेवारी कायद्याची तात्काळ अंमलबजावणी व्हावी.

श्री. अफसर खॉन : स्थानिक आमदार विकास कामे करण्यास मदत करीत नाही अशी चर्चा आताच झालेली आहे. या उलट वृत्तपत्रात असे आलेले आहे की, स्थानिक आमदार व मंत्री महोदय यांनी दिले की, महापालिकेची विकास कामे करण्यास मी इच्छुक आहे अनेक महापालिकेसाठी योजना राबवू शकतो परंतु महापौर व पदाधिकारी तसेच तेथील प्रशासन मला प्रतिसाद देत नाही. गेल्या तीन वर्षापासून स्थानिक आमदार व मंत्री महोदय का कामे करू शकले नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : आमदार तसेच मंत्री महोदयाचे नांव देण्यात येऊ नये सभागृहाचा व त्यांचा काहीही संबंध येत नाही. योग्य ती चर्चा करण्यात यावी.

श्री. अफसर खॉन : सभागृहात प्रश्न उपस्थित करण्याचा मला अधिकारी आहे मी बोलत असतांना इतर सदस्यांनी मध्ये बोलू नये. जनतेनी मला निवडून दिलेले आहे. ( याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असतो. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. अ. रशीद अ. सत्तार : हा विषय सभागृहाचा होत नाही विषयावर बोलावे.

श्री. अफसर खॉन : मला बोलण्याचा अधिकार आहे. स्थानिक आमदार मंत्री महोदय यांनी वृत्तपत्रात बातमी दिली की, महापालिकेचे महापौर तसेच पदाधिकारी व प्रशासन हे सहकार्य करण्यास तयार नाही. म्हणून विकास कामे करण्याची इच्छा असूनही करता येत नाही असे दिलेले होते. अशा बातम्यामुळे नगरसेवकांची बदनामी होत आहे. स्थानिक मंत्री यांना कामे करता आली नाही "नाचता येईना अंगण वाकडे" असे म्हणण्याची वेळ आलेली आहे.

स्वतः मंत्री असूनही कामे करता येत नाही व पदाधिकाऱ्यांना नाव ठेवून योग्य नाही. अडीच वर्षाचा कार्यकाळ या सरकारला झालेला आहे. अनाधिकृत वस्त्यामध्ये कामे करण्याचे या शासनाने बंद केले तसेच जे गरीब बेरोजगार वाहनचालक तसेच संगणक पशिक्षण नगरसेवक स्वेच्छानिधीतून घेत होते ते सुध्दा बंद केलेले आहे. गरीब व्यक्ती प्रशिक्षणाची फि भरू शकत नव्हते. तसेच किडणी सारख्या महाभयंकर आजारावर औषधोपचारासाठी आर्थिक मदत स्वेच्छानिधीतून नगरसेवक देत होते ते सुध्दा या शासनाने बंद करून गरीब बेरोजगारांचा हक्क हिसकावून घेतलेला असून त्यांचेवर अन्याय केलेला आहे. राजकारण करणांरानी त्यांचे घरी करावे परंतु गरीबांवर अन्याय होईल असे कृत्य करणे योग्य नाही. म्हणून जे स्थानिक आमदार मंत्री आहे त्यांनी याबाबतीत शासनाकडे मागणी करून न्याय मिळेल यासाठी प्रयत्न करावयास पाहिजे होते. जनतेनी त्यांना कशासाठी निवडून दिले त्यांनी त्याचे कर्तव्य पार पाडावयास पाहिजे होते. म्हणून संगणक प्रशिक्षण तसेच वाहनचालक व किडणी सारख्या रोगांवर नगरसेवक स्वेच्छानिधीतून आर्थिक मदत देण्याचा या सभागृहाने ठराव घेवून कार्यवाही करावी व तसा ठराव शासनाकडे पाठवून द्यावा. यामुळे गरीब जनतेला सवलती मिळेल.

श्री. सुनिल मगरे : अनाधिकृत वस्त्यामध्ये कोणती कामे करावी. किवा करू नये याबद्दन चर्चा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी कायदा लागू केला प्रशासनाने कामास सुरुवात केली. माझ्या वॉर्डात अनाधिकृत वसाहत आहे गुंठेवारी कायदा लागू करण्यासाठी अशा भागातील जनतेला नकाशा काढून महापालिकेकडे दाखल करावा लागतो. गुंठेवारी कायदा लागू होण्यासाठी अनेक गरीब लोकांनी महानगरपालिकेकडे संचिका सादर केलेल्या आहे. परंतु महानगरपालिकेने पुढील कोणतीच कार्यवाही केलेली नाही. बऱ्याच काही अनाधिकृत वसाहतीमध्ये अगोदरच अनेक विकास कामे केलेली आहे. व गुंठेवारी कायद्याची अंमलबजवाणी लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने ज्या सुविधा दिल्या गेल्या त्या आता बंद केलेल्या आहे. काही वसाहतीमध्ये सुविधा न पुरविल्याने गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी होऊन या दृष्टीने लोकांनी संचिका सादर केलेल्या आहे. गरीब जनतेनी ५००-६०० रुपये हात उसने घेऊन नकाशे तयार करून घेऊन सादर केलेले आहे. तसेच जी नियमानुसार रक्कम भरावयाची होती ती भरलेली आहे. तरी सुध्दा पुढील कार्यवाही होत नाही. किती दिवस लोक थांबणार आहे केंव्हा कार्यवाही होणार आहे किती दिवस लागतील याचा प्रशासनाने खुलासा करावा. किती संचिका सादर झाल्या कोणत्या संचिके संदर्भात किती रक्कम भरून घेतलया याबाबतीत कोणतेही रेकॉर्ड महानगरपालिकेकडे नाही असे समजते.

श्री. स. अली सलामी : एका विषयावर इतका वेळ चर्चा करणे योग्य नाही. गुंठेवारी संदर्भात अधिकाऱ्यांकडून खुलासा घेण्यात यावा. मागील बैठकीत आयुक्त उपस्थित नव्हते म्हणून सभा तहकूब करण्यात आलेली होती. आजच्या बैठकीला सुध्दा मा. आयुक्त नाहीत.

नगर रचनाकार : गुंठेवारीच्या संदर्भात एकूण २५००/- अर्ज प्राप्त झालेले असतील.

श्री. सुनिल मगरे : कोणत्या भागातून किती संचिका सादर झालेल्या आहेत त्याचा खुलासा करावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. मगरे यांना संबंधित अधिकारी यांनी लेखा खुलासा या सदंर्भात द्यावा.

श्री. स. अली सलामी : मा. आयुक्त सुट्टीवर आहे. त्यांचे अधिकार उप आयुक्तांना दिलेले आहे का? त्यांना काही पत्र प्र. आयुक्त यांनी दिलेले आहे का? ते आयुक्त म्हणून बसलेले आहे की, उपआयुक्त म्हणून खुलासा करावा.

श्री. कदीर मौलाना : वाहन चालक, संगणक तसेच वैद्यकीय औषधोपचारासाठी नगरसेवक स्वेच्छाधिनतीन जी आर्थिक मदतीची योजना होती ती शासनाने बंद केली त्यामागे असे कारण होते की, बरेच लोक बोगस वैद्यकीय खर्च दाखवून नगरसेवक स्वेच्छानिधीतून रक्कम हडप करण्याचे प्रकार होत होते. त्याच बरोबर संगणक प्रशिक्षणाचे सुध्दा याप्रमाणेच होत होते. म्हणून शासनापर्यंत तक्रारी गेलेल्या होत्या. त्यामुळे शासनाने स्वेच्छाधिनतीन जी सवलत दिली जात होती ती बंद केलेली आहे. स्थानिक आमदारांनी काय करावे काय करू नये हा विषय सभागृहाचा नाही.

श्री. अविनाश कुमावत : विषय पत्रिकेस सुरुवात करावी इतर चर्चा करण्यात येऊ नये स्वतः मी ते काम करून घेईल.

श्री. स. अली सलामी : मा. आयुक्त सभेला उपस्थित नाही त्यांचे अधिकार उपआयुक्त यांना दिलेले आहे काय?

प्र. आयुक्त (उप आयुक्त म.) मा. आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश क्र. मआ/स्विय/२००२/५५५/दिनांक १८/१२/२००२ याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(५) अन्वये मा. आुयक्त यांनी सर्वसाधारण सभेसाठी त्यांचे वतीने उपस्थित राहून कामकाजामध्ये सहभागी होण्यासाठी मला आदेश दिलेले आहे.

श्री. जगदीश सिध्द : या शहराचे सौंदर्यीकरणासाठी हायमास्ट लाईटची निविदा झालेली होती पुढील कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. खुलासा देण्यात यावा. जवळपास १४ हायमास्टची निविदा होती.

श्री. स. अली सलामी : हायमास्ट या विषयाच्या अगोदर माझा एक प्रश्न आहे त्यावर चर्चा व्हावी जे की, सि.स. नं १५१८७ सेवनहिल च्या बाजूला जागा भूसंपादनाचा प्रस्ताव एप्रिल/मे २००२ च्या बैठकित प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झलेला आहे. सन १९८९ साली या जागेचा प्रस्ताव ऑलरेडी मंजूर करण्यात आलेला असून त्या जागेचा मोबदला सुध्दा देण्यात आलेला आहे. जागा सुध्दा ताब्यात घेतलेली असून पुन्हा १२ वर्षानंतर प्रस्ताव सादर करण्यासाठी येतोा व मंजूर होते हे योग्य नसून गेलया २ महिण्यापासून या जागेच्या संदर्भात सतत वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द होत आहे व यात महापालिकेची मोठ्या प्रमाणात बदनामी होत आहे. यात कोण दोषी आहेत. खुलासा देण्यात यावा. आता माहिती उपलब्ध होत नसेल तर येणाऱ्या २० तारखेच्या बैठकीत माहिती सादर करावी असे आदेश प्रशासनास देण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. स. अली सलामी यांनी जो प्रश्न उपस्थित केला तया संदर्भात येणाऱ्या २० तारखेच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी उपलब्ध ठेवावी.

श्री. जगदिश सिध्द : हायमास्ट दिव्याच्या संदर्भात निविदा काढलेली होती. संचिका कुठे आहे खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : स. सदस्यांनी मांडलेल्या सूचनेचा येत्या २० तारखेला संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**विषय क्र. ३/१ :**

दिनांक ०५/१०/२००२, १८/१०/२००२ अवि २९/१०/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. अंबादास दानवे : इतिवृत्तातील ठराव क्र. ७०६/१ पासून ठराव क्र. ७२९/२४ हे ऐनवेळचे ठराव म्हणून मंजूर करण्यात आलेले होते ते सर्व ठराव रद्द करून रेग्युलर विषयपत्रिकेवर नियमाप्रमाणे घेण्यात यावे.

श्री. अफसर खॉन : ऐनवेळचे सर्व ठराव रद्द करावेत.

मा. महापौर : आताच स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे ऐनवेळचे मंजूर केलेले सर्व विषयाचे इतिवृत्त स्थगित ठेवण्यात येत आहे. उर्वरित इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३/१ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक १८/१०/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक ७०६/१ ते ७२९/२४ पर्यंत हे सर्व मंजूर झालेले ठरावाचे इतिवृत्त स्थगित ठेवण्यास व दिनांक ०५/१०/२००२, १८/१०/२००२ आणि २९/१०/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४/२ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दिनांक ०२/१०/२००२ च्या मान्यतेने अग्निशमन विभागासाठी डबल व ट्रिपल फायर एक्सटेंशन ॲल्युमिनिय लॅडर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

१) डबल एक्सटेंशन ॲल्युमिनियम लॅडर खरेदी प्रस्ताव ०८ नग
किमंत १,०३,६३०X ०८= ८,२९,०४०/-

२) ट्रिपल एक्सटेंशन ॲल्युमिनीम लॅडर खरेदी प्रस्ताव ०५ नग.
एकूण १३ एक्सटेंशन ॲल्युमिनियम लॅडर खरेदी साठी रुपये २२,५१,७८०/-

करिता अग्निशमन विभागसाठी डबल व ट्रिपल फायर एक्सटेंशन ॲल्युमिनिय लॅडर खरेदीसाठी रुपये २२,५१,७८०/- (अक्षरी रुपये बावीस लाख ऐकावन्न हजार सातशे ऐंशी फक्त) खर्चाचा आर्थिक मंजुरी प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मान्यतेस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : अत्यंत महत्वाचा विषय विषयपत्रिकेवर घेतलेला आहे. या विषयास मंजुरी देण्यात यावी सर्वांचिच मान्यता असेल. परंतु जो पर्यंत मा. आयुक्त रजेवरून येत नाही तो पर्यंत हा प्रस्ताव असाच प्रलंबित पडलेला राहणार

आहे का? नुसते विषय मंजूर करून अर्थनाही. जनतेसमारे अमुक अमुक विषय मंजूर झाले असे दाखवायचे व अंमलबजावणी करायची नाही यास अर्थ नाही. म्हणून असे विषय मा. आयुक्त येत नाही तोा पय्रंत घेण्यात येऊ नये असे माझे मत आहे. मंजूर करून ही अंमलबजवावणी होणार नाही प्र. आयुक्त संचिकेवर सह्या करीत नाही उपआयुक्तांना अधिकार देण्यात आलेले नाही.

मा. महापौर : या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

श्री. अंबादास दानवे : दिवाळीच्या वेळेस उड्डाणपूल शेजारी आग लागलेली होती. आपणही प्रत्यक्ष त्या ठिकाणी भेट दिलेली होती. अशा घटनेच्या वेळी महापालिकेचे अग्निशमन दलाचे कर्मचारी अत्यंत कार्यक्षमपणे कामगिरी करतात. व अशी माहिती मिळाली या कर्मचाऱ्यांना घटनेच्या वेळी आगीपासून बचाव करण्यासाठी जे साहित्य वापरावे लागते ते दिले जात नाही. हे साहित्य देण्याबाबत मंजुरी होऊनही कार्यवाही झालेली नाही. म्हणून या कर्मचाऱ्यांना सुरक्षेतेच्या दृष्टीने जे जे साहित्य आवश्यक आहे ते देण्यात यावे असे आदेश प्रशासनास करावे.

मा. महापौर : महानगरालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना घटनेच्या वेळी काम करण्यासाठी ज्या ज्या साहित्यांचा वापर करावा लागतो ते सर्व साहित्य सुरक्षेतेच्या दृष्टीने देण्याची प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ४/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी ०८ नग डबल एक्सटेंशन ॲल्युमिनियम लॅडर व ०५ नग ट्रिपल एक्सटेंशन ॲल्युमिनियम लॅडर असे एकूण १३ एक्सटेंशन ॲल्युमिनियम लॅडर खरेदी करणेसाठी लागणाऱ्या रककम रुपये २२,५१,७८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# <u>पुरवणी विषय</u>

**विषय क्र. ५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील इतर प्रभागाप्रमाणे वॉर्ड क्र. ५५ इदिरांनगर दक्षिण (स्लम) प्रभागात देखील म.न.पा. तर्फे ५ फुटी गल्ल्यात जलनिःसारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे. सदरील गल्ल्या प्रत्याक्षात ५ फुटी ना राहता २ ते ३ फुट राहिलेली आहे. ठिक ठिकाणी तर गल्लीवरच अतिक्रमण झालेले आहे. मुख्य जलनिःसारण वाहिनीची खोली कमी आणि नागरिकांची मल वाहिनीची जोडणी जास्त खोलीवर असल्याने नैसर्गिक प्रवाह मिळू शकत नसल्याने येथील नागरिकांच्या घरात चार ते पाच दिवस घाण पाणी तुंबण्याची घटना वारंवार होत आहे. ज्या मुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच गल्ल्या अरुंद आणि लांब असल्यामुळे दुरुस्ती देखभालीसाठी खोदकाम करतांना भिंती पडून जिवित हानी देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करिता इंदिरानगर दक्षिण, प्रभागातील जलनिःसारण वाहिनी २० फुटी रस्त्यावर आणि तांत्रिक दृष्ट्या योग्य त्या खोलीवर टाकून नागरिकांचा नेहमीचा त्रास दूर करावा. प्रस्ताव मंजुरीस्ताव, पुढील कार्यवाहीस्तव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक - श्री. सय्यद अब्दुल कदीर
अनुमोदक - श्री. स. सलीम स. युसूफ

**संवाद** :

श्री. कदीर मौलाना सय्यद : या भागास महापालिकेने ५ फुटी गल्ल्यामध्ये जलनिसःसारण वाहिनी टाकलेल्या आहेत. सदर गल्ल्या सद्य परिस्थितीत ५ फुट न राहता लोकांनी जागोगाजी वाढीव बांधकाम केलेले असल्याने टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या बांधकामामध्ये खाली आलेल्या आहेत. जलवाहिनीची जोडणी जास्त खोलीवर असल्याने नैसर्गिक प्रवाह मिळत नाही. त्यामुळे घाण पाण्याचे डबके साचते जनतेचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. ड्रेनेज लाईन जलवाहिनी तसेच लाईट या सर्व सुविधा मागच्या बाजूने न ठेवता समारेच्या २० फुटी रस्त्यावर खोलवर टाकण्याची कार्यवाही करावी. तसेच या कामासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पात तरतूद करावी.

मा. महापौरः प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव क्र. ५/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ५५ इंदिरानगर दक्षिण, स्लम भागातील ५ फुटी गल्ल्यामध्ये टाकण्यात आलेल्या जलनिःसारण वाहिनीवरच्या गल्लीत ठिक ठिकाणी अतिक्रमण झालेले असून या जलनिःसारण वाहिनीस नैसर्गिक प्रवाह मिळू शकत नसल्यामुळे प्रभाग क्र. ५५ मध्ये २० फुटी रस्तयावर तांत्रिक दृष्ट्या योगय त्या खोलीवर मलनिःसारण वाहिनी टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व या कामासाठी येणाऱ्या खर्चास येत्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझा वॉर्ड क्र. १९ विष्णुनगर येथे महापालिकेची शाळा नसून वॉर्डातील गरीब विद्यार्थ्यांना दूरवर शिकण्यासाठी जावे लागते करिता वॉर्ड क्र. १९ विष्णूनगर येथे असलेल्या कै. रामभाऊ म्हाळगी सभागृह येथे इयत्ता बालवाडी ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग उघडण्यातयावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती पार्वतीबाई लहानु मानकापे
अनुमोदक - डॉ. श्री. भागवत कराड

**संवाद** :

मा. महापौरः सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ६/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. १९ विष्णुनगर येथे महानगरपालिकेची शाळा नसल्यामुळे वॉर्ड क्र. १९ येथे असलेल्या कै. रामभाऊ म्हाळगी सभागृह येथे बालवाडी ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग उघडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# प्रश्नोत्तरे

मा. श्री. शे. इसाक जैनोद्दिन शे. (नगरसेवक)
(प्राप्त दि. १६/१०/२००२)

**प्रश्न क्र. ९३ :** रोशनगेट ते रोशन फंक्शन हॉल पर्यंतचा भाग (शरिफ कॉलनी, रोशन कॉलनी, रोशन मस्जीदचा भाग) रहिवाशी क्षेत्रात येतो किंवा कसे? या भागात बांधकाम परवानगी देण्यांत येते का? हा भाग गावठाण मध्ये येतो किंवा कसे? सविस्तर माहिती देण्यात यावी.

सहा. संचालक (नगर रचना )

**उत्तर :** रोशन गेट ते रोशन फंक्शन हॉलचा भाग शरीफ कॉलनी, रोशन कॉलनी, रोशन मस्जीदचा भाग हा रहिवाशी क्षेत्रात येतो या भागाता बांधकाम परवानगी देण्यात येते. हा भाग विकास योजना-२००१ नुसार किराडपुरा स्लम (घोषित झोपडपट्टी) व आर-१ झोन (गावठाण) मध्ये येतो करिता महितीस्तव सादर.

**प्रश्न क्र. ९४ :** निराला बाजार येथील मंजूर रेखांकनामध्ये खुली जागा सोडण्यात आली आहे का? किती? तेथील व्यापारी संकुलासाठी वाहनतळासाठी जागा सोडण्यात आली का? किती? रेखांकनाच्या खुल्या जागेवर म.न.पा. चा मालकी व ताबा आहे का? नसेल तर कुणी अतिक्रमण केले का? वाहनतळाच्या जागेवर अतिक्रमण आहे का? कुणाचे? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :** निराला बाजार येथे मिळकतधारक श्रीमती जुमेखा बेगम मोतीवाला यांच्यानांवे रेखांकन मंजूर असून त्याची संचिका चौकशीचे कार्यवाही अंतर्गत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या संचिका मध्ये असल्याने सदर माहिती तुर्त देता येऊ शकत नाही. संचिका प्राप्त झाल्यावर त्याचे उत्तर देण्यात येईल. कृपया माहितीस्तव सविनय सादर.

**प्रश्न क्र. ९५ :** कटकट दवाजा येथील १० फुटी रस्त्यामध्ये सि. स. न. ११६०३, (शिट नं. ३३४,३३५,३३६,३३७) मधील किती जमीन बाधित झाली? मोबदला देण्यात आला का? किती? कुणास? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :** उक्त १०० फुट रुंद रस्त्यासाठी सि.स. नं. ११६०३, मधून उपलब्ध असलेल्या अभिलेख प्रमाणे कोणाला मोबदला दिलेला नाही किंवा उक्त जमीनीतून सदर रस्ता रुंदीकरण जागा संपादन केलेले आढळून येत नाही. तथापी न.भू.क्र. ११६०२, ११६०१, ची जमीन उक्त रस्ता रुंदीकरणासाठी

जागा संपादन केलेली असून त्याचा मोबदला श्री. सत्तार अ. वहाब यांना देण्यात आलेला आहे.

**प्रश्न क्र. ९६ :** औरंगाबाद म.न.पा. क्षेत्रा एकूण मंगळ कार्यालये किती? (खाजगी, धर्मदाय संस्थेचे म.न.पा.चे) म.न.पा. कडे याची नोंद आहे का? मंगळ कार्यालयाकडून मालमत्ता कर वसूल केला जाता का? मालमत्ता कर (घरगुती वापर किंवा व्यापारी वापर) कोणत्या प्रकारचा वसूल केला जातो? नळाचे कनेक्शन आहेत का? किती इंची? घरगुती वापर किंवा व्यापारी वापर? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :** सदर प्रश्नाची मालमत्ता विभाग, कर आकारणी विभाग व पाणीपुरवठा विभागांशी संबंधित आहे.

**प्रश्न क्र. ९७ :** अदालत रोडवरील तापडीया टेरेसेस या इमारतीलाबांधकाम परवानगी दिली का? परवानगी प्रमाणे बांधकाम झाले का? खुली जागा सोडण्यात आली का? लक्ष्मी ट्रॅव्हल्स, रॉयला ट्रॅव्हल्स, सम्राट ट्रॅव्हल्स, या ठिकाणी देखील बांधकाम परवानगी दिली का? येथील खुली जागावर अतिक्रमण झाले का? कुणाचे? सविस्तर माहिती द्यावी.

**उत्तर :** अदालत रोडवरील तापडीया टेरेसेसला इंडियन मेडीकल असोसिऐशन शाखा औरंगाबाद तापडीया कन्ट्रक्शन जी.पी.ए. सौ. पद्मा तापडीया श्री. एस.एम. सो. मे महावीर एंटरप्रायजेस या नावाने क्रमांक ३१९/१७/८८ नुसार बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. सदरची बांधकाम परवानगी पी आर कार्ड प्रमाणे क्षेत्र २२८५ चौ. मी. असे आहे.

तसेच लक्ष्मी ट्रॅव्हल्स व रॉयल ट्रॅव्हल्स दुकाने या परवानगी अंतर्गत मंजूर आहे त्याचप्रमाणे समारे ट्रॅव्हल्स असोसिएशन शाखा औरंगाबाद मे माडके कन्स्ट्रक्शन कंपनी या नावाने परवाना क्रमांक २९/९१ दिनांक ११-०१-१९९१ फाईल क्रमांक ८५८/१७/९० नुसार मंजूर करण्यात आले आहे. तापडीया टेरेसेस, मनमंदिर ट्रॅव्हल्सच्या बाजूला असलेल्या सामासिक अंतरात अनाधिकृत टपरी टाकून चहाचा व फराळाचा व्यवसाय चालू असल्याचे दिसून येते.

श्री. अंबादास दानवे
(प्राप्त दि. १२-११-०२)

**प्रश्न क्र. ९८ :**

अ) महानगरपालिकेच्या क्षेत्रात राहणाऱ्या जनतेच्या मुलभूत गरजांची सोय करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुख सोयीच्या विकासासाठी विशेष तरतूद व सहाय्यक अनुदान या योजनेत औरंगाबाद महानगरपालिकेस इ.स. १९९५-९६, ९६-९७, ९७-९८, ९८-९९, ९९-००, ००-०१, ०१-०२ व चालू आर्थिक वर्षात किती रक्कम प्राप्त झाली आहे?

**उत्तरे** (मुख्य लेखाधिकारी)

| | |
|---|---|
| १९९५-९६ | रु. १०.०० कोटी |
| १९९६-९७ | रु. ०५.१३ कोटी |
| १९९७-९८ | रु. ०४.०० कोटी |
| १९९८-९९ | रु. ०३.८३ कोटी |
| १९९९-०० | रु. ०५.०० कोटी |
| २०००-०१ | रु. ०४.०० कोटी |
| २००१-०२ | रु. ०१.५० कोटी |
| **एकूण रु.** | **३३.४६ कोटी** |

उपरोक्त नुसार शासनाकडून विशेष अनुदान प्राप्त झालेले आहे.

ब) प्रतिवर्षी प्राप्त आर्थिक तरतुदीचे विनीयोग प्रमाणपत्र राज्य शासनास सादर केले आहे काय? असल्यास त्याच्या सत्यप्रती द्याव्यात.

सन १९९५-९६ ते १९९९-२००० या आर्थिक वर्षात प्राप्त तरतूदीचे विनियोग प्रमाणपत्र शासनाकडे सादर केलेले आहेत. सन २०००-०१ सन २००१-०२ या आर्थिक वर्षातील प्राप्त तरतुदीतील कामे सुरू असून काम पूर्ण झाल्यावर विनियोग प्रमाणपत्र शासनाकडे सादर करण्यात येईल.

क) महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुख सोयीच्या विकासासाठी विशेष तरतूद व सहाय्यक अनुदान या सदराखाली जास्तीत जास्त तरतूद प्राप्त करण्यासाठी महानगरपालिकेने काय प्रयत्न केले आहेत?

महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयीच्या विकासासाठी विशेष तरतूद व सहाय्यक अनुदान प्राप्त करण्याकरिता प्रशासनामार्फत वेळोवळी शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे, भूसंपादन करून नविन रस्ते, विकास इमारती व व्यापारी संकुले उभारणे, नविन उद्यान विकसित करणे, स्मशानभूमी व कब्रस्तान विकसित करणे या बाबत विकास कामाचा आराखडासुध्दा शासनाकडे सादर केलेला आहे.

**प्रश्न क्र. ९९ :**

अ) रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी सहाय्यक अनुदान ही योजनेची जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन मंडळा मार्फत राज्य शासनाच्या वतीने अंमलबजावणी करण्यांत येते काय?

ब) महानगरपालिकेच्या रुग्णालयांना अनुदान देण्यासाठी जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत आतापर्यंत किती रक्कम मागील पाच वर्षात प्राप्त झाली आहे.

क) नसल्यास आतापर्यंत नियोजन व विकास मंडळा मार्फत रुग्णालयाच्या आधुनिकीकरण करण्यासाठी सहाय्यक अनुदान प्राप्तीसाठी मनपा मार्फत काय कार्यवाही केली आहे? केली असल्यास कार्यवाहीची सविस्तर माहिती द्यावी. कार्यवाही केलेली नसल्यास त्याची कारणे स्पष्ट करावीत. भविष्यात महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या कोणत्या योजना आहेत?

**उत्तरे** (आरोग्य वैद्यकीय अधिकारी)

अ) रुग्णालयाचे आधुनिकीकरण करणेसाठी सहाय्यक अनुदान जिल्हा नियोजन मंडळ मार्फत मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या वतीने अंमलबजावणी होत नाही.

ब) महानगरपालिकेच्या रुग्णालयांना जिल्हा नियोजन व विकास मंडळा मार्फत मागील पाच वर्षात कोणती रक्कम प्राप्त झाली नाही.

क) आधुनिकीकरण करणेसाठी सहाय्यक अनुदानासाठी मनपाने यापूर्वी कार्यवाही केलेली नाही. जिल्हा नियोजन विकास मंडळ या विभागास त्यांचे नियोजन व सहाय्यक अनुदान बद्दल व त्यांच्या होणाऱ्या बैठकीस मनपास बोलविण्यता आल्याचे दिसून येत नाही. तथापी युरोपीयन कमिशन तर्फे म.शा. वतीने आरोग्य व कुटूंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत सेक्टर अन्व्हेस्टमेंट कमिटी गठीत होऊन मनपाच्या ४ नागरी आरोग्य केंद्रानां श्रेणी वर्धीत (अपग्रेड) कार्यवाही आरोग्य विभागातर्फे चालू आहे. नजीकच्या भविष्यात उक्त ४ ठिकाणी २४ तास वैद्यकीय सेवा देण्याची रुग्णालय कार्यान्वीत होणार आहे.

**प्रश्न क्र. १०० :**

अ) नागरी भागातील दलित वस्त्यामध्ये सुविधा पुरविणे विषयी राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेअंतर्गत नागरी दलित वस्ती सुधरणा योजना अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाच्या मार्फत इ. स. १९९५ ते आजपर्यंत प्रत्येक आर्थिक वर्षात किती रकमेचे आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे?

ब) नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत आगामी काळात महानगरपालिकेच्या माध्यमातून विशेष कालबध्द कार्यक्रमाची आखणी करणार आहात काय? सद्य स्थितीत सदर योजनेखाली कोणकोणते उपक्रम चालू आहेत?

**उत्तरे** (शहर अभियंता)

अ औरंगाबाद महानगरपालिकेस सन १९९५ नंतर दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासना मार्फत रुपये १२५ लाख इतके अनुदान प्राप्त झाले असून यामध्ये प्रस्तावित करण्यात आलेले सर्व कामे पूर्ण झाली आहेत.

ब) सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधारणा योजने मध्ये रु. १०९ लाख इतक्या रक्कमेचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आले असून शासनाच्या मंजुरीनंतर सदर प्रस्तावा अंतर्गत असलेली कामे प्रशासकीय कार्यवाही नंतर पूर्ण करण्यात येतील.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-१२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शुक्रवार, दि. २९/१०/२००२ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ४.३० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१४) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१७) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१८) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
२० स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१ स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२ स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३ स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२४ स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२५ स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२८) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२९) स.स.श्री. शिरसाठ संजय किसनराव
३०) स.स.डॉ. कराड भागवत पांडुरंग
३१) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३२) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव

३३) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३४) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
३५) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३६) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३८) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३९) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४०) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४१) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४३) स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
४४) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४५) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४६) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४८) स.स.सौ. संगिता बाळु मर्दे
४९) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५०) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
५१) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
५९) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
६०) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६१) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
६२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६३) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६४) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६५) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६६) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६७) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७८) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
७९) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
७०) स.स.सौ. निखात परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे

३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद :**

श्री. राधाकृष्ण गायकवाड : स. सदस्य श्री. जबिंदा यांचे बंध स्व. सुरजितसिंग जबिंदा यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

डॉ. भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.
(याचेवेळी स. सदस्य श्री. जबिंदा यांचे बंधू स्व. श्री. सुरजितसिंग जबिंदा यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्धता पाळनू श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री. भरत लकडे : दिनांक १८/१०/२००२ च्या सर्वसाधारण सभेत, माझ्या वार्डातील महापालिकेच्या जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात मी मुद्या उपस्थित केलेला होता. तयावर मा. महापौर यांनी झालेले बांधकाम १ दिवसात संबंधित व्यक्तीने स्वत:हून काढले नाही तर प्रशासनाने तात्काळ काढावे असे आदेश दिलेले होते. दोन महिने झाले अद्याप कार्यवाही केलेली नाही. महापौरांनी आदेश केल्यानंतर कार्यवाही होत नसेल तर हा महापौरांचा अपमान आहे म्हणून असा अपमान आहे. म्हणून असा अपमान होत असेल तर बैठकच कशासाठी आपण घेता. म्हणून जो पर्यंत तेथील अतिक्रमण काढले जात नाही तो पर्यंत बैठक घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : जवळपास दीड तास सभा उशीरा झालेली आहे. का उशीर लागलेला आहे खुलासा करण्यात यावा.

श्री. स. अली सलामी : अगोदर चर्चा घेण्यात यावी त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

श्री. अंबादास दानवे : विषपत्रिका सुरू करावी त्यानंतर चर्चेला वेळ देण्यात यावा.

मा. महापौर : विषयपत्रिका सुरू करण्यात येत आहे. चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

**विषय क्र. ७/१ :**

दिनांक २०/११/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. महापौर : विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ७/१ :**

दिनांक २०/११/२००२ रोजी संपन्न झालेली सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**विषय क्र. ८/२ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दशनाम गोसावी समाज स्मशान भूमीसाठी गट क्र. ४ मधून

(०.४०आर) एक एकर जमीन देण्याचे प्रस्तावित करून दि. १९/०५/२००१ रोजी संपन्न झलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ठराव क्र. ३९१/३ नुसार ठरावास मंजुरी देण्यात आलेली होती, परंतु प्रस्तावित जागा खोलगट भाग असल्याने भरती करून विकसित करावी लागली असती आणि सदर जागा दशनाम गोसावी समाज यांनी सुध्दा नाकारली त्यामुळे दि. १७/०७/२००२ रोजी मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समिती, वॉर्डाचे स. नगरसेवक, मा. उपआयुक्त (प्र.) मा. सहा. संचालक नगर रचना उप अभियंता, मा. मालमत्ता अधिकारी यांनी स्थळ पाहाणी करून व पंचनामा करून एक एकर जागा खालील चतु:सिमे प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे सर्व औपचारीकता पूर्ण करून शासनाची रितसर मान्यतेच्या अधिन राहून जागा दशनाम गोसावी समाज स्मशान भूमीसाठी प्रदान करण्यात आली आहे चतु:सिमा व विकास योजना भाग नकाशा खालील प्रमाणे आहे.

चतु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | - | म.न.पा. शाळेची सहान जागा |
| पश्चिमेस | - | सरकारी नाला |
| उत्तरेस | - | सहान जागा / मांडकी रोड |
| दक्षिणेस | - | सरकारी नाला |
| दक्षिणोत्तर | - | १३५ मी. |
| पूर्व-पश्चिम | - | ३० मी. |

एकूण समुचित क्षेत्र ०.४० आर (एक एकर ) वरील चतु:सिमा ग्राह्य धरून सदर सिमांकनाचा वायव्येस असलेल्या दर्गाची जागा सोडण्यात यावी व उर्वरित क्षेत्रापैकी.

उपरोक्त गट क्र. ४ (चार) नारेगांव एकूण क्षेत्र ५ हेक्टर ८१ आर (१४ एकर २० गुंठे) क्षेत्र म.न.पा. च्या ताब्यात असून मंजूर विकास योजना वाढीव हद्दनुसार आरक्षण क्र. ८ Housing for Dishoused (बिस्थापीतचे पूर्नवसन) साठी आरक्षित आहे. या आरक्षणातून दशनाम गोसावी समाज स्मशान भूमीसाठी वरील चतु:सिमेत प्रमाणे ०.४० आर (एक एकर) जमीन स्मशान भूमीच्या वापरासाठी व विकसीत करण्याच्या प्रस्ताव मान्यतेनंतर लगेच सुरू करण्याचीही या प्रस्ताव मान्यतेसोबत मान्यता व्हावी तसेच पूर्वीच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ३९१/३ दि. १९/०५/२००१ रद्द करून नवीन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर मान्यतेनंतर प्रस्ताव रितसर शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ८/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १९/०५/२००१ ठराव क्र. ३९१/३ रद्द करून नारेगांव येथील गट क्र. ४ येथे औरंगाबाद विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. ८ विस्तापितांचे पुनर्वसन यासाठी आरक्षित असलेल्याएकूण क्षेत्र ५ हेक्टर ८१ आर (१४ एकर २० गुंठे) क्षेत्रापैकी खालील चतु:सिमेतील ४० आर क्षेत्र (१ एकर जमीन) दशनाम गोसावी समाजाच्या स्मशान भूमीच्या वापरासासाठी व लगेच विकसित करण्यास तसेच महाराष्ट्र प्रादेशिक वनगरररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेर बदलाचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

पूर्वेस - म.न.पा. शाळेची सहान जागा

पश्चिमेस - सरकारी नाला
उत्तरेस - सहन जागा / मांडकी रोड
दक्षिणेस - सरकारी नाला
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/३ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील प्रस्ताव क्रमांक टीपीएस २४००-३६७/प्र.क्र.-२४/नवि-९ दिनांक ३० सप्टेंबर २००० अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) खाली महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हेरीटेज नियमावली व ऐतिहासीक दृष्ट्या आणि वास्तुशास्त्रीय दृष्ट्या जतन करावयाच्या वास्तुंची यादी सामाविष्ट करावी म्हणून आदेश दिलेले आहेत. त्यासठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत खालील दर्शविल्यानुसार नविन नियम क्र. २८ म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याचे २८ (६) चे नियमन ॲपेडीक्स "यू" (U) म्हणून प्रस्तावित केले असून वास्तुशास्त्रीय व ऐतिहासिक दृष्ट्या जतन करावयाच्या वस्तुंची यादी सामाविष्ठ करणेचे दुरुस्ती करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

करिता सोबत जोडलेल्या नियम क्र. २८ साठीचे शेड्यूल व ॲपेडीक्स "यू" (U) प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीत दुरुस्ती करणेस व यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेर बदल करणेस मंजुरी होणेस्तव व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर कलम ३७ ची कार्यवाही करणेचे व शासनास प्रस्ताव सादर करणेचे सर्व अधिकार व मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देणेचे मान्यतेस्तव सादर.

अंबादास दानवे : सदर विषय हा शहर सुधार समितीच्या माध्यमातून घेण्यात यावा.
मा. महापौर : हा प्रस्ताव शहर सुधार समितीकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ९/३ :**

प्रस्तुत प्रस्ताव शहर सुधार समितीच्या मंजुरीनंतर सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०/४ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरास सध्या दररोज ११० द.ल.ली.ली. एवढा पाणी पुरवठा करण्यांत येतो. शहराची व लोकसंख्येची वाढ लक्षात घेता तसेच पाण्याचावापर लक्षात घेता पावसाळ्यात घराचे छातावरील पावसाचे पाणी, घरगुती वापरासाठी उपयोगात घेता येऊ शकते.

दिवसेंदिवस पावसाचे प्रमाणे कमी होत असून, पाण्याचा वापर वाढल्याने जमिनीमधील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे.

सध्या पावसाळ्यात रहिवाशंच्या घरांच्या छतावरील पाणी विना वापर वाहून जाते व त्याचा शहरातील नागरिकांना काहीही उपयोग होत नाही. तयास्तव हे पाणी घराच्या छतावरून पन्हाळीद्वारे जमिनीत, विघ्न विहिरीत जामा केल्यास जमीनीती पाणी पातळीत वाढ होईल व जमिनीची पाणी पातळी वाढल्यामुळे उन्हाळ्यामध्ये शहरातील विहिरींना व

विंधन विहिरींना पाणी उपलब्ध राहील व हे पाणी नागरिकांना पिण्यासाठी तसेच घरगुती वापरासाठी उपलब्ध होईल. त्यामुळे शहरातील रहिवाशांना उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासणार नाही. त्यास्तव Roof top rain water harvesting करण्याकरिता औरंगाबाद शहरातील नागरिकांना उद्युक्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातर्फे देखील शिवकालीन पाणी साठवन कार्यक्रम अंतर्गत Roof top rain water harvesting चा कार्यक्रम महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागात राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजवाणी देखील सुरू झालेली आहे.

भुस्तरावर, भुगर्भात उपलब्ध असणारे पाणी दिवसेदिवस कमी होत असल्याने पाण्याच्या नवनवीन स्त्रोतांचा शोध घेणे कालातराने शक्य होणार नाही. कारण या स्त्रोतांमध्ये पावसाद्वारेच पाणी उपलब्ध होते. स्त्रोतात जलनिर्मिती होत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने तर्फे देखील शासनाच्या वरील धोरणानुसार पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करून भूजल स्त्रोतांतील साठा वाढविण्यासाठी कार्यक्रम राबविण्याचा मानस आहे. या संदर्भान अधिक माहिती घेतली असता, मध्यप्रदेश शासनातर्फे जलपुनर्भण तथा भूजल संवर्धने हा कार्यक्रम राज्यात ठिक - ठिकाणी राबविण्यात येत असून नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्रात जो नागरिक स्वतःच्या घरच्या छतावरील पावसाचे पाणी विधन विहिरीत किंवा विहिरीमध्ये पुनर्भरण करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारतील त्यांना त्यांच्या घराच्या मालमत्तेच्या वार्षिक भाडे मुल्यास ६% पर्यंत अतिरिक्त वजावट देण्यात येईल. अशा प्रकारचा नियम मध्यप्रदेश सरकारने तयार केलेला असून मध्यप्रदेश शासनाने दिनांक २३ मार्च २००१ रोजी एक राजपत्र प्रकाशित करून वार्षिक भाड मुल्य नियमामध्ये वरील तरतूद समाविष्ठ केलेली आहे.

अशाच प्रकारची तरतूद औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांसाठी केल्यास, नागरिक जल पुनर्भरण कार्यक्रमास आपला सक्रिय सहभाग नोंदवतील अशी अपेक्षा आहे. तसेच जलपुनर्भरण साठीची यंत्रणा उभारण्यासाठी नगर रचना विभागातर्फे बांधकाम परवानगी देतांनाच जर पूर्व अट घातल्यास नागरिक अशा प्रकारची यंत्रणा उभारतील व जमिनीतील पाण्याचा साठा वाढविण्याच्या महानगरपालिकेच्या कार्यक्रमास लोक सहभागातून मदतच होईल.

तरी वर नमूद केल्यानुसार पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करणाऱ्या नागरिकंना त्यांच्या मालमत्ता करात योग्य ती सुट देणे व नविन बांधकामाच्या वेळी जलपुनर्भरणाची यंत्रणा उभारण्याची अट बांधकाम परवानगी देतांनाच नगर रचना विभागातर्फे घालावे या दोन बाबींवर विचार होऊन सदरचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद** :

श्री. भगवान रगडे : चर्चा न करता विषय मंजूरकरणे योग्य नाही विषयावर चर्चा करावी त्यानंतर निर्णय घेण्यात यावा. (याचवेळी मा. महापौर डायस समोर बरेच स. सभसद गर्दी करतात व मोठमोठ्याने बोलतात चर्चा अगोदर घ्यावी अशी मागणी करतात. मोठमोठ्याने बोलण्याचा आवाज येतो.)

मा. महापौरः सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे व एका वेळी एकाच स. सदस्यांनी बोलावे मा. महापौर यांनी सूचना करूनही स. सभासद आपआपल्या जागेवर बसण्यास प्रतिसाद न दिल्याने व मोठमोठ्योन बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

मा. महापौर : विषय ४ मंजूर करण्यात येत असून पुरवणी विषयपत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १०/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराची व लोसंख्येतीची वाढ लक्षात घेता पावसाळ्यात घराच्या छतावरील पावसाचे पाणी घराच्या छतावरून पन्हाळीद्वारे जमिनीस विंधन वहिरीत जमा केल्यास जमिनीतील पाणी पातळीत वाढ होईल व जमिनीची पाणी पातळी वाढल्यामुळे उन्हाळ्यामध्ये शहरातील विहिरींना व विंधन विहिरींना पाणी उपलब्ध राहील व हे पाणी नागरिकांना पिण्यासाठी तसेच घरगुती वापरासाठी उपलब्ध होईल याकरिता औरंगाबाद शहरातील नागरिकांना Roof top rain water harvesting चा कार्यक्रम राबविण्यास उद्युक्त करून जे नागरिक स्वत: च्या घराच्या छातावरील पावसाचे पाणी विंधन विहिरीत किंवा विहिरीमध्ये पुनर्भरण करणेसाठी जल पुनर्भरण तथा भूजल संवर्धन करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारतील अशा नागरिकांना त्यांच्या मालमत्ता करात योग्य ती सुट देणे व नविन बांधकाम परवानगीच्या वेळी जल पुनर्भरणाची यंत्रणा उभारण्याची अट बांधकाम परवानगी देतांनाच लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ***<u>पुरवणी विषय</u>***

**विषय क्र. ११/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येता की, मसनतपुर येथील एम.आय.डी.सी. चा प्लॉट क्र. ९०,९०/२, ९०/१ सेंट्रल वेअर हाऊस व बोथरा ऑईल मिल या दोघांच्या मधील प्लॉट मधील प्लॉट, महानगरपालिकेने मसनतपुर येथील नागरिकांसाठी व लहान मुलांसाठी उद्यान व सार्वजनिक कार्यक्रमा करिता उपलब्ध करावा व या प्लॉटवर उद्यान व सांस्कृतिक हॉल विकसित करण्यात यावे.

करिता एम.आय.डी.सी. चा प्लॉट क्र. ९०,९०-१, ९०-२ महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. राजु शिंदे |
| अनुमोदक | - | श्री. रतनकुमार पंडागळे, |
| | | श्री. भगवान घडामोडे. |

**ठराव क्र. ११/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मसनतपुर येथील एम.आय.डी.सी चा प्लॉट क्र. ९०, ९०/२, ९०/१ सेंट्रल वेअर हाऊस व बोथरा ऑईल मिल या दोघाच्या मधिल प्लॉट, महानगरालिकेने मसनतपुर येथील नागरिकांसाठी व लहान मुलांसाठी उद्यान व सार्वजनिक कार्यक्रम करीता उपलब्ध करून सदरील प्लॉटवर उद्यान व सांस्कृतिक हॉल विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महापालिकेच्या संपूर्ण दुचाकी कचरा गाडीवर घंटा बसविण्यत याव्यात कारण दुचाकी गाडीवर घंटा बसविण्यास गाडी घरा

समोरून जात असतांना घंटेचा आवाज होईल व नागरिक कचरा गाडीत आणून टाकतील प्रथम माझ्या वॉर्डात प्रायोगिक तत्वावर हि योजना चालू करावी व त्यानंतर संपूर्ण शहरात चालू करावी.

तरी येणाऱ्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर करून घेण्यात यावा ही विनंती.

सुचक - श्रीमती पार्वतीबाई मानकापे
अनुमोदक - श्री. भगवान घडामोडे

**ठराव क्र. १२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या संपूर्ण दुचाकी वाहनाच्या कचरा गाडीवर घंटा बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ह्या योजनेची सुरुवात प्रायोगिक तत्वावर वॉर्ड क्र. १९ येथून सुरू करण्यात यावी असे सर्वानुमते ठरते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे राज्यस्तरीय महापौरचषक क्रीडा स्पर्धा घेण्यातयेतात. या वर्षी सुध्दा स्केटींग, क्रीकेट पंजा लढाव, खो-खो, फुटबॉल इ. स्पर्धा घेण्यात आल्या. तथापी महापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धा घेण्यात न आल्यने या क्षेत्रातील खेळाडूमध्ये मनपा विषयी नाराजी निर्माण झालेली आहे. औरंगाबाद सारख्या शहरात शरीर सौष्ठव सारख्या स्पर्धा घेतल्याने शहरातील युवा खेळाडूना शरीर सौष्ठव चे महत्व व फायदे लक्षात येतील व युवा वर्ग या क्रिडा स्पर्धेकडे आकर्षिल्या जाईल. तरी औरंगाबाद महानगरपलिकेतर्फे राज्य स्तरीय महापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धा त्वरित घेण्यात यावी व सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक - श्री. रतनकुमार पंडागळे

**ठराव क्र. १३/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय महापौर चषक स्पर्धेमध्ये शरीर सौष्ठव स्पर्धा घेण्यास व सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पदमपुरा येथील लालामन कॉलनीला लागून व नंदादिप सोसायटीच्या मध्ये एक मोठे गार्डन असून त्याचे सी.टी.एस नंबर १९४५७ असा आहे. पदमपुऱ्यातील नागरिकांना पद्मपुरा ते गांधीनगर फायर ब्रिगेडच्या मागून स्टेशन कडे जाण्यासाठी पूर्ण बंन्सीलालनगरला फरो मारून जावे लागते करिता लालमन कॉलनी विद्युत डी. पी. ला लागून गार्डनच्या बाजूने एक २० फुटी रस्ता पूर्व, पश्चिम गार्डन मधून

द्यावा त्यामुळे पूर्ण पद्मपुरा व गांधीनगर वासीयांना कायमस्वरुपी मिळेल. करिता विरील प्रस्ताव सर्वानुमते सभागृहात मंजूर करण्यात यावा ही विनंती.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले
सौ. निर्मला कांबळे
अनुमोदक - श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग.

**ठराव क्र. १४/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लालमन कॉलनी विद्युत डी.पी. ला लागून गाउर्नच्या बाजूने २० फुटी रस्ता पूर्व, पश्चिम गार्डन मधून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका स्थापनेच्यावेळी महानगरपलिकेच्या जवळ जवळ सर्वच वर्ग-१ व वर्ग-२ या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी नियुक्त करण्यात आलेले होते. तथापि जसे जसे महानगरपालिका सेवेतील कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता प्राप्त केली. त्यानुसार त्या त्या पदांवर महानगरपालिकेमधील पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन सदरील पदे भरण्यात आलेली आहेत व त्या पदावर प्रतिनियुक्ती संपवण्यात आली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर नेमणूक करण्याचा अधिकार मा. सर्वसाधारण सभेच्या अंकित असून, सदरील पदावर नेमणूक करण्याची विहित पध्दती महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमात करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिका अस्थापनेवरील मुख्य लेखा परिक्षक हे पद सुध्दा पदोन्नतीचे भरण्यात येऊन सदरील पदावर प्रतिनियुक्तीचे अधिकारी पाठवू नये असे शासनास कळविण्याकरिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक - श्री. आनंद तांदुळवाडीकर
श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक - श्री. सुनिल यादवराव मगरे.

**ठराव क्र. १५/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य लेखा परिक्षक पदावर नेमणूक करण्याचा अधिकार मा. सर्वसाधारण सभेच्या अंकित असून सदरील पदावर नेमणूक करण्याची विहित पध्दती महापालिकेच्या सेवाभरती नियमात करण्यांत आली असल्यामुळे महापालिका असिापनेवरील लेखा परिक्षक हे पद पदोन्नतीने भरण्यात येऊन सदरील पदावर प्रतिनियुक्तीने अधिकार पाठवू नये असे शासनास कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १६/१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की,

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६६ (४२) ६८, ३१९, ४६८ आणि २९३ अन्वये.

२) पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ भारत सरकार पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै १९९८ व सुधारण दि. २० जून २०००, बायो मेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट व हॅन्डलींग) रुल्स १९९८.

३) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २० एप्रिल २००० अन्वये.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय निमशासकीय खाजगी, स्वयंसेवी, धर्मदारय संस्था किवा व्यक्ति ज्या जैविक कचरा (बायोमेडिकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व म्हणजे वैद्यकीय व्यवसायिक, रुग्णालय, दवाखाने, रक्तपेढ्या पॅथॉलॉजी. प्रयोग शाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु वैद्यकीय रुग्णालय, गोठे, तबेले, कुकुट पालन केंद्र, दूग्ध व्यवसायिक केंद्र, इत्यादी सर्व धारकांना म्हणजे नियमानुसार ॲक्युपायर असे संबोधण्यात आलेले सर्व ॲक्युपायर यांनी जैविक कचाऱ्याची विहित शस्त्रोयुक्त पध्दीने वरील कायद्यानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबादारी व बंधनकारक आहे.

औरंगाबाद मनपा हद्दितील सर्व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनके रोग्यांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जैविक कचारा विल्हेवाट योग्य पध्दतीने महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इनसिनेटर) खाजगी तत्वावर बोल्ट (बिल्ड, ऑपरेट लजी ॲन्ड ट्रान्सफर) या पध्दतीने कार्यान्वित करीत आहे. यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार सर्व ॲक्युपायर करीता सदर प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक जागा नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंड येथील एक एकर जागा मनपाने राखीव केली होती.

अ.क्र. २ अन्वये बायोमेडील वेस्ट प्रोजक्ट उभारण्याची ३१ डिसेंबर २००२ हि शेवटी तारीख आहे. दिनांक २०/१२/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेने ठराव क्र. ५५४/३ अन्वये नारेगांव टेचिंग ग्राऊंड येथील १ एकर जागेस बायोमेडील वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस प्रस्तावातील अटी व शर्तीनुसार, मंजुरी दिलेली आहे. सर्व साधारण सभेच्या मंजुरी नुसार नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील एक एकर जागेत बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कार्यवाही नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील सदरील प्रोजेक्ट उभारणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/आवि/बी एन- डब्ल्यु/१६२०/२००२ दिनांक १८/१०/२००२ अन्वये ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली असता म.प्र.नि मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. डब्ल्युपी/आर ओ अ/१७४४/२००२ दिनांक २६/११/२००२ अन्वये नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील जागा सदर प्रकल्प उभारणेच्या दृष्टीने योग्य नसल्याने तसेच एअर पोर्ट ॲथॉरिटी औरंगाबाद यांनी देखील येथील जागते कचरा डम्पींग करू नये म्हणून हरकत घेतली आहे.

त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद ने येथील जागेकरिता ना हरकत प्रमाणपत्र देता येत नाही असा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी ना हरकत प्रमाणपत्र न दिल्यामुळे दिनांक

१७/१२/२००२ रोजी मा. महापौर व मा. प्र. आयुक्त (म. जिल्हाधिकारी) मा. सभापती, आरोग्य वैद्यकीय सहाय्य समिती, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी बायो मेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणीच्या पर्यायी जागेसाठी पाहणी केली असता मौजे पाटोदा ता. जिल्हा औरंगाबाद येथील सर्व्हे न. १२२ मधील २ एकर जागा बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणीसाठी निश्चित करून.

१) सहाय्यक संचालक, नगररचना औरंगाबाद या कार्यालयास कार्यालयीन पत्रक क्र. २०३१/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

२) वरिष्ठ भुवैज्ञानिक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या कार्यालयीन पत्रक क्र. २०३१/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

३) प्रशासक सिडको औरंगाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र. २०३६/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली असता संबंधित विभागाकडून त्याचे पत्रक क्र. (अनुक्रमे) मौजे पाटोदा ता जि. औरंगबाद येथील सर्वे नं.१२२ मधील २ एकर जागा बायो मेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस ना हरकत प्रमाणपत्र प्राण्त झाले आहेत

१) सहाय्यक संचालक नगरनचना, औरंगाबाद यांचे कडील पत्रक क्र./१२२/मौ. पाटोदा/सिऔ/११३५/२००२ दिनांक १७/१२/२००२

२) वरिष्ठ भूवैज्ञानिक भु. स. वि. मंडळ औरंगाबाद पत्रक क्र. वभवै/ भुसाविम/ औ.बाद/ता/१६६५/२००२ दिनांक १८/१२/२००२ अन्वये.

३) प्रशासन सिडको औरंगाबाद,पत्रक क्र. सिडको/ प्रशा/ औबाद/ वाळुज/ नियोजन/२००२ दिनांक १७/१२/२००२.

४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र. डब्ल्यु. पी. आर. ओ. ऐ/१८२५ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

वरील ना हरकत प्रमाणपत्रानुसार सर्व्हे नं. १२२ मौज पाटोदा ता. जि. औरंगाबाद मधील दोन एकर जागेत बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेच्या मंजुरीकरिता व यासाठी लागणारा शासकीय खर्च करणे करिता माहिती व अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्र. १६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जैविक कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प बोल्ट पध्दतीने कार्यान्वित करण्यासाठी दिनांक २०/१२/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ५५४/३ अन्वये नारेगांव ट्रेचिंग गाऊंड येथील एक एकर जागेत प्रस्तावित अटी व शर्तीनसुार बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस मंजुरी दिली असली तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद एकर पोर्ट ॲथॉरिटी औरंगाबाद यांच्याकडून आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने दि. १७/१२/२००२ रोजी मा. महापौर मा. प्र. आयुक्त (मा. जिल्हाधिकारी) मा. सभापती, आरोग्य समिती, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे संयुक्त पाहणीत ठरल्यानुसार नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड ऐवजी मौज पाटोदा दोन एकर जागेत सहा. संचालक नगर रचना औरंगाबाद वरिष्ठ भुवैज्ञानिक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद व प्रशासक सिडको, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या ना हरकत प्रमाणपत्रा आधारे

बायोमेडिकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस व त्यासाठी लागणारा शासकीय खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# प्रश्नोत्तरे

मा. श्री. अब्दुल कदीर (मौलाना) सय्यद, नगरसेवक
(प्राप्त दिनांक १३/११/२००२)

**प्रश्न क्र. १०१ :**

अ) कटकट दरवाजा ते सिडको-टी पॉईंट पर्यंत विकास योजनेतील १०० फुटी रस्तयामध्ये एकूण किती क्षेत्र बाधित झाले? कोणकोणत्या नगर भूमापन क्रमांकातून किती क्षेत्र बाधित झाल? कोणकोणत्या सर्व्हे नं. मधून किती क्षेत्र बाधित झाले? संपूण भू-संपादनाची कार्यवाही झाली का? भू-संपादनातील मालमत्ता धारकांना मोबदला देणे बाकी आहे का? किती? कोणत्या सर्व्हे नं. चा? कोणत्या भूमापन क्रमांकाचा? सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत द्यावी.

**उत्तर** सहा. संचालक, नगर रचना

उक्त रस्त्यासाठी खालील मिळकती संपादन केलेल्या आहेत.

| अ.क्र. | मिळकत धारकाचे नांव | न.भू.क्र.सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | अ. सत्तार अ. वहाब | न.भू.क्र. ११६०१ | ४१९५.०० चौ.मी |
| २. | अ. सत्तार अ. वहाब | न.भू.क्र. ११६०२ | ५२३१.०० चौ.मी |
| ३. | श्रीमती सायरा बेगम भ्र. महंमद अ. गफ्फार खॉन | सर्व्हे क्रमांक ३/२ | ६३७५.०० चौ.मी |
| ४. | श्री. अथर खान पिता अकबर खान | सर्व्हे नं.४ | ४३५०.०० चौ.मी |

उपलब्ध असलेल्या अभिलेखानुसार वरील प्रमाणे उक्त रस्त्यासाठी जमीन संपादन केलेली आहेत. वरील मिळकत धारकांशी खाजगी वाटघाटी करून संबंधितास मोबदला देण्यात आला आहे. अ.क्र. १ व २ च्या मिळकत धारकाच्या वारसाने माझ्या वडीलास कमी जागेच्या मोबदला देऊन प्रत्यक्ष जास्त जागा संपादन केले म्हणून मोबदला मागणी करत आहे. करिता सदर मिळकतीतून जायामोक्या प्रमाणे किती क्षेत्र बाधित होते त्या बाबत मालकी हक्क तपासून व प्रत्यक्ष नगर भूमापन कार्यालयाकडून मोजणी करून घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

**प्रश्न क्र. १०२ :** सि.स. नं. ११२५३ मधील युनूस कॉलनी मंजूर रेखांकनातील एकूण रेखांकीत प्लॉट किती? रेखाकनाची खुली जागा किती? कोठे? या रेखाकनाच्या सुधारित रेखांकनास मंजुरी देण्यात आली का? केंव्हा? कोणत्या प्रकारे? सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

**उत्तर** नगर भूमापन क्रमांक ११२५३ मधील युनूस कॉलनी ह्या मंजूर रेखांकनास २०८५५.०० चौ. मी. क्षेत्रातील अंतिम मान्यता दिनांक १४/०१/८६, ०६-०३-८६ AMC/TPS/LUT/99/86 अन्वये आलेला आहे. त्यानुसार सदर रेखांकनात एकूण ८६ भूखंड असून रेखांकनातील रस्ते व विकास योजना रस्ते सोडून असलेली खुली जागा ३१२९ चौ. मी. ऐवढी आहे. तसेच ती महानगरपालिकेतस करारनामेद्वारे ताब्यात दिली आहे हि जागा ह्याच रेखांकनात आलेली आहे. सदर रेखांकनास सुधारित मंजुरी घेण्यात आली नाही.

**प्रश्न क्र. १०३ :** कोणत्याही मंजूर रेखाकनातील खुल्या जागा पैकी १०% जागा रेखांकन सादर करणाऱ्यास (मालकास) विकसीत करण्यासाठी (निवासी वापरासाठी) परत देता येते का? कोणत्याही मंजूर रेखांकनातील खुल्या जागेपैकी १०% भूखंड संबंधितांना परत करण्यात आले का? (निवासी वापरासाठी) कोणकोणत्या मंजूर रेखाकन धारकांना? सविस्तर माहिती येत्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

**उत्तर** कोणत्याही मंजूर रेखांकनातील खुल्या जागेपैकी १०% जागा रेखांकन सादर करणाऱ्यास (मुळ मालकास) विकसित करण्यासाठी (निवासी वापरासाठी) परत देता येत नाही. तसेच कोणत्याही मंजूर रेखांकन सादर करण्या त्यास खुल्या जागपैकी १०% भूखंड परत करण्यात आलेले नाही. विकास नियंत्रण नियमावलीनुसार मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत खुल्या जागेच्या क्षेत्राच्या १०% एवढे बांधकाम अनुज्ञेय होते. या बांधकामाचा वापर व्यायाम शाळा किंवा खुल्या जागेशी संबंधित असलेल्या वापरासाठीच फक्त अनुज्ञेय आहे. तसेच महानगरपालिका सदर खुली जागा रेखांकनाच्या मुळ मालकास रेखांकनातील भूखंड धारकाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विकसित करण्यासाठी अनुमती देऊ शकते.

मा. श्री. भरत लकडे, नगरसेवक
(प्राप्त दि.२२/११/२००२)

**प्रश्न क्र. १०४ :** बायजीपुरा येथील रामविहार हौसिंग सोसायटीचे रेखांकनास मंजुरी मिळालेली आहे काय? असल्यास या रेखांकनास मंजुरी केंव्हा देण्यात आली. या रेखांकनात ७२१.५ चौ. मी. एवढी जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे हे खरे आहे काय? असल्यास या जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे सध्या महापालिकेकडे उपलब्ध आहे काय? असल्यास अशी कोणकोणती कागदपत्रे महापालिकेकडे सध्या उपलब्ध आहेत.

या जागेबाबत येथील काही इसमांनी खोटे व बनावट कागदपत्र तयार करून मालकी हक्क नगरभूमापन कार्यालयास सिध्द केला हे खरे आहे काय? असल्यास त्या व्यक्ती विरुध्द महापालिके मार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली. नसल्यास अशी कार्यवाही केव्हा करणार आहात?

रामविहार हौसिंग सोसायटी येथील या जागेच्या कालकी हक्का बाबत यापूर्वी अथवा सध्या न्यायालयात वाद चालू आहे काय? असल्यास

प्रकरण कोणत्या स्तरावर चालू आहे. प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे काय? या जागेचे प्रकरण न्यायालयात निकाली निघाले आहे काय? दाव्याचा निकाल लागला असल्यास निकालानुसार महापालिकेने कार्यवाही केली आहे काय? अशी कार्यवाही केली असल्यास काय कार्यवाही केली संबंधित विरुध्द फौजदारी केस केली आहे काय? संबंधिताने या जागेवर केलेले अनाधिकृत बांधकमा अथवा अतिक्रमण हटविणे बाबत वारंवार लेखी व तोंडी कळवून देखील सदर अतिक्रमण अद्याप हटविले नाही याचे कारण काय? न्यायालयीन निर्णयानुसार सदर अतिक्रमण केंव्हा हटविणार आहात? तसेच हि जागा महापालिका मालकीची असल्यास या जागेस तार कुंपन केंव्हारकरणार आहात या बाबत आपले अभिप्रायासह सविस्तर माहिती सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर** उप आयुक्त (प्र.)

उपरोक्त विषयी आपण जो प्रश्न विचारलेला आहे. त्या विषयी विधी विभागाशी संबंधित माहिती खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

श्री. हमीद खॉन, बावरखॉन या व्यक्तीने न.भू.क्र.१२१९९/१० सर्व्हे नं. ३८, प्लॉट क्र. १० क्षेत्र अंदाजे ७२१.५ स्के. मिटर जसवंतपुरा/किराडपुरा ही जागा संबंधिताच्या ताब्यात असल्याने सदरील जागेत हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने प्रतिबंध करावा अशी विनंती करणारा दावा मा. न्यायालयात दाखल केला.

सदरील दाव्यातील मनाई हुकूमाचा संबंधिताचा अर्ज मा. नयायालयाने १.११.२००१ रोजी रिजेक्ट केला आहे. सदरील आदेशाविरुध्द संबंधिताने जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले ते सुध्दा दिनांक २१/०१/२००२ रोजी मा. जिल्हा न्यायालयाने डिसमिस केले आहे.

सदरील आदेशाविरुध्द संबंधिताने सि.आर. ए. १८७/०२ मा. उच्च न्यायालयात दाखल केले. सदरील प्रकरण संबंधितान न्यायालयातून काढून घेतले आहे. सद्यस्थितीत व मालमत्ता अधिकारी यांना जा.क्र./मनपा/विधी/१७५८/२००२ दि. २३/०९/२००२ रोजी पत्र देऊन कळविण्यात आले आहे.

या प्रकरणाचा मुळ दावा क्र. ९१६/२००१ हा इश्यूसाठी मा. न्यायालयात प्रलंबित आहे. परंतु त्यामध्ये कुठलाही मनाई हुकूम नाही.

करिता वरीलप्रमाणे आपल्या प्रश्नांच्या अनुषंगाने विधी विभागाशी संबंधित माहिती व सद्यस्थितीत याद्वारे आपणांस कळविण्यात येत आहे.

**<u>सहा. संचालक, नगररचना</u>**

आपण विचारलेल्या प्रश्नापैकी या विभागशी संबंधित असलेल्या प्रश्नांचे उत्तर खालील प्रमाणे आहे. बायजीपुरा येथील रामविहार है. सो. रेखांकन मंजूर आहे. या रेखांकनास कार्यालयीन पत्र क्रमांक एल.वाय.टी./१६३५/७३ दिनांक ११-०५-१९७३ द्वारे मंजुरी दिलेली आहे. या

| | |
|---|---|
| मंजुरीनुसार जमिनीचे एकूण क्षेत्र | ५६३५०.०० चौ. फु. |
| भूखंडाचे क्षेत्र | ४७२९२.०० चौ. फु. |
| अतिरिक्त जागा खुली (रोड) | ३१००.०० चौ. फु. |

खुली जागा (ओपन स्पेस) १०% ५२३०.०० चौ. फु.
उत्तर दिशेस रस्त्याने बाधित क्षेत्र १०२८.०० चौ. फु.

या प्रमाणे क्षेत्र मान्य आहे. या पत्रासोबत रेखांकन आदेश व रेखांकन नकाशा प्रत देत आहे.

तसेच मालकी हक्का बाबत व न्यायालयात चालू असलेल्या वादा बाबत व अतिक्रमण हटविणेच्या कार्यावाहीबाबत प्रश्न मालमत्ता विभाग, विधी विभाग व प्रशासकीय विभाग महानगरपालिका यांचेशी संबंधित असल्याने कृपया माहिति तेथून घ्यावी ही विनंती.

मा. सौ. निखत परवीन ऐजाज अली, नगरसेवक
(प्राप्त दि. २५/११/२००२)

**प्रश्न क्र. १०५ :** वॉर्ड क्र. ८३ येथील (सिटी चौक) येथे दोन-तीन ठिकाणी बांधकाम चालू आहे ते परवानगी घेलेले सदरील बांधकाम आहे त्या करीता मालमत्ता इन्स्पेक्टर देण्यात यावा.

सदरील बांधकाम खालील ठिकाणी चालू आहे.

१) सिटी फुल सेंटरच्या बाजूला
२) शितल बेडसिट समोर कासारी बाजार
३) अंबिका ज्वेलर्स कासारी बाजार
४) सिटी चौक काली मस्जिद समोरील गल्लीमध्ये
५) बी.एम.सी. बँक च्या मागे बारुदगर नाला
६) मछली खडक व्ही.आय.पी. सुटकेसच्या समोर
७) पादरीबा रोड येथे कॉम्पलेक्सचे बांधकाम
८) नाज गल्ली येथे दोन ठिकाणी बांधकाम चालू आहे.

**उत्तर** मा. उप. आयुक्त (म.)

वरील संदर्भीय विषयानुसार स. नगर सेविका श्रीमती, निखत परिवन अली यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतची यादी खाली देत आहे.

१ श्री. सय्यद अबीद व इतर सिटी चौक - बा.प.क्र. ११३/०२ दि. १०/०६/२००२.

२ शितल बेडशिट समोर श्री. दिलीज जैन अनाधिकृत पंचनामा करून २६० व ४७८ ची नोटीस दिली.

३ अंबिका ज्वेलर्स कासारी बाजार - दुकानावरील दोनीही मजले न काढता त्याचा वापर सुरू असतो. जमीन मजल्याची दोन उंची कमी करून जुन्या भिंतींना प्लास्टर केले.

४ सिटी चौक काली मस्जीद समारे मो. नसीर मो. नईम सहा महिण्यापूर्वी बां. प्र.क्र. ३३४/०१ दि. २१/०९/०१ बांधकाम झाले असून सध्या दुकानांचा वापरही सुरू आहे.

५ बी.एम.सी. बँकेमागे श्री. इंद्रलाल जंगवे मुख्यात्यार नामे श्री. आबेदी बां. प.क्र. ३८/०२ दि. १२/०४/२००२.

६ मछलीखडक व्ही.आय.पी. सुटकेस समारे श्री. इच्छा बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल केलेली आहे.

७ पानदरीबा रोड :- येथे दोन कामे सुरू असून दोन्ही कामे पूर्णत्वाकडे आहे व दोन्ही कामांना बां. प. आहे.
१) श्री. पाटणी बां. प.क्र. ४५७/०१ दि. १२/०३/०१
२) श्री. मोईज बां.प.क्र. २४७/०१/ दि. २३/०७/०१

८ नाजगल्ली :-
१) श्री. अभय छाजेड बां.प.क्र. ६९/०२ दि. १०/०५/०२
२) श्री. अरुण सुगंधी बां.प.क्र. ८१/०२ दि. १५/०५/०२

९) सराफा :- श्री. भरतकुमार सांडूजी व इतर बां.प.क्र. १९८/०२ दि.२४/०६/०२

१०) श्रीमती शांताबाई महाजन व इतर बां.प.क्र. ७७/०२ दि. १५/०५/०२ करिता वॉर्ड क्र. ८३ मध्ये चालू असलेल्या बांधकामाचा तपशिल वरीलप्रमाणे आहे.

मा. श्री. सुदाम सोनवणे, नगरसेवक
(प्राप्त दि. १०/१२/२००२)

**प्रश्न क्र. १०६ :** महानगरपालिका हद्दित एकूण किती मंगल कार्यालये आहेत. एकूण किती शदीखाने आहेत, सध्या अस्तितवात असलेले एकूण किती मंगल कार्यालये व शदीखाने यांना महानरपालिके मार्फत मालमत्ता व इतर कर आकरणी केलेली आहे. मगल कार्यालये व शादीखाने तसेच इतर शुभविवाह संपन्न होणाऱ्या वास्तु व सार्वजनिक तसेच खाजगी इमारतींना कोणत्या दरोन मालमत्ता कर आकारण्यात येतो. महापालिके हद्दित असलेल्या सर्वही धर्माचे व जातीचे मंगल कार्यालयांना कोणत्या दराने पाणीपट्टी आकरण्यात येते.

दरवर्षी सर्व धर्मीय मंगल कार्यालयांपासून मालमत्ता कर व इतर करा पोटी महापालिकेस एकूण किती वार्षिक उत्पन्न प्राप्त होते. सर्वही मंगल कार्यालयापासून एकूण किती रक्कम प्रति वर्षा पाणीपट्टी द्वारे वसूल केली जाते.

महापालिका हद्दितील सर्व धर्मीय मंगल कार्यालयांकडे मालमत्ता कर, पाणीपट्टी तसेच इतर कराची एकूण किती रक्कम थकबाकी आहे. ही रक्कम केंव्हा पासून थकीत आहे. थकबांकीची रक्कम केंव्हा वसूल करणार आहात? थकबाकीची रक्कम वासुलीसाठी महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत वरील प्रमाणे मंगल कार्यालय निहाय विहित आकडेवारीसह सविस्तर माहिती आपले अभिप्रायासह सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर** मा. उप. आयुक्त (म.)

डिसेंबर २००२ मध्ये संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेसाठी विचारलेल्या प्रश्ना संदर्भाने मनपा हद्दितील एकूण मंगल कार्यालयाची यादी त्यांना निवासेत्तर दराने लावण्यात आलेल्या मालमत्ता कराची यादी सोबत जोडण्यात आली आहे. मंगल कार्यालये, शादीखाने तसेच इतर ठिकाणी विवाह संपन्न होणाऱ्या वास्तू यांना करण्यांत आलेली मालमत्ता कर आकरणी व पाणीपट्टीची आकारणी हि निवासेत्तर दरानेच केली जाते. त्यांच्याकडील मालमत्ता कराच्या व पाणीपट्टीची आकारणी हि निवासेत्तर दरानेच केली जाते. त्यांच्या कडील मालमत्ता कराच्या व पाणीपट्टीच्या

थकबाकी वसूली करणेसाठी संबंधितास योग्य त्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत. माहितीस्तव सादर.

**सहपत्र**

**औरंगाबाद शहरातील मंगल कार्यालयाच्या मालमत्ता कराचा तपशिल**

| अ.क्र. | मंगल कार्यालयाचे नांव | घर क्र. / प्लॉट क्र. | मोहल्ला | करयोग्य मुल्य |
|---|---|---|---|---|
| १. | दिलरस मंगल कार्यालय, ७ मी. मो. अ. हक मो.अ. सईद | प्लॉट क्र. ०७ | दिलरस कॉलनी | ३४८२०/- |
| २. | सहारा फंक्शन हॉल, श्री. शेख करीम शेख लाल | १-१४-२ | बुढ्ढीलेन | ३१३०९/- |
| ३. | मीना फंक्शन हॉल हाजी महंम्मद इस्माईल | १-२४-४३/पी | देवडीबाजार | १९२८९/- |
| ४. | आसरा फंक्शन हॉल | १-१५-३६/पी | बुढ्ढीलेन | ४८६९३/- |
| ५. | महावीर भवन, वर्धामान स्थानिक वासी समाज | ४-११-१३ | कुंभारवाडा | २,७९,६३४/- |
| ६. | अनार्थ विद्यार्थी गृह सिमंत मंगल कार्यालय | ४-११-५४ | औरंगपुरा | २,४६,५९६/-<br>१,७५,५६०/- |
| ७. | गणेश महासभा | प्लॉट नं.३०० | समर्थनगर | ५७००/- |
| ८. | मगनलाल हिरालाल अग्रवाल | | | ८९१३२/- |
| ९. | पन्नालाल हिरालाल अग्रवाल | ३-७-४२<br>४२३,४६८ | | १३,६९,३६०७/-<br>३०००,५०८<br>अनुक्रमे |
| १० | अजमठीजी व्यास अजमपीठ भवन हॉस्टेल | | खडकेश्वर | ३६३८५/- |
| ११ | अध्यक्षा एकनाथ मंदिर | ४-१०-२० | औरंगपुरा | ६६०५२/- |
| १२. | हुबळीकर टिपनसा, यमनसा, माहेश्वरी ट्रस्ट मो. रंगारगल्ली | ५-६-४४ | रंगारगल्ली | ५७१७५/- |
| १३ | आशिर्वाद मंगल कार्यालय, प्रो. सुमित्रदेवी दामोधर बलदवा | | बहादुरपुरा | ३७८००/- |
| १४. | विश्वशंकर मंगल कार्यालय | | विष्णुनगर | ३३४६७/- |
| १५. | साई हॉल | | उल्कानगरी | ४७७३७/- |
| १६. | बालाजी मंगल कार्यालय | | बालाजीनगर | ३१२४०/- |
| १७. | रामायणा कल्चर हॉल | | उल्कानगरी | ३०५८८/- |
| १८. | तारामती मंगल कार्यालय | | शिवशंकर कॉलनी | ४३८९९/- |
| १९. | कुशल मंगल कार्यालय | | कुशलनगर | २७२७०/- |
| २०. | स्वागत हॉल | | सारंग हौ. सो. | १८२००/- |

| अ.क्र. | मंगल कार्यालयाचे नांव | घर क्र. / प्लॉट क्र. | मोहल्ला | करयोग्य मुल्य |
|---|---|---|---|---|
| २१. | व्यंकटेश हॉल | | आदित्यनगर | ३३०००/- |
| २२. | लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय | | आदित्यनगर | ३८७२०/- |
| २३. | सिंधी भवन | | सिंधी कॉलनी | २८३५०/- |
| २४. | पाटीदार मंगल कार्यालय | | जालना रोड | ४७०४०/- |
| २५. | सुमित मंगल कार्यालय | | क्रांती चौक | ४०७३८/- |
| २६. | श्री. मंगल कार्यालय | | उस्मानपुरा | १०५३८/- |
| २७. | उत्सव मंगल कार्यालय | | उस्मानपुरा | ५३६२९/- |
| २८. | कलश मंगल कार्यालय | | उस्मानपुरा | २८७२१/- |
| २९. | यशो मंगल कार्यालय | | पन्नालालनगर | ४४३०९ |
| ३०. | समता दर्शन | | अदालत रोड | ३४५६/- |
| ३१. | झंकार मंगल कार्यालय | | चिकलठाणा | ४७००/- |
| ३२. | तिवारी मंगल कार्यालय | | एम.आय.डी.सी | ६६०००/- |
| ३३. | कुमावत मंगल कार्यालय | | पद्मपुरा | ३६५७/- |
| ३४. | श्रीमती गंगाबाई मुरलीधर टकसाळी मंगल कार्यालय | | बन्सीलालनगर | ११८९६/- |
| ३५. | समित्रादेवी व इतर दुरिस्ट होम | | स्टेशन रोड | १८६६१/- |
| ३६. | पुंडलिक नंदलाल ठाकूर | | स्टेशन रोड | १९४५९/- |
| ३७. | दामोधर शिवराज बलदवा | | स्टेशन रोड | २८१६८/- |
| ३८. | बालाजी मंगल कार्यालय | ३-१२-६ | शहागंज | ३३५९९/- |
| ३९. | चंद्रसागर मंगल कार्यालय | ३-१२-३/पी | शहागंज | ३५६३०/- |
| ४०. | मोतिवाला फंक्शन हॉल | | युनूस कॉलनी | ५०१६६/- |
| ४१. | रुप महल मंगल कार्यालय | २-८-१७ | फाजलपुरा | ३४५३८/- |
| ४२. | आर.जी. फंक्शन हॉल जमील अहेमद व मसूद अहेमद | १-३०-३५ व १-३०-४० | चेलीपुरा | १८१४४/- |
| ४३. | फातेमा फंक्शन हॉल शेख सत्तार मुर्तुझा कासमी | - | शहाबाजार | ३२८००/- |
| ४४. | हाजी अली फंक्शन हॉल १ श्री. अब्दुल्लाद्दिन अली व इतर | | रोशनगेट बारी कॉलनी | ४९८९६/- |
| ४५. | हुमा फंक्शन हॉल | - | टाकळकर हौ. सो. | ४४२५९/- |
| ४६. | साखरे मंगल कार्यालय | | जिव्हेश्वर कॉलनी | ४८,२४४/- |
| ४७. | मोहम्मदीया फंक्शन हॉल एन.पी.ओ. मुजम्मील मीर खान | | रोशनगेट | ३२८८६/- |

| अ.क्र. | मंगल कार्यालयाचे नांव | घर क्र. / प्लॉट क्र. | मोहल्ला | करयोग्य मुल्य |
|---|---|---|---|---|
| ४८ | अब्बास फंक्शन हॉल | - | रोशनगेट | ५७८५६/- |
| ४९ | मस्तान फंक्शन हॉल | - | रशिदपुरा | ८६५९४/- |

**प्रश्न क्र. १०७ :** महानगरपालिकेमार्फत विविध प्रभागाता कोणकोणत्या व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यात येतात. टाकण्यात येणाऱ्या जल वाहिन्यांसाठी कोणकोणत्या प्रकारचे पाईप वापरण्यात येताता. जलवाहिन्या टाकणेसाठी वापरण्यात येणाऱ्या पाईप बाबत महानगरपालिकेने काही माणिके, निकष ठरवून दिलेले आहेत काय? जलवाहिन्या, पाईप जॉईंट, कप्लींग, बेंड तसेच इतर साहित्य खरेदी बाबत महानगरपालिके मार्फत नियम, उपविधी तयार केलेले आहेत काय? असल्यास ठरवून दिलेल्या निकष व माणकानुसार पाईप व जलवाहिण्यांसाठी लागणारे इतर साहित्य जलवाहिनया टाकतांना वापरण्यात येते काय? नसल्यास संबंधित गुत्तेदाराविरुध्द कार्यवाही करण्यात येत काय? पाईप व इतर साहित्य ठरवून दिलेल्या माणकानुसार वापरले जात नसल्यास संबंधित ठेकेदारा विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात येते. नसल्यास अशा ठेकेदारांविरुध्द महापालिकेमार्फत कार्यवाही केव्हा करणार आहात? अशा एकूण किती प्रकराणांत महापालिकेने संबंधित ठेकेदारा विरुध्द कार्यवाही केली. या बाबत विहित आकडेवारीसह आपले अभिप्रायासह सविस्तर माहिती सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर** कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)
सर्व कंत्राटदार हे निविदेच्या सह त्यांनी कामावर वापरावयाच्या प्रत्येक बाबींसाठी म.जि.प्रा. च्या कडे वापरांत येणाऱ्या सर्व भारतीय मणक संस्थेच्या प्रमाणकांनुसार कामावर वापरण्यात येणारे साहित्य कंपनीकडून विकत आणतात व पुरवठा करतात, त्यासाठी म.जि.प्रा. च्या वतीने दिलेले जिल्हा पत्रकिया दर व पुरवठा दारांच्या यादीतीलच कंपन्याचे कडून साहित्य धेतले जाते, उदा ईअर व्हॉल आय.एस.१०८४५, स्लुस व्हॉल-आय.एस.-२१० जी.आर.सी. एफ-२०० आय.एस.५१५५, आय.एस १३०९५-१९९१, सी.आय. पाईप-आय.एस १५३६-१९८९, एसी.पाईप आय.एस.ओ. १६०, एम.एस. पाईप आय.एस. ३५८९ आणि होय. संबंधितास पुरवठा केलेले साहित्य त्यांचे उपस्थितीत तपासणी केली जाते. त्यास दोष आढळल्यास ते अस्विकार्य साहितय म्हणून बाजूला काढण्यात येते. त्यामुळे अशा प्रकारची कार्यवाही करण्याचा प्रश्नच येत नाही.
निरंक

**प्रश्न क्र. १०८ :** महानरगपालिकेमार्फत लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर गेल्या २ वर्षानंतर महानगरपालिका हद्दित एकूण किती बांधकाम परवानगी देण्यात आल्या. या काळात बांधकामा परवानगी मिळणे बाबत एकूण किती संचिका दाखल झाल्या. त्यापैकी एकूण किती बांधकाम परवानगीच्या संचिका नामंजूर करण्यात आल्या देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी पैकी एकूण किती

बांधकाम धारकांनी बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले. एकूण किती बांधकाम धारकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. सध्या बांधकाम परवानगी बाबत एकूण किती संचिका नगररचना विभागात प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणे असल्यास केंव्हा निकाली काढणार आहात?

बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण किती इमारतींना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. रितसर बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण किती इमारतींना अद्याप मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली नाही. अशा इमारतींना मालमत्ता कर केंव्हा आकारणी करणार आहात? या बाबत विहित आकडेवारीसह व आपले अभिप्रायासह सविस्तर माहिती सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर** अप्राप्त

मा. श्री. भरत लाकडे, नगरसेवक
(प्राप्त दि.१०/१२/२००२)

**प्रश्न क्र. १०९ :** महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १,२,३ व ४ संवर्गा मधील कोणकोणत्या पदावरील अधिकारी व कर्मचारी सध्या निलंबित करण्यात आलेले आहेत. निलंबित असलेले अधिकारी व कर्मचारी केंव्हा पासून निलंबित आहेत. निलंबित अधिकारी व कर्मचारी कोणकोणत्या कारणांमुळे निलंबित करण्यात आलेले आहेत. निलंबित असलेल्या एकूण किती व कोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव प्रशासनामार्फत सभागृहासमोर ठेवण्यात आलेले आहेत. अशा एकूण किती व कोणकोणत्या प्रस्तावांना सभागृहामार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे. सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर एकूण किती अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात आलेले आहे. एकूण किती व कोणकोणत्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे निलंबनाची प्रकरणे सध्या न्याय प्रविष्ठ आहेत. न्यायालयचे अंतिम निकालानुसार एकूण किती व कोणकोणत्या अधिकारी तथा कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक खात्या मार्फत कारवाई केलेल्या एकूण किती अधिकारी व कर्मचारी सध्या निलंबित आहेत. केंव्हा पासून निलंबित आहेत.

महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील निलंबित असलेल्या सर्वही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतनावर दरमहा एकूण किती रक्कम खर्च करण्यात येते. महानगरपालिका आस्थापनेवरील एकूण किती निलंबित असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी चालू आहे. खातेनिहाय चौकशी चालू असलेली प्रकरणे केंव्हा निकाली काढणार आहात? सर्वही निलंबित अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुर्ववत कामावर केंव्हा घेणार आहात? याबाबत विहित आकडेवारीसह खर्चाचे सविस्तर तपशिलासह व आपले सविस्तर अभिप्रायासह माहिती सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर** उप-आयुक्त (प्र.)

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने मनपा आस्थापनेवरील निलंबित कर्मचारी माहिती दर्शविणारा तक्ता सोबत जोडण्यात येत आहे. यात तक्त्यात निलंबित अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव पदनाम, निलंबनाची तारीख, निलंबनाचे कारण, सद्यः स्थितीत देण्यात येत असलेले निर्वाह वेतन याबाबत माहिती देण्यास आलेली आहे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत

कारवाई झालेल्या अधिकारी / कर्मचारी जे की, सद्यः स्थितीत निलंबित आहेत, त्यांचीही माहिती सोबतच्या तक्त्यात देण्यात आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (ब) अन्वये परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अनवये नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे निलंबन व त्या संबंधीची कारणे आयुक्तांनी ताबडतोब महापालिकेस कळविले पाहिजे अशी तरतूद आहे. सद्यस्थितीत उक्त अधिकाऱ्यांमधून कुणीही निलंबित नसल्यामुळे तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेले नाहीत. सोबतच्या यादीतील निलंबित कर्मचाऱ्यांबाबत तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत झालेल्या कार्यवाहीमुळे सोबतच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सद्यस्थितीत निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे पोलिस कार्यवाहीत / न्याय प्रविष्ट आहेत. या प्रकरणांमध्ये मा. नयायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर होणाऱ्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. करिता माहितीस्तव.

**<u>निलंबित अधिकारी / कर्मचाऱ्यासंबंधी माहिती दर्शविणारे विवरणपत्र</u>**

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | निलंबनाची तारीख | निलंबनाचे कारण | देण्यात येत असलेल्या निर्वाह भत्ता (एकूण वेतनवाढ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ना.हि. तेली | प. क्षे. कर्मचारी (तत्कालीन रोखपाल) | ०७/११/९० | वि.क्र. ७ मधील आर्थिक अफरातफर | ७५% प्रकरण पोलिस तपासात | |
| ०२ | एम.ए. साजेद | कनिष्ठ लिपीक | २१/०८/९५ | जकात-आर्थिक गैरव्यवहार | ५०% | |
| ०३ | भरत देवकर | इमारत निरिक्षक | २४/०६/९७ | लाच घेतांना पकडले | ७५% | |
| ०४ | अब्दुल नसिर | शिपाई | ०७/०२/९८ | लाच घेतांना पकडले | ५०% | |
| ०५ | आर. एस. राचतवार | इमारत निरिक्षक | ०५/०६/९९ | लाच घेतांना पकडले | ७५% | |
| ०६ | महंमद रफिक | कनिष्ठ लिपीक | १७/११/९९ | लाच घेतांना पकडले | ७५% | |
| ०७ | जे. डी. थोरात | इमारत निरिक्षक | १८/११/२००० | लाच घेतांना पकडले | ७५% | |
| ०८ | एस. सी. गारोडी | इमारत निरिक्षक | १८/११/२००० | लाच घेतांना पकडले | ७५% | |
| ०९ | ख्वाजा वाहजोद्दिन | कनिष्ठ लिपीक | ३१/०१/२००१ | वि.क्र. १ आर्थिक गैरव्यवहार | ५०% | |
| १० | स. शौकत अली | कनिष्ठ अभियंता | १८/१२/२००१ | लाच घेतांना पकडले | ५०% | |
| ११ | श्रीमती वनमाला शिंदे | लस टोचक | २९/०१/२००२ | आय.पी.सी. कलम ३०२ अंतर्गत पोलिस खात्याकडून कार्यवाही | ७५% | |
| १२ | बी.के. जैस्वाल | दुय्यम अवेक्षक | १७/०२/२००२ | लाच घेतांना पकडले | ५०% | |
| १३ | आर. बी. टाक | ज्ये. स्व. निरिक्षक | २२/०८/२००२ | लाच घेतांना पकडले | ५०% | |
| १४ | डी. आर. सोळंके | सह. शिक्षक | २६/०२/२००२ | गैर वर्तणूक | ५०% | |

**वर्ग-४ संवर्गातील खाते चौकशी प्रकरणा बाबत माहिती**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | निलंबनाचा दिनांक | निलंबनाचे कारण | चौकशी अधिकारी | निर्वाह भत्ता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. पुनमचंद रतनलाल चावरिया | स्विपर झोन क्र.३ | ३१/०३/९५ | गुन्हेगारी कृत्यामुळे पोलिस कार्यवाहित अटक | | ५०% | पोलिस निरिक्षक सिटी चौक यांच्याकडून प्रकरणातील सद्य स्थितीचा अहवाल मागविण्यात आला आहे. दि.०६/१२/२००२ |
| ०२ | दिलिप पंडित जाधव | वॉचमन झो. क्र.५ | ०४/०७/२००० | पोलिस कार्यवाहीत अटक | श्री. डी. बी. लोखंडे कामगार अधिकारी | ५०% | पोलिस मार्फत प्रकरण न्याय प्रविष्ट करण्यात आलेले असून न्यायालयाचा अंतिम निर्णय झाला नाही तथापि चौकशी अधिकारी चौकशी अहवाल सादर केलेला असून प्ररणात विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यत येत आहे. |
| ३. | श्री. एकनाथ खंदारे | मलेरिया मजूर | २४/०६/२००२ | मद्यपान प्राशन केले | -//- | ५०% | |

मा. श्री. जयवंत ओक, नगरसेवक
(प्राप्त दि. ११/१२/२००२)

**प्रश्न क्र. ११० :** औरंगाबाद महापालिका हद्दितील गारखेडा येथील स.नं. ६ सि.स. नं १५१८७ या मिळकतीच्या ले-आऊट संबंधी स्थानिक वर्तमानपत्रात "ले-आऊट मंजूर करण्यासाठी अशी झाली महानगरपालिकेची फसवणूक" असे जाहिर प्रगटरन १२ नोव्हेंबर २००२ च्या वृत्तपत्रांत आलेले आहे. महानगरपालिकेची फसवूणक झालेली आहे. काय? असल्यास त्याबद्दल नगररचना विभागाने व प्रशासनाने काय कार्यवाही केली? त्याबाबतचा खुलासा वर्तमान पत्रांत करण्यात आला आहे काय? नसल्यास त्यांची कारणे कोणती? या प्रकरणांत महानगरपालिकाच्या नगररचना विभागाने २९/०६/१९८८ वे १८/०७/१९८८ च्या जाहिर प्रकरणांप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ व सुधारणा १९८४ प्रमाणे काय कार्यवाही करण्यात आली? अथवा काय कार्यवाही प्रस्तावित आहे?

**उत्तर** अप्राप्त

मा. श्री. अंबादास दानवे, नगरसेवक

**प्रश्न क्र. १११ :**

अ) महानगरपालिकेचे पहिल्या सहा महिण्यात मागील वर्षाच्या तुलनेत किती महसूली उत्पन्न प्राप्त झाले आहे. महसूली उत्पन्नात मागील वर्षाच्या तुलनेत वाढ असल्यास ती किती आहे. रक्कम व टक्केवारी स्पष्ट करावी.

ब) मागील वर्षीच्या तुलनेत किती, महसूली खर्चात व भांडवली खर्चात वाढ झालेली आहे.

क) वार्षिक महसूली उत्पन्नाच्या सरासरी पाहता पहिल्या सहा महिण्यात उद्दिष्टापेक्षा किती महसूली तुट निर्माण झालेली आहे.
सविस्तर खुलासा करावा.

**उत्तर** मा. मुख्य लेखाधिकारी

अ) महानगरपालिकेचे मागील वर्षाचे पहिल्या सहा महिण्याचे उत्पन्न रक्कम रु.३९,१७,४३,७५३/- असून चालू वर्षाचे सहा महिण्याचे उत्पन्न रक्कम रु. ४३,८८,८८,६६७/- एवढे असून रु. ४,७१,४४,८८४/- ने मागील वर्षाच्या तुलनेत महसूली उत्पन्नात १२% ने वाढ झालेली आहे.

ब) मागील वर्षाच्या पहिल्या सहा महिण्याचे महसूली खर्च रु. १८,९५,६२,३५५/- असून या वर्षी रु. १६,१७,६२,२०७/- इतका महसूली खर्च झालेला आहे, तो मागील वर्षाच्या तुलनेत रु. २,७८,००,१४८/- ने कमी झालेला आहे. तसेच भांडवली खर्च मागील वर्षी रु. ७,१६,४०,२४०/- एवढा झालेला असून चालू वर्षी भांडवली खर्च रु. ४,९०,५८,४७०/- एवढा झालेला आहे तो मागील वर्षाच्या तुलनेत रु. २,२५,८१,७७० ने कमी झालेला आहे.

क) सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात महसूली उत्पन्न रु. १२८,६६,२०,०००/- अंदाजपत्रकीय उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. पहिल्या सात महिण्याचे अंदाजपत्रकीय उद्दिष्ट रु. ६४,३३,१०,०००/- होते. त्यातून पहिल्या सहा महिण्याचे प्रत्यख उत्पन्न रु. ४३,८८,८८,६३७/- वजा जाता रु. २०,४४,२१,३६३/- ची महसूली उत्पन्नात तुट निर्माण झाली आहे.

**प्रश्न क्र. ११२ :**

अ) २००२-२००३ या चालू आर्थिक वर्षात दि. ३० नोव्हेंबर २००२ अखेर पर्यंत मागील वर्षीच्या तलनेत जकातीपोटी किती महसूल जमा झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत जकातीपोटी किती महसूल जमा झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत सरासरी किती टक्के वाढ जकातीच्या महसूलात झली आहे? आकडेवारी स्पष्ट करावी.

ब) आपण जकात विभागामार्फत जकात भरणाऱ्या ग्राहकांकडून करार पत्र भरून घेता का? करारपत्राची संपूर्ण शहानिशा केलेली आहे का? सद्यस्थितीत चालू आर्थिक वर्षातील किती करारपत्र प्रलंबित अवस्थेत आहेत? प्रलंबित असल्यास कारणे काय?

क) जकात विभागामार्फत विविध संस्था व कंपनी यांचे खाते तपासणी करण्याचे आपणांस अधिकार प्राप्त आहेत काय? असल्यास आपण चालू आर्थिक वर्षात किती कंपन्याची खाते तपासणी केलेली आहे? नसल्यास खते तपासणी करणे आपणास आवश्यक वाटत नाही काय? वाटत नसल्यास तयाची कारणे स्पष्ट करावी.

ड) जकात विभागामार्फत आपणास व्यापारी कंपनीस मागणी पत्र (डिमांड) देता येते काय? देता येत असल्यास चालू आर्थिक वर्षात किती मागणी पत्र (डिमांड)केलेल्या आहेत काय? विविध कंपन्या आपणाकडे जकात भरतात त्याचे पडताळणी (व्हेरी फिकेशन) आपण करतो काय?

**उत्तर** उप- आयुक्त (म)

अ) (१) सन २००१-०२ या आर्थिक वर्षात १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर पर्यंत एकूण वसुली रु. ३२,३१,२१,७९९=०० होती (२) सन २००२-०३ या आर्थिक वर्षात १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर पर्यंत एकूण वसूल रु. ३७,७४,१५,८५६=०० आहे (३) मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षात रु. ५,४२,९४,०५७=०० एवढी जास्त वसुली झाली आहे. (४) या वसुलीत गतवर्षीच्या तुलनेत १७% वाढ झाली आहे.

ब) (१) जकात विभागातर्फे जकात भरणाऱ्या ग्राहकांकडून करारपत्र भरून घेण्यात येतात (२) करारपत्रांची शहानिशा करण्यासाठी खिडकी क्र. ३ वर प्रत्येक नाक्याची स्वतंत्र करारपत्रांची नोंदवही ठेवली आहे. व त्या ठिकाणी सर्व करारपत्रांची शहानिशा केली जाते (३) सद्यस्थितीत चालू आर्थिक वर्षात एकूण १०८ करारपत्र प्रलंबित आहेत (४) करारपत्र का प्रलंबित आहे. याचे कारण सांगता येणार नाही. जकात विभाग सुरू झाल्यापासून नाक्यावर करारपत्र बनवून देण्याची नियमानुसार तरतूद आहे व प्रत्येक नाक्याच्या निरिक्षकांची करारपत्र प्रलंबित राहिल्यास ते शोधून जकात वसूल करण्याची जबाबदारी आहे. प्रलंबित करारपत्रांची संपूर्ण नोंद असते. व जकात निरिक्षक करारपत्र शोधून जकात वसूल करतात.

क) (१) विविध संस्था व कंपनी यांचे खाते तपासणी करण्याचे मनपास अधिकार आहे. (२) कंपन्याचे खाते १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंत तपासले जातात. सध्या तपासणी संचिका प्रोसेसमध्ये आहे मान्यता घेऊन दरवर्षी नोटीस व्ही. शेड्युल्ड देऊन तपासणी करण्यात येते.

ड) (१) व्यापारी व कंपन्यांना मागणीपत्र देण्यात येत नाही. फक्त शासकीय कार्यालय अथवा निमशासकीय कार्यालयाने मागणी पत्राची मागणी केल्यास त्यांनाच मागणी पत्र देण्यात येते. (२) चालू आर्थिक वर्षात एकूण १३१ मागणी देयके दिलेले आहेत. (३) कंपन्यांच्या जकात भरणा बाबत पडताळणी मनपातर्फे करण्यांत येते.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०७-०१-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. ०७/०१/२००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचे सह कार्यालयीन अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल. सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
११) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१२) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१३) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१४) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२१) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२२) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२३) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२४) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२५) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२८) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
२९) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३०) स.स.डॉ. कराड भागवत किसनराव
३१) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३२) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३३) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब

३४) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
३५) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३६) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३७) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३८) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३९) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४२) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४३) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४४) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
४५) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४६) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४८) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४८) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५०) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
५१) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५९) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६०) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६१) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६२) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६३) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६४) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६५) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६६) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६७) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६८) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## <u>स्विकृत सदस्य</u>

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली

**विषय क्र. १७/१ :** सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील महसूली उत्पन्नाबाबत आढावा घेणे.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : स. सदस्या सौ. घायतिलक यांचे पुत्र व महापालिकेचे कर्मचारी स्व. मिलींद घायतिलक यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी. शिवाय ते महानगरपालिकेचे अस्थायी कर्मचारी म्हणून कार्यरत होते त्यांचे जागेवर त्यांचे कुटुंबातील एक व्यक्तींना कामावर घ्यावे.

श्री. अंबादास दानवे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.
(याचवेळी स्व. श्री. मिलिंद घायतिलक यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

मा. महापौर : संबंधित कर्मचाऱ्यांचे कुटुंबातील एका व्यक्तींना महानगरपालिका सेवेत कामावर घेण्यासंबंधी प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : स. सदस्यांनी बऱ्याच वेळा झोन विभागाला पत्र दिले. झोन वाईज माहिती उपलब्ध होऊ शकेलेली नाही. वसुली संदर्भात स. सदस्यांनी काही माहिती जमा केलेली आहे. वसुली न होण्यास प्रशासनाच्या काय अडचणी आहेत याचा अगोदर खुलासा व्हावा. व झोन वाईज वसूली किती झालेली आहे, त्याची प्रशासनाने अगोदर माहिती द्यावी. त्यानंतर चर्चा करण्यांत यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी याबाबतीत खुलासा करावा.

श्री. विकास जैन : झोनवाईज वसुली किती झालेली आहे. त्याप्रमाणे खुलासा व्हावा.

मुख्य लेखाधिकारी : महानगरपालिकेचा १२८ कोटीचा अर्थसंकल्प असून ३ बाबींवर मुख्यत्वेकरून उत्पन्न महानगरपालिकेस मिळते त्यात जकात, पाणीपट्टी, तसेच मालमत्ता कर अर्थ संकल्पात जकातीसाठी ६२ कोटीचे वसुलीचे उद्दिष्ट होते तसेच २० कोटी मालमत्ता कर व पाणीपट्टी १७ कोटी उद्दिष्ट ठेवण्यता आलेले आहे. डिसेंबर अखेर मालमत्ता कराची वसुली ६.१८ कोटी तर पाणीपट्टीची ४.९४ कोटी व जकातीची ४२.६७ कोटी वसूल झालेले आहे. व इजर वसुलीच्या माध्यमातून थोड्याफार प्रमाणात वसुली झालेली आहे.

श्री. अविनाश कुमावत : प्रत्येक झोनवाईज किती वसूली झालेली आहे. खुलासा करण्यात यावा.

मुख्य लेखाधिकारी : मालमत्ता कराची डिसेंबर अखेर झोन वाईज वसुली अशी की, झोन क्र. १ साठी १.९५ कोटीचे उद्दिष्ट होते. त्यातून ६२.८३ लक्ष वसुली होऊन त्याची सरासरी वसुलीचे प्रमाणे ३२% होते. तसेच झोन क्र. २ चे उद्दिष्ट ३.१६ कोटीचे होते त्यापैकी ७६.२७ लक्ष वसूल झाले २४% वसुली झाली. झोन क्र. ३ साठी २.१५ कोटीचे उद्दिष्ट होते. डिसेंबर अखेर ५६.८७ लक्ष वसूल झाले २७% वसुली करण्यात आलेली आहे. झोन क्र. ४ साठी ५.८८ कोटीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी २.०२ कोटी म्हणजेच ३५% वसुली झालेली आहे. झोन क्र. ५ साठी २.०० कोटीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ८३.१४ लक्षची वसुली झाली. ४१% वसुलीचे प्रमाणे आले. झोन क्र. ६ साठी २.२३ कोटीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ८९.८२ लक्ष म्हणजेच ४०% वसुलीचे प्रमाण आले.

झोन क्र.८ साठी १.९७ कोटीचे उद्दिष्ट होते त्यापैकी ४४.६४ लक्ष इतके वसूल झाले. टक्केवारी ३८% येत आहे. मालमत्ता कराची डिसेंबर २००२ अखेर ६.१८ कोटीची वसुली झालेली असून वसूलीचे प्रमाणे ३१% येते.

श्री. अविनाश कुमावत, श्री. भाऊसाहेब ताठे : झोन निहाय पाणीपट्टीची सुध्दा वसूली किती झालेली आहे. खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : पाणीपट्टी वसुलीबाबतचा झोन निहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| झोन क्र. | उद्दिष्ट | वसुली | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २.०५ कोटी | ४६.८६ लक्ष | २३% |
| २ | १.९८ कोटी | ३२.५४ लक्ष | १७% |
| ३ | १.६२ कोटी | ३२.४४ लक्ष | २०% |
| ४ | ४.१३ कोटी | १३३.८१ लक्ष | ३२% |
| ५ | ६१ लक्ष | १४.७० लक्ष | २५% |
| ६ | १.३२ कोटी | ३७.१० लक्ष | २८% |
| ७ | ४.८६ कोटी | १६२.८५ लक्ष | ३४% |
| ८ | ७५ लक्ष | ३४.२१ लक्ष | ४५% |

चालू वर्षाचे १७.३२ कोटीचे पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. त्यापैकी ४.९४ कोटी वसुली झालेली असून २८% वसुली झालेली आहे.

श्री. विकास जैन : मालमत्ता कराचे टारगेट झोनवाईज कशा पध्दतीने दिलेले होते.

मुख्य लेखाधिकारी : चालू वर्षाची मागणी हि. १२.८१ कोटीची होती मागील थकबाकी २२.८० कोटी असे मिळून एकूण सर्व झोन मिळून मागणी ही ३५.६१ कोटीची आहे. चालू वर्षासाठी उद्दिष्ट १८.५४ कोटीचे ठेवण्यात आलेले होते.

श्री. विकास जैन : थकबाकीसह एकूण या वर्षाचे उद्दिष्ट १८.५४ कोटीचे आहे हे उद्दिष्ट पूर्ण व्हावयास पाहिजे होते. आतापर्यंत ६.१८ कोटीच वसूल झालेले आहे.

मुख्य लेखाधिकारी : थकबाकी जी आहे ती ८ ते १० वर्षापासूनची आहे. उद्दिष्ट पेक्षा थकबाकीची रक्कम जास्त आहे. ३० ते ३५ कोटी बाकी आहे.

श्री. विकास जैन : जे टारगेट ठरवून देण्यात येते ते सुध्दा वसूल होत नाही ही नेहमीची पध्दत झालेली आहे. अधिकाऱ्यांनी ठरवून दिलेले टारगेट पूर्ण करावयास पाहिजे. टारगेट पूर्ण होत नाही हि खेदाची बाब आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : जे ६.१८ कोटी वसूल झालेले आहे. त्यात चालू वर्षाच्या मालमत्तेची किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

मुख्य लेखाधिकारी : डिसेंबर अखेर मागील थकबाकीसह या वर्षाची अशी एकूण ६.१८ कोटी वसूल करण्यात आलेले आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको भागातील एन-२ येथील काही नागरिकांना पाणी देण्यात आले नव्हते म्हणून त्या नागरिकांना पाणीपट्टी माफ करण्याचा या सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. तरी सुध्दा तेथील काही नागरिकांना पाणीपट्टीची बिले देण्यात आलेली आहे जो निर्णय सभागृहाने घेतला त्यानुसार पाणीपट्टीची रक्कम माफ करून ठेवण्यात आलेले पाणीपट्टीचे उद्दिष्ट निश्चित करण्यता आलेले आहे का?

श्री. मधूकर सावंत : जकात विषयावर चर्चा करावी. जकातीचे उद्दिष्ट पूर्ण होणार आहे का यावर चर्चा करावी नंतर इतर विषयावर चर्चा व्हावी.

मा. महापौर : महसूली उत्पन्न कसे वाढविता येईल यासाठी स. सदस्यांनी मार्गदर्शन करावे.

डॉ. भागवत कराड : महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने ही सभा किती दिवस चालणार आहे. दोन दिवस सभा चालणार असेल तर आजच्या बैठकीत पाणीपट्टी तसेच मालमत्ता कराच्या संदर्भात चर्चा करावी. उद्याच्या बैठकीत जकात विषयावर चर्चा करावी. असे माझे मत आहे. तसा आपण निर्णय घ्यावा.

मा.महापौर : वसुलीचे प्रमाण कमी झालेले आहे ते वाढविण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करीत आहे मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीची वसुली कशा प्रकारे वाढविता येईल यावर स. सदस्यांनी चर्चा करावी तसेच एका वेळेस एकाच स. सदस्यांनी बोलावे.

श्री. सुदाम सोनवणे : पाणीपट्टी तसेच मालमत्ता कराचे जे टारगेट झोनवाईन दिलेले होते. त्याची वसुली किती प्रमाणात झालेली आहे. याची माहिती देण्यात यावी तसेच जकातीचे उद्दिष्ट मार्च अखेर पूर्ण होणार आहे की, नाही आता पर्यंत किती वसुली झालेली आहे. याची माहिती घ्यावी. तयानंतरच सविस्तर चर्चा करता येईल.

मा. महापौर : स. सदस्यांच्या मागणीनुसार आताच मुख्य लेखाधिकारी यांनी मालमत्ता कराची वसुलीच्या संदर्भात माहिती दिली त्याची एक एक प्रत सर्व सदस्यांना माहितीसाठी देण्यात यावी.

सौ. निखत परविन : पाणीपट्टी, मालमत्ता कर बाबतची झोनवाईज सविस्तर माहिती देण्यात यावी किती रक्कम वसूल करण्याचे बाकी आहे.

श्री. अंबादास दानवे : आताच मुख्य लेखाधिकारी यांनी महसूली उत्पन्नाच्या संदर्भात झोनवाईज मालमत्ता कर पाणीपट्टी वसूली झालेल्याची माहिती दिली. सभागृहाने एक-एक विषयावर चर्चा करणे योगय होईल. प्रामुख्याने आता मी पाणीपट्टी या विषयावर चर्चा करीत आहे. या वर्षी डिसेंबर अखेर पाणीपट्टीची वसुली ही ४.९४ कोटी झालेली आहे. उद्दिष्टाच्या २८% वसुली झालेली असून मागील वर्षी याच काळात डिसेंबर अखेर ४.३३ कोटी वसूली झालेली होती. याचा अर्थ मागील वर्षीपेक्षा या वर्षी वसूली ही कमी झालेली आहे. झोन कार्यालयामार्फत अकार्यक्षम कारभार चालत असल्यामुळे वसुली कमी होण्याचे कारण आहे. हे ठामपणे मी सांगू शकतो. किमान या वर्षी ५ ते ६ कोटीच्या पुढे पाणीपट्टी वसूल व्हावयास पाहिजे होती. थकबाकी ही १२.९६ कोटीची असून चालू वर्षाची येणे १०.११ कोटीचे आहे. एकूण २३.०७ लक्ष पाणीपट्टीच्या माध्यमातून येणे बाकी आहे. एकूण रक्कम येणे ही २३.०७ कोटी असतांना सुध्दा उद्दिष्ट १७.३२ कोटीचे ठेवण्यात आलेले आहे. डिसेंबर अखेर ४.९४ कोटीचे वसूल केलेले आहे. मुद्या असा आहे की, वर्षभराच्या काळात पाणीपट्टी वसुली संदर्भात महापालिकेने वेगवेगळ्या प्रकारच्या योजना राबविलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने अभय योजना राबविण्यात आलेली असून तशी प्रसिध्दी प्रशासनाच्या माध्यमातून झालेली असून एकूण ४ कोटी रुपये या योजनेचया माध्यमातून मिळणार होते. व वसूल होतील असे प्रशासनाचे मत आहे. यात अनाधिकृत जे नळ कनेक्शन आहे ते रेग्युलर करायचे होते या माध्यमातून ४ कोटी रुपये मिळणार होते. वृत्तपत्राच्या माध्यमातून असे समजले की, जवळपास १ हजार नळ धारकांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. प्रत्येक नळ धारकांकडून २४००/- रु. असे एकूण

२.४० कोटी रुपये आले असतील. अशी कार्यवाही केलेली असेल तर उद्दिष्टाप्रमाणे वसुलीचे प्रमाण सुध्दा वाढावयास पाहिजे होते. ती वसुली कमी का झाली हा महत्वाचा मुद्दा आहे अभय योजना राबवितांना अनेक बाबी समोर सुध्दा आलेल्या आहे. झोन क्र. ७ मध्ये बऱ्याच ठिकाणी मुख्य जलवाहिनी वरून नागरिकांना अनाधिकृत नळ कनेक्शन झोन अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. सर्व्हिस लाईनवर नळ कनेक्शन द्यावे लागतात हे झोन अधिकाऱ्यांना माहित नाही का? आज सुध्दा चौकशी केल्यास तसे आढळून येईल. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ पाडून घ्यावे व कार्यवाही केली पाहिजे. अनधिकृतपणे नळ कनेक्शन देण्यात आले व त्यानंतर कोणतीही प्रोसेस पूर्ण न होता अधिकृत करून घेण्यात आलेले आहे. हे कनेक्शन देत असतांना झोन अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांचा कोणत्याही प्रकारचा अभिप्राय घेतलेला नाही एखाद्या नागरिकांला नळ कनेक्शन घ्यायचे असल्यास ते नागरिक महापालिकेच्या संबंधित विभागात १०-१० चकरा मारतो. परंतु झोन अधिकारी यांनी कोणताही अभिप्राय न घेता मुख्य लाईनवरून नळ कनेक्शन दिलेले आहे. याचा अर्थ अधिकारीच योजनेचा बोजवारा वाजवितात. यामुळे वसुली कमी होऊ शकते व वसुली कमी होण्यास कोण कारणीभूत आहे हे दिसून येत अशा प्रकारचे अनधिकृत नळ कनेक्शन देण्यास ते स्वत:च अधिकृत करून घेण्यास प्रोत्साहन देण्यात येत असेल तर कायदा बघण्याची जबाबदारी कोणावर आहे. वृत्तपत्रात बातम्या येतात. नगरसेवकच वसुली न होण्यास कारणीभूत आहे. परंतु हे चुकीचे असून अधिकारीच जबाबदार आहे. झोन क्र. ७ चे मी उदा. दिले आहे. नॅचरली वाढ ही १० ते १५% दरवर्षी होत असते. नळ कनेक्शन सुध्दा वाढलेले आहे. अभय योजना सुध्दा राबविलेली असतांना पाणीपट्टीची वसुली का कमी झालेली आहे. यासाठी कोणकोणते घटक कारणीभूत आहे. याचा शोध घेणे आवश्यक आहे.

श्री. प्रशांत देसरडा : मागील वर्षाचा जो अर्थसंकल्प सादर करण्यता आला त्यात ९ ठळक वैशिष्ट्ये दिलेली होती. त्यापैकी प्रशासना मार्फत एकाच ठळक वैशिष्ट्यावर कार्यवाही झालेली आहे हे खेदाने सांगावेसे वाटते यात दोन विषय हे महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे होते. यात मालमत्ता कर किती इमारतींना लागलेला आहे किंवा लागलेला नाही या संदर्भात सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतलेला होता. पाणीपट्ट्याच्या वसुलीच्या संदर्भात चर्चा करावी असे स. सदस्यांनी मत मांडलेले आहे. त्यानुसार आताच स. सदस्य श्री. दानवे यांनी चर्चा केलेली आहे. त्याची नोंद सर्वांनी घेतली असेलच. २३ कोटी थकीत रक्कम असून फक्त २८% च वसुली आतापर्यंत झालेली आहे. थकीत रककम ग्राह्य धरण्यास फक्त आतापर्यंत २०% रक्कम वसूल झालेली आहे. सर्वात कमी वसुली ही झोन क्र. २ ची म्हणजेच १७% झालेली आहे. जे अधिकारी उद्दिष्ट पूर्ण करणार नाही त्यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय झालेला होता. आजची वसुली ही २०% च असून हि वसुली डिसेंबर २००२ अखेर पर्यंत असून मार्च अखेर जास्तीत जास्त उद्दिष्टांच्या प्रमाणे २५% वसुली होईल. त्यासाठी झोन अधिकाऱ्यांवर आतापासूनच कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न व्हावेत. जेणे करून मार्च अखेर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल. यातूनही ५% रक्कम

अभय योजनेच्या माध्यमातून मिळालेली असून ती ५% रक्कम वजा केल्यास फक्त १५% वसुली या वर्षाची झालेली आहे. थकीत रककम भरणा करण्याबाबत वृततपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यवाही करतो यात महापालिकेचे बरेच आर्थिक बळ खर्च झालेले आहे. त्यानुसार तेवढी वसूली होते का? प्रसिध्दी दिल्यास पूर्ण कार्यवाही झाली पाहिजे नसता आता नागरिकही महापालिकेला भित नाही. कोणतीही भिती नागरिकांमध्ये राहिलेली नाही. खर्च केला जाता त्याप्रमाणे वसुली होण्यास मदतही मिळाली पाहिजे. झोन क्र. ८ मध्ये ४५% वसुली झालेली आहे. अशा अधिकाऱ्यांना काही बक्षिस दिले पाहिजे जेणे करून काम करण्यास ते उत्सुक राहतील. व जे अधिकारी उद्दिष्ट पूर्ण करणार नाही त्यांचेवर काय कार्यवाही करायची त्याचा निर्णय आजच घेण्यात यावा.

श्री. जयवंत ओक : अनधिकृत नळ कनेक्शन असतील तर तोडून टाकण्यात यावे. जे महसूली उत्पन्न येते त्यावरच या शहराचा विकास होतो. जी योजना राबविल्या जाते त्याचे तीनतेरा केले जाते. आताच श्री. खैरनार साहेब यांनी किती वसुली झाली याची माहिती दिली. बजेटमध्ये जी ठळक वैशिष्ट्ये ठेवलेली होती त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामध्ये संपूर्ण संगणकीकरण करून घरांना नंबर देण्याबाबत होते. त्याची अंमलबजावणी केलेली नाही. जेथे घर आहे तेथे कर तसेच त्या घरामध्ये नळ कनेक्शन या पध्दतीने पाणीपट्टी वसुली करण्यास आणखी मदत होऊ शकते. प्रशासन सध्या काय करणार जे की, येत्या दोन ते अडीच महिण्याच्या काळात उद्दिष्ट पूर्ण होणार आहे की नाही याची माहिती द्यावी. प्रत्येक झोनवाईज मालमत्तेला नंबर द्यावे. अनधिकृत मालमत्ता किती अधिकृत किती त्यांना कर लागलेला आहे का? हे पहावे व सर्वच मालमत्तेला नंबर द्यावे जेणे करून मालमत्ता कर वसूल करण्यात मदत होईल.

श्री. अविनाश कुमावत : पाणीपट्टी या विषयावर चर्चा करावी नंतर मालमत्ता विषयावर करावी.

श्री. जयवंत ओक : सभागृहात कोणत्याही प्रकारची दिशा देत नाही. ज्या अनाधिकृत वस्त्यामध्ये नळ कनेक्शन दिले असेल अशा घरांना नंबर द्यावे. शहरात ११४ वसाहती अनाधिकृत आहेत. ५२ झोपडपट्या या ठिकाणी नळ कनेक्शन दिले आहे किंवा नाही दिलेले असतील तर पाणीपट्टी भरतात की नाही याची चौकशी करण्यात यावी. किती तरी नळधारक कनेक्शनसाठी परवानगी मागतात, तात्काळ कार्यवाही होत नसल्याने अनधिकृत नळ कनेक्शन करतात. अधिकाऱ्यांनी सुध्दा नागरिकांना वेठीस धरू नये. या कार्यालयात नागरिक कोणत्याही कामासाठी आल्यास १ दिवसांमध्ये काम व्हावयास पाहिजे अशी काही योजना राबविण्यात यावी. प्रत्येक संचिकेमागे नागरिकांना फिरावे लागते. तात्काळ कामे झाली पाहिजे जेणे करून आपली महापालिका ही आदर्श महानगरपालिका म्हणून ओळखली पाहिजे. नळ कनेक्शन हे नागरिकांना जागेवर करून दिल्यास नागरिक पैसे भरण्यास तयार आहे. व अधिकृत करून घेण्यास तयार आहेत. आपली पाणीपट्टीची एकूण मागणी २४ कोअीची असून फक्त ४.९४ कोटीच वसूल झालेले आहे. घरांना नंबर दिल्यास आणखी जास्त प्रमाणात वसुली होऊ शकते. तसेच सरकारी नळ कनेक्शन किती त्याची सुध्दा तपासणी व्हावी. पाणी वाया जाते का ते

पहावे. त्यास तोट्या बसवाव्यात. काही जनतेला पाणीपट्टी भरून दुसरीकडून पाणी डोक्यावर आणावे लागते. काही भागात १ दिवसाआड तर काही भागत २ ते ३ दिवसाआड पाणी दिले जाते. हि परिस्थिती का निर्माण होत आहे. यासाठी प्रशासनाने काहीतरी उपाययोजना कराव्यात. सिडको हडकोसाठी जी एक्सप्रेस लाईन टाकण्यात येणार होती त्याचे काय झाले. त्या लाईनचे सबस्टेशन येथे केले तर फायदेशीर होईल. दुसरा मुद्दा असा की, पाणी वाया जात असेल तर अशा ठिकाणी नळांना मीटर बसवावे एका घराला एक नंबर दिला तर शहरातील प्रत्येक घराला नंबर दिल्यास कोणत्या मालमत्तेला नळ कनेक्यशन दिले आहे. कुणी पैसे भरलेले नाही याचा शोध घेण्यास सोपे होईल. त्यासाठी संगणकीकरण करून कार्यवाही करावी. त्यानंतर वसुली झाली नाही तर झोन अधिकाऱ्यांवर कार्यवाही करता येईल.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको भागात एक दिवसाआड पाणी दिले जाते याचा अर्थ आपण या नागरिकांवर अन्याय करतो शहरामध्ये जवळपास ३ लक्ष मालमत्ता असू शकते. परंतु फक्त १.२५ ते १.५० लक्ष मालमत्तेचीच आपल्याकडे नोंद असून यातून पाणीपट्टी भरणारे ग्राहक संख्या ८८ हजार आहे. त्यापैकी २७ हजार नळ कनेकक्शन सिडको हडकोतील असवून तेथील मालमत्ता महापालिकमध्ये येत नाही. ते वजा केले असता. शहरात फक्त ६० ते ६२ हजार नळ ग्राहक संख्या आहे का? सर्वात जास्त वसुली सिडको हडको भागातील पाणी पट्टीच झालेली आहे. उद्दिष्टाच्या ३४% वसुली झालेली आहे. या भागातील जनतेला एक दिवसाआड पाणी दिले जाते त्यामुळे ६ महिण्याची पाणीपट्टी बिल आकारावे. तसेच एन-११ भागातील माझ्या वॉर्डातील काही घरांना तीन वर्ष पाणी मिळत नव्हते म्हणून तत्कालीन महापोर श्री. सुदाम मामा सोनवणे यांचे कार्यकाळात त्यांनी त्यांना घरांना लावण्यांत आलेली पाणीपट्टी जवळपास ३ लक्ष रुपये माफ करण्याचा निर्णय घेतलेला होता. हि पाणीपट्टी माफ करण्यासाठी मा. भोगे साहेब यांनी सुध्दा आदेशित केलेले होते. परंतु कार्यवाही झालेली नाही ती पाणीपट्टी यातून वगळून माफ करण्यात यावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : उत्पन्न वाढले पाहिजे ते वाढत नसेल तर काय उपाययोजना करता येईल यावर चर्चा करणे योग्य होईल यावर चर्चा करणे योग्य होईल. आताच काही स. सदस्यांनी मत व्यक्त केले की, महापौरांनी रुलींग दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत नाही. खिल्ली उडविली जाते त्यासाठी जे या बैठकीच्या माध्यमातून आपण निर्णय घेणार आहोत त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. याची प्रशासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. आताच प्रशासनातर्फे किती वसुली झाली याची आकडेवारी सांगण्यात आली अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात कोणतीही विकास कामे होणार नाही व एखाद्या वॉर्डात काम करावयाचे झाल्यास ते होत नसल्यास नगरसेवकांना नागरिक जबाबदार धरतात. प्रशासकीय खर्च व होणारी वसुली याचा विचार केल्यास कुठेही साम्य होत नाही. यापुढे काही बरेवाईट झाल्यास नागरिक नगरसेवकांनाच जबाबदार धरतील यात शंका नाही वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द होतात. त्यामुळेही स. सदस्यांची बदनामी होते. वसुली न होण्याची कारणे काय? कोणते अधिकारी यास जबाबदार आहेत.

यासाठी ठोस असा निर्णय घ्यावा. की, जे अधिकारी वसुलीत कमी पडत असतील यांचेवर कार्यवाही व्हावी. तरच हि मिटींग बोलविण्याचे सार्थक होईल.

श्रीमती पार्वती मानकापे : झोन विभागामार्फत काही भागात अनाधिकृत नळ कनेक्शन तोडण्याची कार्यवाही झाली त्यावेळी माझ्या वॉर्डात ही मोहिम राबविली परंतु मोठमोठ्यांचे इमारत मालकाचे नळ कनेक्शन तोडण्यात आलेले नाही. काही हॉटेलची तोडण्यात आले नाही. कोणत्याही कामाविषयी झोन अधिकाऱ्यांना बोलल्यास आम्हाला काहीच अधिकार नाही असे सांगतात त्यासाठी झोन अधिकाऱ्यांना अधिकार द्यावे. बऱ्याच ठिकाणी लिकिजेस आहे. ते सुध्दा बंद करण्यात येत नाही. रस्त्यावर काहीवेळा पाणी वाहते. वॉर्डात कुठे अनाधिकृत नळ कनेक्शन आहे त्याची चौकशी करण्याची जबाबदारी संबंधित इंजिनिअरची किंवा कर निरिक्षकांची आहे.

श्री. तकी हसन खॉन : उद्दिष्टाप्रमाणे वसुली झालेली नाही यात शंका नाही. वसुली का होत नाही. प्रशासनाकडे कायदा आहे. जे नागरीक पाणीपट्टी भरीत नाही त्यांचे नळ कनेक्शन कट करावयास पाहिजे ही कार्यवाही झाल्यानंतर कोणत्या लोकप्रतिनिधीने हस्तक्षेप करू नये याचे सुध्दा पालन झाले पाहिजे. वसुलीचे प्रमाण बघितले तर सर्वांत कमी वसुली झोन क्र. २ ची झालेली आहे. या झ ोन मध्ये सर्वांत जास्त कमर्शियल भाग येतो तरीही वसुली कमी झालेली आहे. त्याचप्रमाणे झोन क्र. ५ मध्ये सुध्दा मोठमोठ्या कंपन्या आहेत २ इंच ते ३ इंच नळ कनेक्शन असतील. या झोनमध्ये सुध्दा कमी वसुली झाली आहे. अशा झोन मध्ये २५% वसुली होते तर ज्या झोनमध्ये गरीब जनतेच्या वस्त्या आहेत जे की, झोन क्र. ८ मध्ये ५५% वसुली होते. यावरून असे सिध्द होते की ज्यांचेकडे थकबाकी आहे. ती तशीच थकीत राहते जे देतात त्यांचेकडून वसुल केली जाते. ज्यांचेकडे जास्त रक्कमेची थकबाकी आहे ते नागरिक कर देत नाही त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज आहे प्रशासनाला कायद्यानुसार संपूर्ण कार्यवाही करण्याचे अधिकार आहे. जे की, प्रशासन सर्व थकीत रक्कम वसूल करू शकते. वसुलीच्या संदर्भात कोणत्या लोकप्रतिनिधीने हस्तक्षेप करू नये.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणीपट्टी वसुली हि फक्त २५ ते ३०% झालेली दिसून येते. एकूण मागणी हि २४ कोटीची होती उद्दिष्ट फक्त १७.३२ कोटीचे ठेवण्यात आले यात जवळपास ६ कोटीचा फरक येतो. उद्दिष्ट ठेवताच जास्त ठेवण्यास पाहिजे होते कमी उद्दिष्ट ठेवून ही वसुली हि २८% वर गेलेली नाही. महानगरपालिकेचे प्रशासन चालविण्याच्या दृष्टीने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे. प्रभाग समित्यांची विभागणी केलेली आहे त्यांचे अधिकार त्यांना दिले सभापती. निवडण्यांत आलेले आहे तसेच झोन अधिकारी यांना सुध्दा जास्तीत जास्त अधिकार दिलेले आहे. कर्मचारी दिलेला आहे. तसेच स्थायी समितीचे सभापती यांचे अध्यक्षेतेखाली वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहे. अशी सर्व परिस्थिती व्यवस्थित असतांना १० महिने झाले आतापर्यंत २७ ते २८% वसुली होते हे बरोबर नाही. झोन अधिकारी काय करतात असा प्रश्न निर्माण होतो. वसुली होत नाही म्हणून विकास कामे होत नाही यास जबाबदार कोण आहे. नागरिकांना लहान लहान कामासाठी खुपदा चकरा माराव्या लागतात. आज ही वेळ गेलेली

नाही. प्रभाग समितीला जे अधिकार दिले आहे त्याप्रमाणेच प्रभाग समिती वाईज ने उद्दिष्ट झोनला दिले जाते ती सुध्दा जबाबदारी त्यांचेवर सोपविली पाहिजे. जेंव्हा अधिकाराची मागणी होते तेंव्हा जबाबदारी सुध्दा द्यावयास पाहिजे. हे करीत असतांना कोणत्याही व्यक्तींने वसुलीच्या कामात हस्तक्षेप करू नये व कुणी करणार नाही याची सुध्दा जाणीव ठेवूनच अधिकाऱ्यांनी सुध्दा जास्तीत जास्त वसुली कशी होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. झोन क्र. ५ मध्ये मोठमोठ्या कंपन्या आहे नळ कनेक्शन मोठमोठे दिलेले आहेत. तेथील वसुली बघितली तर २५% पर्यंत दिसून येते. आणि ज्या भागात कामगार राहतात तया सिडको हडको भागात एक दिवसाआड पाणी देण्यांत येते. तेथील वसुली हि ३४% होते याचा अर्थ उद्योगपतींना आपले अधिकारी पाठीशी घालत आहेत यात शंका नाही. झोन निहाय झोन अधिकारी यांचेवर वसुलीचे उद्दिष्टांची जबाबदारी टाकावी निश्चितपणे उर्वरित काळात उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल.

श्री. भगवान घडामोडे : जी आकडेवारी दिली ती प्रशासनाने गोलमोल दिलेली आहे. जे झोनवाईज उद्दिष्ट ठरवून दिले होते त्यादृष्टीने जास्त प्रमाणात वसुली होण्यासाठी झोन अधिकारी यांनी काय प्रयत्न केलेले आहे. त्याचा खुलासा करण्यात यावा. उर्वरित दोन महिण्यात उद्दिष्टपूर्ण करणार आहात का? खुलासा घ्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : वसुलीच्या संदर्भात आजची विशेष सभा आपण बोलवली त्याबद्दल महापौरांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यंते. वसुली करण्यासाठी आणखी दोन महिण्याचा अवधी असून आताच उद्दिष्ट्यांप्रमाणे झालेल्या वसुलीची माहिती प्रशासनाने दिलेली आहे. जी माहिती दिली ती चूक आहे की, बरोबर हे लोकप्रतिनिधींनी या सभागृहाने ठरवायचे असते. अधिकाऱ्यांच्या चुका काढल्या नाही तर आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणण्याचा अधिकार राहणार नाही. १७ कोटीचे पाणीपट्टीचे उद्दिष्ट होते वसुली ही ५ कोटीपर्यंतच गेलेली आहे जे की, १२ कोटी आणखी वसूल करायचे आहे. जे टारगेट ठेवण्यात येते ते नळ कनेक्शनची संख्या विचारात घेऊन ठेवले जाते. आजपर्यंत ८ ते ८.५० कोटीपर्यंत वसुली व्हावयास पाहिजे होती. इतर महानगरपालिकेप्रमाणे याही महापालिकेचे उद्दिष्ट ठेवून हे शहर सुंदर करण्याचे मत स. सदस्यांचे आहे. परंतु आपले कर्तव्य काय आहे हे विसरून जातात. असे माझे मत आहे. झोन क्र. ७ मध्ये अनधिकृत नळ कनेक्शन घेण्यात आले म्हणून बातमी वृत्तपत्रात येते. परंतु ते का घेण्यात आले याची कारणे अधिकाऱ्यांनी शोधणे गरजेचे आहे. झोन क्र. ७ मध्ये पाण्याची अत्यंत बिकट परिस्थिती असून एक दिवसाआड सुध्दा येथील जनतेला व्यवस्थित पाणी मिळत नाही. एकच नळ कनेक्शन नाही तर असे किती नळ कनेक्शन अनधिकृत असू शकतात. अस मी ठामपणे सांगू शकतो. अधिकारी तोडण्यास आले तरी आम्ही तोडू देणार नाही. प्रथम तेथील नागरिकांना अगोदर भरपूर पाणी द्या नंतर ती कार्यवाही करावी. गेल्या आठ दिवसापासून नवभारत सोसायटीमध्ये पाणीपुरवठा होत नाही फत्तेसिंगपुरा येथून पाणी दिले जात होते. तेथच पाणी आता सिडको एन-७ मधून देण्यात येते मी महापौर असतांना कार्यवाही केलेली होती. त्या नागरिकांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता त्यांचे नळ कनेक्शन कट केलेले आहे.

महानगरपालिकेचे अधिकारी त्यांचे जे कर्तव्य आहे ते करीत नसल्याने नागरिक अनधिकृत नळ कनेक्शन घेतात असे वाटते. झोन क्र. ४ मध्ये अशा काही मालमत्ता आहे त्या मालमत्ता धारकांकडे २० ते ३५ हजार रुपये बाकी आहे. आपले कर्मचारी वसुलीसाठी गेले असता काही नगरसेवक तसेच पदाधिकारी मध्यस्थी करतात. ज्यांचेकडे थकबाकी आहे अशा नागरिकांनी प्लंबरला हाताशी धरून नळ कनेक्शन कट करून त्या नागरिकांना नवीन नळ कनेक्शन देण्यात आले. अधिकाऱ्यांनी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता नगरसेवकांनी हस्तक्षेप केलेला आहे. याचा अर्थ अधिकारी कर्मचारी यांना लोकप्रतिनिधीचे सहकार्य होत नाही. काही प्लंबर महानगरपालिकेचे परवाना धारक नाही. तरी सुध्दा ते अनधिकृतपणे नळ कनेक्शन करून देतात २० ते २५ हजार व त्यापुढे थकबाकी रक्कमा धारकांची यादी केल्यास जवळपास २ ते २.५० लक्ष रुपये थकबाकी आहे. अशी परिस्थिती असेल तर उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. ते का पूर्ण होत नाही याकडे लक्ष देण्याची आज गरज आहे. त्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आताच एक सदस्यांनी मत मांडले की, संगणकीकरण करण्यात यावे. ते करूनही वसुली होणार नाही असे माझे मत आहे. त्याऐवजी जे वसुलीसाठी कर्मचारी आहे त्यांना पोलिस संरक्षण द्यावे. तसेच प्रशासनाचे पाठबळ असावे. जे की वसुली जास्तीत जास्त प्रमाणात होऊ शकेल. १९९४ मध्ये एन-१२ या भागात महापालिकेच्या माध्यमातून एक पाईप लाईन टाकण्यात आलेली होती. यासाठी जवळपास १४ लक्ष रुपये खर्च होऊन सुध्दा आजपर्यंत त्या पाईपलाईनवरून नळ कनेक्शन दिले नाही. टेस्टींग नाही ज्यावेळी वसुलीचा मुद्या समोर आणतो त्यावेळी प्रशासनाचा कोणत्या कामावर किती खर्च होते याचाही विचार व्हावयास पाहिजे या पाईपलाईनच्याच शेजारी मेन पाईप लाईन वरून लोकांनी नळ कनेक्शन घेतलेले होते तो तोडून या पाईपलाईनवरून देण्याचा प्रयत्न केला असता त्यातील १० ते १२ पाईप फुटून गेलेले आहे. यावरून असे लक्षात येते की, जे साहित्य वापरले गेले ते चांगल्या प्रतीचे नव्हते व अशी कामे ही ठेकेदाराचे फायद्यासाठी केली जाते. यात महापालिकेचा काहीही फायदा झालेला नाही उलट नुकसानच झालेले आहे. याची मा. आयुक्तांनी चौकशी करावयास पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांच्या हातून ते काम करण्यात आलेले आहे त्याची चौकशी तेसच ज्या कंपनीचे पाईप वापरले गेले ते निकृष्ट दर्जाचे आहे हे काम अधिकारी व ठेकेदार याचे संगनमताने झालेले आहे यात शंका नाही. बऱ्याच भागात पाणी सोडतांना पाणी वाया जाते यासाठी नळ कनेक्शनला मिटर बसविण्याची पध्दत राबवावी. तसेच घरांना व नळांना नंबर दिल्यास सोयीस्कर होईल. व सर्वांनाच आवश्यक तेवढे पाणी मिळेल व पाणी पट्टी जी नेहमीच वाढ होते त्याचा ठपका अधिकारी, पदाधिकारी किंवा नगरसेवकांवर येणार नाही. या महापालिकेमार्फत शासनाकडे कृषी दराने वीज बिल आकारणी व्हावी म्हणून अनेकदा मागणी केलेली आहे. तरी ती मागणी शासन मान्य करीत नाही. म्हणून महापालिकेच्या मालकीचे जनरेटर मागविण्यात यावे. जेणे करून यात महापालिकेचा फायदा होईल व विज पुरवठा खंडीत होण्याचे जे प्रकार होत होते ते सुध्दा होणार नाही. व जनतेला वेळेवर पाणी देण्याची सुध्दा या माध्यमातून कार्यवाही होईल.

वसुलीसाठी कोणत्याही स. सदस्यांनी अधिकारी / कर्मचाऱ्यांचे कामात हस्तक्षेप करू नये असे माझे मत आहे.

श्री. सुनिल मगरे : आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी १४ लक्षची पाईप लाईन टाकून जो खर्च झालेला आहे त्याची चौकशी करून अधिकाऱ्यांनी खुलासा घ्यावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : या पाईपलाईनच्या संदर्भात मी समक्ष जाऊन बघितलेले नाही परंतु संबंधित उप अभियंता तेथे उपस्थित होते. टेस्टींग करतांना काही लिकिजेस होते हे सत्य असून या बाबतीत योग्य ती चौकशी करून अहवाल सादर केला जाईल.

डॉ. भागवत कराड : २३ कोटीची मागणी असतांना उद्दिष्ट १७ कोटीच ठेवण्यात आले त्यातून वसुली हि फक्त ४.९४ कोटीच झालेली आहे. २८% वसुलीचे प्रमाण येते. विद्युत मंडळाकडून नागरिक लाईन कनेक्शन घेतात वेळेवर बिल भरले नाही तर लाइरन कट करण्यात येते. त्याप्रमाणे नळ कनेक्शन सुध्दा कट व्हावयास पाहिजे. महापालिकेची पाणी पुरवठा योजना ही नुकसानीमध्ये चालविण्यात येते. जेथे ३३००/- नळ पट्टी लावण्याऐवजी फक्त महापालिका १२००/- दरवर्षी पाणीपट्टी आकारणी करते असे असतांना सुध्दा वसुलीचे जे उद्दिष्ट ठेवण्यात येते ते पूर्ण होत नाही. जे अधिकारी / कर्मचारी कामात कुचराई करीत असतील त्यांचेवर मा. आयुक्तांनी कडक कार्यवाही करावी. ज्यांचेकडे मागील २ ते ३ वर्षापूर्वीची थकबाकी आहे अशांचे नळ कनेक्शन कट करण्यात यावे जे पाणीपट्टी भरणार नाही त्यांचे नळ कनेक्शन कट करण्याचा निर्णय घेण्याची आज गरज आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर :दबऱ्याच स. सदस्यांनी वसुली जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने आपआपले मत व्यक्त केलेले आहे. यापूर्वीही अनेक वेळा बैठका घेतलेल्या असून मोठ्या प्रमाणात चर्चा झालेली आहे. परंतु प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही असा आरोप स. सदस्यांनी प्रशासनावर केलेला आहे. १७ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले असतांना फक्त ४.९४ कोटीचे वसूल झालेले आहे हे प्रमाण २८% येते. वसुली करण्यात अत्यंत दयनीय अवस्था प्रशासनाची झालेली आहे. अधिकाऱ्यांचा असा गैरसमज झालेला आहे की, नुसती चर्चा होते आपल्यावर काहीही कार्यवाही होत नाही. एक दिवस सभेचा व २८ ते २९ दिवस आपलेच असतात. म्हणून निश्चित करून दिलेले उद्दिष्ट जे अधिकारी पूर्ण करणार नाही त्यांचेवर कार्यवाही करावी. टारगेट कसे पूर्ण करणार आहे याचा खुलासा करावा.

डॉ. भागवत कराड : जे उद्दिष्ट पूर्ण करतील अशा अधिकाऱ्यांना एक वेतनवाढ करण्यात यावी.

मा. महापौर : झोनवाईज माहिती देण्यात यावी. अडचणी काय आहे त्याचा हि खुलासा करण्यात यावा.

विभागीय अधिकारी : झोन क्र. १ मध्ये पाणीपट्टीचे उद्दिष्ट २.०५ कोटीचे होते. त्यापैकी ४६.८६ लक्ष वसुली झालेली असून प्रमाण २२% पर्यंत येते. या झोन अंतर्गत ९ स्लम भाग येतात. तसेच कर्मचारी वर्ग सुध्दा कमी आहेत. तीन महिण्यापासून एक टॅक्स इन्स्पेक्टर नाही प्रभावी वसुली होण्यासाठी ४ भरारी पथक तयार करण्यात आलेले असून त्यात एक इन्स्पेक्टर देण्यात येत आहे. यात थकबाकीदारांचे नळ कट करण्यात येणार आहे. २० लोकांना आतापर्यंत नोटिसा दिलेल्या आहे. थकबाकीदारांकडून आतापर्यंत २७ लक्ष रुपये वसूल

करण्यात आलेले असून अभय योजनेच्या माध्यमातून ९ लक्ष रुपये मिळालेले आहे. तसेच या विभागामध्ये शासकीय कार्यालय जास्त प्रमाणात आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ. भागवत कराड : शासकीय कार्यालय असले तरी कर कुणी ही बुडवीत नाही. अशा कार्यालयाकडून चेकद्वारे वसुली होऊ शकते. बरेचशे कार्यालय चेक देतात.

मा. महापौर : उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री. किशोर तुलशीबागवाले : पाणीपट्टी तसेच मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमेवर १५% व्याज आकारणी करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला परंतु फक्त जुन्या शहरातील नागरीकांनाच व्याज आकरणी होत आहे. सिडको हडकोतील थकबाकी धारकांना व्याज आकारणी करण्यात येत नाही. व्याज आकरणी केल्यास जे भरणार आहे ते थकबाकी भरणार नाही. नियमाप्रमाणे व्याज आकरणी करू शकत नाही. नियमामध्ये तसे नाही जो निर्णय घेतला तो चुकीचा घेतलेला आहे. एन.आर. वी. प्रमाणे टॅक्स आकारणी करण्याबाबत चर्चा झाली. जी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहे ती निकाली काढण्याबाबत अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. ती कार्यवाही पूर्ण करावी. व्याज आकारणी करण्याबाबतचा निर्णय रद्द करावा जेणे करून नागरिक थकीत रक्कमा भरण्यास पुढे येतील व वसुलीत वाढ होईल.

सौ. जयश्री कुलकर्णी : व्याज आकारणी रद्द करण्याचा ठरावा पास केला त्याची अंमलबजावणी केलेली नाही.

विभागीय अधिकारी-२ : या झोन कार्यालयातील बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे. ३ कर निरिक्षक होते. आता सध्या १ कार्यरत आहे. दुय्यम आवेक्षक यांची बदली करण्यात आलेली असून त्यांचे जागेवर कुणीच कर्मचारी दिलेले नाही. थकबाकी धारकांना नोटीस देऊन वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. भरारी पथक तयार करण्यात आलेले आहे. त्यात एक शाखा अभियंता तसेच इतर कर्मचारी आहे. आवश्यक तो कर्मचारी वर्ग दिल्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन देतो. अभय योजनेच्या माध्यमातून ३ लक्ष रुपये वसूल करण्यात आलेले आहे.

विभागीय अधिकारी (३,८) : झोन क्र. ३ साठीचे मालमत्ता कराचे उद्दिष्ट २.१५ कोटीचे होते. तसेच पाणीपट्टीचे उद्दिष्ट १.६२ कोटीचे होते. त्यापैकी मालमत्ता कराची २७% वसुली करण्यात आलेली असून पाणीपट्टीची २०% वसुली झालेली आहे. मालमत्ता कराचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १.५८ कोटीच वसूल करण्यास मी बांधील आहे. कर्मचारी वर्ग कमी प्रमाणात आहे. २५ नागरिकांवर जप्तीची कार्यवाही चालू आहे. माझ्याकडे दोन झोनचा चार्ज असल्यामुळे वसुली करण्यास अडचणी येत असून वेळ कमी पडतो तरी सुध्दा स्भागृहाला आश्वासन देतो की, ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा माझा १००% प्रयत्न राहील.

श्री. नंदकुमार घोडेले : झोन अधिकारी श्री. वाहुळ यांना जे दोन झोनचे टारगेट देण्यात आले हे त्यांना का देण्यात आले. इतरांना सुध्दा असेच टारगेट दिलेले का?

विभागीय अधिकारी-८ : या झोनचे पाणीपट्टीचे उद्दिष्ट ७५ लक्ष दिलेले असून मालमत्ता कराचे १.१७ कोटीचे आहे. आतापर्यंत पाणीपट्टीची वसुली ही ४५% झालेली असून मालमत्ता कराची ३८% वसुली झालेली आहे. ही वसुली

पूर्णपणे होईल. तसेच सेंट्रल जेलचे ४.८५ लक्ष रुपये लगेचच मिळणार असून पाणीपट्टीचे उद्दिष्ट पूर्ण होईल.

मा. महापौर : स. सदस्या सौ. विजया रहाटकर यांची राष्ट्रीय साक्षरता मिशन या केंद्र शासनाच्या कमिटीवर निवड करण्यात आलेली आहे. त्याबद्दल सभागृहाच्या वतीने व महापौर या नात्याने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करते.

(याच वेळी स. सदस्या सौ. रहाटकर विजया यांचे मा. महापौर पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करतात.)

विभागीय अधिकारी-४ : झोन क्र. ४ साठी ४.१३ कोटीचे पाणीपट्टीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी १.३३ कोटीची वसुली झालेली असून ३२% वसुलीचे प्रमाण आलेले आहे. वसुली वाढविण्यासाठी दोन पथके तयार केलेली असून उर्वरित वसुली ३१ मार्च पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन देण्यात येते. शिवाजीनगर येथे नागरिकांना पैसे भरण्यासाठी सोयीस्कर व्हावे म्हणून तशी व्यवस्था केलेली असून वसुली होण्यासाठी आतापर्यंत २३४ नळ कट करण्यात आले.

विभागीय अधिकारी-५ : झोन क्र. ५ साठी ६१ लाखाचे उद्दिष्ट होते. १४.७० लक्ष वसूली झालेली असून वसुलीचे प्रमाण २५% आहे. वसुली जास्तीत जास्त होण्यासाठी ४ भरारी पथके तयार करण्यात आलेली आहे. कर आकारणी विभागाकडून काही कर्मचारी आलेले आहे. त्यांना मासिक वसुलीचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. वसुली किती झाली याचा आढावा घेता ३१ मार्च अखेर उद्दिष्ट पूर्ण होईल.

विभागीय अधिकारी-६ : पाणीपट्टीचे एकूण उद्दिष्ट्चे १.२३ कोटीचे देण्यांत आलेले असून आतापर्यंत डिसेंबर अखेर ३७ लक्ष वसुली करण्यात आलेली आहे. उर्वरित शासनाचे ३५ लक्ष येणार आहे. एकूण वसुली ६९ लक्ष करण्याची आहे. दोन पथके निर्माण केलेली असून १००% वसुली करून देण्याचे आश्वासन देतो. तसेच सप्टेंबर महिण्यात थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याची बातमी प्रसिध्द झालेली होती. ए.सी.एन. वर सुध्दा बातमी होती. परंतु विभागीय कार्यालयात कुठल्याही प्रकारचे आदेश प्राप्त झालेले नाही. त्यामुळे नागरिकांकडून वसुली कशा प्रकारे करायची त्यामुळे नागरिक अनिश्चिता आहे. त्याबाबत योगय मार्गदर्शन झाले तर बरे होईल. तसेच पोलिस पथक दिले तर आणखीनच वसुली वाढवण्यास मदत होईल.

विभागीय अधिकारी-७ : मला या झोन मध्ये जाऊन ११ महिने झालेले आहे. या काळात मी मागील थकबाकी धरता १.०१ मागील आकडा बघता जास्त वसूल केलेले आहे. ३ कोटीचे मला उद्दिष्ट दिलेले असता एकूण ९ पथके तयार केलेली आहे. या पथकात स्पर्धा तयार केलेली आहे जे पथक जास्त वसुली करेल त्यांना १०००/- रुपये बक्षीस म्हणून दिले जाईल तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या पथकास रु. ५००/- बक्षीस दिले जाईल. ज्यामुळे १००% पाणीपट्टीचे उद्दिष्ट पूर्ण होईल.

श्री. नंदकुमार घोडेले : महाराष्ट्र शासनाने अनिधिकृत वस्त्यासाठी गुंठेवारी कायदा काढलेला आहे. त्याची अंमलबजावणी करून जनतेचा जास्तीत जास्त सहभाग होण्यासाठी प्रशासनामार्फत जन जागृती होण्याची आवश्यकता आहे. तशी कार्यवाही केल्यास महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

श्री. अंबादास दानवे : आताच स. सदस्य श्री. घोडेले यांनी गुंठेवारीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन २००१ जानेवारी मध्ये शासनाने एक अध्यादेश काढून अनधिकृत घरे रेग्युलर करण्याचा तो आदेश आहे. यातून महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल. व काही प्रमाणात मिळाले सुध्दा आहे. इतर महानगरपालिकेत या गुंठेवारीच्या कायद्याची अंमलबजावणी तात्काळ केल्याने करोडो रुपयाचे उत्पन्न प्राप्त झालेले आहे. या महानगरपालिकेस यातून म्हणावे तसे उत्पन्न मिळालेले नाही. यात प्रशासना बरोबरच विविध प्रकारे जन जाग्रण करण्यामध्ये नगरसेवक सुध्दा कमी पडलेले आहे असे माझे मत आहे. प्रशासनाने पुढाकार घेतला तर सर्वच सदस्याप्रमाणे स्वच्छता अभियानमध्ये जसा पुढाकार घेतला त्याप्रमाणे या कामासाठी पुढे येतील. त्यासाठी मा. आयुक्तांना विनंती करेल की, गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी तात्काळ केल्यास जमा होणारे उत्पन्न यातून या शहराच्या विकास कामे करण्यास चालना देता येईल. तसेच राष्ट्रीय नेते व सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते सोबत घेऊन अभियान राबवावयास पाहिजे.

श्री. जयवंत ओक : गुंठेवारी कायदा शासनाने लागू केलेला आहे त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महापालिकेची विकास कामे होण्याच्या दृष्टीने यानुसार जमेची बाजू आहे. महाराष्ट्रात सर्वच महापालिकेमध्ये गुंठेवारी कायदा राबवण्यिात येत असून त्या प्रमाणे या महापालिकेत प्रभाविपणे का राबविण्यात येत नाही. प्रशासनास काय अडचण आहे त्या बाबतीत खुलासा करावा प्रशासन सभागृहाची दिशाभूल करीत आहे. या सभागृहातील ५०% सदस्य हे अनधिकृत वसाहतीमधून निवडून आलेले आहेत या वॉर्डात अनधिकृत वसाहती असल्यामुळे विकास कामे करण्यास अडचण येत आहे. गुंठेवारी कायदा लागू केल्यास महापालिकेस १०० कोटी रुपये मिळू शकतील. नाही मिळाले तर मी पदाचा राजीनामा देईल. प्रत्येक घराला नंबर दिल्यास त्यानुसार कार्यवाही करता येईल. महापालिकेने स्वत: त्यांचे घरी जावे घर अनाधिकृत असेल तर अधिकृत करून घ्यावे, नळ अधिकृत नेसल तो अधिकृत करावे. तया व्यक्तींची परिस्थिती बघून त्यांना कर आकरण्यात यावे असे सुध्दा शासनाचे आदेश आहेत. सभागृहात निर्णय काय घ्यायचा तो आपला अधिकार आहे. परंतु त्या जनतेला त्रास होऊ नये अशा पध्दतीने कार्यवाही करावी. आजची बैठक हि वसुली संदर्भात मा. महापौरांनी बोलवली त्याबद्दल सभागृहातर्फे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे गुंठेवारी संदर्भात योग्य तो ठोस निर्णय घेण्यासाठी सभा आयोजित करण्यात यावी असे माझे मत आहे. तसेच हि योजना चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकाऱ्यांची एक समिती तसेच मा. महापौर यांनी सुध्दा स. सदस्यांची एक समिती करावी. त्यासाठी बरेच स. सदस्य सहकार्य करण्यास तयार आहेत. वसुली वाढली तर नागरिकांचे प्रश्न सुटतील. लाईन, ड्रेनेज, पाणी, रस्ते ई. सुविधा चांगल्या प्रकारे मिळाव्यात हिच नागरिकांची मागणी असते. अनधिकृत वसाहतीतील नगरसेवकांना स्वत: संचिका घेऊन फिरावे लागते. कोणत्या भागातील किती संचिका गुंठेवारीच्या संदर्भात पडून आहे. त्या संचिका आजच्या आज निकाली काढून कार्यवाही

करावी यातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न महापालिकेस मिळेल व महापालिकेवर असलेला बोजा कमी होईल.

मा. महापौर : गुंठेवारी कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यातयेऊन महापालिकेचे उत्पन्न कशा पध्दतीने वाढविता येईल यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. जेणे करून विकास कामे करता येतील. ऐनवेळी एक अशासकीय प्रस्ताव सादर झालेला माजी राष्ट्रपती के. आर. नारायणन हे आपल्या शहरात येत असून महानगरपालिकेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

**विषय क्र. १७-अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात दिनांक ११ जानेवारी २००३ रोजी माजी राष्ट्रपती मा. श्री. के. आर. नारायणन एका कार्यक्रमाच्या निमित्ताने येत असून औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे या प्रसंगाचे औचित्य साधून त्यांचा यथोचित मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करणे तसेच दिनांक ११ किंवा १२ जानेवारी रोजी त्यांचे उपलब्ध वेळेनुसार त्यांचे भेटीचा कार्यक्रम (१) मौलाना अबूल कलाम आझद रिसर्च सेंटर (२) छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय, (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या ठिकाणी आयोजित करणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे खर्चासह मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे
श्री. रतनकुमार पंडागळे
श्री. माणिक साळवे.

अनुमोदक - श्री. गणेश तांबे
श्री. सुनिल मगरे
श्री. डॉ. भागवत कराड
श्री. राधाकृष्ण गायकवाड

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १७-अ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात दिनांक ११ जानेवारी २००३ रोजी माजी राष्ट्रपती मा. श्री. के. आर. नारायणन एका कार्यक्रमाच्या निमित्ताने येत असून औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे या प्रसंगाचे औचित्य साधून त्यांचा यथोचित मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करणे तसेच दिनांक ११ किंवा १२ जानेवारी रोजी त्यांचे उपलब्ध वेळेनुसार त्यांचे भेटीचा कार्यक्रम

(१) मौलाना अबुल कलाम आझद रिसर्च सेंटर.
(२) छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय.
(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र. या ठिकाणी आयोजित करण्यास व येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा. महापौर : आजची सभा ३० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(दुपारी २.५० वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा ३.४० वाजता सुरू झाली.)

मा. महापौर : आता मालमत्ता कर या विषयावर चर्चा करण्यात यावी पाणीपट्टीच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. नंतर निर्णय देण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : गुंठेवारी कायदा या विषयावर विशेष बैठक आयोजित करावी.

मा. महापौर : येत्या १० तारखेला गुंठेवारी या विषयावर चर्चा करण्यात येईल.

श्री. प्रशांत देसरडा : अर्थसंकल्पात ठळक वैशिष्ट्ये दिलेली आहेत त्यामध्ये पान क्र. २३ वर कर नियम क्र. २१ नुसार दर ४ वर्षांनी मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यात यावे. बजेटमध्ये जे ठरळ वैशिष्ट्ये ठेवले त्यानुसार कार्यवाही झाली का? मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार दर तीन वर्षांनी मालमत्ताचे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. परंतु अशी माहिती मिळाली की, सन १९९२ मध्ये मालमत्तेचे सर्वेक्षण झालेले होते त्यानुसार आजपर्यंत १० ते १२ वर्षांपूसन कर आकारणी होते या बैठकीनंतर लगेच बजेटची बैठक होणार आहे प्रत्येक बजेटच्या पुस्तकातील ठळक वैशिष्ट्यामध्ये हा मुद्दा छापून येणार परंतु कार्यवाही काहीच नाही. असे किती दिवस चालत राहणार आहे. यावेळचे ही मा. आयुक्त तसा प्रस्ताव देणार सभापती मान्यता देणार मा. महापौर मान्यता देतील परंतु प्रशासनाने आजपर्यंत नवीन कर लावण्याबाबत कार्यवाही का केलेली नाही याचा खुलासा द्यावा. यात कुणाचा दोष आहे. कोणते अधिकारी दोषी आहेत. आताच अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, ६० लक्ष रुपये न्यायालयीन प्रकरणामुळे वसूल करता येत नाही. डॉ. कराड हे महापौर असतांना या महानगरपालिकेचे एक स्वतंत्र न्यायालय स्थापण्याचा निर्णय झालेला होता. व संबंधित न्यायाधिश येथे पाहणी करून सुध्दा गेलेले आहेत. फर्निचर उपलब्ध करून देऊन लगेचच कार्यवाही होणार होती. व न्यायालय स्थापन करून प्रकरणे निकाली निघाली असती तर मालमत्ता कराचे उत्पन्न जास्तीत जास्त वसूल करण्यास मदत झाली असती. तसेच दुसरा निर्णय असा घेतला होता की, जी जी प्रकरणे प्रलंबित आहे अशा प्रकरणाची दर मंगळवारी विभागावाईज एक दिवसात प्रत्यक्ष चर्चा करून प्रकरणे निकाली काढण्याबाबत निर्णय घेतलेला होता. अशी किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहे. त्याचा खुलासा द्यावा तसेच सन १९९२ पासून मालमत्ताचे सर्वेक्षणाचे काम का करण्यात आलेले नाही.

मा. उपआयुक्त (म.) : मालमत्ताचे सर्वेक्षण करणे व सुधारित पध्दतीने कर आकारण्या संदर्भात प्रशासना मार्फत यंत्रणा व आवश्यकते कर्मचारी यांना प्रशिक्षण देवून कार्यवाही करण्यात येणार आहे. एखाद्या संस्थेकडून सर्वेक्षण व्हावे म्हणून तसा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आलेला आहे. दिल्लीची फायर नावाची संस्था जी संस्था सर्वेक्षण करून देणार आहे. त्यांचेशी महानगरपालिकेचा पत्रव्यवहारही झालेला आहे. विनामुल्य करून देणार आहे. प्रशासनाकडून कर मुल्य निर्धारण अधिकारी यांना पाठवून सर्वेक्षण करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण दिशा ठरण्यात येईल. सदरील संस्थेला कदाचित दुसरे काम असेल त्यामुळे प्रतिसाद दिलेला नाही.

डॉ. भागवत कराड : जी संस्था सर्वेक्षण करून देणार आहे ती नॉमिनल रक्कम घेऊन करून देणार. दिल्ली किंवा मद्रासची संस्था येथे येऊन सर्वेक्षण करून

देणार म्हणजे या मागचा उद्देश काय त्याऐवजी एखादी संस्था विना मुल्य सर्वेक्षण करून देत असेल तर तशी कार्यवाही व्हावी.

मा. उपआयुक्त (म.) : खाजगी संस्थेकडून सर्वेक्षणाचे काम करून घेतल्यास प्रशासनाला बरीच फिस द्यावी लागेल. त्या ऐवजी हि एक संस्था होती जे त्यांना वर्ल्ड बँकेकडे त्यांचे जे हेड आहे त्यातून हि संस्था काम करते असाच एक दुसऱ्या संस्थेचा प्रस्ताव आपल्याकउे आलेला आहे. त्यासंबंधी मा. आयुक्तांशी मी चर्चा केलेली आहे. दिल्लीची फायर या संस्थेने प्रतिसादर दिला नाही तर दुसऱ्या संस्थेचा जो प्रस्ताव आलेला आहे त्या बाबतीत विचार करण्यात येणार आहे व सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात येईल. १९८२ पासून एम.आय.डी.सी. एरीया झालेला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात या शहराचे नागरिकरण झालेले आहे. नागरिकरणाचा वेग हा आशिया खंडामध्ये पुढे होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्ता तयार झालेल्या आहेत. नव्यानेच करमुल्य निर्धारण हि शाखा स्थापन केलेली आहे. या अगोदर लहान शाखा होती. व या विभागासाठी काम करण्यास उपआयुक्त दर्जाचे अधिकारी द्यावे म्हणून शासनास मागणी केलेली आहे. परंतु अद्याप शासनाने अधिकारी दिलेले नाही. जी यंत्रणा आपल्याकडे निर्माण केलेली आहे. त्यामध्ये दोन उपअभियंता तसेच २० कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांकडून सर्वेक्षणाचे काम होईल असे मला वाटत नाही. म्हणून ज्या संस्थेने अगोदर कुठेतरी काम केलेले आहे. अशा संस्थेकडे सर्वेक्षणाचे काम देणार आहोत.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मी प्रश्न विचारलेला होता. त्याचे उत्तर मला किती, गोलमोल ठेवण्यात आलेले आहे या शहरामध्ये मंगल कार्यालय शादीखाने जमातखाते किती त्यांची संख्या किती शादीखाने, जमातखाने, मंगल कार्यालये यांना कर आकरणी करण्यात आलेली आहे. ती व्यावसायिक म्हणून आकारणी केली की, मंगल कार्यालय म्हणून, माहिती जी मिळाली ती अपुरी व चुकीची आहे. शहरात फक्त ४९ शादीखाने मंगल कार्यालये सर्व मिळून आहे. अग्निशमन विभागाकडून एनओसी गेलेली आहे. ७० शादीखाने, मंगल कार्यालय, जमातखाने सर्व मिळून माझ्या माहितीप्रमाणे या शहरात जवळपास २०० मंगल कार्यालय, शादीखाने तसेच जमातखाने असतील. उत्तर असे मिळाले की, त्यांना परवानगी दिलेली नाही. परवानगी दिलेली नसेल तर कर कसा आकरण्यात येतो. व्यावसायिक कि, निवासी दराने आकारला जातो याचा उल्लेख खुलाशामध्ये दिलेला नाही. तसेच हे शहर मोठ्या प्रमाणात वाढत आहे मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. त्या इमारतींना कर आकारण्यात आलेला नाही. त्याचे सर्वेक्षण झाले तर २० कोटी उद्दिष्ट ऐवजी ६० कोटी रुपये उद्दिष्ट ठेवले तरी वसूल होऊ शकेल असे माझे मत आहे. प्रशासनाने याबाबतीत कोणतीच पावले उचलली नाही. का कार्यवाही होत नाही प्रशासनाच्या अडचणी काय आहेत त्याचा खुलासा व्हावा. प्रशासनास माहिती विचारली असता माहिती बरोबर देत नाही. दिली तरी चुकीची माहिती सदस्यांना पुरविली जाते हे बरोबर नाही. संबंधित अधिकारी हे मा. आयुक्तांची तसेच सभागृहाची दिशाभूल करतात. तर अशा अधिकाऱ्यांना आदेश द्यावे की, या शहरात शादीखाने, मंगल कार्यालय तसेच जमातखाने किती आहे कितीवर मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे. जेणे करून

उत्पन्न वाढेल व विकास कामे करण्यामध्ये भर पडेल. जे कामचुकार अधिकारी असतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री. जयवंत ओक : महानगरपालिकेच्या मालकीची काही दुकाने आहेत. यात मटन मार्केट असेल, लिलाव मार्केट असेल, थकबाकी मालमत्ता असेल तसेच उत्पन्नाचे साधन म्हणून छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, या शहरात नाट्यगृह आहे. नेहरू भवन आहे, यातून किती उत्पन्न होते याचा खुलासा द्यावा. आताच उपआयुक्त यांनी खुलासा केला त्या नुसार हे लक्षात येते की, १९९२ पासून मालमत्ता कराचे सर्वेक्षण झालेले नाही. शहरातील सर्वच मालमत्तेचे रेकॉर्ड म्हणून संगणकीकरण केल्यास मालमत्ता कर वसूल होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. बऱ्याच मालमत्तेला अद्याप कर लागलेला नाही. अशा मालमत्ता खूप मोठ्या प्रमाणात आहे. अनधिकृत सर्वच भागातील घरांना नंबर देऊन कर लावण्यात यावा. जेणे करून कोण कर भरतात कोण भरत नाही हे दिसून येईल. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोठमोठी मार्केट बांधलेली असून अद्याप चालू करण्यात आलेली नाही. तयाचप्रमाणे हातगाड्याची वसुली, परवाना नुतनीकरण, टपरी भाडे, लायसन्स, दुकान भाडे या बाबतीत काय निर्णय घेणार आहोत जी दुकाने २ ते ३ वर्षापासून रिकामी पडलेली आहे. औरंगपुरा येथे शॉपिंग कॉम्पलेक्स चालू आहे. तसेच किराडपुरा रस्त्यावरील शॉपिंग सेंटर रेल्वे स्टेशन, साईनगर, नागसेननगर येथे दुकाने बांधून तयार आहेत या बांधकामासाठी महानगरपालिकेचे लाखो रुपये खर्च झालेले आहे. २५ ते ५० लक्ष रुपये एका प्रोजेक्टसाठी खर्च झालेले असून इमारती धुळखात पडलेल्या आहे. तसेच व्यायाम शाळा बांधलेल्या आहे त्याही भाड्याने दिलेल्या नाही होर्डींगच्या संदर्भात कार्यवाही झालेली नाही. या वर्षाचे जवळपास ४० लक्ष रुपये येणार होते. आलेले नाही उपाययोजना का राबविल्या गेल्या नाही प्रशासनाला जाब विचारावा. विकास कामे होत नाही. वसुली करण्याची जबाबदारी प्रशसनाची आहे. उत्पन्न वाढविण्यास प्रशासनास काळजी वाटत नाही का? यास कोण जबाबदार आहेत. वसुली न झाल्यास नगरसेवकांवर ठपका ठेवला जातो. परंतु या प्रशासनाने जकात, पाणीपट्टी तसेच मालमत्ता कर वसुली कडे लक्ष दिले तर या शहरातील विकास कामे करण्यास चांगल्या प्रकारे मदत होऊ शकेल. एखाद्या नागरिकांवर नळ तोडण्याची तसेच बांधकाम पाडण्याची कार्यवाही प्रशासन तात्काळ करते. परंतु वसुलीच्या बाबतीत कोणतीच कार्यवाही प्रशासन करीत नाही. न्यायालयीन केसेले किती प्रलंबित आहे किती ठिकाणी दुकाने बांधून आहेत ती चालू करण्याबाबत कार्यवाही करण्याबाबतचा ठोस निर्णय घेऊन तसे प्रशासनास आदेश करावेत. स्थानिक पातळीवर जी संस्था मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यास तयार असेल त्या संस्थेला काम द्यावे. उत्पन्न कशा पध्दतीने वाढविता येईल यासाठी प्रयत्न व्हावेत व त्यातून जनतेचे काम कशी करता येईल यासाठी प्रयत्नशील राहावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : उद्दिष्टाच्या कोणत्याही महसूली उत्पन्नाच्या बाबतीत बघितले तर ५०% च्या वर वसूली झालेली नाही. माझ्या वॉर्डात महानगरपालिकेने शॉपिंग कॉम्पलेक्स बांधलेले आहे. यातील एक पोस्ट ऑफिस तसेच एम.एस.ई.बी. व पोलिस चौकीसाठी जागा देणार होतो. तसा निर्णय

घेतलेला आहे. पोस्ट ऑफिसचे कर्मचारी अधिकारी दुकान देण्यासाठी महापालिकेकडे येतात अद्याप कार्यवाही झालेली नाही. गेल्या ४ ते ५ महिण्यापासून एकही गाळा देण्यात आलेला नाही. यामुळे उत्पन्न वाढण्यास मदत होत नाही. प्रशासनाने यामध्ये अत्यंत दुर्लक्ष केलेले आहे. जसजसा मार्च महिणा जवळ येतो तेंव्हा सभागृहाने उपाययोजना सुचवाव्यात असे अधिकाऱ्यांचे मत असते. महानगरपालिकेने किती वॉल पेंटींग केलेल्या आहेत. त्या संबंधीची यादी मला मिळाली त्यात २३ दिलेली आहे. ए.सी.सी. सिमेंट यांचे वृत्तपत्रात मोठमोठ्या जाहिरात झालेली आहे. या कंपन्यांना महानगरपालिकेतर्फे लाखा रुपया बाबत नोटिसा देण्यात आलेल्या आहे. ८-८ लक्षच्या नोटीसा देऊनही ऑडिटमध्ये ४० हजार अशा रक्कमा भरून घेतल्या. प्रशासनातील अधिकाऱ्यामध्ये पारदर्शकता राहिलेली नाही. मालमत्ता अधिकारी यांनी व्यवहार केलेला आहे. महापालिकेला ४० पैसे व बाकीचा पैसा अधिकाऱ्यांकडे हि पध्दत चालू झाल्यास अधिकारी श्रीमंत होतील असेच चालत राहिल्यास महापालिका भिकास लागेल. ज्या एजन्सीकडे आपल्या अधिकाऱ्यांनी व्यवहार केला ते माझे मित्र आहे. किती रक्कम घेतली त्याची आकडेवारी सुध्दा माझ्याकडे आहे. म्हणून अशा अधिकाऱ्यांना निलंबित करून कार्यवाही केली पाहिजे.

डॉ. भागवत कराड : हे शहर ऐतिहासिक आहे. बाहेरील पर्यटक या शहरात येतात. ५ वर्षापूर्वीचे रस्ते, चौक तसेच गार्डन कसे होते आताची परिस्थिती कशी आहे हे बघितले तर विकास कामाची परिस्थिती बरोबर नाही. त्याचे एकमेव कारण म्हणजे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ढासळत चाललेली आहे. या शहराचा विकास करायचा असेल तर वसूली मोठ्या प्रमाणात झाली पाहिजे. एकूण मागणी हि ३० कोटीची होती. त्यापैकी २० कोटीचेच उद्दिष्ट करण्यात आले. त्यापैकी फक्त ६ कोटीच वसुली झालेली आहे. मागील वर्षी ६.६२ लक्ष होती. वसुलीत वाढ व्हावयास पाहिजे होती. ती झालेली नाही. याबाबतीत प्रशासनाने कडक पावले उचलण्याची गरज आहे. जेथे अनाधिकृत बांधकामे झाली त्या घरांना कर लागला पाहिजे. आताच काही सदस्यांनी सुचविले की, जेथे घर तेथे कर लागला पाहिजे. या महानगरपालिकेच्या बऱ्याचशा केसेस प्रलंबित आहेत. व त्याचा निकाल लागावा म्हणून न्यायालयाची मी महापौर असतांना मंजुरी देण्यांत आलेली आहे. जिल्हा न्यायाधीश यांनी एक टीम प्रत्यक्ष पाहणीसाठी दिलेली होती. त्या टीमला इमारत दाखविण्यता आली. व त्याचवेही प्रशासनातर्फे असे सांगण्यात आले की, येत्या २ ते ३ महिण्यात न्यायालय स्थापन होईल. ज्या केसेस प्रलंबित असतील त्या निकाली काढण्याची कार्यवाही होईल. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही. म्हणून न्यायालय तातकाळ स्थापन करून केसेस निकाली काढाव्या जेणे करून महापालिकेचे उत्पन्न वाढवू शकेल. तसेच होर्डींग बाबतही निर्णय घेतलेला होता. टेंडर काढून कार्यवाही केली असती तर आणखीनच मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढले असते. परंतु तीही कार्यवाही झालेली नाही. आज शहरात कोणत्याही रस्त्यावर होर्डींग नाही. तसेच महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले शॉपिंग कॉम्पलेक्स तसेच पडून आहे. आता पर्यंत दुकाने देण्यात आलेली नाही. टेंडर पध्दतीने कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. ती करण्यात आलेली नाही. स. सदस्य

श्री. निकाळजे यांचे वॉर्डात गेल्या ४ वर्षापासून २० सेंटर बांधून तयार आहेत जे काही भाडे ते येईल त्याप्रमाणे भाड्याने देऊन टाकावे तसेच इतरही बऱ्याच ठिकाणी दुकाने बांधलेली आहेत ते सुध्दा भाडे तत्वावर देण्यात यावे जेणे करून महापालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच बऱ्याच ठिकाणी वाचनालय व इमारती बांधलेल्या आहे परंतु भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही झालेली नाही. महानगरपालिकेच्या वतीने रस्त्याची देखभाल केली जाते मी महापौर असतांना बोल्ड पध्दतीने कमानी उभ्या करण्याचा निर्णय घेतला. टेंडर काढण्यात आले पंरतु काहीही कार्यवाही केलेली नाही. बरेच काही साधने उत्पन्नाची आहे. प्रशासनाला सुध्दा अडचणी असतील त्या अडचणी मा. आयुक्तांपर्यंत त्या त्या अधिकाऱ्यांनी पोहचाव्यात जेणे करून उत्पन्न वाढविण्यास प्रशासनास सोपे होईल. जे जे उत्पन्न वाढवण्याची साधने असतील त्या संबंधी मा. आयुक्तांना आपण आदेशीत करावे त्यानुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी. किंवा खालच्या अधिकाऱ्यांना तसे सांगण्यात यावे. त्यामुळे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

सौ. निखत परवीन : या शहरात इमारतीवर टावर्स उभारण्यात आलेले आहेत. टॉवर्स उभारण्याच्या आगोदर त्या इमारतीला किती कर लावण्यात येत असे व आता किती लावण्यात येतो तसेच शहरात एकूण टॉवर्स किती याबद्दल माहिती मागविली होती अद्याप दिलेली नाही.

मा. महापौर : मालमत्ता कराचे उत्पन्न कशा पध्दतीने वाढविता येईल याबाबत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : वाल पेंटींग धारकांकडून ३० ते ४० हजार रुपये वसूल करण्यात आले त्याचा खुलासा करावा. नोटिसा ह्या १४ लाखाच्या दिल्या.

मुख्य लेखाधिकारी : आतापर्यंत त्यांना फक्त नोटीसेस पाठविण्यात आलेल्या आहे. वसुली करण्यात आलेली नाही. सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार मागील दराच्या तीन पट प्रमाणे आकारणी करून जाहिरात कर वसुल केलेले आहे. १ एप्रिल ते ३१ मार्च २००३ पर्यंत जी वसुली होणार आहे. त्या संबंधीच्या नोटिसा आताच २ दिवसापूर्वी दिलेल्या आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : नोटिसा कशा देण्यात आल्या अंदाजे नोटिस दिल्या जाते. सर्वेचे् काम करण्यात येत नाही. २३ एजन्सीज आहेत का खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : जो सर्वे केलेला आहे तो प्रायव्हेट होर्डींगचा व महापालिकेच्या जागेवरचा केलेला आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : अधिकाऱ्यांकडे वेळ नसतो. कर्मचारी वर्ग कमी आहे. व चुकीचे थातुरमातून उत्तरे देऊन टाकतात. हे धोरण बरोबर नाही.

मुख्य लेखाधिकारी : महानगरपालिकेच्या नोटिसानुसार जे आलेले होते ते २३ होते. त्यानुसारच माहिती दिलेली असेल. प्रायव्हेट होर्डींगचा व महापालिकेच्या जागेवरील आपल्याला दिलेले नाही. काही सर्वेचे काम राहिलेले आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मोठमोठ्या एजन्सीला नोटीस दिलेली आहे. त्यांचेकडून पैसे मिळतात. शहरात जेवढ्याही वॉल पेटींग एजन्सीज असतील त्यांना नोटीसेस द्यावयास पाहिजे होत्या.

मुख्य लेखाधिकारी : या संदर्भात यापूर्वी मालमत्ता विभागाला आदेशीत केलेले आहे. या संदर्भाने त्यांचे कामकाज चालू आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : वर्षभरामध्ये काय केले. फक्त २३ लोकांचाच सर्वे केला का? शहरात एकूण किती वाल पेंटींग आहे याचे उत्तर द्यावे.

मुख्य लेखाधिकारी : किती आहे सध्याच खुलासा करता येणार नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : अशीच परिस्थिती राहिल्यास महापालिका दिवाळखोरीत आल्या शिवाय राहणार नाही. मी जे बोललो ते बरोबर आहे. उत्पन्न वाढवण्याचे अधिकाऱ्यांचे काही प्रयत्न दिसून येत नाही. परंतु जनतेच्या मनात नगरसेवक महापालिकेचे उत्पन्न कमी होण्यास मदत करित आहे. असा समज झालेला आहे. नागरिक नगरसेवकांना जबाबदार धरतात.

मुख्य लेखाधिकारी : ॲडव्हरटायजींग पासून दर वर्षाला २.५० ते ३ ला ख रुपये उत्पन्न प्राप्त होत आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : या महानगरपालिकेचे अधिकारी / कर्मचारी कामचुकारपणा करतात. ज्यांना काम करण्याची इच्छा नसेल त्यांना इतर महापालिकेमध्ये बदलीवर पाठवावे. व तसा सर्वसाधारण सभेने ठराव घेऊन कार्यवाही करावी असे माझे मत आहे. अधिकारी उत्पन्न कमी करण्यास हातभार लागवता.

डॉ. भागवत कराड : होर्डींग काढून घेण्याचा निर्णय घेतला होता. व नवीन होर्डींग लावण्याबाबत टेंडर काढून कार्यवाही करावी यात महापालिकेचे नुकसान झालेले आहे यास कोण जबाबदार आहे.

सौ. निखत परवीन : माझ्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

सहा. संचालक नगररचना : आतापर्यंत एकूण १५ टॉवर्सला परवानगी (एन.ओ.सी.) देण्यांत आलेली आहे. मी सेवेत रुजू झाल्यापासून एकाही टॉवर्सला एन.ओ.सी. दिलेली नाही.

श्री. मीर हिदायत अली : फक्त १५ टॉवर्सला परवानगी दिलेली आहे. अनधिकृत किती आहे याचा खुलास करावा.

सहा. संचालक : प्रशासकीय अधिकारी याबाबत माहिती देतील.

नगर रचनाकार : प्रॉपर्टीचे व्हॅल्युशन करूनच टॅक्स आकारणी केली जाते. टॉवर्सच्या परवानगी देतांना त्या इमारतीची पाहणी करून कार्यवाही होते. त्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. असे एकूण १५ एजनसीला एन.ओ.सी. दिलेली आहे. जे अनधिकृत असतील त्या बाबतीत सर्वेक्षणाचे काम नगररचना विभाग मार्फत करण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : कैलासनगर येथे एक टॉवर्स उभा आहे. त्यांना एन.ओ.सी. दिलेली नाही. अशी माहिती मिळालेली आहे. यास जबाबदार कोण राहिल.

मा. आयुक्त : शहरातील अनधिकृत टॉवर्स तसेच ज्यांना परवानगी दिली त्या इमारत मालकांनी कर भरलेला आहे किंवा नाही याचा सर्वे मालमत्ता अधिकारी यांचे मार्फत १५ दिवसाच्या आत करून घेण्यात येईल.

श्री. मीर हिदायत अली : एखाद्याने जकात चुकवून माल आणल्यास १० पट दंड आकारून जकात वसूल केली जाते. त्याचप्रमाणे ज्यांनी अनिधकृत टॉवर्स उभे केले त्यांचेकडून २० पट रक्कम वसूल करून कार्यवाही करावी नसता ते तात्काळ पाडण्यात यावे.

श्री. सुनिल मगरे : उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक स. सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना केल्या. सभागृहात बसलेले जबाबदार अधिकारी याकडे लक्ष देत नाही. शहरात किती टॉवर्स अनधिकृत आहे. हे अधिकाऱ्यांना माहित नसते. व माहित नाही असे उत्तर अधिकारी देतात. अधिकाऱ्यांना सर्व माहिती

असतांना उत्तरे बरोबर दिली जात नाही हा सभागृहाचा अपमान आहे. गरीब लोक घरे बांधतात ते थांबविण्यासाठी अधिकारी फावडे, घमीले व इतर साहित्य तात्काळ उचलून आणतात. गरीबांवर कार्यवाही करायची म्हणजे अधिकाऱ्यांना सोपे जाते असे म्हणावयास हरकत नाही. मोठमोठ्या इमारत मालकांवर टॉवर्स मालकांवर तसेच जो सिमकार्ड वर कर आकारला जातो तो आकारला जातो की नाही याची माहिती देण्यात यावी. वसुली जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने तशी कार्यवाही केली पाहिजे. तरच विकास कामासाठी निधी उपलब्ध होईल.

डॉ. भागवत कराड : मोबाईल असेल, सिमकार्ड असो या सर्वांवरच जकात आकरणी करावी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल. टॉवर्सला परवानगी दिली नसेल व अनधिकृत झालेले असेल त्याची चौकशी करून टेन्थ बरोबर असेल तर रेग्युलर करण्यासाठी कार्यवाही करावी.

श्री. तकी हसन खॉन : शहरात माझ्या माहितीप्रमाणे ४८ टावर्स उभे आहेत. त्यापैकी फक्त लिगल १५ आहेत असे आताच्या खुलाशावरून दिसून येते. जे टॉवर्स अनधिकृतपणे उभे केले त्यांना तोडण्यात यावे. त्यानंतर रेग्युलर करण्याचा विचार करावा. असे नियमाप्रमाणे बरोबर होऊ शकते. एन.ओ.सी. न घेता काही टॉवर्स उभे करण्यात आले आहेत यातून काही घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होतो.

श्री. मीर हिदायत अली : रस्त्यावरील अनधिकृत बांधलेले बांधकाम कोर्टाच्या आदेशानुसार पाडण्यात आले त्याच प्रमाणे टॉवर्स तोडण्याबाबतही कार्यवाही व्हावी.

श्री. सुनिल मगरे : अनधिकृतपणे जे टॉवर्स उभारलेले असतील ते तोडण्यात यावे त्यानंतर नियमाप्रमाणे एन.ओ.सी. देऊन रेग्युलर करण्यांत यावे.

डॉ. भागवत कराड : जे टॉवर्स लिगल असतील ते राहू द्यावे जे टॉवर्स अनधिकृतपणे उभारलेले आहेत. त्यांचे अर्ज महापालिकेकडे आलेले होते काय? महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आजची सभा होत आहे. उत्पन्न येत असेल तर दंड वसूल करून असे टॉवर्स रेग्युलर करण्यात यावे.

मा. महापौर : शहरात एकूण ४८ टॉवर्स आहे अशी माहिती आताच एक स. सदस्य यांनी दिलेली आहे. जे टॉवर्स अनधिकृत असतील अशाकडून दंड वसूल करून रेग्युलर करता येतील का नियमात काय तरतूद आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(याचवेळी मा. महापौर यांचे डायसमोर बरेच स. सदस्य जातात व अनधिकृत टॉवर्स तोडण्याबाबत मोठमोठ्याने मागणी करतात. काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(याचवेळी सर्व सदस्य आपआपल्या जागेवर बसतात.)

श्री. मीर हिदायत अली : टॉवर्स काढण्यात यावे नसता काही धोका निर्माण झाल्यास महापालिकाच जबाबदार राहणार आहे. पार्कींगच्या जागा रिकाम्या करतांना एका ठिकाणचा टॉवर्स पडण्याच्या स्थितीत होता.

श्री. सुनिल मगरे : उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आपण चर्चा आहेत. अनेधिकृत टॉवर्स धारकांनी महापालिकेची परवानगी घेतली असती तर महानगरपालिकेला लाखो रुपये उत्पन्न प्राप्त झाले असते. म्हणून अशा टॉवर्स मालकावर कार्यवाही करण्यात यावी.

मा. महापौर : चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी.

श्री. सुनिल मगरे : अनेक बाबतीत चौकशी करण्याचे यापूर्वी आदेशित केलेले होते. कोणत्याही प्रकारची चौकशी अधिकारी करीत नाही अनेक उदा. देता येतील. जे टॉवर्स अनधिकृत झालेले आहेत ते तोडण्यात यावे.

श्री. अंबादास दानवे : ३१ डिसेंबर अखेर मालमत्ता कराची ३१% वसुली उद्दिष्टाप्रमाणे झालेली असून अत्यंत कमी वसुली झालेली आहे. या शहरात एकूण १.२५ लक्ष मालमत्तेची नोंद आहे. ५४० केसेस न्यायालयीन प्रकरणांमुळे प्रलंबित आहे. मालमत्ता कराची एकूण मागणी ही ३५ कोटीची असतांना फक्त १८.५४ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. त्यापैकी फक्त ६.१८ कोटीच वसुली म्हणजे फक्त ३१% वसुली झालेली आहे. या शहरात नागरिकांच्या मालमत्ता तसेच महापालिकेच्या मोठमोठ्या प्रकारच्या मालमत्ता आहेत. टपरी भाडेच्या माध्यमातून जे उत्पन्न यावयास पाहिजे होते ते आलेले नाही. मागील वर्षाच्या तुलनेत १५ हजार मालमत्ता वाढलेल्या आहे. ज्यांना कर लागलेला नसेल त्या इमारतींना कर लागलेला असेल असे असतांना सुध्दा मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी मालमत्ता कराची वसुली झालेली नाही. नगर रचना विभाग परवानगी देते. करमुल्य विभाग कर लावते. या दोन्ही ही विभागाचा काम करण्यामध्ये समन्वय राहिलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे दोन लक्ष मालमत्तेला करच लागलेला नाही. तसेच अन्न व भेसळ परवानगी ह्या वेगवेगळ्या प्रकारच्या अशा एकूण १४ व्यावसायिकांसाठी दिल्या जाते. तसे शासनाचे जी.आर. आहे. ३१ डिसेंबर २००१ रोजीचा त्यात ४४ बाबींना वेगवेगळ्या प्रकारची परवानगी दिली जाते. त्यातून महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. यातील १५ बाबी अशा आहेत की, त्यावर कर लागू शकतो व महापालिकेचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढवू शकते. तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या मोठमोठ्या इमारती बांधून आहेत. आमदार निधीतून व्यायाम शाळा बांधलेल्या आहे यात पैसा गुंतला गेला परंतु उत्पन्न म्हणून काहीही फायदा आजपर्यंत त्यातून झालेला नाही. जवळपास ५ ते ६ लक्ष रुपये यातून मिळालेले असते. आताच टॉवर्स बाबत प्रश्न उपस्थित झाला. तयात रेग्युलर केले तर प्रत्येक टॉवर्स धारकांकडून २५ हजार रुपये जमा झाल्यास मोठ्या प्रमाणात उत्पन्न होऊ शकते. शहरात ४८ मनोरे नसून २८ ते ३० मनोरे असतील अशी माझी धारणा आहे. त्यांना नोटिस देऊन रेग्युलर करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे आदेश करावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : जे टॉवर्स अनधिकृत झालेले आहे त्यांची तपासणी करून शहरात किती टॉवर्स आहेत याची पाहणी करून रेग्युलर करण्याबाबत कार्यवाही करावी शहरामध्ये अनधिकृत बांधकामे पाडण्याची मोहिम सुरू असतांना अधिकारी अशा टॉवर्स बाबत कार्यवाही करण्यास का मागे आहेत. अधिकाऱ्यांना याबाबतीत माहिती नाही का? माझ्या माहितीप्रमाणे अधिकाऱ्यांना हे सर्व माहित आहे. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात व सभागृहाचा वेळ वाया घालवितात. माहिती नाही अशी उत्तरे देतात. टॉवर्स धारकांना दंड आकरणी करून रेग्युलर करण्यात येत असेल तर जे बांधकामे पाडीत आहे ती मोहिमही थांबवावी व त्यासही नियमाने रेग्युलर करण्याची कार्यवाही करावी असे माझे मत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : आजच्या सभेला मा. आयुक्त उपस्थित नाही. सभा तहकूब करावी. जेंव्हा आयुक्त सभेला उपस्थित राहतील तेंव्हाच सभा बोलवावी. उद्याच वृत्तपत्रात येईल की, टॉवर्सच्या बाबतीत सेना-भाजप सदस्य काहीच बोलले नाही. तसा काही प्रकार नाही. टॉवर्सधारक हे मोठ्या प्रमाणात पैसा कमवितात व अनधिकृत करून सुध्दा तोडण्याची किंवा रेग्युलर करण्याची कार्यवाही होत नाही. ज्यांनी परवानगी घेतली त्यांना सुध्दा निवासी दराने कर आकारणी होते. टॉवर्स धारक हे व्यवसायिक आहे. मोठ्या प्रमाणात रकमा त्यांचेकडे जनतेच्या माध्यमातून जमा होते. म्हणून त्या इमारतीस व टॉवर्सला व्यवसायिक दरानेच कर आकरणी केली पाहिजे. असे माझे मत आहे. परंतु निवासी दराने कर लावणे बरोबर नाही. यात महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

मा. महापौर : महापालिका प्रशासनाने शहरात किती टॉवर्स आहे त्यांना कर लागलेला आहे किंवा कर भरलेला आहे का तसेच अनधिकृत टॉवर्स किती आहे याची संपूर्ण चौकशी करून महापालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल यासाठी पुढील कार्यवाही करावी. आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे.

(दु. ४.५५ वाजता तहकूब करण्यात आलेली सभा ५.१० वाजता सुरू करण्यात आली.)

श्री. सुदाम सोनवणे : आजची सभा उद्या सकाळी ११.३० वाजता घेण्यात यावी. अशी सभागृहाच्या वतीने मागणी करीत आहे.

मा. महापौर : ठिक आहे. आजची सभा तहकूब करण्यात येते. उद्या सकाळी ११.३० वाजता सभेला सुरुवात होईल.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा तहकूब झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**बुधवार दिनांक ०८-०१-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार दिनांक ०८/०१/२००३ रोजी (दिनांक ०७/०१/२००३ ची तहकूब सभा) मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.१५ वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली.**
**सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
९) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१०) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
११) स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
१२) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१३) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१४) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१५) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
१६) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
१७) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
१८) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
१९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२०) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
२१) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२२) स.स.श्री. शिरसाट संजय पांडुरंग
२३) स.स.डॉ. कराड भागवत किशनराव
२४) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
२५) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
२६) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
२७) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
२८) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे
२९) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३०) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३१) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३२) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३३) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय

३४) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
३५) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
३६) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
३७) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
३८) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
३९) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४०) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४१) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
४२) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
४७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
४८) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
४९) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
५०) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
५१) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५२) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
५३) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
५४) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन
४) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली

**संवाद** :

श्री. किशनचंद तनवाणी : काल मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीच्या संदर्भात बराच वेळ चर्चा झालेली आहे. दि. ०५-१०-२००२ च्या सर्वसाधारण सभेत मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करण्यात येऊ नये असा निर्णय घेतलेला होता. यावर व्याज आकारणी होते का?

श्री. नंदकुमार घोडेले : ५ ऑक्टोंबर २००२ च्या सर्वसाधारण सभेत मालमत्ता कर व पाणीपट्टीवर थकीत बिलावर व्याज न आकरण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. लोक कर भरण्यासाठी मुळ रक्कम घेऊन येतात. व्याज आकारणी होणार असे माहित झाल्यानंतर पैसे भरत नाही. परत जातात त्यामुळे येणारे उत्पन्न येत नाही. त्याबाबत योग्य ती तात्काळ कार्यवाही व्हावी. तसे आदेश देण्यात यावे.

मा. महापौर : प्रशासनाने खुलासा करावा की, आतापर्यंत का कार्यवाही झालेली नाही.

मुख्य लेखाधिकारी : मा. महापौर यांनी चर्चेद्वारे तसा निर्णय घेतलेला आहे. कायदेशीर दृष्ट्या त्या संबंधीचा ठराव होणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करावयाची असाल्यास पुन्हा तसा ठराव घेवून निर्णय घ्यावा लागेल. त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : ठराव घेऊन नंतर निर्णय घेता येईल. परंतु जे नागरिक कर भरण्यात येत आहे. त्यांचे कडून कर भरून घ्यावा. व्याज देत नाही म्हणून कर भरून घेत नाही यावर अवलंबून न राहता जे कर भरू शकत असतील त्यांचा कर भरून घ्यावा. असे आदेश देण्यात यावे.

मुख्य लेखाधिकारी : प्रशासनाची भूमिका काय आहे. या संदर्भात मा. आयुक्तांशी चर्चा केलेली आहे. व्याज आकारणीच्या माध्यमातून येणारा पैसा हे उत्पन्न म्हणून आपण गृहित धरलेले नाही. महानगरपालिकेची जी डिमांड आहे ती वेळेवर वसूल होण हा त्यामागचा हेतू आहे. नागरिकांकडे एकूण ३५ कोटीची थकबाकी आहे. कर आज भरणा केली व दोन वर्षांनी भरणा केला तरी तीच रक्कम भरावी लागते. त्यामुळे नागरिक पैसे भरण्यास येत नाही. जे की, कोणता वचक नागरिकांवर नाही. व्याज आकारणी केल्यास नागरिक स्वत: हून पैसे भरण्यास येतील हा दृष्टीकोण समोर ठेवून निर्णय घेतलेला आहे. एम.एस.ई.बी. किंवा टेलिफोन बिल बघितले तर १० दिवस उशीर झाला तर व्याज आकारणी केली जाते. त्या प्रमाणेच महानगरपालिकेची जनतेकडे थकीत रक्कम वसूल होण्यासाठी व प्रभावी यंत्रणा राबविल्या जावी या दृष्टीने निर्णय घेतलेला आहे. म्हणून जो निर्णय व्याज आकारणी करण्याचा झालेला आहे तो योग्य असून रद्द करण्यात येऊ नये जे की, वसुली होण्यास आणखीनच मदत होईल अशी अपेक्षा प्रशासनाच्या वतीने सभागृहास करण्यात येत आहे. पूर्ण थकीत रक्कमेवर पूर्ण मागील वर्षाचे व्याज आकारणी होत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : एम.एस.ई.बी. तसेच दूरध्वनी विभाग हि संस्था व्यापार करते. आपली महानगरपालिका ही संस्था सेवाभावी संस्था आहे. व्याज आकारणी करून थकीत रक्कम वसूल करू हा दृष्टीकोन असू नये. असे माझे मत आहे. व्याज आकारणी करून नागरिकांना त्रास देतो असा गैरसमाज नागरिकांमध्ये होऊ नये म्हणून जो व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे तो रद्द करावा नसता जे लोक कर भरण्यास येत आहे त्यांचे कडून कर भरून घ्यावा. पुढील सर्वसाधारण सभेत व्याज माफ करण्याचा निर्णय सभागृहाचे मत घेऊन होईल. त्यानंतरच त्यावेळी प्रशासनाने पुढील पावले उचलावी. जे नागरिक कर भरण्यास येत आहे ते भरून घ्यावे जेणेकरून येणारे उत्पन्न बुडणार नाही.

श्री. भाऊसाहेब ताठे : व्याज आकारणी करण्यात येऊ नये असा निर्णय घेतलेला असतांना सुध्दा व्याज आकारणी होत आहे. तसेच सिडको हडको भागात १ दिवसाआड पाणी दिले जाते. यात आपण तेथील नागरिकांवर अन्यायच करीत आहोत. हे प्रशासनाच्या निदर्शनास येत नाही का? व्याज आकारणी होत असेल तर ते योग्य नाही. जेंव्हापासून निर्णय घेतला तेंव्हा पासून व्याज आकारणी करण्यात येऊ नये.

श्री. जयवंत ओक : आताच मुख्य लेखाधिकारी यांनी व्याज माफ करण्या संदर्भात तसा ठराव घ्यावा लागेल तर कार्यवाही करता येईल असा खुलासा केला. ठराव

येणाऱ्या सभेत घेता येईल परंतु स. सदस्य श्री. घोडेले यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. हि स्वायत्त संस्था आहे. जनतेची सेवा करते त्याबाबतीत विचार व्हावा व्याज माफ करण्यासंबंधीच्या संचिकेवर मा. आयुकतांचे रिमार्क काय आहे. शासनाचे डायरेक्शन मागवले होते काय? खुलासा द्यावा. जे कर भरण्यात येत आहे त्यांचेकडून कर भरून घ्यावा. तशा सूचना घ्याव्या. व्याज आकारणी करण्याचे थांबवावे. येणाऱ्या सर्वसाधारण सभेत तसा ठराव ठेऊन निर्णय घेता येईल.

डॉ. भागवत कराड : आजची बैठक ही महसूली उत्पन्न कशा पध्दतीने वाढविता येईल यावर आयोजित केलेली आहे. थकित रक्कमेवर व्याज माफ करण्याचा या सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. परंतु व्याज माफ केल्यास कोणतेच नागरिक पैसे भरणा ार नाही. म्हणून १५% व्याज आकारणी करण्याऐवजी २ ते ३% किमान व्याज आकारावे असे माझे मत आहे. नसता जे कर भरतात तेही कर भरणार नाही तसेच उत्पन्न वाढवले पाहिजे व विकासासाची कामे झाली पाहिजे हि अपेक्षा आपण ठेवतो. म्हणून वसुली सुध्दा झाली पाहिजे. त्यासाठी काही प्रमाणात तरी व्याज आकारणी वहावी कर भरण्यासाठी पूर्ण रककम नसेल तर सवलत द्यावी परंतु पूर्ण १५% व्याज माफ करू नये.

श्री. सुदाम सोनवणे : यापूर्वी व्याज आकारणी होत नव्हती तरी सुध्दा नागरिक पैसे भरीत होते. या शहरात ठराविक लोक असे आहेत की, त्यांचेकडे मोठ्या प्रमाणात कर थकलेला आहे. एखाद्या घरात एक व्यक्ती राहत असेल तर १ जानेवारी नंतर ४ दिवसानंतर रक्कम भरण्यास गेल्यास त्या व्यक्तीला व्याज द्यावे लागत असेल तर तो नागरिक ती रक्कम पुढच्या वर्षी भरतो. याचा अर्थ व्याज आकारण्यामुळे नागरिकांचा नकारात्मक दृष्टीकोन झालेला आहे. म्हणून जे व्याज माफ करण्याबाबत मा. महापौरांनी रुलींग दिलेली आहे त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. या सभागृहात मा. महापौर हे निर्णय घेतात व अंमलबजावणी होत नसेल तर योगय नाही. याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविले असेल तर शासनाचा काय जो निर्णय यायचा तो येईल. परंतु तो पर्यंत सर्वसाधारण सभेने घेतेलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. हे सभागृह हे सर्वोच्च सभागृह आहे. नागरिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी योग्य निर्णय घेतले पाहिजे. म्हणून जो निर्णय दि. ०५/१०/२००२ च्या बैठकीत व्याज करण्याचा निर्णय घेतला तो कायम करण्यात येऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी मा. महापौरांनी प्रशासनाला आदेशित करावे.

मा. उप महापौर : महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यावर चर्चा करून तशा सूचना प्रशासनास द्यावयाच्या आहेत यासाठी आजची बैठक आयोजित केलेली आहे. व्याज आकारणी करण्याचा निर्णय अर्थसंकल्पाच्या बैठकीत घेण्यात आलेला होता. व्याज माफ केल्यास किती तोटा महापालिकेस होऊ शकेल व होणारी रेग्युलर कामे किती कमी होतील याचा सुध्दा आढावा घ्यावा लागणार आहे. व्याज माफ करण्याबाबत सभागृहाचा निर्णय राहील परंतु शासनाचे सुध्दा परिपत्रक आले आहे की, महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढविता येईल त्यासाठी प्रयत्न करावे म्हणून व व्याज माफ करून उत्पन्न कमी करण्याचा प्रयत्न केल्यास त्यास शासन सुध्दा मान्यता देणार नाही. लाईट

बिल तसेच दूरध्वनी बिलावर विलंब कर आकारलेला असतो तो नागरिकांना भरावाचा लागतो त्याची चर्चा सुध्दा कुणी करीत नाही. म्हणून शहरातील नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व्याज माफ करण्याचा निर्णय योग्य नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. त्या दृष्टीकोनातून याच सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला होतो. मालमत्ता कर वसुली वाढविण्यासाठी घरांना नंबर टाकले गेले पाहिजे. जेणे करून ती मालमत्ता कर वसुली करण्यास सोपे जाईल. तसेच महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना घरे विभागून दिली पाहिजे व त्यानुसार वसुली झाली पाहिजे. त्याचप्रमाणे शहरातील मंगल कार्यालये, जीमखाने, शादीखाने यांना मालमत्ता कर हा व्यावसायिक किंवा निवासी लागला जाता काय? निवासी असेल तर व्यवसायिक म्हणून लागला पाहिजे. होर्डींग गेल्या दिड वर्षापासून बाजूला काढलेल्या आहेत त्याचे बऱ्याच मोठ्या प्रमाणात येणारे उत्पन्न आलेले नाही. त्याबाबतीत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही केल्यास उत्पन्नात वाढ होईल. तसेच हातगाड्या धारक यांचेकडून रु. २००/- दर वर्षाला घेतले जात होते ते घेण्यात येत नाही. जे लोक व्यवसाय करण्यासाठी फुटपाथवर बसतात, असे व्यवसायिक वेगवेगळे जवळपास १७ ते १८ सोर्सेस वसुली करण्याचे आहे. त्यांना सुध्दा ५,२ रु. कर महिन्याला आकारला पाहिजे. आणि यासाठी नगरसेवकांनी सुध्दा प्रयत्न करावे. प्रशासनाला सहकार्य करावे. उत्पन्न कसे वाढविता येईल प्रशासनाने प्रयत्न करावे. व्याज माफ केल्यास महानगरपालिकेचा कर भरण्यास जनतेची मानसिकता बदलेल. म्हणून योग्य तो निर्णय सभागृहाने घ्यावा. व्याज माफ केले तर जे ४ कोटी जमा झाले ते हि होणार नाही.

श्री. भाऊसाहेब ताठे : मालमत्ता कर व पाणीपट्टी या थकित रककमेवर व्याज माफ करण्याचा ठराव पास केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. प्रशांत देसरडा : महानगरपालिकेने एखाद्या बँकेकडून, हडकोकडून कर्ज घेतलयास त्या रककमेला व्याज आकारले जाते. शहरातील काही मालमत्ताच्या बाबीतत एन.ओ.सी. घेतल्या जात आहे. त्यात असे आढळून आले की, काही लोकांनी सन १९८२ पासून तर काहींनी १९९३ पासून करच भरलेला नाही. यात महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झलेले आहे. या महापालिकेचे आपण सर्व ट्रस्टी आहोत. महानगरपालिकेच्या हिताचा विचार करून निर्णय व्हावयास पाहिजे. त्यासाठी दोन वर्ष पूर्वीच्या थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करावी व ज्यांचेकडे दोन वर्षापासून थकीत रक्कम आहे. त्यांना व्याज आकारणी करून असा मधला मार्ग काढून सभागृहाच्या वतीने मागणी करतो व तसा निर्णय घ्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : उत्पन्न वाढले पाहिजे यासी मी सहमत आहे. जे लोक पैसे भरतात त्यांचेकडून महसूली उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो. झोन अधिकाऱ्यांना आपण विचारू शकता. व्याज आकारणी होते म्हणूान बरेच लोक पैसे भरण्याचे टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे येणारे उत्पन्न कमी होते आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासठी दुसरे बरीचशी साधने आहेत. बऱ्याच ठिकाणी अनधिकृत वसाहतीमध्ये नळ घेतलेले आहेत त्यांना कर लागलेला नाही. तसेच मालमत्ताकर सुध्दा लागलेला नाही. याचा अर्थ त्या लोकांना सर्व सोयी सुविधा मिळतात. परंतु जे नळ कनेक्शनची मागणी

करतात, बांधकाम परवानगी मागतात, लागलेला कर दरवर्षी भरतात त्यांचेवर आपण एका अर्थाने अन्याय करतो असे माझे मत आहे. म्हणून व्याज माफ करायचा जो मागील महापौर यांनी निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावे.

श्री. जयवंत ओक : व्याज माफ करण्याचा निर्णय झाल्यानंतर प्रशासनातर्फे संचिका घालविण्यता आलेली होती का? शासनाचे मार्गदर्शन घेतलेले होते काय. शासनाची मान्यता घेण्याची का आवश्यकता पडली खुलासा करावा.

डॉ. भागवत कराड : व्याज माफ केल्यास महापालिकेला किती तोटा येतो त्याचा खुलासा करावा. आता पर्यंत व्याजापोटी किती रक्कम वसूल झालेली आहे खुलासा द्यावा. जे रेग्युलर भरतात त्यांचेवर कमी व्याज लावण्यात यावे. काही ना काही प्रमाणात व्याज आकारणी करावी पूर्णत: रद्द करू नये.

श्री. अंबादास दानवे : पाणीपट्टी तसेच मालमत्ता कर थकीत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारणी करू नये असा निर्णय घेतलेला आहे. सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, गेल्या वर्षी डिसेंबर अखेर मालमत्ता कराची वसुली ६.६२ कोटी झालेली होती व यावर्षी डिसेंबर अखेर ६.१८ कोटी झालेली आहे तसेच पाणीपट्टी वसुली ४.२३ कोटी होती या वर्षी ४.९४ कोटी झालेली आहे मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करून तसेच नवीन मालमत्तेच्या नोंदी होऊन कर लावण्यात आला असेल तरी सुध्दा वसुली कमी झालेली आहे, तसेच पाणीपट्टी थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करूनही ठेवलेल्या उद्दिष्टानुसार तेवढ्या प्रमाणात वसुली झालेली नाही. अभय योजनेचा पाणीपट्टी वसुलीत समावेश असू नये असे माझे मत आहे. आताच झोन अधिकारी यांनी सांगितले की, ९ लक्ष तसेच क्र. २ झोनमध्ये अभययोजनेच्या माध्यमातून ३ लक्ष वसुली झाली. परंतु पाणीपट्टीची वसुली व अभय योजना ह्या वेगवेगळ्या वसुलीचे दोन माध्यम आहेत. वसुलमध्ये दाखविण्याचा प्रयत्न झोन अधिकारी यांनी केलेला आहे. व्याज आकारणी करूनही मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुली कमी होते. ती का कमी येते याचा अर्थ जे नियमित कर भरतात, त्यांचेकडून वसुली केली जाते. झानेचे कर्मचारी ज्यांचेकडे ४ ते ५ वर्षाची थकबाकी आहे त्यांचेकडे जातच नाही जे लोक रेग्युलर भरतात त्यांचेकडेच जातात. म्हणून जे कर भरण्यास सहकार्य करतात त्यांचेवर व्याज आकारणी करून आपण एक प्रकारचा अन्याय करतो असे म्हणता येईल. म्हणून जे कर भरत नाही त्यांची मालमत्ता जप्त करण्याबाबतची जाहिर प्रगटनाद्वारे नोटीस देऊन कार्यवाही करावी व्याज आकारणी झाली नाही तर मोठ्या प्रमाणात नागरिक कर भरण्यास येतील व वसुलीत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. पाणीपट्टीची वसुली सुध्दा अभय योजना राबवून सुध्दा कमी वसुली झाली आहे. म्हणून व्याज आकारणी करू नये तशा सूचना प्रशासनास द्याव्यात शासनाचे जे आदेश येतील ते येतील तोपर्यंत व्याज आकारणी करण्यातयेऊ नये अशा सूचना प्रशासनास देण्यात याव्यात.

सौ. साधना सुरडकर : जे नियमित कर भरणार आहे त्यांना व्याजाचा भारच पडणार नाही हे सभागृहाने लक्षात घ्यावे. ज्यांचेकडे थकीत रक्कम आहे, जे ५ ते १० वर्षापासून करच भरीत नाही, त्यांनी स्वत:हून थकीत कर भरण्यास यावे. म्हणून व्याज आकारणी करणे योग्य आहे. व्याज आकारणी केल्यास

महापालिकेची थोड्याफार प्रमाणात आर्थिक परिस्थिती सुधारेल. म्हणून व्याज माफ करण्यात येऊ नये.

श्री. नंदकुमार घोडेले : व्याज आकारणी केल्यापासून वसुलीमध्ये किती प्रमाणात वाढ झालेली आहे. जनतेचा जास्त प्रमाणात प्रभाव पडलेला आहे काय?

मुख्य लेखाधिकारी : जे नियमित टॅक्स भरतात त्यांचेवर व्याज आकारणी होणारच नाही हा मुद्दा लक्षात घ्यावा. जे भरीत नाही त्यांना याचा भार पडणार आहे. जे रेग्युलर व सुरुवातीलाच भरतील अशासाठी आपण सवलत सुध्दा दिलेली आहे. सभागृहानेच ठराव पास केलेला आहे. आज बरेच स. सदस्य विकास कामे होण्याबाबत मागणी करीत आहे व विकास कामे होण्यासाठी वसुली ही मोठ्या प्रमाणात व्हावी. हा दृष्टीकोन त्यामागे होता म्हणून व्याज माफ करण्याचा सभागृहाने निर्णय घेऊ नये. जे की, उत्पन्न वाढल्यास विकास कामे करता येतील.

श्री. नंदकुमार घोडेले : व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आतापर्यंत किती व्याजापोटी रक्कम वसूल झालेली आहे. त्याचा खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : रुपये १.२८ लक्ष व्याजापोटी वसूल झालेले आहे. जे नियमित कर भरतात त्यांचेकडून हे वसूल झालेले नाही.

डॉ. भागवत कराड : जे नियमित कर भरतात त्यांना दिलासा द्यावा. जे १०-१० वर्षापासून कर भरीत नाही त्यांच थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करावी.

डॉ. आशा बिनवडे : महापालिकेचे महसूली उत्पन्न वाढवावे यासाठी आजची सभा आयोजित केलेली आहे. ज्याप्रमाणे विकास कामे जे की, बेसीक सुविधा करण्याबाबत मागणी होते त्यानुसार महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मनपाची आर्थिक बाजू बळकट करण्याची जबाबदारी सुध्दा आपली आहे. आताच चर्चा झाली जे नियमित कर भरणार आहे त्यांचेवर व्याजाचा बोजा पडणार नाही. जे भरणार आहे त्यांना सवलत सुध्दा दिलेली आहे. व्याजापोटी १.२८ लक्ष रुपये आले असेल तरी उत्पन्नाची बाजू बळकट करण्यासाठी लहान लहान बाबींचा सुध्दा विचार केला पाहिजे. व त्यातून मनपाची बाजू बळकट होणार आहे पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट व या विभागावर कार्यरत असलेले कर्मचारी यांचेवर होणारा खर्च किती याचा सुध्दा खुलासा व्हावा.

मुख्य लेखाधिकारी : सध्या माझ्याकडे त्याबाबतीत आकडेवारी उपलब्ध नाही.

सौ. निखत परवीन : एखाद्या इमारतीचा सन १९८० पासूनचा मालमत्ता कर थकलेला आहे त्या इमातरीमध्ये मुळ मालक राहत नाही किरायदार असतात. त्यामुळे मूळ मालकाशी कर्मचाऱ्यांचा संपर्क होत नाही. त्यामुळेही वसुली कमी प्रमाणात होत असेल. अशा लोकांकडून वसुली कशा पध्दतीने करणार आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला होता. त्यावर सर्वांनी चर्चा करून व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतलेला होता व आता त्यावरच पुन्हा चर्चा करून माफ करणे बाबत मागणी करणे योग्य वाटत नाही. आताच प्रशासनाचा खुलासा झाला की, जे नियमित भरतात त्यांचेवर याचा बोजा पडणारनाही. जो रेग्युलर भरीत नाही त्यांचेवर व्याज आकारणी होत असेल तर योग्य आहे. अनेक प्रकारचे अनुदान महापालिकेस मिळत नाही तरी प्रयत्न प्रशासनाने केले पाहिजे. महापौरांनी घेतलेल्या निर्णयाची

अंमलबजावणी होत नाही. एम.एस.ई.बी. जसे दर आकरणी बाबत निर्णय घेते त्याप्रमाणे आपण पाणीपट्टी दर वर्षी वाढ करीत नाही किमान व्याज आकारणी करून जनतेला प्रवृत्त करून वसुली वाढविण्यासाठी प्रयत्न करावे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : मालमत्ता करावर व्याज लावणे चुकीचे आहे. महाराष्ट्रात कोणत्याही महापालिकेमध्ये मालमत्ता करावर व्याज आकारणी होत नाही. नागरिक पैसे भरीत नाही असे नेहमीच प्रशासन सांगते. एन.आर.बी. बाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी आहे. याबाबतीत अधिकारी लक्ष देत नाही. मालमत्ता कराच्या बाबतीत पुष्कळ तक्रारी आहे. उपआयुक्तांची पोस्ट मंजूर केल्यास वसुली मोठ्या प्रमाणात होऊ शकेल. न्यायालयातील प्रकरणे निकाली काढावेत. व्याज आकारणी करण्यात येऊ नये. रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. जयवंत ओक : या शहरात सेवाभावी संस्था आहे. मालमत्तेचा सर्वेक्षण करावे. न्यायालयात किती केसेस प्रलंबित आहे त्या निकाली काढाव्यात यास विलंब होतो. हि चूक प्रशासनाची नाही का? वसुली करण्याची जबाबादारी प्रशासनाची आहे. २० ते ३०% सुध्दा वसुली होत नसेल तर योग्य नाही. दर वर्षी नळ कनेक्शनमध्ये वाढ होते मालमत्तेमध्ये संख्येत वाढ होते तरी सुध्दा वसुली कमी आलेली आहे. बऱ्याच मालमत्तेला कर लागलेला नाही. जे नियमित भरतात तसे ते भरतात. जे सेवाभावी संस्था आहे ते मालमत्ता कर भरणार नाही याबाबतीत निर्णय घ्यावा इतर मनपामध्ये थकीत रक्कमेवर व्याज आकारणी होत नसेल तर याही महापालिकेत व्याज आकारणी करू नये. शासनामार्फत जसे संत गाडगे बाबा साक्षरता अभियान राबविल्या गेले त्याप्रमाणे मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुली होण्यासाठी झोनवाईज अभियान राबविण्यात यावे. जेणे करून जनता स्वत:हून कर भरण्यास येईल. घर तेथे कर असे अभियान राबवावे. प्रशासनाने जी बाजू मांडली त्यानुसार १००% उद्दिष्ट पूर्ण करणार आहे का खुलासा करावा.

मा. महापौर : मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यात यावे.

श्री. सुनिल मगरे : थकीत रकमेवर व्याज आकारण्यात यावे किंवा येऊ नये याबाबत चर्चा चालू आहे. स. सदस्यांनी आपआपले मत मांडलेले आहे. या शहरात अनेक मोठमोठे दवाखाने असून त्यातून बरेच उत्पन्न डॉक्टरांना मिळते. अशा रुणालयात किंवा दवाखान्यात, खाजगी व्यावसायिकांना जे नळ कनेक्शन दिले ते व्यावसायिक म्हणून दिलेले नाही निवासी म्हणून दिलेले आहे. असे माझे मत आहे. व निवासी म्हणूनच पाणीपट्टी वसुली होत आहे. जो कर लागलेला आहे तो व्यावसायिक म्हणून लागलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न कमी येत आहे. कोणत्या प्रकारचा कर तसेच नळ कनेक्शन दिलेले आहे. तयाचाखुलासा करण्यात यावा. पडेगांव लगत तीसगांव शिवारात महानगरपालिकतर्फे १०० ते १५० घरांना नळ कनेक्शन देण्यात आलेले आहे. सदर भाग हा ग्रामपंचायतीमध्ये येत असतांना नळ कनेक्शन कोणत्या नियमाने दिलेले आहे. काल झोन अधिकारी उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ०९ महिन्याचा काळात २५ ते २८% वसुली करण्यात आलेली आहे. उर्वरित २ ते ३ महिन्याच्या काळात बाकीची वसुली कोणत्या प्रकारे करणार आहे. याचा खुलासा झोन अधिकारी यांचेकडून घ्यावा. वसुली होण्याच्या दृष्टीने व्याज आकारणे योग्य आहे.

व्याज आकारणी करायची नसेल तर दंड आकारणी तरी करावी असे माझे मत आहे.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : मा. महापौर यांनी व्याज माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. सुनिल मगरे : व्याज आकारणी केल्यास जे नियमित कर भरतात ते सुध्दा भरणार नाही.

श्री. सुदाम सोनवणे : महापालिका हि संस्था आहे. लोकप्रतिनिधी हे या संस्थेचे ट्रस्टी आहे. मा. महापौर हे संस्थेचे अध्यक्ष आहे. व ते शहराचे प्रथम नागरिक आहेत. या सभागृहात चर्चा होऊ महापौरांनी घेतलेले निर्णय डावलले जात असेल तर महापौर म्हणून त्यांचा अपमान आहे. बैठकीला सुध्दा मा. आयुक्तांनाच महापौरांच्या खुर्चीवर बसावे असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. मा. महापौरांनी दिलेले आदेश डावलण्याचे मा. आयुक्तांना कितपत अधिकार आहे याचा खुलासा व्हावा. व्याज पोटी १.२८ लक्ष वसूल झालेले आहे. बाब शुल्लक आहे. व्याज माफ करण्याचा मा. महापौरांनी मागील बैठकीतच निर्णय घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी होत नसेल तर मा. महापौरांचा अपमान करीत आहे. असेच म्हणाचे लागेल. मा. महापौर बदलल्या नंतरही घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. मी महापौर असतांना जनतेच्या हिताचे जे निर्णय घेतलेले होते ते मा. आयुक्तांनी कधीच डावलेले नाहीत असे मी ठामपणे सांगू इच्छितो. व घेतलेले निर्णय हे अभ्यासपूर्वक घेतलेले होते व जे निर्णय महापौरांनी घेतलेले आहे ते ही अभ्यासपूर्वक आहे असे माझे मत आहे. ज्या नागरिकांनी आम्हाला निवडून दिले त्यांचे बाबतीत महापौर हिताचे निर्णय घेत असेल तर त्याची प्रशासनाने फायदा व तोट्याचा विचार न करता अंमलबजावणी केली पाहिजे. या सभागृहाने व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्या संबंधातच माझा मा. आयुक्तांना एक उपप्रश्न आहे. व्याज आकारणी करण्याबाबत मा. महापौरांनीच निर्णय घेतलेला होता व्याज लावण्याबाबत मा. आयुक्तांनी कोणत्या नियमाने कार्यवाही केली त्याचाही खुलासा व्हावा. तोही निर्णय महापौरांनीच घेतलेला होता. याबाबतची संचिका शासनाकडे चालविण्यात येत आहे. परंतु शासनाचे आदेश कितपत मान्य करायचे किती अमान्य करायचे हा सुध्दा अधिकार या सभागृहाचा आहे. मागील बॉडीमध्ये मा. महापौर यांनी सभापती यांचे निर्णयाविरुध्द न्यायालयात प्रकरण होते. त्यावेळी न्यायालयाने सुध्दा असे दिले की, त्या समितीच्या अध्यक्षांनी निर्णय घेतलेल्या आहे तोा कायम करण्यात यावा. न्याय दानाच्या माध्यमातून असे निर्णय होतात तर मा. आयुक्तांनी कोणत्या नियमानुसार व्याज आकारणी करून उत्पन्न वाढणार नाही. उलट कमी होईल. म्हणून उत्पन्नाची अनेक साधने आहेत जकातीचे खाजगीकरण करावे तसेच बोल्ड पध्दतीने शॉपिंग सेंटर उभारावे, दुकाने भाडेतत्वावर देण्यात यावी. मालमत्तेचे सर्वेक्षण व्हावे. जकातीच्या खाजगीकरणाला विरोध होऊ नये. खाजगीकरण केल्यासा मोठे उत्पन्न वाढेल.

श्री. राजु शिंदे : महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सभा आयोजित केलेली आहे. थकीत रक्कमेवर व्याज माफ केल्यास उत्पन्न कमी येईल. व कर भरणा केला नाही तर व्याज आकारणी होते अशी भीती नागरिकांमध्ये राहील

त्यामुळे व्याज आकारणे योग्य आहे. एम.एस.ई.बी. तसेच दुर संचार विभागामार्फत लोक लाईट तसेच दूरध्वनी घेतात वेळेवर बील भरले नाही तर व्याज आकारणी होते किंवा कनेक्शन कट केले जाते. सदर विभागाने लोकांना बील भरण्यासाठी केंद्र उभारणी केलेले आहे लोक तेथे जाऊन बीले भरतात. महानगरपालिकेचे कर्मचारी घरोघरी जाऊनही लोक बील भरत नाही या मागचे कारण काय? अधिकारी कमी पडतात काय? किंवा नागरिकांना आपण सोयी सुविधा पुरवित नाही काय? मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक असून तरच या शहरातील नागरिकांसाठी विकास कामे करता येतील. ज्या झोनची ५० ते ६०% च्या वर वसुली झालेली आहे तेथे त्या प्रमाणातच सुविधा दिल्या जाव्यात. काही झोनची वसुली २० ते ३०% झालेली असतांना सुविधा मात्र १००% दिल्या जातात. त्यामुळे जे कर भरतात त्या नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होतो. व ते नागरिक कर भरीत नाही.

श्री. संजय शिरसाट : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सभागृहात स. सदस्यांनी आपआपले मत मांडलेले आहे. वसुलीवर आपण सभा बोलविली त्याबद्दल आपले प्रथम अभिनंदन करतो. महापौर हे महापौरांच्या खुर्चीवर बसल्यानंतर संस्थेचे आर्थिक बळ कसे वाढेल याकडे लक्ष असते व त्यामाध्यमातून जनतेला जास्तीत जास्त सुविधा कशा पुरविल्या जातील याकडे लक्ष असते. सुविधा द्यायच्या म्हणजे पैसा पाहिजे. त्यासाठी ठोस असे निर्णय आपल्याला घ्यावे लागणार आहे. महापौरांनी उदा. उद्यापासून व्याज आकारणी केली नाही नळपट्टी माफ केली ती घोषणा तुमच्या प्रसिध्दीसाठी योगय ठरू शकते. या सभागृहात भरपूर चर्चा झालेली आहे. जे कर भरतात त्यांचेवर व्याज लागले जाते असे काही सदस्यांनी मत व्यक्त केले आहे. परंतु जे कर भरतात त्यांचेवर व्याज लागत नाही हे सभागृहाने लक्षात घ्यावे. उलट जे नियमित व सुरुवातीस भरतील त्यांना सवलत दिलेली आहे. अनेक वेळा थकबाकी धारकांना जाहीर प्रगटनाद्वारे नोटिस दिलेल्या आहेत. एकाही कर धारकाचे मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही झालेली नाही असे मला वाटते. जो कर भरत नाही त्यांचेवर व्याज आकारले नाही तर तो आणखी पुढील १० वर्षही कर भरणार नाही कारण त्या रक्कमेत काहीही वाढ होणार नाही. आपल्याकडे प्रथाच पडलेली आहे की, एखाद्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला की, त्या अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न काही नगरसेवकही करीत असतात. या ठिकाणी जात बघून अधिकाऱ्यांच्या पाठीशी असतात. माझ्या बोलण्याला काही सदस्यांचा विरोध सुध्दा असू शकतो यात शं्का नाही. वसुली करायची म्हणजे काय करायचे झोन अधिकारी यांना १० रुपयाचा झाडू विकत घेण्याचे अधिकार नाही तर वसुली जास्तीत जास्त होण्याची अपेक्षा करणे कितपत बरोबर आहे. एखाद्याकडे कर थकलेला असेल तर पावती बुक बरोबर घेऊन जातात. त्यामध्ये कुणीतरी सदस्य मध्ये येतो व कर्मचाऱ्यांना परत करतो. जे की, येणारा पैसा येत नाही. म्हणून नोकरी दिली तर तसे अधिकार सुध्दा दिले पाहिजे. ते दिले जात नाही. ड्रेनेज चोकअप झाले तर २५ रुपयाची बल्ली विकत घेण्याचे अधिकार झोन अधिकारी यांना नाही. माझ्याच वॉर्डाचे उदाहरण देतो व्यापार व भाजी मंडई मार्केट माझ्या वॉर्डात आहे. त्या

इमारत मालकांनी दुकाने विक्री करून टाकली कराची पावती मालकांच्या नावाने जाते. ज्यांनी घेतले ते कर भरणार नाही अशा अडचणी झोन अधिकारी यांना येतात. अशा प्रकारची मालमत्ता कराची झोन क्र. ६ मध्ये २० लक्ष रुपयाची थकबाकी असेल. अशाी वसुली केंव्हा होणार आहे. व्याज कशासाठी कमी करीत आहात. यासाठी करमुल्य विभागामर्फत यंत्रणा राबविण्यात यावी. या विभागातील उपअभियंता यांची झोनमध्ये नियुक्ती करावी. त्यांचे बरोबर दोन जे.ई. द्यावे ६ महिण्या पर्यंत निकाल पाहावा. ६ महिण्याच्या आत निकाल लागत नसेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी. मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो. असे माझे मत आहे. या सभागृहात काल पासून सभा चालू आहे. जो तो स. सदस्य पोटतिडकीने आपआपले प्रश्न मांडतात. परंतु त्यास वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न होतो. काही अधिकाऱ्यांना असे वाटते की, सभागृहात चर्चा करतांना सदस्य गोंधळ करतात. कार्यवाही करायची तर समोर नसतात. समोर बसले की फोटो आला. चार नगरसेवक जे बोलले तयाची बातमी वृत्तपत्रात आली की, आपली सेवा संपली असे समजतात. एखाद्या विभागा बाबत चर्चा करावयाची असेल व त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत बोलल्यास माझ्या कामात उद्या अडथळा निर्माण होईल म्हणून न बोललेले बरे. म्हणून आपण या शहराचे प्रथम नागरिक आहोत. निर्णय कोणताही घ्या परंतु त्यावर ठाम राहिले पाहिजे. तो पक्ष हिताचा असेल किंवा नसेल या पदावर काम करीत असतांना योग्य ते निर्णय घेण्यात यावे. १२८ कोटीचे बजेट १०० कोटीवर येत आहे विकास कामे झाली नाही तर जनतेला काय उत्तर देणार आहात या महापालिकेत एकूण १२ आयुक्त येऊन गेले. जनता आयुक्ता विषयी विचारणार नाही फक्त काम का झाले नाही याचा जाब आपणा सर्वांना विचारणार आहे. हे विसरून चालता येणार नाही. त्या जनतेच्या भावना काय आहे हे कामे करित करित असतांना त्या अधिकाऱ्यांना अधिकार सुध्दा काय दिले आहे याचाही विचार झाला पाहिजे. नागरिकांचे सुध्दा काय अधिकार आहे हे पाहिले पाहिजे. त्यांनी सुध्दा वेळेवर कर भरणा केला पाहिजे. व्याज माफ केल्यास कोणीही कर भरणा करणार नाही उलट थकबाकी वाढत जाईल व वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. शुल्लक प्रमाणात करावर व्याज आकारणी होते त्यास सर्वांनी मान्यता द्यावी. माफ करू नये. नतसा १५% ऐवजी १२% तरी व्याज आकारणी करावी जेणे करून लोकांच्या मनात भिती निर्माण होईल व लोक कर भरणा करतील तरच या शहराचा विकास करणे सोपे होईल.

श्री. मीर हिदायत अली : मा. भोगे साहेब आयुक्त असतांना बजेट शिल्लक राहत असे. ज्याच्याकडे थकबाकी असेल त्यांना डायरेक्ट जप्तीच्या नोटीस देत असे त्यामुळे बरेच लोक कर भरणा करीत असेल. लोकांच्या मनात एक प्रकारची भिती निर्माण झालेली होती. त्याप्रमाणे आता सुध्दा अशा थकबाकीदारांना नोटिसा देऊन कार्यवाही करावी तसेच शहरात एकूण ३३ टॉवर्स आहेत. तयांनी परवानगी घेतलेली नाही. जकात विभागात जसे १० पट दंड म्हणून वसूल करतो. तयाप्रमाणे २० पट दंड वसूल करून ३३ टॉवर्सचे जवळपास १.६५ कोटी रुपये जमा होतील व त्यानंतर त्यांना रेग्युलर करण्यात यावे. महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

श्री. अंबादास दानवे : १५% व्याज आकारणी करायची किंवा कसे या विषयावर बरीच चर्चा करण्यात आलेली आहे. व्याज आकारणी करू नये असे मत मी यापूर्वी व्यक्त केलेले आहे. परंतु काही सदस्यांनी महानगरपालिकेच्या हिताचा प्रश्न उपस्थित केला. १० वर्षापासून या महापालिकेत काम करीत आहे. महापाकिचे हित कसे जपायचे याची ज्ञान देण्याची आवश्यकता नाही. असे मला वाटते सभागृहाला सांगू इच्छितो की, लिगल वॉर्डातून निवडून आलेलो आहे. ९०% वसुली माझ्या वॉर्डातून होत आहे. खात्री होत नसेल तर झोन अधिकारी याचा खुलासा देऊ शकतील. जो कर भरतो त्यांनाच व्याज आकारणी बाबतचा त्रास होतो. मागील वर्षाची वसुली व या वर्षाची वसुलीचे प्रमाण बघितले तर व्याज आकारणी करूनही वसुली कमी झालेली आहे. शहरात अनधिकृत घरे होत आहे. नळ कनेक्शन अनधिकृत घेतले जाते, कोणत्याही प्रकारचा कर लागला जात नाही व नळपट्टी भरून घेतली जात नाही. अनेक ठिकाणी पाणी वाया जातो अशी परिस्थती आहे. ज्यांचेकडे लाख दोन लाख कर बाकी आहे त्यांच्याकडे आपले अधिकारी / कर्मचारी जात नाही जास्त रक्कमा असणारे लोकांकडे १०-१० वर्षाची बाकी आहे. का वसुली १० वर्षातही होत नाही. ते टॅक्स भरीत नाही. जे रेग्युलर भरतात ज्यांचेकडे ५ ते १० हजार कर बाकी आहेत. त्यांचेकडेच अधिकारी / कर्मचारी जातात कारण या कर्मचाऱ्यांना बजेटचे उद्दिष्ट पूर्ण करायचे असते. जे भरीत नाही त्यांचेकडे कशासाठी चकरा मारायच्या असा समज झोन अधिकारी तसेच कर्मचारी करतात. म्हणून जे भरतात त्यांना या व्याजाचा भार पडतो महापालिकेच्या आर्थिक हिताचे अनेक विषय आहेत जकातीचे खाजगीकरण करण्याचा निर्णय झाला त्यास विरोध करण्यात आला यातही महापालिकेचे हित होते कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू झाला मोठ्या प्रमाणात वेतनात वाढ झाली. परंतु उत्पन्न काहीच नाही यास कोणी विरोध का केला नाही. यामुळे मोठ्या प्रमाणात तुट निर्माण झालेली आहे. ज्या नागरिकांच्या स्वबळावर महापालिका चालते. म्हणून सर्वसामान्य जनतेचे हित जोपासण्याचे काम महापालिकेचे आहे हे विसरून चालता येणार नाही. म्हणून जे १५% थकीत रक्कमेवर व्याज आकारणी होते ते रद्द करण्याचे आदेश द्यावेत जेणे करून महानगरपालिकेची जास्त प्रमाणात वसुली होईल. उशीरा आदेश दिल्यास वसुली होणार नाही.

श्री. विकास जैन : कालाच्या बैठकीत मुख्य लेखाधिकारी यांनी वसुली बाबत टक्केवारी चा खुलासा केलेला आहे. जे उद्दिष्ट ठरवून दिले त्यावर टक्केवारी काढलेली आहे. माझे मत असे की, मागील थकित रक्कम व चालू वर्षाची वसुली किती झाली यावर टक्केवारी काढली पाहिजे. टारगेट हे दिले जाते परंतु त्यापेक्षाही येणे रक्कम मोठ्या प्रमाणात असते. थकीत रक्कम का वाढत चाललेली आहे. याचा विचार प्रशासन का करीत नाही. वॉर्डात काही लोक सांगतात लोकांना बिलेच जानेवारी / फेब्रुवारीमध्ये दिली जाते उशीरा बिले दिल्यामुळे वसुली सुध्दा कमी होते. अगोदरपासूनच प्रशासन का कार्यवाही करीत नाही. या वर्षी तरी वर्कवाईज बजेट असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी त्रास दिलेला नाही. फक्त एकच मागणी असते की, बजेट मध्ये माझ्या वॉर्डातील कामाची तरतूद केलेली आहे ते काम झाले पाहिजे. हि सवलत कमी करून देऊनही प्रशासन वसुली या माध्यमातून का

प्रयत्न करीत नाही. व्याज आकारणी करणे म्हणजे उत्पन्न वाढते का? हा चुकीचा अर्थ आहे. इंदौरला मी गेलो होतो खैरनार साहेब ही होते. त्या शहराचे टॅक्स वसुली ही ५२ कोटीची होती या सभागृहाने योग्य निर्णय घेऊनही वसुली होत नाही. आताच काही सदस्यांनी संगणकीकरण करण्याचा मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे. उदा. राजाराणी अपार्टमेंट आहे. त्या ठिकाणी १० फ्लॅट आहे. ५ फ्लॅटचे रजिस्ट्रेशन झाले तर लोकांवर कर लागतो. बाकीच्यावर नाही. मालक विकून टाकतो त्यामुळे मालकाच्या नावाने कर लागत नाही. तेच संगणकावर फिट केलेले असते तर किती प्लॉट आहे किंतींना टॅक्स लागला हे दिसून आले असते. याबाबतीत प्रशासन काय कार्यवाही करीत नाही. यातूनही उत्पन्न वाढू शकते. आज अशी परिस्थिती आहे की, उत्पन्न कमी झाले म्हणून कामे कमी करीत आहोत. यात नागरिकांचेच नुकसान होत आहे. आज व्याज आकारणी केल्यास त्या नागरिकांसमोर पुन्हा आपणांस जायचे आहे. कर कुणी भरीत नाही असा प्रकार नाही आपले अधिकारी / कर्मचारी त्यांचेकडे जातच नाही. बिले वेळेवर पोहचते होत नाही. याचा परिणाम नागरिकांवर होणार आहे जे की, वसुली कमी झाल्यास विकास कामे करणार नाही. व तसा प्रस्ताव स्थायी समितीसमोर येणार आहे. मागे टेक्नीकल विभागाचे लोक वसुलीसाठी दिले होते. तरी वसुली झाली नाही. व्याज आकारणी करणे म्हणजे उत्पन्न वाढेल असे गृहित धरणे योग्य नाही. उत्पन्न वाढविण्याची अनेक साधने महापालिकेकडे आहेत. आदर्श भाजी मंडई करण्याचा निर्णय झाला का काम सुरू करण्यात आले नाही. तसेच वसंतभवन येथे बीओटी पध्दतीने दुकाने काढल्यास मोठ्या प्रमाणे उत्पन्न मिळू शकेल. शहरात महापालिकेने लाखो रुपये खर्च केलेले आहे. शॉपिंग सेंटर तयार केले. का भाडे तत्वावर देण्यात आलेले नाही. यात महापालिकेचे मोठ्या प्रमाणात प्रशासनाकडूनच नुकसान होत आहे. त्यामुळे वसुली हि होत नाही. यास प्रशासन दोषी आहे. शहरात महापालिकेच्या मालकीची मोठ्या प्रमाणात जागा आहे. बी.ओ.टी. पध्दतीने शॉपिंग सेंटर तयार करण्याची कार्यवाही केल्यास महापालिकेस करोडो रुपये मिळू शकतील यात शंका नाही. जळगांव नगरपरिषदेचे उदा. दिल्यास बीओटी पध्दतीने मोठ्या प्रमाणात उत्पन्न त्या पालिकेस होते. आपल्या महापालिकेत तशा प्रकारची कार्यवाही का होत नाही. अनेक ठिकाणी दुकाने होऊन झालेली आहे. त्याबाबतीत का वाटाघाटी करून कार्यवाही होत नाही. वर्कवाईज बजेट मुळे प्रशासनाचा कामाचा व्याप कमी झालेला आहे. वसुली जास्त व्हावयास पाहिजे होती. जे नियमित भरतात त्यांनाच यापासून त्रास होणर आहे. व्याज माफ करण्याचा निर्णय झालेला आहे. विकास जैन माहपौर आहे म्हणून निर्णय दिला परंतु पॉलिसी मॅटर म्हणून निर्णय दिलेला होता. सभागृहाच्या सम्मतीने तो निर्णय घेतलेला होता. प्रशसन महापौरांच्या आदेशाची अंमलबजावणी करीत नसेल तर यापुढे प्रशासनाने सुध्दा कोणतेही पॉलिस मॅटर आनु नये. असे माझे मत आहे.

श्री. जगदीश सिध्द : चर्चेद्वारे वेगळ्या प्रकारचे वळण देण्याचा प्रयत्न होत आहे. ज्याची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे. अशांना सुध्दा सवलत देऊ शकतो तसे नियमात तरतूद आहे. नगर परिषदेच्या काळात जे कर भरीत नसतील अशा नागरिकांच्या घरासमोर भोंगे, बँड वाजवून त्या व्यक्तींला कळवित होता.

बदनामी होईल म्हणून ज्यांचेकडे बाकी आहे ते लोक कर भरीत असे. १५% व्याज आकारणी न करता १२% करावी पूर्ण व्याज माफ करू नये.

श्री. भगवान घडामोडे : उत्पन्न वाढविण्यासाठी काय उपाययोजना करता येईल यासाठी आजची बैठक आयोजित केलेली आहे. महसूली उत्पन्न वाढविणे ऐवजी कमी उत्पन्न होण्याच्या दृष्टीने चर्चा करणे बरोबर नाही मुळात जे कर भरणारे नागरिक आहे. त्यांना व्याज भरावे लागणार नाही. व्याज आकारणी केल्यास जनतेला भिती राहील व त्या भिती पोटी थकबाकीदार कर भरतील. महापालिकेचे हित लक्षात घ्यावे. विरोधी पक्षनेते तसेच स. सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले यांनी जे व्याज माफ करण्याची मागणी केली त्यामागे त्यांचा हेतू असा की, वसुली कमी व्हावी व या युतीच्या काळात शहरातील विकास कामे होऊ नये. निवडणूका तोंडावर आलेल्या आहे. त्यावेळी जनतेला सांगतील की, सेना भाजपची सत्ता होती त्यावेळी त्यांनी शहराचा कोणताही विकास केला नाही. ही भूमिका त्यामागची आहे. व कोणताही विकास करता येणार नाही व नागपूर महापालिका बरखास्त केलेली होती. त्याप्रमाणे हि महापालिका बरखास्त होईल काहीही साध्य होणार नाही.

श्री. किशोर तुळशीबागवाले : शहराचा विकास जास्तीत जास्त कसा होईल असे आमचेही मत आहे. काही सदस्य सभागृहात राजकारण करीत आहे. ज्यावेळी व्याज आकारणी करण्याचा प्रस्ताव बजेटमध्ये आला त्यावेळी मी विरोध केलेला होता. मा. महापौर व माझ्याकडे त्यावेळी शिष्टमंडळ आले होते चर्चा केली. पुन्हा शेवटच्या बैठकीत व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला तो योग्य आहे. कोणतेही राजकारण आम्ही करीत नाही. व इतरांनीही करू नये.

श्री. अ.रशिद अ. सत्तार : स. सदस्य श्री. घडामोडे यांनी विरोधी पक्षनेते बद्दल अपशब्द काढले त्यांनी माफी मागावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : या महापालिकेचे आपण सर्व ट्रस्टी आहोत. जे कर भरतात त्यांचेवरच हा बोजा पडणार आहे. व्याज आकारणी केल्यानंतर वसुली कमी प्रमाणात होते. नियमाप्रमाणे व्याज लावता येत नाही. इतर महापालिकेमध्ये लावण्यात येत नाही. व व्याज आकारणी केल्यास वसुली जास्त होते असे म्हणणे चुकीचे होईल. एम.एस.ई.बी. ने जे महापालिकेच्या रक्कमेवर व्याज लावलेले आहे. ते महापालिका भरते का हा विचार होणे गरजेचे आहे. लोक करच भरणार नसेल तर व्याज आकारणी करून उपयोग नाही. जे कर भरत नाही त्यांचे मालमत्ता जप्त कराव्यात. त्यांचे ड्रेनेज बंद करावे. नळ कट करावे. १५% व्याज आकारणी थकीत रक्कमेवर करू नये असे मत सभागृहाचे झालेले आहे. म्हणून आपण तसेच रुलींग द्यावे.

मा. महापौर : थकीत मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीवर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारणी होऊ नये ज्यांचेकडे कर बाकी आहे त्यांचेकडून सक्तीने कर वसूल करावा व जास्तीत जास्त वसुली वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे.

(दुपारी २.०० वाजता तहकूब करण्यात आलेली सभा दुपारी ३.०० वाजता सुरू झाली.)

सौ. निखत परवीन : झोन वाईज किती वसुली झाली खुलासा व्हावा.

श्री. सुदाम सोनवणे : व्याज आकारणी या विषयावर चर्चा झालेली आहे. आता मालमत्ता या विषयावर चर्चा करावी.

मा. महापौर : जकात विषयावर चर्चा करावी. वसुलीच्या संदर्भात जकात अधिक्षक यांनी सविस्तर माहिती सभागृहात द्यावी.

जकात अधिक्षक : जकात विभागाची मागील ५ वर्षाची आकडेवारी आणलेली आहे. सर्व सदस्यांना देण्यासाठी छायाप्रती आणलेल्या आहेत. चालू वर्षाचे जकातीचे उद्दिष्ट ६२ कोटीचे दिलेले होते. डिसेंबर अखेर ४२,६७,०३,२३०/- रुपये इतकी झालेली आहे. मागील वर्षी डिसेंबर अखेर ३६,९४,३१,३००/- रुपये इतकी वसुली झालेली होती गत वर्षीच्या तुलनेत या वर्षी ५,७२,७१,९३०/- रुपये जे जास्त आहे मागील ५ वर्षाचा रेशो बघितला तर ६% नी वाढ झालेली आहे. डिसेंबर अखेर पर्यंत १६% नी वाढ झालेली आहे. आणि उद्दिष्टांचा विचार केल्यास ६९% वसुली झालेली आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्याचे पूर्णतः प्रयत्न चालू आहे. मागील वर्षाचे उद्दिष्ट बघितले तर ११.५०% कमी केलेले आहे. असे करूनही वसुली त्यापेक्षा कमी झालेली आहे. म्हणजे दिलेल्या उद्दिष्टाच्या १५% नी वसुली कमी झालेली आहे. ६९% वसुली झ ाालेली आहे. आणखी ८७ दिवस बाकी आहे उद्दिष्टाप्रमाणे वसूल करावयाची रक्कम १८.१९ कोटी सरासरी दररोज २१ लक्ष वसूल झाले पाहिजे. दररोज सरासरी १६.५० लक्ष वसुली होती आहे.

श्री. भगवान घडमोडे : टारगेट पूर्ण करावयाचे म्हणून ॲडव्हान्स चेक घेऊन उद्दिष्ट पूर्ण करण्यात येऊ नये.

श्री. भाऊसाहेब ताठे : जकात वसुली जास्त प्रमाणात वाढलेली आहे असे अधिकाऱ्यांनी मत मांडले. परंतु या शहराच्या लोकसंख्येत सुध्दा वाढ झालेली आहे. मालाची आवक वाढली. आणखी जकात यावयास पाहिजे होती असे माझे मत आहे.

श्री. तकी हसन खॉन : सन ९७-९८ मध्ये जी जकात वसुली झाली त्याचे प्रमाणे सन ९८-९९ मध्ये ६% वाढलेली आहे. ९९-२००० मध्ये ६% वाढलेली आहे. सन २०००-२००१ मध्ये १०% वाढली. १०% जेंव्हा वढली तेंव्हा जे. पी. एफ फिस १० रुपये होती ती २०/- रु. केले. तसेच फर्टीलायझरला सुध्दा २% जकात आकारणी केली परंतु त्यानंतर २००१-२००२ मध्ये वसुली वाढण्याऐवजी ४.५०% कमी झाली. जकात अधिक्षक यांनी आताच खुलास केला की, १६% वसुली वाढली परंतु माझ्या माहितीप्रमाणे १७% वाढलेली आहे. पॅनॉलटीच्या नावाने किती वसुली करण्यात आलेली आहे व मार्च अखरे अंदाजे किती वसुली होईल.

जकात अधिक्षक : २८ लक्ष रुपये यात ॲड केलेले आहे. पॅनॉलटीच्या नावाने एकूण १६% नी वाढ झालेली आहे. सध्याची जी वसुली होते त्याप्रमाणे चालत राहिले तर ५८ कोटी पर्यंत वसुली होईल. असा अंदाज आहे.

श्री. तकी हसन खॉन : मागील वर्षी जे टारगेट दिले होते. त्यामध्ये रिवाईजमध्ये ९ कोटी कमी करण्यात आलेले होते. व त्या वेळी झालेली वसुलीच्या तुलणेत या वर्षी याहीपेखा कमी वसुली व्हावयास पाहिजे होती. तसेच त्यावेळेस या विभागात २२५ कर्मचारी काम करीत होते. त्यापैकी ५२ कर्मचारी या विभागातून कमी करण्यात आले. आता फक्त १७४ कर्मचारी काम करीत आहे. कमी प्रमाणात कर्मचारी असतांना सुध्दा ५८ कोटी उद्दिष्ट पूर्ण होत असेल तर चांगल्या प्रकारे वसुली होत आहे. व या पेक्षा जास्त वसुली करायची असेल तर सिमकार्डवर जकात लावावी. कोणतीही इलेक्ट्रीक वस्तु बाहेरून आल्यास जकात आकारणी होते. सिमकार्ड येथे तयार होत नाही. बाहेरून येते. जर

यावर जकात लागला तर ६० कोटी जकात वसुली होऊ शकते. तसेच सन २०००-२००१, २००२-२००३ या वर्षी पॅनॉलटीच्या नावाने एक पैसाही वसूल झालेला नाही. ज्या विभागाचे कर्मचारी वसुलीमध्ये कमी पडतात तेंव्हा त्यांना दोषी ठरवण्याचा प्रयत्न होतो. परंतु ज्या अधिकाऱ्यांनी चांगल्या प्रकारे वसुली करून दाखवल्यास त्याचे श्रेय मा. आयुक्तांना, संबंधित विभाग प्रमुखांना तसेच मा. महापौरांना जाते. म्हणून अशा अधिकाऱ्यांची प्रशंसा झ ाली पाहिजे. चांगल्याना चांगलेच म्हटले पाहिजे. वाईटांना वाईट म्हटले पाहिजे. हाच खरा न्याय आहे.

श्री. सुदाम सोनवणे : अर्थसंकल्पात जकातीचे उद्दिष्ट हे ६२ कोटीचे दिलेले होते. डिसेंबर अखेर ४२.६७ कोटी वसुली झालेली आहे. मागील ५ वर्षाच्या तुलनेत जास्त प्रमाणात वसुली झाली असे आताच जकात अधिक्षक यांनी खुलासा दिला. म्हणून जकात अधिक्षक यांचे मी सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. महानगरपालिकेचा जकात हा विभाग वसुलीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. गेल्या ५ वर्षात जी जकात कमी आली व जी तफावत निर्माण झाली ती का झाली त्याचाही खुलासा करण्यात यावा. जकात कमी झाली किंवा वाढली यास कारणीभूत अधिकारीच आहेत. जकातीत वाढ झाली म्हणून त्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. परंतु जास्तीत जास्त जकात वाढविण्यासाठी सुध्दा काय उपाययोजना करता येतील हे सुध्दा सभगृहाने सुचविले पाहिजे. सिमकार्डवर जकात आकारणी केली पाहिजे यास माझे सहमत आहे. मागील एका बैठकीत चर्चा झालेली होती की, या शहरात सिमकार्ड, मोबाईल, हँडपीस, मोबाईल फिलींग वर जकात आकारणी केली पाहिजे असे या सभागृहात ठरविण्यात आले होते. एका व्यक्तीने नॉमीनल मोबाईल वापरला तर तो हँडपीस कमीत कमी ५ ते ६ हजार रुपयाचा हँडपीस असतो. बऱ्याच हँडपीसची चोरी या शहरामध्ये होते. सिमकार्डची नोंद महापालिकेकडे होत नाही. सिमकार्डचे आता सुचविण्यात आले परंतु हँडपीसवर सुध्दा जकात आकारणी करू शकतो. हा नियम आहे. म्हणून ज्या कंपन्या आहेत. एटीएनटी, बीपीएल या दोन्ही कंपन्याकडून ग्राहकांची यादी मागवावी आणि त्या ग्राहकांशी संपर्क करायचा. ज्यांनी सिमकार्ड घेतले त्यांचेकडे हँडपीस असणार यात शं्का नाही. त्यानुसार त्या हँडपीसची चौकशी झाली पाहिजे अमुक व्यक्तीकडे हँडपीस आहे. त्याची जकात मिळाली मिंवा नाही याची शहानिशा केली पाहिजे. परंतु तसे काहीही कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही. तसेच मोबाईल फिलींगवर सुध्दा जकात आकारणी झाली पाहिजे. एका व्यक्तीला जवळपास ३ ते ४ हजार दर महिण्याला बिल येते. मोबाईल कंपनी मालकांनी हा व्यवसाय चालू केलेला आहे. महापालिकेसारखे सेवाभाची संस्था नाही. आणि ही कंपनी जर शहरात येऊन व्यवसाय करीत असेल तर मोबाईल फिलींगवर हँडपीस तसेच सिमकार्डवर जकात आकारणी झाली पाहिजे असे माझे मत आहे. दुसरा मुद्दा असा की, ६२ कोटीचे टारगेट ठरविण्यात आले. टेंडर कॉल पध्दत सुरू झाली परंतु त्यानुसार कार्यवाही झाली नाही. नैसर्गिक पध्दतीने ज्या प्रमाणे जकात वाढावयास पाहिजे होती ती वाढलेली नाही असे माझे मत आहे. टेंडरप्रमाणे ६२ कोटीचे उत्पन्न मिळाले असते. तसेच २५२ कर्मचाऱ्यांवरील २ कोटीचा खर्च, स्टेशनरी, फोन बिल, मोबाईल बिल,

गाड्याचा खर्च झाला नसता तयाचा विचार केल्यास त्या प्रमाणात जकात वाढली असे म्हणता येणार नाही. वसुलीनुसार २० कोटीची तफावत येत आहे. दोन महिण्यात हे उद्दिष्ट पूर्ण होईल का असा प्रश्न आहे. काही प्रमाणात वाढ झालेली आहे असे म्हणता येईल. अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करीत असतांना सभागृहात चर्चा वेगळ्या पध्दतीने होते. त्यामुळेही अधिकारी उत्सुकतेने उद्दिष्ट पूर्ण करण्यास तयार नसतात. आताच जकात अधिक्षक यांनी खुलासा केला ५८ कोटी वसुली होणार २ काटी कर्मचाऱ्यांचा खर्च ५० ते ६० लक्ष रुयये गाड्याचा खर्च म्हणजेच केवळ ५५ कोटीच वसुली झाली असे म्हणता येईल. मागील काही वृत्तपत्रात बऱ्याच छायाप्रती आल्या महापौरांनी सोने, मा. आयुक्तांनी १० किलो सोने वगैरे पकडण्याचा बाबतीत आलेल्या आहेत. चोऱ्या होण्यास नगरसेवक जबाबादर नाही. चोरी पकडली किंवा चोरी होते, यास अधिकारीच जबाबदार आहेत. चांगले काम केले म्हणून अभिनंदन करण्यास हरकत नाही. परंतु अधिकाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य बजावत असतांना त्यांची सुध्दा प्रतिमा खराब होऊ देऊ नये. सर्व खर्च जाता महापालिकेस किती जकात वसुली येणार आहे याचाजकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

जकात अधिक्षक : कर्मचाऱ्यांवर २ कोटीचा खर्च होतो. ५४ कर्मचारी कमी करून २५% खर्च कमी केलेला आहे.

श्री. संजय शिरसाट : ५४ कर्मचारी जकात विभागात जास्तीचे होते का? असतील तर गेल्या १० वर्षापासून ते त्या विभागात कसे काम करीत होते.

श्री. प्रशांत देसरडा : जकात वसुलीच्या संदर्भात चर्चा चालू आहे. जकात वसुली वाढली तर विकास कामे सुध्दा होतील. महापालिकेला मुंबई, तसेच नगर नाक्यापासून जकातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न येते. काही मोठमोठ्या व्यापाऱ्यांकडून नाक्यावर जकात न घेता सेंट्रल नाक्यावर घेतली जाते काही गाड्या सेंट्रल नाक्यावर जात आहे म्हणून जकात भरत नसतील असा संशय आहे. ते गाडीतील माल जालनारोडवर असलेल्या दुकानामध्येही उतरवून घेऊ शकतात असा संयश येतो. येतो. छावणी परिषदेला जकातीचा हिस्सा वाढवून पाहिजे होता. तेंव्हा मागील वर्षी छावणी परिषदेला नाक्यापोटी जो जकातीचा हिस्सा देण्याचा करार झाला त्यावेळीच करारामध्ये छावणी परिषदेकडून २ एकर जागा नाक्यासाठी घेणार होतो त्याबाबतीत काय कार्यवाही झाली. जे की, व्यापाऱ्यांना नगरनाक्यावरून सेंट्रल नाक्यावर माल नेण्यास त्रास होतो व सदर नाका हा शहरच्या मध्ये वर्दळीच्या ठिकाणी आलेला आहे. सेंट्रल नाक्याकडे दिवसातून जवळपास १०० ते २०० ट्रक गाड्या जात असतील त्यामुळे बऱ्याच वेळा पाईपलाईन फुटलेल्या आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात अपघात सुध्दा झालेले आहे. याचा विचार करता सेंट्रल नाका नगर नाक्याकडे शिफ्ट केल्यास मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढू शकते आणि जे अडथळे निर्माण होतात ते सुध्दा सुटतील. नाक्यावरील कामकाज जे तीन शिफ्ट मध्य चलत नाही अशी माहिती आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी जो माल येतो त्यांचा जकात मिळत नाही. तसेच जकात भरण्यास व्यापाऱ्यांना सुध्दा त्रास होतो त्यासाठी नाका २४ तास चालू पाहिजे. सोने, चांदी यावर जकात कमी प्रमाणात येते. जे दर आकारणी होते ती जास्त आहे कमी केल्यास व्यापारी जकात भरतील. यावरील जकात

हा एकाच नाक्यावर वसूल करण्यात येतो. प्रत्येक नाक्यावर सोने-चांदीची जकात वसुली करण्यासाठी व्यवस्था असावी.

श्री. भगवान घडमोडे : जकातीची नैसर्गिक वाढ हि १०% होतेच. उदिष्ट पूर्ण करण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. खाजगी गाड्यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात माल येतो तो पकडण्यास अडचण येते. शहराबाहेर गोडावून तयार झाले तेथे लोक माल उतरवितात. उदा. एका फियाट गाडीमध्ये ५०,०००/- रुपयेचे सोने येऊ शकते. त्यासाठी यंत्रणा राबविणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी गोडाऊन होते तेथे महानगरपालिकेचे सेक्युरिटी ठेवलेले होते. माझ्य माहितीप्रमाणे आता ठेवण्यात येत नाही. म्हणून अशा गोडाऊन वर धाडी टाकून महापालिकेचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढू शकते. आताच सांगितल्याप्रमाणे जकात अधिक्षक यांना नगरसेवकांचा वसुली करण्याच्या दृष्टीने काही हस्तक्षेप उद्दिष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी जशी अधिकाऱ्याची आहे तेवढीच जबाबदारी या सभागृहाची सुध्दा आहे. कुणाचा हस्तक्षेप असेल तर हे सभागृह जकात अधिक्षक यांना मदत करेल. एखाद्या ठिकाणी धाड टाकली. चोरीचा माल पकडला गेला वृत्तपत्रात येते. त्यात सर्वांचा सन्मान होतो. आज सभागृह प्रशासनाच्या पाठीशी आहे. अधिकाऱ्यांनी तसा खुलासा करावा. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना सभागृहाची काय मदत पाहिजे ती मिळू शकेल. लोकप्रतिनिधी व प्रशासन बरोबर असल्याशिवाय महापालिकेचा रथ चालू शकरणार नाही. ती दोन्ही चाके बरोबर असणे आवश्यक आहे. तरच उद्दिष्ट पूर्ण होईल.

सौ. विजया रहाटकर : आताच जकात विभागासंबंधीची माहिती जकात अधिक्षक यांनी दिलेली आहे. अभिनंदन करावे अशी आजची परिस्थिती असून चांगला पायंडा या सभागृहात पडतो आहे. असे चित्र आहे. इतर कराच्या बाबतीत आपण मागे आहोत काळजी करण्यासारखी परिस्थिती आहे. परंतु जकातीमध्ये आणखी काही उपाय योजना केल्या तर जे टारगेट ठरविले आहे तिथपर्यंत पोहचू शकतो असे मला वाटते. मागील वर्षाच्या तुलनेत १६% वसुली वाढलेली दिसून येते. ५८ मार्चपर्यंत जाईल असे आताच सांगण्यात आले. याचा अर्थ ठरवून दिलेल्या टारगेटच्या ४ कोटी मागे पडतो असे दिसते. यापूर्वी ठरवून दिलेल्या टारगेटमध्ये कमी करून टारगेट पूर्ण करून देण्यात आलेले आहे. त्यातही ९७,९६,९८% टारगेट पूर्ण करून दिले ते रिवाईज टारगेट होते. परंतु या वेळेस सर्व परिस्थिती चांगली आहे. जकात अधिक्षक चांगले काम करीत आहे. आताच काही सदस्यांनी सिमकार्डवर जकात आकारावी म्हणून सूचना केल्या अशा प्रकारे हँडपीस मोबाईल फिनींग, सिमकार्ड यावर जकात आकारणी केल्यास मोठे उत्पन्न महापालिकेस येऊ शकेल. व ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण होईल. या वर्षी रिवाईज टारगेट न करता उद्दिष्ट पूर्ण होईल. अशी शाश्वती आहे.

श्री. राजु शिंदे : जकातीमध्ये वाढ झाल्याबद्दल जकात अधिक्षक यांचे सभागृहाने अभिनंदन केलेले आहे. शहरात जो आयात माल होतो त्यावर जकात आकारणी होते. प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एम.एस.ई.बी. हि सुध्दा एक संस्था आहे. व्यावसाय करते. म्हणून जी विज शहरात येते त्यावर सुध्दा जकात लागला पाहिजे. कारण विज शहरात आणून कमर्शियल प्रमाणे जनतेला विकून उत्पन्न मिळत आहे. महानगरपालिकेच्या पाणीपट्टीच्या

बिलावर एम.एस.ई.बी. व्याज आकारते. बिल भरण्यास वेळोवेळी नोटीस देऊन विज कट करण्याच्या धमक्या दिल्या जातात. त्याकरिता शहरातील पोल. डि. पी. ट्रान्सफार्मर यावर कर आकरणी केली पाहिजे. येणाऱ्या विजेवर जकात तसेच पोल, डि. पी. ट्रान्सफारर्मरवर कर लागल्यास मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल व तसा ठराव सर्वसाधारण सभेत घेऊन पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. अंबादास दानवे : सर्व आकडेवारी सादर केलेली आहे. मागील वर्षी २००१-२००२ व २००२-२००३ मध्ये डिसेंबर अखेर किती वसुली झाली याची माहिती दिलेली आहे. एप्रिल पासून डिसेंबर ची आकडेवारी बघितली तर एप्रिल मध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत ३०% नी वाढ झालेली आहे. मे. १७%, जून मध्ये १९%, जुलैमध्ये १७%, ऑगस्ट मध्ये २३%, सप्टेंबर मध्ये १३%, ऑक्टोंबर मध्ये १६-५०%, नोव्हेंबर मध्ये ०.१७%, डिसेंबर मध्ये १% वाढ झालेली आहे. यात मागील ७ महिण्याच्या रेशो व नोव्हेंबर डिसेंबर महिण्याचा रेशो प्रचंड प्रमाणात तफावत आहे असा माझा आरोप आहे. एप्रिल पासून ऑक्टोंबर पर्यंत चांगल्या प्रकारे वाढ झालेली आहे. परंतु नोव्हेंबर डिसेंबर यामध्ये रमजान होता. तसेच डिसेंबर माहिणाही वसुलीचा महिणा असतांना का वसुली कमी झालेली आहे. या शहरात सोने चांदीवर ७०-७५ कोटी रुपयाची उलाढाल होते. यावर वसुली फक्त ६ ते ७ लक्ष झालेली असेल असे मला वाटते. कमी वसुली झालेली आहे. दर जास्त आहे म्हणून कमी वसुली आहे. दर कमी केले पाहिजे अशी मागणी मी मागच्या बैठकीच्या वेळी सुध्दा केलेली होती. तसेच संगणक यावर जकात जास्त प्रमाणात लागली जाते म्हणून वसुली कमी होत आहे. असे माझे मत आहे. या शहरात जास्त सेल संगणकांचा होत आहे. यावर जास्त प्रमाणात जकात वसुली नाही असे माझे स्पष्ट मत आहे. मागच्या महिण्यात सिमेंट डिलर्स व्यापाऱ्यांची जी असोसिएशन आहे त्यांनी तक्रार महापौरांकडे केली की, सिमेंटची चोरी या शहरात होते. जो विकतो त्या प्रतिनिधीने तक्रार केलेली होती ती तक्रार का दिली याचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे. त्यात त्यांनी स्पष्ट आरोप केलेला होता. जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या लागेबांधा मुळे अशा घटना घडतात. म्हणून त्यांचे निवेदनाची सुध्दा दखल घेण्याची आवश्यकता आहे. आताच सांगण्यात आले की, मागच्या तुलनेत जकातीमध्ये ६% नी वाढ झालेली आहे. परंतु मागील ५ वर्षीचे उद्दिष्ट बघितले तर ५ ते ७ कोटीने वाढवनू होते. परंतु यावर्षीचे उद्दिष्ट फक्त १ कोटीनेज जास्त म्हणून ठेवलेले आहे. मागील वर्षी ६१ कोटीचे उद्दिष्ट होते. आणि हेच कारण टक्केवारी वाढण्याचे आहे. ६% वरून १६% नी वाढ झाली यात काही फारसे हुरळून जण्याची आवश्यकता नाही. उद्दिष्ट पूर्ण होत नाही तर टारगेट वाढवून देण्याची काय आवश्यकता असा विचार मा. आयुक्त श्री. शर्मा साहेब यांनी केला होता. म्हणून ६१ कोटीचे उद्दिष्ट या वर्षी फक्त ६२ कोटीच ठेवण्यात आले होते जकात वसुलीच्या वेळेस एक करारपत्र भरून द्यावे लागते. कायदा आहे नियमाने भरून द्यावे लागते. करारपत्राची काय परिस्थिती आहे याबाबत जकात अधिक्षक यांना मागील एका बैठकीत मी प्रश्न उपस्थित केलेला होता. करारपत्र भरून दिल्यानंतर २४ तासात निपटारा झाला पाहिजे. परंतु जकात अधिक्षक यांनी मला पत्र देऊन कळविले आहे की,

करारपत्राचे एकूण प्रकरणे १०८ प्रलंबित आहे. या करारपत्रासंबंधी कायद्याचा खुलासा जकात अधिक्षक यांनी करावा. तसेच डिमांडच्या संदर्भातही प्रश्न उपस्थित केला होता. वेगवेगळ्या कंपन्यांना डिमांड देणे आवश्यक असते. त्या संदर्भात सुध्दा खुलासा झाला पाहिजे. मागच्या प्रमाणात जकातीमध्ये निश्चितपणे समाधान कारक परिस्थती आहे. मागील जुन, जुलै महिण्यात प्रचंड मोठ्या प्रमाणत चोऱ्या पकडल्या गेल्या त्या नंतर ४ महिण्यात काहीच नाही या चार महिण्यात चोऱ्या होत नव्हत्या का? असा प्रश्न उभा राहतो. परंतु महसूली बैठक आयोजित करण्यात आली म्हणून ४ ते ५ दिवसापूर्वी जकात चोरी पकडली म्हणून वृत्तपत्रात आले. याचा अर्थ ज्या वेळेस सभा असेल त्यात प्रशासनाला जाब विचारण्याची परिस्थिती निर्माण्सा होते तेंव्हा प्रशासन तश्या प्रकारची परिस्थिती निर्माण करते परंतु जाब विचारायचा नाही. तर काम करायचे नाही का असा प्रश्न येतो. जकात वसुलीचा दररोज अहवाल येतो. एक बातमी अशी आलेली आहे की, रमजान मध्ये ४ कोटीची पेंडखजूर या शहरात आलेली आहे. ४ कोटीची पेंडखजूर येत असेल तर जकात का लागला नाही. मिना बाजारामध्ये दोन कोटी रुपयाची कपड्याची उलाढाल झाली. रमजान मध्ये एवढी देवाणघेवाण होते तर दिवाळीच्या वेळेस किती उलाढाल होत असेल किती कपडा आला असेल, किती जकात आली आहेत याचा सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. जी वसुली होत आहे ती दररोज सारख्या प्रमाणात वसुली आली असे दाखविण्यात येत आहे. अनेक सण होऊन गेले. परंतु कुठेही २२ लक्ष २३ लक्ष वसुली आलेली दाखविण्यात आलेली नाही अशावेळी काही दिवशी १० ते ११ लक्ष आली तरी चालेल परंतु तसे दिसून येत नाही. याचा अर्थ हे सर्व मॅनेज केले जाते. आजची वसुली उद्याच्या वसुलीमध्ये दाखवली जाते. त्या दिवशी जास्त आली त्यातील दुसऱ्या दिवशीमध्ये दाखवली जाते. आजचा रेशो बघितला तर १५ ते १६ लक्ष हा कायमचा आहेतच. कमी कमी वसुली झाली तरी जास्त दाखविली जाती. अशी परिस्थित जकात विभागात निर्माण झालेली आहे. याची दखल घेण्याची आवश्यकता आहे. नोव्हेंबर डिसेंबर महिण्यात जकात का कमी वसुली झाली याचे कारण आयुक्त येथे नव्हते व जाब विचारण्यासाठी कुणी नव्हते म्हणून जकात वसुली कमी झालेली आहे. गेल्या ५ वर्षाची वसुली या महिण्यातील बघितली चांगल्या प्रकारे झालेली आहे. सप्टेंबर महिना हा कमी वसुलीचा असतो त्या महिण्यामध्ये सुध्दा १३% जास्त वसुली झालेली आहे. म्हणून सभागृहाच्या वतीने विनंती करेन की, या दोन महिण्यात का वसुली कमी झालेली आहे. करारपत्र प्रलंबित का आहे. कंपन्यांना डिमांड का देण्यात येत नाही या सर्व बाबीचा सविस्तर अभ्यास करण्याची गरज असून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. व या सर्व बाबींचा खुलासा होणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात कोणत्याही प्रकारची रिवाईज बजेट न करता ठरवून दिलेले ६२ कोटीचे उद्दिष्ट पूर्ण होणे गरजेचे आहे. एकूण बजेटच्या ४८% वसुली हि जकातीच्या माध्यमातून होणार असून खऱ्या अर्थाने शहराचा विकास हा याच कराच्या पैशातून होणार आहे. मी ज्या सूचना मांडल्या त्याची प्रशासनाने योग्य प्रकारे नोंद घेवून कार्यवाही करावी. मी कुण्याही अधिकाऱ्यांवर आरोप करीत नाही. परंतु जकात विभागाची जी यंत्रणा आहे त्याबद्दल माझा आरोप आहे. ५४ कर्मचारी

कमी करून यंत्रणा सुधारण्याचा प्रयत्न ते करतात हा त्यामागचा भाग आहे. इतर अधिकारी कर्मचाऱ्यांची मागणी करतात जकात अधिक्षक यांनी कमी का केले याची सुध्दा चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

श्री. तकी हसन खॉन : रमजानचा महिना हा ऑक्टोंबर होता त्यासाठी लागणारे साहित्य, सामान हे अगोदरच लागते. या महिण्याच्या अगोदर जी वसुली झालेली आहे ती ५.१९ कोटी आहे. जे की, १ कोटी जास्त आलेली आहे. येणारी पेंडखजूर, कपडा यावर जकात आकारणी केलेली आहे. जेणे करून १ कोटी रुपये जास्त आलेली आहे. सरासरी ४ ते ४.५० कोटीचे वसुली दर महिण्याची होते. जी जकात कमी आली ती नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये आलेली आहे. रमजान महिण्यात कमी आलेली नाही. आरोप करणे बरोबर नाही. राहिला प्रश्न उद्दिष्टांचा ६१ कोटीचे उद्दिष्ट होते ६२ कोटी करण्यात आले. रिवाईज बजेट मध्ये ३ ते ४ कोटी कमी होऊ शकेल. तरी सुध्दा गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी जकातीची वसुली हि ९ कोटीने जास्त राहिल असे वाटते.

श्री. संजय शिरसाट : आताच सर्व च नगरसेवकांनी जकात अधिक्षक यांची तारीफ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जकातीमध्ये कशामुळे वाढ झाली याबद्दल त्यांनी माहिती दिलेली आहे. नैसर्गिक वाढ हि १०% झालीच पाहिजे असे सभागृहाचे मत आहे. ९ महिण्याच्या काळात जकात चोरी प्रकरणात ७५ लक्ष वसूल केलेले आहे. जकात कमी येते तेंव्हा धाडी टाकण्याला सुरुवात होते व चोरी पकडली म्हणून वृत्तपत्रात सुध्दा येते. माझ्या माहितीप्रमाणे जकात अधिक्षक यांना कोणत्याही नगरसेवकांचा त्रास नाही. असेल तर त्यांनी या सर्वोच्च सभागृहात तसे सांगावे एखादा नगरसेवक नाक्यावर गेल्या नंतर त्यांनी पैसे घेतले कि काय अशी धारणा प्रशासनाची होते. या शहरामध्ये एक्सपोर्टची काही दुकाने आहे कोणताही एक्सपोर्ट दुकान मालक जकात भरीत नाही. नसता जकात अधिक्षक यांनी ४ दुकानाची नांवे सभागृहाला सांगावी. सोनी कंपीचा कॅमेरा २७ हजार रुपये किंमत आहे. हँडपीस कास्ट ५ हजारापासून ते ३५ हजार रुपयापर्यंत आहे. यातून जकात वसूल केलेली असेल तर तसे त्यांनी खुलासा करावा. अस्थापनेवरील ५४ कर्मचारी कमी केले यापूर्वी सदर कर्मचारी १० वर्षापासून त्या विभागात कशासाठी ठेवले होते. जकात अधिक्षक हे बऱ्याच दिवसापासून त्या विभागात काम करतात. या विभागात एवढा मोठा गलथान कारभार होता हे जकात अधिक्षक स्वत: दाखवून देत आहे. प्रशासनाच्या चुकीमुळे सदर कर्मचारी आवश्यकता नसतांना तेथे काम करीत होते. हे सुध्दा जनतेला दाखविण्याची आवश्यकता आहे. यात सभागृहाचा काही दोष नाही. व प्रशासनाने सुध्दा कबूल करावे की, आमच्या चुकीमुळे सदरचे ५४ जास्त कर्मचारी हे जकात विभागात काम करीत होते व प्रशासनाच्या चुकीमुळे उद्दिष्ट पार करीत नाही असे सुध्दा जनतेला प्रशासनाने कळवावे. आताच स. सदस्य यांनी सूचना केली की, जकात वसुलीचा एक ठराविक आकडा दाखविला जातो सर्व मॅनेज केले जाते कधीतरी कमी जास्त जकात येत असेल परंतु तसेच दाखविले जात नाही मी सभागृहनेता असतांना दररोजचे रिपोर्ट वसुलीचे येत असे. जकात वसुली कमी आली की, भूकंप झाला, दुसऱ्यांदा कमी आली की, जागतिक मंदिमुळे जकात कमी आली अशी कारणे दाखवली जात असे. या वर्षी काही

अडचण येत नसंताना कुठेही भूकंप नसतांना, जागतिक मंदि नसतांना दररोजची आकडेवारी बरोबर जे की, सारखीच दाखविण्यात येत आहे. इतर महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात जकातीमध्ये वाढ झालेली आहे. मुंबई महापालिकेची ५४० कोटी जकात वसुली आहे. मागच्या वेळी महापौर नाक्यावर गेले होते. ओपन डिलेव्हरी करण्याच्या सूचना दिल्या, परंतु कर्मचारी नाही म्हणून शक्य नाही असे सांगण्यात आले. ओपन डिलेव्हरी केल्यास व्यापाऱ्यांना त्रास होण्या अगोदर अधिकाऱ्यांनाच त्रास होतो असे माझे मत आहे. एकिकडे कर्मचारी कमी करायचे व दुसरीकडे मॅनपॉवर नाही म्हणून सांगायचे हे कितपत बरोबर आहे. याचा अर्थ जकातीमध्ये मोठ्या प्रमाणात चोरी होते. चोरी होत नाही असे कुणीही ठामपणे सांगू शकत नाही. शिवाजीनगर नाक्यावर एक कर्मचारी असतो वाटेल तेंव्हा गाडी मध्ये येते. वाटेल तेंव्हा बाहेर जाते कुणीही लक्ष देत नाही. जालन्याचा काही माल शहरात उतरविला जातो. सदर नाक्यावरील कर्मचारी २०/- रुपये घेऊन गाड्या येऊ देतात. करारनाम्यानुसार कार्यवाही केली जात नाही. एखादे तरी उदाहरण द्यावे. जकात अधिक्षक जरी चांगले काम करीत असेल तर इतर कर्मचाऱ्यांनी सुध्दा केले पाहिजे. इतर कर्मचारी / अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करतात का? जकातीमध्ये २०% चोरी आहेतच नोव्हेंबर, डिसेंबर महिण्यात या शहरात माल आलाच नाही असे म्हणणे चुकीचे होईल. बऱ्याच गाड्यामध्ये लहान आकाराच्या मौल्यवान वस्तू येत असतील. अशा चोऱ्या पकडण्यासाठी गाडी, मोबाईल, तसेच इतर काही यंत्रणा आवश्यक असेल व त्यासाठी ५ लक्ष रुपये खर्च येत असेल व मोठ्या प्रमाणात जकात चोरी थांबत असेल तर आजच या सभागृहासमोर तसा खुलासा करावा.

डॉ. भागवत कराड : ५०% उत्पन्न महानगरपालिकेस जकातीच्या माध्यमातून मिळते. जकात वेळीच वसूल केली तर उत्पन्न आहे. चोरी एकदा झाली की, पुन्हा ती रक्कम महापालिकेस मिळत नाही. तसे मालमत्ता कर पाणीपट्टीचे नाही कर कुणी भरला नाही तर पुढील वर्षी वसूल करू शकतो. तसे जकातीचे नाही. या वर्षीची वसुली ही समाधान कारक वाटते. तरी सुध्दा जकातीमध्ये चोरी होत नाही असे म्हणता येणार नाही २५% ते ३०% अजूनही चोरी होत आहे. आताच स. सदस्य श्री. देसरडा यांनी सूचना केली. व्यापाऱ्यांना ट्रक गाडी सेंट्रल नाक्याकडे ने आण करतांना त्रास होतो व जकात चोरी होण्याची सुध्दा शक्यता सांगता येत नाही. मी महापौर असतांना जाधववाडी भागात या गाड्या थांबण्यासाठी जागेची पाहणी केली होती. परंतु संबंधित ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सदर जागा कमी पडेल अशी सूचना केली. त्या पुढे काही कार्यवाही नाही. आपण आणखी अडीच वर्ष महापौर आहात ट्रक टर्मीनल कुठे शहराबाहेबर काढता आले तर जकात नक्कीच १५ ते २०% नी वाढेल. पंढरपुर भागात मी स्वत: ७० एकर जागेची मागणी केली होती. या संदर्भात मी मा. विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांचीही भेट घेतली होती. ती जागा घेता आली तर तेस प्रयत्न करण्यात यावे व सेंट्रल नाका तेथे शिफ्ट करण्यात येऊन येणाऱ्या ट्रकची तपासणी तेथे केल्यास नक्कीच जकातीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल असे माझे मत आहे. आपण जकातीची ओपन डिलेव्हरी व्हावी म्हणून

आदेश केलेले होते. तो आदेश जकात अधिक्षक यांनी पाळला नाही. सर्व ट्रक गाड्याची तपासणी करणे शक्य नसेल. परंतु दिवसभरामध्ये किमान ५ ते ७ किंवा ८ ट्रक गाड्यांची प्रशासनाला वाटेल त्याप्रमाणे गाड्याची तपासणी करण्याची गरज आहे. कारण बाहेरून वेगळा माल दाखविला जातो व गाडीमध्ये वेगळाच माल असतो अशी शंका आहे. आताच स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे मोबाईल तसेच सिमकार्ड वर जकात लावण्याची आज गरज आहे. मोठमोठ्या कंपन्या आहेत त्यांनी या शहरात किती सिमकार्ड दिले आहे त्यानुसार जकातीचे बिल तयार करून पाठवण्यात येऊन जकात वसूल करण्यात यावी. तसेच वाळुज भागात काही व्यापाऱ्यांची मोठमोठी गोडाऊन आहेत. तेथे माल उतरविला जातो. त्यानंतर शहरात आणला जातो. अशा गोडाऊनची व त्या गाड्याची तापासणी करण्याची गरज आहे. जकातीमध्ये वाढ होऊ शकेल. काही लहान वस्तू जसे सोने, चांदी, संगणक आणले जातात. त्यांची जकात भरीत नाही. याची चौकशी करण्यासाठी शहरात अशा सोने, चांदीच्या किती दुकाने आहेत. व्यापारी माध्यमातून त्या दुकानदाराने किती सेलटॅक्स केला त्यावर काही जकात आकारणी करता येईल का यावर निर्णय घेण्याची गरज आहे. एम.एस.ई.बी. चे महापालिकेकडे १३० कोटीचा बोजा आहे. या संबंधी सभागृहात वारंवार चर्चा होते. शहरात येणारी वर्षभराच्या विजेवर जकात आकारणी करण्यात येत असल्याचे पत्र एम.एस.ई.बी. ला देऊन टाकावे. १%, २% काय जे आकारणी करायची ती कारावी व महापालिकेकडे असलेल्या थकबाकीमधून हे बिल वजा करून कार्यवाही करता येईल. या बाबतीत राज्य शासन किंवा केंद्रशासन काय जो निर्णय घ्यायचा तो घेतील. जकात वसुलीचे ॲव्हरेज घेतले तर दर वर्षी ४.५० कोटी ते ५ कोटीपर्यंत वाढ दरवर्षी झालेली आहे. चांगल्या प्रकारे वसुली झालेली आहे. टारगेट जकात अधिक्षक पूर्ण करतील तसे आश्वासन त्यांनी दिलेले आहे. जकात अधिक्षकांच्या काय अडचणी असतील त्या प्रशासनाने सोडवाव्यात. तसेच जकात विभागातील जे कर्मचारी यांना ३ ते ४ वर्षापासून सेवा करीत आहे त्यांच्या त्वरित बदल्या करण्यात याव्यात.

श्री. जयवंत ओक : सन ९७-९८ मध्ये ३८ कोटी म्हणजे ९९% वसुली झाल्याचे दाखविण्यात आलेले आहे. त्यानंतर ४० कोटी, ९९-२००० मध्ये सुध्दा तीच परिस्थिती म्हणजे दर वर्षी ३ ते ४ कोटीने वाढ झालेली आहे. २०००-२००१ मध्ये फक्त १ कोटीने वाढ झालेली आहे. जी आकडेवारी दिली त्यात तफावत येत आहे. जकातीमध्ये ३० ते ३५% चोरी होतेच यात शंक नाही. गेल्या नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये वसुली का झाली नाही हा मुद्दा सुध्दा महत्वाचा आहे. जे टारगेट ६२ कोटीचे दिले ते पूर्ण करणार आहात त्याचा खुलासा व्हावा. खालील बाबींवर जकात आकारली जाते का याचा खुलासा द्यावा. त्यामधील क्र. १ शहरात शासनाचे येणारे मुद्रांक म्हणजे स्टॅम्प पेपर, (२) शहरात येणारे लॉटरीचे तिकिटावर जकात आकारणी होते का? (३) शहरात येणारी पोस्टाची तिकिटे. (४) खालील संस्थेकडून जकात घेतली जाते का? (१) एम.एस.ई.बी. चे शहरात येणारे मटेरियल यावर जकात आकारणी होते का? तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे येणारे यंत्र सामुग्री, तेसच रेल्वेची जी यंत्र सामुग्री येते त्यावर जकात आकारली जाते का. (५)

शासकीय, मुद्रणालयात बाहेरून, येणारी यंत्रसामुग्री, (६) शहरात येणारी पाठ्यपुस्तक तसेच (७) पाट बंधारे विभागाचे बाहेरू येणार सिमेंट आणि स्टिल, तसेच (८) सोने, चांदीवर जकात किती आकारणी होते. सोने चांदीवर आजपर्यंत किती वसुली झाली त्याची माहिती देण्यात यावी. तसेच सिमकार्ड व मोबाईल व मोबाईलवर जकात घेतलेली आहे का त्याचाही खुलासा द्यावा. तसेच डायमंड, राशी खडे यावर जकात घेतलेली आहे का?

श्री. प्रशांत देसरडा : आताच स. सदस्यांनी वेगवेगळ्या सूचना मांडल्या. वस्तुवाईज जकात वसूल केल्यास कोणत्या वस्तुवर किती जकात आकारणी झाली हे दिसून येईल. लिकीजेस होणार नाही. चोरी थांबेल, फटाकेवर, पेंडखजूर व ज्या काही वस्तू येतात त्यावर किती जकात आली ते दिसून येईल. त्यानंतर वर्षाला कोणत्या मालावर किती जकात आली हे दिसून येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : जकातीच्या माध्यमातूनच महानगरपालिकेला खऱ्या अर्थाने उत्पन्न येणारे आहे. या वर्षी चांगल्या प्रकारे जकात वसुली झाली म्हणून जकात अधिक्षक यांचे बऱ्याच स. सदस्यांनी अभिनंदन, प्रशंसा सुध्दा केलेली आहे. जकात अधिक्षक यांनी वसुलीचा ५ वर्षाचा आढावा दिला. ५ वर्षाची परिस्थिती काय होती त्यात सुधारणा काय केल्या. परंतु गेल्या पाच वर्षात किती व्यापार वाढले. उद्योग धंदे वाढले, याचा सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे. ६२ कोटीचे उद्दिष्ट पूर्ण करून देण्याची तयारी अधिकाऱ्यांनी ठेवलेली आहे. म्हणून अडीच ते तीन महिण्याच्या काळात २० कोटीचे वसुली होत असेल तर गेल्या ९ महिण्याच्या काळात हाच रेशो असता तर उद्दिष्टाच्यावर वसुली झाली असती असे माझे मत आहे. प्रशासन दोन तीन महिण्यात घाई केल्याचे दाखवते व उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न आहे असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. वृत्तपत्रात बातम्या येतात अमुक अमुक सोने पकडले. मोंढा भागात अनेक गाड्या ट्रान्सपोर्टच्या उभ्या असतात. एका मालकाच्या जवळपास २० ते ३० गाड्या उभ्या असतात. आतापर्यंत किती गाड्यावर जकात विभागने धाडी टाकलेल्या आहेत. चौकशी केली का? १० गाड्या मागे ५० गाड्या विना जकात शहरात एकाच मालकाच्या येत असतील असे मला सांगायचे आहे. मी त्या वॉर्डाचा नगरसेवक आहे मला सर्व माहित असून आपले अधिकारी तेथे फिरतात ते कशासाठी फिरतात त्याची जाणीव नाही. जसे सोने चांदिच्या व्यापाऱ्यांवर धाडी टाकण्याचे काम जकात विभाग करते त्याचप्रमाणे या गाड्यावर धाड टाकण्याचे प्रकारे करावे. जेणे करून जकातीमध्ये उत्पन्न वाढेल व होणारी चोरी बंद होण्यास मदत होईल. ५४ कर्मचारी कमी केले, कमी कर्मचारी वर्ग असतांना वसुली वाढवता, तर जास्त कर्मचारी असतांना यापूर्वी का वसुली वाढलेली नाही. यापूर्वीही जकात अधिक्षक या विभागात काम करीत होते.

श्री. शेख ईसाक शे. जैनोद्दिन : डिसेंबर अखेर ३४ कोटीची वसुली झाली या वर्षी डिसेंबर अखेर ४२.६७ कोटी वसुली झालेली आहे. जे उद्दिष्ट दिले जाते ते यापूवीर्ध् रिवाईज करण्यात येऊन उद्दिष्ट दिलेले आहे. परंतु या वर्षीचे उद्दिष्ट रिवाईज केलेले नाही. मागील वर्षी ६१ कोटीचे उद्दिष्ट दिले ते रिवाईज झ ाालेले नाही. असे असतांना सुध्दा झालेली वसुली ही चांगल्या प्रकारे आहेत. म्हणून जे अधिकारी चांगले काम करतात त्यांचे मागे या सभागृहाने राहावे त्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करावे. त्यांना पाठींबा द्यावा जेणे करून ते

अधिकारी आणखी कसरत करून उत्सुकतेने काम करतील व उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करतील. कर्मचारी कमी करून हि त्यांनी जी वसुली केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांचे वर जे आरोप केले जात आहे ते बरोबर नाही. आताच स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सिमकार्डवर जकात आकारणी करावी. एका सिमकार्डची किंमत ३००/- रुपये प्रमाणे १२/- एका सिमकार्डवर येतात. या शहरात एकूण १५ हजार सिमकार्ड आहेत. त्या माध्यमातून १.८० लक्ष वसूल करण्यात यावे. तसेच बीएसएनएल चे मोबाईल इन्स्टुमेंट देणार आहे त्या इन्स्टुमेंटची किंमती १५ हजार रुपये आहे. ४% प्रमाणे ३० लक्ष रुपये वसूल करू शकता याची खबरदारी घ्यांवी. उत्पन्न वाढेल.

श्री. राजु शिंदे : एका अंडेवर किती जकात आकारली जाते तसेच पेट्रोल व डिझेलवर किती जकात आकारली जाते. त्याचा खुलासा करावा.

जकात अधिक्षक : पेट्रोल व डिझेलवर १% जकात आकारले तसेच एका नगास अंडेवर एक पैस जकात आकारली जाते.

श्री. सुदाम सोनवणे : सुरुवातीस एका लहानशा विषयावर जवळपास अडीच तास चर्चा झालेली आहे. व्याज माफ केल्यास महापालिकेचे मोठे नुकसान होईल असे काही स. सदस्यांनी दाखवले आहे. वृत्तपत्रात एक फोटो या सभागृहाचा आलेला असून चार ते पाच सदस्य सभागृहात बसलेले दिसते. त्या फोटोच्या खाली दिले की, महापालिकेची वसुलीवर सभा चालू आहे. या सभागृहात विचारवंत सदस्य असतात त्या फोटोतून नागरिकांनी काय अर्थ काढला असेल ते आपण समजून घ्यावे. महापालिकेच्या हिताचे प्रश्न येथे मांडले जातात. काल त्याच वेळी टॉवर्स बाबत चर्चा चालू होती. काही सदस्यांनी य बाबतीत सभात्याग केला. त्याच विषयावर आज पुन्हा चर्चा होईल असे अपेक्षित होते. परंतु तसे काही झालेले नाही. या सभागृहात जातीवाद कसा वाढेल या दृष्टीने चर्चा केली जाते. अमुक अधिकारी मुस्लीम आहे त्यांची तरिफ कशी करायची. हिंदुच्या सदस्यांनी विरोध कसा करायचा हि परंपरा या सभागृहात चालू झालेली आहे. जकात अधिक्षक हे मुस्लीम आहे म्हणून त्यांचे अभिनंदन केले नाही, तर त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले म्हणून एका हिंदुच्या कट्टर शिसेना सदस्यांनी त्यांचे अभिनंदन अगोदर केले. हिंदुचा अधिकारी असते तरी सुध्दा अभिनंदन केले असते. जात बघून अभिनंदन केलेले नाही. ईद / दिवाळी मध्ये किती माल शहरात आला असे एक दुसऱ्यांला विरोध करण्यासारखे प्रश्न उपस्थित होत आहे. परंतु सभागृहाने हे समजून घेतले पाहिजे की, कोणताही व्यक्ती नागरिक कोणाच्याही दुकानमध्ये जाऊन माल खरेदी करतो. त्या ठिकाणी दुकानदाराची जात बघून खरेदी करतो त्या ठिकाणी दुकानदाराची जात बघून खरेदी होत नाही. जकात हा महानगरपालिकेचा कणा आहे. जकात कशी वाढले या दृष्टीकोनातून चर्चा या सभागृहात झाली पाहिजे. म्हणून सभा चालू असतांना प्रत्रकारांना विनंती करेन की, फोटो बरोबर छपाई करावे. परंतु स. सदस्यांची त्यात बदनामी झाली नाही पाहिजे. याची सुध्दा काळजी घेतली पाहिजे. शहरात २५ ते २६ टॉवर्स आहेत. इलिगल जे असतील त्यांचेकडून २५ हजार रुपये भरून घेऊन लिगल करण्याची कार्यवाही व्हावी. उत्पन्न मिळेल. आताच सिमकार्डचा प्रश्न उपस्थित झाला. शहरात १५ हजार

सिमकार्ड आहे. त्यावर जकात लागल्यास ७५ लक्ष रुपये मिळतील ज्यांचा मोबाईल त्याच कंपनीकडून हँडपीस खरेदी करावा लागणार आहे. एका मोबाईलची किंमत १५ हजार रुपये आहे. यावर ३ ते ४% जकात आकारली तर ३० लक्ष रुपये मिळू शकतील. ही येणारी प्रोव्हीजन आहे. उपाययोजना करून ठेवावी. टॉवर्सच्या बाबतीती बघितले तर एअरटेल या कंपनीने महापालिकेकडे परवानगी सुध्दा मागितलेली नाही. पेजरची सुध्दा कंपनी या शहरात आहे. ९५-९६ मध्ये आलेली आहे. त्यांचे सुध्दा १ टॉवर्स शहरात आले साधा अर्ज सुध्दा परवानगीसाठी या कंपनीने महापालिकेकडे केलेला नाही. पुढील उपाययोजना म्हणून काही सुधारणा करता आली तर नक्कीच जकातीचे उत्पन्न वाढेल अशी शाश्वती आहे.

मालमत्ताचे उद्दिष्ट २० कोटीचे होते वसुली फक्त ६ कोटी झालेली आहे. माझा एक प्रश्न होता. या शहरात शादीखाने, मंगलकार्यालय किती व कोणत्या शादीखाने व मंगल कार्यालये यांना किती व कोणत्या दराने कर आकारला जातो. निवासी की, व्यावसायीक, ४९ शादीखाने व मंगल कार्यालये आहे अशी माहिती दिली आहे. परंतु हे चुकीचे असून या शहरात ७६ शादीखाने व मंगल कार्यालये आहेत अशी माहिती आहे. याचा अर्थ आणखी २८ ची नोंद प्रशासनाकडे नाहीत. जे आहेत त्यातून मालमत्ता कर हा १.८२ कोटी वर्षाला मिळतो असे दिले आहे. ४९ मालमत्तेवर एवढा मोठा कर मिळतो तर या शहरात १.२५ लक्ष मालमत्ता आहे तर फक्त २० कोटीचे उद्दिष्ट कसे ठेवता यापेक्षा ही मालमत्ता कर जास्त मिळावयास पाहिजे. म्हणून जी चुकीची माहिती दिली जाते यात सुध्दा सुधारणा करणे गरजेचे आहे. दुसरा एक प्रश्न असा होता की, सन २०००-२००१ या काळात किती परवानगी दिलेल्या आहेत. तसेच भोगवटा प्रमाणपत्र किती लोकांना दिले असा प्रश्न होता त्याचे उत्तर मिळाले की, या वर्षात एकूण ८६२ प्रकरणे दाखल झालेली होती. त्यापैकी ५३९ प्रकरणे निकाली काढली. भोगवटा प्रमाणपत्रासाठी २०५ लोकांची पकरणे होती. त्यापैकी ९८ प्रकरणे निकाली काढली. याचे प्रमाण बघितले तर याच वर्षात ६०० ते ६५० लोकांची प्रकरणे आणखी प्रलंबित आहे. एवढी मोठी तफावत जाणवते की, त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढण्यास बाधा येत आहे. यास कारणीभूत नगरसेवक नसून अधिकारीच आहे. म्हणून याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.

श्री. जयवंत ओक : मी जे १० मुद्दे उपस्थित केले त्यावर जकात आकारणी होते किंवा कसे खुलासा द्यावा.

जकात अधिक्षक : शासनामार्फत आयात होणारे बाँड यावर जकात घेतली जात नाही. तसेच तिकिट, लॉटरी तिकिटे तसेच स्टेशनरी याला जकात माफ आहे. आणि एम.एस.ई.बी. यांचे येणाऱ्या मालावर जकात आकारली जाते. लॉटरीच्या तिकिटावर सुटच दिलेली आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : लॉटरी तिकिटावर जकात आकारू शकतो.

जकात अधिक्षक : जकात आकारणी करू शकतो परंतु तसा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

श्री. जयवंत ओक : नियमात असतांना या १० वस्तुवर जकात आकारणी का केली जात नाही. ठराव करावा नंतर मंजुरी होणार त्यात उशीर होऊ शकेल. या सर्व

वस्तुवर जकात आकारली तर ४ कोटी रुपये महापालिकेस येऊ शकतील तसेच सोने, चांदीवर किती जकात आकाली जाते. त्याचाही खुलासा करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : काही विभाग प्रमुख सभगृहात उपस्थित नाही. महापौरांची परवानगी घेऊन गेलेले आहेत का.

प्र. आयुक्त (उपआयुक्त) (म.) विभाग प्रमुख उपस्थित नाही. कोणत्या कामासाठी गेलेले आहे याबद्दलची माहिती घेऊन सांगण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : न सांगता अधिकारी सभागृहाबाहेर जात असतील तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : अभ्यासपूर्वक स. सदस्यांनी आप-आपले मत व्यक्त केलेले असून या चर्चेच्या माध्यमातून आपण रुलींग देणार आहात. परंतु मा. महापौरांनी दिलेले रुलींग याची अंमलबजावणी करून सर्वच त्या-त्या अधिकाऱ्यांनी त्यानुसार कामे करावी व उद्दिष्ट कसे पूर्ण करता येईल याकडे लक्ष द्यावे. उद्दिष्टाच्या ६९% वसुली आजपर्यंत केलेली आहे. जकात कशी वाढेल यासाठी सर्वांनी आप-आपले मत मांडलेले आहे. सिमकार्ड तसेच मोबाईल हँडसेट आहे यावर सुध्दा जकात आकारणी करावी. ५४ कर्मचारी कमी करून जी वसुली केली ती थोड्याफार प्रमाणात समाधान कारक आहे. असे म्हणता येईल. जे उद्दिष्ट दिले ते पूर्ण करण्यासाठी हे ५४ कर्मचारी पुन्हा लागत असतील तर त्यांनी तसे सभागृहात सांगावे. कुठल्याही परिस्थितीत उद्दिष्ट पूर्ण झाले पाहिजे असे सभागृहाचे मत आहे. त्यासाठी अनेक स. सदस्यांनी मत मांडल्यानुसार सर्वच सदस्यांचा आपल्याला पाठिंबा राहिल. दारूचे जे गोडाऊन आहेत तेथे एक कर्मचारी ठेवून जकात वसूल करण्यात यावा. शहरात असे काही व्यवसाय आहे की, प्रॉफिटमध्ये व्यवसाय करतात. जकात जो लागला जाता तो जास्त आहे. उदा. द्यावयाचे झाल्यास संगणक, बि. बियाणे रासायनिक खते, टायर्स, सिमेंटचे गोडाऊन शहराबाहेर आहे. ते व्यापारी येण्यास तयार असतील तर या मालावर जकात कमी प्रमाणात लाऊन वसूल करण्यास वसूल करण्यात यावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. मला मिळालेल्या माहितीनुसार या शहरात गेल्या ३ तारखेला १.५० कोटी रुपयाची दारू आलेली आहे. यावर जकात आकारला गेला की, नाही याचा खुलासा करावा. जी जागतिक मंदि होती ती कमी झालेली असून सर्वच महापालिकेत जकातीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात या वर्षी झालेले आहे. जकात अधिक्षक यांनी चांगल्याप्रकारे वसुली केलेली आहे. अभिनंदन करण्यास हरकत नाही. परंतु जर त्यांनी टारगेट पूर्ण केले तर त्यांना एक वेतनवाढ सुध्दा देण्यात यावी या सभागृहाची कुणाचीही हरकत राणार नाही.

श्री. मीर हिदायत अली : टॉवर्सच्या बाबतीत मी कालही चर्चा केलेली होती. हा महत्वाचा मुद्दा आहे. योग्य तो निर्णय घेण्यात यावा. या शहरात एकूण ३८ टॉवर्स आहेत. आपण योग्य निर्णय घेतला नाही तर जसे पार्कींग बाबत न्यायालयाने निर्णय दिला त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे माझे प्रयत्न राहिले. २० पट रक्कम वसूल केल्यास एक टॉवर्सचे ५ लक्ष रुपये वसूल होतील. ६५ कोटी रुपये मिळतील योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : शहरातील अनधिकृत उभे असलेले टॉवर्स तात्काळ काढण्यात यावे.

मा. महापौर : प्रशासनातर्फे प्र. आयुक्त मत मांडीत आहे.

प्र. मा. आयुक्त : महापालिकेचा अर्थसंकल्प व त्या तुलनेत झालेली वसुली या बाबतीत गेल्या दोन दिवसापासून सभागृह आढावा घेत आहेत. तुलनात्मक दृष्ट्या मागील वर्षाची केलेली वसुली, त्यानुसार दिलेले उद्दिष्ट, त्यास अनुलक्षून आपण केलेला अर्थसंकल्प या सर्व बाबी एकत्रित पाहिल्या तर तुलनात्मक दृष्ट्या वसुली हि कमीच झालेली आहे. या शहरातील जनतेची कर भरण्याची प्रवृत्त ती वर्षाच्या शेवटीच असल्याने नोव्हेंबर, डिसेंबर पासून जी देणी लोकांची असते ते भरण्याचा कल त्यांचा असतो. उदा. टेलिफोन बिल, विजेचे बिल आल्या नंतरच भरणा केले जाते. त्याप्रमाणे पाणीपट्टी तसेच मालमत्ता कराचे सुध्दा आहे. आपले कर्मचारी घरी जाण्याची अपेक्षा नागरिक धरतात व त्यानंतर बिल भरू अशी अपेक्षा करतात. जेवढ्या काही डिमांड होत्या त्या मालमत्ता धारकास ऑगस्ट अखेरच इश्युव केलेल्या आहे. ज्या डिमांड बाबत तक्रारी, संभ्रम, त्रुटी होत्या अशा ७ ते ८% डिमांड्स पाठविलेल्या नाहीत. तुलनात्मक दृष्ट्या मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये ४४ लक्षनी मागे आहेत. परंतु पाणीपट्टी वसुलीत ७२ लक्षांनी पुढे आहेत. वसुलीची टक्केवारी इतर महापालिकेच्या तुलनेत केल्यास कल्याण महापालिकेची ६% वसुली आहे. अमरावती महापालिकेची ०.०३%, नाशिक महा ालिकेची १६% तर औरंगाबाद महापालिकेची ३१% वसुली आहे. तुलनात्मक दृष्ट्या वसुली कमी झालेली असून त्यास काही कारणे आहेत. त्याचा उहापोह या सभगृहात होणे आवश्यक आहे. मला माझे मत प्रशासनातर्फे मांडू दिले त्या बद्दल ऋणी आहे. त्यांनी वसुलीच्या संदर्भात सभा बोलविली त्याबद्दल मी त्यांचा सुध्दा अभारी आहे. वसुली कमी होण्याची कारणे काय याचा अभ्यास प्रशासन करीत आहे. त्यास काही स्थायी अशी कारणे आहेत. त्यातील पहिले जे कारण आहे. जी कर्मचारी वर्ग आहे तो अपुरा आहे. आणि तो शिकाऊ आहेत. उदा. तीन झोन अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत जे सिनीयर स्वच्छता निरिक्षक आहे. त्यांचेकडून काम करून घेतले जाते. एका झोनमध्ये अधिकारी नाही. त्यांचे अधिनस्त दिलेला जो कर्मचारी वर्ग आहे. केवळ २२ कर्मचाऱ्यांकडून १.२५ लक्ष मालमत्ता व १ लक्ष नळ धारकाकडून वसुली करण्याचे काम करून घेतो. एका कर्मचाऱ्यांना किती मालमत्ता कर व पाणीपट्टी नळ धारकांची वसुलीसाठी द्यावयाचे याचा रेश्युव काढला तर एकूण ४५ कर्मचारी वसुलीसाठी लागतात. म्हणून यासाठी तेवढे इन्स्पेक्टर आहे का, नाही प्रमोशन दिले तरी खालच्या वर्गातील ने कर्मचारी आहेत ते पात्रता पूर्ण करीत नाही. सध्या २२ लोकांचे काम ११ लोकांकडून करून घेण्यात येत आहे. १९८२ च्या स्टॉफिंग पॅटर्ननुसार २२ कर्मचारी आवश्यक झोन साठी आहे. आज ११ कर्मचारी काम करतात. वसुली करण्यासाठी व उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी जे आवेक्षक पदावर कर्मचारी आहेत त्यांना वसुलीचे काम दिले तसेच ३५० लिपीकांच्या वसुलीसाठी ऑर्डर काढलेल्या आहेत. जे उद्दिष्ट दिले आहे ते पूर्ण करण्याचे प्रयत्न राहील. दुसरे असे प्रासंगिक प्रकारची कारणे आहेत. नोव्हेंबर व ऑक्टोंबर या महिण्यात दोन महत्वाचे सण आलेले

आहे. त्यामुळे वसुली कराची कमी झालेली आहे. तसेच शासनाने संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभियान सुरू केल्यामुळे त्यामुळे जवळपास ३१ दिवस गेलेले आहे. तसेच मागील एका सभेत व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला. त्यांची अंमलबजावणी होण्याअधीच वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या. त्यामुळे जे कर भरण्यात येत असे ते व्याज देण्यास इच्छुक नव्हते व करही भरीत नव्हते. जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यामुळे वसुलीवर परिणाम झालेला आहे. तसेच शासकीय कार्यालयाकडून २.५० कोटी रुपये येणे बाकी आहे. त्या त्या कार्यालयास बजेट प्राप्त न झाल्यामुळे वसुलीची थकबाकी आहे. एम.एस.ई.बी. तसेच टेलीफोन विभागा व्यतिरिक्त इतर विभागाची थकीत रक्कम भरण्यात समाजामध्ये व त्याच बरोबर प्रशासनामध्ये एक प्रकारचे वातावरण असते. बघण्याचा दृष्टीकोन असतो, तो नकारात्मक आहे. अनेक वेळा झोनमध्ये बैठका घेतल्या परंतु एका वेळेस कर्मचारी गेल्यानंतर वसुली कधीच झालेली दिसून येत नाही. एकूण ३५ कोटीची थकबाकी मालमत्ता कर व पाणीपट्टीची आहे. ही थकबाकी होण्याचे मुळात कारण हे आहे की, महापालिका ही नगरपालिकाच आहे असा बघण्याचा दृष्टीकोन लोकांचा आहे. मा. आयुक्तांना पुरेसा स्टाफची मागणी केलेली आहे ती पूर्ण होईलच परंतु सभागृहाला सुध्दा प्रशासन विनंती करते की, वॉर्डावॉर्डातून सर्वच जनतेला कर भरण्यासाठी स. सदस्यांनी उत्सुकता निर्माण करावी जेणे करून निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल.

श्री. सुदाम सोनवणे : आताच सभागृहात प्र. आयुक्त यांनी खुलासा केला. कर भरण्याची लोकांची प्रवृत्ती नाही हेच उदाहरण आताच काही स. सदस्यांनी दिलेले आहे. झोन क्र. २ मध्ये एक व्यक्ती कर भरण्यासाठी आलेले होते. त्यांचेकडे २० हजार रुपये बाकी होते. कर भरून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनी व्याजासह २४०००/- रुपये सांगितल्यानंतर सदर करधारक पैसे भरण्यास तयार होईना व्याज माफ झाले वृत्तपत्रात आले म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला. म्हणून जो कर तो व्यक्ती भरणार होते ते सुध्दा आलेला नाही. म्हणून व्याज माफ करण्याची मागणी स. सदस्यांनी केलेली होती.

श्री. मीर हिदायत अली : टॉवर्सच्या बाबतीत योगय तो निर्णय घेण्यात यावा नसता मी न्यायालयात याबाबतीत जाणार आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : दोन दिवसापासून सभा चालू आहे. स. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले असून प्रशासनाने सुध्दा त्यांची बाजू मांडलेली आहे. या सविस्तर चर्चेनुसार आपण योग्य तो निर्णय घेऊन प्रशासनाने सुध्दा झालेल्या निर्णयाची त्वरित अमंलबजावणी करावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करेन

मा. महापौर : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून आजची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदरील सभेसाठी वसुली बाबत चर्चा होऊन माहिती नुसार ठरवून दिलेल्या उद्दिष्टाच्या तुलनेत फक्त ३१% व मालमत्ता कर वसूल करण्यात आलेला आहे. आणि सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी १००% उद्दिष्ट पूर्ण करण्याची खात्री दिलेली आहे. परंतु या आर्थिक वर्षाचे १० महिने संपलेले असतांना फक्त ३१% च वसुली होऊ शकते राहिलेले ६९% दोन महिण्यात कसे वसूल करणार याची माहिती मिळणे गरजेचे आहे. मार्च २००३ अखेर पर्यंत ७०% पर्यंत री वसुली होणे

गरजेचे होते. परंतु तसे न होता ७०% वसुली बाकी आहे. मी विभागीय अधिकारी यांना आदेश देतो की, त्यांनी आहे शक्यतो त्यांचेकडे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनच वसुलीचे काम करून घ्यावे व उद्दिष्ट पूर्ण करावे. कर्मचारी आवश्यक असेल तर तसे प्रशासनास कळवावे अन्यथा उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या झोन अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करावी. असे मी आदेश देत आहे. सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शहरातील ठरावीक हॉटेल्स किंवा दुकाने यांनाच अन्न भेसळ परवाना देण्यात येतो. परंतु शहरातील खाद्य पदार्थाच्या गाड्या, पानटपऱ्या, आईस्क्रिम पार्लर, इ. ना योग्य ते शुल्क आकारून परवाना देण्यात यावा जेणे करून उत्पन्न वाढेल. या संदर्भात बऱ्याच व्यावसायिकांनी माझ्याशी प्रत्यक्ष येऊन चर्चा केलेली आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्याचे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिलेले आहे त्यानुसार उद्दिष्ट पूर्ण करावे.

जकात वसुली जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांना जकात नाक्यावर ओपन डिलेव्हरी करण्याचे आदेश दिलेले होते परंतु त्याची कार्यवाही झालेली नाही. मुंबई नाक्यावर मालाची ओपन डिलेव्हरी करण्यासाठी एक गोडाऊन बांधण्यात यावे. जोपर्यंत गोडाऊन होत नाही तोपर्यंत मध्यवर्ती नाक्यावर अचानकपणे आठवड्यातून १ ते २ वेळेत ओपन डिलेव्हरी करावी. यासाठी धडक कृतीदल स्थापन करण्यात येत असून त्याचे नियंत्रक म्हणून मुख्यलेखाधिकारी यांची निवड करण्यात येत आहे. शहरात वर्षभरात आयात होणाऱ्या मालाची तपासणी करणे गरजेचे आहे. जकातीचे जे उद्दिष्ट ६२ कोटीचे होते आजपर्यंत ४२ कोटी वसूल झाले. आणखी २० कोटी येणे आहे. उद्दिष्टपूर्ण केले जाईल. असे आताच अधिकाऱ्यांनी आश्वासन दिलेले आहे. नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये ईद दिपावली सण असतांना सुध्दा वसुली का कमी झालेली आहे. यासाठी वर्षभरात आयात होणाऱ्या मालाची प्रशासनाने तपासणी करावी. ओपन डिलेव्हरी दररोज होत नसेल तर आडवड्यातून एकदा किंवा ४ दिवसातून एकदा करण्यात यावी. कर्मचारी वर्ग मी करून वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न होणे हे बरोबर नसून आवश्यक कर्मचारी जकात अधिक्षक यांनी मागवून घ्यावा. व उद्दिष्ट पूर्ण करावे. उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास जकात अधिक्षक यांना जबाबदार धरून त्याचे दोन / तीन वेतनवाढ प्रशासनाने रोखून त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. आरोग्य विभागामार्फत अन्न व भेसळ कायद्यानुसार शहरातील हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री करणारे दुकाने किती आहेत. अनाधिकृत किती याचा सर्व्हे करण्यात यावा. जेणे करून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. जे अधिकृतपणे विक्री करीत असतील त्यांचेवर नियमाने कार्यवाही करण्यात यावी. मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी उपआयुक्त (म) यांनी झोन वाईज वेळोवेळी बैठका घेऊन तशा सूचना झोन अधिकारी यांना द्याव्यात महानगरपालिकेतील विभागीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तहसीलदार संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावी. झोन अधिकारी यांना वसुलीसाठी लागणारा आवश्यक तो कर्मचारी बदलीने प्रशासनाने पुरवावा. प्रशासकीय कामात सुसुत्रता यावी व प्रभावीपणे करता यावी यासाठी सुधारित कर्मचारी आकृतीबंध सादर करण्यात यावा. धडक कृती दल समितीचे कार्य व नावे देण्यात येते. यात

मुख्यलेखाधिकारी यांचे नियंत्रणाखाली लेखाधिकारी, झोन अधिकारी श्री. वाहुन, करनिरिक्षक, श्री. एन.जी. पवार या अधिकारी /कर्मचारी यांनी काम करणे, त्यांचे कामाचे स्वरुप असे राहिल. आयात मालाची आठवड्यातून एक / दोन वेळेस ओपन डिलेव्हरी करणे. औद्योगिक व वसहतीतील कारखान्यातील आयात मालाची तपासणी करणे. वाहतुक कंपन्याचे गोडावून नियमित दैनंदिन तपासणी व सोबत मागील नऊ महिण्याची तपासणी करणे विशेषतः मोबाईल हँडसेट, इलेक्ट्रॉनिक वस्तु, संगणक यांच्या तपासण्या करणे. शहरातील व्यापाऱ्यांचे वर्षभरातील आयातीत मालाची अभिलेखाची तपासणी करणे. जकात वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास जकात अधिक्षक यांचे दोन / तीन वेतनवाढ रोखण्यात येऊन त्यांना जबाबदार धरून निलंबनाची कारवाई करण्यात यावी. शहरातील टॉवर्सची ०८ दिवसांत तपासणी करून त्या संबंधित मालकांना नोटिसा देऊन प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : न्यायालयाच्या आदेशानुसार पार्कीगच्या बाबतीत महानगरपालिकेतर्फे कार्यवाही सुरू आहे कोर्टाचा अवमान करीत नाही माझे मत ऐकून घ्यावे.

मा. उपमहापौर : त्यावर चर्चा करणे योगय नाही न्यायालयाचे आदेश आहे. कोर्टाचा अवमान होईल अशी चर्चा करू नये. आज हि वसुलीची बैठक आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : न्यायालयाचा अवमान होईल अशी चर्चा करणार नाही. जी कार्यवाही चालू आहे त्या संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्याचे आदेश करावेत.

श्री. प्रशांत देसरडा : न्यायालयाचे आदेश काय आहेत सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावे. यापुर्वीचे जे जे आदेश न्यायालयाने दिले त्या सर्व बाबतीत कार्यवाही झालेली आहे का?

श्री. अंबादास दानवे : आजची बैठक हि वसुलीच्या संदर्भात आहे. न्यायालयाने पार्कीगच्या जागेच्या बाबतीत आदेश दिलेले आहे परंतु त्या व्यतिरिक्त अन्य कार्यवाही होत आहे. त्या होऊ नये असे मत सभागृहाचे आहे. पार्कीग सोडून इतर ठिकाणचे सुध्दा पाडण्यास येत आहे. नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. म्हणून न्यायालयाचे आदेश काय आहेत. म्हणून विचारणा होत आहे. सर्व अहवाल येत्या सभेत ठेवण्यात यावा.

मा. महापौर : पार्कीगच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलविण्याच्या येईल.

**ठराव क्र. :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सभागृहाचे मत लक्षात घेता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) पाणीपट्टी वसुलीचे तसेच मालमत्ता कराचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही करावी. व वसुलीसाठी आवश्यक तो कर्मचारी देण्यात यावा.

२) मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी थकबाकी रक्कमेवर व्याज आकारणी करण्यातयेऊ नये जेणे करून जे कर भरण्यास तयार आहे ते नागरिक कर भरतीत व महापालिकेचे उत्पन्न वाढले. जे मालमत्ता कर, पाणीपट्टी भरणार नाही त्यांचेवर नियमाने कार्यवाही करावी.

३) शहरातील ठराविक हॉटेल्स किंवा दुकाने यांनाच अन्न भेसळ परवाना देण्यात येतो. त्याप्रमाणेच शहरातील खाद्य पदार्थाच्या गाड्या, पानटपऱ्या आईस्क्री पार्लर ईत्यादी नाही योग्य ते शुल्क आकारून परवाना देण्यात यावा. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

४) गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी जनतेमध्ये जनजागृती करणे.

५) शहरातील मालमत्ता कर न लागलेल्या इमारतीचे सर्वेक्षण करणे.

६) शहरातील अनधिकृत उभारण्यात आलेल्या टॉवर्सची ८ दिवसात चौकशी करून संबंधित मालकावर कार्यवाही करणे.

७) विभागीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने मागविण्यात यावी.

८) कर्मचारी आकृतीबंध सादर करण्यात यावा.

जकात वसुलीचे उत्पन्न वाढविण्यासाठी धडक कृतीदल स्थापन करण्यात येत असून मुख्यलेखाधिकारी यांचे नियंत्रणाखाली (१) लेखाधिकारी (२) विभागीय अधिकारी श्री. वाहुळ (३) करनिरिक्षक श्री. एन. डी. पवार या अधिकारी कर्मचारी यांनी काम करावे त्यांचे कामाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

१) आयात मालाची आठवड्यातून एक / दोन वेळेस ओपन डिलेव्हरी करणे.

२) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यातील आयात मालाची तपासणी करणे.

३) वाहतुक कंपन्याचे गोडावून नियमित दैनंदिन तपासणी व सोबत मागील नऊ महिण्याची तपासणी करणे.

४) विशेषतः मोबाईल हँडसेट, इलेक्ट्रॉनिक वस्तु, संगणक यांच्या तपासण्या करणे.

५) शहरातील व्यापाऱ्याचे वर्षभरातील आयातीत मालाची अभिलेखाची तपासणी करणे.

६) मुंबई नाका येथे गोडाऊन उभारून मालाची ओपन डिलेव्हरी करणे.

७) जकात वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास जकात अधिक्षक यांचे दोन/ तीन वेतनवाढ रोखण्यात येऊन त्यांना जबाबदार धरून निलंबनाची कारवाई करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा तहकूब झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-०१-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**सोमवार, दि. २०/०१/२००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.४५ वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली.**
**सभेला कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१३) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१४) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिसन
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१८) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१९) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२०) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२१) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२२) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२३) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२७) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२८) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२९) स.स.डॉ. कराड भागवत किसनराव
३०) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३१) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३२) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
३३) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक

३४) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे
३५) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३६) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३७) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३८) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३९) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४०) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४१) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४२) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
४३) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
४४) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४५) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४६) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४८) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४९) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५०) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
५१) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खॉन
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
५९) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
६०) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६१) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
६२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६३) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६४) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६५) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
६६) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६७) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६८) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६९) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**संवाद :**

श्री. सलीम पटेल : नगर नाक्यावर काल जो नाट्यमय प्रकार झाला तो बरोबर आहे का? त्याचा सविस्तर खुलासा करावा. वृत्तपत्रात तशा बातम्या सुध्दा प्रसिध्द झालेल्या आहेत.

श्री. नंदकुमार घोडेले : अगोदर चर्चा होणार की, विषय पत्रिका याबाबत खुलासा व्हावा.

श्री. अफसर खॉन : वेगळी चर्चा करीत नाही. महत्वाच्या विषयावर चर्चा करीत आहे. महानगरपालिकेमध्ये असे प्रकार होत असतील तर योग्य नाही. नाक्यावर जो प्रकार घडला त्याचा खुलासा व्हावा. हा गंभीर प्रश्न आहे मनमानी करणे बरोबर नाही.

श्री. अविनाश कुमावत : एक कर्मचारी श्री. बांडे हे नाक्यावरील रु. २.४५ लक्ष घेऊन गेले. त्यांचा ठाव ठिकाण नाही. त्या रक्कमेबाबत अगोदर खुलासा घेणे गरजेचे आहे. तो प्रकार यापूर्वी घडलेला आहे.

मा. महापौर : मा. उपआयुक्त (म.) यांनी या संबंधी खुलासा करावा.

श्री. अफसर खॉन, श्री. सलीम पटेल : अधिकाऱ्यांनी खुलासा करू नये. जो प्रकार झाला तो आपण स्वत: केलेला आहे. आपले पुत्र सुध्दा बैठकीला येण्याची सुध्दा इच्छा होत नव्हती. श्री. कुमावत यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

श्री. अविनाश कुमावत, श्री. नंदकुमार घोडेले : सभागृहाची प्रथा आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. महापौर खुलासा करू शकत नाही. ते या सभेचे अध्यक्ष आहे.

मा. महापौर : मा. उपआयुक्त हे खुलासा करतील.

श्री. अफसर खॉन, श्री. सलीम पटेल : जो प्रकार घडला त्यावेळी मा. उपआयुक्त (म) हे तेथे नव्हते, त्यामुळे ते योग्य तो खुलासा करू शकणार नाही. स्वत: महापौरांनी खुलासा करावा. मा. उपआयुक्तांचा खुलासा वृत्तपत्रात आलेला आहे तो आम्ही वाचलेला आहे त्यांनी खुलासा करू नये.

श्री. सुदाम सोनवणे : ज्या बातम्या प्रसिध्द झाल्या त्या महापौर तसेच स. सदस्यांच्या दृष्टीने अपमानास्पद बातम्या आहे. कालचा जो प्रकार घडला, त्याचा खुलासा स. सदस्यांनी मागविला आहे. खुलासा घेण्यासाठी आम्ही सुध्दा उत्सूक आहेत. परंतु सदस्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, मा. महापौर हे या सभागृहाचे अध्यक्षस्थानी बसलेले आहे. अधिकारी खुलासा करतील व महापौरांच्या बाबतीत काही बोलले गेले तर मा. महापौर हे त्यांचे मत मांडतील. महापौरांनी खुलासा करावा हि मागणी बरोबर नाही. तसेच गेल्या ०८ दिवसापूर्वी श्री. बांडे नावाच्या एका कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेच्या २ ते २.५० लक्ष रुपयाची अफरातफर केली. वृत्तपत्रात तशी बातमी प्रसिध्द झाली. त्याचा ही खुलासा प्रशासनाने करावा.

श्री. सलीम पटेल : कालची जी घटना घडली हि नगर नाक्यावर घडलेली आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी रु. २.४५ लक्ष रक्कम पाळविली. ती घटना सेंट्रल नाक्यावरील आहे. जी मागणी होत आहे हे प्रकरण आपल्या संबंधित आहे. आपण स्वत: नाक्यावर गेलेले होता. तेंव्हा स्वत:च खुलासा करावा. किती लाच मातिगतली होती.

श्री. अफसर खॉन : या सभागृहाचा मी. ८ वर्षापासून सदस्य आहे माजी महापौर व विद्यमान सदस्य श्री. सोनवणे यांनाही ८ वर्ष झालेले आहेत. यापूर्वी त्यांनी व डॉ. भागवत कराड यांनी महापौर असतांना नाक्यावर जाऊन भेटी दिल्या होत्या.

काय तपासणी केली या बाबत स्टेटमेंट दिलेले होते. काहींना निलंबित केले होते. त्याप्रमाणे आपणांस सुध्दा खुलासा द्यावा लागेल. या स्टेजवरच यापूर्वीच्या महापौरांनी खुलासा केला आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : श्री. बांडे नावाचे कर्मचारी यांनी जी रक्कम घेऊन गेले हि घटना अगोदर घडलेली आहे त्याचा अगोदर खुलासा व्हावा. या ठिकाणी काही स्पर्धा नाही.

श्री. सलीम पटेल : वृत्तपत्रात बातम्या आल्या अपमानास्पद शब्द वापरलेले आहे. या शहराच्या नागरिकांमध्ये नगरसेवकांविषयी वाईट भावना निर्माण झालेल्या आहे.

श्री. संजय शिरसाठ : स. सदस्यांनी जी मागणी केली त्यास आम्ही सहमत आहोत वृत्तपत्रात बातमी आलेली आहे की, मा. महापौर हे एका नाक्यावर गेले व तेथे जाऊन त्यांनी तपासणी करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे सर्व नगरसेवकांची बदनामी झाली असे स. सदस्यांचे मत झालेले आहे. परंतु हे नाट्य का घडले याचा हि विचार करणे गरजेचे आहे. दोन घडलेल्या घटनेतून हि घटना घडलेली आहे. पहिला मुद्दा असा की. मा. महापौरांना जकात नाक्यावर जाण्याचा अधिकार आहे किंवा नाही येथून सुरुवात होते. गेल्या ०६ तारखेला नाक्यावरील श्री. बांडे नावाच्या कर्मचाऱ्यानी रक्कम चोरून नेलेली आहे. दि. ०६/०१/२००३ ला रककमेचा अपहार होता परंतु या बाबतचा गुन्हा हा दि. १४-०१-२००३ रोजी नोंद झाला. एखाद्या कर्मचाऱ्यांने चोरी केल्यास तात्काळ कार्यवाही होत नाही त्याची खंत वाटते. माझ्या माहितीप्रमाणे नाक्यावरील पावती बुक सुध्दा गहाळ करण्यात आलेले आहे. व इतर नाक्यावर हि असे प्रकार घडतात म्हणून चौकशीसाठी मा. महापौर या नाक्यावर गेलेले होते. या प्रमाणेच मागे एक झोन मध्ये चोरीचा प्रकार घडला होता. त्यावेळी सुध्दा मा. महापौर यांनी संबंधित झोन अधिकारी यांना जबाबदार धरून निलंबित करण्याचे आदेश दिले. त्यानुसार त्यांना निलंबित केले होते. त्याप्रमाणेच हा हि चोरीचा प्रकार घडलेला आहे जे कुणी संबंधित अधिकारी जकात विभागाचे असतील त्यांना अगोदर निलंबित करावे नंतर या प्रकरणाचा खुलासा घ्यावा. मी बांडे बाबत काय चौकशी झाली त्याचा खुलासा द्यावा.

श्री. सलीम पटेल : खुलासा द्यावा नसता या महापौरांचा आम्ही धिक्कार करतो.

(याच वेळी डायस समोर येऊन काही सदस्य महापौरांचा निषेध असा अशा घोषणा देतात.)

श्री. कुमावत अविनाश, श्री. अंबादास दानवे : मा. महापौरांचा अपमान होत आहे. स. सभासद श्री. पटेल यांचे सभसदत्व रद्द करावे व त्यांना सभागृहाबाहेर काढण्यात यावे.

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(याच वेळी सर्व सदस्य जागेवर बसतात.)

श्री. अंबादास दानवे : दि. १५ तारखेला मा. आयुक्त, व मा. महापौर यांना एक पत्र देऊन जी. एस. ट्रान्सपोर्ट कंपनीचे धनादेश स्विकारून रु. ६०,०००/- रक्कम घेऊन फरार झालेल्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी केली होती. जकात अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालील किंवा मा. उपआयुक्तच्या मार्गदर्शनाखाली एखादी १०,०००/- रु. चोरी पकडल्यास

वृततपत्रात बातम्या येतात. जेंव्हा ६०,०००/- रु. ची चोरी होत ती कुणाच्या मार्गदर्शनाखाली होते यास कोणीच जबाबदार नाही का? प्रशासनाला काही नियम नाहीत का? योग्य खुलासा मागवावा. नसता त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरून कार्यवाही व्हावयास पाहिजे यात मा. आयुक्तांपासून जकात अधिक्षक सर्वच अधिकारी येतात.

श्री. अफसरखॉन, श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : स. सदस्य विषयांवर करीत आहे. काल घडलेला प्रकरणाची माहिती आपण स्वतः द्यावी.

(याच वेळी स. सभासद डायस समोर मोठमोठ्योन बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : स. सदस्यांना उपस्थित केलेल्या मुद्यावर खुलासा देण्यात येईल. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री. स. अली मीरा सलामी : सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न काही सदस्य करीत आहे. आपण नाक्यावर गेलेल्या होतात तेथे जाऊन पैसे मागविले होते का? काय चौकशी केली खुलासा द्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : मा. महापौरांनी पैसे मागविले असतील तर कार्यवाही करता येईल. ते शिवसेनेचे असले तरी कार्यवाही होईल. परंतु ते या सभागृहाचे अध्यक्ष आहे खुलासा स्वतः करू शकत नाही.

श्री. स. अली मीरा सलामी : वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या यात महापौर व इतर सदस्यांची बदनामी झालेली आहे. तसेच संपूर्ण महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे.

(या वेळी स. सदस्य मोठमोठ्याने बोलण्याचा आवाज येतो काहीही ऐकू येत नाही.)

श्री. अंबादास दानवे : सामना वृत्तपत्रात काय बातमी आली ती वाचावी पुरावे नसतांना आरोप करणे बरोबर नाही.

श्री. सलीम पटेल : एका क. लिपिकास आपण पैसे मागविले असा आरोप आपल्यावर आहे हे सत्य आहे का? त्याचा खुलासा आपण स्वतः करावा.

मा. महापौर : मी कोणत्या कामासाठी नाक्यावर गेले होते याचा खुलासा आपणास मिळेल त्यापूर्वी श्री. बांडे यांनी चोरून घेऊन गेलेल्या रककमेच्या प्रकरणाचा मा. उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

मा. उपआयुक्त (म.) सेंट्रल नाका येथील कार्यरत असलेले श्री. बी. बी. बांडे यांनी २,४४,१५४/- रुपयांची आफरातफर केल्याचे दि. १३ तारखेला जकात अधिक्षक यांचे निदर्शनास आल्यानंतर मा. आयुक्त यांचे आदेश घेऊन प्राथमिक चौकशी केली व त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(याचे वेळी मा. महापौर यांचे डायस समोर स. सभासद येऊन मोठमोठ्याने बोलतात. निषेधाच्या घोषणा देतात. पुन्हा काळी वेळाने सभासद आपआपल्या जागेवर बसतात)

श्री. सुदाम सोनवणे : वृत्तपत्रात बातमी आल्यानुसार स. सदस्य खुलाशाची मागणी करीत असून त्यांची मागणी ही रास्त आहे. परंतु त्यांचा खुलासा म्हणून उलगडा करणे हे प्रशासनाचे काम आहे. कालचा प्रकार काय झाला त्याचा खुलासा व्हावा या सभागृहात नेहमीचीच आरडाओरड होते. कामकाज न होऊ देणे ही परंपरा खंडीत करावी असे माझे मत आहे. या सभागृहात जातीचा भेदभाव करून तशी चर्चा करण्याचा प्रयत्न होतो व विकास कामावर

कोणतीच चर्चा न होता सभेच्या कामकाजातून काहीच साध्य होत नाही या ठिकाणी राजकारण कुणी करू नये. सभागृहात मा. महापौर खुलासा करू शकत नाही परंतु आपल्यावर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आरोप केलेले आहे. म्हणून सभागृहाच्या वतीने मी विनंती करेन की, माझ्या प्रश्नाचा खुलासा नंतर केला तरी चालेल. स. सदस्यांचा प्रश्नांचा खुलासा करण्यात यावा.

श्री. सुनिल मगरे :वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली म्हणून स. सदस्य त्या संदर्भातील खुलाशाची मागणी करीत आहे. जकात विभागाच्या संदर्भा ात गेल्या अनेक वेळा या सभागृहात चर्चा झालेली आहे. जे कर्मचारी या विभागात काम करतात त्यांच्या मालमत्तेची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. जे कार्यरत आहे त्याची त्याच विभागात दुसरीकडे बदली होते. ०८ दिवसांपूर्वी जो प्रकार बांडे नावाच्या कर्मचाऱ्यांनी केला. अशा प्रकारच्या तक्रारी येत होत्या त्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी आपण नाक्यावर गेलेले असाल तर तसा खुलासा करावा. परंतु या सभागृहात वृत्तपत्र वाचून काही स. सदस्यांनी आपण भ्रष्टाचार केल्याचे, पैसे मागितल्याचे आरोप केले ते निदंनीय आहे. कोणतेही पुरावे नसतांना सभागृहात असे आरोप करणे म्हणजे मा. महापौर तसेच सर्व सदस्यांची बदनामी होते हे विसरून चालणार नाही. म्हणून मी या गोष्टीचा निषेध करतो.

श्री. अफसर खॉन : राजकारण कुणीही करीत नाही. कालच्या प्रकरणाचा आपण खुलासा करावा, विषयांतर होत आहे. श्री. काशिनाथ कोकाटे हे सभागृह जुगलबंदी करण्यासाठी नाही विकासा करण्यासाठी आपण हि सभा घेतो. विषयाला धरून योगय अशी चर्चा झाली पाहिजे. आम्ही सुध्दा या सभागृहाचे सदस्य आहोत. प्रत्येक सदस्यांनी जबाबदारीने आपआपले प्रश्न मांडले पाहिजे. विषय पत्रिकेवरील अद्याप कुठल्याही विषयावर चर्चा नाही. ३० मिनिटे सभा सुरू होऊन झाले. काही निर्णय नाही एक महिना झाला की पुन्हा पुन्हा तेच तेच प्रश्न उपस्थित होतात. मुळ विषयावर सविस्तर चर्चा होत नाही. एकतर जनरल चर्चा करावी नसता विषय पत्रिकेवर चर्चा करावी. किंवा आज या शहराचे आमदार मा. दर्डा साहेब यांचे पुत्राचा विवाह असल्याने आम्ही सदस्यांना लग्नास जायचे आहे. म्हणून आजची सभा तहकूब करून उद्या घेण्यात यावी. नसता ताबडतोब संपवावी.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन, श्री. अफसर खॉन : आपण विकास करण्यासाठी येथे आलेलो आहोत. वैयक्तिक कार्याक्रमाचा मुद्दा येथे उपस्थित करून सभा तहकूब करणे योग्य नाही.

(याच वेळी स. सभासद मा. महापौर यांचे डायस समोर जाऊन मोठमोठ्योन बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा. उपमहापौर : मा. महापौर खुलासा करतील सर्वांनी आाप आपल्या जागेवर बसावे. नसता स. सदस्यांवर कडक कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

(याचे वेळी स. सदस्य श्री. अफसर खॉन तसेच शे. ईसाक शे. जैनोद्दिन हे मा. महापौर यांचे डायस समोर खाली बसतात व खुलाशाची मागणी करतात.)

मा. उपमहापौर : स. सदस्य श्री. अफसर खॉन व श्री. शे. ईसाक जैनोद्दिन यांनी डायस समोर बसू नये आपआपल्या जागेवर बसावे. महापौर खुलासा करीत आहे.

मा. महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे स. सदस्य श्री. अफसर खॉन व इतर सदस्यांनी खाली बसू नये जागेवर बसून आपले म्हणणे मांडावे नसता त्यांना सभागृहाबाहेर काढण्यात येईल.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : लग्न कार्यक्रमांचा मुद्दा येथे कशासाठी. आपण विकास बाबत चर्चा करावी. आमच्या प्रश्नांचा खुलासा करावा (याचवेळी सर्व सदस्य आपआपल्या जागेवर बसतात.)

श्री. काशिनाथ कोकाटे : स्थानिक आमदार व मंत्री श्री. दर्डा साहेब यांच्या पुत्राचा विवाह आहे. आताच मी तसा उल्लेख केलेला होता. त्यांचे नावाचा उल्लेख केल्याने त्रास होत असेल तर त्या त्या सदस्यांनी बाहेर जावे. विकास कामावर चर्चा करावी नसता सभा तहकूब करावी.

(याचवेळी स. सदस्यांचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काहीही ऐकावयास येत नाही.)

डॉ. भागवत कराड : मा. ना. श्री. दर्डा साहेब यांचेकडे लग्न सोहळ्याचे कार्यक्रम आहे. आम्ही सुध्दा त्या लग्न समारंभासाठी जाणार आहोत. आमच्या पक्षाचे जेष्ठ नेते मंडळी सुध्दा येणार आहे. योग्य त्या विषयावर चर्चा करून कामकाज चालावे नसता आजची सभा तहकूब करून येत्या २७ तारखेला ठेवावी.

सौ. निखत परवीन : मा. महापौर ह्या महिला असल्याने काही सदस्य हेतू पुरस्कर डायस समोर जाऊन मा. महापौरांना अपमानास्पद वागणूक देत आहे. म्हणून आम्ही सर्व महिला एकत्र येऊन या गोष्टीचा निषेध करतो व पुरावे नसतांना मा. महापोरांवर आरोप करणे बरोबर नाही.

(यावेळी सर्व महिला सदस्या मा. महापौर यांचे डायस समोर एकत्रपणे येऊन अपमानास्पद वागणूक देणाऱ्या सदस्यांचा निषेध करतात मोठमोठ्याने घोषणा देतात.)

मा. उपमहापौर : मा. महापौर खुलासा करीत आहे. सर्वांनी शांत राहावे.

मा. महापौर : जकात प्रकरणी एक निनावी फोन मला आलेला होता. म्हणून मी नगर नाक्यावर गेले. जाण्यापूर्वी उपआयुक्त (म.) व जकात अधिक्षक यांना नाक्यावर बोलाविले. अवघ्या १० मिनिटातच जकात अधिक्षक हे नाक्यावर आले. त्यांनामी मला आलेल्या फोनची माहिती दिली. व असे प्रकार घडले असेल तर त्याची शहानिशा करणे महापौर म्हणून माझी जबाबदारी आहे.

त्याच प्रमाणे काही दिवसांपूर्वी जकात नाकयावर काही लाख रुपयांचा अपहार झाल्याचे मला स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे,श्री. अंबादास दानवे, श्री. संजय शिरसाठ, डॉ. भागवत कराड, श्री. प्रशांत देसरडा, यांनी आताच सांगितले आहे. याप्रकरणी श्री. बांडे नावाचे लिपिकास निलंबित केल्याचे निदर्शनास येते. काही लाख रुपयांची रककम एक लिपिकाच्या मार्फत अपहार होण्याची घटना घडते व त्याकडे जकात प्रमुखांचेही दुर्लक्ष असल्याचे सकृत दर्शनी दिसते. त्यामुळे त्यांनाही आपल्या कर्तव्यात कसून केल्याचे लक्षात येत असून असे विभाग प्रमुख या नात्याने सिध्द होते. त्यामुळे श्री. बांडे यांचे बरोबरच जकात अधिक्षक श्री. अयुब खान यांना निलंबित करून त्याचा अहवाल येणाऱ्या बैठकीत देण्याचे प्रशासनास आदेश देण्यात येतात.

मा. महापौर : आजची सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(दु. १-४० वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा २.०० वाजता सुरू झाली.)

मा. महापौर : आजची सभा तहकूब करून येत्या २७ तारखेला सभा आयोजित करण्यात येईल.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा तहकूब झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २७-०१-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोमवार, दि. २७/०१/२००३ (दिनांक २०/०१/२००३ ची तहकूब सभा) मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.१० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१०) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
११) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१२) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१३) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१४) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१५) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१६) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
१७) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
१८) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
१९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२०) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२१) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२२) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२३) स.स.डॉ. कराड भागवत किशनराव
२४) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२५) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
२६) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
२७) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
२८) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे
२९) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३०) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३१) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३२) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव

३३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३४) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३५) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३६) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
३७) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
३८) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
३९) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४०) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४१) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४५) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
४६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खॉन
४७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
४८) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
४९) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५०) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५१) स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खॉ
५२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५३) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
५४) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
५५) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
५६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
५७) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स. सौ. सलमा बानो मिर महंमद अली.

**संवाद :**

श्री. अंबादास दानवे : गेल्या २० तारखेच्या बैठकीत जकात अधिक्षक यांचेवर निलंबनाची कार्यवाही करून येणाऱ्या सर्वसाधारण सभेत म्हणजे आजच्या सभेत अहवाल ठेवण्याचे आदेशित केलेले होते. प्रशासनातर्फे अहवाल आलेला आहे का?

श्री. अफसर खॉन : जे आदेश देण्यात आले ते योग्य नाही. सभागृहात कुठल्याही प्रकारची चर्चा झालेली नसतांना एका अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करणे बरोबर नाही. सभागृहानेही तो निर्णय मान्य करू नये. एकतर्फी निर्णय घेतलेला आहे. या सभागृहास सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. सर्वांचे मत

जाणून घ्यावयास पाहिजे होते. व त्यानंतर रुलींग द्यावयास पाहिजे होते जो निर्णय घेतला त्यास विरोध आहे.

मा. महापौर : अहवाल आलेला आहे का? प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. तकी हसन खॉन : एक वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांनी अफरातफर केली त्यात जकात अधिक्षक यांचा नाही. संबंधित कर्मचाऱ्यांला प्रशासनाने निलंबित केलेले आहे. तोच मुद्दा समोर ठेवून अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे बरोबर नाही (याच वेळी मा. महापौर यांचे डायस समोर बरेच स. सदस्य जमा होतात. मोठमोठ्याने बालणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. प्रशांत देसरडा : प्रशासनाचे मत घ्यावे सर्वांना जागेवर बसवावे. नसता गैरवर्तन करणांराचे सभासदत्व रद्द करावे.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांनी आप आपल्या जागेवर बसावे. मोठमोठ्याने कुणी बोलू नये.

श्री. शेख ईसाक शे. जैनोद्दिन : मागील दिनांक ०७/०१/२००३ व ०८/०१/२००३ रोजी महसूली उत्पन्नावर सर्वसाधारण सभा आयोजित केलेली होती. त्या बैठकीत जकात अधिक्षक याचे, वसुली चांगली केल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले व त्यानंतरच लगेच दुसऱ्या बैठकीत त्यांना दोषी धरून निलंबनाची कार्यवाही करणे योग्य नाही. एकतर्फी निर्णय देऊन कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेणे बरोबर नाही. सभागृहाचे मत जाणून घ्यावयास पाहिजे होते.
(याचेवळी स. सभासद श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन हे मा. महापौर यांचे डायस समारे जाऊन राजदंड उचलण्याचा प्रयत्न करता. काही सदस्य त्यांना बाजूला सावण्याचा प्रयत्न करतात. डायस समोर मोठमोठ्याने बालणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. अंबादास दानवे : स. सभासद श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन यांनी राजदंड पकडून मा. महापौर व सभागृहाचा अवमान केलेला आहे. त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांनी आताच राजदंड पकडून सभागृहाचा अवमान केलेला आहे. म्हणून त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यांत येते. सुरक्षा रक्षकांनी सभागृहाबाहेबर काढावे.

श्री. अफसर खॉन : विकास कामाच्या संदर्भात निर्णय न घेता व सभागृहाचे कोणतेही मत विचारात न घेता अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे बरोबर नाही. असे निर्णय घ्यावयाचे असेल तर मा. महापौरांनी बंगल्यावर सभा बोलवावी. तेथेच निर्णय घ्यावे. तसेच स. सदस्य आपल्या भावना व्यक्त करतात. त्यांचे सभासदत्व रद्द करणे. बरोबर नाही. गैरवर्तन झालेले नाही.

मा. उपमहापौर : मा. महापौरांनी स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द केलेले आहे. त्यांना बाहेर काढण्यात यावे.
(याचवेळी स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन यांना बाहेर जाण्याची विनंती सुरक्षा विभागाचे कर्मचारी करतात, परंतु ते बाहेर जाण्यास नकार देतात.)

श्री. अंबादास दानवे : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना बाहेर जाण्याचे मा. महापौरांनी आदेशित केलेले आहे. त्यांना तात्काळ सुरक्षा रक्षकांनी बाहेर काढावे. महापौरांच्या आदेशांचे पालन होत नाही असा त्याचा अर्थ होतो.

मा. महापौर : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना सुरक्षा रक्षकांनी बाहेर काढावे. सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(दुपारी १२-५५ वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा दुपारी १.०५ वाजता सुरू झाली.)

मा. महापौर : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना सभागृहाबाहेबर काढावे त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात आलेले आहे.

(याचवेळी सुरक्षा विभागाचे कर्मचारी स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना सभागृहाबाहेर जाण्याची विनंती करतात. परंतु ते जाण्यास नकार देतात.)

श्री. अफसर खॉन : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन सदस्यत्व का रद्द करण्यात आले, सभागृहाला खुलासा द्यावा.

मा. उपमहापौर : स. सदस्य यांनी राजदंड उचलून अवमान केलेला आहे. एक दिवसासाठी सदस्यत्व रद्द करण्यात आलेले आहे. त्यांना सभागृहाचे बाहेर काढण्यात यावे.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : मागील बैठकीतील मी खुलाशाची मागणी केलेली होती. सभागृहाच्या तसेच माहपौरांचा अवमान होतो आहे. असे कृत्य केलेले नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना त्वरित सभागृहाबाहेर काढण्यात यावे. त्यांना बाहेर नेण्यासाठी पोलिसांना पाचारण करण्यांत येते. तयांनी स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन यांना बाहेर काढावे.

श्री. अफसर खॉन : सर्वच सदस्यांना निलंबित करावे. आपण स्वत: च सभा चालवावी. सभासदत्व रद्द केले तो निर्णय मागे घेण्यात यावा. अशा पध्दतीने सभागृह चालविणे बरोबर नाही.

(याचवेळी काही महिला सदस्य स. सदस्यांचे सभासदत्व रद्द केलेला निर्णय मागे घेण्यासाठी मा. महापौरांकडे मागणी करतात.)

मा. महापौर : एकदा घेतलेला निर्णय मागे घेणार नाही. स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना सभागृहाबाहेर काढावे.

(वेळोवेळी मा. महापौर रुलींग देऊनही स. सभासद श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन सभागृहाबाहेर जात नाही. सुरक्षा कर्मचारी त्यांना बाहेर जाण्याचे सांगतात. मोठमोठ्याने बोलणे चालू असते.)

श्री. अंबादास दानवे : जे. स. सभासद सभागृहात शांतता भंग करतात त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार मा. महापौरांना आहे. घेतलेला निर्णय योग्य आहे.

(याचेवळी सुरक्षा रक्षक कर्मचारी स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांना सभागृहाबाहेर घेऊन जातात स. सभासद मोठमोठ्याने घोषणाबाजी करतात.)

मा. महापौर : अहवालाबाबत काय निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे. खुलासा करावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहात शिस्तीचे पालन केले जात नाही. विकास कामाच्या संदर्भात बोलायचे असेल तर सभा घ्याव्यात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मा. ना. श्री. सुशिलकुमार शिंदे यांची नियुक्ती झाल्याबद्दल या सभागृहात अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा. व तसेच शासनास मंजूर केलेला ठरावानुसार कळवावे.

श्री. सुदाम सोनवणे : स. सदस्य श्री. कोकाटे यांनी जी सूचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. सभागृहातर्फे महाराष्ट्राचे नुतन मुख्यमंत्री मा. ना. श्री. सुशिलकुमार शिंदे यांचे अभिनंदन करण्यात येते. अभिनंदन केल्याबाबत प्रशासनातर्फे तसे कळविण्यात यावे.

मा. महापौर : अहवालाबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

मा. प्र. आयुक्त (उपआयुक्त म.) गेल्या २० जानेवारी २००३ च्या सर्वसाधारण सभेत जकात अधिक्षक यांना निलंबित करण्याचे मा. महापौर यांनी रुलींग दिलेले होते. त्या संबंधिची प्रत नुकतीच प्रशासनाकडे प्राप्त झालेली आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयनुसार प्रशासकीय कार्यवाही चालू आहे. ही कार्यवाही करीत असतांना या प्रकरणांमध्ये जकात अधिक्षक यांचा काही हस्तक्षेप होऊ नये म्हणून त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येत आहे.

श्री. अंबादास दानवे : मा. महापौरांनी आदेश केलेले होते. एका कर्मचाऱ्यांनी जकात विभागात नाक्यावर अफरातफर केलेली आहे. यात दोषी म्हणून जकात अधिक्षक यांचेवर निलंबनाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. जो पर्यंत कार्यवाही होत नाही तो पर्यंत सभा तहकूब करावी. अहवाल प्राप्त झाल्यानंतर सभा आयोजित करावी.

मा. महापौर : प्रशासनातर्फे आताच जो खुलासा करण्यात आलेला आहे तो मला मान्य नाही. त्या संबंधित अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही तो पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

या बरोबर सभा तहकूब झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८-०२-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २००३ (दिनांक २०/०१/२००३ व २७/०१/२००३ ची तहकूब सभा) रोजी मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११.३५ वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी यांचेसह खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
२) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
८) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
९) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१०) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
११) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१२) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१३) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१४) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१५) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१६) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१७) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
१८) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
१९) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२०) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२१) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२२) स.स.डॉ. कराड भागवत किशनराव
२३) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२४) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
२५) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
२६) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
२७) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
२८) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे
२९) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३०) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३१) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३२) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव

३३) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३४) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३५) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३६) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
३७) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
३८) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
३९) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४१) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४२) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
४७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
४८) स.स.सौ. सिद्दिकी नर्रम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
४९) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५०) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५१) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
५२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५३) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
५४) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५५) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
५६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
५७) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**संवाद :**

श्री. अंबादास दानवे : भारतीय महिला अंतराळवीर स्व. कल्पना चावला यांचे नुकतेच निधन झाले त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अ. रशिद अ. सत्तार : माझे यास अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.

भारतीय महिला अंतराळवीर स्व. कल्पना चावला यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : सकाळी ११.३० वाजेची सभेची वेळी होती. वेळेवर कुणीही अधिकारी सभागृहात आलेले दिसून येत नाही. मा. आयुक्त सुध्दा उपस्थित नाही.

डॉ. भावगत कराड, श्री. अ. रशिद अ. सत्तार : अधिकारी जोपर्यंत येत नाही तो पर्यंत सभा तहकूब करावी.

श्री. भगवान घडामोडे : बैठक तहकूब करू नये कारण यात सभागृहाचीच प्रतिमा खराब होईल. जे अधिकारी आलेले नाही त्यांचेवर कार्यवाही करावी. अधिकाऱ्यांना सभागृहात प्रवेश बंद करावा. सभा चालू द्यावी.

डॉ. भागवत कराड : मा. आयुक्त शहरात आहे का? महानगरपालिकमध्ये आलेत का? किंवा येणार नाही का याचा खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : सभागृहात आता यानंतर अधिकाऱ्यांना प्रवेश नाकारण्यात येत आहे. फक्त स. सदस्यांनाच सभागृहात येऊ द्यावे.

नगरसचिव : मा. आयुक्त ०२ मिनिटामध्येच सभागृहात येतील.

सौ. निखत परवीन : वेळेवर विषयपत्रिक दिली जात नाही. कालच विषयपत्रिका मिळाली. तसेच अधिकारी जागेवर राहत नाही. ३-३ वर्षापूर्वीची कामे तशीच राहिलेली आहे. अद्याप झालेली नाही.
(याचवेळी मा. आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.)

श्री. अंबादास दानवे : आताच ११-३० वाजता बैठक होती. व अधिकाऱ्यांनी वेळेवर सभागृहात उपस्थित राहण्याबाबत स. सदस्यांनी मत व्यक्त केले व उशीरा येणाऱ्या अधिकाऱ्यांना सभागृहात प्रवेश बंद करावा असे मत व्यक्त केल्यानंतर मा. महापौरांनी प्रवेश बंद केला महापोरांचे आदेश झालेले असतांना मा. आयुकतांना सभागृहात प्रवेश देण्यात आला हे कितपत योग्य आहे. मा. आयुक्त उशीरा सभागृहात का आले. खुलासा घ्यावा व इतर अधिकारी सुध्दा का उपस्थित नाही त्याचा सुध्दा खुलासा द्यावा.

मा. आयुक्त : आज प्रथमच असे वाटते की, मला सभागृहात येण्यास ०५ मिनिटे उशीर झाला. वेळेवर ११-३० वाजता मी निघालो परंतु एक नागरिक रस्त्यामध्ये भेटला त्यामुळे वेळ झाला. उशीर झाल्याबद्दल सभागृहाची क्षमा मागतो व इतर अधिकारी सुध्दा त्याचे दृष्टीने येण्यास उशीर झाला असेल तर सभागृहात येण्यास सभागृहाची परवानगी राहिल.

श्री. तकी हसन खॉन : अधिकारी वेळेवर सभागृहात न आल्यास शिक्षा झाली पाहिजे. परंतु यापूर्वी ११.३० वाजेची सभा १२.०० किंवा १२.३० वाजता अनेक वेळा सुरू झालेली आहे. अधिकाऱ्यांना दोषी ठरविण्याऐवजी आपण वेळेवर प्रत्येक वेळी बैठक सुरू करावी. सर्व अधिकारी वेळेवर येतील.

**विषय क्र. १८/१ :** दिनांक १८/१२/२००२ आणि २०/१२/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. सुनिल मगरे : दि. २०/१२/२००२ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. १५/५ नुसार पान क्र. ०७ वर ठरावामध्ये ओळ क्र. ४ मध्ये लेखा परिक्षक असे चुकीने ठरावात टंकलिखित झालेले असून त्यात दुरुस्ती करून मुख्यलेखा परिक्षक असे शब्द घेण्यात यावे.

मा. महापौर : दुरुस्ती करण्यात यावी. व दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १८/१ :**

दिनांक २०/१२/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील ठराव क्र. १५ मध्ये पान क्र. ७ वर ओळ क्र. ४ मध्ये लेखा परिक्षक ऐवजी मुख्य लेखा परिक्षक असे शब्द टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यातयेते. या दुरुस्तीसह दिनांक १८/१२/२००२ आणि २०/१२/२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १९/२ :**

दिनांक १३/०१/२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सिमती सभेचा ठराव क्र. ६४ अन्वये सन २००३-२००४ या विहित वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिम महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ मधील कलम ९९ अनवये महापालिकेने दिनांक २००२-२००३ किंवा त्यापूर्वी निश्चित करणे व मंजर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००३-२००४ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर हे करयोग्य मुल्यावर आकारणी करण्यास मंजुरी देऊन सर्व साधारण सभेस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००२-२००३ चे प्रस्तावित दर सन २००३-२००४ साठी प्रस्तावित दर | | स्थायी समितीने मंजूर केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मूल्य रुपये | दर | करयोग्य मूल्य रुपये | दर |
| १. | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३४% | ५०००१ ते १००००० | ३४% |
| | | १००००० च्या पुढे | ३६% | १००००० च्या पुढे | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी वापर | ०३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १) १ ते ५०००० | ८% | १) १ ते ५०००० | ८% |
| | | २) ५०००१ च्या पुढे | १०% | २) ५०००१ च्या पुढे | १०% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही करयोगय मुल्यावर | २% | कोण्त्याही करयोगय मुल्यावर | २% |
| ४. | अग्निशमन कर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षणकर | -//- | २% | -//- | २% |
| ६. | पथकर | -//- | २% | -//- | २% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | जल लाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ८. | जलनिस्सारण लाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ९. | मोकळ्या जागेचार कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने | | | | |
| १०. | राज्य शिखण कर रोजागार हमी कर, मोकळ्या निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोगय मुल्यावर आकारण्यात येईल प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर. | | | | |

**संवाद :**

श्री. तकी हसन खॉन : जसे प्रस्तावात दिले १ ते १०००० पर्यंत २३% गेल्या वर्षीचे दर किती होते यात दाखविलेले नाही. वृक्ष कर यावर २% लावण्यात आलेले आहे. अर्बन रिझर्वेषन ॲक्ट १९७५ नुसार १% च्या वर कर लावता येत नाही. या ठिकाणी २% दिले हि चूक होत नाही. जो टॅक्स दर दिले यात गेल्या वेळेस पेक्षा कितीने वाढ झाली याचा खुलासा करावा.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : सार्वत्रिक निवडणूक म्हणजेच बॉडी आल्यापासून या सभागृहात अशा प्रकारचा प्रस्ताव मंजुरीसाठी आलेलाचा नव्हता. आज का गरज भासली. खुलासा द्यावा.

डॉ. भागवत कराड : गेल्या वेळेस पेखा या वर्षी कितीने वाढ करण्यांत आलेली आहे. तसेच ज्यांच्याकडून काहीच वसूल होत नाही अशा कर धारकांवर काय कार्यवाही करणार आहोत. सुरुवातीचे दर हे व प्रस्तातिव दर काय आहेत याचा खुलासा देण्यात यावा. गेलेले दर हे वाढविलेले आहे. जशाच्या तसे स्थायी सिमतीने शिफारस केलेले आहे.

श्री. अंबादास दानवे : माझ्यामते प्रस्तावात उत्तर आहे जसे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी २० तारखेला किती त्यापूर्वीच हे दर निश्चित करावे लागतात. मागच्याच वर्षीचे दर या वर्षी ठेवण्यात आलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : मागील वर्षाचे दर किती होते या वर्षी कितीने वाढ केलेली आहे, याची माहिती द्यावी. आज माहिती उपलब्ध नसेल तर येत्या २० तारखेला बैठक घेणारच आहोत. त्या बैठकीत माहिती देण्यात यावी.

डॉ. भागवत कराड : हा प्रस्ताव स्थगित ठेवून सविस्तर माहिती देण्यात यावी.

उप आयुक्त (प्र.) : महानगरपालिका पुढील वर्षी ज्या दराने कर वसूल करणार आहे ते दर २० फेब्रुवारीच्या आत सर्वसाधारण सभेने मंजूर करणे बंधनकारक आहे. कलम ९९ मध्ये स्पष्ट तरतूद केलेली आहे. मागील वेळेसच हा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला होता. दोन वेळा बैठक तहकूब झाल्यामुळे निर्णय झालेला नव्हता दर वर्षी अशा प्रकारचा प्रस्ताव सभागृहासमोर येतच असतो.

डॉ. भागवत कराड : मागील वर्षीचे दर काय होते सभागृहास माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : आताच उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा केला कलम ९९ नुसार २० फेब्रवारी पर्यंत हे दर निश्चित करावे लागतात. मागील वर्षीचे जे दर होते तेच दर ठेवण्यात आलेले आहे १% चे २% झाले ही टंकलेखन मिस्टेक असू शकेल. दुरुस्त करता येईल.

श्री. जयवंत ओक : जे मालमत्ता कर भरतात त्यांनाच त्रास होता. या वर्षी कोणत्याही प्रकारची करात वाढ करण्यांत आलेली नाही असे आव्हान जनतेला प्रसिध्दी

माध्यमातून करण्यात यावे. सर्वच लोक वृत्तपत्र वाचतात असे नाही. म्हणून एक वेगळ्या पध्दतीने जनतेला याबाबतीत माहिती होईल यासाठी जनजागृत करावे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. कोणत्याही प्रकारची वाढ न करता प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो असे रुलींग देण्यात यावे.

मुख्यलेखाधिकारी :- करानुधान नियम ८ नुसार दरवर्षी दर निश्चित झाल्यानंतर पब्लिकेशन करावे लागते. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर वृत्तपत्राद्वारे जनतेला कळविण्यात येईल की, जे गेल्यावर्षीचे दर होते त्यात वाढ झालेली नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मालमत्ता कर व पाणीपट्टीवरील थकीत रककमेवर व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला. वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या परंतु अंमलबजावणी करण्यांत आलेली नाही आजही व्याज आकारणी होते आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करू नये म्हणून निर्णय घेतला असतांना अंमलबजावणी का करण्यात येत नाही. व्याज वसूल केल्याशिवाय इतर कर घेत नाही. जे कर भरण्यास येतात ते लोक परत जातात. किमान कर तरी भरून घ्यावा महापालिकेचे उत्पन्न वाढेल व्याजाच्या बाबतीत नंतर निर्णय घेता येईल.

मा. महापौर : हा विषय जशाच्या तसा मंजूर करण्यात येत आहे. दुरुस्ती असेल तर तीच करण्यांत यावी.

**ठराव क्र. १९/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी सिमती ठराव क्र. ६४ दिनांक १३/०१/२००३ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधील कलम ९९ अन्वये २००३-२००४ या वित्तीय वर्षासाठी महापालिका क्षेत्रासाठी मालमत्तावर कर योग्य मुल्यावर खालील दराने मालमत्ता कर आकारणी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००२-२००३ चे प्रस्तावित दर सन २००३-२००४ साठी प्रस्तावित दर | | स्थायी समितीने मंजूर केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मूल्य रुपये | दर | करयोग्य मूल्य रुपय | दर |
| १. | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३४% | ५०००१ ते १००००० | ३४% |
| | | १००००० च्या पुढे | ३६% | १००००० च्या पुढे | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | | अ) निवासी वापर | ०३% | अ) निवासी वापर | ०३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १) १ ते ५०००० | ०८% | १) १ ते ५०००० | ०८% |
| | | २) ५०००१ च्या पुढे | १०% | २) ५०००१ च्या पुढे | १०% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | वृक्ष कर | कोण्त्याही करयोगय मुल्यावर | २% | कोण्त्याही करयोगय मुल्यावर | २% |
| ४. | अग्निशमन कर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षणकर | -//- | २% | -//- | २% |
| ६. | पथकर | -//- | २% | -//- | २% |
| ७ | जल लाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ८. | जलनिस्सारण लाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ९. | मोकळ्या जागेचा कर करयोगय मुल्यावर सामान्य कराच्या दराने | | | | |
| १०. | राज्य शिक्षण कर रोजागार हमी कर, मोकळ्या निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोगय मुल्यावर आकारण्यात येईल प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर. | | | | |

**विषय क्र. २०/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की,

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६६(४२)६८, ३१९, ४६८ आणि २९३ अन्वये
२) पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ भारत सरकार पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै १९९८ व सुधारणा दि. २० जून २०००, बायो मेडिकल वेस्ट (मॅनेजमेंट व हँन्डलींग) रुल्स १९९८.
३) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २० एप्रिल २००० अन्वये औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय निमशासकीय खाजगी, स्वयंसेवी/ धर्मदाय संस्था किंवा व्यक्ति ज्या जैविक कचरा (बायोमेडीकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व म्हणजे वैद्यकीय व्यावसायिक रुग्णालये, दवाखाने, रक्तपेढ्या, पॅथॉलॉजी, प्रयोग शाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु वैद्यकीय रुग्णालय, गोठे, तबेले कुकुट पाल केंद्र, दुग्ध व्यावसायिक केंद्र, इत्यादी सर्व धारकांना म्हणजे नियमानुसार ॲक्युपायर असे संबोधण्यात आलेले सर्व ॲक्यूपायर यांनी जैविक कचऱ्याची विहित शास्त्रोयुक्त पध्दतीने वरील कायद्यानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी व बंधनकारक आहे.

औरंगाबाद मनपा हद्दितील सव्र नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनेक रोग्यांचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने करण्या महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इनसिनेटर) खाजगी तत्वावर बोल्ट (बिल्ड, ऑपरेट, लीज ॲन्ड ट्रान्सफर) या पध्दतीने कार्यान्वित करीत आहे. यासाठी कायद्यासाठी तरतुदीनुसार सर्व ॲक्यूपायर करीता सदर प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक जागा नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंड येथील एक एकर जागा मनपाने राखीव केली.

अ.क्र. २ अन्वये बायोमेडिकल वेस्ट प्रोजेक्ट उभारण्याची ३१ डिसेंबर २००२ हि शेवटी तारीख आहे. दिनांक २०/१२/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेने ठराव क्र. ५५४/३ अन्वये नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील १ एकर जागेस बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस प्रस्तावातील अटी व शर्तीनुसार मंजुरी दिलेली आहे. सर्व

साधारण सभेच्या मंजुरीनुसार नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील एक एकर जागेत बायोमेडीकल वेस्ट्र प्रोजेक्ट सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कार्यवाही नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील सदरील प्रोजेक्ट उभारणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/आ. वि./ बी.एम. डब्ल्यु/१६२०/२००२ दिनांक १८/१०/२००२ अन्वये ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली असता म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. डब्ल्यु पी/ आर ओ.अ./१७४४/२००२ दिनांक २६/११/२००२ अन्वये नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील जागा सदर प्रकल्प उभारणेच्या दृष्टीने योगय नसल्याने तसेच एअर पोर्ट ॲथॉरिटी औरंगाबाद यांनी देखील येथील जागेत कचरा डम्पींग करू नये म्हणून हरकत घेतली आहे. त्यामुळे प्रदूषण नियत्रंण मंडळ, औरंगाबाद ने येथील जागेकरिता ना हरकत प्रमाणपत्र देता येत नाही असा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी नाह करत प्रमाणपत्र न दिल्यामुळे दिनांक १७/१२/२००२ रोजी मा. महापौर द.मा.प्र. आयुक्त (मा. जिल्हाधिकारी) मा. सभापती, आरोग्य वैद्यकीय सहाय्यक समिती, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी बायो मेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणीच्या पर्यायी जागेसाठी पाहणी केली असता मौजे पाटोदा ता. जिल्हा औरंगाबाद येथील सर्व्हे नं. १२२ मधील २ एकर जागा बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणीसाइी निश्चित करून.

१) सहाय्यक संचालक, नगररचना औरंगाबाद या कार्यालयास कार्यालयीन पत्रक क्र. २०३१/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

२) वरिष्ठ भूवैज्ञानिक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या कार्यालयीन पत्रक क्र. २०३१/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

३) प्रशासक सिडको औरंगाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र. २०३६/२००२ दिनांक १७/१२/२००२ अन्वये ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली असता संबंधित विभागाकडून त्यांचे पत्रक क्र. (अनुक्रमे) मोजे् पाटोदा ता. जि. औरंगाबाद येथील सर्वे नं. १२२ मधील २ एकर जागा बायोमेडिकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेस ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहेत.

१) सहाय्यक संचालक नगररचना, औरंगाबाद यांचे कडील पत्रक क्र. गट नं./१२२/मौ. पाटोदा/सि.ओ/११३५/२००२ दिनांक १७/१२/२००२.

२) वरिष्ठ भूवैज्ञानिक भु. स. वि. मंडळ औरंगाबाद पत्रक क्र. व भ. वै./ भूसविम/औ.बाद/ता/१६६५/२००२ दिनांक १८/१२/२००२ अन्वये.

३) प्रशासन सिडको औरंगाबाद, पत्रक क्र. सिडको प्र.शा/औरंगाबाद/वाळुज/ नियोजन /२००२/२५५७ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र. डब्ल्यु पी./आर.ओ.ऐ/१८२५ दिनांक १७/१२/२००२ अन्वये.

वरील ना हरकत प्रमाणपत्रानुसार सर्वे नं. १२२ मोजे पाटोदा ता. जि. औरंगाबाद मधील दोन एकर जागेत बायोमेडीकल वेस्ट प्रोजेक्ट उभारणेच्या मंजुरीकरिता व यासाठी लागणारा शासकीय खर्च करणे करता सुधारित प्रस्तावा मंजुरीकरिता व माहिती व विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : कचऱ्याची विल्हेवाट कशी लावयची या संदर्भात हा विषय सादर झालेला आहे. हा प्रस्ताव या सभागृहासमोर येण्यापूर्वी महानगरपालिकेकडे आरोग्य समिती आहे. आरोग्य समितीकडे हा विषय पाठविण्यात यावा त्यानंतर या सभागृहासमोर हा प्रस्ताव यावा असे माझे मत आहे.

मा. महापौर : सदर प्रस्ताव आरोग्य समितीकडे निर्णय घेण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभेत सादर करावा.

**ठराव क्र. २०/३ :**

सदरील प्रस्ताव आरोग्य समिती मार्फत सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

# पुरवणी विषयपत्रिका

**विषय क्र. २१/१ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दितील भाजी मार्केट ते नेहरूभवन हा रस्ता रुंदीकरणासाठी प्रस्तावित आहे. सदर रस्ता हा शहरातील प्रमुख रस्ता असून ह्या भागातील बाधित घरमालकांनी मोबदला घेतलेला असून रुंदीकरणाचे काम रखडलेले आहे. भाजी मार्केट ते देना बँक, देना बँक ते चौक पर्यंतचे काम त्वरित हाती घेण्यात यावे व शहरातील हा पर्यायी प्रमुख रस्ता रुंद करण्यात यावा.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. भरत श्रीपती लकडे

**संवाद :**

मा. महापौर : विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २१/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भाजी ते दैना बँक, देना बँक ते चौक पर्यंतचे रुंदीकरणाचे काम त्वरित हाती घेण्यास सर्वानुमते मंजुरी येते. वैधानिक कार्यवाही हाती घेण्यास सर्वानुमते मंजुरी येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२/२ :**

महापालिका हद्दितील मिळकतीची नोंद नगरभूमापन कार्यालयाच्या अभिलेखात पी. आर. कार्ड, चौकशी रजिस्टर व सनदेवर घेण्यात आलेली आहे. सदर नोंदीमध्ये बऱ्याच वेळा गैरप्रकार झालेले आहे. सदर महापालिकेच्या मोकळ्या जागेवर खाजगी व्यक्तींचे नांवे लावण्यात आलेले आहेत. ही बाब गंभीर व आक्षेपार्ह आहे. तरी येथील नगरभूमापन कार्यालयातील गैरव्यवहाराची शासनाने उच्चस्थरीय चौकशी करण्यांत यावी. अभिलेख अचूक ठेवण्यात यावे म्हणून नगरभूमापनची जमाबंदी आयुक्त, विभागीय आयुक्त व महसूल सचिव यांनी चौकशी करून दखल घ्यावी म्हणून हा ठराव मंजूर करून शासनाकडे अंमलबजावणीसाठी सादर करण्यात यावा.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. भरत श्रीपती लकडे.

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. २ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भूमापन कार्यालयाच्या अभिलेखातील पी. आर. कार्ड, चौकशी रजिष्टर व सनद यावर घेण्यात आलेल्या नोदीमध्ये बरेच गैरप्रकार झालेले आहेत या गंभीर व आक्षेपार्ह बाबीबाबत नगर भूमापन कार्यालयातील गैरव्यवहाराची जमाबंदी आयुक्त, विभागीय आयुक्त व महसूल सचिव यांचेमार्फत चौकशी करण्यात यावी. अशी शासनास हे सभागृह विनंती करीत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो. सदर प्रस्ताव अंमलबजावणीसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३/३ :**

महापालिका हद्दित महापालिकेच्या मोकळ्या जागा व आरक्षित भूखंड आहेत. सदर भूखंड व मोकळ्या जागांवर अतिक्रमण होऊ नये, अनाधिकृत बांधकाम होऊ नये म्हणून प्रशासनाने महापालिकेच्या जागावर चारी बाजूने कंपाऊंड वाल बांधावी. तसेच त्याला गेट ठेवण्यात येऊन त्यांला कुलूप लावण्यात यावे. त्या शिवाय अशा जागावर एक विस्तृत बोर्ड महापालिकेच्या नावाची व इतर आवश्यक त्या माहितीसह लावण्यात यावा.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. भरत श्रीपती लकडे.

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. ३ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिका हद्दितील महापालिकेच्या मोकळ्या जागा व आरक्षित भूखंडावर अतिक्रमण होऊ नये, अनाधिकृत बांधकाम होऊ नये म्हणून प्रशासनाने महापालिकेच्या जागांवर चारी बाजूने कंपाऊंड वाल बांधावी. तसेच त्याला गेट ठेवून त्याला कुलूप लावण्यास व अशा जागावर एक विस्तृत बोर्ड महापालिकेच्या नावाचा व इतर आवश्यक त्या माहितीसह लावण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/४ :**

अजबनगर प्रभागात महानगरपालिके मार्फत सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आलेले असून सदर वाचनालात बहुसंख्येने नागरिक, मुले, महिला मुली येत आहेत. सदर वाचनालयास स्वांतत्र्य वीर विनायक दामोदर सावरकर वाचनालय असे नांव देणे बाबत तेथील रहिवाशी सारखी मागणी करत आहेत. स्वातंत्र्य विर सावरकरांचे देशाचे स्वातंत्र्य लढ्यातील महान कार्य व योगदान विचारात घेता युवा पिढीस त्यांचे महान कार्याची

कायम आठवण राहावी महणून या सार्वजनिक वाचनालयास स्वातंत्र्य वीर विनायक दामोदर सावरकर वाचनालय असे नांव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अंबादास दानवे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. ४ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजबनगर प्रभागातील महापालिकेच्या सार्वजनिक वाचनालयास स्वातंत्र्य वीर विनायक दामोदर सावरकर वाचनालय असे नांव देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/५ :**

अजबनगर प्रभागात महानगरपालिके मार्फत नव्यानेच अभ्यासिक सुरू करण्यात आलेली आहे सदर अभ्यासिका केंद्रास क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिक असे नांव देणे बाबत येथील रहिवाशी मागणी करत आहेत. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणासाठी असलेले योगदान व महान कार्य विचारात घेता या अभ्यासिकेस त्यांचे नांव देणे अत्यंत आवश्यक आहे. जेणे करून त्यांचे कार्य युवा पिढीस प्रेरणादायी ठरेल. करिता या अभ्यासिका केंद्रास क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका केंद्र असे नांव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसतव सादर.

सुचक - श्री. अंबादास दानवे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. ५ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजबनगर प्रभागात महानगरपालिके मार्फत सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिका केंद्रास क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका केंद्र असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/६ :**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक इमारती धारकांनी बांधकाम परवानगी घेतांना बेसमेंट प्लोअरचे बांधकाम आपल्या परवानगी मध्ये मंजूर करून घेतले आहे. महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमानुसार बेसमेंटचा वापर हा केवळ गोडाऊन किंवा पार्कींगसाठी करता येतो.

पार्कींग बाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेला असल्याने ज्या बेसमेंटचे बांधकाम पार्कींग शिवाय दुसऱ्या कारणांसाठी वापरात असेल तेथे पार्कींगसाठी जागा खुली करून देणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे.

परंतु ज्या इमारतीत बेसमेंट प्लोअर गोडाऊन साठी मंजूर केला आहे. व या ठिकाणी मागील अनेक वर्षापासून व्यवसाय चालू आहेत. सदरील व्यवसायिकांनी महानगरपालिका व राज्य शासनाचे विविध परवाने काढून अनेक कर व शुल्क भरून शासनाचा महसूल वाढविला आहे. अशा दि. ०१/०४/२००२ पर्यंत अस्तित्वात असलेल्या व शासनाचे व महानगरपालिकेचे विविध परवाने प्राप्त असलेल्या व्यावसायिकांना केवळ त्यांचे बेसमेंट चटई क्षेत्र निर्देशकात समाविष्ट न केल्याने व्यवसाय बंद करावयास लावणे न्याय होणर नाही. तरी दि. ०१/०४/२००२ पूर्वी अस्तित्वात असल्याचे सिध्द होण्याऱ्या व्यवसायिकांना रु. १००/- (रु. शंभर) प्रति चौरस मीटर प्रति वर्ष या दराने नजराना शुल्क आकारून तात्पुरती मान्यता देण्यात यावी व ज्या वेळेस शासन विकास हक्क हस्तांतरणास (T.D.R.) मान्यता देईल त्यावेळी या व्यवसायिकांनी एक वर्षाच्या आत बेसमेंट, चटई क्षेत्र निर्देशकांत समाविष्ट करून घ्यावे या अटीवर मान्यता देण्यात यावी प्रस्तावस मान्यता देऊन आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना पुढील वैधानिक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावेत.

सुचक - श्री. जयवंत केशवराव ओक
अनुमोदक - श्री. भरत श्रीपती लकडे

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : या विषयावर चर्चा घेण्यांत यावी.

नगरसचिव : एखादे प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना त्या विषयावर चर्चा होऊ नये अशी सर्वसाधारण धारणा आहे. हा विषय उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे त्याची सुनावणी २६ तारखेला ठेवण्यात आलेली आहे. करिता सभागृहास विनंती की, यावर चर्चा होऊ नये.

श्री. काशिनाथ कोकाटे : न्यायालयामध्ये कोणते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. १४ तारखेला न्यायालयात कोणती माहिती पुरविण्यांत आलेली आहे. त्याची माहिती सभागृहाला द्यावी न्यायालयाचा हे सभागृह अवमान करीत नाही. एवढी खबरदारी घेण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : न्यायालयाचा आपण अवमान करित नाही. विषय समजून घ्यावा न्यायालयाचे याबाबतीत डायरेक्शन आलेले आहेत का? महापालिका हि स्थानिक स्वराज्य संस्था आहे. काय निर्णय घ्यायचा तो महापालिकेचा हिताच्या दृष्टीने घेण्याचा अधिकार आपल्याला आहे यातून ४ ते ५ कोटी रुपये मिळणार आहे. निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. कोर्टाचे काही डायरेक्शन आलेले आहेत का? त्याची माहिती देण्यात यावी. हा विषय मंजूर करण्यास हरकत नसावी.

श्री. अंबादास दानवे : शहरात मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. त्यातील पार्कींग व गोडाऊनच्या जागा रिकाम्या करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. न्यायालयाचा आदेश काय आहे याचा खुलासा होण्याची सुध्दा आवश्यकता आहे. विधी सल्लागार कडून या संदर्भात माहिती घ्यावी. न्यायालयाच्या निर्णयाचा अतिशय गैरवापर केला जातो अशी भावना नागरिकांच्या मनात

निर्माण झालेली आहे. न्यायालयाचा अनादर करण्याची कोणाचीही भूमिका नाही. परंतु जनतेच्या भावनेचा विचार करावा लागेल यात शंका नाही. यातील पार्कींग आणि बेसमेंट हे दोन विषय महत्वाचे आहे. विशिष्ट ठिकाणचेच बांधकाम पाडले जात आहे. पार्कींगच्या जागेवर जेवढे अतिक्रमण झाले ते पाडलेच पाहिजे. यात शंका नाही. यात कुणाचे दुमत राहणार नाही. परंतु बेसमेंट चा जो प्रश्न आहे. न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे कोठेही उल्लेख नसतांना कार्यवाही होत आहे. सोमन नावाचे वकील हे मिसगाईड करतात हा माझा आरोप आहे. सर्वच महापालिकेची प्रकरणे त्यांचेकडे यापुढे देऊ नये. ५% पर्यंत काम झाले तर आपण रेग्युलर करता तेच काम आपण पाडतो. गुंठेवारी कायदा लागू करणार आहोत. १०-१० वर्षापूर्वीची अनधिकृत झालेल्या घराच्या बाबतीत कार्यवाही करित नाही याबाबतीत सुध्दा विचार झाला पाहिजे. जेंव्हा अनधिकृत बांधकाम होते तेंव्हा लक्ष दिले जात नाही व तेच बांधकाम आता पाडण्याची काय्रवाही होत आहे. ठराव चांगल्या प्रकारे आहे. परंतु ठरावाच्या अनुषंगाने कायद्याचा सुध्दा अभ्यास करण्याची गरज आहे. याबाबतीत ४ ते ५ तज्ञ वकीलाची समिती नेमावी या विषयाशी तज्ञ असणाऱ्यांना समितीमध्ये घ्यावे त्यांनी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अभ्यास करून तसा अहवाल सादर करावा तो अहवाल सभागृहापुढे यावा. सहजासहजी परवानगी दिली जात नाही. त्रास दिला जातो. लोकप्रतिनिधींना त्रास दिला जातो. अशा सुध्दा काही घटना घडलेल्या आहे. या प्रस्तावास मंजुरी देऊन स्विकृतीसुध्दा दिली पाहिजे. न्यायालयासमोर सुध्दा हा ठराव सादर करून न्यायालयाच्या निदर्शनास हे आणून दिले पाहिजे. जे की, नागरिकांवर जे अन्याय होत आहे ते थांबविले गेले पाहिजे.

श्री. भगवान घडामोडे : न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे बांधकाम केलेले पाहण्याची मोहिम हातही घेण्यात आलेली आहे. ती कार्यवाही कोठे चालू आहे. आतापर्यंत किती कार्यवाही झाली याची माहिती सभागृहाला तेसच कदाचित महापौरांना सुध्दा नसेल ज्या वेळेस स. सदस्य जनतेमध्ये वावरता तेंव्हा जनता आम्हाला विचारते महापालकेतील परिस्थिती काय आहे. आताच स. सदस्यांनी मत मांडले विशिष्ट ठिकाणचेचे बांधकाम पाडले जात आहे. एकीकडे सांगितले जाते की, मोहिम चालू आहे. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही होते आहे का? काय कार्यवाही आतापर्यंत झाली काहीही माहिती या सभागृहाला नाही. ५ वकीलांचे पॅनल निवड करित असतांना सोमन नावाचे वकीलांना यातून वगळण्यात यावे असे माझे मत आहे. त्यांना महापालिकेच्या पॅनलमधून काढून टाकावे. तयामुळेच हे सर्व प्रकार होत आहे. ज्यांनी परवानगी घेतली त्यांचीच बांधकामे आता पाडण्यात येत आहे. परंतु ज्यांनी १०-१०/२०-२० वर्षापासून अनधिकृतपणे इमारती बांधलेल्या आहेत त्यांचे बाबतीत कार्यवाही होत नाही. कोर्ट प्रकरण होते व वर्षानुवर्ष पासून त्या इमारतीचा वापर होत आहे. अशा वेळी वेळेवरच कार्यवाही होत नाही. दुकाने करून विक्री केली जातात. नंतर जनतेला पुढे करून नगरसेवकांची बदनामी करण्याचा प्रयत्न होतो. व आमचे बांधकाम पाडू नका म्हणून समोर आणतात. सन १९८५ ला प्रशासनाने एक प्रस्ताव दिला होता. ठराव क्र. ७०४ जे की, १०% बांधकामात जास्तीची परवानगी मिळणार होती. पुन्हा २००० पर्यंत आपण परवानगी कशा पध्दतीने दिलेल्या आहेत.

जी परवानगी दिली ती इललिगल झालेले आहे का? याचा विचार करणे गरजेचे आहे. तसेच सुप्रिम कोर्टाचा सुध्दा निकाल आहे की, ६३४/९१ नुसार ५% जास्तीच्या कामाला परवानगी देण्यात यावी. जे की, कुण्याची जनतेची तक्रार नसेल अशा ठिकाणच्या त्या नागरिकांना दंड आकारणी करून परवानगी द्यावी असे आदेश आहे. असे असतांना महापालिकेच्या पॅनल वारील जे वकील आहेत त्यांनी याचा अभ्यास केला नाही का? म्हणून सुप्रीम कोर्टाने जे निर्देश दिले त्याचा अभ्यास करून उच्च न्यायालयात सादर न करतांच प्रकरणात जागा खाली करण्याचे आदेश झाले व त्यानुसार कार्यवाही सुरू झाली. म्हणून या महापालिकेतील पॅनलवरील जे वकील आहे. त्यांनी या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. म्हणून सुप्रीम सुध्दा जज्जमेंट घेऊन त्याची तपासणी करून कार्यवाही व्हावी असे माझे मत आहे. मोठमोठ्या इमारती तसेच रुंद रस्त्यावरील झालेले अनधिकृत बांधकाम पाडण्यात येत नसून लहान लहान गल्ल्यामधील बांधकाम पाडण्यात येत आहे. हा जनतेवर अन्याय होत आहे. म्हणून हा ठराव मंजूर करावा व जनतेला न्याय द्यावा असे माझे मत आहे.

श्री. अफसर खॉन : कोणत्या नियमानुसार फाईल लावून वसूली करणार आहोत. याचा खुलासा व्हावा. यापुर्वीच्या आपल्याकडे ४७ संचिका आहे जे की, या बिल्डरांनी पार्कींगची जागा दाखवून बांधकाम केले. त्या संचिका तपासणीसाठी गेलेल्या होत्या, आलेल्या आहेत का? ज्या अनधिकृत जागेवर बांधकाम करून सदरच्या त्या ४७ संचिकाचे संगणीकरण करण्यात आले. त्यानुसार सदर जागेवर केलेल्या बांधकामास सिल लावण्यात आलेले होते. अशा ठिकाणच्या बांधकामावर कार्यवाही होत आहे की, त्या बांधकाममध्ये इतर नागरिकांना काहीही त्रास नाही. लाखो रुपयाचा भ्रष्टाचार होऊन पार्कीगच्या जागेवर दुकाने काढून ज्यांनी विकली त्यांचेवर काहीही काग्रवाही झालेली नाही. कार्यवाही केलेली असेल तर सभागृहाला त्याचा खुलासा झाला पाहिजे. पार्कीगच्या जागेवर बांधकाम झाल्यामुळे इतर लोकांना वाहन लावण्यासाठी जागा नाही. जनतेला पोलिस लोक त्रास देत आहे. गाड्या घेऊन जातात. याचा कोणीही विचार करीत नाही. म्हणून या ४७ संचिका तसेच आणखी अशा १५० ते २०० संचिका पार्कीगच्या जागेच्या संदर्भात मोठमोठ्या बिल्डरांच्या आहेत. त्या काढून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. जे चुकीचे काम करीत असेल त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे असे माझे मत आहे. यापूर्वी श्री. चौथाई साहेब होते त्यांनी जेथे परवानगी देता येत नाही अशा जागांवर परवानगी दिली. त्या माध्यमातून अधिकारी / बिल्डर यांनी लाखो रुपयाची माया जमविली. असे होत असेल तर योग्य नाही. कोणताही चुकीचा निर्णय या सभागृहाने घेऊ नये नसता मी न्यायालयात जाईल व दाद मागेल याची जाणीव ठेवून निर्णय व्हावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. असे आताच प्रशासनाने सांगितलेले आहे. सभागृहात या विषयी चर्चा करण्यापूर्वी न्यायालयाचे काय आदेश आहेत त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. जयवंत ओक : पार्कीगच्या जागा रिकाम्या करू नये असे माझे मत नाही स्पष्ट दिले आहे. आताच स. सदस्य श्री. दानवे यांनी जे मत व्यक्त केले ते तंतोतंत बरोबर आहे. तसेच बघितले तर सिल लावण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही.

एखाद्या गोडाऊनला सुध्दा सील टाकण्याचा अधिकार नाही. गुंठेवारीमध्ये १००% इललिंगल घर लिगल करीत आहोत. आताच काही सदस्यांनी मागील संचिका काढण्याबाबत चर्चा केली. त्या संचिकाशी व या प्रस्तावाचा काही संबंध येत नाही. ठराव टाकून २ महिने झालेले आहे. पार्कींगच्या जागा रिकाम्या करण्याची कार्यवाही नंतर सुरू झालेली आहे. या ठरावाच्या नुसार न्यायालयात काही डायरेक्शन दिलेले आहेत काय विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : उच्च न्यायालयाचे काय डायरेक्शन आहेत यांचा खुलासा अगोदर करण्यांत यावा.

श्री. जयवंत ओक : रिट पिटीशन काय दाखल झाले. कुणी दाखल केले. न्यायालयाचा निर्णय काय झालेला आहे, याची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

मा. महापौर : न्यायालयाने काय निर्देश दिलेले आहे. त्याचा खुलासा करावा.

विधी सल्लागार : पार्कींगच्या विषया संबंधी सभागृहाने इच्छा व्यक्त केलेली आहे की, या विषयाच्या संदर्भाने न्यायालयात जे प्रकरण होते तयाची माहिति देण्या संबंधी सभागृहाने सूचित केलेल आहे. पार्कींगच्या न्यायप्रविष्ट प्रकरणा संबंधी माहिती

श्री. काशिनाथ कोकाटे : पार्कींगच्या जागेच्या संदर्भात विषय नाही. न्यायालयाने निर्देश दिलेले आहे, त्याची माहिती पाहिजे आहे.

विधी सल्लागार : सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या संबंधिचे प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये ५००९/०२ पार्कींगच्या विषयासंबंधी न्यायप्रविष्ठ असतांना सभागृहात चर्चा करणे संयुक्तिक वाटत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : कोणत्या नियमाने उत्तर देणे बरोबर वाटत नाही. याचा खुलासा द्यावा.

विधी सल्लागार : आपल्या सभा कामकाज नियमावलीमध्ये सुध्दा उल्लेख केलेला आहे की, जर भारताच्या कोणत्याही न्यायालयात व कोणत्याही प्रदेशाच्या न्यायालयात जर प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर त्यावर प्रश्न उपस्थित करता येणार नाही. आणि ही बाब माझे कर्तव्य म्हणून निदर्शनास आणून देत आहे. सभागृह निर्देशित करीत असेल तर या प्रकरणी माहिती दिली जाईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : न्यायालयाने कोणती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. जेंव्हा कार्यवाही होते कोणत्या आदेशाप्रमाणे कोणती कार्यवाही करीत आहेत याचा खुलासा करावा.

श्री. शे. ईसाक. शे. जैनोद्दिन : पार्कींगच्या संदर्भात वृत्तपत्रातील मजकूर वाचून दाखविण्यात येतो. मा. उच्च न्यायालयाच्या अहवालात दिले आहे, महापालिकेने सुरू केलेली पार्कींगच्या जागा मोकळ्या करण्यची मोहित म्हणजे धुळफेक करणे आहे. जेथे वाहतुकीला अडथळा होतो तेथे दुर्लक्ष करून जेथे वाहतुक सुटसुटीत होते कधीही अपघात घडलेला नाही. व अपघात होण्याची शक्यता नाही अशा भागातील नागरिकांना त्रास दिला जात आहे. विशेषतः य मोहमेच्या आडून अधिकारी मोठ्या प्रमाणात पैसे उकळीत आहे. जे पैसे देत नाही त्यांचेवरच कार्यवाही होत आहे. शहराच्या वाहतुकीत व्यवस्थित वळण लागावे व त्या ठिकाणी वाहतुकीला अडथळा होतो त्या भागात इमारत धारकांनी पार्कींगच्या व्यवस्था करावी. त्यासाठी महापालिकेकडून परवानगी देतांना विचार केला जात नाही. त्यानुसार अनेक इमारत मालकांनी आपल्या

इमारती बांधलेल्या आहे. आणि ज्या ठिकाणी काही वाहतुकीस अडथळा नाही. अश पार्कींगच्या जागा फेरफार करून वापरासाठी घेतल्या हे खरे. अशा जागांना महापालिकेने नियमाने कर लाऊन दंड आकारून वापरासाठी नियमित करण्यास हरकत नसावी. परंतु महापालिकेचे अधिकारी न्यायालयाचे निर्देशाकडे बोट ठेवून सर्वच जागेवरची कार्यवाही करीत आहे. जेथे पार्कींगसाठी आवश्यक जागा आहे, त्या बांधकामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. निराला बाजा येथील खटोर कॉम्प्लेक्स, चंद्रमा कॉम्पलेक्स येथल पार्कींगच्या जागेवर मोठी दुकाने थाटलेली आहे. दुकाने बांधून विकण्यात आलेली आहे. रस्त्याच्या कडेला पार्कींग केली जाते. त्यामुळे या भागात अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. मोठमोठ्या बिल्डरांनी बांधलेल्या पार्कींगच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यात येत नाही. याकडे दुर्लक्ष दिले जात आहे. अधिक चौकशी केली असता सदर संचिका पुण्याच्या राज्य विकास संचालनालयाकडे गेलेल्या आहेत. सदर संचिका परत आल्याचे सुत्रांनी सांगितलेले आहे. जे मालक महापालिकेतील अधिकाऱ्यांना पैसे देत नाही त्या मालकांना लहान लहान बाबीवरून त्रास दिला जातो त्यांचे पार्कींग तोडले जातात. अधिकारी पैशाची मागणी करीत असल्याची चर्चा जनतेमध्ये आहे. किरकोळ चूक करणाऱ्या इमारत मालकांकडून अधिकारी पैसे घेतात. नसता इमारत पाडण्याची धमकी देतात. म्हणून ज्या ठिकाणी अडथळा होत आहे, त्या बिल्डरांनी लाखो रुपयाची दुकाने बांधून विकलेली आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी तसे न्यायालयाचे आदेश आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : पार्कींगच्या जागा रिकाम्या करण्या अगोदर नाक्यावरील टपऱ्या काढल्या पाहिजे. वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

श्री. अफसर खॉन : न्यायालयाच्या निर्देशानुसार रस्त्याचे मोजमाप करून ज्या टपऱ्या येतात. ज्या इमारती येतात त्या काढण्यात आल्या पाहिजे. काही स. सदस्य सभागृहात दिशाभूल करीत आहे. ९ मीटर ते ४५ मीटर रस्त्यामध्ये येणारे सर्व पाडण्यातयावे. परंतु ९ मीटर रस्त्यावरील लहान रस्त्यावरील बांधकाम टपऱ्या काढण्याची कार्यवाही होते. मोठमोठ्या बिल्डरांच्या इमारती काढल्या जात नाही. जेथे वाहतुकीस अडथळा नाही तेथील बांधकाम पाडले जाते हे कितपत योगय आहे. कार्यवाही झाली नाही तर मी उपोषणास बसले. का कार्यवाही होत नाही. गरिबांना त्रास देण्याचा प्रयत्न प्रशासन करीत आहे. जो १००-१२५ रु. दररोजचे कमवितो अशांच्या टपऱ्या काढल्या जात आहे. मोठमोठे बिल्डरांचे बांधकाम पाडले जात नाही.

विधी सल्लागार : न्यायालयाचा जो अहवाल आहे. तो सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. दि. १७ ऑक्टोंबर २००२ च्या प्रसिध्द झालेल्या लोकमत टाईम्सच्या वृततपत्रामध्ये पार्कींगच्या जागेची दखल मा. उच्च न्यायालयाने घेतली आहे. पार्कींगच्या जागेचा गैरवापर बिल्डरकडून करण्यात येत असल्याने सदरील बिल्डरला महापालिकेतर्फे नोटीस देऊन ५ महिने झाले तरी कार्यवाही नाही. या उत्तराची दखल घेऊन मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका समजून सु मोटू म्हणून याचिका दाखल करून घेतली आहे. व महापालिका आयुक्त व शहर अभियंता यांना लेखी जबाब दाखल करण्याचे दि. २०-११-२००२ रोजी निर्देशित केले आहे. तयानुसार १८ डिसेंबर २००२ मध्ये शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. महापालिकतर्फे पार्कींगच्या जागा ज्या मंजूर

नकाशामध्ये दाखविण्यात आल्या व तया जागेचा जो गैर वापर करण्यात येत आहे. तशी प्रकरणे शोधून काढण्यात येत आहे. त्यापैकी काही ४७ व्यक्तींना नोटीस देण्यात आल्या आहे. परंतु अशा नोटीस धारकांवर कार्यवाही न करण्यात आल्यामुळे महापालिकेतर्फे बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ चे अंडर सेक्शन ४७८ अन्वये नोटीसा देण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यता आलेली आहे व या संबंधीची कार्यवाही व्यक्ती, संस्था, भोगवटादार यांनी जया मंजूर नकाशामध्ये पार्कींगच्या जागेवर जो गैरवापर केलेला आहे अशा लोकांविरुध्द कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. ही बाब लक्षात घेऊन मा. न्यायालयाने मा. आयुक्त यांना १५ दिवसाला याबाबत प्रोगेस रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश करून भविष्यात महापालिकेने बांधकाम परवानगी देतांना अशी बेकायदेशीर त्यास प्रतिबंध होईल याची काळजी घेणे बाबत निर्देशित केलेले आहे. प्रकरण ३ मार्च २००३ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार प्रशासनातर्फे अशा व्यक्ती संस्थावर कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यांत आले आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : एक जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही प्रारंभ झालेला आहे. दि. १८/१२/२००२ रोजी महापालिकेने शपथपत्र दाखल केलेले आहे. असे आताच खुलासा केला. किती बिल्डरांनी व इमारत मालकांनी अतिक्रमण केलेले आहे. अशा किती इमारतीची माहितीची यादी न्यायालयासमोर ठेवलेली आहे. किती इमारतीच्या बाबतीत कार्यवाही करणार आहोत याचा खुलासा द्यावा. १५ दिवसाला यादी सादर करण्याचे न्यायालयाचे निर्देश आहेत. त्यानुसार किती लोकांचे इमारतीची यादी सादर केलेली आहे.

श्री. सुदाम सोनवणे : पार्कींगच्या जागा व गोडाऊन या विषयाशी हा विषय सहमत आहे. पार्कींग व गोडाऊनचे जागा रिकाम्या करण्योच कार्यवाही चालू आहे. असे मत सर्व सदस्यांचे झालेले आहे. या शहरातील रहदारी आहे, त्यास अडथळा निर्माण होतो म्हणून पाडणे गरजेचे आहे. या ठिकाणी या प्रस्तावानुसार असे मत व्यक्त केले आहे कि ज्या ठिकाणी काही रहदारीला अडथळा निर्माण होत नाही त्यास १००/- रु. प्र. चौ. असा दंड आकारून पार्कींग गोडाऊनच्या व्यतिरिक्त वापरासाठी त्या जागा देण्यात याव्यात. असा ठराव आलेला आहे न्यायालयाचा जो आदेश आलेला आहे तो प्रथम या सभागृहाला वाचून दाखववायास पाहिजे होता हे सभागृह या शहराचे भवितव्य चांगल्याप्रकारे निर्माण करणार आहे. न्यायालयाचा काय आदेश आहे त्याचा खुलासा होऊन चर्चा करणे गरजेचे होते. गेल्या दोन तीन महिण्यापासून कोणत्याही प्रकारची या विषयावर चर्चा नाही. अधिकारी या विषयावर खुलासा करण्यास भित आहे, परंतु या विषयावर चर्चा होऊन योग्य खुलासा मिळण्यास व त्यावर चर्चा करण्यास सर्वच सदस्य जवळपास उत्सूक आहेत. सिडको भागाच्या जागेच्या संदर्भात जेंव्हा न्यायालयाने आदेश केले तेंव्हा सिडकोचा भाग महापालिकेकडे नव्हता. महापालिकेच्या पॅनलवरील जे नांवे वकीलाची आहे, श्री. सोमन व नावंदर यांनी महानगरपालिकेची टोटल पूर्णतः फसवणूक केलेली आहे. याचे उदा. द्यावयाचे झाल्यास महापालिकेच्या जवळपास १७०० ते १८०० केसेस न्यायालयात चालू आहे. एकही केसचा निकाल महापालिकेच्या बाजूने

लागलेला नाही. विरोध पार्टीच्या बाजूने निकाल कसा जाईल या दृष्टीने हे वकील काम करतात. सिडकोच्या बाबतीत श्री. नावंदर यांना कोणतेही मत न विचारता तयांनी स्वतःचे मत न्यायालयात व्यक्त केले होते. की महानगरपालिकेचे असे मत आहे की, सिडको हडको भागात ज्या जागा आहेत त्या जागेवरील अतिक्रमण पाडून नंतर हस्तांतरण करण्यात येईल. कोहीचा या चर्चेतून अवमान होत आहे. किंवा विरोधात होत आहे असे भाग नाही. वैयक्तिक काही लोक आहेत त्यांना असे वाटू लागले की, या शहराचा कायापालट आम्हीच करतो आहे. न्यायालयाचे आदेश मला मान्य, त्याचे पालन झाले पाहिजे. यापूर्वी सुध्दा न्यायालयाचे आदेश झालेले आहे की, ज्या मुख्य रस्तयावर टपऱ्या आहेत त्या काढण्याचे आदेश दिले त्याचे सुध्दा पालन झाले पाहिजे. याशहराचा चेहरामोहरा बदलावयाचा असेल तर जसे पार्कींग व गोडाऊनच्या जागा रिकाम्या करीत आहोत. त्याप्रमाणे ज्या १०० फुटाच्या रस्त्यावर टपऱ्या आहेत त्या सुध्दा काढल्या पाहिजे. ज्यांनी ही याचिका दाखल केली त्या याचिकेनुसार कोणत्या बिल्डरांच्या जागेच्या किती कोणत्या पार्कींगच्या जागेचा मुद्दा उपस्थित ठेवून केलेली आहे. तेथून सुरुवात करून कार्यवाही केली पाहिजे. आज जी कार्यवाही होते ती मुख्य शहर बाजूला ठेवून इतर ठिकाणी होत आहे. म्हणून ही कार्यवाही करीत असतांना सुरुवातीला मोठमोठ्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात यावे त्यात १०० फुटाचे अनेक रस्ते आहेत रेल्वेस्टेशन ते जिल्हाधिकारी कार्यालय तसेच आझाद चौक ते शहागंज, मोंढा नाका ते शहागंज. हे मुख्य रस्ते आहे, वाहतुकीत अडथळा निर्माण होतो. तेथील अतिक्रमण अगोदर काढण्यात यावे. आताची परिस्थिती अशी आहे की, ज्यांनी विनामुल्य टपऱ्या टाकल्या त्यांचवर कार्यवाही नाही ज्यांनी दुकाने विकत घेतली त्यांचेवर काग्रवाही होत आहे. बिल्डरांनी पार्कींगच्या जागेवर दुकाने तयार करून विकली आता ती पाडल्यास बिल्डरांना काही तोटा नाही यात सर्वसामान्य व्यक्तीवरच अन्याय होणार आहे. म्हणून जनतेमध्ये असे मत झाले आहे की, महापालिका काही लोकांना आश्रय देण्याचा प्रयत्न करते. व काही लोकांना जाणून बुजून त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे. शहरातील मुख्य रस्त्यावरील टपऱ्या सुध्दा काढणे आवश्यक आहे.

श्री. तकीहसन खॉन : न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही झालीच पाहिजे यात शंका ाही. या प्रकरणांत पिटीशनरला स्वतः उच्च न्यायालय आहे. न्यायालयाने आदेश केले त्यास मा. आयुक्त यांना बंधनकारक आहे न्यायालयापेक्षा हे सभागृह सर्वोच्च आहे. असे म्हणता येणार नाही. न्यायालयाने जे आदेश केले त्यानुसारच कार्यवाही झाली पाहिजे. रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झाली असेल तर ९ मी. चा रस्ता म्हणू शकतो जर रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झालेलीच नसेल तर तो रस्ता किती फुटाचा आहे हे कसे समजू शकेल. रोड वॉयडींग व्हावे त्यानंतर कार्यवाही करण्यास सोपे होईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : ज्यांनी पार्कींग तसेच गोडाऊनच्या जागा बांधून विकलेल्या आहेत असे किती बिल्डर्स आहेत याबाबतची जी यादी केलेली असेल ती यादी सादर करण्यात यावी.

श्री. स. अली सलामी. : न्यायालयाचे आदेश आलेले आहे, त्यानुसार कार्यवाही करावीच लागेल. परंतु ही कार्यवाही होत असतांनाच गोडाऊचा हा विषय आलेला

आहे. हा विषय नगररचना विभागाच्या संबंधीत येतो. संबंधीत अधिकारी ३ बैठकीपासून गैरहजर आहे. यावरून असे मत व्यक्त होते की, न्यायालयाचे जे आदेश आलेले आहे, त्यात काही बदल होऊ शकतो का व त्यानुसार काग्रवाही करू शकतो का? काही सदस्यांनी असे पत्र दिलेले आहेत की, जो विकास आराखडा आहे. त्यामध्ये परवानगी दिलेली आहे असा अंदाज येत आहे. म्हणून जे चुकीच्या पध्दतीने परवानगी देऊन कार्यवाही होत आहे यावर कार्यवाही झाली पाहिजे. बऱ्याच बिल्डरांनी अनधिकृतपणे इमारती बांधलेल्या आहेत. शॉपिंग सेंटर केले आहे. यापूर्वी जे प्र. आयुक्त म्हणून जिल्हाधिकारी होते त्यांनी शॉपिंग सेंटरवरच्या जगा रिकाम्या करून घ्याव्यात असे आदेश दिले होते. अद्याप कार्यवाही झालेली दिसून येत नाही. एकीकडे न्यायालयाचे आदेशाचे पालन केले जाते व गरिबांच्या टपऱ्या तोडण्याचा पहिला मानस असतो हे बरोबर नाही. मोठमोठ्या बिल्डरांच्या इमारतीला धक्का सुध्दा लागत नाही. काढण्यात येत नाही. तसेच बन्सीलाल नगर येथे शॉपिंग सेंटरसाठी आरक्षण होते तेथे २५/७५ प्रमाणे विकास कामासाठी जागा देऊन टाकलेली आहे. परवानगी देऊ शकतो का? यापूर्वी ही प्रकरणातील जागा विकासासाठी २५/७५ प्रमाणे दिलेल्या होत्या अद्याप हँडवर्क केलेल्या नाहीच असे असतांना ५ व्या प्रकरणाबाबत पुन्हा जागा दिलेली आहे. वारंवार या सभागृहात प्रश्न विचारलेला आहे. सभागृहाला अंधारात ठेवून मंजुरी कशी दिली याचा खुलासा व्हावा. या प्रश्नाचा खुलासा कोण देणार आहे. आज अधिकारी सभागृहात नाही यानंतर या विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात यावा बन्सीलाल नगर येथील जागेच्या संदर्भात प्रस्ताव सभागृहात का आणण्यात आलेला नाही असा प्रकार होत असेल तर हि सभा कशासाठी घेतो. गरीबाच्या टपऱ्या, तोडू नये. जो भ्रष्टाचार करतो, अतिक्रमण करतो त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. तसेच एफ.ए.एस समोर जे शॉपिंग सेंटर बांधलेले आहे ते केंव्हा तोडणार आहे याचा सुध्दा खुलासा व्हावा अधिकारी बाहेर असलेले आहे. त्यांना सभागृहात बोलवावे खुलासा घ्यावा.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : अधिकारी बाहेर बसलेले आहे, त्यांना सभागृहात बोलविण्यात यावे.

मा. महापौर : अधिकारी सभागृहात नाहीत पुढील बैठकीत याबाबतीत खुलासा करण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : नगर रचना विभागाचे अधिकारी भ्रष्टाचार करतात. संबंधित अधिकारी आता खुलासा करण्यासाठी नाहीत. प्रशासन येथे बसलेले आहे. बन्सीलाल नगर येथील जागा कोणत्या नियमाने देण्यात आलेली आहे. खुलासा द्यावा. यापूर्वी काही इमारतीमध्ये अंडर ग्राऊंडमध्ये परवानगी दिली. त्यावेळी अधिकारी लक्ष देत नाही. आता पुन्हा पाडण्याची काग्रवाही होत आहे. हि कार्यवाही करायाचे आदेश न्यायालय देते परंतु महापालिकेतर्फे यापूर्वीच याबाबतीत कार्यवाही व्हावयास पाहिजे होती.

मा. महापौर : न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी. न्यायालयाचे आदेश काय आहेत. याचा स्पष्ट उल्लेख होण्यासाठी व त्यानुसार कार्यवाही होण्यासाठी ५ तज्ञ वकीलांची समिती नेमण्यात येईल व योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री. सुदाम सोनवणे : सभागृहात अधिकारी नाही. प्रशासन खुलासा करीत नाही म्हणून सभा संपवावी येत्या २० तारखेच्या बैठकीत या विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात यावा. (याचवेळी मा. महापौर यांचे डायस समोर स. सभासद जाऊन मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. न्यायालयाची परवानगी घेऊनच सभागृहात चर्चा करणे योग्य होईल न्यायालयाचे निर्देशनाप्रमाणे कार्यवाही व्हावी. न्यायालयाने दिलेले निर्देश लक्षात घेऊन यावर चर्चा करू नये. म्हणून हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. २६/६ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७/७ :**

महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक आर्थिक वर्षात विविध क्रीडा स्पर्धा महापौर चषक क्रीडा स्पर्धा अंतर्गत घेण्यात येतात. या स्पर्धामध्ये मराठवाडा, राज्यस्तरीय, तसेच आखिल भारतीय स्तरावरील विविध खेळाडू भाग घेतात. कृपया सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील महापौर चषक या क्रीडा अंतर्गत अपंगासाठी मराठवाडा पातळीवर स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे. तसेच सदरच्या स्पर्धा जनार्थ या संस्थे मार्फत घेण्यात याव्या करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक - सौ. सधना गणेश सुरडकर
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २७/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील महापौर चषक या क्रीडा स्पर्धे अंतर्गत अपंगासाठी मराठवाडा पातळीवर स्पर्धाचे आयोजन करण्यास, तसेच सदरच्या स्पर्धा जनार्थ या संस्थे मार्फत घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-०२-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त गुरुवार, दिनांक. २०-०२-२००३ रोजी मा. महापौर विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४० वाजता सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
११) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१८) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
२०) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२३) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२४) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२५) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२८) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२९) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३०) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३१) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३२) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३३) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे

३४) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३६) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३७) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३८) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३९) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४०) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४१) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४२) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
४३) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
४४) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४५) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४६) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४८) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४९) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५०) स.स.श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरैशी
५१) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५६) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५७) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५८) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५९) स.स.श्री. शेख मुनाफ शे. यासीन
६०) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६१) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६२) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
६३) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६४) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६५) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६७) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**संवाद :**

श्री. नंदकुमार घोडेले : विषय पत्रिकेवर नंतर चर्चा व्हावी अगोदर जनरल चर्चा व्हावी. बऱ्याच दिवसापासून चर्चा झालेली नाही.

मा. महापौर : ठिक आहे. अगोदर चर्चा करण्यात यावी चर्चेसाठी एक तासाचा वेळ देण्यात येतो.

श्री. भगवान रगडे : कोणतेही विषय मंजूरकरतांना त्याचे सभागृहात वाचन झाले पाहिजे स. सदस्यांना कल्पना न देता विषय मंजूर होतात. हे बरोबर नाही.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : प्रत्येक बैठकीला मा. आयुक्त उपस्थित नसतात काही महत्वाचे मुद्दे उपस्थित करावयाचे आहे. आयुक्त म्हणून उपआयुक्त (म.) बसलेले आहे. ते खुलासा देऊ शकतील का? बन्सीलालनगर भागात विकास करण्यासाठी जागा देण्यात आली. सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेता परवानगी कशी दिली खुलासा करावा.

श्री. सुदाम सोनवणे : बन्सीलालनगर येथे एका जागेवर महानगरपालिकेने विकास करण्यासाठी परवानगी दिली. सध्या तेथे काम चालू आहे. यात नगरसेवकांची बदनामी होत आहे. आरक्षण क्र. २४, विकास आराखड्यामध्ये राखून ठेवलेला क्र. ३२४ हे दुकान केंद्र म्हणून होते. हा महत्वाच्या ठिकाणचा भूखंड आहे. बांधकाम परवानगी दिली. ७५/२५ प्रमाणे परवानी देण्यात आली. शासनाची मंजुरी आणली, काम चालू झाले हे कसे होऊ शकते. या सभागृहात तसा प्रस्ताव सुध्दा परवानगीसाठी आलेला नाही. कारण नसतांना स. सदस्य बदनाम होत आहे. बिल्डर व अधिकारी यांची साखळी झालेली आहे. सभगृहाची आवश्यकता राहिली नाही. असे झाले आहे. शासन परवानगी आणती. जागा कुणाची मान्यता कशी दिली. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव का आणला नाही. यात मा. आयुक्तांनी परवानगी दिली का? दिली असेल तर महानगरपालिकेचे हित जोपासले का? व सभागृहाची मान्यता नसतांना शासन परवानगी देऊ शकते का? या सर्व बाबींचा सविस्तर खुलासा देण्यात यावा. त्यानंतरच सविस्तर चर्चा करता येईल.

श्री. किशोर तुलशीबागवाले : यापूर्वी ४ ठिकाणच्या जागा विकासासाठी दिलेल्या आहे. त्यातील महापालिकेस मिळणारा हिस्सा ताब्यात घेतलेला आहे का? त्याचा सुध्दा खुलासा करावा.

श्री. प्रशांत देसरडा : जी परवानगी दिली. त्यात कोणत्या अटी, शर्तीचे पालन करण्यांत आले. संचिकेवर मा. आयुक्तांनी परवानगी दिली आहे का? त्यांची सही संचिकेवर आहे का? सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक वाटले नाही का? त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्री. नंदकुमार घोडेले : मा. आयुक्त बाहेर गावी गेले की, या शहरातच आहे. कुठे गेलेले आहेत खुलासा द्यावा. नसता आयुक्त म्हणून बसलेले उपआयुक्त (म.) हे सर्व प्रश्नांचा खुलासा करतील का?

प्र. आयुक्त (श्री. दिवेकर) : मा. आयुक्त हे नैमित्तीक रजेवर गेलेले आहे. सदर बैठकीस त्यांचे प्रतिनिधी म्हणून मी उपस्थित आहे.

श्री. सुदाम सोनवणे : आयुक्तांच्या जागेवर प्र. आयुक्त म्हणून उपआयुक्त (म.) बसलेले आहे. या सभागृहात जे प्रश्न विचारण्यातयेतील त्याचीउत्तरे देण्यास ते सक्षम आहे का असतील तर सभा घेण्यात यावी.

मा. महापौर : आयुक्त म्हणून उपआयुक्त (म.) हे खुलासा देतील. चर्चेला सुरुवात करावी.

श्री. दलबिरसिंग जबिंदा : सहा. संचालक नगर रचना या पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांची पात्रता काय असावी याचा खुलासा व्हावा. संबंधित अधिकारी या पदावर पात्र आहेत का?

प्र. आयुक्त (श्री. दिवेकर) : सध्या कार्यरत असलेले सहा. संचालक नगर रचना हे डेप्युटेशनवर प्रभारी चार्ज म्हणून शासनाने त्यांना येथे पाठविले आहे. ते प्र. सहा. संचालक नगर रचना म्हणून काम करीत आहे.

श्री. दलबिरसिंग जबिंदा : हे शहर ऐतिहासिक शहर आहे. या विभागसाठी चांगले अधिकारी असावेत. संबंधित अधिकारी हे सक्षम नाही. पात्रतेचा व अनुभवाचा विचार केल्यास ते या शहरातील कोणतीच कामे करीत नाही. असे दिसून येते. स. सदस्य त्यांचेकडे गेल्यास रिस्पॉन्स मिळत नाही. पार्कींगच्या जागा खाली करण्याची माहिमेमध्ये त्यांना नागरीकांचा कोणताही सहभाग नोंदवून न घेता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. हे अधिकारी सक्षम नाही. त्यांना परत पाठविण्यत यावे. त्यांची बदली करण्यात यावी. व महापालिकेतील बरेच पात्रता धारक अधिकारी आहेत त्या अधिकाऱ्यांकडे या पदाचा चार्ज देण्यात यावा.

श्री. मिर हिदायत अली : सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता बन्सीलाल नगर येथील जागा विकास करण्यासाठी परवानगी कशी देण्यात आली. मा. आयुक्तांना अधिकार होते का. आयुक्तांची सही आहे का?

श्री. जयवंत ओक : नियमानुसार परवानगी दिलेली आहे का? नियमानेदेतांना जसे सभागृहात विचारण्यात आले, त्याचे अधिकार संपूर्ण काय जे आहे त्याचा संपूर्ण खुलासा व्हावा. यात सांगितले सभागृहाची आवश्यकता आहे का, शासन प्रामाणपत्र आहे का? परवानगी जी दिली ती लिगल की इललिगल एवढाच खुलासा द्यावा.

प्र. सहा. संचालक नगररचना : बांधकाम परवानगी क्र.३२२ /२००२ यांचा आदेश दि. १४-१०-२००२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सिटी सर्व्हे क्र. १९३८१/८/१ व १९३८१/८ या दोन सि. सर्व्हे क्रमांकाचे एकूण क्षेत्र ६००६ पूर्णांक ६७ चौरस मीटर या ठिकाणी बांधकाम परवानगी मागविण्यात आलेली होती. मंजूर विकास योजनेप्रमाणे सदरची मिळकत ४० मीटर विकास रुंद रस्ता व आरक्षण क्र. ३२४ दुकान केंद्र याने भागशः बाधित होत होते. ४० मी. रुंद विकास रस्त्याने या मिळकतीचे १०७७ चौ. मीटर क्षेत्र बाधित होत होते. उक्त ठिकाणी अनुज्ञेय एफ.एस.आय. हा ३६९७ २५ चौ. मीटर रुंद आहे. सदरची बांधकाम परवानगी देतांना डेव्हलपमेंट कंन्ट्रोल रुल्स प्रमाणे सर्व बाबी पडताळून त्यास आयुक्तांच्या मान्यतेने रिझर्वेशन अक्युमेडेशनच्या धरतीवर परवानगी देण्यात आलेली आहे. उक्त प्रकरणी प्रश्न विचारल्याप्रमाणे मा. सभागृहाची परवानगी घेण्यात आलेली नाही. त्याकरिता यापूर्वी ४ प्रकरणाच्या बाबतीत सभागृहाच्या मान्यतेनुसार परवानगी देण्यात आलेल्या होत्या याचा दाखला दिला जातो ५ व्या या प्रकणात का सभगृहाची मान्यता घेण्यात आलेली नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. पूर्वीच्या ज्या ४ परवानग्या यात जय टॉवर्स, पाडळकर, अर्चना डेव्हलपर्स, मालखरे या प्रकरणात त्यावेळी कायद्याच्या स्वरुपात याची अंमलबजावणी होती. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम

१९६६ चे कलम १५२ तहत शासनाने काही मार्गदर्शकपर आदेश देऊन शहरातील विकास योजना अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून काही धोरण सुचित केलेले होते. ते मार्गदर्शकपर आदेश असल्याने व सूचनात्मक आदेश असल्या कारणाने त्याची अंमलबजावणी करताना नियोजन प्राधिकरणामधून स.सभागृहापुढे ही प्रकरणे आणण्यात आलेली होती. तत्वतः त्याची मान्यता झाल्यानंतरच त्या ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. तथापि विषयांकित बांधकाम परवानगी म्हणजेच ३२२/२००२ या प्रकरणामध्ये १४/१०/०२ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि हि परवानगी देतांना सेक्शन ३१ नुसार शासनाने जो अध्यादेश काढलेला होता त्यास कायद्याच्यारुपास त्याला ग्राह्य धरून सेक्शन ३१ नुसार बांधकाम नियमावलीचा एक भाग म्हणून घोषित केलेले आहे. ज्या वेळेस एखादा अध्यादेश हा विकास नियंत्रण नियमावलीचा व कायद्याचा भाग होतो, त्यावेळेला तो आता तत्वतः न राहता उक्त कायद्यानुसार बांधकाम परवानगी देणेस हे नगरपालिकेवर बंधनकारक होईल. आता रिझर्वेशन ॲक्युडेमेशन हा कायद्याचा भाग झाला असल्याने उक्त प्रकरणे त्यावेळेला सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी हा विषय आलेला नव्हता. तसेच टॅक्स बाबत काही मुदत देण्यात आलेली आहे. परंतु सदरचा भूखंड हा आरक्षणाखाली असल्या कारणाने आरक्षित भूखंडाचा कुठलाही ओपन टॅक्स घेतल्या जात नसे. परंतु ज्या वेळेस परवानगीला मान्यता देण्यात आली त्यावेळेस थकीत टॅक्स व करंट टॅक्स वसूल करण्याबाबत त्यांना काही महिण्याची मुदत देण्यात आलेली होती. देण्यात आलेली बांधकाम परवानगी हि नियमानुसार आहे. रिझर्वेशन क्रमांक ३२४ दुकान केंद्र (शॉपिंग सेंटर) यांचे रिझर्वेशन आहे.

श्री. प्रशांत देसरडा : २५% जागा विकास झालेल्या महापालिकेस देणार त्या बाबतीत करारनामा करून घेतला का?

श्री. संजय शिरसाठ : मुळात सुधारित कायदा केंव्हा आला . याची सर्वसाधारण सभेला कोणतयाही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. २५% प्रमाणे जो भाग महापालिकेस मिळणार त्या बाबतीत कोणतेही करारनामा करण्यात आलेला नाही. कोणत्या आधारावर महापालिकेस देण्यात येणार, भाग घेणार आहे. सध्या त्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. जो भाग महापालिका देणार आहे त्याचे ॲग्रीमेंट अगोदर करावे. तोपर्यंत चालू असलेले बांधकाम थांबवावे नंतर सुरू करण्यात यावे.

श्री. अंबादास दानवे : आताच स. अधिकारी यांनी खुलासा केला. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे नियम सांगण्यात आले. यात तात्काळ कशी कार्यवाही झाली या संबंधीचा खुलासा देत आहे. दि. ११/१०/२००२ ला शहर विकास निधी जमा केलेला आहे. त्याच दिवशी जमीन विकास शुल्क जे असते ते जमा केलेले आहे. त्यानंतर १४/१०/२००२ ला उर्वरित जे मोकळ्या जागेला टॅक्स लागतो तो १४-१०-२००२ ला भरलेला आहे. आणि बांधकाम परवानगी सुध्दा १४-१०-२००२ ला मिळालेली आहे. एकंदर तीन दिवसात हे काम झालेले आहे. दि. १४-१०-२००२ रोजी सी.एस. सोनी यांनी आयुक्तांसाठी सही केलेली आहे. संबंधीत नगर रचना अधिकारी यांची बदली या महापालिकेत माझ्या माहितीप्रमाणे १०-१०-२००२ रोजी झालेली आहे. त्याच दिवशी माहितीनुसार ते रुजू सुध्दा झालेले होते. दि. १४-१०-

२००२ रोजी सी. एस. सोनी यांनी या कामास परवानगी दिली त्या पत्रावर सही आहे. माझी माहिती चुकीची असू शकते. परंतु हा माझा आरोप आहे. तीनच दिवसात परवानगी कशी देण्यात येते. सामान्य नागरिकांना एखाद्या घराची दुरुस्ती करावयाची असल्यास त्यास परवानगी साठी ६-६ महिने लागतात आणि या कामास तीच दिवसात परवानगी कोणत्या आधारे दिली गेली हा अभ्यासाचा खऱ्या अर्थाने संशोधनाचा विषय आहे. यातून शंका निर्माण होते. यात अनेक तांत्रिक अडचणी येतात ही जागा रिझर्वेशनची आहे. जो खुलासा केला त्यात काही बरोबर आहे. जे कलम १५२ कलम ३१ वाचून दाखवले ते बरोबर आहे. परंतु ते नियम या बांधकाम परवानगीला लागू होत नाही. असे माझे मत आहे. १५२ मध्ये विकास प्राधिकरणाच्या शक्तीचा वापर म्हणून १५२ कलम आहे. कलम ३१ मध्ये विकास योजनेच्या मसुद्यास मंजुरी असे आहे. या कलमा बरोबरच ३७(अ) सुध्दा वाचण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. ३७(अ) नुसार तात्पुरता बदल करण्याची परवानगी देण्याचा शासनाचा किंवा नियोजन प्राधिकरणाचा अधिकार आहे. ही जी कार्यवाही तीन दिवसात झाली बदली होऊन आलेले श्री. आढाव याचेंकडे दि. १४/१०/२००२ रोजी चार्ज होता का, नाही? हा सुध्दा प्रश्न महत्वाचा आहे. घाई गडबडीत जाणीवपूर्वक हि परवानगी ३ दिवसात देण्यात आलेली आहे. असा स्पष्ट आरोप माझा प्रशासनावर आहे. ३७(अ) नुसार नियोजन प्राधिकरणाचा म्हणजेच महापालिकेचा अधिकार आहे. डेव्हलपमेंट कंट्रोल्स रुल आहे. परंतु हा धोरणात्मक निर्णय होता. सर्वसाधारण सभेपुढे येण्याची आवश्यकता होती, कारण हि जागा रिझर्वेशनची होती. या जागेवर महापालिका फंडातून खर्च करून बीओटी पध्दतीने या जागेवर शॉपिंग सेंटर करू शकलो असतो का? याचा विचार करण्यासाठी व धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हे सर्वसाधारण सभेपुढे आणण्याची आवश्यकता आहे. या सभागृहाच्या अधिकारावर गदा आणण्याचा काम होत आहे. असा माझा आरोप आहे. या प्रकरणाच्या बाबतीतून कडक कार्यवाही, शिस्त लावण्याची कार्यवाही केली नाही. तर लोकप्रतिनिधींना या महापालिका सभगृहात विचारले जाणार नाही. कोणताही अंकुश राहणार नाही असे माझे मत आहे. प्रशासन एकीकडे कोणतेही निर्णय घेईल ते नागरिकांना भोगावे लागतील आताच सांगितल्या प्रमाणे की, एकीकडे नगरसेवकांची बदनामी केली जाते. परंतु एकीकडे अधिकारी चुकीच्या पध्दतीने कार्यवाही करतात. व एकीकडे धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करतात. लोक प्रतिनिधींना अंधारात ठेवले जाते. तसेच शासनाचे धोरणाचे समोर स्वरुप ठेवून कार्यवाही होते. हे चुकीचे आहे. एवढ्या तात्काळ परवानगी कशी दिली जाते. याचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. माझ्या मते मा. आयुक्तांना अमेरिकेला जायचे होते. म्हणून घाईघाईने परवानगी दिलेली आहे का? तसेच दि. १४/१०/२००२ रोजी श्री. आढाव हे अधिकारी कार्यरत असतील तर ही परवानगी अपोआपच रद्द करावी लागेल, म्हणून या प्रकरणात सर्व शंका निर्माण होत आहे. लोक प्रतिनिधी यांचे अधिकारावर गदा आणली जाते. म्हणून या परवानगीला त्वरित स्थगिती देण्याची आवश्यकता आहे. महापालिकेकडे आर्थिक तरतूद नाही म्हणून ७५/२५ प्रमाणे विकास करण्यासाठी दिलेच पाहिजे यास माझा विरोध नाही. परंतु

सर्वसाधारण सभेपुढे तसा प्रस्ताव यावयास पाहिजे होता नियमांने असे दिले की, जाहीर नोटीस प्रसिध्द करून अशाप्रकरणात जनतेच्या सुध्दा निदर्शनास आणून द्यावे लागते. नियमातच दिलेले आहे. म्हणून या परवानगीचा फेर विचार करून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. १५२ नुसार व ३१ नुसा मा. आयुक्तांना अधिकार आहे. परंतु राखीव भूखंडाच्या बाबतीत अधिकार नाही. शहराचा विकास आराखडा जो आहे त्यात ज्या ज्या जागा राखीव आहे. तयात आयुक्तांना निर्णय घेण्याचे अधिकार नाही. हे अधिकार या नियोजन प्राधिकारणालाच आहे. त्यामुळे संबंधित विभागाने किंवा प्रशासनाने गैरअर्थ लावून अशा परवानग्या देऊ नये. म्हणून योगय तो निर्णय घ्यावा.

प्र. सहा. संचालक नगर रचना : दिनांक १०-१०-२००२ रोजी रुजू होण्याचे मला आदेश होते. परंतु मी दि. १६/१०/२००२ रोजी महापालिकेमध्ये रूजू होऊन या पदाचा चार्ज घेतलेला आहे.

श्री. संजय शिरसाठ : जी बांधकाम परवानगी दिली ती अनधिकृत आहे. ते बांधकामात स्थगित ठेऊन चौकशी व्हावी सर्वसाधारण सभेसमोर येऊ द्यावे ज्या अनेक त्रुटी आहेत त्यावर चर्चा करता येईल.

श्री. स. अली सलामी : आताच खुलासा झाला शासनाच्या निर्णयाचा उल्लेख केला जात आहे. सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न अधिकारी करतात. शासनाचे जे निर्देश दिले ते निर्देश या प्रकरणात केलेल्या कार्यवाहिस लागू होत नाही. आरक्षण बदलण्याचे अधिकार शासनास आहे. परंतु जो प्रश्न येथे उपस्थित नव्हता आरक्षण हे शॉपिंग सेंटर साठीचे होते खाजगीत कुणाला द्यायचे कि नाही हा अधिकार सभगृहाचा आहे. सभागृहाला अंधारात ठेवून ३ दिवसात परवानगी देऊन कार्यवाही करण्यात आली. सामान्य नागरिक गरीब असलेला बांधकाम परवानगीसाठी किंवा गिरणीच्या एन.ओ.सी. साठी गेल्यास ६-६ महिनणे कार्यालयात चकरा मारतात. परवानगी दिली जात नाही. अधिकाऱ्यांनी परवानगी कोणत्या नियमाने दिली या बाबतीत योग्य ती चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर व प्रशासनावर ४२० चा गुन्हा दाखल करावा प्रशासन लाखो रुपयाची मालमता ३ दिवसात देत असेल तर योग्य नसून महापालिकेच्या हिताचे निर्णय प्रशासन घेत नाही. यापूर्वी ४ जागाचा विकास करण्यायाठी दिले होते. अद्याप महापालिकेत येणाऱ्या जागेचे हेडवर्क केले नाही. वारंवार सभागृहात या बाबतीत चर्चा झाली. कोणती जागा देणार त्याचा करानामा नाही. केंव्हा देणार सभागृहाला माहिती दिली जात नाही यात महापालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. एखादी खोली भाड्याने द्यायची असेल तर सर्व विचार करून मालक खोली देतात. परंतु येथे तसा विचार केलेला नाही. जी ५ व्या प्रकरणाची परवानगी दिली हे योग्य नाही हि जनतेची मालमत्ता असून जनतेसाठी या मालमत्तेचे चांगल्या प्रध्दतीने संरक्षण करणे या प्रशासनाचे काम आहे. याबाबत योग्य चोकशी व्हावी. जनतेला सोयी, सुविधा दिल्या गेल्या पाहिजे, त्या दिल्या जात नाही. म्हणून नगरसेवकांना तोंड द्यावे लागते. मा. आयुक्त अशा प्रकारच्या जागा विकास करण्यासाठी देऊन मोकळे होतात चुकीच्या पध्दतीने काम होते. स. सदस्य कामाच्या बाबत मागणी करतात मला येथे राहायचे नाही असे उत्तर आयुक्त देतात. परंतु जातांना त्यांचेकडून चोरी केलेला हिशोब चुकता करून घ्यावा

व या प्रकरणात कठोर अशी चौकशी होऊन योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे असे माझे मत आहे. अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत ठोस निर्णय या सभागृहाला घ्यावे लागतील तरच अंकुश या सभागृहाचा प्रशासनावर राहिल. जे ते आयुक्त येतात नगरसेवक काहीही बोलतात असे सांगतात. नगरसेवक वेडसर आहेत का काही बोलण्यास प्रतयेक आयुक्त येतात त्याचा फायदा करून जातात. जहागिरदार साहेब आले त्यांनी जातांना मेघा सिटी प्रकरण करून ठेवले. यात नगरसेवकांची बदनामी होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे. हि बदनामी मिटवायची असेल तर या प्रकरणाची चौकशी होऊन दोषीवर योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. व चौकशी होत नाही तोपर्यंत आयुक्तांची सुध्दा बदली होऊ नये.

सौ. निखत परवीन : जे आयुक्त आले त्यांनी नगरसेवकांवर ठपका ठेऊन गेलेत. परंतु जे चुकीचे काम आयुक्त करतात त्या बाबतीत जनतेला माहित नसते. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारत देशात महापालिकेची बदनामी झालेली आहे. मी ट्रेनींगसाठी गेले होते तेथे सुध्दा तीच चर्चा होते. बाहेरील लोक बोलतात तुमच्या महापालिकेत कुणी आयुक्त येण्यास तयारच नाही. आयुक्त जेंव्हा चुका करतात त्याबाबतीत काय निर्णय घेणार हि दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व या प्रकरणात जे जे कुणी अधिकारी असतील त्या बाबतीत चोकशी करून योग्य ती कार्यवाही व्हावी.

श्री. भगवान घडामोडे : एका जागेच्या संदर्भात बरीच चर्चा झाली. यात असे मत व्यक्त केले गेले की, यामुळे नगरसेवकांचीच बदनामी होते. संबंधी अधिकारी यांनी प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून योग्य खुलासा मांडला. यावर आयुक्तांनी सही केली असली तरी व ते शासनाचे प्रतिनिधी असले तरी महापालिकेचा कारभार चांलल्या रितीने चालावा, अंकुश राहावी, शहराचा विकास व्हावा, त्यातून त्यांनी काम करावयास पाहिजे यासाठी त्यांना शासनाने पाठविले आहे. शासनाची जरी यास परवानगी मिळाली असेल तर परवानगी देऊन महानगरपालिकेच्या हिताचे हे काम होत आहे की, नाही या बाबत त्यांनी सदर संचिकेवर त्यांचे मत नोंदवावयास पाहिजे होते. परंतु तसे झाले नाही. घाईत परवानगी देऊन टाकली. इतर काही बाबतीत संचिकेवर शेरे येतात. फाईली थांबविल्या जातात. जेंव्हढी माहिती या सभागृहातील सदस्यांना या शहराची आहे त्या जागेची आहे तेंव्हढी माहिती शासनास नसते. त्या त्या जागेवर काय करायचे, काय केल्यास महापालिकेच्या फयदा होईल, हे येथील नागरिकच जाणून घेऊ शकतात. यापूर्वीही ४ ठिकाणच्या जागेवर विकास करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. कोणताही फायदा महापालिकेस झाला नाही. अद्याप जागा २५% ताब्यात घेतलेल्या नाही. काही बाबतीत नकाशे गहाळ झाले. काही डेव्हलपर्सनी महापालिकेस मिळणारी २५% जागा ताब्यात घेण्या बाबत पत्र व्यवहार केले परंतु महापालिकेने त्या सुध्दा जागा जो की २५% हिस्सा ताब्यात घेतलेला नाही. तेथे कर्तव्यदक्ष म्हणून जबाबदारी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दाखविली नाही. परंतु जेथे महापालिकेच्या हिताचे नाही अशा मोठमोठ्या जागा बिल्डरांच्या घशात देऊन गोरगरिब जनतेचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहोत हे बरोबर नाही. जनता आम्हाला जाब विचारणार आहे. आताच स. सदस्य

दानवे यांनी कलमानुसार खुलासा मांडला. शासनाची परवानगी जरी असेल तरी सुध्दा सभागृहाचे मत घ्यावयास पाहिजे होते. शासनाचा, न्यायालयाचा हे सभागृह अवमान करणार नाही. याची भिती दाखवून कोणतीही कामे करून घेऊ नये. महापालिकेचे तसेच जनतेचे हित जोपासावे. याच अनुषंगाने मी एक वर्षापूर्वी पत्र देऊन शहरातील किती जागा संस्थेला भाड्याने दिलेल्या आहे. कुणाकडे दिल्या त्याच्या अटी काय, ते संस्था चालक वापर करतात का परंतु अद्याप माहिती दिलेली नाही. प्रशासन सभागृहात माहिती देत नाही. नगरसेवकांना माहिती देत नाही. हे प्रशासन ढेपाळलेले आहे. अकार्यक्षम झालेले आहे. व विनाकारण स. सदस्यांची बाहेर बदनामी केली जाते. जी परवानगी दिली त्यामुळे सभागृहाची परवानगी घेतलेली नाही. सभागृहाचा अवमान केलेला आहे. म्हणून या बांधकामास स्थगिती देऊन चौकशी केली पाहिजे. नसता पुन्हा अधिकाऱ्यांची अशी काम करण्यास मानसीकता वाढीस लागून अशी कामे होत राहतील. गरीब नागरिकांना अनेक वेळा एखाद्या परवानगीसाठी खेट्या माराव्या लागतात तो नागरिक त्रासून जातो व त्याची भावना या महापालिके विषयी वेगळी होते.६-६ महिने परवानगी दिली जात नाही. परंतु अशा एका मोठ्या कामासाठी ३ दिवसात परवानगी देण्यात येते. एवढे प्रशासन विकास करण्यास उत्साही आहे का? म्हणून या कामात त्वरित स्थगिती देऊन योग्य ती कार्यवाही व्हावी. महापालिकेचे हित जोपासेल असाच निर्णय घ्यावा.

मा. महापौर : बांधकामास स्थगिती देऊन चौकशी व्हावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या दोन बैठकी पासून वेळेवर सभा सुरू होत आहे. सुरळीतपणे काम चालू आहे. त्याबद्दल आपले सभागृहातर्फे अभिनंदन करतो. बन्सीलालनगर येथील जागेच्या संदर्भात सर्वच सदस्यांनी चर्चा केली. त्यावर आपण निर्णय दिला. त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. निर्णय झाल्यानंतर पुन्हा बोलणे बरोबर नाही. परंतु काही बाबी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो जी परवानगी दिली अशा पध्दतीने यापूर्वी चार जागेचे विकास करण्यास परवानगी दिली. महापालिकेस जो २५% हिस्सा द्यावयास पाहिजे तो आजपर्यंत हॅंडवर्क झालेला नाही. स्थायी समितीमध्ये चर्चा झाली. जय टॉवर्सच्या जागेचा नकाशाच संचिकेमध्ये नसल्याचे आढळून आले. एकीकडे न्यायालयाच्या आदेशानुसार बेसमेंटवर दुकाने झालेली असेल तर ते पाडावे. माझ्या मते जय टॉवर्सच्या बेसमेंटवर ॲग्रीमेंट मध्ये भाजी मार्केट दाखविले कीती व कोणती दुकाने महापालिकेस दिली. त्यापासून किती उत्पन्न माहापालिकेस आले. या सर्व बाबींची चौकशी करण्याची अत्यंत गरज आहे. संचिकेमध्ये बदल करून संगनमताने कागदपत्र काढले जातात व कारभार सुरळीत चालता सर्व सदस्य इमाने इतबारे काम करीत असतांना काही चूक झली की, त्यांचेवर शिंतोडे उडविण्याचे काम केले जाते व स. सदस्यांनाच वेळोवेळी बदनाम केले जाते. ते थांबविण्याची गरज आहे. या सभागृहाची प्रतिमा उज्वल करण्यसाचे काम निश्चितपणे झाले पाहिजे. ज्या जागेवर परवानगी दिली. जी चर्चा होत आहे, त्या जागेच्या क्षेत्रफळा विषयी सुध्दा तफावत आहे हे निदर्शनास आणून देतो. विरोधी पक्षेनता यांनी या संदर्भात माहिती घेतली असता संबंधी व्यक्तीला २६०५ चौ. मी. मध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे. व ६११ चौ. मी. वरील काम म्हणजेच तेथील

विकास जागा महापालिकेस मिळणार आहे. ११ व्या कॉलम मध्ये हे दाखविले १४ मध्ये अर्जदारास पुन्हा बांधकाम क्षेत्र २६०५ चौ. मी. दिलेले आहे आणि महापालिकेचे क्षेत्र असे ३२१७ चौ. मी. असून हे वगळले तरी तेव्हढेच क्षेत्र जशाच्या तसे ठेवण्याचे काम यातून झालेले आहे. जे की, सदर मालकाचे काही नुकसान होणार नाही त्यांच्या मालमत्तेला धक्का लागणार नाही. या दृष्टीने काम होत आहे. तीन दिवसात सर्व कार्यवाही झाली. १० तारखेला चार्ज घेण्याचे अधिकाऱ्यांना आदेश असतांना त्यांनी १६-१०-०२ रोजी घेतला कदाचित त्यांना उशीरा रुजू करून घेतले असेल सही कुणी केली. का केली खोलवर जायचे नाही शासनाचे आदेश फक्त रिझर्वेशन उठविण्याचे असेल परंतु महापालिकेच्या हिताचा निर्णय असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावयास पाहिजे होती. सभागृहाला अंधारात ठेवण्याचे कारण काय? गेल्या वर्षभरात १ ते २ बांधकाम परवानगी दिलेल्या आहे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न थांबलेले आहे. या कामाच्या संदर्भात चौकशी होण्याचे आदेश करून कार्यवाही व्हावी.

श्री. जगदिश सिध्द : या कामाच्या संदर्भात संचिका २००१ ला दाखल झालेली होती. ३ दिवसात कार्यवाही झालेली नाही. स्थायी समितीच्या बैठकीत या संदर्भात चर्चा होऊन चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. अद्याप चौकशी चालू आहे. म्हणून हे काम स्थगित ठेवणे योग्य नाही. विधी सल्लागार यांचा सल्ला घ्यावा. त्यानंतरच हे काम थांबवावे. जे ४ बांधकाम परवानगी यापूर्वी दिलेल्या तया प्रकरणात योग्य कार्यवाही झाली नाही. म्हणून या प्रकरणात होणार नाही असा अर्थ लावणे बरोबर नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : आताचे स. सदस्य श्री. दानवे यांनी तारीख वाईज माहिती दिली. सर्व बाबीचा त्यांनी खुलासा केलेला आहे. १२/१३-१०-२००२ ला सुट्टी होती. जी माहिती देण्यात आली त्यांच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

श्री. जगदिश सिध्द : परवाना क्र. ३२२/२००२ त्याच खाली फाईल क्र. ४७६/१७/०१ याचा अर्थ २००१ ला संचिका दाखल झालेली आहे. नोटीस दिल्यानंतर पैसे केंव्हा ही भरू शकतात. पैसे एक दिवसात भरून देऊ शकतात. संचिका काढण्यास सांगावे. तरच चौकशीचे आदेश द्यावेत.

श्री. सुदाम सोनवणे : महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. आपण जो निर्णय घेतला स्थगिती दिली त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. माझ्या मते तर हि परवानगी सुध्दा रद्द करावी. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम नुसार कलम ४४.४५ नुसार दिलेली परवानगी सुध्दा रद्द करू शकतो. नियमानुसार परवानगी रद्द केल्यास नागरिक सुध्दा धन्यवाद देतील व या सभागृहाच्या सदस्यांना बदनामी पासून वंचित करावयाचे असेल तर ठोस असा निर्णय घ्यावा. या सभागृहाला कुणाची जुगलबंदी, करायची नाही. किंवा महापालिकेची / बिल्डराची बाजू घ्यायची नाही. काही सदस्य विरुध्द बाजूने बोलतात तर काही एकमेकांच्या फेवर मध्ये बोलतात. त्यामुळे वृत्तपत्रात बातम्या झळकतात व समागृहाची प्रतिमा कमी होत चाललेली आहे. हे वाचवण्यासाठी माझे असे मत आहे की, कलम ४४,४५ नुसार सभागृहाच्या सम्मतीने दिलेली परवानगी रद्द करावी. ३-४ वर्षापूर्वी वाचले असेल व्यास नावाच्या व्यक्तीने असा प्रकार पुणे महापालिकेशी केला होता. याची राजकीय वर्तुळात चर्चा झाली. रमन झा नावाचे आयुक्त तेंव्हा तेथे

होते. हि जमीन जवळपास $१^{१/२}$ (दिड एकर) एकर आहेत महापालिकेच्या आरक्षणामुळे ती महापालिकेच्या मालकीची झालेली आहे. आजची किंमत या जागेची १० कोटीच्या आसपास असेल. असे प्रकार होत असेल तर मी सुध्दा एक जमीन व्यावसायिक आहे. मी १० कोटी देतो. मला जमीन देता येत असेल तर कार्यवाही होईल का? यात आयुक्तांनी संबंधित लोकांना अधिकाऱ्यांना हाताशी धरून असे प्रकार केले. यापूर्वी जहागिरदार आयुक्त होते. त्यांनी हि मेघासिटी प्रकरणात ३०-३२ लक्ष रुपये जमा केले या प्रकरणात काही अधिकारी व व्यक्ती तसेच पदाधिकारी, आयुक्त गुंतलेले आहेत. ६० लक्ष रुपयाचा भ्रष्टाचार यातून झालेला आहे. आताच मी पुण महापालिकेचे उदा. देत होतो. व्यास नावाच्या व्यक्तीला जागा दिली होती. झा नावाचे आयुक्त तेथे होते. प्रकरण न्यायप्रविष्ट झाले व त्यात आयुक्त व नगर सचिव यांचेवर  नयायालयाने ताशेरे ओढले होते. कोर्टाने त्यांना दोषी ठरविले. तो प्रकार या प्रकरणाच्या बाबतीत होत आहे. आपण परवानगी रद्द केली नाही तर मी न्यायालयात दाद मागेल. सन २००१ मध्ये स्थायी समितीच्या सभेस या जागेच्या बाबतीत चर्चा होती. प्रकरणास २००२ मध्ये परवानगी मिळाली २००१ मध्ये चर्चा करण्याची गरज होती का? या प्रकरणामध्ये व्यक्तीगत अभ्यास केला तर हे प्रकरण आर्थिक घोटाळ्याचे आहे. स्थगित ठेवण्याबाबत निर्णय दिला. कलम ४४,४५ नुसार अधिकाराचा वापर करून हि परवानगी रद्द करावी. जेणे करून जी बदनामी सध्या होत आहे ती थांबेल.

श्री. सुनिल मगरे : एक तासा पासून चर्चा चालू आहे. ४-५ महिण्यापासून नगर रचना विभागाचा एकत्रित कारभार चालू आहे. या शहरातील सर्व सामान्य नागरिकांचा महापालिकेकडे बांघण्याचा दृष्टीकोन वेगळा झालेला आहे. पार्कीग जागा रिकाम्या करण्याचे काम या विभागातून नियमाने होत नाही. त्यातच बन्सीलालनगर भागात मोठ्या आकाराचा भूखंड विकास काम करण्यासाठी देण्यात आला. जेष्ट स. सदस्य श्री. सोनवणे, श्री. दानवे यांनी आपले मत व्यवस्थित पणे व्यक्त केले. त्यांचे मताशी मी सहमत आहे. केवळ तीन दिवसात परवानगी दिल्या जाते परंतु सर्वसामान्य नागरिकांने परवानगीची मागणी केली तर किमान त्या व्यक्तीला नगर रचना विभागात १०० चकरा माराव्या लागतात. ले-आऊटचे बरेच प्रकारण माझ्या वॉर्डातील आहे. श्री. आढाव साहेब तसेच नगर रचनाकार श्री. निकम यांचेकडे चकरा माराल्या आता पर्यंत प्रकरण निकाली काढले नाही. ३ दिवसात एवढ्या मोठ्या जागेवर परवानगी दिली जाते. हि निदंनीय बाब आहे. या कामास स्थगिती देऊन नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या पाहिजे. त्यांचे मालमत्तेची चौकशी झाली पाहिजे. तर जी बदनामी होत आहे ती थांबेल. त्यांची सी.बी.आय. मार्फत चौकशी व्हावी.

श्री. तकीहसन खॉन : या प्रकरणात चौकशी करून संबंधित जे कुणी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. तीन दिवसात परवानगी दिली. तो प्रश्न निर्माण होत नाही. परंतु इतरांना परवानगी देतांना सुध्दा अशीच तात्काळ कार्यवाही का होत नाही हा प्रश्न आहे. ६० लक्ष घेतले, ३०-३२ लक्ष घेतले असा आरोप केलेला आहे. या संदर्भात दाद मागण्यासाठी न्यायालयात सुध्दा कुणी नागरिक, अधिकारी जाऊ शकता असे आरोप करणे कितपत योग्य आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : य जागेच्या संदर्भात बऱ्याच स. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले आहे. मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकार वापरून परवानगी दिली असेल तर आताच संबंधित अधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे जे की, डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर झाल्यानंतर तशा प्रकारचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात आलेले होते. गॅजेटमध्ये सुध्दा आयुक्तांन परवानगी देण्याचे अधिकार दिलेले आहे. निर्णय घेतांना त्या प्रकाणाची चोकशी केली पाहिजे या मताशी मी ही सहमत आहे. कोणत्याही अधिकारी पदाधिकारी यांचेवर आरोप करतांना त्याबाबतीत अगोदर चौकशी होणे गरजेचे आहे. यापूर्वी सुध्दा अनेक प्रकरणात घोटाळे झाले म्हणून आरोप करण्यात आले. जसे मेघासिटी प्रकरण चौकशी अंती कुणी अधिकारी त्यात गुंतलेले नव्हते असे निष्पन्न झालेले आहे. पुरावे नसतांना आरोप करणे चुकीचे आहे. म्हणून या प्रकरणाची चौकशी व्हावी नंतरच या कामास स्थगिती देण्यात यावी. तसेच मा. आयुक्त सुध्दा आजच्या सभेला उपस्थित नाही म्हणून एकच बाजू ऐकून निर्णय देणे योग्य नाही.

श्री. स. अली सलामी : या सभागृहातील जे सदस्य आहेत ते सी.आय.डी. मध्ये काम करीत नाही. जे की, सभागृहात जाऊन पुरावे जमा करू शकतील. जी ही चर्चा असते ती जनतेमध्ये असते, शहरात त्यांच्या बातम्या प्रसिध्द होतात. त्यावर चालते. तसेच जे स. सदस्यांच्या नजरेस येते सर्वांत मोठा पुरावा हाच आहे. महानगरपालिकेची करोडो रुपयांची संपत्ती ३ दिवसात देण्यात येते. तर यात काहींना काही तरी गोडबांगल आहे. त्यानुसारच कार्यवाही करता येते. प्रत्येक बाबींचे पुरावे द्यावे असे म्हटल्यास योग्य होणार नाही. व पुरावे सुध्दा मिळणार नाही. काल एक सदस्य बाटलीमध्ये पाणी घेऊन आलेले होते. त्यांनी त्या संदर्भात चर्चा केलेली नाही त्याप्रमाणे पुरावे आणू शकत नाही. उद्या कुणी असेही म्हणू शकेल की, सदरचे पाणी हे नाल्यातून आणलेली आहे. पुराव्याची गरज नाही. कुणी असेही म्हणू शकेल की, सदरचे पाणी हे नाल्यातून आणलेले आहे. पुराव्याची गरज नाही. कुणी असेही म्हणूनशकेल की, सदरचे पाणी हे नाल्यातून आणलेले आहे. पुराव्याची गरज नाही. ज्याप्रमाणे कार्यवाही ३ दिवसात झाली यावरूनच दिसून येते. रंगारगल्ली भागात एका व्यक्तीचे दुकाने जळालेले होते. एन.ओ.सी. साठी ८-१० महिण्यापसून चकरा मारतात. देण्यात येत नाही कर भरावा म्हणून सांगतात. दुकान मालकावर भरण्यास तयार नाही. म्हणून एन.ओ.सी. देता येत नाही असे लिहिले जाते. तेथे लाखो रुपयाची मालमत्ता ३ दिवसात परवानगी दिली जाते हे कसे होऊ शकते. आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी सांगितल्याप्रमाणे कलम ४४,४५ प्रमाण परवानगी रद्द करून नंतर चौकशी करावी. असा निर्णय घेण्यात यावा.

श्री. सुदाम सोनवणे : मागे सुध्दा रामतारा हौसिंग सोसायटी मध्ये सर्व्हे नं. ९,११ मधील बांधकामास स्थगिती दिलेली होती. सध्या त्या ठिकाणी पुन्हा काम चालू आहे. या सभागृहात स्थगिती दिली जाते. परंतु अधिकारी वर्ग हात मिळवणी करून पुन्हा कामे चालू केली जातात. म्हणून या सभागृहाने एक ठराव पास करून नगर रचना विभागातील जे अधिकारी कर्मचारी १०-१० वर्षापासून काम करतात त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत त्यांचे मालमत्तेची चौकशी करण्यांत यावी. तसेच पुणे महानगरपालिकेमध्ये जे जागेचे प्रकरण

घडले त्या धरतीवरच याही महानगरपालिकेत प्रकरण होत आहे. यात आयुक्तांनी मोठा घोटाळा केलेला आहे. बदली करून जाण्याच्या मनस्थितीत आहे. असे एक शासनास पत्र लिहून जो पर्यंत या प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यंत आयुक्तांची बदली येथून करण्यात येऊ नये. असे पत्र मुख्यमंत्री यांना देण्यात यावे. या प्रकरणाची चौकशी न करता कलम ४४,४५ प्रमाणे परवानगी रद्द करण्यात यावी. हे प्रकरण मंत्रालयातून एकमेकांच्या संगनमताने करण्यात आलेले आहे. यात ६० लक्ष रुपये घेतलेले आहे. यात आयुक्त, महापालिकेचे काही पदाधिकारी तसेच अधिकारी तसेच एका पक्षाचे आमदार यांचा समावेश आहे. सर्वांची यादी आपल्यापुढे सादर करेल. यादी सादर केल्यानंतर रद्द करण्याचा सुध्दा निर्णय आपण घेतला पाहिजे. नांवे ऐकण्याची तयारी असेल तर ती सुध्दा सांगू शकतो.

श्री. पांडुरंग तायडे : सहा.संचालक नगर रचना पासून सर्वच या विभागातील कर्मचाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत त्यांचे मालमत्तेची चौकशी व्हावी.

मा. महापौर : या संदर्भात चौकशी करूनच कामास स्थगिती दिली जाईल.
(याच वेळी महापौर यांचे डायस समोर बरेच स. सदस्य येऊन मोठमोठ्याने बोलतात. कामास स्थगिती द्यावी नंतर चौकशी करावी मागणी करतात.)

श्री. सुनिल मगरे : यावर मतदार घेण्यात यावे त्यानुसारच निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.
(दुपारी १.१० वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुहा २.२५ वाजता सुरू झाली.)

सौ. चंद्रभागाबाई दाणे : सदरचे बांधकाम थांबवावे. चौकशी व्हावी नंतरच पुढील कार्यवाही करावी. नसता आम्ही या बाबतीत उपोषणास बसणार आहोत.

मा. महापौर : सदरचे बांधकामाबाबत ८ दिवसात चौकशी करून अहवाल सादर करावा तोपर्यंत बांधकामास स्थगिती देण्यात येते. चौकशी करून या कामाचा अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात यावा. तसेच या कामाच्या संदर्भातील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी आणावा.

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : एक माजी नगरसेवक यांनी शासन तसेच या प्रशासनाला धोका देण्याचे काम सर्रास होती घेतलेले आहे. आज सुध्दा मी नगरसेवक आहे. म्हणून ते पत्रव्यवहार करतात. त्यांचे नांव आहे मोहसीन अहेमद त्यांनी प्रशासनाची फसवणूक केलेली आहे. पत्रव्यवहार नगरसेवक म्हणून करतात त्यांचेवर कार्यवाही करण्याचे प्रशासनास आदेश करावेत. व पोलिस गुन्हा नोंदवावा.

मा. महापौर : संबंधित माजी नगरसेवक हे नगरसेवक म्हणून पत्रव्यवहार करीत असतील तर त्यांचेवर कार्यवाही होण्यासाठी प्रशासनाने पोलिसात पत्र देऊन कार्यवाही करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : हा विषय या सभागृहाचा होत नाही, रुलींग देणे चुकीचे होईल.

श्री. भगवान रगडे : आताच एका भूखंडावर बांधकाम परवानगी देण्यावरून सभागृहात चर्चा झाली. नगररचना विभागाकडून काही बाबतीत गोलमोल प्रस्ताव येतात. त्यावर सभागृहात चर्चा करू दिली जात नाही. लगेच सभा संपविली जाते हे बरोबर नाही. दि. २०-१२-२००२ च्या सभेतील विषय क्र. ८/२ मध्ये नगररचना विभागामार्फत प्रस्ताव सादर झालेला होता. त्यात १४ एकर जमीन दर्शविलेली आहे कोण कशी जागा हडप करतात अशा जागा हडप

होऊ नये असे माझे मत आहे. या १४ एकर जमिनीमध्ये दशनाम गोसावी समाजाला १ एकर जमीन देण्यात आली. प्रस्ताव वाचून दाखविता सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दशनाम गोसावी समाज स्मशान भूमी साठी गट क्र. ४ मधून (०.४० आर) एक एकर जमीन देण्याचे प्रस्तावित करून दि. १९/०५/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ठराव क्र. ३९१/३ नुसार ठरावास मंजुरी देण्यात आलेली होती. परंतु प्रस्तावित जागा खोलगट भाग असल्याने भरती करून विकसित करावी लागली असती आणि सदर जागा दशनाम गोसावी समाज यांनी सुध्दा नाकारली, त्यामुळे दि. १७/०७/२००२ रोजी मा. महापौर, उप महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, वॉर्डाचे स. नगरसेवक, मा. उपआयुक्त (प्र.) मा. सहाय्यक संचालक, नगररचना उप अभियंता (उद्यान) मालमत्ता अधिकारी यांनी स्थळ पाहणी करून व पंचनामा करून एक एकर जागा खालील चतु: सीमे प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे सर्व औपचारिकता पूर्ण करून शासनाची रितसर मान्यतेच्या अधिन राहून जागा दशनाम गासोवी समाज स्मशान भूमीसाठी प्रदान करण्यांत आली आहे. यात चतु:सिमा अशी देण्यात आली की, नगर रचना विभागाच्या वतीने त्यास नकाशा म्हटले जाते. तो नकाशा योगय रितीने दिला गेला पाहिजे. नकाशा कॅबीन मध्ये तयार करून कार्यवाहरी करणे योग्य नाही. जागेची पाहणी करून कार्यवाही होत नाही. यात पूर्वेस महापालिकेची सहान जागा तसेच पश्चिमेस सरकारी नाला,उत्तरेस सहान जागा मांडकी रोड असे दाखविले ज्यो वेळेस पाहणी केली त्यावेळी उत्तरेस असलेल्या सहान जागेत सैलानी बाबाची दर्गा होती. आजा सुध्दा अस्तित्वात आहे. सैलानी बाबाला किती जागा देण्यात आली त्याचा नकाशामध्ये उल्लेख नाही. तसेच हि १४ एकर जागा कुठे आहे. त्याचाही खुलासा व्हावा. उद्या काही समाजाचे लोक म्हणून शकतील की, सैलानी बाबाचा दर्गा इललिगल असलेला आहे तो काढण्यात यावे. तेथे समशानभूमी करण्यांत यावी मागणी करतील अशा वेळी हिंदु/ मुस्लिम समाजामध्ये वाद निर्माण होऊ शकतो. शहरात आपणां सर्वांना शांतता राखायची आहे. दर्गा असतांना सहान जागा आहे असे दाखविण्यांत आले. म्हणून नगर रचना विभागाने नागरिकांना संबंधित सदस्यांना आडचणीत आणू नये. असे गोलमोल प्रस्ताव ठेवून कार्यवाही करू नये. दर्गाची जागा नकाशामध्ये दाखविण्यात यावी अशी दुरुस्ती करावी. कॅबीनमध्ये बसून प्रस्ताव तयार केलेला आहे. १४ एकर जागा आजही आहे असे दाखविण्यता आले. परंतु प्रत्यक्षात आज ती जागा अस्तित्वात नाही. तेथे अतिक्रमण करून एका व्यक्तीने प्लॉट पाडून विक्री केलेले आहे. अशा पध्दतीने महापालिकेच्या जागा हडप होत असेल तर यास कोण जबाबदार आहेत. म्हणून जी महापालिकेची १४ एकर जागा आहे, त्याचे मोजमाप झाले पाहिजे. ती जमीन अस्तित्वात राहिली पाहिजे. अशा पध्दतीने कार्यवाही करण्यांत यावी. जमीन अस्तित्वात आहे किंवा कसे याचा खुलासा द्यावा.

प्र. सहा. संचालक : (नगर रचना) पुढील बैठकीत या संबंधीचा सविस्तर खुलासा देण्यात येईल.

श्री. संजय शिरसाठ : तीन महिने झाले प्रस्ताव आलेला होता. सर्व माहिती अधिकाऱ्यांना असते. परंतु टाळाटाळ करण्यात येते.

प्र. सहा. संचालक (नगर रचना) सदर प्रकरणाची संचिका तपासून लेखी अहवाल सादर करण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : १४ एकर जागा अस्तित्वात आहे किंवा नाही याची मोजणी करून घेण्याचे आदेश द्यावे.

श्री. भगवान रगडे : या जागेची चतु:सिमा काय आहे. त्या जागेची मोजणी करून दर्गाची जागा निश्चित करण्यांत यावी. नकाशामध्ये यावयास पाहिजे माझ्या मते १००X५० चौ. फुट जागा दिलेली होती.

मा. महापौर : नियमाप्रमाणे जागा मोजणी करून घ्यावी व पुढील कार्यवाही करावी. दर्गाची जागा किती व कुठे आहे याचीही तपासणी करून जागा निश्चित करून कार्यवाही करण्यात यावी.

श्री. जयवंत ओक : कालच एक महापालिकेतर्फे जाहीर प्रगटन देऊन नळ योजनेच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. अभय योजनेच्या बाबतीत चर्चा करीत आहेत. १० दिवसात हि योजना राबविण्याचे सुचविले त्यानंतर अनधिकृत असले तर १ मार्च पासून कार्यवाही करणार त्यात जे की, पोलिस केस वगैर वृत्तपत्रात दिले. परंतु जे वृत्तपत्र वाचतात त्यांनाच या योजनेबाबत समजेल. जे वाचत नाही त्यांना या योजनेची माहिती जागणार नाही. म्हणून जे १० दिवस राहिले आहे यासाठी जनतेला माहिती होण्यासाठी एक रिक्षा नाही. १० रिक्षा या शहरामध्ये या योजनेचा प्रचार करण्यासाठी जनतेत जन जागृती निर्माण करण्यासाठी चालवाव्या. ज्या भागाता अनधिकृत नळ झालेले आहे ते कायम करण्यासाठी. या योजनेचा फायदा घ्यावा. व त्यानंतर म्हणजेच १ मार्च नंतर अनधिकृत नळ कनेक्शन दिसल्यास पोलिस केस करणार असेही घोषवाक्या सुध्दा प्रचार करण्याच्या माध्यमातून असू द्यावे. यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही. आपले अधिकारी सक्षम आहे, त्यांना रिक्षाद्वारे प्रचार करण्यायाठी अधिकार द्यावे. महापौर यांनी पत्रकार परिषद घेऊन वृत्तपत्रात या योजने बाबत लोकांचा प्रतिसाद कसा जास्तीत जास्त येईल. म्हणून कार्यवाही करण्याचे ठरवावे. म्हणून सुरुवातीला छावणी ते चिकलठाणा व किराडपुरा ते बेगमपुरा या भागात रिक्षा फिरवून प्रचार करावा. तसेच जे लोक एकदम २४००/- रुपये भरून या योजनेत सहभाग नोंदवित नसतील, गरीब असेल तर त्यांना सवलत देऊन १२००/-, १२००/- रुपये असे दोन हप्त्यात देण्यास तयार असतील तर तशी कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी जी सूचना मांडली त्यांबाबतीत प्रशासनाने योग्य ती नियमाने कार्यवाही करावी.

श्री. भगवान रगडे : महापालिकेच्या गेटसमोर रिपब्लीकन कामगार संघटनेतर्फे कर्मचाऱ्यांचे उपोषण चालू आहे. येणाऱ्या अर्थसंकल्पात बोनससाठी तरतूद करण्यांत यावी व कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा म्हणून उपोषणास बसलेले आहे. यापूर्वीच मी पत्र देऊन बजेटमध्ये बोनससाठी तरतूद करण्याचे सुचविले होते. परंतु बोनससाठीच्या तरतुदीचा उल्लेख बजेटमध्ये करण्यात आलेला नाही. जे उपोषणास बसलेले आहे त्यांचे संदर्भात विचार करून येणाऱ्या अर्थसंकल्पात तशी बोनस देण्यासाठी तरतूद करण्यात यावी. सभा संपल्यानंतर उपोषणर्थींना भेट देऊन त्यांचा प्रश्न सोडवावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. भगवान रगडे यांनी जी बोनस बाबतची सूचना मांडली याची प्रशासनाने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. आता विषय क्र. १ ला सुरुवात करण्यात येते.

**विषय क्र. २८/१ :**

दिनांक ०७/०१/२००३ आणि ०८/०१/२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : दिनांक ०७, ०८/०१/२००३ रोजीच्या इतिवृत्तातील ठराव क्र. १७/०१ पान क्र. २१ व क्र. ७ मध्येअशी दुरुस्ती करावयाची आहे की, चुकीने बदल करण्यात आलेला आहे. मा. महापौर यांनी अशी रुलींग दिली होती की, जकातीचे उद्दिष्ट पूर्ण झाले तर जकात अधिक्षक यांचे अभिनंदन करू व उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. याप्रमाणे दुरुस्ती करावी.

मा. महापौर : दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : दिनांक ०८/०१/२००३ च्या इतिवृत्तातील पान क्र. २ वर क्रमांक दोन मध्ये मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी थकबाकीवर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारणी करण्यात येऊ नये असा निर्णय घेतलाला आहे. परंतु आजही व्याज आकारणी होते. एक नव्हे तर तीन वेळेस रुलींग होऊनही व्याज आकारणी केली जात असेल तर योग्य नाही. प्रशासनास तसे आदेश द्यावेत नसता व्याज द्यावे. जनतेला सांगता येईल की व्याज आकारणी होत आहे.

मा. महापौर : झालेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

श्री. सुदाम सोनवणे : मोठ्या प्रमाणत तुट निर्माण होत असेल तर मालमत्ता करावर आकारावे पाणीपट्टी वर आकारण्यात येऊ नये. पुढील अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर योग्य तो निर्णय दोन्हीच्या बाबतीत घेता येईल.

मा. महापौर : याबाबतीत ठराव टाकून निर्णय घेता येईल.

श्री. जयवंत ओक : दि. ०७/०१/२००३ च्या इतिवृत्तातील पान क्र. ११ वर आपण गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने विशेष सभा आयोजित करण्यात येईल असे रुलींग दिलेले आहे. अनधिकृत वस्त्यामध्ये कोणतीही कामे होत नाही. का सभा बोलाविण्यात आलेली नाही.

(याच वेळी बरेच स. सभासद मा. महापौर यांचे डायस समोर जाऊन मोठमोठ्याने मागणी करतात काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : येत्या २५ तारखेला गुंठेवारीच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी बैठक बोलविण्यात येईल.

श्री. सुदाम सोनवणे : दि. १८/१०/२००२ च्या बैठकीतील ठराव क्र. ७०६/१, ७०७/२ स्थगित ठेवण्यात आलेले होते. मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : सदरचे प्रस्ताव रेग्युलर बैठकीमध्ये घेण्यात येतील.

**ठराव क्र. २८/१** : दिनांक ०८/०१/२००३ च्या इतिवृत्तातील पान क्र. २१ वर ठरावात क्र. ७ मध्ये जकातीचे उद्दिष्ट पूर्ण झाले तर जकात अधिक्षक यांचे अभिनंदन करू व उद्दिष्ट पूर्ण

झाल्यास त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी अशा दुरुस्तीसह दि. ०७/०१/२००३ व ०८/०१/२००३ च्या सभेत इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९/२** : कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रसताव सादर केलेला आहे की, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार (परिपत्रक महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ना. पापु-१०००/प्र.क्र.४१९/पापु २२ दिनांक २७/०९/२०००) राज्यातील सर्व अ वर्ग नगरपालिका व सर्व महानगरपालिका यांनी पाणी पुरवठा योजनेचे विशिष्ठ मुदतीत पाणी लेखा परिक्षण व उर्जा लेखा परिक्षण तसेच पाण्याचा हिशेब बाह्या वापर कमी करण्याच्या कामासाठी आणि ऊर्जा बचतीसाठी कार्यक्रम हाती घेण्यात यावा अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत.

सध्या औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा होता व त्या करिता धरणातील पाणी विद्युत पंपाद्वारे खेचून नंतर ते औरंगाबाद शहरास पुरविले जाते. त्याकरिता मोठ्या प्रमाणात विद्युत खर्च येतो, त्यामुळे महानगरपालिकेने पाणी लेखा परिक्षण व उर्जा लेखा परिक्षण करून घेतल्यास पाणी पुरवठा यंत्रणे मधील विद्युत वापराबाबत योग्य ती काळजी घेण्यासाठीच्या तसेच हिशोब बाह्य पाणी वापरामधील एकूण त्रुटी लक्षात येतील व या त्रुटींची दखल घेऊन काही उपाय - योजना केल्यास पाणी पुरवठा योजना सक्षमपणे राबवून हि योजना कमी खर्चात चालविणे शक्य होईल. तसेच यात महानगरपालिकेचा आर्थिक कायदा होईल असा अंदाज आहे.

या प्रस्तावा सोबत पाणी लेखा परिक्षण व उर्जा लेखा परिक्षण करिता तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या संस्थाची यादी जोडलेली आहे या संस्थाची सूची महाराष्ट्र राज्य शासनाने तयार केलेली आहे. या संस्था मधून स्पर्धात्मकरित्या दर मागवून पाणी लेखा परिक्षण व उर्जा लेखा परिक्षण इत्यादी काम करता येतील.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

श्री. अंबादास दानवे : संस्थेची यादी सोबत जोडलेली आहे असे म्हटलेले आहे. परंतु यादी दिलेली नाही. प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

मा. महापौर : सर्वांना संस्थची यादी पुरविण्यात यावी. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. २९/२** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नापापु-१०००/प्र.क्र. ४१९/पापु २२ दिनांक २७/०९/२००० अन्वये सूचना केल्यानुसार पाण्याचा हिशोब बाह्य वापर कमी करण्यासाठी आणि उर्जा बचतीसाठी कार्यक्रम हाती घेण्याचे दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचे विशिष्ट मुदतीत पाणी लेखा परिक्षण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/३** : दिनांक १९ मे २००१ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३९३/५ अन्वये तिसऱ्या आघाडीचे गटनेते यांच्या करिता स्वतंत्र कॅबीन लागणारे आवश्यक फर्निचर, व शिपाई उपलब्ध करून देण्यास मंजूरी दिली आहे. या मंजुरीनुसार कार्यलयीन पत्र क्र. मनपा/अस्था-१/२००१/१३७५ दिनांक ३०/०४/२००१ आधारे सांस्कृतिक विभागाचे दालन, विस्तार दूरध्वनी, शिपाई, फर्निचर इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दिनांक ०५/१०/२००२ च्या सर्वसाधारण सभेचत तिसरी आघाडीतील सदस्यांनी विरोधी पक्ष नेते यांना सह्या देऊन पाठींबा दिला आहे. या सदंर्भात स. सदस्य श्री. अंबादास दानवे व श्री. किशनचंद तनवाणी यांनी तिसऱ्या आघाडीची कॅबीन त्यांचेकडून काढण्याबाबत मुद्दा उपस्थित केला. याबाबत प्रशासनाने तात्काळ नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे रुलींग मा. महापौर यांनी दिले आहे. दिनांक ०५/१०/२००२ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि. १८-१२-२००२ सभेत कामय करण्यांत आले आहे.

सबब तिसऱ्या आघाडीच्या गटनेत्यांना ठराव क्र. ३९३/५ दि. १९ मे, २००१ च्या सर्वसाधारण सभेच्या ठरवानुसार देण्यात आलेल्या कार्यालयीन सर्व सुविधा काढून घेण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३०/३** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ३९३/५ दिनांक १९/०५/२००१ नुसार तिसऱ्या आघाडभ्च्या गटनेत्यांना पुरविण्यात आलेल्या कार्यालयीन सुविधा काढून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषयपत्रिका*

**विषय क्र. ३१/१** : प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील मराठवाडा विद्यापीठास १४ जानेवारी १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. सदरील नामांतरासाठी विविध समाजिक संघटना तसेच राजकीय संघटना व दलित कार्यकर्त्यांनी आंदोलने केली तसेच पोचीराम कांबळे, जनार्धन मवाडे, गोविंद भुरेवार, दिलिप रामटेके, चंदर कांबळे, नारायण गायकवाड, शरद पाटोले, रोशन बोरकर, कु. सुहासिनी बनसोडे, कु. प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, कवी विलास घुगरे आणि पँथर गौतम वाघमारे यांनी बलिदान केले. अशा मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनामध्ये शहीद झालेल्यांची नांव व त्यावर आंदोलनाचा घटना क्रम, नामांतर आंदोलनात सक्रीय असलेल्यांची नांवे अशा आशयाचा नामांतर शहिद स्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाच्या प्रमुख प्रवेशद्वारा जवळ रिपाई (संकल्पीत) गाडे गटाच्या वतीने उभा करण्यात आला आहे.

सदरील नामांतर स्तंभ जनसाठी महानगरपालिकडे समर्पित करण्यात येत आहे. सदरील स्तंभ स्विकारणेस व तयाची योग्य ती देखभाल करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे,
चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक - श्री. रमनकुमार पंडागळे,
श्री. माणिक साळवे

**संवाद**

श्री. गणेश तांबे : आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळी बसवण्याचा ठराव पास केला त्यास शासनाची परवानगी मिळालेली होती. वेगवेगळ्या जेंव्हा परवानगी

मिळाली त्या वेळेसच शासनाने काही निर्देश घातलेले आहे तो रस्ता किती फुटाचा असला पाहिजे. आयलंड कसा असला पाहिजे जो प्रस्ताव मंजूर करणार आहोत, रस्त्यात अडथळा निर्माण होत असेल तर अगोदर बाजूला करण्यात यावे. नंतरच या बाबतची कार्यवाही करण्यात यावी. तोपर्यंत हा ठराव रद्द कररण्यांत यावा. हा आमच्या वॉर्डातील प्रश्न आहे. कुणी ठराव टाकून रस्त्यामध्ये आणण्यात येत असेल तर त्यास आम्ही मान्य करणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नामांतर चळवळीमध्ये सर्वांनी भाग घेतलेला आहे. सर्वांनी सहभाग घेतलेला आहे. आणि तो आपण शहीद स्तंभ म्हणून बोलता तर त्यावर शहीदांचीच नांवे आसावयास पाहिजे. त्या स्तंभावर हयात असलेल्या व्यक्तींची नावे असतील आम्ही आंबेडकर वादी चळवळीतील व्यक्ती किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा व्यक्ती कदापि मान्य करणार नाही. अशी घुसखोरी करून ठराव कुणी आणत असेल तर तो नामंजूर करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : हा ठराव मंजूर करावयाचा की नाही हा महापौरांचा, सभागृहाचा अधिकार आहे जो प्रस्ताव ठेवला तो आमचे स. सदस्यांना समजला नाही असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसविण्यासाठी महापालिकेने शासनाकडे परवानगी मागितलेली होती. परवानगी देत असतांना काही अटी घातलेल्या होत्या. त्यात २३ ते २४ अटी होत्या म्हणून महापालिका व विद्यापीठ त्या अटी पूर्ण करू शकत नव्हते. त्यामुळे अनधिकृत पुतळा बसविण्यात आला. शासनाची नाचक्की होते म्हणून शासनाने परवानगी दिली त्यानुसार महापालिकेने पुतळा व आयलंडसाठी ७५ लक्ष रुपये खर्च केलेले आहे. महापालिकेने त्या ठिकाणी पुतळा बसविला व त्यानंतर दोन पुतळे तेथे एकत्रित असू नये असा विचार समाजातून पुढे आला व एक पुतळा तेथून काढून घेण्यात यावा असा विचार झाला. त्या ठिकाणचा पुतळा काढून घेण्यात आला. विद्यापीठाच नामांतरासाठी जे शहीद झाले, जे हयात आहे त्यांनी भाग घेतला अशा लोकांच एक स्मारक व्हावे, म्हणून ठरले त्यानुसार एका च्ळवळीतील लोकांनी एक स्मारक उभारलेले आहे. तेच स्मारक महापालिकेस अर्पण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता देण्यात येत आहे. दुसरी बाब अशी की, जर हे विकास आराखड्यामध्ये येत असेल तर ते बाजूला करावे. वॉर्डाचा प्रश्न आहे. वॉर्ड हा कुणाचा नसतो हे स. सदस्यांनी लक्षात घ्यावे. महानगरपालिकेने मोठमोठे प्रोजेक्ट उभे केलेले आहे. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र हे कुणाच्या वादामध्ये नाही. हि कुणाची वैयक्तिक प्रॉपर्टी नाही. वॉर्डाच्या सदस्यांची नाही. स. सदस्यांच्या वॉर्डात येत असले तरी ते स्मारक डेव्हलप करून महापालिकेस अर्पण करण्यात येत आहे. जे शहिद झाले त्यांची नांव व ज्यांनी नामांतर चळवळीमध्ये आपली १७ ते १८ वर्ष घातलीत अशा लोकांची नांवे त्या स्तंभावर असावी. कुणाचे चुकून राहिले असेल तर त्यांचीही समावेश करण्यात येईल. वैयक्तिक कुणी वादाचा मुद्दा उपस्थित करू नये अशी विनंती आहे.

श्री. गणेश तांबे : शहीद स्तंभ व्हावा या मताशी मी आहे. महानगरपालिकेला जे अटी घालून दिलेल्या आहे. त्याप्रमाणे व्हावा. शहीद स्तंभावर जे हयात असलेले लोक

आहे, त्यांची नांवे दाखविण्यात येऊ नये, जे जे लोक नामांतरासाठी शहीद झालेले असतील त्यांचीच नांव त्या स्तंभावर असावी. यास सर्व स. सदस्य सहमत असतील असे माझे मत आहे. हयात असलेल्याची नांव टाकायची असेल तर मी याचा निषेध करतो.

श्री. भगवान रगडे : स्तंभावर फक्त शहीदांचेच नांव असावी असे माझे मत आहे. नामांतरासाठी सर्वच तळागळातील लोकांनी १७ वर्ष लढा दिला. अनेक जण त्या बळील गेले. लाठीमार झाले. अनेकांना मारहाण झाली. अनेक मोर्चे झाले. जो स्तंभ महापालिकेडे घेणार आहे त्या स्तंभावर जे हयात आहे त्यांची नांवे आहे ती नसावी जे ७५ लक्ष रुपये स्तंभासाठी, पुतळ्यासाठी सुशोभिकरणासाठी ठेवण्यात आलेले होते. त्या पध्दतीने नकाशा तयार करण्यात आलेला आहे. व मध्येच कुणी स्तंभ उभा करण्याचा प्रयत्न होत असेल तर चालणार नाही. या स्तंभाबाबत मागे बरेच वाद निर्माण झाले म्हणून तो महापालिकेच्या जागेवर केलेल्या असून अतिक्रमण केलेले आहे. तो काढण्यात यावा. व या नामांतरामध्ये जे शहीद झालेले आहे त्यांचे नावाचे एक स्मारक व्हावे यास आम्ही सहमत आहे. व असे रस्त्यामध्ये हे स्मारक होऊ नये. जे शहीद झालेले आहे त्यांचे नावाचे एक स्मारक व्हावे यास आम्ही सहमत आहे. व असे रस्त्यामध्येच हे स्मारक होऊ नये. जे शहीद झाले त्यांची यादी महापालिकेने द्यावी यावर एक समिती नेमावी.

सौ. कुसुमबाई : जे शहिद झालेले आहेत त्यांची नांवे त्या स्तंभावर असावी.

श्री. माणिक साळवे, श्री. काशिनाथ कोकाटे :

ज्यांनी नामांतर चळवळीमध्ये भाग घेतला त्यांची नावे राहिली असेल तर ती टाकण्या यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा विद्यापीठ गेट समोर लावण्यात यावा अशा प्रकारचा ठराव या सभेने उत्साहाने पारीत केलेला आहे. यासाठी जवळपास १ कोटी रुपये लागणार होते त्यास मंजुरी दिली. अनेक ठराव या सभागृहाने पास करून शासनाकडे पाठविले त्यात आपण सर्व मागे पडली परंतु पुतळा बसविण्याच्या ठरावास सर्व पदाधिकारी प्रशासनाने प्रयत्न केलेले होते. सर्वच स. सदस्यांची भावना होती की, त्या ठिकाणी एक चांगल्या प्रकारे स्मारक व्हावे. परंतु त्यानंतर याचे श्रेय कुणी घ्यायचे हे सुरू झाले. खर्च महापालिका करणार मंजुरी शासन देणार असे श्रेय घेण्यासाठी वाद चालत असेल तर कदापि कुणालाही मान्य होणार नाही. या ठिकाणी चर्चा होते. पुन्हा पुन्हा प्रस्ताव येतात हे बरोबर नाही. सर्वांना विश्वासत घेऊनच कार्यवाही झाली पाहिजे. महापालिकेने मोठा खर्च केला, शासनाची परवानगी आणली आणि उद्‌घाटन करू शकतो नाही. अशी परिस्थित निर्माण झाली होती कुण्या एकट्यामुळे हे झालेले नाही जे झाले त्या त्या खर्चाचे निर्णय याच सभागृहाने घेतलला आहे. त्याचे संपूर्ण श्रेय याच सभागृहाला आहे. प्रत्येकाला आंदोलने, मोर्चे, आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. परंतु या सभागृला वेठीस धरण्याचे कारण नाही असे माझे मत आहे. यासाठी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी पाठपुरावा करून कार्यवाही केलेली होती. या सभागृहानेच त्यास मान्यता दिली. म्हणून सर्वांचा सन्मान तेथे झाला पाहिजे. म्हणून वैयक्तिक श्रेयासाठी या सभागृहात कुणी मत मांडू नये. योग्य तो निर्णय घेण्यात यावा. या स्तंभामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील त्या पूर्ण करून अहवाल मागवावा व आयलंडचे सौंदर्यीकरण कसे

होईल यासाठी प्रयत्न करावे. तेथील पुतळ्याची शान कशी राहिल, १४ एप्रिल तसेच १४ जानेवारी संक्रांतीच्या दिवशी तेथे बरेच लोक जातात त्यांचा आदार कसा राखता येईल हे सुध्दा पहावे.

मा. महापौर : हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

श्री. जयवंत ओक : या विषयालाच वेळ न देता या सभागृहाच्या संमतीने काय दुरुस्ती करता येईल ती करण्यांत यावी. सर्वांना सुचक अनुमोदक म्हणून नांवे घ्यावीत. स. सदस्य श्री. तांबे यांनी जी भावना व्यक्त केली तो स्तंभ पुतळा त्यांचे वॉर्डात आहे. मी हि त्या वॉर्डाचे सदस्य असतो तर तीच भावना व्यक्त केली असती. योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. महापौर : यानंतर यावर शहीदांचीच नांवे येतील.

श्री. भगवान रगडे : या स्तंभावर शहीदाचे नांव असेल पाहिजे जे हयात आहे त्यांचे नांवे नसावी. तरच हा प्रस्ताव मंजूर करावा. कुणीही कसा ठराव घेऊन येईल मंजूर करणार काय? श्री. गंगाधर गाडे, श्री. शेगावकर यांची नांवी आहेत ती काढावी.

श्री. माणिक साळवे : या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. आता विषय क्र. २ वर चर्चा करावी.

श्री. भगवान रगडे : फक्त शहीद झालेल्यांचीच नांवे त्या शहीद स्तंभावर असावी अशी मागणी आमची आहे. नसता हा प्रस्ताव मंजूर करू नये, असे रुलींग द्यावे. (यावेळी मा. महापौर समोर स. सदस्य गर्दी करतात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री. गणेश तांबे : जे शहीद झालेले आहेत त्यांचीच नावे त्या स्तंभावर असावी.

मा. महापौर : यापुढे जे बांधण्यात येईल त्यावर शहीदांची नांव टाकण्यात यावी. विषय मंजूर करण्यात येतो.

श्री. गणेश तांबे : जो निर्णय दिला तो स्पष्ट नाही निर्णय देण्याची आपली क्षमता नाही.

श्री. भगवान रगडे : विषय क्र. १ मध्ये फक्त शहीदाचींच नांव असावी नसता आमचा हा प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध आहे.

**ठराव क्र. ३१/१** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रमुख प्रवेशद्वाराजवळ रिपाई (संकल्पीत) गाडे गटाच्या वतीने उभा करण्यात आलेला नामांतर शहीदस्तंभ महानगरपालिकेकडे समर्पित करून स्तंभ स्विकारणेस व त्याची देखभाल करणेस तसेच यापुढे जे बांधण्यात येईल त्यावर शहीद झालेल्यांची नांवे स्तंभावर टाकण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : विषय क्र. २,३,४ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्र. ३२/२** : प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विभाग क्र. ४ येथे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने तसेच सॅनेटरी इन्स्पेक्टर देखील कमी असल्याने विविध प्रमाणात (या विभागांतर्गत येणार) साफसफाई योग्य त्या प्रमाणात होत नाही. तसेच महापालिकेची आर्थिक परिस्थिती विकट असल्याने नवीन कर्मचारी भरती करता येत नाही.

तरी या सर्व बाबींचा विचार करून प्रभाग क्र. ५४ सुराणानगर या भागात साफसफाई करणेसाठी हा वॉर्ड खाजगी तत्वावर घंटागाडी मार्फत साफसफाई साठी देण्यांत यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्री. राजु शिंदे

**ठराव क्र. ३२/२** : प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे विभाग क्र. ४ मध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने विविध प्रभागात साफसफाई योग्य त्या प्रमाणात होत नसल्याने प्रभाग क्र. ५४ सुराणानगर या भागात साफसफाई करणेसाठी हा वॉर्ड खाजगी तत्वावर घंटागाडी मार्फत साफसफाईसाठी देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३/३** : प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पत्रकार हा लोकशाहीतील ४ था स्तंभ असून व्यावसायिक या सदरात मोडत नाही. पत्रकारामार्फत जनजागृती, क्रांती व लोकहित उपयोगी कामे होत असतात, याची दखल घेवून गाळा विनाशुल्क (मोफत) देण्यांत यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे,
श्री. माणिक साळेव,
श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
अनुमोदक - श्री. रतनकुमार पंडागळे
श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव क्र. ३३/३** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघात सादीयार सिनेमागृहातील महापालिका व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील गाळा विनामुल्य (मोफत) देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/४** : उपआयुक्त (प्रशासन) प्रस्ताव सादर करीत आहे की, मयत कर्मचारी श्री. पंडित उदावंत माजी शिपाई यांची मा. लोक आयुक्त यांच्या दिनांक २६/०२/९९ च्या पत्रान्वये दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ (६३९८) दिवस (मृत्यू पर्यंतचा कालावधी) दिनांक २८/०५/९९ चे आदेशान्वये असाधारण रजा मंजूर करण्यात येवून निवृत्ती वेतनांसाठी अर्हताकारी सेवा म्हणून धरण्यांत आली होती. व पेन्शन बाबतीची सर्व कार्यवाही करून प्रकरण पेन्शन विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयस पाठविण्यांत आले होते. व त्यानंतर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक २०/०६/२००१ अन्वये आवश्यक कागदपत्रासह महालेखाकार नागपूर-२ यांचेकडे पाठविण्यात आले आहे.

त्यानंतर महालेखाकार नागपूर-२ यांना सदरील कर्मचाऱ्यांचा गैरहजेरीचा काल दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ हा काळ (Qualifing Service) मंजूर केल्यानंतर त्यांना पेन्शनेच आर्थिक फायदे देता येईल म्हणून सुचित केले होते.

त्याप्रमाणे सदरील प्रकरणी नेमणूक प्राधिकरण (Appointing Authority) औरंगाबाद महानगरपालिका आहे. व महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा हि धोरणात्मक (Compitant authority) योग्य निर्णायक अधिकारी असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचा गैरहजेरीचा काळ दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ हा काळ दिनांक २८/१०/२००२ रोजी

संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ५७४/४ अन्वये अर्हताकारी सेवा म्हणून मंजूर करण्यांत आलेला आहे.

परंतु मा. उप. लोक आयुक्त यांचे पत्र क्र. अ.शा.प.क्र. उलोआ/कॉम/५०३०/९८ (अेअेडी) दिनांक ३१/१२/२००२ चे पत्राद्वारे कळविले आहे की, श्री. पंडित उदावंत, शिपाई यांच्या गैरहजेरीचा कालावधी अर्थात दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ अर्हताकारी सेवा गृहित धरावे अशी कोणत्याही प्रकारची शिफारस या कार्यालयातून केली गेलेली नाही. त्यामुळे त्यांच्या कुटूंबियांना निवृत्ती वेतन द्यावयाचा प्रस्ताव त्यांची पूर्वीची सेवा अर्थात १९६३ ते १९७७ पर्यंतची सेवा लक्षात घेवून ठरावयाचे आहे. आणि नंतर गैरहजेरीच्या कालावधीत अर्हताकारी सेवा म्हणून ठरविण्याची आवश्यकता नाही. हे स्पष्ट करण्यांत येत आहे. म्हणून त्या आधारावर या प्रकरणांत निवृत्ती वेतन ठरवावे म्हणून पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे मा. उप लोक आयुक्त यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या पत्राद्वारे दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ ह्या कालावधीत गृहित धरण्यांत आलेली अर्हताकारी सेवा ठराव क्रमांक ५७४/४ दिनांक २८/०२/२००२ रद्द करणेस्तव व श्री. पंडित उदावंत हे आजारी कारणास्तव गैरहजर असल्यामुळे त्यांना दिनांक ०१/०४/७७ रोजी रुग्णता सेवा निवृत्त केले अशी कार्यात्तर मंजूर मिळणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेगपुढे मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ३४/४** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मयत कर्मचारी श्री. पंडित उदावंत माजी शिपाई यांची मा. उप लोकआयुक्त यांच्या दिनांक २६/०२/९९ च्या पत्रान्वये दिनांक ०२/०४/७७ ते ११/१०/९४ (६३९८) दिवस (मृत्यू पर्यंतचा कालावधी) दिनांक २८/०२/२००२ च्या सर्वसाधाण सभेमध्ये ठराव क्र. ५७४/४ अन्वये मंजूर करण्यांत आला होता. परंतु पुन्हा मा. उप लोक आयुक्त यांचे दिनांक ३१/१२/२००२ चे पत्राद्वारे संबंधितास त्यांच्या गैरहजेरीचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून ठरविण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन द्यावयाचा प्रस्ताव त्यांची पूर्वीची सेवा अर्थात १९६३ ते १९७७ पर्यंतची सेवा लक्षात घेवून ठरवावी व उपरोक्त ठराव रद्द करून श्री. पंडित उदावंत हे आजारी कारणास्तव गैरहजर असल्यामुळे त्यांना दिनांक ०१/०४/७७ रोजी रुग्ण सेवा निवृत्त केले. अशी कोर्योत्तर मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन, गण, मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २५-०२-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंगळवार, दिनांक. २५ फेब्रुवारी २००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली  महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचेसह कार्यालयीन अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१०) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
११) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१२) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१३) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१४) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१५) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१६) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१७) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१८) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१९) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२०) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२१) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२२) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२४) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२५) स.स.श्री. नासेरखॉन सरदार खॉन
२६) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
२७) स.स.श्री. सुदाम रामदास सोनवणे
२८) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
२९) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३०) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय

३३) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
३४) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
३५) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
३६) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
३७) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
३८) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३९) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४१) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४२) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
४३) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
४४) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
४५) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना
४६) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
४७) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
४८) स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खॉ
४९) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५०) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
५१) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
५२) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५३) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
५४) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
५५) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
५६) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.सौ. सलमा बानो मीर महंमद अली

**विषय क्र. ३५/१ :** गुंठेवारी प्रकरणाबाबत विचार विनिमय करणे.

**संवाद :**

सौ. चंद्रभागाबाई दाणे : सर्वप्रथम गुंठेवारी प्रकरणासंबंधी सर्वसाधारण सभा आयोजित केल्याबाबत मा. महापौर यांचे अभिनंदन.

श्री. नंदकुमार घोडेले : गुंठेवारी बाबत शासनाकडून काही मार्गदर्शन तत्वे सांगितली असतील तर ती सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावी.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : बऱ्याचशा लोकांना गुंठेवारी पध्दत काय आहे. याची अजिबात माहिती नाही. फक्त लोकांना वर्तमान पत्रामध्ये आलेल्या बातमीची माहिती आहे. बाकी कोणत्या पध्दतीने काय करावे त्यासाठी आवश्यक लोणारी कोणकोणते कागदपत्रे लागतात याची काहीही कल्पना नागरिकांना नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : शासनाकडून प्राप्त गुंठेवारी पध्दतीची संपूर्णपणे माहिती सभागृहाला होणे आवश्यक आहे. आणि जोपर्यंत शहरातील नागरिकांना गुंठेवारी पध्दतीची सविस्तर माहिती होत नाही तोपर्यंत आणखी दोन महिने या प्रकरणास मुदतवाढ द्यावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : शहरातील प्रत्येक वॉर्ड निहाय भागातील नागरिकांना गुंठेवारी प्रकरणांची माहिती पूर्णपणे होणेसाठी जनजागरण होणे आवश्यक आहे. त्यानुसार या महानगरपालिकेने जाहिरात वगैरे काहीही केलेले कुठेही दिसत नाही. नागरिकांकडून गुंठेवारी बाबत पैसे पूर्ण भरून घेतल्यास आणि इतर काही नागरिक दुसऱ्या शहरातील याच प्रकरणी कोर्टात धाव घेतलेली असल्याने कोर्टाने या निर्णयाच्या विरोधात निकाल दिल्यास आपण काय करणार?

श्रीमती पार्वती मानकापे : बऱ्याचशा नागरिकांना गुंठेवारी पध्दत काय आहे. याची कल्पना नाही. आणि म्हणून याबाबत वॉर्डनिहाय चर्चा व्हावी आणि नागरिकांना पुरेपूर माहिती व जनजागरण होणेसाठी प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. व नागरिकांपर्यंत याची माहिती होणे आवश्यक आहे.

श्री. जयवंत ओक : गुंठेवारी संदर्भात या महानगरपालिकेने स्लम व इतर भागात आतापर्यंत कोणकोणत्याही सुविधा पुरविल्या आहेत. शहरातील अनधिकृत वसाहती बाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली. महानगरपालिकेमध्ये एकूण ८३ वॉर्डापैकी फक्त ४० स. सदस्यसांचे वॉर्ड हे अनधिकृत वसाहतीतील आहेत. गुंठेवारी पध्दतीबाबत प्रशासनाने निर्णय घेऊन कार्यवाही करावयाचे ठरविल्यास आणि नागरिकांनी एकही पैसा महानगरपालिकेकडे जमा न केल्यास प्रशासन कोणती कार्यवाही करेल?

सौ. चंद्रभागाबाई दाणे : शहरातील बऱ्याच भागात नागरिकांनी अनधिकृत प्लॉट घेऊन अनधिकृत बांधकामे केलेली आहेत व मोठमोठे घरे झालेली आहेत. त्या सर्वांची घरे गुंठेवारी पध्दतीनुसार नियमित करणेसाठी प्रशासनाने सविस्तर पाहणी करून कार्यवाही करावी. कोणत्याही बाबतीत सर्व्हेक्षण झाल्याशिवाय कार्यवाही थांबू नये.

श्री. तकीहसन खॉन : शहरात ज्या अशा अनेक अनधिकृत वसाहती आहेत त्या एकूण ११४ वस्त्या गुंठेवारी मध्ये येतात. यामध्ये ५०% पेक्षाही जास्त वसाहती या आरक्षित जागेवर बसलेल्या आहेत. यामध्ये काही वसाहती या शाससनाच्या जागेवरही वसाहती करून असतील तर त्याला आपण काय करणार? तेंव्हा याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवून शासनाकडे प्रस्ताव अशा प्रकारच्या वसाहती बाबत मान्यतेस्तव शासनाकडे पाठविणे योग्य. बऱ्याच भागात आरक्षित जागे बाबतच्या जागेवरील वसाहती संदर्भात असून या सर्व प्रकरणांवर सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : या बाबत संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

उप अभियंता (नगररचना) सन २००१ पूर्वी ज्यांचे बांधकाम झालेले आहेत MRTP ॲक्ट नियम क्र. ४ अन्वये अनधिकृत बांधकाम केलेले असल्यास त्यांनी महापालिकेकडे अधिकृत करणे बाबत अर्ज करावा. ३० जून २००२ ला मुदत देऊन मुदतवाढ करण्यांत आलेली होती. आतापर्यंत गुंठेवारी पध्दतीनुसार अनधिकृत बांधकामे कायम करणेसाठी जवळपास ३६०० अर्ज प्राप्त झाले. आणि या संदर्भात शहरातील नागरिकांना या कार्यक्रमाची पूर्णपणे माहिती

होणे आवश्यक असल्याने स्थानिक केबल ए.सी.एन वर प्रसारित करण्यांत आलेले आहे. त्याचप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रात देखील बातम्या माहिती स्वरुपात देण्यात आलेले आहेत. तेंव्हा जवळपास ३६०० अर्जापैकी ३२०० अर्जाची छाननी करून त्यांचेकडून नियमाप्रमाणे पैसा भरणा करून घेण्याची कार्यवाही होत आहे. यामध्ये एकंदर १०० नागरिकांच्या अर्जावर कार्यवाही अंतिम स्वरुपात होत आहे.

श्री. अविनाश कुमावत : अशी माहिती आहे की, मुंबई / ठाणे येथील काही नागरिक गुंठेवारी पध्दतीच्या नियमाविरुध्द कोर्टात केस दाखल केलेली आहे. याबाबतची काही माहिती प्रशासनास आहे काय?

उप अभियंता (नगररचना) याबाबतची माहिती प्रशासनास नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : गुंठेवारी पध्दतीच्या निर्णयास सांगली येथील काही नागरिक कोर्टामध्ये केस दाखल केलेली असून अद्याप या बाबत माहिती दिलेली नाही. परंतु या संदर्भाने उद्याला कोर्टाने सदरील प्रस्ताव रद्द केला तर या बाबत नागरिकांनी पैसा महापालिकेकडे भरणा केल्यानंतर तो पैसा परत मिळणार काय?

श्री. नंदकुमार घोडेले : जवळपास ३६०० अर्ज गुंठेवारी पध्दतीनुसार प्रशासनाकडे अधिकृत करणेसाठी प्राप्त झाले. यापैकी किती अर्ज अधिकृत होऊ शकतील. याची सविस्तर माहिती द्यावी.

श्री. जयवंत ओक : स. सदस्य यांनी उपस्थित केलेल्याप्रश्नाबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

सहा. संचालक (नगररचना) गुंठेवारी पध्दतीच्या मुदतवाढी बाबत दिनांक ०८/०१/२००३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे दालनात महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्तांची बैठक झालेली होती. या बैठकीत गुंठवारीच्या संदर्भाने शासनाने वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढ बाबत प्रत्येक महानगरपालिकेचा आढावा बैठकीत घेतला होता. या बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकतर्फे मा. आयुक्त यांनी या शहरातील नागरिकांचा अल्पसा प्रतिसाद मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. दि. ०८/०१/२००३ पूर्वी फक्त जवळपास १००० अर्ज प्राप्त झाले होते. माहे फेब्रुवारी २००३ पर्यंतचेच गुंठेवारी बाबतचे अर्ज स्विकारणा करण्याची तुदतवाढ औरंगाबाद महापालिकेस देण्यांत आलेली आहे. मागील महिन्यापर्यंत माहे फेब्रुवारी २००३ पर्यंत ३००० अर्ज नागरिकांकडून प्राप्त झालेले असल्याने व मुदतवाढही फेब्रुवारी पर्यंत असल्याने नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे. गुंठेवारी संदर्भातील काही शहरामध्ये नागरिकांनी याचिका दाखल केली व प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले अशी शंका स. सदस्यांनी उपस्थित केली. माझ्या माहितीप्रमाणे सांगली महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारची याचिका दाखल झालेली असल्याने तरीही न्यायालयाने या प्रकरणी कामकाज करणेसाठी कोणत्याही प्रकारचा अंतरिम मज्जाव केलेला नाही. शहरातील विविध ठिकाणचे अतिक्रमणे, रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम किंवा त्यामुळे होत असलेले अडथळे यामुळे शहरातील विकास कामांना बंधने येतात. ज्या वसाहती अनधिकृतरित्या झालेल्या आहेत, त्यासाठी शासनाने गुंठेवारी कायदा हा अंमलात आणून त्याी अंमलबजावणी करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. यासाठी स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे नागरिकांना गुंठेवारी कायद्याची पूर्णपणे

माहिती मिळणे व होणेसाळी प्रसिध्दी माध्यमाचा वापर करून प्रसार करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये रिक्षाद्वारे फिरणे पोस्टर्स काढणे, हँडबिल काढून वाटप करणे, या व्यतिरिक्त कर्मचारी व अधिकारी यांचेमार्फतही नागरिकांना माहिती पोहोचविण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली आहे. शहरातील अनेक भागात जागेच्या मालकी हक्काबाबत अनेक वाद आहेत. त्यामुळे त्या भागातील वादानुसार तेथील भागांचा विकास करणेसाठी आवश्यक ती उपाययोजना प्रशासनामार्फत करावी लागते. आणि संपूर्ण वसाहतीचा विकास करणेसाठी त्या भागातील नागरिकांचाही या कामी सहकार्य मिळणे आवश्यक आहे. तो पर्यंत गुंठेवारी प्रकरणी योग्य ती कार्यवाही होणे शक्य नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : कोर्टामध्ये या संबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तेंव्हा सदरील प्रकरण शासनाच्या विरुध्द गेल्यास आपण महानगरपालिकेमार्फत काय करणार? आणि गुंठेवारी पध्दतीची माहिती नागरिकांना अजिबात नाही यासाठी प्रसार व प्रचार होणे आवश्यक आहे. विविध वर्तमानपत्रात बातम्या, जाहिराती, हँडबिल व पोस्टर्स प्रशासनामार्फत काढून प्रत्येक भागामध्ये फिरणे आवश्यक आहे हे सर्व प्रशासनामार्फत का होत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : शहरात जनजागरण होणे आवश्यक आहे. कारण या शिवाय नागरिकांनाही कोणत्याही प्रकारची कल्पना नाही.

श्री. जयवंत ओक : शासनाच एक परिपत्रक आहे या संदर्भात मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा. जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्राधिकारण यांची संयुक्त बैठकीतील मुद्दांच्या बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

सौ. विजया रहाटकर : वॉर्डातील विकास कामांबाबत लोकांकडून पैसा घेतांना जो दर ठरविलेला आहे. त्यानुसार त्याच्या अर्ध्या दराने त्या-त्या वॉर्डातील विकास कामे विकसित करता येतील काय? अशी शंका येते.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : औरंबादरला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदय आले असतांना आम्ही काही स. नगरसेवक त्यांची भेट घेतली असता त्यांनी या प्रकरणी असे सांगितले की, अगोदर काम सुरू करणेबाबत निर्यण घ्यावा आणि नंतरच शासन कार्यवाही करेल.

सौ. विजय रहाटकर : वॉर्डातील नागरिकांना त्यांना त्यांचे नागरी सुविधा पुरविणेसाठी आपण किती पैसा विकासासाठी घेतो त्यास जनतेला काहीही घेणे देणे नाही. मात्र वॉर्डातील सुविधा पूर्णपणे होतील किंवा नाही हा महत्वाचा मुद्दा आहे.

श्री. अविनाश कुमावत : गुंठेवारी नियमाची अंमलबजावणीसाठी आणखी दोन महिने मुदतवाढ देण्यांत यावी. आणि या नियमाची कार्यवाही करीत असतांना झोन निहाय नागरिकांना पूर्णपणे माहिती मिळणेसाठी प्रशासनाच्या वतीने आवश्यक तो कार्यवाही करावी. गुंठेवारीची अंमलबजावणीसाठी जी फिस आकारणी करावयाची आहे ती जर रु. १२०/- प्रमाणे घ्यावयाची असल्यास त्याचे निम्मे म्हणजे रु. ६०/- प्रमाणे आकारावे. व आलेली प्रकरणे निकाली काढावे.

सहा. संचालक (नगररचना) श्री. अ. प्र. सिन्हा यांचे मार्गदर्शन मा. मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखाली आलेल्या बैठकीतील सूचना सभागृहात वाचून दाखविले.

श्री. जयवंत ओक : सन २००१ पर्यंतच एकूण ११४ अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत व नागरिक बिना सुविधांचे रहात आहेत. याबाबतची माहिती घेतली आहे काय? मी खालीलप्रमाणे मुद्दे मांडतो त्यानुसार कार्यवाही व्हावी.

१) गुंठेवारी पध्दतीची अंमलबजावणी करावयाची असल्यास संपूर्ण नागरिकांना पूर्णपणे माहिती होण्यासाठी आणखी दोन महिन्याची मुदतवाढ द्यावी.

२) नाशिक महानगरपालिकेने ज्या प्रमाणे कार्यवाही केली त्यानुसार या महानगरपालिकेस सुध्दा कार्यवाही व्हावी.

३) शहरातील अनधिकृत वसाहतीमधील व झोपडपट्ट्यांमध्ये राहत असणाऱ्या सर्व नागरिकांना गुंठेवारी पध्दत काय आहे. त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे कोणती. याबाबत संपूर्ण पणे माहिती मिळणेसाठी तत्वत: वर्तमानपत्रात जाहिरात पोस्टर्स, हँडबिल काढून वस्त्यामध्ये वाटप करणे, दूरदर्शन व स्थानिक टि.व्ही ला चैनेलकडून नागरिकांना आवाहन करणे, लाऊडस्पिकर्स लावून प्रसिध्दी देणे इत्यादी बाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

४) गुंठेवारीची अंमलबजावणी करीत असतांना यामध्ये डी. पी. रोडमध्ये एखाद्या नागरिकांची किंवा मालकीची जमीन / घर रोडमध्ये येत असल्यास त्यांना त्याचा मोबदला / पर्यायी जागा नियमाप्रमाणे देण्यात यावा.

५) गुंठेवारी नियमाची अंमलबजावणी करीत असतांना जो शासनाचा दर निश्चित असेल तो दर आणखी कमी करूनच त्याची अंमलबजावणी करावी.

६) मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हधिकारी, संबंधित प्राधिकरण व मनपा यांची संयुक्त बैठक आयोजित करून निर्णय घ्यावा.

७) गुंठेवारी बाबत मुंबई उच्च न्यायालयात वाद चालू आहे. त्याप्रमाण्े विधी विभागाने माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी.

श्री. प्रशांत देसरडा : गुंठेवारी पध्दतीची अंमलबजावणी बाबत बऱ्याचशा नागरिकांना याची पूर्णपणे कल्पना आहे परंतु काही नागरिक स्वत:हून आर्थिक बाबीकडे लक्ष देत नाही. कारण खिशाला झळ पोहोचते यासाठी शासनाने आखून दिलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. ज्यावेळी महानगरपालिका अस्तित्वात आली त्यावेळी लोकसंख्येच्या प्रमाणाने आजूबाजूचे १८ खेडी समाविष्ट करून मनपा तयार झाली वास्तविक पाहता १८ खेडी मनपा हद्दित घेण्यापूर्वी या संपूर्ण भागाचा पूर्णपणे विकास करूनच घ्यावयाचे पाहिजे होते, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे आता सध्या या १८ खेड्याचा समाविष्ट करून मनपास आर्थिक दृष्ट्या सोसावा लागत आहे. तेंव्हा गुंठेवारी पध्दतीची अंमलबजावणी करावयाची झाल्या जो ठरविलेला दर आहे त्याची निश्चिती अगोदर व्हावी. व प्रायोगिक तत्वावर एखाद्या वॉर्डाची निवड करून कार्यवाही करावे. शहरातील जेवढे अनधिकृत घरे झालेली आहेत ती ७५% भाग हा आरक्षित जागेवरील असून त्यामुळे या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा. उपमहापौर : शहरातील सालारजंग इस्टेट व सिल्कमिल जवळील भाग हा सर्व खाजगी जागेवरील अतिक्रमण करून वसाहती झालेल्या आहेत. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार.

सहा. संचालक नगररचना : या संदर्भात संबंधित जमीन मालक मुळात आज अस्तित्वात दिसत नाही. अशा काही प्रकरणांमुळे शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात येईल. सध्या वादामील प्रकरणांची कोणत्याही प्रकारे तुर्त कार्यवाही करता येणार नाही. शासनाने याबाबत मार्गदर्शन दिलेले आहे की, जमीनी नोटरीद्वारे विकत घेतलेल्या आहेत त्यांचे अर्ज ग्राह्य धरावे.

श्री. अविनाश कुमावत : शहरातील अशा काही वसाहती आहेत की, त्यांनी बेटरमेंट चार्जेस पूर्णपणे भरलेले असूनही तेथील वसाहतींना सुविधा मिळाल्या नाहीत त्यांचे काय?

श्री. भगवान रगडे : भारतभर पल्स पोलिओचा कार्यक्रम राबविल्या जातो व सर्व वर्तमानपत्रात, पोस्टर्सद्वारे जाहिराती दिल्या जातात व लोकांना खेड्यापाड्यात माहिती पोहोचविला जाते. त्याप्रमाणे गुंठेवारी पध्दीतने बाबतीत सर्व शहरात झोननिहाय नागरिकांना माहिती देऊन प्रचार व प्रसार करावा. बरेचशे नागरिक शहरात २०X३० चे प्लॉटअनधिकृत अल्पशा पैशात घेऊन छोटेशे घरटे बांधतात. त्या लोकांची जराशीही ऐपत नाही. दिवसभर मोलमजूरी करून दिवस भागवतात. तेंव्हा मनपाची गुंठेवारी बाबतची आकारणी करण्यात येणारा खर्च कधी करावा. आणि समजा या गरीब लोकांनी गुंठेवारीसाठीचे पैसा भरणा नाही केला तर मनपा काय करणार? त्यांची घरे पाडणार आहेत काय?

श्री.काशिनाथ कोकाटे : गुंठेवारीसाठी प्रशासनातर्फे आकारण्यात येणारी फिस रु. २५०/- ऐवजी या सभागृहाने रु. १२०/- असे तर रु. १२.५०/- बांधकाम बाबत असे एकूण रु. १३२.५० होतात यास सभागृहाने सर्वसंमतीने आताच मंजुरी दिलेली आहे. तेंव्हा अशा सर्व प्रत्येक भागात सर्व सोयीयुक्त सुविधा उपलब्ध करण्यासाठी रु. २५०/- फीस आकारणी करणेबाबत शासनाचे आदेश आहेत तेंव्हा आपण महानगरपालिकेची जबाबदारी व नागरिकांचे दृष्टीकोनातून काय करता येईल ते पाहणेही आवश्यक आहे. त्यासाठी मनपालाही भुर्दंड पडणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. कारण जायकवाडी जलाशयातून पाणी विकत घेतो आणि त्यामुळे शहरातील प्रत्येक भागात सुरळती पाणीपुरवठा होणेसाठी प्रशासनास आपली जबाबदारी पार पाडावी लागते. बऱ्याचशा भागात ड्रेनेज / लाईट व रस्ते आदी सुविधा पुरविण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. यासाठी कशा प्रकरचा व किती दर लावावे याचा विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचे व कुणाचाही स्वार्थ नाही. कोणत्याही प्रकारचे राजकारण नसून जनतेच्या हिताच्या व मानपाच्याही दृष्टीने आपणास पाहावे लागणार आहे. गुंठेवारी बाबतचा प्रक्रियेसाठी आता पुन्हा जादा कालावधी न वाढविता लवकरात लवकर निर्णय घ्यावा कारण सदरील प्रस्ताव यापूर्वीही आलेला आहे. स. सदस्यांनीही प्रस्तावाची माहिती आहे. लोकांचे मतप्रवर्तन करणेसाठी आपण प्रयत्न करावे. प्रत्येकांचे मते वेगवेगळे असू शकतात. यामध्ये आपण वेळोवेळी मुदतवाढ करीत राहिले आणि शासनाकडे प्रस्ताव पाठवावयाचा तसाच राहिला तर व बारगळला तर याची सर्वसाधारण सभेने दक्षता घ्यावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : सरकारने गेल्या २-३ वर्षापासून गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांची दिशाभूल करीत आहे या मनपाला अद्याप कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नाही. जे की, तत्कालीन सरकार या मनपाला दरवर्षी अनुदान देत असे. ज्यामुळे विकास कामांना चालना मिळते. तेंव्हा सध्याच्या शासनाने या मनपास कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान न दिल्यामुळे विकास कामांना खिळ बसते. आज आपण गुंठेवारी कायद्याचे तहत निर्णय घेतला तर, नागरिकांना याबाबतची कोणतीही माहिती नसतांना निर्णय मनपाने लादला तर ज्या अनधिकृत वस्त्या कर आकारणी लावून राहतात अशा वसाहतींना ५०% दर शासन नियमाप्रमाणे लागू करावा व आणखी दोन महिन्याची मुदतवाढ या गुंठेवारी कायद्यास यापुढे करावी.

श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार : गुंठेवारी कायद्यास आमाचा विरोध नाही. शासन निणर्याप्रमाणे प्रस्ताव मंजूर करावा परंतु यास कोणत्याही प्रकारचे दर लागू होऊ नये अशा प्रकरचा प्रस्ताव सर्व संमतीने व्हावा व शासनाकडे पाठवावा.

श्री. राजु शिंदे शासनाने या प्रस्तावाबाबत जो दर लागू करण्याचे सुचित केलेले आहे. त्यापेकी ५०% दरास मान्यता द्यावी आणि त्यामध्येही नागरिकांना सवलत द्यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे :महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करणेसाठी जो जी. आर. पाठविलेला आहे. त्याची प्रशासनाने कार्यवाही करावी. नागपुर, पुणे, कोल्हापुर येथे गुंठेवारी कायदा लागू करण्यात आलेला आहे.
(याचवेळी सभागृहात स. सदस्या मध्ये जोर जोरात आवाज होत असतो काहीही ऐकू येत नाही वेळ १.०५ वा.)

मा. उपमहापौर : महानगरपालिकेचे अंदाजपत्रक पाहिले असता मागील वर्षाचे स्पिल वर्कचे कामे अंदाजे ६ ते ७ कोटीचे शिल्लक आहेत. शासन अनुदान नाही. त्यामुळे व्यक्तीगत दुषणे कुणीही कुणास देणे योग्य नाही. त्यामुळे प्रस्तावावर चर्चा न होता इतरत्र चर्चा होते. फक्त स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार दोन महिण्याची मुदतवाढ यापुढे वाढवून मिळावी. आरक्षण उठविण्याबाबत अगोदर सर्व्हेक्षण करून त्या भागातील जमीनीचे आरक्षण उठवावे. असा प्रस्ताव प्रशासनाने मांडावा जवाहर कॉलनी, गारखेडा, येथील भागातील आरक्षणे रद्द करावे कारण या भागातील जमीनी या ५० वर्षापूर्वीची मालकी हक्क असलेल्या मालकाचे आहे. किंवा नाही ते पहावे ५० वर्षापूर्वी जमीन मालकाने छोटे-छोटे प्लॉट पाहनू खरेदी खतावर व बॉंडवर लिहून घेऊन विक्री केलेले आहे. त्याच जमिनीवर आज घरे झालेली आहेत यासाठी गुंठेवारी कायद्याची शहरात पूर्णपणे अंमलबजावणी करावयाची झाल्यास विविध झोननिहाय नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे शहरातील पुंडलीकनगर गारखेडा, राजीव गांधी नगर, जय संतोषी माता नगर, गारखेडा परिसर येथील सिडको डिनोटी -फाईड मध्ये येत असल्याने यामध्ये १००% वसाहती झालेल्या आहेत. त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

श्री. राजु शिंदे : मी सूचना केल्याप्रमाणे प्रशासनाने माहिती द्यावी.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : आणखी दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी. शहरामध्ये शंभर टक्के वसाहती झालेल्या आहे व त्यांना आता महापालिकेच्या सुविधा पुरवून गुंठेवारी कायदा सध्यातरी लागू करू नये.

श्री. जयवंत ओक, राधाकृष्ण गायकवाड :

डॉ. आशा बिनवडे : माझ्या माहितीप्रमाणे शहरात जवळपास ७२-१०० वसाहती विविध ठिकाणी अनधिकृतरित्या आहेत त्या भागास सर्व सुविधा मिळणेसाठी अधिकृत घरे करण्यासाठी शासनाने दिलेल्या जी. आर प्रमाणे अंमलबजावणी करावयाची आहे. प्रत्येक वसाहतीमध्ये नागरी सुविधा पुरवावयाच्या आहेत. त्याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे. माझ्या वॉर्डातील न्यु शांतीनगर, भानुदासनगर या वस्तीमधील लोकांनी महापालिकेचे बेटरमेट चार्जेस भरलेले असून परंतु अद्यापही या भगासाठी नागरी सुविधा पूर्णपणे दिलेल्या नाहीत. तेव्हा याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावयास पाहिजे. शासनाच्या गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना प्रशासनातर्फे नागरिकांना याची कल्पना नाही असे नाही. परंतु लोकांच्या अशा काही प्रवृत्त्या बळावत आहेत की, कोणत्याही सवलती कोणताही खर्च न होता मिळत असल्यास ते तातडीने होणेसाठी धाव घेतात. परंतु एखादी योजना आल्यास व नागरिकांना थोडीफार झळ पाहोचत असल्यास नागरिक धाव घेत नाही. तर अशा प्रकारचे नागरिकांच्या प्रवृत्त्या दिसून येतात कारण कोणत्याही योजना किंवा सुविधा या जनतेस मोफत मिळाव्या अशी धारणा आहे. यासाठी बऱ्याचशा स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे लोकांमध्ये जनजागृती होणेसाठी प्रशासनाने प्रयत्न करावा आणि गुंठेवारी कायद्याच्या बाबतीत कठोर निर्णय घेऊन विकास कामांना प्राधान्य द्यावे. आणि पूर्णपणे नागरिकांना माहिती मिळणेसाठी आणखी दोन महिन्याची मुदतवाढ द्यावी व एखाद्या विभागात प्रायोगित तत्त्वावर गुंठेवारी कायदा लागू करावा.

श्री. राजु शिंदे : गुंठेवारी कायद्याबाबत लागू करावयाचे झाल्यास ज्या भागातील लोकांचे शासन फिस भरण्याची कुवत आहे, त्यांचेकडून घ्यावे. नसता ज्यांची कुवत नाही फिस भरण्याची त्यांना माफ करावे.

श्रीमती पार्वती मानकापे : गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कमीतकमी रु. ६०/- प्रमाणे फिस आकारणी करावे व त्यामध्ये दोन दोन वेळे प्रमाणे नागरिकांकडून वसूल करावे.

श्री. शे. इलियास किरमानी : गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना सर्व जनतेला पूर्ण माहिती होणे आवश्यक आहे.

श्री. जगदिश सिध्द : या संदर्भाने प्रत्येक वॉर्डातील प्रतिष्ठित नागरिक यांची बैठक बोलावून चर्चा घडवून आणावी तोपर्यंत आणखी पुढे दोन महिन्याची मुदतवाढ द्यावी.

सौ. साधना सुरडकर : सामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारचे पैसे देवू नये असेच असते. कोणतीही योजना फुकटात असल्यास ती ताबडतोब घेतात. परंतु एखाद्या योजनांची अंमलबजावणी करावयाची असल्यास व काही पैसे आकारणी करावयाची असल्यास ते नागरिकांना देण्यास जिवावर येते. कोणत्याची बाबतीत शहरातील विकास कामे करीत असांना प्रशासनाने सर्व्हेक्षण करून कार्यवाही होणे गरजेचे आहे.

नगर रचनाकार : (शासन अध्यादेश सभागृहात वाचून दाखविला)

श्री. राजु शिंदे : ज्या भागातील नागरिकांचा पैसा महापालिकेमध्ये जमा होईल तेवढाच पैसा जमा झालेला. त्या त्या विभागासाठी विकास कामे करण्यासाठी खर्च करणार काय? शिवाय अशा अनधिकृत वासाहतीमधील भागातील लोकांकडून आपण कर आकारणी करून पैसा वसूल करतो त्याचे काय?

नगर रचनाकार सहा. संचालक : होय ज्या भागातील लोकांचे पैसा जमा होतील त्यांचे विकास कामांना प्राधन्य राहिल. गुंठेवारी कायद्याचे तहत सर्वप्रथम लोक समुहाचा जास्तीत जास्त सहभाग झाल्यास त्यांना त्या भागातील सुविधा पुरविण्याची व्यवस्था करता येईल. समजा एखाद्या भागात ५०० घरे असतील. आणि फक्त यापैकी ५० घरांचे लोकांनी महानगरपालिकेमध्ये पैसा भरणा करून अर्ज दाखल केले असेल तर उर्वरित ४५० घरासाठी सुविधा प्रशासन कसे काय पुरविणार आणि स. सदस्यांनी विचारल्याप्रमाणे ज्या भागातील किंवा वसाहतींना महापालिकेमध्ये अर्ज दाखल केलेला असल्यास व प्रत्येक भागातील स्वतंत्र लेखाशिर्ष विकास कामासाठी खर्च करणेसाठी राहणार आहे.

श्री. राजु शिंदे : माझ्या विभागातील नागरिक अत्यंत आर्थिकरित्या परिस्थितीने नाजूक आहेत. त्या लोकांनी रु. ५०००/- प्रमाणे प्लॉट छोटे-छोटे घेऊन २०X३० चे साधारण घरे बांधनू राहतात. तेंव्हा दिवसभराची मोजमजुरी करून ते आपले दिवस काढतात. त्यामुळे गुंठेवारी कायद्याप्रमाणे शासन निर्णयाचे आधारे फिस कधी भरणार व खाणार काय? त्यामुळे अशाप्रकारे गोरगरीब नागरिकांना एक प्रकारे आझे शक्य नाही. याबाबत प्रशासनाने असे सांगावे की, प्लॉटच्या खरेदीवर पेसा किती लागेल.

डॉ. आशा बिनवडे : असे लक्षात येते की, आजच्या स्थितीत कोणत्याही भागातील किती गरीब व श्रीमंताच्या अथवा मध्यमवर्गीयांचा विचार करता प्रशासनाच्या चांगल्या कामास सहजासहजी पैसे देण्याची कुवत नाही. यासाठीच प्रशासनाने कायदा व शासनाचा बडगा असल्यास त्याचा पुरेपुर वापर करून कार्यवाही करावी. व कोणतीही योजना बंद पडणार नाही याची खबरदारी घ्यावी.

मा. महापौर : सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता (१) गुंठेवारी कायद्यास प्रशासनाने दोन महिने मुदतवाढ देण्यांत यावी (२) प्रशासनाचे वतीने स. सदस्यांनी सूचना केल्यानुसार वॉर्डावार्डात व झोन निहाय प्रसिध्दी जासत प्रमाणात कारावी. (३) आरक्षणात असलेले वस्त्याचे सर्व्हेक्षण करून आरक्षण उठविण्याचे शासनाकडे प्रस्ताव पाठवावे (४) प्रत्येक झोनमध्ये अधिकारी बसवून प्रभाविपणे हि योजना राबवावी (५) आरक्षणाचा प्रत्येक वस्तीचा कृती आराखडा सभागृहात दाखल करावा.

**ठराव क्र. ३५/१ :** सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे व गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी २ महिने मुदत वाढ देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे राबविता यावी म्हणून सर्वेक्षण करून आरक्षण उठविण्याची योग्य ती कार्यवाही करणे, प्रत्येक झोन कार्यालयात अधिकारी बसविणे इत्यादी कार्यवाही करणेस आणि आरक्षणाखालील प्रत्येक वस्तीचा कृती आराखडा, सभागृहात सादर करणेची कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९-०३-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुधवार, दिनांक १९/०३/२००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१२) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१३) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्रीमती डॉ. अशा उत्तम बिनवडे
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२०) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२१) स.स.सौ. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२२) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२३) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२४) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२५) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२६) स.स.जी जैन विकास रतनलाल
२६) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२७) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२८) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२९) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३०) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३१) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन

३२) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक
३३) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३४) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३५) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३६) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३७) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३८) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३९) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४०) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
४१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
४२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
४७) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४८) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४९) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५०) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५१) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५२) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५३) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५४) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
५५) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
५६) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५७) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
५८) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५९) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६०) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६१) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६२) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
६३) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६४) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
६५) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६७) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## <u>स्विकृत सदस्य</u>

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे

३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन
५) स.स.सौ. सलमा बानो मीर महंमद अली

**संवाद :**

श्री. प्रशांत देसरडा : या शहराचे माजी महापौर व विद्यमान सदस्य श्री. भागवत कराड यांचे सासुचे दु:खद निधन झालेले आहे, त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : स. सदस्य श्री. मोतीलाल जगताप यांचे वडील सामाजिक कार्यकर्ते स्व. रघुनाथ जगताप यांचे दु:खद निधन झाले त्यांना सुध्दा या सभागृहाने श्रध्दांजली अर्पण करावी.

आनंद तांदुळवाडीकर : प्रख्यात कवी स्व. सुरेश भट यांचे सुध्दा दु:खद निधन झाले त्यांना सुध्दा या सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.
(याचवेळी स्व. विद्यालता खेडकर स्व. रघुनाथ जगताप, स्व. सुरेश भट यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तबध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली)

श्री. अ. रशिद अ. सत्तार : दोन स. सदस्यांनी राजीनामे दिले. राजीनामा कसा दिला खुलासा वाचून दाखवावा.

श्री. नंदकुमार घोडेले : या विषयावर अगोदर चर्चा घेण्यात यावी.

श्री. नासेरखॉन सरदार खॉन : सभेची विषय पत्रिका ०७ दिवस अगोदर मिळण्या ऐवजी कालच विषय पत्रिका मिळाली का उशीर झाला खुलासा द्यावा.

मा. महापौर : संचिव यांनी या बाबत यापुढे दखल घ्यावी.

श्री. अफसर खॉन : आरक्षण क्र. १६० महानगरपालिकेची जागा आहे. तेथे बिलडरांनी अतिक्रमण केलेले असून या संदर्भात चर्चा होऊन अहवाल सादर करणार होते. अद्याप आतापर्यंत अहवाल सादर झालेला नाही.

मा. महापौर : या अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाण्याची समस्या अत्यंतभेडसावत आहे. गेल्या बैठकीत चर्चा झालेली नाही. स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला असतांना चर्चा होऊ दिली नाही. आज पाणी या विषयावर चर्चा व्हावी व या सभागृहाचे काम पारदर्शक चालवायचे असेल तर चर्चा होऊन त्या बाबतीत आजच्या आज कार्यवाही झाली पाहिजे. तसेच अनधिकृत वस्त्यामध्ये पाणी देण्याचे बंद केले. गरीब जनतेला पाणी मिळाले पाहिजे. या मताशी आम्ही आहोत.
(याचवेही बरेच स. सदस्य मा. महापौर यांचे डायस समोर जाऊन पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करावी म्हणून मागणी करतात. मोठमोठ्याने बोलतात काही ऐकू येत नाही.)

श्री. आनंद तांदुळवाडीकर : पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे यास आमचे सर्वांचे सहमत आहे. परंतु यावर विशेष बैठक बोलवावी आजच्या सभेची विषय पत्रिका आता सुरू करावी.

श्री. स. अली सलामी : या सभागृहाची चर्चा वृत्तपत्रात येत आहे. भूखंडाच्या चर्चेच्या प्रकरणावरून दोन स. सदस्यांना राजीनामे द्यावे लागले. या प्रकरणात कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. यास जबाबदार कोण आहे.

मा. महापौर : सर्वांनी आपल्या जागेवर बसावे, आपआपले मत जागेवरून मांडावे.

श्री. प्रशांत देसरडा : नियमानुसार चर्चा करण्यासाठी वेळ दिलेला आहे का? जी प्रश्नावली आहे त्यानुसार अशी चर्चा करता येते का? खुलासा द्यावा.

मा. महापौर : पाण्याच्या विषयावर विशेष बैठक घेऊन निर्णय घेता येईल.

मा. उपमहापौर : पाणी प्रश्नावर स्पेशल बैठक बोलविण्यात येईल आताच महापौर यांनी निर्णय घेतला आता सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(मा. महापौर यांचे डायस समोर थांबलेले स. सदस्य जागेवर बसण्यास उत्सुकता दाखवित नाही. व पाणी प्रश्नावर चर्चा करावी, म्हणून वेळोवळी मा. महापौरांना मागणी करतात.)

मा. उपमहापौर : महापौरांच्या संम्मतीने बोलता आहे. पाणी प्रश्नावर सविस्तर अशी चर्चा करावी लागणार आहे. विषय पत्रिका संपल्यानंतर पाणी प्रश्नावर चर्चा घेण्यात येईल.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे पाणी प्रश्नावर चर्चा करावी.

(याचवेळी डायस समोर असलेले सर्व सदस्य आपआपल्या जागेवर बसतात.)

श्री. मीर हिदायत अली : अशोकनगर भागात पाणीच येत नाही. रस्त्यावर खोदकाम केले. नळ तोडण्यांत आले. तसेच वॉर्डात लाईटची व्यवस्था होत नाही. या वर्षीचे १२ दिवस बाकी असून लाईटचे मटेरियल अद्याप आलेले नाही. तसेच वॉर्डात ड्रेनेजचे पाणी वाहत आहे. पिण्याचे पाणी दूषित येते.

श्री. जयवंत ओक : जायकवाडीत पाण्याची परिस्थिती काय आहे. उन्हाळ्यात पाणी शहराला पुरेल किंवा कसे जी टँकरद्वारे सध्या पाणी पुरवठा करतो तो नियमित करणार आहोत का? जनतेला पाणी पुरवठा करण्यासाठी प्रशासन काय नवीन उपाययोजना राबविणार आहे. काही भागात १ दिवसाआड पाणी देतो. भविष्यात ०८ दिवसाआड द्यावे लागणार काय?, सध्या किती भागात पाणीच जात नाही. टँकरद्वारे जो पाणीपुरवठा करतो. तो सध्या चालू आहे का? टँकरद्वारे पाणी पुरवठा बंद झाला अशी माहिती आहे.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : या शहरातील काही भागात ड्रेनेजचे पाणी पिण्यासाठी येते. वृत्तपत्रात वेगवेगळ्या बातम्या येतात. पाणी रे पाणी तेरा रंग कैसा, असे वृत्तपत्रात आलेले आहे. हे एक प्रकारचे महापालिकेस आव्हान केलेले आहे, त्यासाठी महानगरपालिकेची बदनामी होऊ नये म्हणून जनतेला स्वच्छ व मुबलक पाणी देणे गरजेचे आहे. यापूर्वी जे पाणी पुरवठा अधिकारी होते, त्यांना या शहरातील पाण्याच्या संदर्भात सर्व माहिती आहे. म्हणून पाणी पुरवठ्याचा विभाग संबंधित अधिकाऱ्याकडे देण्यात यावा.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : पाणी पुरवठाअधिकारी सुट्टीवर गेलेले आहे का? सभागृहात कोण खुलासा देणार आहे.

श्री. स. अली सलामी : माझ्या वॉर्डात पिण्याच्या ड्रेनेजचे पणी येते. कामाचे टेंडर होऊनही कार्यवाही झाली नाही. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. भूखंडाचे प्रस्ताव तात्काळ मंजूर होतात. परंतु अशा कामाच्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष केले जाते. पाण्याच्या बाबतीत जे प्रस्ताव येतात त्याची तात्काळ अंमलबजावणी झाली पाहिजे. ४०-४५ हजार रुपयाचे टेंडर रिकॉल होते हे बरोबर नाही.

ड्रेनेज लाईन चोकअप झाली तर सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कार्यवाही केली पाहिजे. लोक बिमार पडल्यास महापालिकेवर पोलिस केस होऊ शकते. वॉर्डातील नागरिक आम्हाला समस्या बाबत विचारतात. अधिकाऱ्यांना त्रास नाही. म्हणून वेळेवर कामे झाली पाहिजे.

श्री. किशोर तुलशीबागवाले : संबंधित पाणी पुरवठा अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाही. मंजुरी कशी देण्यात आली.

मा. आयुक्त : संबंधित अधिकारी कामानिमित्त मुंबईला गेलेले आहे. जाण्याची परवानगी मागितलेली होती. रात्री त्यांनी मा. महापौर यांना फोनवरून विचारणा करून मा. महापौर यांनी त्यांना परवानगी दिलेली होती. व मला सुध्दा फोन वरून विचारणा करून परवानगी घेऊनच ते गेलेले आहे.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको-हडको भागात एक दिवसाआड पाणी देऊन ३०-३५ मिनिटेच पाणी दिले जाते या भागातील जनतेकडून पाण्याचे वसुली जास्तीत जास्त प्रमाणात होत. एक्सप्रेस लाईनचे काम केंव्हा पूर्ण होणार आहे. येथील रहिवाशांना किमान १.१० तास पाणी द्यावे भरपूर पाणी देत नसेल तर या नागरिकांकडून पाणी पट्टी वसूल करू नये. असे मी सभागृहाच्या वतीने पत्रकारांना सुध्दा आवाहन करतो की, त्यांनी जनतेला तसे आवाहन करावे.

श्री. मीर हिदायत अली : या सभागृहात सदस्यांना सविस्तरपणे चर्चा करण्यासाठी माईकची व्यवस्था नाही ३ बैठकी पासून माईक नाहीत. माईक तात्काळ बसविण्यात यावे.

मा. महापौर : पुढील बैठकी पर्यंत नादुरुस्त माईक व्यवस्थित करण्यात यावी संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी.

सौ. निखत परवीन : माझ्या वॉर्डात ४ महिण्यापासून पाण्याची टंचाई भासत आहे जे पाणीपट्टी भरतात त्यांनाच पाणी मिळत नाही. उन्हाळ्याचे दिवस सुरू झालेले आहे काही ठिकाणी दोन-दोन नळ कनेक्शन लोकांनी घेतलेले आहे. कर्मचाऱ्यांना / अधिकाऱ्यांना तसे कळवूनही कष्ट केले जात नाही. काही लोक विद्युत मोटार लाऊन पाणी घेतात. याचे कारण पाणीच मिळत नाही म्हणून मोटार लावतात त्यापासून लहान मुलांना इजा होऊ शकते. परंतु सर्वच लोक मोटार लावून पाणी घेऊ शकत नाही. त्यासाठी पाणी भरूपूर द्यावे. एक तासात हंडाभर पाणी मिळत नाही हि परिस्थिती आहे. ४ इंचीचे नळ कनेक्शन असे २०० दिलेले आहे ते कट करण्याची कार्यवाही होत नाही या संदर्भात मी अनेकवेळा तक्रारही केलेली आहे.

श्रीमती शाहीन जफर : वॉर्डात पाणी वेळेवर दिले जात नाही. पाणीपट्टी भरली नाही तर नळ कट केले जातात.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात विद्युत मोटार लाऊन काही लोक पाणी भरतात. ४-५ फुटाचा खोल खड्डा करून पाणी काढावे लागते. लोकांना पाणी मिळत नाही. पाणी देऊ नका टॅक्स घेऊ नका एक हातपंप करून द्यावा म्हणून मागणी केली अद्याप कार्यवाही झाली नाही. मोटार लाऊन सुध्दा पाणी येत नाही. वारंवार मागणी करून पाणी भरपूर दिले जात नाही.

सौ. कुसुमबाई खरात : माझ्या वॉर्डात रोजाबाग येथे महापालिकेची इमारत बांधलेली असून त्या इमारतीत उर्दू शाळा चालवितो. १०-१५ वर्ष झाले पाण्याची या शाळेत व्यवस्था नाही. पाण्याची व्यवस्था केंव्हा करणार आहात तसेच एन-१२ एच-सेक्टर तसेच एफ-सेक्टर मध्ये रात्री ११-३०, १२-०० वाजता पाणी दिले

जाते. काही लोकांना पाणीच मिळत नाही. पाण्याची वेळ रात्री १२-०० वाजता असते का? नियमाने बरोबर आहे का? जे पाणी सोडतात त्यांचेवर प्रशासनाचे नियंत्रण नाही असे दिसून येते. म्हणून प्रशासनास विनंती की, कोणत्याही वॉर्डात रात्री १०-०० वाजेच्या नंतर पाणी सोडण्यात येऊ नये. एक दिवसाआड पाणी देण्या ऐवजी २ दिवसा आड दिले जात असून ते सुध्दा २०-२५ मिनिटे पाणी दिले जाते व त्यातल्या त्यात रात्री पाणी दिले जाते हे योग्य नाही. ज्यांना दोन हंडे पाणी मिळते त्यांना सुध्दा तेव्हढीच पाणीपट्टी भरावी लागते. हा अन्याय होतो आहे. या भागात पाणी केंव्हा देणार व भरपूर पाणी देणार असेल तरच पाणीपट्टी वसूल करावी या बाबत मी ३ वर्षापासून प्रश्न उपस्थित करते परंतु कार्यवाही होत नाही.

सौ. रुख्मीणी शिंदे : वॉर्डात वेळेवर व भरपूर पाणी दिले जात नाही. पाणी न आल्यास नागरिक आम्हाला बोलतात याची दखल घ्यावी. जनतेला टँकरद्वारे वेळेवर पाणी देऊन कार्यवाही करावी. दिवाळी पासून पाणी मिळत नाही.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : माझ्या स्वेच्छा निधीतून वॉर्डात पाणपोई बांधलेली असून पाणी टाकावे म्हणून ३ वेळेस सांगितले अधिकारी सांगतात पाणी टाकण्यात येईल परंतु ३ वेळेस आश्वासन दिले अद्याप त्या पाणपोई मध्ये पाणी टाकले नाही.

सौ. कुसमताई खरात : माझ्या वॉर्डात महापालिकेने ५ लक्ष रुपये खर्च करून शौच्छालय बांधलेले आहे. अद्याप त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. वारंवार तक्रार करून कार्यवाही होत नाही.

सौ. साजेदा बेगम : पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. वॉर्डातील जनतेला पाणी द्यावे पाणीपट्टी सुध्दा वसूल करावी. पाणीच दिले जात नाही तर जनता कर सुध्दा भरीत नाही जे नळ कनेक्शन कट केले ते जोडावे व यापुढे नळ कनेक्शन कट करू नये. नागरिकांना अगोदर मुबलक पाणी द्यावे.

सौ. सलमा बानो : रशिदपुरा भागात काही कर्मचारी अधिकाऱ्यांचे नांव दाखवून नागरिकांकडून १०-१५-२० रुपये प्रत्येकी जमा करून ज्या भागातून पैसे जमा झाले त्या भागतच पाणी सोडतात. नसता त्या भागात ४-४ दिवस पाणी सोडत नाही. असा प्रकार नेहमीच होत राहील का? काही लोकांचे नळ कट केले. त्या ठिकाणी पोलिसची गाडी बोलावनू दमदाटी केली. जनतेचे म्हणणे ऐकून घेतले नाही. पोलिसा मार्फत कार्यवाही होते. कर्मचारी यांचेवर प्रशासनाचे नियंत्रण असावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : अत्यंत पोट तिडकीने स. सदस्यांनी पणी प्रश्नाबाबत प्रश्न उपस्थित केले, मत मांडले. अनधिकृत अधिकृत भाग असेल अशा सर्व भागात जनतेला पणी देण्यासाठी महाराष्ट्र शासन केंद्र शासनाने अनेक योजना अवलंबिविल्या आहेत. प्रशासनामार्फत काही बाबी या न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहे. त्याचा अहवाल महापालिकेकडे सुध्दा आलेला आहे. शहरात येणारे पाणी हे एकूण ११० एम.एल.डी येते. त्यापैकी जुन्या शहरासाठी ८०-९० एम.एल.डी. व उर्वरित सिडको-हडको भागसाठी ४० एम.एल.डी. पाण्याची आवश्यकता आहे. असा खुलासा प्रशासनाने वृत्तपत्राद्वरे केलेला होता. ९० एम.एल.डी. पाणी शहरात येते. सगळीकडे पाण्याची टंचाई भासत आहे, असे चित्र असेल तर पाणी लिकीजेस होते का? याची सुध्दा दखल घेण्याची गरज आहे. अनेक अशा वसाहती आहेत की, मिसारवाडी, मयुरपार्क, जाधववाडी, पुंडलिकनगर, न्यायनगर,

जयसंतोषी माता नगर, हुसैन कॉलनी, न्यायनगर, पडेगांव, गारखेडा, जयभवानी नगर, राजीव गांधीनगर या भागात व अशा अनेक कॉलन्या आहेत की, तेथे पाणी पुरवठा होत नाही. शासनाच्या जी. आर चे निमित्त पुढे करून अनधिकृत वस्त्यात पाणी येत नाही असे प्रशासनातर्फे सांगण्यात येते. परंतु शासनाने असे कोठेचे म्हटलेले नाही की, पाणी पुरवठा अशा वस्त्यात करू नये. शासनाने खुद्द खेड्या गावांमध्ये टँकर व्यवस्था सुरू केलेली आहे. करोडो रुपयाची तरतूद पाण्यासाइी शासनाने केलेली आहे. अनधिकृत वसाहतींना पाणी देणार आहेत की नाही. देणार नसेल तर यापूर्वी कसे दिले. शहरात ११० एम.एल.डी पाणी येते शहरासाठी १० एम.एल.डी. जाते. शहरात सुध्दा पाण्याची टंचाई असून पाणी कोठे जाते असा प्रश्न निर्माण होतो. सिडको-हडको भागात ४० एम.एल.डी पाण्याची आवश्यकता असतांना २० एम.एल.डी पाणी देतो म्हणून एक दिवसाआड पाणी दिले जाते. मा. महापौर यांचा सुध्दा वॉर्ड या भागात येतो. गोरगरीब जनता जवळपास २ लक्ष लोक सिडको-हडको भागात राहतात व एक दिवसाआड पाणी देऊन सुध्दा त्यांचेकडून ३६५ दिवसाची पाणी पट्टी वसूल होत असेल तर एक प्रकारचा त्यांचेवर आपण अन्याय करतो आहे. हे विसरून चालता येणार नाही. ज्या ठिकाणी पाणी कमी सोडले जाते त्या भागात पाणीपट्टीचे बिले सुध्दा त्या प्रमाणात दिली पाहिजे या भागातील जनतेची पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून एक्सप्रेस लाईनचे काम चालू असून ती सुरू होण्या अगोदर येथील नागरिकांना एक दिवसाआड पाणी देऊन व्याज आकारणी सुरू केली एकीकडे सुविधा केली असे दाखवायचे व दुसऱ्या बाजूने भरमसाठ वसूल करायचे हा जनतेवर अन्याय होत आहे. याची दखल घेणे आवश्यक आहे. या सभागगृहाने मालमत्ता कर व पाणीपट्टी करावर व्याज लावण्यात येऊ नये म्हणून निर्णय घेतला व्याज आकारणे बंद केले का? हा माझा तिसरा प्रश्न आहे. व्याज माफ करण्याचा निर्णय घेवून प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर सभागृहाचा निर्णय काय समजायचा निर्णय घेऊन कार्यवाही होत नसेल तर सभागृहाचा अपमान असून यामुळे जनता व लोकप्रतिनिधी यांचेत वाद निर्माण होतो म्हणून चांगले प्रशासन चालवायचे असेल तर सभागृहात झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. तसेच शहरात किती वसाहतीत टँकरद्वारे पाणी दिले जाते टँकरची संख्या किती. टँकरच्या किती खेपा होतात या सर्वांचा खुलासा तसेच काही भागात दूषित पाणी येत आहे, तयांचा देखील खुलासा प्रशासनाने सविस्तर द्यावा.

श्री. राजु शिंदे : पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झालेला असून यावर काहीही उपाय निघणार नाही. असे माझे मत आहे. पाण्याची पातळी सध्या खाली गेलेली आहे. वॉर्डातील विहिरी, हातपंप दुरुस्त केले तर वॉर्डातील जनतेला पाणी मिळू शकते. मार्च अखेर असून या वर्षातील स्वेच्छा निधीतून हातपंप करायचे असेल तर एप्रिल मध्ये पत्र दिल्यास कार्यवाही मे मध्ये होईल म्हणून पाण्याची पातळी खाली जाऊ शकते. त्यासाठी जे हातपंप वॉर्डात करणार आहेत ते एप्रिल पर्यंत व्हावे तसे आदेश द्यावे व तसे पत्र स. सदस्यांकडून येऊन मार्च, एप्रिल पर्यंत हातपंप व्हावे जेणे करून पाण्याची टंचाई भासणार नाही.

श्री. भगवान रगडे : पाणी प्रश्न हा शहरातील नागरिकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे, अनिधिकृत वस्त्यामध्ये पाणी नाही. त्या नागरिकांचे काय हाल होतात. हे त्यांनाच माहिती अशा भागात रस्ते, लाईट, नाली, गटार व्यवस्था देत नाही. तर पाण्याची सुध्दा समस्या अशा भागात आहे. काही भागात टँकर द्वारे पाणी पुरवठा होतो परंतु तो अपुरा होतो ज्या भागात विहिरी असतील त्या साफ सफाई करून त्यातील गाळ काढून पाणी पुरवठा करू शकतो. एका अनधिकृत वस्तीचे उदा देतो. मिसारवाडी भागात दररोज १३ टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो. यावर महापालिकेचा खूप पैसा खर्च होतो. एका वस्तीसाठी एवढा मोठा खर्च होत असेल तर अशा वस्त्यासाठी एक पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करून सामुहिक रित्या नळ योजना करून एक सामुहिक टाकी तयार करून तेथे पाणी सोडण्यात यावे. यामुळे जो टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो तो होणारा मोठ्या प्रमाणातील खर्च वाचेल याची जाणीव ठेवून सार्वजनिक नळ योजना उपलब्ध करून द्यावी. उन्हाळ्याचे दिवस असल्याने जमीनीत सुध्दा पाणी नाही. पाणी मोठ्या प्रमाणात लागणार आहे. टँकरद्वरे पाणी द्यायचे असेल तर टँकरची संख्या वाढवावी, भाडे तत्त्वावर टँकर घेऊन उन्हाळ्याचे दिवसापर्यंत तरी पाणी पुरवावे.

सौ. लिलावती घायतिलक : सन २००० पासून माझ्या वॉर्डात पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झालेला आहे. वेळेवर पाणी सोडले जात नाही. १५-२० मिनिटे सुध्दा पाणी दिले जात नाही. वॉर्डातील तानाजीनगर भागातील विहिर साफ करावी. म्हणून संबंधित अधिकारी यांना तसे पत्र दिले कार्यवाही होत नाही. आश्वासन दिले जाते. परंतु कार्यवाही होत नाही. पाणी दिले जात नसेल तर पाणी पट्टीच देणार नाही. असे नागरिक बोलतात. ज्यांनी पाणीपट्टी भरली नाही त्यांचे नळ कट केले. ते जोडून दिले पाहिजे. थकित रक्कमेची विभागणी करून वसूली करावी. नागरिक ही पैसे भरण्यास पुढे येतील पाणी सुध्दा भरपूर द्यावे. अनधिकृत नळ कनेक्शन कायम केल्यास योग्यच होईल. जे उद्दिष्ट झाने वाईनज अभय योजनेचे दिले जाते ते पूर्ण होण्यास मदत होत नाही. अनधिकृत नळ शोधून काढले जात नाही. वसूलीसाठी झोन विभागाने दर महिन्यात वॉर्डात फिरून कार्यवाही केली पाहिजे. तरच लोक २००-२०० प्रमाणे पाणी पट्टी भरू शकेल जो प्रश्न, पत्र दिले जाते त्याकडे प्रशासन कानाडोळा करते हे योग्य नाही.

सौ. नुसरत बानो : उन्हाळ्याचे दिवस असून पाण्याची जास्त प्रमाणात गरज भासत आहे. एकीकडे पाण्याची टंचाई जाणवत असतांना नळ कट करण्याची मोहिम सुरू केली. अनधिकृत नळ असेल तर ३०००/- रु. दंड आकारणी करून २४००/- रु. भरून अधिकृत करील आहे. गरीब नागरिक एवढे पैसे भरू शकत नाही. याचा विचार करून लिगल करण्याची कार्यवाही होत आहे. जे नागरिक रु. २४००/- भरून लिगल करू शकत नाही ते ३०००/- रु. दंड कसे भरणार तो निर्णय रद्द करून व जागेवरच नळ लिगल करण्याची कार्यवाही व्हावी. यात महापालिका व नागरिकांचा सुध्दा फायदा आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : पोट तिडकीने स. सदस्यांनी पाण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थि तकेले. यात महिला सदस्यांनी सुध्दा सहभाग घेतला. पाण्याचा साठा किती आहे. सिडको-हडको भागात पाणीपुरवठा सुरळीत करणार आहे किंवा कसे असे स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. जे जे मुद्दे स. सदस्यांनी मांडले

त्यावर खुलासा होणे अत्यंत गरजेचे आहे. आतापर्यंत अनधिकृत वसाहतीमध्ये पाणीपुरवठा करीत होतो. परंतु शासनाचा अध्यादेश असल्यामुळे यापूर्वी पासून अडचण निर्माण होणार आहे. या शहराला सुरळीत पाणीपुरवठा योजनेचा ८८ लक्षचा प्रस्ताव नगर विकास विभागाला पाठवलेले आहे. स. सदस्य श्री. कोकाटे तसेच विरोधी पक्षनेते, सभापती, मा. महापौर, मा. उपमहापौर तसेच जेष्ठ सदस्यांचे एक शिष्ठमंडळ नगर विकास विभागस भेट देऊन ही योजना कशी तात्काळ मंजूर करून आणता येईल यासाठी प्रयत्न करावे. आताच काही सदस्यांनी वॉर्डात दूषित पाणी येते. मुद्दा उपस्थित केला याची कटाक्षाने दखल घेण्यात यावी. व स्वच्छ पाणी कसे देता येईल याकडे लक्ष देण्यात यावे. पाणी प्रश्नांवर कशा पध्दतीने मात करणार यावर खुलासा करावा.

श्री.जयवंत ओक : ज्या संचिका मंजूरी विना पडलेल्या आहेत त्यावर तात्काळ निर्णय घ्यावेत. मा. आयुक्तांनी खुलसा करावा की, पाण्याच्या बाबतीत प्रशासन काय उपाययोजनाकरणार आहे. जायकवाडी मध्ये पाण्याची परिस्थिती काय आहे. जनतेला पाण्याचा त्रास होणार नाही असे जाहिर करावे. आश्वासन द्यावे. (या सदंर्भात मा. आयुक्तांनी खुलासा करावा व हिंदी भाषेतून करावा अशी मागणी होते.

मा. महापौर : मा. आयुक्तांनी खुलासा करावा हिंदी भाषेतून करावा.

मा. आयुक्त : (हिंदी भाषेत खुलासा करतात.) या शहरात जायकवाडी वरून पाणी पुरवठा होतो हे सर्वांना माहितच आहे. फारोळा येथे वॉटर ट्रिटमेंट प्लँट आहे. तेथून पाणी नक्षत्रवाडी व नक्षत्रवाडी व नक्षत्रवाडीहून शहरात पाणी येते. दुसरे पाण्याचे कंद्र हर्सूल येथे आहे. येथून पाणी पुरवठा होऊ शकतो. परंतु उन्हाळ्यामध्ये पाणी नसते इतर वेळात पाणी मिळू शकते. एका व्यक्तीला किती पाणी द्यावेत एक संस्था नागपुर येथे आहे सर्व्हे करते. प्रत्येक शहरातील किमान पाणी किती द्यावे याचा निष्कर्ष ही संस्था देते. कोणत्या ठिकाणी किती पाणी एका व्यक्तींला आवश्यक आहे, हे तेथील तापमान, पाण्याचा वापर यावर अवलंबून आहे. आज रोजी शहरात फक्त ११० एम.एल.डी पाणी शहराला दिले जाते २० एम.एल.डी. पाणी सिडको-हडको भागात दिले जाते. सिडको-हडको भागसाठी ३२ एम.एल.डी पाण्याची आवश्यकता आहे. पाणी पुरवठा हा २४ तास चालू असतो यात दोन प्रकारे सातत्याने समस्या निर्माण होतात. एक तर लाईट गेल्यास तसेच जुन्या जलवाहिनेचे दुरुस्तीचे काम असल्यास तेवढा वेळा पाणी पुरवठा खंडित होतो. लाईटचे काही काम करायचे असेल तर तसे अगोदरच या विभागास कळवावे जेणे करून महापालिकेस जनतेला तसे आवाहन करता येईल असे एम.एस.ई.बी. कार्यालयास कळविले आहे. सिडको-हडको भागात रात्री १२=०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा होतो हे सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे या सभागृहाने मान्यत दिलेली ६७ कोटीची योजना शासनाकडे दिलेली आहे. ती योजना अंमलात आल्यास सन २०११ पर्यंत लोकसंख्येची वाढ विचारात घेऊन पाणी पुरवठा होऊ शकेल या योजनेसाठी नवीन असे काही पंप बसविणार आहोत. जे की, फारोळा येथून जास्तीत जास्त पाणीपुरवठा या शहरासाठी आणता येईल. क्षमता वाढविण्याची यंत्रणा बसवावी लागेल. महाराष्ट्रात सर्वांज जास्त पाणी या शहरात दिले जाते. असे महाराष्ट्र जीवन

प्राधिकरणाचा अहवाल आहे. न्यायालयात सुध्दा तसे सादर करण्यात आले. या शहराला प्रत्येक व्यक्ती मागे १२५ लिटर पाणी दिले जाते सिडको-हडको भागातील जनतेला ८०-९० लिटर दिले जाते १२५ लिटर मिळत नाही कारण १ दिवसा आड पाणी दिले जाते. एवढे पाणी महाराष्ट्रात कुठल्याही शहरात दिले जात नाही. असा अहवाल आहे. सिडको-हडको भागात महानगरपालिकेस पाणी देणे बंधनकारक आहे. म्हणून या सभागृहाने ५.१० कोटी रुपये मंजूर करून योजना तयार करण्यासाठी कार्यवाही करावी म्हणून मान्यता दिली. त्यापैकी २.५० कोटी रुपये आतापर्यंत देण्यात सुध्दा आले या प्रोजेक्टचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकारणावर सोपविले आहे. जे की, सिडको वासीयांची पाण्याची समस्या दूर होणार आहे. ३० मार्च पर्यंत काम पूर्ण करण्याचे निश्चित होते परंतु ३० एप्रिल पर्यंत काम पूर्ण होईल जे रेल्वे पटरी जवळ काम करायचे होते ते काम संबंधित विभागच करू शकते. तसेच दुसरी अडचण अशी की, बीड बायपास रस्त्यावर क्रॉसिंग येत होती. काम करण्यास उशीर लागेल. या बाबतीत न्यायालयाचे सुध्दा लक्ष वेधून सदर काम ३० एप्रिल पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना आहेत. व ३० एप्रिल २००३ पर्यंत ही योजना पूर्ण होईल. दुसरी एक सूचना सदस्यांनी मांडली पाण्याची पातळी कमी होत आहे. व पाणी पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने ४० लक्ष रुपये मशिनरी खरेदीसाठी मंजूर केलेले आहे. त्या बाबतीत ही टेंडर आपण मंजूर केलेले आहे. तसेच एन-५ मधील पाण्याच्या टाकीवरील छत्राचे हि काम करण्याबाबत मंजूरी दिलेली आहे. हेड लेव्हलला पातळी आहे. तसेच टाकीमध्ये पाण्याची कॅपॅसिटी वाढविण्याच्या दृष्टीने जी मशिनरी आहे ते सुध्दा दुरुस्तीचे कामास मंजुरी दिलेली आहे. यामुळे पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच या शहरात ज्या विहिरी आहे, त्यातील साफसफाई करून त्यातील मटेरियल काढून पाण्याचा वापर, करता येईल तसेच या शहरात ५८८ हातपंप असून त्यातील बरेच बंद असून त्याचे सर्व्हे करून दुरुस्तीचे काम करून कार्यवाही करण्यांत येईल. झोन वाईज अनधिकृत नळ शोध मोहिम सुरू असून ८-१० दिवसात ३५० ते ४०० नळ आढळून आले. व ते कट करण्यासाठी कार्यवाही केली. जनतेच्या सोयीसाठी अभय योजना सुरू केली होती. परंतु त्यास म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. फक्त १८००० नळ कनेक्शन लिगल झालेले आहे. बरेच नागरिक विद्युत मोटार लाऊन पाणी घेतात. त्यामुळे बाजुच्या घराला पाणी मिळत नाही. सर्वांना पाणी मिळेल या दृष्टीने सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. अनधिकृत वस्त्यात पाणी देऊ नये असे शासनाने म्हटले नाही., परंतु अनधिकृत वस्त्यामध्ये ज्या आवश्यक सुविधा द्यायच्या त्यावर बंदी घातलेली आहे. यामध्ये ड्रेनेज, पाणी, रस्ते, लाईट हे सर्वच आले. शासनाने गुंठेवारी कायदा लागू केला. त्यास जास्तीत जास्त रिस्पॉन्स मिळावा व अनधिकृत वस्त्या अधिकृत कशा होतील हे शासनाचे विचार आहे. सर्वच भागात सुविधा दिल्यास गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी होणार नाही. हा दृष्टीकोन शासना समोर आहे. म्हणून सुविधा देण्याचे बंद केलेले आहे. शहरातील जे हातपंप, विहिरी, आहे या मार्गाने पाणी मिळविण्याच्या दृष्टीने शासन जसे ग्रामपंचायत, नगरपालिका, यांना पाण्यासाठी निधी उपलब्ध करून देते त्या हेड मधूनच या शहरासाठी सुध्दा ८८ लक्षचा निधी द्यावा, म्हणून शासन

दरबारी प्रस्ताव दिलेला आहे. त्यास मान्यता घेण्यासाठी पादाधिकारी जातील आताच सांगण्यात आले. यातून किमान अनधिकत वस्त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करता येईल. ज्या भागाचा गुंठेवारी कायदा लागू होईल, व तेवढा बेनीफीट महापालिकेस मिळाली असे डिक्लेअर झाल्यास इतर सुविधा देण्याचा वेळ लागेल त्याची वेळ न बघता पाण्याची सुविधा त्या वस्तीत दिली जाईल. व प्रत्येक घरासाठी रु. ६००/- घेऊन टँकरद्वारे पाणी दिले जाईल असा स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री. नासेरखॉन सरदारखॉन : उपाय योजनेबाबत आयुक्तांनी खुलासा केला परंतु आजची परिस्थिती अशी की, नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो आहे.

श्री. संजय शिरसाठ : काही सदस्यांच्या मागणीनुसार या आयुक्तांनी हिंदी भाषेतून खुलासा केला. हिंदी भाषेची जास्त उत्सुकता काही सदस्यांना आली असे वाटते हेड लेव्हलला हिंदी मध्ये काय म्हणतात? हिंदी भाषेत असा खुलासा करायचा असेल तर या सभागृहाचे कामकाज सुध्दा हिंदीतून व्हावे शासनाला सुध्दा प्रशासनाने तसे कळवावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : मा. महापौरांनीच मा. आयुक्तांना हिंदी भाषेतून बोलण्यास आदेशित केले म्हणून स. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यात महापौरांचा अवमान केलेला आहे म्हणून त्यांचे एक दिवसासासाठी सभासदत्व रद्द करावे.

मा. महापौर : आजची सभा १ तासासाठी तहकूब करण्यात येते.
(दुपारी १.५० वाजता तहकूब झालेली सभा पुन्हा २.५० वाजता सुरू)

श्री. भाऊसाहेब ताठे : पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी प्रत्येक वॉर्डात २ हातपंप तसेच सिडको-हडको भागातील वॉर्डात प्रत्येकी ३ हातपंप घेण्यात यावे.

श्री. राजु शिंदे : ११० एम.एल.डी. पाणी येते. ते फक्त कागदावरच आहे. २० एम.एल.डी. सिडको-हडको व ९० एम.एल.डी. जुन्या शहरात पाणी दिले जाते. आताच खुलासा झाला. तो चुकीचा आहे सिडको भागात २० एम.एल.डी. पाणी आजही मिळत नाही. व ९० एम.एल.डी. शहरात पाणी दिले जात नाही अनेक ठिकाणी पाणी शहरात लिकिजेस होत असल्याचे दिसून येईल. सिडकोचे ५ व शहरातील १० असे १०-१५ एम.एल.डी पाणी लिकिजेस द्वारे वाया जाते. फक्त ८० एम.एल.डी. पाणी शहरास मिळते असे माझे मत आहे. प्रत्येक व्यक्तींला १२५ लीटर पाणी प्रत्येक दिवशी दिले जात असेल तर या सभागृहास कुणी चर्चा सुध्दा करणार नाही. नुसते कागदावर असून चालणार नाही प्रत्यक्षात तेवढे पाणी दिलेच पाहिजे अभय योजना राबविण्या बाबत जो निर्णय या सभगृहाने घेतला त्यानुसार अंमलबजावणी झालेली नाही. जनतेला माहिती दिली नाही. जाहीर प्रगटन करावे. रिक्षाद्वारे माईक स्पीकर लाऊन जनतेपर्यंत माहिती दिली नाही. जनजागृती जनतेमध्ये केलेली नाही. नळ कट करण्याची कार्यवाही तात्काळ होते, परंतु जे लोक नळपट्टी भरूनही त्यांना वेळेवर पाणी देण्याची कार्यवाही होत नाही वेळेवर व भरपूर पाणी दिल्यास कुणी विद्युत मोटार लाऊन पाणी घेणार नाही. तसेच ज्या विहिरी मध्ये पाणी असेल अशा विहिरीतील गाळ काढून साफसफाई करण्याबाबत अनेकवेळा पत्र दिले. सर्व्हेचे काम केले. परंतु एकाही

विहिरीची आतापर्यंत साफसफाई झालेली नाही. झाली असेल तर तसा खुलासा करावा. वॉर्डात एकूण ५८८ हातपंप आहे. त्याचा सर्व्हे केला का किती हातपंप बंद आहेत. माझ्या वॉर्डातील दोन हातपंप बंद असून पत्र देऊन तात्काळ कार्यवाही होईल म्हणून मी स्वत: त्या विभागात अनेक वेळा गेलो परंतु अद्याप हातपंप चालू झाले नाही. पाण्याच्या बाबतीत असे दुर्लक्ष होत असेल तर बैठका घेऊन अर्थ नाही यास सभागृहात चर्चा होऊन मा. महापौर निर्णय घेतात त्याचीं अंमलबजावणी होत नसेल तर अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. एक दिवसाआड पाणी येते गेल्या दोन दिवसापसून पाणी आले नाही. किती हातपंप व विहिरी दुरुस्त झालेल्या आहे. याचा खुलासा द्यावा. हातपंपासाठी लागणारा खर्च पुढील वर्षाच्या निधीतून करावा परंतु स. सदस्यांचे ॲडव्हान्स मध्ये पत्र घेऊन मार्च पर्यंतचे कार्यवाही करून हातपंप चालू करावे.

श्री. नंदकुमार घोडेले : माजी मापौर डॉ. कराड यांचे सासूचे निधन झालेले आहे. अंत्ययात्रेसाठी जायचे असल्याने अगोदर विषय पत्रिका घेऊन त्यांनतर वेळ मिळेल. त्याप्रमाणे पुन्हा या विषयावर चर्चा करावी.

श्री. स. अली. सलामी : आताच आयुक्तांनी खुलासा केला ८-१० वर्षापासून अशाच प्रकारे प्रशासनाचे मत आम्ही जाणून घेतले. पाण्याच्या बाबतीत फ्युचर प्लॅनिंग काय राहणार आहे इतर शहरात प्रत्येक व्यक्तीला दररोज ९० लिटर पाणी दिले जाते या शहरातील प्रत्येक नागरिकांना एक दिवसाला १२५ लिटर पाणी देतो असा खुलासा झाला. इतर महापालिकेचा तसा काही अहवाल आहे का? जनतेला पाण्यासाठी भटकत फिरावे लागते. त्रास होतो. काही भागात दुर्गंधी युक्त पाणी दिले जाते याची दखल प्रशासन घेणार आहे की नाही फ्युचर प्लॅन करणे जरुरीचे आहे. ड्रेनेजचे पाणी येते. तात्काळ टेंडर काढून काम कसे तात्काळ करता येईल याचा खुलासा व्हावा. आठ दिवसात ६०० नळ कट केले खुलासा झाला परंतु पणी सुध्दा मुबलक देण्याची गरज आहे. अभय योजनेची अंमलबजावणी ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे होती, त्याप्रमाणे झालेली नाही. नागरिकांचा रिस्पॉन्स मिळाला नाही. असे म्हणने चुकीचे होईल या योजनेबाबत बऱ्याच नागरिकांना काहीच माहित नाही. झोन मध्ये जनता जाते. वेगळी प्रोसीजर दाखविली जाते कर्मचारी सहकार्य करीत नाही ही योजना राबविण्याच्या दृष्टीने टाईम लिमिट वाढवावे. जनतेमध्ये जन जागृती निर्माण करून या योजने बाबत जनतेला माहिती द्यावी. ज्यांचे नळ कट केले. अशा कडून दंड वसूल करून नळ कनेक्शन कायम करावे.

कनिष्ठ अभियंता (पा.पु.) विहिरीच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. वापरण्यास योग्य असेल तर त्या विहिरीचा गाळ काढून कार्यवाही होईल.

श्री. भगवान रगडे : पाणी पिण्यासाठी योग्य आहे अशा किती विहिरीचे पाण्याचे नमुने पाठविण्यात आलेले आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : कोणत्या विहिरीचे सॅम्पल पाठवले. त्या विहिरी कोणत्या भागात येतात. आणि केंव्हा पाठविले माझ्या वॉर्डात विहिरीचे दुरुस्तीचे काम करण्यासाठी निधी ठेवला होता काम झाले नाही.

श्री. राजु शिंदे : शहरात एकूण विहिरी किती, किती विहिरीचे सॅम्पल पाठविले, किती विहिरीचा गाळ काढला खुलासा द्यावा.

कनिष्ठ अभियंता (पा.पु.) : जायकवाडी जे पंप आहे ते २४ तास ऑपरेट करतो आहे. मध्यांतरी ३-४ दिवस बंद होते. शहरात एकूण १५० विहिरी असून ५० विहिरीचे पाण्याचे सॅम्पल तपासणीसाठी पाठविले आहे. वापरण्यास योग्य असलेल्या पाण्याच्या ज्या विहिरी आहे त्यातील गाळ काढून कार्यवाही करता येईल. पाण्याचे नमुने पाठवलेल्याचा अहवाल आलेला नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : हा विषय गंभीर स्वरुपाचा असून विशेष बैठक आयोजित करून निर्णय घ्यावा सभागृहात संबंधित अधिकारी उपस्थित राहतील त्यावेळी खुलासा मिळेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहात गंभीर विषयावर चर्चा चालू असतांना त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे. न्यायालयात काय स्टेटमेंट सादर केलेले आहे. अनधिकृत वस्त्यात पाणी देणार की नाही हा सभागृहाचा प्रश्न आहे. शासन पातळीवर दरवर्षी विहिरीचा सर्वे होतोच तो प्रश्न येत नाही. अनधिकृत भागात पाणी देणार आहे की नाही?

श्री. राजु शिंदे : विहिरी साफ करून गाळ काढून घ्यावा. ०८ दिवसा नंतर बैठक बोलावून सभागृहात तसा अहवाल सादर करावा. जनतेला या पाण्याचा उपयोग घेता आला पाहिजे.

मा. महापौर : शहरातील विहिरी साफ सफाई करून, नादुरुस्त असलेले हातपंप दुरुस्त करून घेऊन नागरिकांना स्वच्छ व भरपूर पाणी कसे मिळेल या बाबत प्रशासनाने दखल घ्यावी. व सन २००३ एप्रिल पर्यंत एक्सप्रेस जल वाहिनीचे काम पूर्ण होऊन सिडको-हडको भागातील जनतेला मुबलक पाणी कसे देता येईल, यासाठी तात्काळ कार्यवाही होईल याची दखल घेऊन स. सदस्यांनी मांडलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी. शहरातील सर्व वसाहतीत जनतेला पाणी पुरवठा व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने १५ टँकर भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा करण्यांत यावा.

मा. उपमहापौर : मा. महापौर यांनी प्रशासनाला आताच आदेशित करून दिले त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी असे माझे मत आहे.

**विषय क्र. ३६/१ :** दिनांक २०/०१/२००३, २७/०१/२००३, १८/०२/२००३ आणि दिनांक २०/०२/२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. भगवान रगडे : दिनांक २०/०२/२००३ च्या सभेतील विषय क्र. ३१ हा विद्यापीठ गेट समोर असलेला स्तंभ हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव होता. त्यास आमचा विरोध असतांना मंजूर केलेला आहे. आमच्या शब्दाला अर्थ राहिला नाही. स. सदस्य श्री. तांबे यांनी सुध्दा विरोध दर्शविला होतो. मंजूर केलेला ठराव रद्द करावा.

मा. महापौर : आपण प्रस्ताव त्यावेळीच मंजूर केलेला आहे.
(याचवेळी स. सदस्य श्री. भगवान रगडे मा. महापौर डायस समोर जातात व ठरावास विरोध असतांना मंजूर कसा केला खुलाशाची मागणी करतात मोठमोठ्याने बोलण्याचा आवाज येतो.)

श्री. स. अली सलामी : दिनांक २०/०२/२००३ च्या बैठीकत ठराव क्र. ३०/३ नुसार तिसऱ्या आघाडीची कॅबीन व इतर कार्यालयीन सुविधा काढून घेण्याचा प्रस्ताव होता सदर सभेचे इतिवृत्त आजच्या बैठकीत कायम होत आहे. त्या अगोदरच सिल लावण्यात आले. शहरात ड्रेनेजचे पाणी येते. त्याची दखल घेण्यास वेळ लागतो. प्रशासनास ते काम आवश्यक वाटले नाही. परंतु कॅबीन काढून घेण्याची कार्यवाही आवश्यक वाटली. हे कितपत बरोबर आहे. जो प्रसताव आला तो चुकीच्या पध्दतीने आलेला होतो. तिसऱ्या आघाडीच्या सदस्यांनी ८ महिन्यापूर्वी स. सदस्य श्री. अफसर खॉन यांना विरोधी पक्ष नेता करण्यासाठी पाठींबा दिला म्हणून स. सदस्य श्री. अंबादास दानवे व श्री. किशनचंद तनवाणी यांनी ऑब्जेक्शन घेतले. या प्रकरणांत न्यायालयीन प्रकरण झाले. व कॉंग्रेस पक्ष हा अधिकृत पक्ष असून विरोधी पक्ष नेते म्हणून त्या पक्षाचा उमेदवार असावा असा निकाल न्यायालयाने दिला. आम्ही पाठींबा दिला त्याचा उल्लेखच तेथे झालेला नाही. तर प्रश्नच निर्माण कोठे होतो. सदस्यांच्या मागणीनुसार प्रशासन प्रस्ताव सभगृहात आणून कार्यवाही करते त्याचा आम्ही निषेध करतो. कॅबीन सील करतांना पंचनामा तसेच त्या पक्षातील सदसयंच्या उपस्थितीत कार्यवाही करावयास पाहिजे, परंतु तसे झालेले दिसून येत नाही. कुण्याही तिसऱ्या आघाडीच्या सदस्या समक्ष कॅबीनला सील केलेल नाही. तसेच पत्रकार, ए.सी.एन चॅनल यांना बोलावून कार्यवाही करावयास पाहिजे होती. प्रत्येकाला वेळ येते. जनतेच्या कमासाठी ती कॅबीन घेतलेली होती. अशी कार्यवाही करणे कितपत योग्य आहे. प्रशासनास हा प्रस्ताव आणण्याची गरज नव्हती. ज्या पध्दतीने तो प्रस्ताव आला तो चुकीचा आहे. आम्ही सदस्य कोणत्याही प्रकारचे चुकीचे कामे करीत नाही. करिता ती कॅबीन पुन्हा देण्यात यावी. नसता मी न्यायालयात या बाबतीत दाद मागेल. सील लावतांना जी कार्यवाही झाली त्याचे जे पुरावे असतील ते नष्ट होऊ नये. नसता प्रशासन त्यास जबाबदार राहिल. सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा.

मा. महापौर : उप-आयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) या बाबतीत सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला होता. मा. महापौर यांचे त्या बैठकीत रुलींग आहे त्यानुसार ठराव टाकून हि कार्यवाही केलेली आहे. इतिवृत्त कायम करणे हि तांत्रिक बाब आहे. धोरणात्मक निर्णय सभेने घेतला होता त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

श्री. स. अली सलामी : या सभेने मालमत्ता तसेच पाणीपट्टी करावर व्याज आकारू नये असा धोरणात्मक निर्णय होऊन का कार्यवाही केलेली नाही. एकीकडे तांत्रिक मुद्दा दाखवायचा दुसरीकडे जनतेची पिळवणूक करायची हे प्रशासनाचे धोरण बरोबर नाही.

सौ. निखत परवीन : ३ वर्ष झाले, महिला सदस्यांना बसण्यास कक्ष उपलब्ध करून दिलेला नाही.

उपाआयुक्त (म.) महिला सदस्या करिता कक्ष उपलब्ध करण्यात आलेला होता. परंतु कार्यालयीन कामासाठी अपुरी पडत असलेली जागा विचारात घेऊन सदर कक्ष कार्यालयीन कामासाठी वापरण्यात येत असे. नवीन इमारतीमध्ये तेथील कार्यालय शिफ्ट झालेली आहे. सदर महिला सदस्य कक्ष १ महिण्याच्या आत स. महिला सदस्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे प्रथमच महापालिका स्थापन झाल्या पासून माजी महापौर डॉ. भागवत कराड यांचे कार्याकाळात तिसऱ्या आघाडीच्या गटनेत्यांना कॅबीन देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्या कॅबीनचे उद्‌घाटन झाले. सुरळीतपणे त्या आघाडीचे काम चालू असतांना जी वस्तुस्थिती स. सदस्यांनी मांडली, त्यास अनुसरून उत्तर बरोबर दिलेले नाही. स. सदस्य यांनी ६ महिन्यापूर्वी सभागृहात तक्रार केली. ६ महिन्याच्या नंतर म्हणजेच नुकीतच कॅबीनला सील लावण्यात आले. ६ महिन्यानंतर प्रशासनाला जागा आली का? इतिवृत्त कायम होणे ही तांत्रिक बाब आहे. असे उत्तर दिले हे माझ्या मते उपआयुक्त (म.) यांनी वैयक्तिक त्यांचे स्वतः मत मांडले असे वाटते. प्रशासकीय दृष्टीने बरोबर नाही. यासाठी नियमावली तयार केली पाहिजे. इतर महापालिकेमध्ये काय परिस्थिती आहे, सर्व माहिती घेऊनच कार्यवाही करणे योग्य झाले असते. गटनेत्यांनी कॅबीन मागणी केली तेंव्हा इतरही गटनेतयांनी कॅबीनची मागणी केली होती. नियम तयार करून नियमाला धरून कोणतीही कार्यवाही झाली पाहिजे. प्रशासनाच्या सोयी नुसार प्रशासन कामकाज चालवत असेल तर मी त्याचा निषेध करतो. वृत्तपत्रात नेहमीच बातम्या येतात. मा. आयुक्तांवर आरोप केले म्हणून परवानगी प्रशासन देते परंतु बदनामी सदस्यांची होते. आरोप होतात असे म्हणणे चुकीचे होईल. प्रशासनाने त्याचे अधिकारात परवानगी दिली. सभगृहात चर्चा होते व आरोप म्हणून संबोधले जात असेल व या निषेधार्थ अधिकारी संघटना सुट्टी घेऊन रजेवर जात असतील, तर नागरिकांचा विकास कामामध्ये एक प्रकारची विकास कामे थांबण्याचा प्रकार आहे. ही परिस्थिती निर्माण करण्यासाची प्रथा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी बंद करावी. व प्रशासनाची अशी दुटप्पी भूमिका असू नये. इतिवृत्त कायम न होता कार्यवाही करणे बरोबर नाही येथे कायदेशीर खुलासा झाला पाहिजे. आताच महिला सदस्यांनी कॅबीनचा मुद्दा उपस्थित केला. नवीन इमारत होऊन वर्ष झाले. ८-१० महिन्यापूर्वी कार्यालये शिफ्ट झाली. परंतु अद्याप महिला सदस्यांचा कक्ष व्यवस्थित करून उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही. नगरसेवक / नगरसेविकांच्या बाबतीत जाणून बुजून दुर्लक्ष केले जाते हे प्रशासनचे धोरण योग्य नाही.

श्री. स. अली सलामी : जी कार्यवाही करण्यांत आली ती इलिगल झालेली आहे. तिसऱ्या आघाडीच्या सदस्यांना प्रशासनाने विश्वासात घेऊन कार्यवाही केलेली नाही.

मा. महापौर : प्रशासनाने या बाबत खुलासा केलेला आहे.

श्री. भगवान रगडे : स्तंभाच्या संदर्भात जो प्रस्ताव होता त्यास माझा विरोध होता, तरी मंजूर कसा करण्यात आला खुलासा द्यावा.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : प्रस्ताव मंजूर केलेला आहे. दुरुस्ती काय असेल ती करता येईल. इतिवृत्त कायम करावे.

मा. महापौर : इतिवृत्तामध्ये हा प्रस्ताव मागच्या बैठकीकत मंजूर करण्यात आलेला आहे. तयावर चर्चा करता येणार नाही.

श्री. भगवान रगडे : प्रस्तावास विरोध असतांना मंजूर करणे योग्य नाही. संपूर्ण सभागृहाचे मत लक्षात घेऊनच निर्णय घ्यावयास पाहिजे होता परंतु विरोध असूनही प्रस्तावास मान्यता दिली.

मा. महापौर : विषय क्र. १ इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ३६/१ :** दिनांक २०/०१/२००३, २७/०१/२००३, १८/०२/२००३ आणि दिनांक २०/०२/२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**विषय क्र. ३७/२ :** सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १२ मिटर (४० फुट) रुंद रस्ता हर्षनगर ते लेबर कॉलनी या रस्त्याने न.भू.क्र. ६८७४ व ६८७५ ह्या मिळकती बाधित आहे. उक्त मिळकत धारकाने बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक २८/०८/२०००२ रोजी दिलेली आहे. प्रकरणात १२७ ची खरेदी सूचना असल्याने भूसंपादन प्रस्ताव खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून सहा महिण्याच्या आत म्हणजे दिनांक २७/०२/२००३ पूर्वी मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

उक्त रस्त्याने वरील मिळकती बाधित असून बाधित क्षेत्र अंदाजे अनुक्रमे २५२ चौ. मी. व २४१ चौ. मी. असे एकूण ४९३ चौ. मी. आहे शिघ्र सिध्द गणक दर रु. ३०००/- प्रति चौ. मी. आहे. करिता संपादनासाठी सुमारे १५ लाख रु. खर्च अपेक्षित आहे.

प्रकरणात मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली असल्याने बाधित क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे.

सबब उक्त मिळकतीचे वरील बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी व त्यास लागणारा वरील प्रमाणे भूसंपादन खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

श्री. नंदकुमार घोडेले : विषय क्र. २,५,६ च्या संदर्भात बोलतो आहे. यापूर्वी असे प्रस्ताव होते. जयावेळेस चर्चेस नोटीस होतात. त्यावेळसच महापालिकेची आर्थिक परिस्थिती बघण्याची गरज आहे. ज्या जागेचे भसंपादन करायचे त्या जागेची आजची स्थिती त्या जागेचा नकाशा सादर करणे आवश्यक होते. प्रस्तावा सोबत नकाशा वगैरे दिसून येत नाही. एक महिना शिल्लक असतांना असा प्रस्ताव आणणे कितपत योग्य असून शेवटच्या महिन्यापर्यंत का म्हणून वाट बघायची अशा मोठ्या रकमा खर्च करून यात महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला का? अशा जागा भूसंपादन केल्यास एक वेळ अशी येईल की, कर्मचाऱ्यांचे वेतन देणे शक्य होणार नाही. असे प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत या सभागृहात यावेत.

सहा. संचालक (न.र.) : सूचना प्राप्त झाल्या नंतर जे की, १२७ ची नोटीस प्राप्त होते १२७ ची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ६ महिन्याच्या आत भूसंपादनाची कार्यवाही करावी लागते. ४९ ची नोटीस प्राप्त झाल्यानंतर १ वर्षाच्या आत भूसंपादनाची कार्यवाही करावी लागते. भूसंपादनाची कार्यवाही न झाल्यास सदर जागा विकास योजना आराखड्यातून रद्द होते. पर्चेस नोटीस प्राप्त झाली व महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखा परिक्षक यांचे कडून आर्थिक परिस्थितीचा अभिप्राय घेतल्या नंतरच असे भूसंपादनाचे प्रस्ताव मा. आयुक्तांकडे पाठविण्यांत येतात. दुसरे मत सभागृहात व्यक्त केले की, मर्यादित वेळेत प्रस्ताव का आलेला नाही

पर्चेस नोटीस प्राप्त झाल्यानंतरच सर्व कार्यवाही सुरू झाली. प्रस्ताव येण्यास विलंब झाला. यापुढे वेळेवर प्रस्ताव पाठविण्याची दक्षता घेण्यात येईल.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : १२७ ची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ६ महिन्याच्या आत कार्यवाही करावी लागते. दि. २७/०२/२००३ पूर्वीच प्रस्ताव यावयास पाहिजे होता. प्रस्ताव पाठविण्याची मुदत संपलेली असतांना प्रस्ताव.

श्री. नंदकुमार घोडेले : जेंव्हा असे प्रस्ताव येतात चर्चेला घेतले होते जागेचा स्थिती नकाशा सभागृहाला ठेवण्या बाबत निर्णय घेतला होता परंतु तशा पध्दतीने प्रस्ताव नसून प्रचलित पध्दतीने प्रस्ताव येतात. आतापर्यंत किती प्रस्ताव लेखा विभागाडून मंजूर केले किती प्रस्ताव आतापर्यंत मंजूर केलेले आहेत. नोंद लेखा विभागाकडे आहे का? किती जागेच्या संदर्भात लेखा विभागाचा अभिप्राय घेतला खुलासा द्यावा. प्रस्ताव मंजूर केला नाही तरी तो तसाच जिल्हाधिकारी यांना पाठवणे, सभागृहाचे मंजुरी न दिल्यात असे किती प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले. रेडिरेट प्रमाणे किंमत वाढली असेल त्यास कोण जबाबदार आहे. पुन्हा रक्कम देण्याचे प्रस्ताव येतील का? संपूर्ण माहिती सह असे प्रस्ताव आले पाहिजे कोणत्या वर्षात ही रक्कम देय राहील याचा तरी खुलासा व्हावा.

सहा. संचालक (न.र.) प्रस्ताव संबंधिची संपूर्ण माहिती देण्यास संदर्भात कळविले भूसंपादनाची कार्यवाही करतो. तेंव्हा द्यावी लागणरी रक्कम यास मान्यता घेऊनच कार्यवाही होते.

श्री. काशिनाथ कोकाटे : भूसंपादनाची जागा घेणे जरुरीचे असेल तरच घेली पाहिजे. मुळ मालक जेंव्हा पर्चेस नोटीस देतात तेंव्हा महापालिकेस जाग येते. किती जागा बाधील होते. किती खर्च आवश्यक आहे. याचा प्रस्तावात उल्लेख नसतो. सर्व्हेक्षण झाले पाहिजे रक्कम देऊ शकतो का खुलासा द्यावा. प्रशासनाच्या सोयीनुसार प्रस्ताव येतात अशा जागाच्या बाबतीत महापालिकेने नोटीस पाठवून त्या जागा घेतल्या पाहिजे.

श्री. तकी हसन खान : रस्त्याचे रुंदरीकरण झाले पाहिजे हे सुध्दा महत्वाचे आहे. १२७ ची नोटीस दिल्यानंतर स्टेप बाय स्टेप कार्यवाही झाली पाहिजे ऐनवेळी प्रस्ताव आल्यास या सभागृहाची जबाबदारी आहे. प्रस्ताव मंजूर करायचा की नाही. मंजुरी देत नसेल तर डिलिट करण्याची कार्यवाही झाली पाहिजे. शासनाकडे तसे पाठविले पाहिजे शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने रस्ता रुंदीकरण करणे जुरुरी असेल तर असे प्रस्ताव मंजूर केले पाहिजे. नुसती प्रस्तावावर चर्चा करून नामंजूर करणे म्हणजे विकास कामास अडचण निर्माण करणे होय. टी.डी.आर. चा प्रस्तावानुसार कार्यवाही झाली असती तर हा प्रश्न येथे निर्माण झाला नसता.

श्री. नंदकुमार घोडेले : लेखा विभागची मान्यता घेतलेली आहे का खुलासा द्यावा.

श्री. किशोर तुलशीबागवाले : रस्त्यासाठी जागा आवश्यक असेल तर ठराव मंजूर करावा.

श्री. तकीहसन खॉन : टी.डी.आर. चा प्रस्ताव मंजूर झाला असता तर रेडीरेट, रक्कम किती द्यावी लागणार ते प्रश्न निर्माण झाले नसते त्यासाठी टी.डी.आर. चा प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी आणून कार्यवाही करावी जेणे करून असे प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित होणार नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : रस्त्यासाठी जागा आवश्यक आहे प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी यापूर्वी नक्षत्रवाडी भागात १-२ कोटीचे भूसंपादनाचे प्रस्ताव मंजूर

केले सर्वच भूसंपादनासाठी कार्यवाही केल्यास १० वर्षात ही भूसंपादन करणार नाही अशी परिस्थिती आहे.

श्री. जगदिश सिंध्द : या जागेच्या संदर्भात प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकउे पाठविलेला आहे, अशी माझी माहिती आहे. नॉमीनल मंजुरी सभगृहाची घेत आहे. महानगरपालिकेस शहर सुधार समिती स्थापन केलेली असतांना त्या बैठकीत असे प्रस्ताव न आणता डायरेक्ट या सभागृहात आणेल जात असेल तर आम्ही सर्व संमतीने सभापती पदाचे राजीनामे देऊन टाकू समितीला अर्थच राहिला नाही हा प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत यावा. प्रस्ताव अगोदरच मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला असून त्याची प्रत सुध्दा मी आणून देऊ शकतो.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : शहराचा विकास करण्यास आमचा विरोध नाही. परंतु प्रशासनाच्या कार्यपध्दतीला विरोध आहे.

श्री. प्रशांत देसरडा : रस्त्याला लागून असलेले रस्त्यात बाधित होणऱ्या जागा यासाठी रक्कम द्यायची कोठून असा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी पर्याय म्हणून टी.डी.आर. प्रस्ताव मंजूर केल्यास योग्य होईल. टि.डी.आर. चा प्रस्ताव पुढील बैठकीत यावा असे आदेश प्रशासनास द्यावे. यात महापालिका व नगरिकांचा सुध्दा फायदा आहे.

मा. महापौर : सदर विषय क्र. २ शहर सुधार समिती कडे पाठविण्यात येतो.

श्री. तकी हसन खॉन : सर्वसाधारण सभेचे अधिकार विशेष समित्यांना देणे बरोबर नाही. टी.डी.आर. चा प्रस्ताव समितीकडे पाठविला अद्याप त्या प्रस्तावास मंजुरी होऊन सर्वसाधारण सभेत सादर झालेला नाही.

**ठराव क्र. ३७/२ :** सदरील प्रस्ताव शहर सुधार समितीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/३ :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे प्रस्ताव सादर करीत आहे की, रिट याचिका क्रमांक ३२५२/२००२ डॉ. शेख मो. शफी मो. अहमद विरुध्द महानगरपालिका औरंगाबाद आणि इतर. दिनांक ०५/०२/२००३ रोजी मा. उच्च न्यायालयाने नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड हे विमान तळापासून १० कि.मी. अंतरापेक्षा कमी असल्याने एअरकॉप्ट ॲक्ट १९३४ नियम ८१(ब) व एअरक्रॅप्ट नियमाला धरून नसल्यामुळे येथील कचरा डेपो तातडीने हलविण्याच्या दृष्टीने तातडीने पर्यायी जागा शोधण्याची कार्यवाही मनपाने करावे असे निर्देशित केले आहे. दिनांक २६/०२/२००३ पर्यंत याबाबत कॉंक्रीट प्रस्ता उच्च न्यायालयास सादर करण्यास निर्देश दिलेले आहे.

त्या अनुषंगाने, मनपा प्रशासनातर्फे तीसगाव, करोडी येथील गायरान जागा प्राथमिक स्वरुपात सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. जागा चिकलठाणा विमानतळापासून २० कि.मी. अंतरावर आहे सदरील जागेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ औरंगाबाद स्टेट ऑर्किलॉजी बोर्ड, एअरपोर्ट ऑथरिटी या विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र लागणार आहे.

यासंबंधी क्षेत्र पर्यावरण प्राधिकारण व्यवस्थापन समितीची बैठक मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/०२/२००३ रोजी पार पडली.

सदरील जागा गायरान असून मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या ताब्यात आहे. उपरोक्त सर्व विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यास तीसगांव किवा करोडी

येथील जागेत म्युनिसिपल सॉलिट वेस्ट डंपीग व लॅडफिलींगसाठी हस्तांतरण करण्याकरिता विनंती करणार येणार आहे. उक्त जागा शासनाकडून मनपास हस्तांतरीत झाले तर उक्त प्रयोजनासाठी जागा वापरण्यात येईल. करिता प्रस्ताव माहितीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. भगवान रगडे : जी जागा घेणार आहे. केव्हा घेणार त्याचा कालावधी काय आहे. गोलमोल प्रस्ताव आणणे बरोबर नाही.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : करोडी येथील जागा अद्याप हस्तांतर झालेली नाही काही एन.ओ.सी मिळालेल्या आहे. यानंतर हे प्रपोजल मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी जाईल. जागा हस्तांतरणासाठी दिड वर्षाचा कालावधी लागेल.

मा. आयुक्त : नारेगांव येथील घन कचऱ्याच्या डेपो संदर्भात एअर पोर्टचे १९३७ चे जे नियम आहे, त्यानुसार विमान तळापासून असे घनकचऱ्याचे डेपो १० कि.मी. अंतरावर असला पाहिजे. अशा प्रकारची एक याचिका न्यायालयात दाखल झाली होती. सदर याचिकेला त्या त्या कालावधीतच महानगरपालिकेतर्फे इतर जागा शोधन्याचे प्रयत्न झालेले आहे. बऱ्याचशा जागा नारेगावच्या पलीकडे असलेल्या गावाची नांवे आठवत नाही. पदाधिकाऱ्या समवेत जागा शोधण्याचा प्रयत्न केला. त्यात नक्षत्रवाडी, हर्सूल, तीसगांव या भागात जागा शोधण्याचे काम केले यातून ॲडीशनल साईड डेव्हलप करायची असे ठरले जे की, हे मुळ तसेच्या तसेच ठेऊन यात दुरुस्त्या करून नारेगांव येथील डेव्हलप करायचे व दुसरीकडे आणखी जागा बघून कार्यवाही करायची हि याचिका सुनावणी झाली तेंव्हा ॲडीशनल साईड म्हणून त्यांना मान्य नाही. म्हणून दुसरी जागा बघून कार्यवाही करावी यासाठी खूप जागेचा शोध घेतला या प्रकल्पासाठी जवळपास ४० एकर जागा लागते. हि जागा खरेदी करावयाची झाल्यास फार मोठी रक्कम मोजावी लागेल. आणि सॉलीड टेस्ट मॅनेजमेंट चे असे नियम आलेले आहे की, विमान तळापासून २० कि.मी. अंतरावर हा प्रकल्प असेल तर पोर्टची परवानगीची सुध्दा आवश्यकता नाही. म्हणून यासाठी महसूल अधिकारी, एस. डी. ओ. महापालिकेचे अधिकारी यांनी खूप प्रयत्न यासाठी केले व कोणकोणत्या ठिकाणी जागा बघितल्या त्यात किती गोष्टी योग्य व अयोग्य झालेल्या आहे न्यायालयात तसा अहवाल सादर केलेला आहे. करोडी एक गांव आहे नवीन जो पुणे-मुंबई बायपास रोडवर आहे. या शहरापासून एअरपोर्ट पासून साधारण २२ कि.मी. वर आहे. व त्या ठिकाणी गायरान जमीन उपलब्ध आहे. हि गायरान जागा महापालिकेस शासनाकडून त्वरित उपलब्ध होऊ शकते. त्यानुसार जिल्हाधिकारी विभागीय आयुक्त यांचे बैठक झाल्या व तत्वतः त्यांनी सर्व मान्य केलेले आहे. व त्या प्रकल्पाच्या जागेचे नियम त्यांना पूर्ण करायचे आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे काम होणार आहे. यात टाईम टेबल ठरवून दिलेला आहे. जागा निश्चित करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी यासाठी एअरपोट, महाराष्ट्र प्रदूषण कंन्ट्रोल बोर्ड, फॉरेस्ट विभाग, एरिगेशन विभाग, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, एम.एस.ई.बी. या सर्वांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता आहे. बरेचशे नो ऑब्जेक्शन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे म्हणजे ०१ महिन्याच्या

आत २७ तारखेला कोर्टाला अहवाल द्यायचा आहे. किती जागेची आवश्यकता आहे. मा. जिल्हाधिकारी किती जागा देतील याचा वाद होता. त्यांना सुध्दा त्या विभागानेच नगर रचना विभागाचे संचालक यांचेकडून माहिती घेऊन निर्णय घ्यावे लागतात. आम्हाला पूर्ण खात्री आहे की, सदर ठिकाणी ७५ ते ८० एकर जागा उपलब्ध आहे. पुढच्या वर्षीच्या बजेटमध्ये ५० लक्षची तरतूद नवीन जागा घेण्यासाठी केलेली आहे. महानगरपालिका सुध्दा या कामासाठी प्रयत्नशील आहे. असे एक प्रकारचे दाखवून दिले आहे. जेंव्हा नारेगांव येथे डेपो झाला तेंव्हा कदाचित असे कायदे नव्हते. सॉयनॉट्रीक पध्दतीने हा प्रकल्प करावा लागणार आहे. या डेपोमध्ये कचऱ्याचे पाणी पावसाचे पाणी कचऱ्यामध्ये खाली जाऊन इतर शुध्द गावाच्या पाण्यामध्ये पर्टयुलेश होऊ नये. गावकऱ्यांना वासाचा त्रास होऊ नये. व चांगल्या पध्दतीने या कचरा डेपोचा वापर करता येईल हा दृष्टीकोन समारे ठेऊन योग्य प्रकारे कार्यवाही चालू आहे. यास ५०-६० लक्ष खर्च येईल. हे काम करणेस तांत्रिक व हार्ड काम आहे. त्यानुसार शासनाने असा सल्ला दिला की, महाराष्ट्र शासनाची एक संस्थाकाम करते. यास ऑल इंडिया इन्स्टिटय्चुट लोकल सेल्फ गव्हरमेंट म्हणतात. ही संस्था मुंबईत असून या संस्थेचे काम कार्यकारी कन्सलटंट म्हणून माझ्या सारखे आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी काम करतात. त्यांचा सल्ला घ्यावा, म्हणून सुचविले या संस्थेला शासन आर्थिक मदत देऊन अशा प्रकल्पाचे काम करून घेणार आहे. संपर्क साधला आहे. यास १८-२० महिन्याचा कालावधी दिलेला आहे. टेंडर प्रोससला किती वेळ लागेल, इतर टेंडर प्रोसेसला किती वेळ लागेल. इतर कामासाठी किती वेळ लागेल याचा विचार होऊनच कार्यवाही करावी लागणार आहे. यासाठी थोडासा वेळ लागणार आहे. मा. हायकोर्टाने असे आदेशित केले की, जागा मिळाल्यावर तुम्ही तुमचे काम सुर करावे. तसा अहवाल दिलेला आहे. अशी विनंती करणार आहे की, एका बाजूने न्याय मिळाला परंतु दुसऱ्या बाजुने काम करतात. कायद्यानेच काम करावे लागणार आहे. हे काम करण्यासाठी जे तांत्रिक सल्लागार आहे त्याचा दिड वर्षाचा कालावधी राहिल. तया वायद्या नुसारच अंमलबजावणी करावी लागणार आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : ही संस्था काम करेल, जबाबदारी कुणावर सोपविणार आहे. आपल्या अधिकारात एक जबाबदार अधिकारी तेथे नियुक्त करावेत.

मा. आयुक्त : या प्रकल्पाचे काय हे तांत्रिक आणि हार्डकाम आहे. मेरी म्हणून एक नागपुरची संस्था आहे. एक नॅशनल म्हणून दिल्लीची संस्था आहे. आणि एक महाराष्ट्र शासनाची संस्था आहे. आताच माहिती दिल्यानुसार कन्सलटंट म्हणून नेमणूक करावी लागणार आहे. महापालिकेचे अधिकारी इन्व्हॉल राहतील.

श्री. राजु शिंदे : आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला, योग्यच वाटतो या प्रकल्पासाठी महानगरपालिकोकडे तशी आर्थिक परिस्थिती नाही. तरी सुध्दा जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने मा. आयुक्तांनी जी कार्यवाही सुरू केली जागा मिळविण्याची तयाबद्दल मा. आयुक्तांचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो. या कामासाठी दिड वर्ष लागणार असून नारेगांव येथे टाकण्यात येणारा कचरा कुठे टाकणार आहे.

श्री. भगवान घडामोडे : नारेगांव येथे दररोज किती कचरा जमा होतो. सत्यम फर्टीलायझ्रला ठेका दिला होता. करारनाम्या नुसार विल्हेवाट लागते का? खुलासा द्यावा. हा विषय महत्वाचा असून न्यायालयाने दंड केलेला आहे.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ३८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिट याचिका क्रमांक ३२५२/२००२ अंतर्गत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील निर्देश आणि एअर क्रॉफ्ट ॲक्ट १९३४ नियम ८१ (ब) व एअर क्रॉफ्ट नियम याप्रमाणे नारेगांव येथील कचरा डेपो तातडीने हलविण्याच्या दृष्टीने मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात दिनांक १८/०२/२००३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद स्टेट ऑर्किलॉजी बोर्ड, एअर पोर्ट ऑथरिटी ऑफ इंडिया या विभागचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे ताब्यात असलेल्या तिसगांव किंवा करोडी येथील गायरान जमिनीत नारेगांव येथील कचरा डेपो म्युनिसिपल सॉलिड वेस्ट डंपीग व लॅंड फिलींगसाठी हस्तांतरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/४**

मुख्यलेखाधिकारी महानगरपलिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे, की महानगरपालिका गणवेश विनियम क्र. ३९०/२ दि. १९/०५/२००१ नुसार मान्य गणवेश विनियमा अंतर्गत खालील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

| मान्य ठराव | दुरुस्ती प्रस्ताव |
|---|---|
| १ कायमस्वरुपी कर्मचारी यांना दोन गणवेश देण्यात यावे. | १) प्रशासनातर्फे जो ठराव होता तो सर्व कायमस्वरुपी चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना तीन गणेवश प्रती दोन वर्षाला एकदा असा होता परंतु मान्य ठरावास कालावधी न दिल्याने कालावधी देण्यात यावा. |
| २) सुरक्षा रक्षक यांना गणवेश व गणवेश साहित्य पित्यर्थ रु. २५००/- चार वर्षासाठी एकदा रोख देणे | २) सुरक्षा रक्षक हे चतुर्थ श्रेणी येत असल्याने त्यांना उपरोक्त इतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यासारखे गणवेश व इतर साहित्य देण्यात यावे. |
| ३) विद्युत लाईनमन / पाणी पुरवठा लाईनमन/वाचमन/गार्ड/मलेरिया/मजूर/गटा रीवरील मंजूर/ट्रेचिंग ग्राऊंड वरील मजूर यांना देण्यात येत असलेले गम बुट प्रती दोन वर्षाला एकदा देण्यात यावे. | सदरील कर्मचात्याचे कामे लक्षात घेता दर दोन वर्षा ऐवजी प्रती वर्षी गमबुट जोड हॅंडग्लोज व मास्कची सवलत देणे या मध्ये लाईनमन / वाचमन यांना फक्त गमबुट देणे. |

वरील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौरः मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ३९/४**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणवेश विनियम क्रमांक ३९०/२ दिनांक १९/०५/२००१ नुसार मान्य गणवेश विनियमांतर्गत प्रस्तावित दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/५**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुधारित औरंगाबाद शहर मंजूरविकास योजनानुसार आरक्षण क्रमांक ३०१ उद्यान या प्रस्तावाने न.भू.क्र. १६३२५/१ क्षेत्र ४०८२ चौ. मी. बाधित असून मिळकत धारक श्री. शांतीलाल चांदमल सकलेचा यांनी ॲड डब्ल्यु जी. जैन यांचे मार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना शासनास दिनांक ०७/११/२००१ रोजी बजावलेली असून शासनाने सदरील खरेदी सूचना दिनांक ३० एप्रिल २००२ रोजी कायम केली आहे. त्यामुळे खेरदी सूचना कायम केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत म्हणजे दिनांक २९ एप्रिल २००३ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

शासनाने उक्त खरेदी सूचना कायम केलेल्या पत्रास अर्जदाराने दिलेल्या त्यांचे मिळकतीचे क्षेत्रासह संपूर्ण आरक्षण खालील क्षेत्र संपादन करणे बाबत आदेश दिला आहे. उक्त आरक्षणाखालील संपूर्ण क्षेत्र विकास योजना अहवालनुसार सुमारे १ हेक्टर ३७ आर असून संपादनासाठी अंदाजे मोबदला खर्च रु. १,५७,७२,०००/- दर्शविण्यात आला आहे. सदर रक्कम ही अंदाजे असून प्रत्यक्ष मोजणी आणि ज्या तारखेस अधिसूचना प्रसिध्द होईल त्या वेळेच्या दरानुसार मुल्यांकन होईल.

सबब उक्त आरक्षणा खालील संपूर्ण क्षेत्र संपादन करणेसाठी व त्यास लागणारा वरील प्रमाणे भूसंपादन खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा. महापौर : सदर विषयाची सविस्तर माहिती ठेवण्याकरिता स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. ४०/५**

सदरचा प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती पुढील सभेत ठेवण्यात यावी, तोपर्यंत या प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्र. ४१/६**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे. औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द नुसार) मौजे ईटखेडा येथील सर्व्हे क्रमांक ८४ व ८६ ह्या मिळकती स्टाफ क्वॉर्टर, पार्कींग, अग्निशामक दल व ६० मीटर रुदं रस्त्याने बाधित आहे. बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खेरदी सूचना दिनांक २१/१०/२००२ दिलेली आहे.

तथापी अग्निशामकदल व ६० मी रुदं रस्त्याच्या भुसंपादनाची कार्यवाही महानगरपालिकेकडून मा. जिल्हाधिकारी मार्फत विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सुरू आहे. तर गव्हर्नमेंट स्टॉफ क्वॉर्टर या आरक्षणाची जागा संपादन करणेसाठी विकास योजना अहवालानुसार सार्वजनिक बांधकाम खा ाते हे संपादन संस्था आहे. त्यामुळे सदर

आरक्षणाखालील जमीन संपादन करणे बाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद यांना या विभागाने जा.क्र./मनपा/नरवि/भू.स./१३३/२००३ दिनांक २४/०१/२००३ नुसार कळविले आहे.

सबब उक्त खरेदी सुचनेनुसार आरक्षण क्रमांक D/G पार्कींग या प्रस्तावाने बाधित मिळकती सर्व्हे क्रमांक ८५,८६ मौजे ईटखेडा बाधित आहे. त्यापैकी सर्वे क्रमांक ८६ च्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. सबब खरेदी सूचनेप्रमाणे मिळकत धारकाचे क्षेत्र संपादन करून आरक्षणाचा उद्देश सफल होणार नाही. करिता संपूर्ण क्षेत्राचे भूसंपादन करणे योग्य होईल. विकास योजना अहवालानुसार उक्त आरक्षणाचे अंदाजे क्षेत्र ०.८६ आर असून भूसंपादन खर्च अंदाजे १४३.९६ लाख दर्शविलेले आहे. उक्त भूसंपादन अधिकसचूना प्रसिध्द होईल त्यावेळेचे दरानुसार मोबदला देय होईल, सदरील प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक २०/०४/२००३ पूर्वी भूसंपादनासाठी पाठविले आवश्यक आहे. नसता संबंधिताची जमीन आरक्षणातून मुक्त होईल व त्यास लगतचा वापरानुसार बांधकाम परवानगी देय होईल.

करिता उक्त मिळकतीचे वरील बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी व त्यात लागणारा वरील प्रमाणे भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौरः सदर विषय स्थगित ठेवण्यांत येत असून सविस्तर माहिती सभागृहात ठेवावे.

**ठराव क्र. ४१/६**

सदरचा प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती पुढील सभेत ठेवण्यात यावी, तोपर्यंत या प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्र. ४२/७**

प्रकल्प संचालक व समन्वयक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या ग्रंथालया संबंधी काही नियम बनविले आहेत. तयातील नियम प्रामुख्याने सभासदाने वाचण्यासाठी ग्रंथ घरी नेण्यास बंधीचेच नियम आहेत. तसेच त्यातील प्रवेश शुल्क व मासिक अथवा वार्षिक शुल्क जास्त आहेत या नियमात ग्रंथालयातच बसून वाचन करणाऱ्या वाचकासंबंधी नियम प्रस्तावित करण्यात येत आहेत. या ग्रंथालयाची सभासद व वाचक संख्या वाढवावी या उद्देशाने पुढील नवीन नियम बनविण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्ताव १ प्रस्तावित करण्यता येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातील ग्रंथाचा उपयोग करणारे पुढील दोन प्रकारचे सदस्यच असावेत.

१. सभासद २ सामान्यवाचक

सभासद : सभासदामध्ये एम.फील. पी.एच.डी. व इतर उद्देशाने संशोधन करणारे संशोधक असतील अशा सभासदांना मान्य केलेल्या नियमानुसार ग्रंथ घरी नेऊन वाचण्याची मुभा राहील नियम त्यातील प्रवेश शुल्क व मासिक/ वार्षिक शुल्कात थोडा बदल करून ते यापुढेही चालू ठेवण्यात यावेत.

शुल्कातील प्रस्तावातील बदल.

अ सभसदांसाठी सद्याच्या नियमानुसार मान्य केलेली अनामत रक्कम रुपये २००/- ही अट यापुढेही कायम राहावी व

ब प्रवेश शुल्क सद्याच्या नियमानुसार रु. ५०/- आहे. त्याऐवजी ते ५.१०/- करण्यात यावी.

क सभासदासाठी मासिक शुल्क रु. २५/- आहे. त्याऐवजी ते रु. १०/- करण्यात यावे. वार्षिक शुल्क रु. २५०/- ऐवजी ते रु. १००/- करावे.

सामान्य वाचक : सामान्य वाचकामध्ये साधारणपणे कोणतेही विद्यार्थी निवृत्त व्यक्ती प्रौंढ व जिज्ञासु स्त्रीपुरुष याचा समावेश असेल. अशा वाचकांना अनामत रक्कम न भरता केवळ नाममात्र प्रवेश व मासिक शुल्क भरून या केंद्रातील ग्रंथाचे वाचन करण्यास उत्तेजन देणे व त्याद्वारे सामाजिक जागृतीला हातभार लावणे उपयोगाचे आहे. त्यासाठी पुढील नियम सुचविण्यांत आले आहेत.

अ - सामान्य वाचकांसाठी अनामत रक्कम भरण्याची अट राहणार नाही.

ब - सामान्य वाचकांना प्रवेश शुल्क रु. १०/- मासिक शुल्क रु. १०/- किंवा वार्षिक शुल्क रु. १००/- राहील.

क - सामान्य वाचकांना केंद्रातील ग्रंथ घरी नेता येणार नाहीत. सामान्य वाचकांना संशोधन केंद्राचे फोटोसहित ओळख पत्र जरुरी राहिल व त्याच्या बसण्याची सोय स्वतंत्रपणे करण्यात येईल. वाचकांसाठी ग्रंथावर खूणा करणे, रेघा मारणे, पृष्ठ फाडणे वगैरे गोष्टींना बंदी असेल.

१. <u>प्रस्तावित साहित्य</u> :-

१) ग्रंथ व संशोधन नियतकालिके निवड समिती संशोधन केंद्राच्या ग्रंथालयासाठी दर्जेदार ग्रंथ व संशोधन नियतकालिकाची निवड करण्यासाठी हि समिती राहिल या समितीवर पुढील सदस्य असतील.

१. अध्यक्ष, मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद.

२. समन्वयक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र महानगरपालिका, औरंगाबाद

३. संशोधन मार्गदर्शक

२. <u>संशोधन प्रकल्प समिती</u> :-

या संशोधन केंद्रातील सर्व प्रकारचे संशोधन प्रकल्प व त्यांचे विषय ठरविणे, प्रकल्प पूर्णकरण्यासाठी पात्र उमेदवाराची निवड करणे, प्रकल्पांना लागणारा अंदाज खर्च अनुदान व कालावधी निश्चित करणे, संशोधनसाची पध्दत ठरविणे अनुदानासाठी समता व परिवर्तन वादी समाज सुधारकासंबंधीच्या लेखनाचे परिक्षण व निवड करणे, पुस्तिका छपाई करून प्रकाशित करणे आणि संशोधन संबंधिची इतर कामे या समितीकडे सोपविण्यात येतील. या समितीवर पुढील सदस्य असतील.

१. या केंद्रातील संबंधित विषयाचे संशोधन मार्गदर्शक

२. अध्यक्ष, मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद.

३. समन्वयक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र महानगरपालिका, औरंगाबाद.

**३. <u>संशोधन केंद्र सल्लागार समिती</u> :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातील ही सर्वोच्च समिती असेल. या समितीवर खालील सदस्य असतील.

१. महापौर
२. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद.
३. प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे, माजी प्राध्यापक, मराठी विभाग डॉ. बा.अ.म.वि.औरंगाबाद.
४. प्रा. सौ. सुधाताई काळदाते, माजी
५. प्रा. डॉ. पी. एम. बोरा, माजी लोकप्रशासन विभाग प्रमुख, डॉ. बा. आ. म. वि. औरंगाबाद.
६. समन्वये, सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद.

**४. <u>संशोधन प्रकल्प</u> :-**

१. संशोधन केंद्रातर्फे पूर्णकरावयाचा प्रकल्प सुची प्रकल्प या प्रकल्पा अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: लिहिलेले व त्यांच्या संबंधी लिहिलेल्या मान्यवर विद्वान व संशोधकांच्या इंग्रजी, मराठी व हिंदी भाषांतील ग्रंथ व लेखांची एक सूची (Bibliogrephy) इंग्रजी व मराठी भाषेत तयार करण्यात येईल. तसेच या प्रकल्पात महाराष्ट्र व इतरराज्यातील समता व परिवर्तनवादी विचारवंत व लेखकाची सूची बनविण्याचे कार्य केंद्राचे समन्वयक एका संशोधन सहाय्यकाच्या साह्याने पूर्ण करतील, हि सूची संशोधन केंद्रातर्फे इंग्रजी व मराठीत प्रकाशित करण्यात येईल.

**५. <u>डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र गौरववृत्ती</u> :-**

महाराष्ट्र इतर व राज्यांतील नामांकित संशोधक (कालावधी-१ वर्ष) अभ्यास साहित्यीकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मिमासा करणाऱ्या व सामाजिक समता व परिवर्तनवादी चळवळीला पोषक ठरणाऱ्या विषयावर ग्रंथ लेखनकरून या संशोधन केंद्राला प्रकाशनार्थ सादर करण्यासाठी ही गौरवृत्ती देण्यात येईल. यासाठी दरवर्षी एक नामांकित व्यक्तीचा विचार व्हावा. त्यांना मानधन म्हणून दरमहा रु. ५ हजार देण्यसात यावेत. एकावर्षासाठी यावर एकूण खर्च रु. ६०,०००/- होईल. नामांकित संशोधकांची निवड व संशोधन प्रकल्पाचा विषय संशोधन केंद्रातील संशोधन प्रकल्प समितीतर्फे करण्यात येईल.

भारतातील अथवा परदेशातील अधिक नामांकित विद्वान व संशोधक व सदर गौरववृत्तीसाठी उपलब्ध होत असल्यास त्याला द्यावयाच्या मानधनात संबंधित समितीच्या संमतीने वाढ करता येईल.

**६ <u>पी.एच.डी. पदवीसाठी संशोधन</u>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात पी.एच.डी. पदवीसाठी मानवव्य विद्या (Hurranities) व सामाजिक शास्त्रे (Social Science) ह्या विषयातील एम.ए. पदवीधारकांना प्रवेश देण्यांत येईल हे विद्यार्थी त्या त्या विद्याशाखाच्या विषयतज्ञ व संशोधन मार्गदर्शकाच्या मदत व मार्गदर्शनाखाली संशोधन करतील. अशा संशोधक विद्यार्थीपैकी पाच विद्यार्थ्यांना या संशोधन केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन विद्यावेतन देण्यात येईल. विद्यावेतनाची रककम मासिक रु. १०००/- असेल व ती. पी.एच.डी पदवीचा प्रबंध सादर करेपर्यंत किंवा (कमाल ३० महिने पर्यंत) मार्गदर्शकांच्या सल्ल्यनुसार व विद्यार्थ्यांच्या प्रगती अहवालानुसार देण्यांत येईल. याबाबतचे तपशिलवार नियम व अटी संशोधन प्रकल्प समिती करवील.

ह्या संशोधन केंद्राला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे. या केंद्रावर पुढील विषयात पी.एच.डी. पदवीसाठी संशोधन होणार आहे.

१. दलित साहित्य व समता व परिवर्तनवादी साहित्य
२. समाजशास्त्र
३. इतिहास, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक
४. अर्थशास्त्र - सामाजिक व सांस्कृतिक
५. उद्यम वाणिज्य व व्यवसाय
६. समता व परिवर्तनवादी सामाजिक राजकीय विचार.
७. भारतीय राज्य घटने संबंधातील विषय.
८. भारतीय पुरातत्व व पर्यटन

**७ <u>या केंद्राला सद्या उपलब्ध असलेले तज्ञ संशोधन मार्गदर्शक</u>**

१. डॉ. गंगाधर पानतावणे-मराठी व दलित साहित्य.
२. डॉ. सौ. सुधाताई काळदाते- समाजशास्त्र व सामाजिक समस्या
३. प्रा. डॉ. एन.जी. भवरे- इतिहास- सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक
४. प्रा. डॉ. ज.रा. शिंदे- राजकारणशास्त्र- महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी
५. प्रा. डॉ. बी.बी. पटूरकर - वाणिज्य, उद्योग व व्यवसाय चळवळी
६. प्रा. मनिष आनंद - पाली वाड्मय व बुध्दधर्म
७. प्रा. डॉ. आर. के. क्षिरसागर-भारतीय राज्य घटना
८. प्रा. आर. एन. साळवे, समाजशास्त्र व सामाजिक समस्या

या केंद्रावरील संशोधकाला प्रबंध सादर केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला पी.एच.डी. पदवी प्राप्त होईल विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सर्वसोयी व सुविधा या केंद्राच्या विद्यार्थ्यांना ही मिळतील. याबाबतीत विद्यापीठातील प्रचलित शुल्क पध्दती व वेळोवेळी तयार होणारे नियम या केंद्रास लागू राहतील अशा नियमांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार समन्वयकाकडे राहतील.

**८ <u>गौरव ग्रंथ</u>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याचे प्रस्ताविता असून देशातील नामवंत साहित्यीकांकडून लेख मागविणे अपेक्षित आहे. सदर लेख अप्रकाशित असावेत. मनपाने स्किारलेल्या लेखाबाबत लेखकास प्रति लेख मानधन रुपये एक हजार देण्यांत येईल. लेखात चुक अथवा वादग्रस्त विधान वगळण्याचा अधिकार संपादक मंडळास राहिल. तथापी लेखकांच्या विचारांशी संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखा बाबतचे सर्वाधिकार महानगरपालिकेकडे राहतील ग्रंथ प्रकाशनपूर्व सवलत २०% छापील किंमतीवर असावी तशी विविध प्रचार माध्यमाद्वारे जाहिरात देण्यांत यावी. पुर्नमुद्रणाचे, प्रती छपाईचे अधिकारही आयुक्त मनपाकडे असतील. ग्रंथ चार रंगास ऑफसेटवर उत्कृष्ट कागदावर छपाई करण्यांत येईल. संपादक मंडळावर मा. डॉ. गंगाधर पानतावणे, मा. डॉ. सुधीर गव्हाणे प्रा. दत्ता भगत आणि मनपाच्या वतीने प्रकल्प संचालक वि.वा. जावरे व समन्वयक डॉ. एम.जी. भवरे हे असतील. सदर गौरव ग्रंथ मराठी भाषेत प्रकाशित करण्यांत येईल. मुख्यपृष्ठ स्थानिक कलावंताकडून तयार करण्यासाठी दर पत्रक मागविण्यात येतील. निवडलेल्या लेखांचे लेखकांचा मनपातर्फे शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार प्रकाशन समारंभात करण्यात येईल. संपादक मंडळावरील साहित्यीकांना (प्रकल्प संचालक व समन्वयक व्यतिरिक्त) एकदाच द्यावयाचे मानधन रु. ५,०००/- प्रत्येकी मंजूर करणे योग्य सल्लागार समिती व संपादक मंडळातील सदस्य लेखकांची नांवे सुचवू शकतील या उपक्रमांवर रुपये दोन लक्ष अपेक्षित आहे.

## ९ <u>व्याख्याने</u>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने निमंत्रिकत व्याख्यात्यांनाप्रती व्याख्यान मानधन रु. १०००/- (एक हजार फक्त) अदा करण्यांत यावे तसेच औरंगाबाद शहरा बाहेरील वक्ते असल्यास त्यांना त्यांचे रहाण्याचे ठिकाण ते औरंगाबाद व परत असे विमान भाडे / प्रथम श्रेणीचे रेल्वे भाडे, बस भाडे अथवा खाजगी वाहनाने प्रवास केला असल्यास त्यांचे रहाण्याचे ठिकाण ते औरंगाबाद व परत असा त्यांनी प्रतयक्षात प्रवास भाड्यावरील केलेला खर्च महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात यावा. विमानभाडे मा.आयुक्तांच्या परवानगीने मान्यता देण्यांत येईल.

१. व्याख्यानाच्या एक दिवस आधी व व्याख्यानाच्या दिवसाचे हॉटेल निवास भाड व इतर खर्च मिळून प्रती दिन रु. १०००/- प्रमाणे दोन दिवसाचे देयक रु. २०००/- चे मर्यादेत उपआयुक्त मंजूर करतील. अतिथींचा शाल श्रीफळ, गुच्छ, स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यांत यावा.

२. समन्वयकांनी वर्षभर कार्यक्रम आयोजन करण्यात आराखडा तयार त्यात मा. आयुक्तांची मान्यता घ्यावी.

४. रु. तीन हजार पर्यंतचे प्रस्ताव, खर्च, मंजुरीचे देयक अदाईचे इधिकार प्रकल्प संचालक यांना प्रदान करणे योग्य एक वर्षात रु. १५०००/- (रु. पंधरा हजार पर्यंत खर्च मंजुरीची मर्यादा असावी.)

५. वक्त्याने व्याख्यानात व्यक्त केलेल्या मतांशी महानगरपालिका सहमत असेलच असे नाही. वादग्रस्त वक्तव्या बद्दल संबंधीत वक्ते जबाबदार असतील.

## १० <u>स्मृतिचिन्ह</u>

संशोधन केंद्राचे स्मृतिचिन्ह तयार करणेसाठी राज्य स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यांत यावी प्रथम पुरस्कार रु. ५०००/- चा असावा व निवड समिती ज्यांना मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली.

उप आयुक्त (प्र.) मुख्य लेखा अधिकारी व समन्वयक, कला महाविद्यालयाचे एक प्राध्यापक असावेत व्याख्यांत्यांना, विशेष निमंत्रितांना सदर स्मृतिचिन्ह देण्यांत यावे. अतिथींचा शाल, श्रीफळ, गुच्छ देऊन सतकार करण्यांत यावा.

इतर उपक्रम विविध स्पर्धा, सेमिनार्स, परिषदा, कायशाळा, प्रकाशने, संबंधित छायाचित्र, संकलीत व प्रकाशन स्पर्धा यांचे स्वतंत्र प्रस्ताव समन्वयकाने तयार करावेत.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

# *पुरवणी विषयपत्रिका*

**विषय क्र. ४३/१ :** प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या एन-६ शाळेत मोकळ्या जागेत १) जिन्मॅशियम हॉल व १) वाचनालय बांधणे बाबत सिडको एन-६ येथील नागरिकांची मागणी आहे. करिता आगामी २००२-२००३ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात कामांचा समावेश करण्यांत यावा.

१) सिडको एन- ६ महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेत जिन्मॅशियम हॉल बांधणे अर्थसंकल्पीय तरतूद रु. ७.०० लाख.

२) सिडको एन-६ महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेत वाचनालय बांधणे अर्थसंकल्पीय तरतूद र.रु. ७.०० लाख.

करिता वरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसताव सादर.

सुचक - श्री. सोपान पारे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. किशनचंद तनवाणी

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४३/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या आगामी २००२-२००३ या आर्थिक वर्षातील अंदाज पत्रकता खालील कामाचा समावेश करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) सिडको एन-६ महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेत जिन्मॅशियम हॉल बांधणे अर्थसंकल्पीय तरतूद रु. ७.०० लाख

२) सिडको एन-६ महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या मोकळ्याजागेत वाचनालय बांधणे अर्थसंकल्पीय तरतूद रु. ७.०० लाख
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/२ :**

दरवर्षी महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यातयेतात. त्याच धर्तीवर सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात सांस्कृतिक विभागात महापौर चषक एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात हि विनंती.

करिता प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. भरत श्रीपती लकडे
अनुमोदक - श्री. नंदकुमार घोडेले

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. २ सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**ठराव क्र. ४४/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात सांस्कृतिक विभागात महापौर चषक एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/३ :**

महानगरपालिका अस्थापनेवर श्री. सुधीर पत्की श्री. रत्नकार दांडगे व श्री. जी. एस. लुटे हेकर्मचारी वहन चालक म्हणून कार्यरत होते. गेल्या १०-१२ वर्षापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांचा संवर्ग बदलून त्यांना महानगरपालिके मार्फत कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती करण्यात आले होते. या कमचाऱ्यांनी कनिष्ठ लिपीक म्हणून विविध विभागात काम केले आहे.

या तिन्ही कर्मचाऱ्यांना महापालिकेने पुन्ही लिपीक ऐवजी वाहन चालक म्हणून काम करणेस आदेशित केले आहे. हे कर्मचारी बऱ्याच वर्षापासून लिपीक म्हणून कार्यरत असतांना त्यांना पुन्हा वाहन चालक म्हणून काम करणेस आदेशित करणे उचित वाटत नाही. हे तिन्ही कर्मचारी आता वयोमानानुसार पुन्हा वाहन चालक म्हणून वैद्यकीय दृष्ट्या काम करणेस सक्षम नाही की तसा त्यांना वाहन चालक ऐवजी पुर्ववत लिपीक म्हणून नियुक्त करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल,
श्री. भरत लकडे

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. ३सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४५/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवरील श्री. सुधीर पत्की, श्री. रत्नाकर दांडगे व श्री. जी. एस. लुटे ह्या कर्मचाऱ्यांनी गेल्या १०-१२ वर्षापासून कनिष्ठ लिपिक म्हणून विविध विभागात काम केलेले असल्याने त्यांना वाहन चालक ऐवजी पुर्ववत लिपीक म्हणून नियुक्त करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर प्रतिनियुक्तीने डॉ. किरण सुरवसे, जीवशास्त्रज्ञ यांची दि. ०१/११/१९९९ पासून नियुक्ती झाली आहे. डॉ. सुरवसे यांचे काम हे समाधानकारक नसून नारेगांव येथील घन कचरा प्रकल्पामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाणे महानगरपालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणा म्हणून रु. १०००/- दंड आकारला आहे. यास डॉ. सुरवसे

जबाबदार असून त्यांचे बेजबाबदार कामामुळेच महानगरपालिकेस रु. १०००/- दंड भरावा लागला आहे या बाबत त्याचे पगारातून वसुली करण्यसाचे आदेश ही प्रशासनाने दिलेले आहेत.

तसेच आरोग्य विभागातील बहुतांश महिला वैद्यकीय अधिकारी याचीही डॉ. सुरवसे यांच्याबद्दल तक्रार आहे. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यास औरंगाबाद महानगरपालिकेकडून त्वरित कार्यमुकत करण्यात यावे. यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

सुचक - श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक - श्री. रतनकुमार पंडागळे,
श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. नंदकुमार फुलारी, श्री. प्रशांत देसरडा

**संवाद :**
मा. महापौर : विषय क्र. ४ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४५/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर प्रतिनियुक्तीने आलेले डॉ. किरण सुरवसे, जीवशास्त्रज्ञ, यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेतून त्वरित कार्यमुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ***प्रशासकीय प्रस्ताव***

**विषय क्र. ४७/८ :**

सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दिकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना लागू करूण्यात आली असून या योजने करीता केंद्र शासन, राजय शासन अनुदान व हुडको कर्ज उपलब्ध होणार आहे. सदर योजना, योजना क्र. १४५०० ने मंजूर झालेली असून या अंतर्गत रक्कम रु. २२५.०० लक्ष खर्च करून ४५०० बैठकी (शौचकुप) उभारण्यात येणार आहेत. आता पावेतो ११०१ शौचाकुपाचे काम पूर्ण झालेले असून त्यासाठी रक्कम रु. ३९.८५ लक्ष एवढी रक्कम केंद्र शासन व राज्य शासनाकडून अनुदान म्हणून महानगपालिकेस प्राप्त झालेली आहे. या योजनेच्या कार्य आढावा बैठकीत मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद यांनी योजने अंतर्गत कर्ज उभारणीसाठी करावयाचा करारनामा कार्यवाहीबाबत सुचनापर निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार करारनामा करावयासाठी महानगरपालिकेने सक्षम अधिकाऱ्यास प्राधिकृत करणे आवश्यक असून संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांचे नावाने ठराव करण्यात येऊन त्याची पूर्तता करावी असे सुचित केले आहे.

करिता उपरोक्त कार्यवाहीसाठी उप आयुक्त (महसूल) यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**
मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४७/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावित योजने अंतर्गत कर्ज उभारणीसाठी महापालिकेतर्फे करारनामा करणेसाठी उपआयुक्त (म.) यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/९ :**

औरंगाबाद शहराकरिता सध्या अस्तित्वात असलेली जलनि:सारण व्यवस्थेचा स्तर उंचावणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराकरिता प्रथमत: १९६५ मध्ये भूमिगत जलनि:सारण योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता झाली. तद्नंतर महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ यांनी सदर योजना १९७२ मध्ये पूर्ण करून तत्कालीन औरंगाबाद नगर परिषदेस हस्तांतरीत केली. सदर योजना सन २००१ मध्ये औरंगाबाद शहराची लोकसंख्या २,००,००० एवढी होईल या आधारावर तयार करण्यांत आली होती. योजनेत जलनि:सारण मुख्यवाहिन्या, उपवाहिन्या व मलशुध्दीकरण केंद्र (treatment Plant) चा समावेश केलेला आहे.

गेल्या दोन दशकामध्ये औरंगाबाद शहराची व लगतच्या परिसराची औद्योगिक, शैक्षणिक व पर्यटन इ. क्षेत्रात झपाट्याने झालेल्या वाढीमुळे शहराची लोकसंख्या सर्व अपेक्षित अंदाज ओलांडून १९८१ मध्येच दोन लाख पेक्षा जास्त झाली त्यानंतर हि आज पावेतो शहराच्या लोकसंख्येचा आलेख सातत्याने वाढत असून आजमितीस शहराची लोकसंख्या साधारणत: १० लाखापेक्षा जास्त आहे. लोकसंख्या वाढीचा वेग व चढता आलेख पाहता महापालिकेने १९८६ साली मे. शहा. कन्सलटंट मुंबई यांचे मार्फत सर्वेक्षण करून सुधारित जलनि:सारण योजना तयार केली. ह्या योजना अंमलबजावणीसाठीचा अपेक्षित खर्च रुपये ६५.२६ कोटी (१९८६) नुसार इतका होतो. निधी अभावी सदर योजना एकाचवेळी न राबवता निधी उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. ह्या अंतर्गत बहुतांश भागात ३५ जलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे काम करण्यात आलेले आहे. ह्या योजनेत १९२ द.ल. लिटर्स क्षमतेचे मल प्रक्रिया केंद्र बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

शहराच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे व वाढत्या लोकसंख्यामुळे, लोकांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात अस्तित्वातील जलनि:सारण योजनेची शहा कन्सलटंन्सीने प्रस्तावित केलेल्या सुधारित योजनेशी सांगड घालून जलनि:सारण वाहिन्याचे जाळे विस्तारीत करण्यात आले. ह्या अंतर्गत जवळपास ४४ कि.मी. लांबीच्या मुख्य जलनि:सारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. ह्यामुळे अस्तित्वातील जलनि:सारण योजनेवरील भार वाढल्यामुळे हि योजना फक्त नाममात्र चालू असून नागरिकांना अपेक्षित असलेला लाभ मिळत नाही. ह्या योजनेचा स्तर उंचविणे व यात सुधारणा करणे आवश्यक असूनही निधी उपलब्धते अभावी मोठ्या स्वरुपातील बदलाची कामे महापालिकेस हाती घेणे शक्य नाही. सबब सदरील योजना आहे. त्या स्वरुपात राबविण्यात येत असल्याने व भविष्यातील अपेक्षित सुधारणा न केल्यास सदर व्यवस्था कोलमडून गेल्यास त्यावेळी कोणतीही पर्यायी व्यवस्था करणे शक्य होणार नसल्याने याबाबत आताच योग्य ती पावले उचलून टप्प्या-टप्प्याने का होईना, सदर व्यवस्थेचा स्तर उंचविणे, व त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक झालेले आहे. ह्या मध्ये अस्तित्वातील उपजलनि:सारण वाहिन्या बदलून आवश्यक तेथे मोठ्या व्यासाच्या वाहिन्या टाकणे, मुख्य जलनि:सारण वाहिण्यांची पूर्ण दुरुस्ती करणे, मेनहोल दुरुस्ती इत्यादी स्वरुपाची कामे प्राथमिक स्वरुपात अपेक्षित असून ह्यासाठी मोठ्या रक्कमेची आवश्यकता भासते.

जलनिःसारण विहन्या पेक्षा जास्त महत्वाची व गंभीर समस्या शहरातील जलनिःसारण योजनेतील मल मिश्रीत पाण्यावरील प्रक्रियेची आहे.

मागील कामाचा आढावा व आकडेवारी पाहता असे दिसून येते की, दैनंदिन देखभाल दुरुस्ती या कामावरील खर्च वाढता असून भांडवली स्वरुपाची नवीन कामे करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही.

| सन | भांडवली कामे | दुरुस्ती देखभाल |
|---|---|---|
| ९८-९९ | ४२.९९ लक्ष | ५१.९५ लक्ष |
| ९९-२००० | ७०.३३ लक्ष | ५१.२६ लक्ष |
| २०००-२००१ | ४९.२९ लक्ष | ६८.०२ लक्ष |
| २००१-२००२ | ४९.६४ लक्ष | १२०.२३ लक्ष |

या संदर्भाने अस्तित्वातील जलनिःसारण व्यवस्थेचा स्तर उंचविणेच्या दृष्टीने मा. प्राचार्य शसकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांना पत्र देवून तांत्रिक मार्गदर्शनी बाबतचे त्याचे अभिप्राय देण्यासाठी विनंती करता त्यांना प्राथमिक स्वरुपाचा अभ्यास पूर्ण अहवाल देवून सध्याचे व्यवस्था बाबत व त्याच्या परिणामा बाबत अभिप्राय ऐकून त्यात करावयाची सुधारणा, व्यवस्थाचा स्तर उंचाविणे, त्यात सुधारणा करणे याची निकड इत्यादी बाबत सुचविले आहे.

ह्या प्राथमिक स्वरुपाच्या अहवालनुसार व त्यात सुचविलेली व्यवस्था सुधारित करण्याचे कामी विशेषतः प्रक्रिया केंद्राबाबत दुरगामी नियोजन करणे आवश्यक असल्याचे प्रशसनाचे मत आहे. त्यासाठी साधारणतः रक्कम रुपये १७० कोटी खर्च अपेक्षित असून सदर निधी उपलब्धतेनुसार योजना पूर्णत्वास नेणे यासाठी सर्वांगीण विचार होऊन निर्णय होणे आवश्यक असल्याने, अस्तित्वातील जलनिःसारण व्यवस्था सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचे कडून सविस्तर योजना तयार करण्यात येईल व सोबतच दुरगामी नियोजन करून निधी उपलब्धते बाबत नियोजन करण्यात येईल.

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४८/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अस्तित्वातील जलनिसःरण व्यवस्था सुधारित करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून सविस्तर योजना तयार करणे व दुरगामी नियोजन करून निधी उपलब्धतेबाबत नियोजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ४९/१० :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची मुळ विकास योजना १९७५ साली शासन निर्णय क्र. टीपीएस

३०७३-४९५८ डब्ल्यू दिनांक ६-१-१९७५ अन्वये मंजूर झाली असून ती. दि. ०१-०३-१९७५ पासून अंमलात आणण्यात आली आहे. शहर विकास योजनामधील क्रांतीचौक -पैठण गेट या ३० मी. रुंद प्रस्तावित विकास योजना रस्ता विकसित करण्याचे कामी क्रांतीचौकी ते सिल्लेखाना या भागाचे भूसंपादन करण्यात येत असून या रस्त्याची पूर्व बाजू कडील बाधित मिळकती संपादित केल्या आहेत. पश्चिमेकडील मिळकतीचे भूसंपादन करण्यांत येत आहे.

औरंगाबाद शहराची प्रारुप सुधारित विकस योजना शासनास अंतिम मंजुरीसाठी म.प्रा.व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये सादर करण्यात आली. त्यामध्ये हि उक्त ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता कायम करण्यात आलेल्या आहे.

उक्त रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही दरम्यान पश्चिम बाजूकडील बाधित मिळकतीमध्ये कब्रस्तान व कदीम मस्जिदचा समावेश होतो, सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्च न्यायालयाने ३० मी. रुंदीकरिता विकास योजना रस्ता विकसित करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. यामुळे या बाधित मिळकती संपादित करण्यासाठी जिल्हा प्रशासन व वक्फ बोर्ड प्रतिनिधी यांच्यामध्ये वेळोवळी झालेल्या चर्चेमध्ये सदर मिळकती धार्मिक असून त्या संपादन केल्यास त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर होणारा परिणाम टाळण्याचे दृष्टीने जिल्हा प्रशसनाने मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांचेकडे या संदर्भात चर्चा झाली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दि. २३/०३/२००१ चे पत्र रस्त्याचे आखणीय बदल प्रस्तावित करून त्याप्रमाणे साईड ब्रीज बांधण्याची निविदा दिनांक ०७/०४/२००१ पूर्वी काढणे आवश्यक असल्याचे कळविलेले होते. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी या संदर्भात बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून असा प्रस्ताव महानगरपालिकेसमारे ठेवण्याबाबत व पारित करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयासमोर पर्याय सादर करण्याकरिता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यांत आला होता की,

मंजूर विकास योजनामधील प्रस्तावित ३० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे आखणीत अल्पसाबदल करून या रस्त्याने बाधित होणाऱ्या मस्जिदच्या भागास धार्मिक भावनाचे दृष्टीने कोणतीही बाधा न पोहचता या मस्जिद लगतचे कब्रस्थानचे परिसरातून मस्जिदचे पश्चिमेकडील बाजूस ३३ फुट (१०.३० मी.) रुंद रस्ता साईड ब्रीज म्हणून विकसित करण्यात यावा. जेणे करून सध्या मस्जिदचे पूर्वेस असलेला ६७ फुट व आता प्रास्तावित केलेला मस्जिदचे पश्चिमेकडील ३३ फुट असा एकत्रित १०० फुट रुंद रस्ता विकसित होईल व तसा रस्ता विकसित करण्यासाठी सदर आखणीबदलाची म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाहीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित केले होते.

सदरील प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव ठेवण्यासाठी मा. आयुक्त म.न.पा. यांनी जा.क्र. नरवि/४९०/२००१ दि. ३१/०३/२००१ अन्वये सदर प्रस्ताव पाठविला असता मा. महापौर औरंगाबाद म.न.पा यांनी पत्र क्र. म.न.पा./महापौर/२००१/५८१ दि. ०३/०४/२००१ रोजी कळविले आहे. की, पैठणगेट ते क्रांतीचौक हा सार्वजनिक रसता मंजूर विकास आराखड्यानुसार १०० फुट असून त्यानुसार या रस्त्याचे रुंदीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर रस्ता रुंदीकरणाबाबत मा. उच्च न्यायालय तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असता मंजूर विकास आराखड्यानुसार या रस्त्याचे रुंदीकरण करणे बाबत मा. न्यायालयाने देखील आदेशित केलेले आहे. मंजूर विकास आराखड्यात दर्शविलेली रुंदी तसेच मा. न्यायालयाचे आदेश या बाबी विचारात घेता सदर रस्ता १०० फुट रुंद करणे उचित वाटते. करिता पैठणगेट ते क्रांती चौक या रस्त्याचे १०० फुट रुंदीकरण मंजूर विकास आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे तसेच मा.

न्यायालयाचे आदेशाप्रमाणे करण्यात यावे. या संदर्भाने विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवणे आवश्यक वाटत नाही.

ह्यानुसारचे अभिप्राय मा. शासनास कळविण्यांत आले असता शासन स्तरावर वरील प्रस्ताव शासनातर्फे औरंगाबाद शहराचे प्रारुप (सुधारित) विकास योजना मंजूर करतांना विकास योजना वगळलेला भाग (E.P.) १०४ म्हणून मान्यता देण्यांत आली. हि मान्यता टी.एस/३००१/१५९५/सी. आर. २७३/२००१/युडी-३० दि. २ जानेवारी २००२ अन्वये मान्यता झाली.

ह्या नव्या बदललेल्या आखणीसाठी भूसंपादन व विकास कामासाठी शासनातर्फे १ कोटी ७७ लक्ष रुपये देण्यात येणार आहेत. ह्या साईड ब्रिजचे विकास काम महानगरपालिका करणार का इतर कोणती संस्था करणार या बाबत शासनाने विचारणा केली आहे. त्या बाबत मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवला असता. मा. सर्वसाधारण सभेने सदर प्रस्तावात विधी विभागाचा अभिप्राय घेऊन कायदेशीर बाब तपासून ठरवावर विचार करण्यात येईल. असा निर्णय घेतला आहे.

प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने ह्या बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सुनावणीचे वेळी वरील रुंदीकरणात बाधित असलेल्या धार्मिक स्थळाचे (कदिम मस्जिद) बाबत चर्चा होतांना मा. जिल्हा प्रशासन औरंगाबाद व शासनातर्फे माजी केंद्रीय कॅबीनेट सचिव मी. जफर सैफुल्ला ह्यानी याबाबत तोउगा काढवा ह्यासाठी अहवाल मागविला. त्याववर मा. उच्च न्यायालयाने मानपास निर्देश दिले की, श्री. जफर सैफुल्ला यांचे अहवालावर आपले मत काय? ह्यासाठी मी. जफर सैफुल्ला यांनी सुचविलेले पर्याय मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

मा.श्री. जफर सैफुल्ला यांनी सुचविलेल्या तोडग्यानुसार १०० फुट रस्त्याकरिता त्यांनी चार महत्वाचे भाग आहेत, असे म्हटले आहे. त्यास १) कॅरेजवे २) फुटपाथ ३) रिटेनिंग वॉल (४) ड्रैन यापैकी ६ फुट रुंदीचा रस्ता आवश्यक आहे. म्हणजे दुभाजकासाठी १ फुट रुंदी गृहित धरली आहे. यापुढे संपादित रस्त्याच्या पूर्वेकडील हद्दिपासून ६७ फुट रुंद रस्ता रुंदीकरण करावे व त्यानंतर साधारण ३ फुट रंदीची रिटेनिंग वॉल बाधावी ही बांधतांना मस्जिदच्या दक्षिण, पूर्व व उत्तर बाजूस १० फुट लांबी पर्यंत बांधावी व ड्रेनचा भाग कॅरेजवे खालून प्रस्तावित करावा म्हणजे गटारीचे बांधकाम रस्त्याखालून करावे व त्याचप्रमाणे उर्वरित रुंदी ३० फुटासाठी मस्जिदच्या पश्चिम बाजूने पादरचारी उड्डाण पुल ह्याची उंची ७ फुट असावी. त्याखालून जाने येणेसाठीजागा असावी हा पूल बांधतांना त्याखालील कबरीना टाळत-टाळत होणाऱ्या आखणीनुसार बांधावा सदर मस्जिदच्या लांबीएवढी पुलाला गच्ची बांधून त्यावर फायबर शिटचे छत करावे. हा पुल फक्त पादचाऱ्यांकरिता असेल त्यावर सायकल अथवा स्कूटर किंवा रिक्षाही जाणर नाही. असा हा पुल आवश्यकतेनुसार बांधण्यात यावा. असा त्यांचा थोडक्यात प्रस्ताव आहे. सोबत श्री. जफर सैकुल्ला यांच्या अहवालाची प्रत देत आहे. त्यामध्ये सर्व प्रस्ताव सविस्तर मांडण्यात आलेले आहेत. त्यांचेही कृपया अवलोकन व्हावे.

तरी मा. सर्वसाधारण सभेत विनंती करण्यात येते की, श्री. जफर सैफुल्ला यांच्या उपरोक्त अहवालबाबत सभागृहाचे मत व अभिप्राय देण्यात यावा. म्हणजे उक्त बाब मा. उच्च न्यायालया समक्ष सादर करता येईल.

**संवाद :**

श्री. नंदकुमार घोडेले : या विषया संबंधीचे प्रकरण न्या प्रविष्ठ असेल तर चर्चा करणे योग्य होणार नाही. विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

श्री. तकीहसन खान : कोर्टप्रकरणचा संबंध नाही. श्री. जफर सैफुल्ला यांचे अहवालावर सभागृहाचे मत विचारले आहे. न्यायालयात हे प्रकरण जाणार आहे.

श्री. प्रशांत देसरडा : ज्यांनी कुणी संबंधितांनी प्रस्ताव ठेवला त्यांनी पोलिस आयुक्त यांना बैठकीला बोलविले, जिल्हाधिकारी यांना बोलाविले. मा. आयुक्त महापालिका यांना का बोलविले नाही. त्यामुळे हा विषय या सभागृहाच्या संबंधित येत नाही. न्यायालय जो निर्णय घेईल तो मान्य राहिल.

श्री. संजय शिरसाठ : न्यायालय जो निर्णय देईल तो या सभागृहाला मान्य राहिल.

श्री. तकीहसन खॉन : या प्रस्तावाची सर्व कार्यवाही जिल्हा प्रशासन मार्फत होत आहे. १०० फुट रस्ता होणारच आहे. या रस्त्याच्या संदर्भात वाद निर्माण झालेला होता. प्रकरण न्याय प्रविष्ठ झाले. व तोडगा निघावा म्हणून प्रशासनाचे केंद्रीय कॅबिनेट सचिव श्री. जफर सैफुल्ला यांचे या संदर्भात अहवाल देण्याचे सुचविले त्यानुसार मा. न्यायालयाने श्री. जफर सैफुल्ला यांचे अहवालावर या सभागृहाचे मत विचारलेले आहे. या रस्त्याच्या कामासाठी शासनाने रु. १.७७ कोटी देण्याची संमती दर्शविलेली आहे. म्हणून या सभागृहाने असा निर्णय घ्यावा की, नागरिकांना त्रास होणार नाही. १९७५ च्या विकास आराखड्यानुसार १०० फुटाचा रस्ता आहे. एक प्रकारचा चांगला संदेशच आम्ही देणार आहेत. मान्यता द्यावी.

श्री. संजय शिरसाठ : या रस्त्याचे विकासा संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ठ झाले. जिल्हा प्रशासनाने श्री. जफर सैफुल्ला यांची नियुक्ती केली. त्यांचा अहवाल न्यायालयास सादर करण्याची जे सरकारी वकील या प्रकरणात असेल त्यांचेकडे सादर व्हावयास पाहिजे. महापालिकेस जो निर्णय घ्यायचा होता तो घेतलला आहे. ज्याची अहवाल सादर करण्या संदर्भात नियुक्त केली होती त्यांनी त्याचे काम केले. त्यानुसार न्यायालय न्यायालयाचे काम करेल. वादाचा मुद्दा उपस्थित होण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव येथे आणण्याची आवश्यकता नव्हती. न्यायालयाचा निर्णय या सभागृहास मान्य राहिल असा निर्णय घ्यावा.

मा. महापौर : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार असा निर्णय देण्यात येतो की, या प्रकरणात मा. न्यायालय जो निर्णय/ निर्देश देईल ते या सभागृहास मान्य राहिल, अशी मान्यता देण्यांत येते.

**ठराव क्र. ४९/१०:**

या सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मा. न्यायालय जो निर्णय / निर्देश देईल तो या सभागृहास मान्य राहिल. अशी मान्यता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/११:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन आदेश क्र. सलेको-११.०२/प्र.क्र.२५१/२००२/भाग-१/कोषा-प्रशा-१, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ०५ मार्च २००३ नुसार श्री. श. वि. बनसोडे, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (कनिष्ठ) संवर्गामध्ये रु. ८०००-२७५-१३५०० या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात येऊन त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील विहित अटी व

शर्तीच्या अधिन राहून मुख्या लेखा परिक्षक, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दिनांक ०४ फेब्रुवारी २००४ पर्यंत प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेकडील आदेश क्र./मनपा/आस्था-१/२००३/५०९ दिनांक १५-०३-२००३ नुसार, श्री. श. वि. बनसोडे, यांना दिनांक १५-०३-२००३ रोजी मध्यान्हापूर्व मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजू करून घेण्यात आलेले आहे.

करिता श्री. श. वि. बनसोडे यांना दिनांक १५-०३-२००३ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा इ.......) नियम १९८१ मधील विहित अटी व शर्तीनुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर दिनांक ०४ फेब्रुवारी २००४ पर्यंत प्रतिनियुक्ती मान्यता देण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. रतनकुमार पंडागळे : श्री. बनसोडे यांना मुख्य लेखा परिक्षक पदावर रुजू करून घेण्यास आमचा विरोध राहिल. महानगरपालिकेमध्ये सक्षम अधिकारी आहे त्यांना त्यांचे मुळ विभागात पुन्हा पाठविण्यात यावे.

श्री. सुनिल मगरे : मु.प्रा.म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य लेखापरिक्षक हे पद भरण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. हे पद भरत असतांना तीन पर्याय असून त्यातील पहिला नामनिर्देशन, पदोन्नती व प्रतिनियुक्ती हे पद भरता येते. अशाच प्रकारचा यापूर्वी प्रस्ताव आलेला होता व तो सभागृहाने फेटाळलेला होता. आजही पुन्हा तसाच प्रस्ताव सादर झाला. दि. २०-१२-२००२ रोजीच्या बैठीकत या पदावर महापालिकेतील अधिकाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळावी म्हणून सर्वानुमते प्रस्ताव पास केलेला आहे. त्यानुसार अंमलबजावणी व्हावी व श्री. बनसोडे यांना त्यांच्या मुळ विभागमध्ये पाठविण्यात यावे.

श्री. भगवान रगडे : या पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला असल्याने व महापालिकेतील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी मिळावी म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यास आमचा विरोध आहे.

मा. महापौर : उपरोक्त प्रस्तावास अनुषंगून सर्वसाधारण सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१) महानगरपालिका अधिकारी सेवा भरती नियमानुसार मुख्य लेखापरिक्षक हे पद भरण्याकरिता तीन पर्याय दिलेले आहेत.
(अ) नामनिर्देशनाने (ब) पदोन्नतीने (क) प्रतिनियुक्तीने सदरील तीनही पर्यायपैकी कोणत्या पर्यायाने पद भरावे हे ठरविण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणून मनपाचा आहे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार सदरील पद भरण्यास सर्वसाधारण सभा सक्षम आहे.

३) उपरोक्त बाब विचारात घेता सर्वसधारण सभेने ठराव क्र. १५/५ दिनांक २०-१२-२००२ नुसार सदरील पद पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिलेली आहे.

४) उपरोक्त मुद्दा (१) ते (३) विचारात घेता श्री. श. वि. बनसोडे यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव रद्द करण्यांत येतो. त्यांना दिनांक १५-०३-२००३ ते १९-०३-२००३ या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करण्यांत यावे व

दिनांक १९-०३-२००३ च्या मध्यान्हानंतर मनपा सेवेतून कार्यमुक्त करण्यांत यावे.

५) सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५-/५ दिनांक २०-१२-२००२ च्या ठरावानुसार सदरील पद हे पदोन्नतीने भरण्यसाची कार्यवाही ही एक महिन्याच्या आत पूर्ण करून प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात यावा.

उपरोक्तनुसार ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने सत्वर करावी व वैधानिक कार्यवाही व्हावी, या ठरावास याच सभेत स्विकृतीसह मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र. ५०/११:**

उपरोक्त प्रस्तावास अनुषंगून सर्वसाधारण सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१) महानगरपालिका अधिकारी सेवा भरती नियमानुसार मुख्य लेखापरिक्षक हे पद भरण्याकरिता तीन पर्याय दिलेले आहेत.

(अ) नामनिर्देशनाने (ब) पदोन्नतीने (क) प्रतिनियुक्तीने सदरील तीनही पर्यायपैकी कोणत्या पर्यायाने पद भरावे हे ठरविण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणून मनपाचा आहे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार सदरील पद भरण्यास सर्वसाधारण सभा सक्षम आहे.

३) उपरोक्त बाब विचारात घेता सर्वसधारण सभेने ठराव क्र. १५/५ दिनांक २०-१२-२००२ नुसार सदरील पद पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिलेली आहे.

४) उपरोक्त मुद्दा (१) ते (३) विचारात घेता श्री. श. वि. बनसोडे यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव रद्द करण्यांत येतो. त्यांना दिनांक १५-०३-२००३ ते १९-०३-२००३ या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करण्यांत यावे व दिनांक १९-०३-२००३ च्या मध्यान्हानंतर मनपा सेवेतून कार्यमुक्त करण्यांत यावे.

५) सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५-/५ दिनांक २०-१२-२००२ च्या ठरावानुसार सदरील पद हे पदोन्नतीने भरण्यसाची कार्यवाही ही एक महिन्याच्या आत पूर्ण करून प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात यावा.

उपरोक्तनुसार ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने सत्वर करावी व वैधानिक कार्यवाही व्हावी, या ठरावास याच सभेत स्विकृतीसह मान्यता देण्यात येते.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सध्या महानगरपालिकेतर्फे अनाधिकृत नळाला लावण्यात येणारे दंड जास्त आहे. आपण अनधिकृत नळ शेधण्याची मोहिम चांगली आहे. परंतु नळ शोधल्यानंतर ते नळ अधिकृत करण्याची कृती आहे. ती फार त्रासदायक आहे. त्या करिता आपण पहिले चालू केलेली अभय योजना अंतर्गत ही योजना लागू करून २४००/- रुपये आकारून आपण अनधिकृत नळ योजना अधिकृत करावी. ही नम्र. विनंती.

सुचक - १) सौ. नुसरत बानो
२) श्री. किशोर तुलशीबागवाले
अनुमोदक - १) श्री. अ. रशिद अ. सत्तार
२) श्री. काशिनाथ कोकाटे

**संवाद :**

मा. महापौर : प्रशासनाकडून माहिती घेऊन प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**ठराव क्र. ५१/१ :**

सदरील प्रस्ताव प्रशासनाकडून माहिती घेऊन सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

मा. महापौर : ऐनवेळचे काही प्रस्ताव आहेत त्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. ५२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहागंज चमन मधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पतुळा आहे. शहागंज चमन सभावताली बरेच अनधिकृत टपऱ्या असून या टपऱ्यामुहे हा पुतळा झाकला गेला आहे. या टपऱ्यांचे व हातगाडी वाल्यांचे दिवसेंदिवस वाएत असलेले अतिक्रमणामुळे या पुतळ्याचे अस्तित्व संपुष्टात येत असून या भागातील सर्व टपऱ्या हटविणे, अर्धकृती पुतळा काढून त्या ऐवजी सरदार वल्लभभाई यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच शहगंज चमन (वाहतुक बेट) सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करणेसाठी मंजुरी देऊन रु. ५,००००० (पाच लाख) तरतूद २००३ ते २००४ या आर्थिक वर्षात करणेचा प्रसतावास मंजुरी देण्यात यावी ही विनंती.

सुचक - श्री. जगदीश सिध्द
अनुमोदक - श्री. जयवंत ओक,
श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव क्र. ५२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज चमन येथे सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणेस व शहागंज चमन येथे वाहतुक बेट सौंदर्यीकरण व सुशोभिकरणासाठी २००३-२००४ या आर्थिक वर्षात रु. ५०००००/- (पाच लाख) ची तरतूद करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो, प्रभाग क्र. ५२ अविष्कार कॉलनी सिडको येथील चोकात शिवाजी महाराजाच्या पुतळया जवळ हाय मास्ट बसविणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

सुचक - श्री नंदकुमार फुलारी,

सोपान पारे
अनुमोदक - जयश्री कुलकर्णी

**ठराव क्र. ५३/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५२ अविष्कार कॉलनी, सिडको येथील चौकात शिवाजी महाराजांच्या पुतळया जवळ हायमस्ट बसविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ८ मसनतपूर नालंदा विहार येथील वाचनालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू सदरील वाचनालयाच्या इमारतीचे नालंदा विहार समाज मंदिर असे नामकरण करण्यात यावे व सदरील इमारत या परिसरातील गरीब नागरिकांसाठी सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी खुली करून देण्यात यावी. करिता प्रस्ताव मजुंरीस्तव सादर.

सुचक - श्री. राजु शिंदे, श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. रतनकुमार पंडागळे,
सौ. लिलावती घायतिलक

**ठराव क्र. ५३/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ८ मसनतपूर नालंदा विहार येथील वाचनालयाच्या इमारतीचे नालंदा विहार समाज मंदिर असे नामकरण करण्यास व सदरील इमारत या परिसरातील गरीब नागरिकांसाठी सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी खुली करून देण्यास सर्वानुमते मजुंरी देण्यात येत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/५ :**

दिनांक १८-१०-२००२ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ७०६/१, ७०७/२, ७१०/५, ७१४/९, ७२८/२३ आणि ७२९/२४ अन्वये प्रास्तावित करण्यात आलेल्या विषयांना मंजुरी दिली असून दि. १८-१०-२००२ चे इतिवृत्त (दि. २०-११-२००२ तहकूब सभा दि. १८-१२-२००२) च्या सभेत स्विकृतीसाठी ठेवण्यात आले असता. सदर सभेने वरील विषय स्थगित ठेवण्यास मंजुरी दिली आहे.

कृपया दि. १८-१०-२००२ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयाबाबत सभेत मागणी केल्याप्रमाणे वरील विषयांना मंजुरी देण्यांत यावी. त्याप्रमाणे ठराव क्रमांक ७०६/१, ७०७/२, ७१०/५, ७२८/२३ आणि ७२९/२४ प्रमाणे प्रस्तावित विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले, श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक - श्री. भरत लकडे, सौ. कचराबाई लोखंडे

**ठराव क्र. ५५/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १८-१२-२००२ च्या सभेने (दि. २०-११-२००२ ची तहकूब सभा) दिनांक १८-१०-२००२ च्या सभेचे इतिवृत्तात स्विकृती देतांना स्थगित ठवेण्यात आलेल्या ठराव क्र. ७०६/१, ७०७/२, ७१०/५, ७१४/९, ७२८/२३ व ७२९/२४, वरील स्थगिती उठविण्यात व या ठरावांना स्किवृतीसह मंजुरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १९ मार्च-२००३ च्या सर्वसाधारण सभेत रेल्वे स्टेशन पैठण रोडला जोणाऱ्या उड्डाण पुलास संत एकनाथ महाराज उड्डाण पुल असे नांव देण्याचा प्रस्ताव सर्वानुमते स्विकृतीसह मंजूर करून दिनांक २३ मार्च २००३ रोजी एकनाथ महाराजांची षष्ठी आहे, त्या निमित्ताने फलक रंगवून त्याचेवर तसे नांव तात्काळ लिहिण्यांत यावे.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले, श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. जयवंत ओक

**ठराव क्र. ५६/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन पैठण रोडला जोणाऱ्या उड्डाण पुलास संत एकनाथ महाराज उड्डाण पुल असे नांव देण्यात आलेले आहे. दिनांक २३ मार्च २००३ रोजी एकनाथ महाराजांची षष्ठी आहे. करिता त्या नावाचा फलक रंगवून त्याचेवर तसे नांव तात्काळ लिहिण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. यावे.

**संवाद :**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : काही स्वातंत्र्य सैनिक त्यांचे पाल्यांना महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळावी म्हणून उपोषण करणार आहे. तसे निवेदन त्यांनी दिलेले आहे. प्रशासन या बाबतीत काय कार्यवाही करणार आहे.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. आयुक्त-१ : या संदर्भात स. सदस्य यांना दोन दिवसांत लेखी खुलासा देण्यात येईल. या निवेदनाच्या संदर्भात शासनाचे मार्गदर्शन मागविण्यांत आलेले आहे.

श्री. जयवंत ओक : या स्वातंत्र्य सैनिकांनी शासनाकडे तशी मागणी केलेली होती. शासनाचे पत्र प्रशासनाकडे आलेले आहे. विचार करावा म्हणून तरी सुध्दा कार्यवाही केलेली नाही. उद्या हे स्वातंत्र्य सैनिक महापालिकेच्या गेटसमोर उपोषणास बसणार आहे. त्यांचेकडे सर्व कागदपत्र उपलब्ध आहे. तात्काळ कार्यवाही करावी नसता तात्काळ चौकशी समिती नेमावी. या अस्थापना विभागासाठी चौकशी समिती नेमावी. जसे नागपुरला नंदलाल समिती स्थापन झालेली होती, त्याप्रमाणे या विभागसाठी चौकशी समिती नेमावी. जात-पातीचाप्रश्न येथे निर्माण होत नाही. कुणावर अन्याय होणार नाही याची दखल हा विभाग घेत नाही. या आगोदर हि या विभागात ज्यांचे नातेवाईक असलेल्याच्यांच

नियुक्त्या झालेल्या आहे. यामागे कुणाचा हात आहे. याचा अभ्यास करण्याची गरज आहे. उद्या हे स्वातंत्र्य सैनिक उपोषणस बसणार आहे. प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. योग्य तो मार्ग काढून संबंधित उपोषणास बसणार नाही यांची दखल घेऊन कार्यवाही करावी.

मा. उपआयुक्त (म.) संबंधित स्वातंत्र्य सैनिकाचे निवेदनानुसार शासनाने अनुषेश भरतीसाठी मंजुरी दिली पाहिजे या निवेदनाच्या संदर्भात शासनाचे मार्गदर्शन मागविलेले आहे व शासनाचे मार्गदर्शन येत नाही तो पर्यंत आपण उपोषणाचा मार्ग अवलंबू नाही म्हणून तसे प्रशासनातर्फे निवेदन कर्त्यांना लेखी स्वरुपात दिले आहे. शासनाच्या मार्गदर्शना शिवाय काही करू शकत नाही.

मा. महापौर : प्रशासनातर्फे संबंधित उपोषणार्थी याची भेट घेऊन या बाबतीत योग्य तो मार्ग काढून कार्यवाही करावी.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापोर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २९-०३-२००३ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार, दिनांक २९/०३/२००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा (आठ स्थायी समिती सदस्य निवड) महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०० "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
११) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१२) स.स.श्री. राजू रामराव शिंदे
१३) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१४) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१५) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१६) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१७) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१८) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिसन
१९) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
२०) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२१) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२२) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२४) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२५) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२६) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२७) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२८) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२९) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
३०) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३१) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
३२) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३४) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३५) स.स.डॉ. कराड भागवत किशनराव
३६) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३७) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३८) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३९) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
४०) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
४१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४३) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४४) स.स.श्री. तायडे पांउुरंग यशवंतराव
४५) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४६) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४७) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४८) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४९) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
५०) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
५१) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
५२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५६) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
५७) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५८) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५९) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
६०) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६१) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६२) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
६३) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहेमद
६४) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६५) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
६६) स.स.श्री. शेख इसाक शेख जैनोद्दिन
६७) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६८) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
६९) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
७०) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७१) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
७२) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७३) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
७४) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७५) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा

७६) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
७७) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७८) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
३) स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन
४) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**विषय क्र. ५७/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समितीच्या आठ (०८) सदस्यांची निवड करणे.

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समिती सदस्य नियम क्रमांक ४४,४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक ११ मार्च २००३ ते २१ मार्च २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्किारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनाक २१ मार्च २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सदस्य पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशनन पत्रे प्राप्त झ ाालेली आहेत. सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेवारांचे नामनिर्देशनपत्र वैद्य ठरलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | प्रभाग क्र. |
|---|---|---|
| १ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखाँ | ३६ |
| २ | श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | २५ |
| ३ | श्री. सय्यद सलिम सय्यद युसुफ | ६६ |
| ४ | श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ | १३ |
| ५ | श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज | स्विकृत सदस्य |
| ६ | श्री. तुलशिबागवाले किशोर बाबुलाल | ७८ |
| ७ | श्रीमती सिद्दिकी नईम सुलताना | ७० |
| ८ | श्री. तकीहसन खान कासीम हसन खान | ६७ |
| ९ | श्री. अशरफ मोतिवाला | ५७ |
| १० | श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर | ६२ |
| ११ | सौ. निखत परविन ईजाज अली | ८३ |
| १२ | श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | ०४ |
| १३ | श्री. शेख मुनाफ शेख यासीन | ७५ |
| १४ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण | २६ |

| | | |
|---|---|---|
| १५ | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | ३३ |
| १६ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन | २८ |
| १७ | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव | ४७ |
| १८ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | १५ |
| १९ | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | ४५ |
| २० | श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरेशी | ६१ |

पिठासीन अधिकारी : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छकांला या दोहोंपेकी जी कोण सभेला उपस्थित आहे, त्याच्या संमतीने म्हणजेच १-०० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्या प्रमाणे आपले नांव १-०० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पिठासीन अधिकारी : स्थायी समिती सदस्य पदासाठी २० उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांचे नांवे |
|---|---|
| १ | स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग |
| २ | स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ |
| ३ | स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज |
| ४ | स.स.श्री. तुलशिबागवाले किशोर बाबुलाल |
| ५ | स.स. श्रीमती सिद्दिकी नईम सुलताना |
| ६ | स.स.श्री. अशरफ मोतिवाला |
| ७ | स.स. सौ. निखत परविन ईजाज अली |
| ८ | स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन |
| ९ | स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| १० | स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरेशी |

आता स्थायी समिती सदस्य निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांचे नांवे |
|---|---|
| १ | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखाँ |
| २ | स.स.श्री. सय्यद सलिम सय्यद युसूफ |
| ३ | स.स.श्री. तकी हसन खॉन कासीम हसन खॉन |
| ४ | स.स.श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर |
| ५ | स.स. श्री. शेख इलियास किरमाणी शे. उमर |
| ६ | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण |

| | |
|---|---|
| ७ | स.स. श्री. शिरसाट संजय पांडुरंग |
| ८ | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| ९ | स.स.श्री. किवळेकर जयश्री सारंग |
| १० | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |

पिठासीन अधिकारी : मतदानाबाबत गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सरमिसळ करण्यात येईल तसेच स्थळप्रतीवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका २-३० वाजेपर्यंत तयार होतील व मतदानाला सुमारे २-३० वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करून घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स. सभासदांच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभगृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी (नमुना मतपत्रिका स्ीाागृहात फलकावर लावण्यांत येते.)

पिठासीन अधिकारी : मतपेटी जळव नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे. व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी व मतपेटी मोहोर बंद करून घ्यावी (पिठासी अधिकारी स्वतःच्या सहिने मतपेटी मोहरबंद करून घेतील.)

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापूर्वी म्हणजेच आता त्यांनी ज्यांची नावे माझ्याकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासंदानी कृपया गर्दी करू नये.

नगर सचिव यांनी कृपया मतदाना संबंधीच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

नगरसचिव :-

१) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांनी नांव पुकारण्यांत येतील.
२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेन नेच आपले मत नोंदवावे.
३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.
४) नियम क्र. ६२ प्रमाणे जितक्या जागा भरावयाच्या असतील तितकी मते देण्यांचा प्रत्येक सभासदाला अधिकार आहे. आता स्थायी समिती सदस्य पदासाठी निवडणूक होत असल्यामुळे प्रत्येक सदस्यांना आठ मते देण्यांचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छूकाला मते द्यावयाची असतील त्यांच्या नांवासमारे

गुणाकाराची (X) फुली करावी तसेच सदरची मते एका उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार देता येतील. मात्र आठ पेक्षा जास्त मते देवू नयेत.

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत : न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमावलीत बदल केला का? दोन वर्षापासून नियमावली बदलण्याची कार्यवाही चालू मा. न्यायमुर्ती ची माल्लीपल्ले यांनी निर्णय दिलेला आहे. उद्या मी रिट याचिका या संदर्भात दाखल केली तर महापालिकेची बदनामी होऊ शकते महापालिका प्रशासन न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाही. न्यायालयाने पार्कींग बाबत कार्यवाहीचे आदेश देताच तेथे तात्काळ कार्यवाही होते. हे सुध्दा न्यायालयाचे आदेश आहे. का उशीर लागतो.

नगरसचिव : विधी सल्लागार यांचेशी या सदंर्भात चर्चा केली. माहिती नुसार या प्रकरणांत जवळपास ९०% काम पूर्ण झालेले आहे.

श्री. अविनाश कुमावत : जवळपास न्यायालयाच्या निर्णया नंतर १५ निवडणूका झाल्या परंतु नियमावलीस अद्याप बदल केला नाही सल्लागार यांनी खुलासा करावा. प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर मी महापालिके विरुध्द न्यायालयात जाईल.

विधी सल्लागार (श्री. शिरसाठ) : या नियमावलीच्या दुरुस्ती संबंधी जो. स. सभासदांनी मुद्दा उपस्थित केला त्यानुसार त्या नियमावली मध्ये दुरुस्ती करण्या संबंधीचे काम मुंबई उच्च न्यायाल्याचे खंडपीठ, औरंगाबादचे निवृत्त न्यायमुर्ती श्री. एम.पी. चपळगांवकर यांना दिलेले आहे. आणि नगर सचिव यांचे मार्फत हे दुरुस्तीचे काम करीत आहोत. जवळपास ९०% काम वेळोवळी बैठका घेऊन पूर्ण केलेले आहे. २ ते ४ तांत्रिक मुद्यावर दुरुस्तीचे काम बाकी आहे. कमी कालावधीत हे काम करून सभागृहापुढे सादर करण्यात येईल. जवळपास १ महिन्यात हे काम पूर्ण होईल.

श्री. अविनाश कुमावत : एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्यांत यावी नसता मी न्यायालयात या संबंधी दाद मागेल.

५ सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदी नुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैघ समजली जाईल.

१. जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केलेली असेल अथवा.....
२. जी छिद्रांकित (परफोरेटेडे) नसेल अथवा ......
३. जिच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी सदिग्धतेमुळे निरउपयोग आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : कोणत्या स. सदस्यांना मतदानाचा अधिकार नाही, खुलासा द्यावा.

नगरसचिव : या निवडणूक प्रक्रियेत वॉर्ड क्र. १७, ३९, ४३, ६०, ७१ चे स. सभासद यांना उपस्थित राहता येणार नाही. किंवा मतदान करता येणार नाही.

पिठासीन अधिकारी : नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यांत आलेली आहे.

आता मतदानाला सुरुवात होते आहे. प्रभागनिहाय स. सभासदांची नांवे पुकारण्यांत येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५(F) च्या अनुषंगाने मतदानासाठी ६० मिनिटाचा कालावधी देण्यात येत असून

सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता ३.०० वाजले असून मतदान ४.०० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (G) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ चया तरतुदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा-नस२००३/१२० दिनांक २६-०३-२००३ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती काम करण्यांत येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमून देण्यांत आलेली आहेत त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत. आता जनसंपर्क अधिकारी यांनी मतदानासाठी एक-एक सभासदांची नांवे पुकारावीत.

जनसंपर्क अधिकारी : (स. सभासदांची नावे पुकारल्यानंतर) वॉर्ड क्र. १ चया स. सदस्यांनी मतदान केले यानंतर वॉर्ड क्र. ४७, ३८, ७४, च्या स. सदस्यांनी मतदान करण्यसाची मागणी केल्यानुसार मतदान केले. यानंतर वॉर्ड क्र. ३, ५, ६, ७, ८, ९, १० च्या स. सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ११ चे स. सभासद यांनी मतदानासाठी मदतनीसची मागणी केल्यानुसार त्यांना मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार पी.पी. शहापुरकर क.लि. यांनी मदत केली. वॉर्ड क्र. १२, १४, १५ च्या स. सदस्यांनी मतदान केले तसेच वॉर्ड क्र. १६ स. सभासद यांनी मदतनिसची मागणी केल्यानुसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार श्री. संजय पवार लेखाधिकारी यांनी त्यांना मदत केली. यानंतर वॉर्ड क्र. १८ च्या स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला वॉर्ड क्र. १९ च्या स. सदस्यांनी मदतनिसची मागणी केल्यानुसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार श्री. डी.जी. मुळे लघुटंकलेखक यांनी त्यांना मदत केली. यानंतर वॉर्ड क्र. २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २८, २९, ३१, ३२, ४४, ३३, ३५, ३६, ४०, ४१, ३०, ४२, ४५, ४६, ४८, ४९, ५०,५१ च्या सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ५३ चे स. सदस्य यांचे नांव पुकारले असता मा. पिठासीन अधिकारी म्हणून बसलेले स. सदस्या सौ. राजपुत विमलबाई यांना मतदान करायचे असल्याने मा. महापोर यांनी आदेशित केल्यानुसार स.स.श्री. राधाकृष्ण गायकवाड हे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात. व त्यांनी मतदान केले. यानंतर वॉर्ड क्र. ५४, ५५, ५६, ५७, ५९, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७२, च्या स. सभासदांनी मतदानात भाग घेतला वॉर्ड क्र. ७३ चे स. सभासद यांनी मतदानासाठी मदतनीसची मागणी केल्यानुसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार त्यांना लेखाधिकारी श्री. संजय पवार यांनी मदत केली. व मतदान केले. यानंतर वॉर्ड क्र. ७५, ७६, ७७, ७८, ७९ च्या स. सभासदांनी मतदानात भाग घेतला यानंतर वॉर्ड क्र. ८० स. सभासद यांनी लेखी मागणी केल्यानुसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार त्यांना आरोग्य अधिकारी सौ. कुलकर्णी यांनी मदत केली. यानंतर वॉर्ड क्र. ८२,८३, च्या स. सभासदांनी मतदानात भाग घेतला. (याचवेळी मा. पिठासीन अधिकी पदाच्या खुर्चीवर मा. महापोर पदग्रहण करतात. यानंतर ८१, १३, ३४, ३७, २, ४, ५८, २७ च्या स. सभासदांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ५२ च्या स.

सभादांचे नांव पुकारले असता त्यांनी मतदानासाठी मदतनीसची मागणी केल्यानुसार त्यांना मा. पिटासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार मा. उप. आयुक्त (म.) श्री. शिवाजी दिपेकर यांनी मतदानास मदत केली.

पिठासीन अधिकारी : आता दुपारचे ४.०० वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करता. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करू नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यांस सहकार्य करावे ही विनंती.

पिठासीन अधिकारी : मतमोजणी काम पूर्ण झाले आहे. एकूण ७८ स. सभासदांनी मतदानात भाग घेतला दोन मतपत्रिका अवैद्य ठरविण्यांत आल्या आहेत.

एकूण मतदान - ६०४
वैद्य मते - ६०४

उमेदवारांना पडलेली मते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| १ | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | ७२ |
| २ | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन | ७६ |
| ३ | स.स.श्री. तकी हसन खॉन कासीम हसन खॉन | ५६ |
| ४ | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | ८० |
| ५ | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉं | ६४ |
| ६ | स.स.श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर | ६४ |
| ७ | स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाट | ७२ |
| ८ | स.स.श्री. शे. ईलियास किरमाणी शे. उमर | ६४ |
| ९ | स.स.श्री. सय्यद सलिम सय्यद युसूफ | ०० |
| १० | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | ५६ |

वरील १० स. सदस्यांपेकी सर्वाधिक ७ सदस्यांना मते पडलेली असून दोन स. सदस्य श्री. तकीहसन खॉन कासीमहसन खॉन व स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण यांना ५६ अशी समान मते पडलेली असून स्थायी समितीच्या सदस्य पदाच्या ०८ जागा भरावयाच्या असल्याने या दोन सदस्यांतून आणखी एक सदस्य निवडणे आवश्यक असल्याने सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र. ६४ अन्वये पिठसीन अधिकारी यांनी कॉस्टिंग मतदान करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार माझ्याकडे एक मतपत्रिका देण्यात यावी.

पिठासीन अधिकारी म्हणून बसलेले मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांनी निर्णायक मतदान केले ते मत स. सदस्य श्री. माणिक लक्ष्मण साळवे यांना देण्यांत आल्याने आता त्यांना ५७ मते झाली. त्यानुसार मतमोजणीच्या निकालावरून मी असे घोषित करते की, स्थायी समिती सदस्य पदासाठी खालील सदस्यांची निवड झाली असून मी. त्या सर्वांचे अभिनंदन करते.

| अ.क्र. | विजयी उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १ | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| २ | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| ३ | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |
| ४ | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखाँ |
| ५ | स.स.श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर |
| ६ | स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाट |
| ७ | स.स.श्री. शे. ईलियास किरमाणी शे. उमर |
| ८ | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण |

**ठराव क्र. ५७/१ :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार स्थायी समितीच्या आठ सदस्य पदासाठी खालील स. सदस्यांना सार्वजनिक मते मिळाल्याने त्यांची स्थायी समिती सदस्य पदासाठी बहुमताने निवड करण्यांस मंजुरी देण्यांत येते. (१) स.स.श्री. किवळेकर जयश्री सारंग (२) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन (३) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक (४) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखाँ (५) स.स.श्रीमती शाहिन जफर व महमुद जफर (६) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाट (७) स.स.श्री. शे. ईलियास किरमाणी शे. उमर (८) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ३०-०३-२००३ रोजी संपन्न झालेल्या (अर्थ संकल्पीय) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त रविवार, दिनांक ३०/०३/२००३ रोजी मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली (अर्थसंकल्पीय) सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.४० वा. "वंदे मातरम्" गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
२) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३) स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
६) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
९) स.स.श्री. राजू रामराव शिंदे
१०) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१३) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२०) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२२) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२३) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२४) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२५) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
२६) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२७) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२८) स.स.डॉ. कराड भागवत पांडुरंग किसनराव
२९) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
३०) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
३१) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३२) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
३३) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक

३४) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३६) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३७) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३८) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३९) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४०) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
४१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
४२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
४७) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४८) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४९) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५०) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५१) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५२) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५३) स.स.सौ. सिद्दिकी नईम सुलताना सिद्दीकी म. फसियोद्दिन
५४) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
५५) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५६) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
५७) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५८) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
५९) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६०) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
६१) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६२) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६३) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
३) स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन
४) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : मागील आठवड्यात २४ काश्मिरी नागरिकांची हत्या झाली. त्याचा निषेध करून त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर :गुजरातचे माजी गृहराज्यमंत्री स्व. हरेन पांड्या यांचेही निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे. श्रध्दांजली साठी सर्वांनी उभे रहावे क्रुरपणे हत्या केली त्याबद्दल सभागृहातर्फे निषेध करण्यांत येतो.
(याचवेळी २४ काश्मिरी नागरिक व गुजरातचे माजी गृहराज्यमंत्री स्व. हरेन पांड्या यांना सभागृहातर्फे ०२ मिनिट स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

मा. महापौर : आता अर्थसंकल्प या विषयावर चर्चा करावी. मुख्यलेखाधिकारी यांनी अर्थसंकल्पा विषयी थोडक्यात माहिती द्यावी.

**विषय क्र. ५८/१ :**

सन २००२-२००३ चे सुधारित व २००३-२००४ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मुख्य लेखाधिकारी : महापालिकेचा हा २१ वा अर्थसंकल्प स्थायी समितीच्या मान्यतेनुसार सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्याचे मत आहे. हा अर्थसंकल्प मा. साभापती हे सादर करणार आहे. तद्पूर्वी मा. सभापती यांनी सर्व पदाधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे. (याचवेळी मा. सभापती स्थायी समिती हे सभागृहनेता, मा. महापौर, विरोधी पक्षनेता, यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.) प्रशासनतर्फे उपआयुक्त (म.) हे मा. सभापती यांचे स्वागत करतील. (उप-आयुक्त हे मा. सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मा. आयुक्त यांनी हा अर्थसंकल्प स्थायी समितीकडे सादर केलेला होता. तो तयार करतांना यात वेळोवेळी लेखी विभागामार्फत मदत घेऊन तयार केला त्याबद्दल मा. आयुक्त यांचे सुध्दा पुष्पगुच्छ देऊन उपआयुक्त (म.) यांनी स्वागत करावे (याचवेळी मा. आयुक्त यांचे उपआयुक्त (म.) हे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतील) मा. सभापती यांना विनंती की, त्यांनी मा. महापोर यांचेकडे अर्थसंकल्प सादर करावा.
(याचवेळी मा. महापौर यांचेकडे मा. सभापती अर्थसंकल्प सादर करतात.)

मा. सभापती : औरंगाबाद महानगरपालिकेचे सन २००२-२००३ चे सुधारित व सन २००३-२००४ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सुधारित व मुळ अर्थसंकल्प दि. १४-०२-२००३ रोजी सादर केला होता. तदनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अंदाज पत्रकावर दि. १७,२१ व २८ फेब्रुवारी २००३ रोजी संपन्न झालेल्या सभेत सदर प्रस्तावास या बैठकीत ठराव क्र. ७७ नुसार मान्यता देण्यात आली आहे. या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकार सर्वकष चर्चा करण्यांत आली व त्या मध्ये काही फेरबदल सुचवून आयुक्तांनी सादर केलेला अर्थसंकल्प पारित करून सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करण्यांत येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची सन १९८२ साली स्थापना झाल्यानंतरचा हा एकविसावा अर्थसंकल्प असून लोक नियुक्त पदाधिकारी यांचे कालवधीतील तेरावा अर्थसंकल्प सादर करते वेळी मला मनस्वी आनंद होत आहे. शहरातील नागरिकांना प्राथमिक स्वरुपाच्या सेवा सुविधा पुरविण्याकरिता प्रस्तावित अर्थ संकल्पात कामनिहाय कामाचा समावेश करण्यांत आलेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये आर्थिक वर्षामध्ये कोणती कामे घेण्यात येणार आहेत त्याचे विवरण दिलेले आहे. त्यमुळे नागरिकांना व सन्माननिय सदस्यांना या आर्थिक वर्षात कोणती कामे घ्यावयाची याचे नियोजन सन्माननिय सदस्यांना करता येणार आहे. प्रशासनातर्फे पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला होता. या प्रस्तावावर सर्व अभ्यास सन्माननीय सदस्यांनी विचार विनिमय करून सर्वसामान्य नागरिकांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक बोजा न टाकता पाणीपुरवठा योजनेवर होणारा भरमसाठ खर्च व त्यामुळे निर्माण होणारी तुट काही प्रमाणात भरून काढण्याच्या दृष्टीने प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या पाणीपट्टी दरवाढीमध्ये फरेफार करून प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यांत आला.

स्थायी समितीने महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन असलेले जकात मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट प्रशासनास वाढवून दिले आहे. जेणे करून थकित रकमा वसूल होऊन नागरिकांच्या कामासाठी जास्तीचा निधी उपलब्ध होऊ शकेल या करिता प्रत्येक विभागात एक पथकाची नियुक्ती करण्यांत येणार आहे. सदरील पथकास मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी वसूली करण्याचे काम दिले जाईल. तसेच विविध विभागीय कार्यालयामार्फत अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम अंतर्गत विभागीय बक्षिस योजना राबविण्यात येईल.

या बरोबरच महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांची थकीत असलेले पाचव्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम या आर्थिक वर्षात अदा करण्यांत येईल. त्या करिता विशेष तरतूद करण्यांत आलेली आहे. आणि मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षांतर्गत टोकन रक्कम म्हणून रु. २०.०० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे. मा. न्यायालयाचा आदेश महानगरपालिकेस बंधनकारक राहिल.

महानगगरपालिकेचे मुख्य कर्तव्य म्हणजे नागरिकांना मुलभूत गरजा जसे रस्ते, विज, पाणी, ड्रेनेज सुविधा तातडीने दणे, या बाबीकरिता निधी कमी पडत असल्याने तातडीची नसलेली कामे कपात करून याचा निधी इतर तातडीच्या कामावर वळविण्यांत आलेला आहे.

उत्पन्न वाढीच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येणार आहे.

१) जकात विभागाचे संगणीकरण करून कर्मचाऱ्यांना जकातीचे कामकाजात कार्यक्षम करण्याकरिता प्रशिक्षण देण्यांत येणार आहे.
२) मध्यवर्ती नाक्याचे स्थलांतर नगरनाका परिसरात करण्यात येणार आहे.
३) जकात व मालमत्ता कराची प्रभावी वसुलीकरिता उपआयुक्त दर्ज्याच्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करण्याकरिता शासनास प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

४) खाजगी संस्थेकडून शहरातील मालमत्तेचे तातडीने सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

५) शहरातील विद्युत खांबांना टायमर बसवून दिवे चालू बंद करण्यची व्यवस्था प्रोयागिक तत्त्वावर सुर करण्यांत येणार आहे.

६) शहरातील मन:निसारण व्यवस्थ्येचा स्तर उंचावणे व तसेच त्यांच्या अशुध्द पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प उभारणी करण्यासाठी नियोजन करण्यांत येणार आहे.

७) औरंगाबाद शहरातील विविध वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने गरिबांसाठी १००० शौचालय बांधून देण्यात येणार आहे.

८) केंद्र शासनाची वालमीकी-आंबेडकर आवास योजना महापालिका हद्दिमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी योग्यती उपाययोजना करण्यात येणार आहे.

९) विकास खर्च (BETTERMENT CHARGES) महाराष्ट्र शासनाचे जिल्हा दर सुची दराने वसूल करण्यात येणार आहे.

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या इतर सर्व बाबींवर स्थायी समितीचे सर्व सदस्यांच्या अभ्यासपूर्ण चर्चेअंती काही फेरफार सुचवून स्थायी समितीने सन २००२-०३ चे सुधारित अंदाजपत्रक रु.१०८ कोटी ०४ लाख ४० हजार एकूण जमा व रु. १०७ कोटी ८७ लाख ०५ हजार खर्च व रु. १७ लाख ३५ हजार शिलकी आणि सन २००३-०४ चे मुळ अंदाजपत्रक रु. १४६ कोटी ४३ लाख ५० हजार जमा व रु. १४६ कोटी १५ लाख १० हजार खर्चास व रु. २८ लाख ४० हजार च्या शिलकी अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४६ चे कलम ९६ नुसार मान्यता देऊन मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे, यावर सर्वकष विचार होऊन त्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : सुधारित मुळ अंदाजपत्रक सुध्दा यात दिले त्यावर चर्चा करून निर्णय घ्यावा.

डॉ. भागवत कराड : मा. सभापती यांनी सखोल अशी या अर्थसंकल्पावर स्थायी समितीच्या सभेत चर्चा घडवून आणली व चर्चेच्या आधारे योग्य तो निर्णय घेऊन आज हा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत सादर केलेला आहे. त्याबद्दल मा. सभापती यांचे मी माझ्या वतीने अभिनंदन करतो. म्हणून सन २००२-२००३ च्या सुधारित अर्थसंकल्पावर चर्चा करावी. नंतर मुळ अर्थसंकल्पावर चर्चा करता येईल. मागील वर्षाचे १२८ कोटीचे बजेट होते, १०८ कोटीवर आले त्यावर चर्चा करावी

श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. संजय शिरसाठ :
१०८ कोटीचे सुधारित अर्थसंकल्प का करण्यात आला त्याचा खुलासा करावा.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : प्रत्येक वर्षी संबंधित अधिकारी पदाधिकारी यांचे समवेत सभेपूर्वी एक बैठक (प्री बैठक) होते. यावर्षी घेण्यात आली नाही त्याचे कारण काय.

श्री. नंदकुमार घोडेले : या शहरात येणाऱ्या मालाची आवक वाढली जी नैसर्गिक वाढ होणार ती झाली. १२८ कोटीचे बजेट १०८ कोटीवर कसे आले कमी करण्यात आले. विकास कामे होतील का?

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : नगरसेवक किंवा पदाधिकारी यांचे सोबत सभेपूर्वी एक (प्री बैठक) बैठक बोलवावीच अशी नियमात तरतूद नाही. अर्थसंकल्प हा मा. आयुक्त यांनी तयार करून स्थायी समितीकडे सादर करायचा असतो. त्यास मान्यता होऊन मा. सभापती तो अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत सादर करतात.

श्री. तकीहसन खॉन : पहिल्या पंचवार्षिक मधील जेव्हढेही महापौर झाले त्यांचे काळात प्री. बैठक घेण्यात आलेल्या आहेत. मा. श्री बलदेवसींग हे आयुक्त होते. त्यावेळी प्री बैठक घेण्यात आली होती. त्यापूर्वी १२-१३ वर्ष प्री बैठक घेत होते ती कोणात्या नियमाने घेत होतो. त्याचा खुलासा व्हावा. यावर चर्चा करणे कितपत योग्य वाटते तसेच मागील अर्थसंकल्पात खाजगीकरण होणार या दृष्टीने जकातीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात आलेले होते.

श्री. संजय शिरसाठ, डॉ. भागवत कराड :
प्री. बैठक बाबत चर्चा करणे योग्य नाही. १२८ कोटीचे बजेट १०८ कोटीवर कसे आणले त्याचा खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म.) : सन २००२-२००३ या वर्षासाठी सुधारित अर्थसंकल्प मालमत्ता १३ कोटी, पाणीपट्टी १० कोटी तर जकातीचे ५९ कोटी करण्यांत आले. या तिनही माध्यमातून एकूण १७ कोटी वसुली कमी झालेली आहे. सभागृहाने जे अंदाजपत्रक दिले होते तो अंदाज असतो. एवढी वसुली होईल म्हणून. परंतु तेव्हढी वसुली झालेली नाही. व ती होत नसल्याने सुधारित मध्ये उद्दिष्ट वरील प्रमाणे कमी करण्यांत आले.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : २० कोटी वसुली का कमी झाली त्याची कारणे काय आहे, त्याचा खुलसा द्यावा. याचा अर्थ २०

उपआयुक्त (म.) : सन २००२-२००३ चे जे उद्दिष्ट दिले त्याची वसूली करण्यासाठी झोनचे कर्मचारी लावण्यात आले. झोन निहाय वसुलीचे काम चालू आहे. प्रभावीपणे वसुली होण्यासाठी वेळोवेळी झोन मध्ये बैठका घेऊन कार्यवाही करण्यांत येत आहे. जास्तीत जास्त वसुली करण्याचे प्रयत्न चालू असून डिसेंबर अखरे पर्यंतची वसुली यात दर्शविलेली आहे. सुधारित बजेट नुसार मार्च अखेर पर्यंत वसुली पूर्ण होईल असे अपेक्षित आहे. व तसे प्रयत्न चालू आहे.

श्री. अविनाश कुमावत : महसूली उत्पन्नावर जानेवारीमध्ये विशेष बैठक आयोजित केली तेंव्हा उद्दिष्ट पूर्ण होईल व तेव्हढी वसुली करण्यात येईल असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले होते. आता सुधारित बजेट करून सुध्दा तेव्हढे वसूल होतील की नाही शंका आहे.

श्री. भगवान घडमोडे : जी तुट निर्माण झाली ती कशामुळे झाली ज्या अधिकारी कर्मचारी यांनी उद्दिष्ट पूर्ण केले नाही तर काय कार्यवाही करणार आहे व यापूर्वी अशी कार्यवाही झालेली आहे का? माझ्या मते अर्थसंकल्प हा अधिकारी/ कर्मचारी यांचे पगारासाठी ठेवला जातो. नागरिकांच्या विकास कामासाठी नव्हे. ०८ वर्षापासून हेच पाहत आलो. अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा निर्णय होतो. त्याची अंमलबजावणी होत नाही. वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण का केले नाही याचा खुलासा द्यावा.

उप आयुक्त (म.) : ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना ज्या ज्या स्तरावर कामे नेमू दिली. कुणी दिरंगाई व कामचुकारपणा केला असेल त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री. तकीहसन खॉन : दोन्ही उपआयुक्त कार्यक्षम नाही म्हणून ही वेळ आलेली आहे. उपआयुक्त (म.), (प्र.) यांचेवरच काय कार्यावाही करायची त्याचा निर्णय

घ्यावा. वसुली न होण्यास दोन्ही उपआयुक्त जबाबदार आहे. सभागृहाने निर्णय घेतला तर अंमलबजावणी होणार आहे का?

श्री. अफसर खॉन : दोन-तीन विभागाचे चार्च एकाच अधिकाऱ्यांकडे असे किती अधिकारी आहेत. एका अधिकाऱ्याकडे एकाच पदाचा चार्ज असावा. तर वेळेवर कामे होतील.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : जकातीचे उद्दिष्ट पूर्ण होणार आहे की नाही किती तुट निर्माण होणार आहे. सुधारित अर्थसंकल्पानुसार सुध्दा वसुली झाली नाही असे समजते.

श्री. सुनिल मगरे : मा. सभापती स्थायी समिती यांनी विचारपूर्वक या अर्थसंल्पावर चर्चा करून योग्य ते निर्णय घेऊन हा अर्थसंकल्प सादर केला. चांगल्या प्रकारे अर्थसंकल्प असून त्यांचे त्याबद्दल सभागृहातर्फे तसेच माझ्या वतीने अभिनंदन करतो. सन २००२-२००३ साठी जे उद्दिष्ट ठेवले होते ते का वसूल झाले नाही. तसेच जकातीचे सुधारित मध्ये ५९ कोटी केले. दि. २८-०३-२००३ पर्यंत ५७.५५ कोटीच वसूली झालेली आहे. उर्वरित ०३ दिवसात बाकीची वसुली होणार आहे का? सुधारित जे केले तेव्हढी वसुली होणार आहे का? यास जबाबदार कोण मा. आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा की, उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी प्रशासन काय उपाय योजना करणार आहे.

श्री. प्रशांत देसरडा : मागील अर्थसंकल्प मी मंजूर केलेला आहे. तेंव्हा मी सभापती होतो. त्यात नऊ (०९) ठळक वैशिष्ट्ये ठेवलेली होते. त्यानुसार अंमलबजावणी झाली असती तर जी २० कोटीची तुट निर्माण झाली ती झाली नसती. नुसते बजेट पुस्तिका तयार करून सादर होतो. निर्णय होऊन अंमलबजावणी होत नाही. त्या ठळक वैशिष्ट्यामध्ये मालमत्ता कराचे सर्वेक्षण झाले पाहिजे. ते झालेले नाही. शासनाकडून महसूल उपआयुक्त (म.) हे महसूल उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मागवितो परंतु वसूली करण्यावर त्यांना जास्त वेळ दिला जात नाही. म्हणून उपआयुक्त (म.) यांना पूर्णवेळ महसूली उत्पन्न वाढविण्याचे काम द्यावे. इतर कामे त्यांचेकडून करून घेऊ नये.

श्री. काशिनाथ कोकाटे : बऱ्याच स. सदस्यांनी सुधारित अर्थसंकल्पावर मनोगत व्यक्त केले. स्थायी समितीने मान्यता देऊन या सभागृहासमोर बजेट सादर झाले. १२८ कोटीचे उद्दिष्ट १०८ कोटीवर आणले. आजपर्यंत एकूण वसुली किती झाली. सुधारित उद्दिष्टानुसार सुध्दा तेव्हढी वसुली होते कि नाही. या आर्थिक वर्षाचे दोन दिवस बाकी आहे. या दोन दिवसात जी तुट निर्माण होते ती भरणार आहे का? २०-२२ कोटीची तुट निर्माण होत आहे. वसुली न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात तुट निर्माण झाली याचा अर्थ प्रशासन उद्दिष्ट ठेवतांनाच चुकीचे ठेवते. जेव्हढी वसुली होईल तेव्हढेच उद्दिष्ठ ठेवावयास पाहिजे. प्रशासन चालवित असतांना या सभागृहाचे स. सदस्य, पदाधिकारी हे ट्रस्टी आहे. त्यांच्या मार्फत हे प्रशासन चालते. सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने चालले पाहिजे. परंतु गेल्या अर्थसंकल्पात २० कोटीची तुट येते याचा अर्थ प्रशासनावर या सभागृहाचा अंकुश राहिलेला नाही. वसतुस्थितीला धरून चर्चा होते. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. या वर्षाचे १४६ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला. २० कोटीची तुट आली या अर्थसंकल्पात किती तुट येऊ शकते. उद्दिष्ट एवढी होईल का नसता अर्थसंकल्प फुगवून द्यायचा सुधारित मध्ये कमी करायचे त्याला अर्थ

नाही. वसुली करण्यामध्ये प्रशासनास काय अडचण आली. लोकप्रतिनिधीचा माध्यमातून अडचण आली का तसा खुलासा प्रशासनाने करावा. जेमतेम तुट ५ ते ७% होऊ शकते परंतु जवळपास २०% तुट निर्माण झालेली आहे. जकातीचे ५४-५७ कोटी वसूल झाले १ दिवस बाकी असून ५९ कोटी पूर्ण करायचे असून एक दिवसात १-५० कोटी वसूल होणार आहे का?

श्री. भगवान घडमोडे : पदाधिकारी किंवा हे सभागृह वसुलीस जबाबदार नाही. उलट या सभागृहाने प्रशासनाला वसुली का होत नाही म्हणून धारेवर धरले होते. तुट का निर्माण झाली हेच विचारण्याचा अधिकारी सभागृहाला आहे जे अधिकारी वसुली मध्ये कमी पडले त्यांचेवर कडक कार्यवाही केली पाहिजे.

श्री. जयवंत ओक : या ठिकाणी कुणीही राजकीय भाषणे करू नये. मागील उद्दिष्ठामध्ये २०-२२ कोटीचे तुट का निर्माण झाली त्याचा खुलासा द्यावा. (याचवेळी मा. महापौर यांचे डायस समारे स. सभासद जमा होतात व खुलाशीची मागणी करतात.)

डॉ. भागवत कराड : या वर्षात २० कोटीची तुट निर्माण झाली पुढील वर्षी २५ कोटी होईल असे नेहमीच होत असेल तर जनतेची कामे कशी करणार .

मुख्यलेखाधिकारी : सन २००२-२००३ साठी प्रशासनामार्फत सादर केलेले मुळ अंदाजपत्रक ११७ कोटीचे होते त्यात स्थायी समितीने ४ कोटीची वाढ करून १२१ कोटी केले. सर्वसाधारण सभेने आणखी ०७ कोटीची वाढ करून १२८ कोटीचे अंदाजपत्रक केले. जवळपास ११ कोटीचे उद्दिष्ट वाढविले. मागील वर्षी जकातीचे खाजगीकरण करणार यास अपेक्षित धरून ६१ कोटीचे ६२ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते गेल्या आर्थिक वर्षात जकात वसुली ही ५१ कोटीच झालेली होती. ६२ कोटीचे उद्दिष्ट केले त्यामुळे २२-२३% जकातीच्या उद्दिष्टात वाढ झालेली होती. खाजगीकरण करायचे असेल तर शासन नियमाने २०% वाढ सुचविता येते. खाजगीकरण झाले नाही तर १०% वाढ नैसर्गिक म्हणून वसुलीच्या प्रमाणात करता येते. ५१ कोटी वसूल झाले त्याचे १०% केल्यास ५७ कोटी झाले असते. फेब्रुवारी मध्ये टेंडर प्रोसेस बाबत कार्यवाही चालू होती. परंतु काही कारणास्तव जकातीचे खाजगीकरण होऊ शकले नाही. खाजगीकरण होणार या अपेक्षेने ६१ कोटी ठेवण्यांत आले सभागृहाने ६२ कोटी केले होते.

श्री. जयवंत ओक : खाजगीकरण का झाले नाही. त्यास कोण जबाबदार आहे. कुणाचा दबाव किंवा अडथळा निर्माण झाला का? खुलासा द्यावा. शहरातील मालमत्तांना नंबर देण्याचा निर्णय मागील बजेटच्या बैठकीत घेतला होता. अद्याप कार्यवाही झाली नाही. त्यामुळे जी वसुली व्हायची ती झाली नाही. एवढी मोठी तुट निर्माण झाली असती.

श्री. संजय शिरसाठ : मुख्यलेखाधिकारी यांनी केलेला खुलासा अतयंत चुकीचा वाटतो. प्रशासनाची बाजू घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. मा. आयुक्तांनी खुलासा करावयास पाहिजे. सुधारित उद्दिष्ट तरी पूर्ण होते की नाही खुलासा द्यावा. मालमत्ता कराचे एकूण मागणी २४.२८ कोटीची आहे. २००३-२००४ साठी १३ कोटीचेच उद्दिष्ट ठेवले. त्यातून सुधारित ०७ कोटी केले जाते व वसुली ६ होते वसुली होत नाही यास जबाबदार कोण आहे. मालमत्ता / पाणीपट्टी मिळून ४० कोटीच्यावर थकबाकी आहे. वसुली करणार नाही यास जबाबदार कोणास धरायचे बजेट फुगवून दाखवितात रिवाईज

होते. १००% वसुली झाल्याचे प्रशासन दाखवते यात सभागृहाची दिशाभूल होते. वसुली का झाली नाही. याचा नेमका खुलासा दिला पाहिजे.

मुख्यलेखाधिकारी : रिवॉईज बजेट १०८ कोटीचे केले. त्यात २७ मार्च २००३ पग्रंत ९३-९४ कोटी वसूली झालेली आहे. जकात ५७ कोटी मालमत्ता १०.५२ कोटी तर पाणीपट्टीचे ७.१३ कोटी वसूल झालेले आहे. यात प्रामुख्याने शासकीय अनुदान १३ कोटी त्यापैकी ६ कोटीच प्राप्त झाले. मा. उपसंचालक यांचेशी मा. आयुकत यांनी सुध्दा प्रशासकीय पातळीवर त्योचशी संपर्क साधला परंतु तरी सुध्दा जे शासकीय अनुदान ७ कोटी येणार होते ते आलेले नाही.

श्री. संजय शिरसाठ : मुख्यलेखाधिकारी वसुलीचे काम करीत नाही. उपआयुक्त (म.) यांनी खुलासा द्यावा.

मुख्यलेखाधिकारी :शासकीय अनुदान १३.५० कोटी येणर होते. त्यापैकी प्रा. शिक्षण विभागाचे अनुदान प्राप्त झाले. २५ लक्ष गलिच्छ वस्ती साठीचे अनुदान प्राप्त झाले. विशेष ०५ कोटी अनुदान शासनाने प्राप्त करून दिले नाही. एकूण ६ कोटी प्राप्त झाले ७.५० कोटी प्राप्त झाले नाही. यातच ७.५८ कोटीची तुट निर्माण झालेली आहे. जकात, पाणीपट्टी तसेच मालमत्तावर वसुलीमध्ये जवळपास २८ कोटीची तूट निर्माण होत आहे. ३१ मार्च पर्यंत आढावा घेतला असता ते उद्दिष्ट अजूक होणार नाही ३१ मार्च पर्यंत आढावा घेतला असता ते उद्दिष्ट ॲच्युव होणार नाही. ३१ मार्च पर्यंत ९७ कोटी वसूल होतील असा अंदाज आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : १०८ कोटीचे उद्दिष्ट सुधारित करूनही ९७ कोटी वसूल होतील असे अधिकारी सांगतात यास जबाबदार कोण ९७-९८ मध्ये ७८ कोटीवरून ६९ कोटी सुधारित केले. ६८ कोटी वसूल केले. १ कोटीची तुट, सन ९८-९९ मध्ये ९३ कोटी ठेवले सुधारित ८२ कोटी केले. ७६ कोटी वसूल सन २०००-२००१ मध्ये ११५ कोटी सुधारित १०१ कोटी वसूल ८७ कोटी तुट १४ कोटी २००१-२००२ मध्ये १३५ कोटी सुधारित ९७ कोटी वसुली. ९४ कोटी ३ कोटीची तुट २००२-२००३ मध्ये १२८ कोटीचे सुधारित १०८ कोटी वसूल होणार. ९७ कोटी ३२ कोटीची तुट निर्माण होणार यावरून असे दिसून येते की, प्रशासन सुधारित उद्दिष्टानुसार तेव्हढी वसुली प्रशासन करू शकले नाही. दुर्देवी बाब आहे. स. सदस्य या सभागृहात पोट तिडकीने बोलतात त्यावर निर्णय घेतले जातात. परंतु अंमलबजावणी होत नाही. आणि अंमलबजावणी होत नसेल व वसुलीमध्ये अशी प्रत्येक वर्षी घट होत असेल तर वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याची गरज आहे. वसुल न झाल्यामुळे त्याचा परिणाम विकास कामावर होते हे विसरता येणार नाही. ठळक वैशिष्ट्यावर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे वसुली कमी येते.

श्री. संजय शिरसाठ : झोननिहाय वसुली किती त्याचा आढावा द्यावा.

श्री. भगवान घडामोडे : वसुली का झाली नाही याचा खुलासा अद्याप झाला नाही. जकात वसुली का झाली नाही याचा खुलासा व्हावा. तसेच शासनाकडून येणार अनुदान यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले. महापालिकेचे पदाधिकारी जबाबदार म्हणून चर्चा होते. परंतु या शहराचे लोकप्रतिनिधीतव हे मंत्री महोदय करतात, त्यांनी शासकीय अनुदान मिळण्यासाठी काय प्रयत्न केले.

युती शासनाच्या काळात या महापालिकेस २७ कोटी मिळाले होते. आरोग्य, शिक्षण विभागाचे अनुदान मिळत नसेल तर दुर्दैव आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्वांनी महानगरपालिकेच्या हिताचे बोलावे. १० वर्षापासूनचा विचार केला तर अनेक प्रकरणे या महापालिकेची चालू आहे. विज बिल देण्या संदर्भात जेंव्हा एम.एस.ई.बी. ने नोटीस पाठविली तेंव्हा लोकप्रतिनिधीत्व करणारे या शहराचे आमदार यांनी मध्यस्थी करूनच प्रश्न सोडविला होता. येथील पदाधिकाऱ्याचा प्रशासनावर अंकूश नाही असे म्हणावे लागेल या ठिकाणी अधिकाऱ्यांना पाठीशी घालणे व भ्रष्टाचारावर पांघरून घालण्यासाठी स. सभासद चर्चा करण्याचे दिसून येते.

श्री. सुनिल मगरे : अर्थसंकल्पावर चर्चा व्हावी राजकीय भाषणे कुणी देऊ नये. झोन अधिकाऱ्यांनी उद्दिष्ट पूर्ण का केले नाही.

डॉ. भागवत कराड : १३ कोटी अनुदान प्राप्त झाले नाही तुट प्रशासन दाखविते. जकातीचे उद्दिष्ट पूर्ण का केले नाही त्याचा खुलासा व्हावा. तर शासकीय अनुदान संबंधी एक निवेदन तयार करून पदाधिकारी तसेच मा. आयुक्त व ज्येष्ठ स. सदस्य यांना घेऊन शासनाकडून मंजुरी आणण्याबाबत प्रयत्न करावे.

सौ. निखत परविन : झोननिहाय वसूली किती झाली. आज सुट्टी असून ही सर्व झोन अधिकारी उपस्थित आहे. महत्वाच्या विषयावर चर्चा करावी. ०३ वर्ष गेले परंतु वॉर्डात कोणतेही विकास काम झाले नाही. ठराविक वॉर्डातच कामे होत आहेत.

सौ. शाहीन जफर : माझ्या वॉर्डात एका कामाच्या संदर्भात ०३ वर्ष झाले इस्टीमेंट मंजूर झालेले आहे. अद्याप काम झाले नाही.

मा. महापौर : झोननिहाय वसुली किती झाली खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म.) झोन क्र. १ ची ३१-०३-२००२ पर्यंत २४९ लक्ष थकबाकी, १२४ लक्षची मागणी आहे. एकूण मागणी ३७३ लक्ष उद्दिष्ट १२० लक्ष, आजपर्यंत वसूली १०१ लक्ष झोन क्र. २ ची थकबाकी ३९९ लक्ष डिमांड १७९ लक्ष एकूण मागणी ५७८ लक्ष उद्दिष्ट १७५ लक्ष वसुली १६१ लक्ष झोन क्र. ३ थकबाकी २१३ लक्ष यावर्षीची डिमांड ९३ लक्ष उद्दिष्ट १२० लक्ष.

श्री. सुनिल मगरे श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. भरत लकडे :

ही आकडेवारी पुस्तिकेमध्ये आहे. वाचून दाखविण्याची गरज नाही. वसुलीचे उद्दिष्ट का गाठले नाही, याचा खुलासा पाहिजे.

श्री. किशोर तुलशीबागवाले : पाणीपट्टी व मालमत्ता करावर व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला होता त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे वसुलीवर परिणाम झालेला आहे.

उपआयुक्त (म.) : माहे ऑक्टोंबर- नोव्हेंबर शासनाने संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभिया राबविण्याबाबत महापालिकेस शासनाने आवाहन केलेले होते. महाराष्ट्रात जवळपास सर्वच महापालिकांमधून २२ दिवस हे अभियान राबविले गेले. याही महापालिकेत सर्वांच्या नेतृत्वाखाली राबविण्यांत आले. यात जवळपास २२ दिवस निघून गेले. त्यावेळी वसुलीवर परिणाम झाला व यासाठी नियोजनासाठी ७-८ दिवस लागते.

श्री. संजय शिरसाठ : अधिकाऱ्यांनी खुलासा करतांना बरोबर करावा संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभियान राबविल्याने २१ कोटीची तुट झाली का? स्पष्ट खुलासा करावा. मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) वसुलीचा जो कालवधी होता तो त्यात गेला दुसरे असे की, ४ झोन मध्ये प्र. झेन अधिकारी म्हणून चार्ज आहे. तिसरे कारण असे की, वसुलीसाठी सक्षम असा आकृतिबंध नाही झोन निहाय किती कर्मचारी पाहिजे ती जी मागणी केली ती व्यवस्थित नाही याचा अर्थ कर्मचारी वर्ग झोनमध्ये वसुलीसाठी पुरेसा नाही. झोन अधिकारी यांना बोलावून किती कर्मचारी वर्ग असावा यावर अभ्यास केला होता तर प्रत्येक झोनला कर निरिक्षक असे एकूण १५ कर निरिक्षक आहे. आवश्यक आपल्याला २९ आहे. याचा अर्थ ५०% काम जे कार्यरत आहे, त्यांचेवर टाकतो आहे. या कर निरिक्षकांचे नेतृत्व करण्यासाठी जेष्ठ कर निरिक्षक आवश्यक आहे. असे एक कर्मचारी झोन क्र. ४ मध्ये आहे. वसुली करण्यासाठी झोन मध्ये एकूण २८ कर्मचारी लिपीक वर्गाचे आहे. एकूण ४९ कर्मचारी आवश्यक असून जवान कर्मचारी ३९ आहे, ७४ आवश्यक आहे. जकात विभागासाठी ७४ कर्मचारी आवश्यक आहे. कर वसुलीसाठी १४२ कर्मचारी आवश्यक आहे. फक्त आताच्या परिस्थितीत ८२ कर्मचारी उपलब्ध आहे. हि अपुरी संख्या असून हे सर्व कर्मचारी अप्रशिक्षित असून वसुली करण्याची क्षमता आहे. बऱ्याच कर्मचा४यांना आकडेवारी बेरजा, गुणाकार करता येत नाही. तसेच ज्यावेळेस करावी पट्टी दिली जाते त्यात वेगवेगळे कर आकरणी असते. उदा. वृक्ष कर, सामान्य कर याची मालमत्ता धारकांना फोड करून सांगणे आवश्यक असते, जेणे करून ते कर भरण्यास पुढे येतील परंतु अप्रशिक्षित असल्यामुळे तसे होत नाही. म्हणून वसुलीवर परिणाम होत आहे. बऱ्याच वेळेस करधारक हा संभ्रमात पडतो. एखाद्या घराला २०००/- रु. टॅक्स लागला तसेच दुसऱ्या बाजूच्या घराला कमी लागला तर तो का कमी लागला याचे समर्थन अप्रशिक्षित कर्मचारी त्यामुळे टॅक्स न देण्याची प्रवृत्ती नागरिकांमध्ये होते. प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच झोन क्र. ३ मध्ये कर निरिक्षक पद नाही. म्हणून जास्तीचे काम इतर कर्मचाऱ्यांना दिले जाते. त्यामुळे जी कामाची क्षमता असते ती कर्मचाऱ्यांची कमी होऊन करधारक यांचेशी वाद करणे वगैरे प्रकार घडतात. त्यामुळे वसुलीवर परिणाम होतो. प्रत्येकाला असे वाटते की, मी माझ्या क्षमतेपर्यंत काम करेल जास्तीचे काम करणार नाही. काही झोन मध्ये अधिकारी यांनी. जेष्ठ कर्मचारी यांना प्र. चार्ज देऊन काम करून घेत आहोत. त्यामुळे त्याचा जो प्रभाव नागरिकांवर / कर्मचाऱ्यांवर पडावयास पाहिजे तो पडत नाही. त्यामुळे वसुली करण्याचे जे नियोजन आहे. ते करून घेऊ शकत नाही. तसेच महापालिकेचा कर भरण्याची लोकांची मानसिकता नाही जसे टेलीफोन, लाईट बील, बँक कर्ज हप्ता भरतात तसे महापालिकेचा कर भरावा असे नागरिकांना वाटत नाही. दुय्यम प्राधान्य देतात. तसेच एम.एस.ई.बी. टेलीफोन, केबल कनेक्शनचे बील भरले नाही तर कट केले जाते. तसेच नळ कनेक्शन कट करण्या शिवाय आपल्याला पर्याय नाही. परंत हि कार्यवाही आपण कमी भागातच केलेली आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : ज्यांनी मालमत्ता कर भरला नाही त्यांची मालमत्ता जप्त करू शकतो, नळपट्टी भरली नाही तर नळ कट करू शकतो. अशी उपायायोजना प्रशासनाने केलेली नाही का?

उपआयुक्त (म.) : ज्यांनी पैसे भरले नाही त्यांना १-२ वेळेस आपले कर्मचारी जाऊन सूचना देतात. त्यांनी आश्वासन दिले असते. जर त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार कर भरणा केला नाही तर नळ कट करणे वगैरे करतो अशा पध्दतीने आपण योजना अवलंबावितो. आपण पोलिस दलाचा उपयोग करतो. एकूण ६४६ मालमत्ता धारकांना नोटीसा देऊन १३ मालमत्ता आतापर्यंत जप्त केल्या. १९०० नळ कनेक्शन कट केले. वसुली प्रभाविपणे होण्यासाठी कर्मचारी आकृतीबंध होणे आवश्यक आहेत.

श्री. संजय शिरसाठ : अधिकारी / कर्मचारी सक्षम नाही हे मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिलेले नाही का? असेल तर तसा खुलासा मा. आयुक्त करतील.

श्री. प्रशांत देसरडा : अधिकारी / कर्मचारी काम करीत नाही. अप्रिशिक्षित आहे हे वर्षाच्या शेवटी समजते झोनची वसुली व स्वच्छता खजगी संस्थेमार्फत करावी म्हणून निर्णय घेतलेला होता त्याची अंमलबजावणी का झाली नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : कमी जास्त कर आकारल्याने नागरिक कर भरीत नाही संभ्रम निर्माण होतो.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन सुधारित उद्दिष्टानुसार मालमत्ता कर वसूल होणार आहे का? हे शहर झपाट्याने वाढत आहे जे उद्दिष्ट ठेवले ते नियमाने बरोबर आहेत का?

डॉ. भागवत कराड : मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याची गरज होती. करमुल्य निर्धारक म्हणून उपआयुक्त दर्जाचे पद सर्वसाधारण सभेने मंजूर केले. त्या पदावर अधिकारी भरती केले असते तर उपआयुक्त (म.) यांना जो कामाचा व्याप होतो तो झाला नसतो. वसुली करण्याचे प्रयत्न चांगल्या प्रकारे झाले असते. अधिकारी/ कर्मचारी कामचुकारपणा करीत असतील तर आज या सभेत ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करण्याचा विचार करण्यांत यावा.

श्री. सुनिल मगरे : आताच उपआयुक्त (म.) यांनी वसूली न होण्याची कारणे दिली. परंतु काही ठिकाणी मुद्यामहून आपले कर्मचारी कर जास्त लावून कमी करण्यासाठी त्या कर धारकाने आपल्याकडे यावे व त्यावेळी आपले कर्मचारी चिरीमिरी घेऊन कर कमी करून देतात. त्यामुळेही त्याचा परिणाम वसूलीवर होतो.

डॉ. भागवत कराड : न्यायालय स्थापन झाले असते तर डिसपूट केसेसचा निकाल लागला असता का कार्यवाही झाली नाही त्यावर खुलासा व्हावा.

श्री. मिर हिदायत अली : गेल्या वर्षाचा अर्थसंकल्प माजी सभापती श्री. देसरडा यांनी सर्वसाधारण सभेत सादर केला. स्थायी समितीने असा निर्णय घेतला होता की, जे वादाचे प्रकरण असतील, न्यायप्रविष्ट असतील असे चर्चेअंती वटाघाटी करून निकाली काढावेत. दिड वर्षाचा कालावधी गेला प्रशासन कार्यवाही करीत नाही. कार्यवाही केली असती तर वसुलीत वाढ झाली असती.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी वसुलीच्या संदर्भात खुलासा करावा.

मा. आयुक्त : वसुली या महत्वाच्या विषयावर चर्चा झाली. वसूली कशी वाढेल या बाबतीत व प्रशासनाने वसुली वाढवण्या संदर्भात जे धोरणात्मक निर्णय घेतले त्याची माहिती देतो आहेत. गेल्या ०५ वर्षापासूनची सुधारित अर्थसंकल्प व त्यानुसार झालेली वसुली आताच स. सदस्य श्री. तांदुळवाडीकर यांनी सादर केली. साधारण ४-५ वर्षापूर्वी ७०-६९ कोटी व या वर्षात ९७ कोटी

वसूली वर जात आहोत. प्रशासन व इतर कर्मचारी हे सर्व योग्य पध्दतीने काम करतात हे अमान्य करावेच लागेल. सर्वच कामे बरोबर होतात असे नाही. करीत नाही, म्हणून अयोग्य आहे, असे म्हणणे बरोबर नाही. वसुलीत वाढ ही लिमिटेशन आहे. जी वाढ जकात, पाणीपट्टी व मालमत्ता मध्ये दरवर्षी होते, तेव्हढीच वाढ या वर्षी झालेली आपणांस दिसून येते. काही प्रमाणात कमी असले. खाजगीकरण होणार या हिशोबाने ६२ कोटीचे उद्दिष्ट ठवले, टेंडर भरून आले नाही. ज्यांना उत्साह होता. त्याचवेळी काहींचा विरोध होता, यावर्षी सभागृहाची इच्छा असेल, तसा निर्णय घ्यावा खाजगीकरणाची कार्यवाही करता येईल. वसुली संदर्भात बैठक पण घेतलेल्या होत्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले. दुर्दैवाने त्यांना त्या पदावरून काढण्यात आले. चांगल्या प्रकारचे अधिकारी बदलले गेले म्हणून काम बंद पडले असा भाग नाही. परंतु थोडीशी कामात सुसुत्रता येण्यास वेळ लागतो जकात वसुली कमी आली हे जेंव्हा आपण म्हणतो तेंव्हा सेल टॅक्स, कस्टम विभाग त्याचा सुध्दा विचार करावा लागेल. जे ६२ कोटीचे उद्दिष्ट ठेवले ते जकात खाजगीकरण होणार म्हणून ठेवलेले होते. खाजगीकरणाचा इष्टांक जास्त असतो. वाद विवाद, सर्वच महापालिकेमध्ये देशात चर्चेला असतात. चोरी समोर येतेचे. गेल्या वर्षभरात त्या अर्थाने दंडात्मक वसूली जास्त प्रमाणात केलेली आहे. १००% लोक जकात भरतात असे म्हणता येणार नाही. जेंव्हा समारे येतात त्यानुसार दंडात्मक कार्यवाही होतेच. हा जकातीचा मुद्दा आता मालमत्ता व पाणीपट्टीच्या संदर्भात बोलयचे झाल्यास मुंबई, कल्याण, डोंबिवली, पुणे येथे वॉर्ड ऑफिसर, झोन अधिकारी हे फार सक्षम आहे. तसेच याही महापालिकेचे सक्षम झोन अधिकारी व्हावे म्हणून प्रस्ताव शासनाकडे गेला तथापि ते मान्य नाही. पुन्हा शासनाकडे पाठवित आहोत की, या महापालिकेचे झोन अधिकारी इतर महापालिकेप्रमाणे सक्षम पाहिजे, प्रस्ताव तयार आहे, परंतु उपआयुक्त (प्र.) हे आजारी पडले. लवकरच मा. सभापती, मा. महापौर यांचेशी चर्चा करून पाठविण्यांत येईल फार काही प्रशासन सभागृहात वसुली करण्याचे मार्ग दाखविणार नाही, परंतु कमी वसुली होते, म्हणून आणखी कशी वाढविता येईल याची जिद्द ठेवणे गरजेचे आहे. तसेच झोन अधिकारी पदासाठी पात्र नसल्याने इनचार्ज म्हणून झोन अधिकारी म्हणून कार्यभार काही कर्मचाऱ्यांकडे दिलेला आहे. महसूली खातयाची ज्याला माहिति नाही तो झोन अधिकारी काय काम करू शकणार म्हणून महसूली खात्याकडून अधिकारी डेप्युटेशन वर घ्यावे असा निर्णय यापूर्वी घेतलेला आहे. म्हणून मी तहसीलदार किंवा नायब तहसिलदार या दर्जाचे अधिकारी झोन अधिकारी म्हणून द्यावे असे विभागीय आयुक्त यांना प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी सर्व तहसिलदार वर्गाचे यांचेशी कन्सल्ट केला तर एकच तहसिलदार वर्गाचे अधिकारी महापालिकेत येण्यास तयार आहे. तसा प्रस्ताव त्यांनी शासनास पाठविला हि वस्तुस्थिती आहे. मालमत्ता कर व इतर कर वसूल करण्या संदर्भात एक उपआयुक्त दर्जाचे एक अधिकारी शासनाकडून मागविण्यात आले. अद्याप दिले नाही. अधिकारी घेण्याची आवश्यकता आहे म्हणून बजेट मध्ये सुध्दा दाखविले, मालमत्ताचे सर्वेक्षण करण्याची गरज आहे, त्यातून सर्वच जे ३ हजार, ६ हजार कर लागतो असे प्रश्न उपस्थित होतात, ते ही दूर होतील याचे टेंडर प्रोसेस

कसे करावे म्हणून भिवंडी-निजामपूर, नागपुर महापालिकेकडून माहिती घेत आहोत यात बरेच नियम असून या कामासाठी ६० ते ७० लक्ष रुपये खर्च होणार आहे. फायर नावाची संस्था सर्वेक्षण करून देणार होती त्यांनी डिसेंबर मध्ये नाही म्हणून कळविले की शासन संस्था असून नगर विकास सचिव त्या संस्थेचे डायरेक्टर असतात. त्यांचेकडे खुलासाच आला नाही. याचा अर्थ ती संस्था सर्व्हे करण्यास तयार नाही. नागपुर, अकोला या महापालिकेकडे अधिकारी पाठवून ही कार्यवाही करण्या संदर्भात कागदपत्र आणलेले असून लवकरच मालमत्तेचे सर्व्हेक्षण होईल त्यात संगणकीकरण करायचे की नाही याचा विचार चालू आहे जेणे करून आपल्याला सर्वच मालमत्ता संबंधीची माहिती ठेवता येईल. नकाशे, घराची लांबी, रुंदी त्याचा नंबर असावयास पाहिजे असे टेंडर आम्ही करणार आहोत. १५-२० एप्रिल पर्यंत टेंडर प्रोसेस होईल. आपल्याकडे कर्मचारी आकृतीबंध बरोबर नाही. शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यास आपली मदत आवश्यक आहे. कर्मचारी पूर्ण असल्यास वसूली वाढू शकते. मालमत्त्ेची वसुली चांगल्या प्रकारे होईल तर पुढील वर्षी आपण स्वच्छतेच्या बाबतीती खाजगीकरण करून तो कर्मचारी वर्ग कर वसुली साठी लाऊन वसूली करू शकतो. कराचे बील वाटपाचे काम खाजगी अभिकर्त्यामार्फत केले तर ते कर्मचारी वसुलीसाठी घेता येईल. उदा १० कर्मचाऱ्यांना टार्गेट दिले. जा खूपच कमी वसुली केली. त्यावर निश्चित पणे प्रशासन कार्यवाही करेल यात शंका नाही.

सौ. निखत परविन : जनगणनेच्या कामासाठी महापालिकेचे काही कर्मचारी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे बऱ्याच दिवसापासून आहेत. त्यांना काही कामे नाहीत. पगार महापालिका देते. त्या कर्मचाऱ्यांना तात्काळ बोलविण्यांत यावे.

मा. महापौर : मागील वर्षीचे जे मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुलीचे जे उद्दिष्ट होते. वसुली करण्यात अधिकारी / कर्मचारी कसूर करीत असतील त्यांचेवर मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी. आजची सभा ६० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (सभा दु. २.५० वा. तहकूब पुन्हा सभा ४.०० वजता सुरू)

श्री. साहेबराव कावडे : गेल्या अर्थसंकल्पात ज्या कामासाठी निधीची तरतूद केली ती कामे का करण्यात आली नाही.

श्री. सुरजितसिंग खुंगर : वसुली का झाली नाही. या वरून उपआयुक्त त्यानंतर मा. आयुक्त यांनी खुलासा केला. वसुली योग्य तऱ्हेने करण्यासाठी मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक कमिटी नियुक्त करावी. सक्षम अधिकारी कमिटीला ठेवावे. अधिकारी हे मार्च महिन्यात वसुलीस लागतात त्यामुळे पूर्णतः वसुली होत नाही. मालमत्ताचे १० वर्षापासून सर्व्हेक्षण झाले नाही. निवासी व कमर्शियल दर सारखाच लागला जातो. त्यामुळे ज्या पध्दतीने कर आकारून वसुली करावयास पाहिजे तशी होत नाही. या संदर्भात काही मालमत्ता धारकांना नोटिसा दिल्या. महापालिकेकेउ असलेले लाईट मिटर दुरुस्त करून घेतले पाहिजे. दिवसा लाईट चालू असते. त्यामुळे येणारे बील जास्त येत असेल. होर्डींग बाबत कार्यवाही केली असती तर दरवर्षी ७०-८० लक्ष रुपये मिळाले असते. जे अधिकारी / कर्मचारी काम करीत नसतील त्यांच्या बदल कराव्या वसुलीसाठी नवीन कर्मचारी घ्यावेत.

श्री. शे. ईसाक शे. जैनादिन : ०३ आठवडी बाजाराचा ठेका एकाच गुत्तेदारास दिला जातो. त्याचा लिलाव येतो काय? माहिती द्यावी.

डॉ. भागवत कराड : उत्पन्न / खर्च या दोन्ही बाजूवर चर्चा होत आहे. म्हणून अगोदर उत्पन्न बाजूवर चर्चा करावी जकात वसुली या विषयावर चर्चा व्हावी.

श्री. जयवंत ओक : कर आकारणी विभाग वेगळा, वसुली करणारे वेगळे कर्मचारी म्हणून यात झोन अधिकाऱ्याचा दोष नाही. कर कमी जास्त लागला जातो. त्यामुळे कर भरणारे भरीत नाही. त्यामुळे वसूली (उद्दिष्ट) पूर्ण होत नाही. यात कोण दोषी असू शकते.

मा. महापौर : झोन अधिकारी यांना ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, नसता वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यावर मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

सौ. लिलावती घायतिलक : वसुली होण्यासाठी लोकप्रतिनिधी स. सदस्य तसेच पदाधिकारी यांनीही सहभाग घ्यावा व प्रशासनास सहकार्य करावे.

नगरसचिव : मा. महापौर यांनी सूचना केल्याप्रमाणे सभागृहाने जकात वसुली संदर्भात चर्चा करावी.

डॉ. भागवत कराड : सुधारित जकात उद्दिष्ट ५९ कोटी ठेवले ते वसुली होणार आहे का? सन २००३-२००४ साठी जे ६७ कोटी ठेवले ते उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासन काय यंत्रणा राबविणार आहे.

उप आयुक्त (म.) जकातीचे संगणकीकरण करण्यात येणार आहेत. तसेच सेंट्रल नाका शिफ्ट करण्या संदर्भात कार्यवाही करता येईल.

श्री. तकीहसन खॉन : जकात विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार त्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार यासाठी सर्वच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज पडणार आहे. सेंट्रल नाका चेंज करण्यासाठी महापालिकेकडे तेव्हढी तरतूद आहे का. संगणकीकरण झाल्यास जकातीचे वसुली वाढले असे वाटत नाही. सेंट्रल नाका शिफ्ट करण्यासाठी ५-६ कोटी रुपये खर्च येणार आहे. बजेटमध्ये तरतूद नाही.

डॉ. भागवत कराड : संगणकीकरण झाल्यास वसूलीत वाढ होईल. मा . आयुक्त, मा. महापौर यांचे दालनात एक-एक संगणक ठेवावे तात्काळ प्रिंट करून बघता येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : ६७ कोटी जकातीचे उद्दिष्ट दिले. टारगेट पूर्ण करणार आहे का कोणती यंत्रणा वापरणार आहे. कोणत्या महिन्यात किती टारगेट झाले, मागील वर्षी किती झाले या वर्षाच्या प्रत्येक महिन्यात किती झाले पाहिजे. एखाद्या महिन्यात कमी आले तर त्याची पूर्तता करण्यासाठी पुढील महिन्यात तरी भरून काढले पाहिजे. अशी काही फिक्स जबाबदारी टाकण्यात यावी. मालमत्ता / पाणीपट्टी वसुलीवरही तेंव्हाच भार दिला पाहिजे. मा. आयुक्तांनी हे टार्गेट पूर्ण करण्यासाठी काय सुधारणा करता येईल त्या कराव्यात जे कुणी वसुली करण्यात कसूर करीत असतील त्यांचेवर मा. आयुक्त कार्यवाही करू शकतात.

श्री. प्रशांत देसरडा : खाजगीकरण उत्पन्न वाढविण्यास प्रशास किती सक्षम असेल ते यावरून समजते. सेंट्रल नाका मुंबई नाका जवळ कुठे तरी जागा घेऊन कार्यान्वित करण्यात यावा. त्यासाठी छावणी बोर्ड नाक्यासाठी ०२ एकर जागा देणार होते. का कार्यवाही झाली नाही. तसेच वस्तुवाईज जकात

आकारणी केल्यास चोरीचे प्रमाणे कमी होईल. सोने, चांदी यावर २% जकात आकारली जाते कमी केल्यास वसुलीत वाढ होईल.

श्री. मीर हिदायत अली : जकातीचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेण्यात यावा तसे प्रशासनास आदेश द्यावे.

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन जकातीपासून ७० कोटी खाजगीकरण करून मिळत असेल तर करण्यास हरकत नाही.

श्री. अ. रशिद अ. सत्तार, श्री. मीर हिदायत अली : खाजगीकरण करण्याचा ठराव यापूर्वीचे मंजूर केलेला आहे. निविदा प्रोसेस करण्याचे आदेशित करावे. जकातीचे कर्मचारी इतर वसुलीसाठी घेता येईल.

श्री. अफसर खॉन : ६७ कोटी वसूल झाले तरी चालेल जकात खाजगीकरण करावे विकास कामे होतील. ठराव यापूर्वीचे झालेला आहे. कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. सुनिल मगरे : प्रशासनामार्फत खाजगीकरण करण्याबाबत प्रस्ताव नाही, चर्चा करणे योग्य नाही. यापूर्वी ठराव झालेला असेल, महापालिकेचे नुकसान होत असेल, तर प्रशासकीय पातळीवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

डॉ. भागवत कराड : शासनाने व्हॅट पध्दत लागू केला त्यामुळे जकातीवर काय परिणाम होईल.

उपआयुक्त (म.) : यामुळे वृध्दी होऊ शकेल परंतु हा काही विषय नाही. जेव्हढ्या वस्तू आयात होतील, त्यारवर जकात आकारला जाईल. तयाचा किंमतीवर परिणाम होईल जकात वर नाही.

श्री. संजय शिरसाठ : खाजगीकरणाचा ठराव झालेला आहे काही कारणास्तव बारगळला असेल तर प्रशासनानेच पुन्हा त्यावर कार्यवाही सुरू करावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : जकातीचे ६७ कोटीचे उद्दिष्ट यावर्षी ठेवले, त्यावरच चर्चा करणे योग्य होईल. खाजगीकरण करणे हे काही नवीन नाही. महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रशासनाने कार्यवाही केली. तरी सुध्दा खाजगीकरण झाले नाही. उद्दिष्ट किती ठेवायचे यावरच चर्चा करावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : मागील वेळेस खाजगीकरण करावे म्हणून प्रस्ताव मान्य केला, परंतु खाजगीकरण झाले नाही या अर्थसंकल्पीय पुस्तिकेत प्रशासनाने तसा प्रस्ताव ठेवावयास पाहिजे होता. जकातीचे खाजगीकरण करायचे असेल तर प्रशासनास तसे कार्यवाहिचे आदेश करावेत. सर्व पक्षीय सदस्यांची मान्यता मिळालेलीच आहे.

श्री. सुनिल मगरे : मागील वर्षी खाजगीकरण हा होऊ शकले नाही. याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : खाजगीकरणाची प्रक्रिया दोन वर्षापासून चालू असतांनाच काही संघटनेमार्फत मोर्चे, आंदोलने निघाली तसेच पादाधिकारी यांचे मार्फत वृत्तपत्रात विरोध म्हणून स्टेटमेंट छापून आले. त्यामुळे तसेच काही व्यापारी यांचा विरोध होता. म्हणून वृत्तपत्रात आले. त्यामुळे निविदा भरणाऱ्यामध्ये संभ्रम निर्माण झाला. यासाठी चांगल्या प्रकारचे वातावरण आवश्यक आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधीच्या सहकार्याची आवश्यकता आहे. अमरावती, उल्हासनगर महापालिकेचे संक्सेस झालेले आहे. नसता खाजगीकरण होणे सक्सेस होणार नाही. खाजगीकरण करण्याचे मत असले तर प्रशासन तशी

कार्यवाही करेल तसा निर्णय सभागृहाने घ्यावा. गेल्या वेळेस निर्णय घेतला त्यानुसार कार्यवाही केलेली होती. पुन्हा निविदा काढावयाच्या असल्यास पुन्हा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : खाजगीकरण होवो न होवे या विभागावर एक सक्षम अधिकारी प्रशासनाने नियुक्त करावे. जेणे करून वसुलीत वाढ होईल. चोऱ्या होणार नाही. सर्व सुविधा देण्यांत यावी. ही निर्णय घ्यावा.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने जकातीचे खाजगीकरण करण्या संदर्भात कार्यवाही सुरू करावी. तसा निर्णय हे सभागृह घेत आहे. दोन महिन्याच्या आत टेंडर प्रोसेस करावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : आजच्या सभेत हा विषय नाही. खाजगीकरण करण्याचा निर्णय घेत असेल तर मी निषेध करतो.

## २ मालमत्ता कर वसुली

श्री. डॉ. भागवत कराड : या विषयावर चर्चा झालेलीच आहे. २५ कोटी उद्दिष्ट करावे.

श्री. सुनिल मगरे : कर मुल्य विभागामर्फत मालमत्ता कर आकारला जातो. त्या विविध प्रकारचे कर असतात. कर आकारणी एका विभागात तर वसूली झोन मार्फत होते. जेंव्हा आपले कर्मचारी वसुलीसाठी जातात त्यांना कोणता किती कर व कशा पध्दतीने आकारला गेला याचे उत्तर घर मालकांना देता येत नाही. त्यामुळे कर भरणारे संभ्रमात पडतात. म्हणून कर आकारणी विभाग झोनला ॲटच करावा. जेणे करून त्या विभागाचे कर्मचारी पाठवून कर वसूल करण्यास मदत होईल. तसे झोन अधिकारी यांना जास्तीचे अधिकार देण्यांत यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : विभागीय अधिकारी यांना अधिकार देऊन दोन-दोन महिन्याचे टार्गेट देऊन तसा अहवाल मागवून घ्यावा. सर्वे करण्याचे अधिकार द्यावे. सर्वेक्षण झाल्यास किती टॅक्स कोणत्या इमारतींना लागला हे समजून येईल.

श्री. तकीहसन खॉन : दर चार वर्षांनी मालमत्ताचे सर्वेक्षणाचे काम व्हावयास पाहिजे. १२ वर्षापासून सर्वेक्षण झाले नाही. दोन उपआयुक्त असतांना कार्यवाही करण्यांत येत नाही. सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात सर्वेक्षण करण्याचा निर्णय झाला असतांना सर्वेक्षण केले नाही. यास जबाबदार कोण. सर्वेक्षण न झाल्यामुळे वसुलीवर परिणाम झाला.

श्री. जयवंत ओक : घर तेथे कर असावा. या संदर्भात उपाय योजना करावी. दोन्ही उपआयुक्ता मार्फत सर्वेक्षणाचे काम करून घ्यावे. गेल्या वेळेस निर्णय घेतल्यानुसार सर्वेक्षण करून घरांना नंबर दिले असते तर कोण कर भरतो, कोण भरीत नाही हे दिसून आले असते त्याच बरोबर नळपट्टी कुणाकडे बाकी आहे हे सुध्दा या सर्वेक्षणातून दिसून येईल. नंबर न दिल्यामुळे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. १) महिण्यात अंमलबजावणी कशी होईल या संदर्भात आदेशीत करावे. झोन अधिकारी यांना अधिकार देऊन जया डिसपूट केसेस आहे. त्या सुध्दा निकाली काढाव्यात.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात कमी जास्त कर आकारणी होते. अधिकाऱ्यांचा यात दोष असतो. त्यामुळे जे भरणारे ते सुध्दा भरीत नाही.

श्री. मीर हिदायत अली : सर्वेचे काम काही आपले कर्मचारी करीत आहे. सर्वे करीत असतांना घरमालक सोबत चर्चा करून कर आकरणी करणे आवश्यक आहे. परंतु तसे होत नाही. आपले कर्मचारी बाजूच्या घरमालकाकडे जातात पैशाची मागणी करतात नसता जास्त कर आकारणी करतात. आणखी वाद निर्माण करण्याचे काम होत आहे. झोन अधिकारी यांना तसेच आदेश द्यावे. अशा कराव्या संदर्भात ६४७ मालमत्ता दिस्पूट मध्ये आहेत झोन अधिकारी यांना अधिकार द्यावेत.

श्री. सुनिल मगरे : झोन अधिकारी यांना अधिकार देता येतात का. करमुल्य विभाग झोन विभागाला ॲटच करता येऊ शकते का?

मा. आयुक्त : दोन टीम काम करीत आहे. त्यांच्या कामाचा आढावा घेतला तर एका वर्षात १ कोटी रुपयाची वाढ होऊ शकते. असे दर वर्षी १-१ कोटी वसूल होत राहिले तर १०-१५ वर्ष लागतील त्यामुळे फायर नावाच्या संस्थेला सर्वेक्षणासाठी देणार होतो आपले कर्मचारी ठेऊन कमी जास्त कर आकारणी होऊ शकते. कर्मचाऱ्यांनी पैसे घेतात म्हणून काही ॲन्टी करप्शनच्या केसेस सुध्दा झालेल्या आहे. सर्वेक्षण केल्यानंतर रेट नाही वाढले. तरी व्हॅल्यू वाढवू शकतो. रेट सुध्दा वाढविता येईल. असे करून १२-१५ कोटी उत्पन्न मालमत्ता करातून मिळेल असे वाटते. घरांना नंबर पडल्यानंतर इतर त्यापासून फायदा होणार आहे. आता प्रश्न राहिला झोन अधिकाऱ्यांना अधिकार देण्याचा सर्वेक्षण हे खाजगी संस्थे मार्फतच केलेले बरे होईल. ०७ महिन्याचे कामाच्या कालावधीत पुढील १० वर्षाचे काम संपेल. मालमत्ता कर निश्चित झाला की, अधिकार देऊ शकते, वसूली त्यांनी करायची आहे.

श्री. जयवंत ओक : कर एक अधिकारी आकारतात. वसुली झोन अधिकारी करतात, जी तफावत कमी जास्त ठेवण्यांत येते, झोन अधिकारी त्यास जबाबदार नसतो. त्यामुळे वसुली करणारे कर्मचारी व करधारक यांचेत वाद निर्माण होतात वसुलीवर परिणाम होतो. त्यासाठी जे कर लावतात त्यांनाच वसुलीचे अधिकार द्यावे नतसा झोन अधिकाऱ्यांना द्यावे.

श्री. मीर हिदायत अली : आताच खुलासा झाला १२-१५ कोटी करातून वसुली वाढवू शकते यापेक्षा हि वाढवू शकते. प्रशासनाचे नियोजन असावेत. जे . ई. यांना झोन मध्ये दिले पाहिजे. त्यांनी झोन अधिकारी यांना सर्व लावण्याबाबत माहिती दिली पाहिजे ज्या घरांना ३ हजार रु. कर लागू शकतो तेथे ८ हजार रु. लागला जातो. त्यामुळे भरणा करण्यासाठी नागरिक पुढे येत नाही. झोन मध्येच कर आकारणी तेथेच जागेवर भरणा करता येईल अशी व्यवस्था करावी.

मा. महापौर : मालमत्ता कराचे उद्दिष्ट २० कोटी ऐवजी २३ कोटी करण्यांत येते. एवढी वसुली प्रशासनाने योग्य उपाय योजना अवलंबून करावी. घर तेथे कर याप्रमाणे अंमलबजावणी करावी. मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यांत यावे. घरांना नंबर देऊन मालमत्ताचे संगणकीकरण करावे. करमुल्य विभाग व झोन अधिकारी या दोन्ही विभागचा समन्वय असावा. ठरल्याप्रमाणे उद्दिष्ट पूर्ण करण्यांत यावे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी ही खाजगीकरण केले तर योग्य वसुली होऊ शकते किमान बिले वगैरे देण्यासाठी तरी खाजगी संस्थेला काम द्यावे.

## ३ पाणीपट्टी वसुली

मा. महापौर : वसुलीच्या संदर्भात आताच सविस्तर चर्चा झाली ठरलेल्या उद्दिष्टाप्रमाणे वसुलीचे काम प्रभावीपणे करणे तसेच २७ कोटी पर्यंत प्रयत्न करणे.

## ४ मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकी वसुली मोहिम प्रभाविपणे राबविणे

मा. महापौरः वसुलीच्या संदर्भात बऱ्याच वेळापासून चर्चा चालू आहे. त्यावर प्रशासनाने सुध्दा सविस्तर खुलासा केलेला आहे. सभागृहाच्या सम्मतीने यास मान्यता देण्यांत येते.

## ५ पाणीपट्टी दरवाढ

मा. महापौरः पाणीपट्टी दरवाढ या विषयावर चर्चा करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रशासन दरवाढीचा प्रस्ताव सादर करते. वेळोवेळी सभागृहात पाणी प्रश्नावर चर्चा होते. पाण्याचे ऑडिट करावे म्हणून मागणी होते. तयाची कार्यवाही होत नाही. वसुली किती त्या योजनेवर खर्च किती होतो त्याचा सुध्दा खुलासा व्हावा. प्रशासनाचे या योजनेसाठी कोणतेही नियोजन नसल्याने ही दरवाढ करण्याचा प्रस्ताव येतो. असे मला वाटते. सिडको-हडको भागात सध्या एक दिवसाआड पाणी दिले जाते. याचा अर्थ ६ महिनेच पाणी देतो, परंतु पाणीपट्टी पूर्ण वर्ष भराची आकारणी होते तो या जनतेवर अन्याय होतो. ६ महिन्याचेच १२००/- रु. याचा अर्थ वर्षभराचे २४००/- रु. होतात एकूण १०७ एम.एल.डी. पाणी मिळते. आसे माझे मते आहे. पावसाळ्यात ६० एम.एल.डी. पाणी हर्सूल तळावातून मिळू शकते. जे रेग्युलर पाणीपट्टी भरतात त्यांचेवरच ही दर वाढ आहे. असे म्हणटले तरी योग्यच होईल.

मा. महापौर : सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यांत येते. (वेळ ५.३० वा सभा तहकूब पुन्हा ६.०० वा सुरू)

सौ. निखत परवीन : पाणीपट्टी दर वाढ विषयावर चर्चा चालू आहे. परंतु जनतेला पाणी वेळेवर दिले जात नाही पाणीपट्टीत वाढ करून उपयोग नाही. अगोदर पुरेसे पाणी द्यावे नंतर यावर विचार करावा. १०-१५-२० मिनिटे पाणी दिले जाते. पाणी सोडले नाही तर जनता आमच्या घरी येऊन प्रश्न विचारतात.

श्रीमती नईम सुलताना : एक दिवसाआड पाणी येते. जनतेला अगोदर भरपूर पाणी द्यावे नंतर यावर विचार करावा.

श्री. अ. रिशद अ. सत्तार : १२००/- रु. पाणीपट्टी राहू द्यावी. जनतेला पिण्यास पाणी नाही वाढ करण्यात येऊ नये.

सौ. साजेदा बेगम : १२००/- रु. सुध्दा भरण्यास कुणी तयार नाही. जनतेला पाणीच कमी दिल जाते. आाणखी वाढ केल्यास कुणीही पाणीपट्टी भरणार नाही.

श्री. राजु शिंदे : पाणीपट्टी दर वाढविण्याची प्रशासनाला का आवश्यकाता झाली याचा अगोदर खुलासा करावा.

श्री. तकीहसन खॉन स्थायी समितीने अर्धा इंची पासून एक इंची पर्यंतचे दरवाढ केल्याचे यात नमूद केले. परंतु त्यापुढील नळांना किती दरवाढ करावी यात दिले नाही.

कार्य. अभियंता (पा.पु.) : पाणी पुरवठा योजनेवर दरवर्षी ३०-३२ कोटी रुपये खर्च होतो. वसुली मात्र १०-१२ कोटीचे होते. याचा अर्थ १८ कोटी रुपयांची तुट निर्माण होते. ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालावी तसे शासनाचे सुध्दा आदेश आहे.

श्री. राजु शिंदे : जे लोक रेग्युलर भरतात त्यांना या दरवाढीला समोरे जावे लागाणार आहे जे भरणा करीत नाही त्यांचेवर प्रशासन काहीच कार्यवाही करीत नाही. यात व्यवसायिक नळाची संख्या फक्त ८१६ दिली. महापालिका हद्दित किती व्यावसायिक लोकांनी नळ कनेक्शन घेतलेली असतील घेतले नसतील तर ते पाणी कोठून वापरतात याची चौकशी करावी.

कार्य. अभियंता (पा.पु.) गेल्या दिड महिन्यापासून अनधिकृत नळ शोधण्याची मोहिम सुरू आहे. एकूण ७०० नळ कट करण्यांत आलेले आहे. शहरात हॉटेलस, पेट्रोलपंप, मंगल कार्यालय, सिनेमागृहे व इतर व्यावसायिक या सर्वांची बेरीज केल्यास १९४६ होते. या प्रत्येक ठिकाणी जाऊन सर्वेक्षण करणार आहोत अनधिृत नळ कनेक्शन शोध मोहिम कार्यवाही झाली. तरी २-३ कोटी रुपये मिळू शकतील परंतु जी तुट या योजनेत येत आहे ती मोठी आहे.

श्री. राजु शिंदे : कर्मशियल मध्ये ३-४ हजार नळ कनेक्शन इललिगल असतील शहरात हॉटेल, दवाखाने किती आहे याचा रेकॉर्ड महापालिकेकडे बरोबर नाही. म्हणून जी माहिती दिली ती चुकीची आहे. जी वीज घेतली जाते ती कृषी दराने आकारली पाहिजे. या विजेचा ग्रामीण भागात आपण वापर करतो. म्हणून व्यावसायिक दर वीज मंडळास आकारू देऊ नये. कृषी दराने वीज आकरावी या मागणीसाठी प्रशासनाने आतापर्यंत काय प्रयत्न केलेले आहे. एम.एस.ई.बी. ही सुध्दा एक व्यावसायिक संस्था आहे. एम.एस.ई.बी. चे १०७ कोटी रुपये महापालिकेवर आहे वेळोवेळी बील भरण्याची धमकी देत असतील तर या शहरात येणाऱ्या मालावर जसा जकात आकारला जाता त्याप्रमाणे येणारी वीज यावर सुध्दा जकात आकारणी करावी. नाक्यावर नळ मिटर बसवावे. त्यावरून जकात आकारणी करता येईल. तसेच शहरात ज्या ठिकाणी एम.एस.ई.बी. चे पोल आहेत त्यावर टॅक्स आकरावा पाणीपट्टीत वाढ करू नये. पाणीपट्टी बिलात ३-४ भाग करून जनतेकडून पाणीपट्टी भरणा करून घेण्यात यावी. एकदम सर्व पाणीपट्टीची मागणी करू नये. सिडको-हडको भागात एक दिवसाआड पाणी दिले जाते. पाणी नसतांना नळ कट करणे योग्य होणार नाही. एक्सप्रेस लाईनचे काम चालू आहे. ते काम पूर्ण झाल्यावर नळ कट करण्याची व दरवाढ करण्याचा विचार व्हावा तोपर्यंत रु. १२००/- पाणीपट्टी राहू द्यावी. व्यावसायिकाचे नळ कट करावे. तसेच विजेवर जकात आकारावी.

श्री. सुनिल मगरे : महाराष्ट्रात हे एकमेव शहर असे आहे की, दररोज पाणी सोडले जाते. परंतु इतर शहराचा आढावा घेतल्यास हे लक्षात येईल की, ४,५,६,८ दिवसातून एकदाच पाणी दिले जाते स. सदस्य श्री. शिदे यांनी योग्य सूचना मांडली या शहरात व्यावसायिक नळाची संख्या जास्त असू शकते ते शोधण्याची गरज आहे. एका भागात किमान ४०० इलनिगल नळ असून

शकतात. ही शोध मोहिम सुरू केल्यास पाणीपट्टी वसुलीत निश्चितपणे वाढ होईल. १४६ कोटीचा अर्थसंकल्प दिला वेगवेगळ्या बाबतीत दिला. मा. सभापती स्थायी समितीने जी पाणीपट्टी थोड्या फार प्रमाणात वाढ केली ती योग्य आहे. किमान ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालावी यासाठी तुट कमी होण्यास मदत होईल. सभागृहाने यावर सविस्तर चर्चा करून निर्णय घ्यावा.

डॉ. भागवत कराड : या शहराची लोकसंख्या जवळपास १२ लक्ष आहे. शहरासाठी १३० एम.एल.डी. पाण्याची आवश्यकता आहे. परंतु शहरात काही भागात पाणी दिले जाते तर काही भागात पाणीच दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. पाण्याची कुठे गळती आहे का त्याचा शोध घेण्याची आवश्यकात आहे. अनधिकृत असतील त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. एका नळाला जवळपास ३०००-३२०० रु. खर्च प्रशासनास लागतो. वसुली १२ कोटीची होते. जवळपास २० कोटी रु तोटा सहन करावा लागतो. होणारी तुट जास्त प्रमाणात न होण्यासाठी काही ना काही प्रमाणात पाणीपट्टी वाढविण्यासाची आवश्यकता आहे. तरच या शहरातील इतर कामे करता येतील. स्थायी समितीने जी दरवाढ केली त्याचा हि विचार व्हावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : हे शहर झपाट्याने वाढत आहे. जवळपास १०-१२ लक्ष लोकसंख्या झालेली आहे. तुट भरून काढण्यासाठी स्थायी सिमतीने काही प्रमाणात वाढ दर्शविली या शहरात १३० एम.एल.डी पाणी येते. प्रत्येक व्यक्तिला १३० लिटर पाणी मिळकत का? झोन क्र. ७ ला सिडकोसाठी २०-२२ एम.एल.डी पाण्याची नोंद आहे. उर्वरित पाणी एम.आय.डी.सी. छावणी, जुने शहर यांना दिले जाते. सिडको-हडकोला एक दिवसाआड पाणी दिले जाते. काही वेळेस ०३ दिवसाला सुध्दा पाणी येते. असा प्रकार होत असतांना त्यात सुसुत्रता आणण्याचे सध्या गरजेचे आहे. दरवाढ करण्याची नव्हे. १३० एम.एल.डी पाण्यातून ७-८ एम.एल.डी पाणी येतांना एम.आय.डी.सी. ला दिल जाते. उर्वरित शहरासाठी फक्त १२० एम.एल.डी. पाणी येते. सिडको हडको भागास २०-२२ एम.एल.डी. पाणी देण्यास उर्वरित पाणी जाते कुठे याचा शोध घेण्याची नियोजन बध्द ही योजना राबवण्याची गरज आहे. एकीकडे पाणी द्यायचे नाही व दुसरे महापालिकेचे हित जोपासण्यासाठी दरवाढ करायची हे कितपत योग्य आहे. महापालिकेचे हित जोपासण्या ऐवजी अगोदर जनतेचे हित जोपासावे नंतर पाणीपट्टी वाढीवर विचार करावा. शहरात येणारे पाणी किती सिडको-हडको साठी किती जुन्या शहरासाठी किती दिले जाते याचे ऑडिट होण्याची गरज आहे.

श्री. तकीहसन खॉन : प्रत्येक नळ धारकांना किमान एक ते दिड तास पाणी दिले पाहिजे. पाणीच दिले जात नसेल तर नळपट्टी वाढविणे योग्य नाही. कुणीही कर भरणार नाही. कर्मचाऱ्यांना सुध्दा त्रास होईल. गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये पाऊन इंच नळ कनेक्शन १३५२ दाखविले यावर्षीच्या बजेट मध्ये फक्त १२१० दाखविण्यात आले. संख्या वाढण्या ऐवजी घटते आहे हे सत्य आहे का? माझ्या माहितीप्रमाणे आकडेवारी चुकीचे झाले त्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. पूर्वीची पाणी पट्टीच राहू द्यावी कोणत्या प्रकारची वाढ करण्यांत येऊ नये.

कार्य. अभियंता (पा.पु.) मागील वर्षाचे फिगर माझ्याकडे नाही आकडेवारी चुक असेल तर दुरुस्त करून घेण्यात येईल.

श्री. मीर हिदायत अली : अनधिकृत नळ शोध मोहिम सुरू आहे. जे ई. कामाला लागलेले आहे. एका भागास जवळपास ६७० अनधिकृत नळ कनेक्शन निघतात असे गृहित धरण्यास जवळपास संपूर्ण शहरात ८००० हजार नळ कनेकशन निघू शकतात. अशा नळ धारकांवर ३४००/- पॅनॉल्टी लावण्यात येते. १५००० हजार नळ कनेकशन किमान या शहरात अनधिकृत असू शकतील अशी माझी खात्री आहे. यातून ७-८ कोटी वसूल होतील पाणीपट्टी वाढविण्याची गरज नाही. अनधिकृत नळ शोधण्याचे काम तात्काळ करण्यास यांचे असे आदेश द्यावेत.

श्री. जयवंत ओक : पाणीपट्टी वाढ संदर्भात चर्चा होत आहे. सर्वांना सारखेच पाणी दिले जाणार आहे का? सर्वेक्षण करणार, अनधिकृत नळ धारकांवर कार्यवाही करणार असाल व पाणी भरपूर देत नसेल तर ही कार्यवाही करणे योग्य नाही. चांगले स्वच्छ व भरपूर पाणी देणार असेल तर यावर योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री. संजय शिरसाठ : पाणीपट्टी वाढ संदर्भात काही बोललो तर वॉर्डातील नागरिक काय म्हणतील हा दृष्टीकोन समारे ठेऊन स. सदस्य चर्चा करण्यास तयार नाही. पाणीपट्टीत वाढ केली नाही तर प्रशासन काय अडचणी येईल याचा विचार करून सभागृहाची अशी भावना झालेली ओ की, काही तरी प्रमाणात पाणीपट्टीत वाढ करावी. स्थायी समितीने सुचविलेली वर वाढ मान्य करावी व तशी मंजुरी देण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणीपट्टीत वाढ होत असेल तर अन्याय होईल. सिडको-हडको भागात २ लक्ष लोकसंख्या असलेल्या भागास २०-२२ एम.एल.डी पाणी दिले जाते. एक दिवसाआड पाणी येते ६७० नळ कनेक्शन अनधिकृत एका भागात निघतात. तर असे नळ कनेक्शन १० हजार असेल तर यातून प्रशासनास ३ कोटी रुपये प्राप्त होती. जो रेग्युलर भरतो त्यांचेवर बोजा पडणार आहे. १८०० अर्धा इंची साठी करण्यास आमचा विरोध राहिल. जनतेवर अन्याय होईल असा निर्णय घेण्यात येऊ नये.

श्री. जगदीश सिध्द : ३०० रु. वाढ करावी. यापेक्षा जास्त वाढ करू नये.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : मागील वर्षी पाणीपट्टी काहीच वाढ केलेली नव्हती. या योजनेवर मोठ्या प्रमाणात तुट निर्माण होत आहे ती काही प्रमाणात भ्ज्ञरून काढण्यासाठी व महापालिकेचे व नागरिकांचे हित लक्षात घेवून व या महापालिकेचे आपण सर्व ट्रस्टी आहोत या सभागृहाला दोन्ही बाजू सारख्याच आहे. इतर काही शहरात ८-१० दिवसाला एकदा पाणी येते. आताच काही स. सदस्यांनी एक दिवसाआड पाणी येते असा प्रश्न उपस्थिती केला. माजी महापौर श्री. विकास जैने यांचे कार्यकाळात एक्सप्रेस जल वाहिणीचा प्रस्ताव घेतला निधी उपलब्ध करून दिला सदरचे काम १ मे २००३ पर्यंत पूर्ण सुध्दा होईल. एक दिवसाआड पाणी येते ते यानंतर दररोज येईल. दरवर्षी पाणीपट्टीत काहिना काही वाढ झाली पाहिजे, स्थायी समितीने जी वाढ सुचविली ती योग्य आहे. ती मान्य करावी तर पैसा उपलब्ध होऊन होणारी तुट काही प्रमाणात भरून निघेल.

मा. महापौर : अर्धा इंच घरगुती नळासाठी १८००/- पाणीपट्टी करण्यांस मंजुरी देण्यात येते. ३०००/- रु. दंड आकारणी ऐवजी १५००/- रु. दंड आकरणी करून कनेक्शन कायम करण्यांत यावे. सिडको-हडकोतील पाणी सुरळीत करण्यांत यावे. एक्सप्रेस लाईनचे काम तात्काळ करण्यांत यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : जनतेचे सुध्दा हित लक्षात घ्यावे. पाणीच देत नसेल तर वाढ करण्यांत येऊ नये यास आमचा विरोध आहे. आपली मनमाणी खपवून घेणार नाही. सिडको-हडको भागात २-२ दिवसाआड पाणी देत आहे. यापूर्वीही एक दिवसाआड पाणी येत होते. दररोज पाणी देण्यात यावे. नंतरच दर वाढीवर विचार व्हावा असाता आमचा विरोध आहे. लोकशाहीच्या मार्गाने जनतेचा गळा घोटण्याचा प्रयत्न होत आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : सिडको-हडको भागात पाणी देण्यांत सुसूत्रता यावी म्हणून सर्व सिडको-हडको भागातील नगरसेवक यांचे सम्मतीनेच एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय बैठकीत घेतलेला होता.

(याचवेळी स. सदस्य श्री. कोकाटे हे मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन पाणीपट्टी वाढ करू नये म्हणून मोठमोठ्योन बोलून मागणी करतात.)

श्री. काशिनाथ कोकाटे : जनतेचे लक्षात घ्यावे. यापाणी पट्टीस आमचय पक्षाच्या सदस्यांचा विरोध आहे. ठेकेदारांचे हित जोपासण्यासाठी असे निर्णय घेता हे बरोबर नाही. भ्रष्टाचारास वाव देण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो.

(याचवेळी बरेच स. सदस्य विरोध नोंद करून सभागृहाबाहेर जातात.)

मा. महापौर : मुख्य एक्सप्रेस जल वाहिनी सिडको-हडको भागसाठी टाकण्यांत आली. १ मे पासून दररोज पाणी या भागात दिले जाईल. यात शंका नाही. मागील वर्षी वाढ करण्यांत आलेली नव्हती. आता दरवाढ करणे गरजेचे आहे. निर्णय घेतलेला आहे.

श्री. संजय शिरसाठ : सभागृहाच्या वतीने आपल्याला सर्व अधिकारी देण्यांत येतात. तात्काळ निर्णय घ्यावेत व सभा संपवावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : जमा बाजूवर निर्णय घ्यावेत खर्च बाजूस लेखा विभागास अधिकार द्यावे. त्याप्रमाणे कामे होतील सिध्दार्थ उद्यानात लहान मुलासांठी प्रवेश मोफत ठेवावा.

मा. महापौर : अविष्कार कॉलनी येथे एक हायमास्ट उभारण्याकरिता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता देण्यांत येते. ५ लक्षची तरतूद करण्यांतयेते. तसे महापालिकेचे गरवारे क्रीडा संकुलाचा विकास होणे आवश्यक आहे या क्रीडा संकुलनात एक जलतरण तलाव बांधण्यास २५ लक्षची तरतूद करण्यांत येते. देशाचे राष्ट्रभवन महाराणा प्रताप यांचा शहरास कुठेतरी पुतळा करून तेथे सुशोभिकरण करण्यासाठी २५ लक्षची तरतूद कररण्यांत येते. सिडको नाट्यगृहासाठी १ कोटी तरतूद करण्यांत येते.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : क्र. ११ मध्ये विकास शुल्क घेण्याबाबत प्रस्ताव आहे, की डी. एस.आर. प्रमाणे न घेता १०% वाढ करून त्याप्रमाणे घेण्यात यावे.

(याचवेळी निषेध करून गेलेले आघाडीचे सदस्य सभागृहात पुन्हा प्रवेश करतात.)

मा. महापौर : पाणीपट्टीत जी दरवाढ केली ते येणारे उत्पन्न विकास कामासाठी वळती करण्यात यावे.

श्री. संजय शिरसाठ : आपण निर्णय घेतलेला आहे. सभागृहाने संपूर्ण अधिकार दिले होते. आता सभा संपवावी लेखा विभागास संपूर्ण अधिकार प्रदान करण्यांत यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सभगृहात सर्वांचे मत जाणून घेऊनच योग्य तो निर्णय घेता येतात. नियमाने निर्णय घ्यावेत प्रत्येक मुद्द्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. पाणीपट्टीवाढीचा निर्णय घेतला तो मागे घ्यावा व १२००/- रु. पाणीपट्टी ठेवावी. वैयक्तिक काही सदस्यांच्या सुचनेवरून अधिकार देऊ शकत नाही. सभागृहाचे मत लक्षात घेऊनच अथसंकल्प मंजूर करावा. पाणीपट्टी दरवाढीस आम्ही विरोध केलेला आहे. आता इतर जमा बाबीवर चर्चा व्हावी. (मोठमोठ्याने बोलून मागणी करतात)

श्री. तकीहसन खॉन : आमचा पाणीपट्टी वाढीस विरोध आहे बजेटवर चर्चा करावी.

श्री. संजय शिरसाठ : निर्ण्य घेतलेला आहे. ज्याचाविरोध असेल तो नोंदवावा. सभा संपविण्यात यावी.

मा. महापौर : ज्यांचा पाणीपट्टी वाढीस विरोध आहे तो नोंदवावा. घेतलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. सन २००२-२००३ चा सुधारित व सन २००३-२००४ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते.

**ठराव**

**(अ) <u>जमा बाजू</u>**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतूद | सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली तरतूद | सर्वसाधारण सभेने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | जकात | ६८ कोटी | ६९ कोटी | १ कोटी |
| २ | मालमत्ता कर | २२ कोटी | २३ कोटी | १ कोटी |
| ३ | पाणीपट्टी | २६ कोटी | २७ कोटी | १ कोटी |
| ४ | पाणीपट्टी दर वाढ प्रस्ताव | | | |

प्रशासनाने पाणीपट्टी दरवाढ संदर्भात प्रस्तावित करण्यांत आलेला तक्ता अ-१, अ-२ व ब मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करून स्थायी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यांत येते.

**<u>घरगुती वापर</u>**

| अ. क्र. | तपशिल | प्रचलित दर (रु.) प्रति वर्ष | स्थायी समितीने मान्य केलेले दर (रु.) प्रति वर्ष | सर्वसाधारण सभेने मान्य केलेले दर (रु.) प्रति वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | १/२ इंच | १२०० | १८०० | १८०० |
| २ | ३/४ इंच | १९५० | २९२५ | २९२५ |
| ३ | १ इंच | ४५५० | ६८२५ | ६८२५ |
| पिण्याचे पाणी टँकरद्वारे पुरविणे | | | | |
| अ | १० हजार लि. क्षमता प्रती | | २०० | २०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टँकर | | | |
| १ | राज्य परिवहन मंडळ | ७५ | | |

५ सिध्दार्थ उद्यान व इतर उद्याने प्रवेश शुल्क व इतर दरवाढ प्रस्ताव

सध्या सिध्दार्थ उद्यानतील प्रवेशासाठी प्रौढांकरिता २.०० मध्ये रु. १.०० ची वाढ करून रु. ३.०० प्रौढांसाठी प्रवेश शुल्क आकारण्यात यावा तसेच लहान मुलींना पूर्वीप्रमाणे मोफत प्रवेश देण्यांत यावा. तसेच प्राणी संग्रहालयाचे शुल्क व सिध्दार्थ उद्यान प्रवेश शुल्क हे पूर्वी प्रमाणेच वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात यावे.

६ पशु संवर्धन विभागाशी संबंधित दर वाढ प्रस्ताव

स्थायी समिती सभेने पशु संवर्धन विभागाशी संबंधित सादर केलेल्या दरवाढ प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

७ रोड कटींग चार्जेस वसुली बाबत प्रस्ताव :

महाराष्ट्र शासनाने आदेश क्र. जमीन १०/२०००/पीआएकेआरए-९१/जे-१ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २७ एप्रिल २००२ नुसार आदेशित केल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील खोंदकाम व टेलीफोन लाईनच्या कामाकरिता व शहरातल इतर बाबींकरिता ही याचा नवीन दराने स्थायी सिमतीने प्रस्तावित केल्याप्रमाणे दरास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

८ विकास शुल्क निधी वसुल बाबत प्रस्ताव :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दित प्रशासनामार्फत करण्यात येणारी नवीन रस्ते, नवीन इमारती, नवीन गार्डन जलनि:सारण व पाणी पुरवठा वाहिण्यांची कामे विकासात्क कामे हे महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. दरानुसार करण्यात येतात, तथापि महानगरपालिका विकास खर्च (BETTERMENT CHARGES) महाराष्ट्र शासनाच्या डि.एस. आर. दरानुसार करत नाही. ज्यामुळे महानगरपालिकेस विकास कामावर प्राप्त निधी पेक्षा अतिरिक्त खर्च करावा लागतो. करिता सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून विकास खर्च हे महाराष्ट्र शासनाच्या डि.एस.आर. नुसारच वसूल करण्यात यावे. जेणे करून महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडून शहर विकासाची कामे होण्यास मदत होईल करिता विकास खर्च (BETTERMENT CHARGES) महाराष्ट्र शासनाच्या डि.एस. आर. दराने वसूल करणे बाबतच्या स्थायी समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावावर या बैठकीत सर्वकष चर्चा होऊन सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून विकास खर्च (BETTERMENT CHARGES) रु. १४०/- प्रती चौरस मिटर दराने वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

९ **<u>प्रसुती शुल्क व बाह्या नोंदणी प्रस्ताव :</u>**

आरोग्य विभागसंबंधी प्रशासनाने प्रस्तावित दर वाढीस खालील प्रमाणे बदल करून उर्वरित प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| सेवा / सुविधा | प्रचलित दर (रु.) प्रति वर्ष | स्थायी समितीने मान्य केलेले दर (रु.) प्रति वर्ष | सर्वसाधारण सभेने मान्य केलेले दर (रु.) प्रति वर्ष |
|---|---|---|---|
| बाळांतपणे | | | |
| पहिले | ५० | ५० | ५० |
| दुसरे | ५० | १०० | १०० |
| तिसरे व तिसऱ्यानंतर | ५० | ५०० | ५०० |

**१० विना परवानगी जाहिरात फलक व रस्तयावर कमानी उभारणीस दंड आकारणी**

प्रशासनाने उपरोक्त विनापरवानगी जाहिरात फलक व रस्त्यावर कमानी उभारणी दंड आरणीच्या स्थायी समितीने सादर केलेल्या प्रस्तावास रस्ता खोदण्याचे नियमित शुल्क वसूल करून दंड आकारणीस मान्यता देण्यात येते.

**११ उघड्यावर घाण टाकणे, शौचास बसणे यावर दंड आकरणी करणे :**

शहराची स्वच्छता राखण्याकरिता उघड्यावर शौचास बसविणे यावर प्रतिबंध घालण्याकरिता संबंधिताकडून पुढीलप्रमाणे दंड आकारणी करण्यांत येत होती. तथापि उघड्यावर शौचास बसणे, केर कचारांकुडीत न टाकणे इत्यादी बाबींकरिता प्रस्तावित दंडाच्या रक्कमेत वाढ करण्यांत येत आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी विभागीय कार्यालयामार्फत करण्यांत येईल असे झाल्यास या गोष्टीनां आळा बसून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होईल व शहर स्वच्छ राहण्यास हातभार लागेल. प्रस्तुत दंड वाढीपासून प्रशासनाचा मानस उत्पन्न मिळविण्याचा नसून नागकरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण करण्याचा आहे. अस्वच्छता केली तर दंड होऊ शकतो हि मानसिकता रुजविण्याचा प्रशासनाचा प्रस्तावित दंड वाढीचा प्रस्तावास स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**१२ खाजगीकरणाच्या माध्यमातून साफसफाई :**

प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या खाजगीकरणाच्या माध्यमातून विभाग क्र. ३ व ६ अंतर्गत होणाऱ्या साफसफाईचे काम प्रायोगिक तत्वावर देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने रद्द केला होता तथापि सर्वसाधारणसभेत चर्चा होऊन सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात प्रायोगिक तत्वावर विभाग क्र. २ व ३ अंतर्गत होणाऱ्या साफसफाईचे काम खाजगीकरणाच्या माध्यमातून करण्याचा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

**१३ जकात कर वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करणे :**

जकात कर वसुली खाजगी अभिकर्त्यांमार्फत करणे बाबत यापूर्वीच मा. सर्वसाधारण सभेने ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार प्रशासनाने या आर्थिक वर्षात माहे जुलै २००३ ते जून २००४ या कालावधीकरिता जकातीची वसूली खाजगी अभिकर्त्यामार्फत करणे बाबतची कार्यवाही त्वरित सुरू करावी.

(ब) **खर्च बाजू**

सन २००३-२००४ च्या अर्थ संकल्पाच्या जमा रक्कमेतून आवश्यक खर्च वजा जाता उर्वरित रक्कमेतून शहरातील विविध विकासाची कामे करण्यासाठी सव्र संबंधित विभागांची स्पिल ओव्हर रक्कमेसह ४३.६८ कोटीची मागणी होती, परंतु जमा बाजूचा विचार करता सर्व संबंधित विभागांना स्थायी समितीने ४१.५८ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद उपलब्ध करून दिली होती. या सर्व बाबींचा बैठकीत विचार विनिमय करून सर्वसाधारण सभेने काही कामात कपात व नवीन शहर विकासाची कामे असे एकूण रु. ३.०० कोटीची निव्वळ वाढ करून रु. ४७.७७ कोटीच्या कामास मान्यता प्रदान केली. तथापि जमा बाजूचा विचार करता रु. ४४.५८ कोटीची लेखाशिर्ष निहाय तरतूद उपलब्ध करून देण्यांत आली आहे, याची सविस्तर माहिती व गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**(आकडे हाजारात)**

| अ. क्र. | विभाग | सुधारित तरतूद | २००३-०४ स्पीक ओव्हर रक्कम | विभागाची मागणी व सर्वसाधारण सभेने केलेली दुरुस्ती | एकूण (४+५) | सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शहर अभियंता | ६७४७५ | १९१६० | ९६८४९ | ११६००९ | १०७५०० |
| २ | अति. शहर अभियंता | ६०५०० | ८२३० | १३८७७५ | १४७००५ | १३३५०० |
| ३ | कार्य. अभियंता (पा.पु.) | ५४१२० | २११०७ | ८३३७४ | १०४४८१ | १०२१५० |
| ४ | कार्य. अभियंता (जल. नि. व विद्युत) | ४७३०० | ३३५९० | ७६६४१ | ११०२३१ | १०२६०० |
| | एकूण | २२९३९५ | ८२०८७ | ३९५६३९ | ४७७७२६ | ४४५७५० |

उपरोक्त नुसार फेरफार व दुरुस्त्या करून स्थायी समितीने शिफारस करून सर्वसाधारण सभेपुढे सादर केलेले सन २००२-२००३ चे सुधारित व २००३-२००४ चे मुळ अंदाजपत्रकावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष व काम निहाय काम व रक्कमेत बदल फरेफार व सोबतच्या प्रमाणे दुरुस्त्या करून सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रक जमा रुपये १०८ कोटी ०४ लाख ४० हजार व खर्च रुपये १०७ कोटी ८७ लाख ०५ हजार व रुपये १७.३५ लाख शिलकी.

सन २००३-२००४ चे मुळ अंदाजपत्रक जमा रुपये १४९ कोटी ४३ लाख ५० हजार व खर्च रुपये १४९ कोटी १५ लाख १० हजार व रुपये २८. ४० शिलकी

रक्कमेच्या अर्थसंकल्पास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यतायेते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९-०४-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार, दिनांक १९ एप्रिल २००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०५ वा. "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स. श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स. श्रीमती इंगळे शंकुतला सांडुजी
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१०) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
११) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१२) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१४) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१५) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१६) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१७) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१८) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
१९) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२०) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२१) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२२) स.स.श्री. नजर हमीद अ. गफूर
२३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२४) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२५) स.स.डॉ. कराड भागवत किसनराव
२६) स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव
२७) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
२८) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
२९) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
३०) स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसाहक
३१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३२) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३३) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव

३४) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३५) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३६) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३७) स.स.श्री. सोपान भाऊराव पारे
३८) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
३९) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
४०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४१) स.स.श्री. नासेरखान अब्दुल रहेमान खान कुरैशी
४२) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
४४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४६) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
४७) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
४८) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
४९) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५०) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
५१) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५२) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
५३) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५४) स.स.सौ. बबिता सुभाष कागडा
५५) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
५६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
५७) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
३) स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन
५) स.स.सौ. सलमा बानो मीर महमंद अली.

**संवाद :**

मा. महापौरः विषय पत्रिकेवर प्रथमतः चर्चा करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : मागील सभाचे इतिवृत्त देण्यात आले नाही. का देण्यांत आले नाही. खुलासा करण्यात यावा.

श्री. अविनाश कुमावत : इतिवृत्त तयार करण्यासाठी नगरसचिव यांचेकडे कर्मचारी नसतील तर देण्यात यावे. कर्मचारी आवश्यक आहे. म्हणून सचिव यांनी तशी मागणी प्रशासनाकडे केलेली आहे का?

श्री. तकीहसन खॉन सभा संपन्न झाल्यानंतर मागील सभांचे इतिवृत्त पुढील सभेच्या वेळी कायम करण्यासाठी देण्यात आले पाहिजे. असे नियमात आहे. सचिव यांनी नियम वाचून दाखववावा.

नगरसचिव : गेल्या फेब्रुवारी, मार्च महिन्यात एकूण विशेष सर्वसाधारण सभेसह ०६ सभा झालेल्या आहे. स्थायी समितीच्या ०७ सभा तर महिला व बाल कल्याण समित्यांचे ०२ सभा तसेच विशेष समितत्यांचे हि सभा झालेल्या आहे. या सर्व सभाचें इतिवृत्त तयार करण्यासाठी एक दैनिक वेतन लघुटंकलेखक कार्यरत आहे या विभागात कार्यालयीन अधिक्षक, वरिष्ठ लिपीक हि पदे रिक्त आहे. जेवढे इतिवृत्त तयार झाले, तेव्हढे देण्यात आलेले आहे. शिवाय मी ३ महिने रजेवर हि होतो. विषय क्र. १ मध्ये २५-०५-२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यासाठी दिलेले आहे. उर्वरित इतिवृत्त पुढील सभेच्या वेळा कायम करण्यास देण्यात येतील. जो नियम स. सदस्यांनीसुचविला त्यात सभेपुढे अनुक्रमांक कसा लावावा हे दिले. त्यात सुरुवातीस इतिवत्त दिले. त्यानंतर सर्व निवडणूका, सर्व नेमणूका, प्रश्नोत्तरे, अर्ज, स्थायी समिती व विशेष समित्यांचे ठराव, शिक्षण मंडळाचे पत्र, महापालिका आयुक्त याची पत्रे, शासनाकडून आलेली पत्रे, उप समित्यांचे निवेदन, प्रस्तावाच्या सूचनास, संर्कीण असे विषय पत्रिकेत अनुक्रमे ठेवण्यात यावे असे दिले. इतिवृत्त दिले नाही तर सभा होत नाही असे नियमात आढळून येत नाही.

श्री. अविनाश कुमावत : नगर सचिव यांनी एक स्टेनोची, एक कार्यालयीन अधिक्षक तसेच एक क. लिपीक यांची मागणी केलेली आहे. हा स्टाफ त्यांना देण्यांत यावा.

नगरसचिव : कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. म्हणून वेळोवेळी मागणी करूनही देण्यात आले नाही. इतिवृत्त लिहिण्यासाठी एक स्टेनोची आवश्यकता आहे. सध्या एकच दै. वेतनावरील लघुटंकलेखक कर्मचाऱ्यांकडून इतिवृत्त तयार करून घेतले जाते. इतिवृत्तांताच्या संदर्भात स्थायी समितीच्या सभेत सुध्दा चर्चा झ ाालेली होती. व कर्मचारी देण्यात येतील असे त्यावेळीही सांगण्यात आले होते.

डॉ. भागवत कराड : मागील सभाचे इतिवृत्त न देता कामकाज करणे योग्य नाही. सचिव यांना कर्मचारी वर्ग देणे आवश्यक आहे या विभागाचे खरोखरच आजच्या परिस्थितीत काम वाढलेले आहे.

प्र. उपआयुक्त (प्र.) : नगर सचिव यांनी कर्मचारी देण्याबाबत प्रशासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे. तुर्त त्यांचे विभागामध्ये १-२ दिवसात एक कार्यालयीन अधिक्षक देऊन त्यांचे विभागात कार्यरत एक लघुटंकलेखक कर्मचारी यांचे कडील कार्यालयीन अधिक्षकांचे काम कार्यालयीन अधिक्षक करतील व जे लघुटंकलेखक श्री. मुळे आहेत त्यांचेकडून स्टेनोचे काम इतिवृत्त नोंद करून इतिवृततांत लिहून घेण्याचे काम करून घेतले जाईल, इतर कर्मचारी सुध्दा आवश्यकतेनुसार लवकरच देण्यात येईल.

श्री. अविनाश कुमावत : मिनीट्स तयार होऊ शकत नाही, तर प्रशासन नागरिकांची विकास कामे करू शकेल काय?

श्री. प्रशांत देसरडा : आजच्या आज सचिव यांना एक स्टेनोग्राफर इतिवृत्त लिहिण्यासाठी देण्यांत यावे. सर्वच सभांचे इतिवृत्त एक स्टेनो तयार करू शकत नाही. या विभागात कामे वाढलेले आहेत. नवीन समित्यांची स्थापना झालेली आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : आताच सचिव यांनी सांगितले इतिवृत्त नोंद करून ते लिहून देण्यासठी एकच दै. वेतन लघुटंकलेखक आहे. या विभागात कामाचा व्याप वाढलेला आहे. एकाच कर्मचाऱ्यांकडून इतिवृत्त तयार करून घेणे बरोबर नाही. सभेचे काम चालवायचे असेल तर मागील सर्वच सभांचे इतिवृत्त देणे आवश्यक आहे. तात्काळ उपआयुक्त (प्र.) यांनी सचिव यांना लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा. पुढील बैठकीत या विषयावर चर्चा होऊ नये. कामास सुसुत्रता कशी येईल यासाठी ठोस निर्णय घ्यावा.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : सचिव यांना तात्काळ कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देता येईल का, याबाबत मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सचिव विभागसाठी काम करण्यास कर्मचारी वर्ग कमी आहे. मुद्दा उपस्थित झाला. सचिव विभाग किंवा इतर कोणत्याही विभागात जास्तीचे काम असले तर इतर दुसरे कर्मचारी लाऊन ते काम करून घेऊ शकता या मतांचा मी आहे. इतिवृतत तयार करून देणे ही या विभागाची कायदेशीर जबाबदारी आहे. कर्मचारी नव्हते तर इतर कर्मचारी घेऊन त्या कर्मचाऱ्यांकडून हे इतिवृत्त तयार करून घेण्याचा पाठपुरावा करावयास पाहिजे होता. फक्त चर्चा काय झाली ते स्टेनो नोंद करावी लागते. नगर सचिव दिर्घ सुट्टीवर होते, असे असले तरी. त्यांची गैरसोय झाली ती दूर करून देण्यांत येईल.

सौ. जयश्री कुलकर्णी : पाणीपट्टीवरील थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अद्याप कार्यवाही होत नाही. जनता पाणीपट्टी भरण्यास तयार नाही.

मा. महापौर : चर्चेसाठी वेळ देण्यांत येईल. विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र. ५९/१ :**

दिनांक २५-०२-२००३ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. महापौर : विषय क्र. १ इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ५९/१ :**

दिनांक २५-०२-२००३ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६०/२ :**

माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती दिनांक १६-१०-२००२ चे विषय क्र. ४ अन्वये खालील प्रस्ताव मंजूर केलेला आहे. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

नवीन प्रभागात मनपाच्या शाळा नाहीत अशा ठिकाणी शाळा उघडपणे गरजेचे आहे. त्यामुळे गरीब मुलांची सोय होईल.

(१) हमालवाडी (२) मिसारवाडी (३) जाधवाडी (४) रमानगर (५) चिश्तियॉ कॉलनी (६) सिडको एन-११ मुझफ्फरनगर, (७) भारतनगर (गारखेडा परिसर) (८) जयभवानीनगर (९) इंदिरानगर (उत्तर) (१०) विष्णूनगर.

उपरोक्त ठिकाणी आणि रहेमानीया कॉलनी येथे शाळा उघडणे बाबतचा प्रस्ता मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : वेगवेगळ्या वॉर्डातील शाळेचा प्रस्ताव आहे. यापूर्वीही असे बरेच प्रस्ताव आले. परंतु प्रशासनातर्फे कुठेही शाळा चालू करण्यात आलेली नाही. माझ्या वॉर्डात बालवाडी व प्राथमिक शाळा मंजूर केलेली होती. जागा हस्तगत केली. इमारत बांधली पत्र दिले तरी सुध्दा शाळा सुरू झालेली नाही. म्हणून या प्रस्तावा सोबत त्याही प्रस्तावाची अगोदर अंमलबजावणी करावी.

श्री. तकीहसन खॉन : आपल्याकडे मराठी / उर्दू दोन्ही माध्यम आहेत. गरज पडल्यास उर्दूची शाळा सुरू करण्यात येईल यात समावेश करावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : यपूर्वीही विविध भागात शाळा सुरू करण्याचे प्रस्ताव मंजूर झाले. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केलेली नाही. याचा अर्थ प्रशासनावर पदाधिकाऱ्यांचा काही अंकुश नाही. डॉ. कराड यांनी ठराव मंजूर करून घेतला. दिड वर्ष झाले त्यावर कार्यवाही झाली नाही. सूचना मांडली. अंमलबजावणी झाली नाही. दुर्दैवाची बाब आहे. आताच व्याज माफ केले त्याची अंमलबजावणी झाली नाही म्हणून मुद्दा उपस्थित झाला त्याला स्थगिती देऊन नंतर चर्चेत घेता येईल असे सांगण्यात आले. अशा प्रकारचे बरेच प्रकरणाच्या बाबतीत स्थगिती दिलल १५ दिवसात अहवाल येईल. मोबाईल टॉवर्स तसेच बन्सीलाल नगर भूखंडाच्या बाबतीत १५ दिवसात अहवाल येईल असे सांगण्यात आले होते. अहवाल मागविता जातो परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. वर असे प्रस्ताव ठेवून मंजूर केल्यानंतर त्याची अंमलबजावणी होणार आहे का? म्हणून हे ठराव मंजूर करण्यापेक्षा या पूर्वीचे पास झालेल्या ठरावावर प्रशासन का अंमलबजावणी करू शकले नाही. खुलासा व्हावा. अनेक ठिकाणी महापालिकेच्या इमारती बांधून तयार आहे. दरवाजे खिडक्या तुटलेल्या दिसून येतील. इमारती बांधून महापालिकेचे नुकसान करू नये.

श्री. जयवंत ओक : ज्या शाळा सध्या चालू आहे शिक्षक वर्ग कमी आहे, नवीन शाळा उभारण्याचा प्रस्ताव येतो तो बरोबर नाही. ज्या पूर्वीच्या शाळा आहे, त्या दुरुस्तीला आहे, दुरुस्ती करून घ्यावी.

श्री. मधूकर सावंत : रमानगर भागात एक प्राथमिक शाळा चालू करण्याचा प्रस्ताव पास झाला. आजही शाळा सुरू नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव आल्यास त्या ठिकाणी शळा झालीच पाहिजे. पूर्वीचे प्रस्ताव व या प्रस्तावानुसार शाळा सुरू कराण्यात, माझ्या वॉर्डात एकही महापालिकेची शाळा नाही.

श्री. जयवंत ओक : शाळा उघडण्याचा प्रस्ताव येतो. ज्या अस्तित्वात आहे, त्या शाळेची परिस्थिती काय आहे. त्या शाळेत शिक्षक वर्ग कार्यरत आहेत का? शिक्षक मुलांना शिकवितात की नाही. झोपडपट्टीत शाळेची खरोखरच गरज आहे

का? गरीब मुलांना शिक्षण बरोबर दिले जाते का? महानगरपालिकेच्या शाळेचा रिझल्ट का चांगला नाही. शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो शासन अनुदान देते. पूर्वीचेच प्रस्तावानुसार इमारती उभ्या आहे. त्याच शाळा सुरू नाही. नवीन शाळेचा प्रस्ताव आणण्याची आवश्यकता का? कार्यरत ज्या शाळा आहेत तेथे बाकडे नाहीत, पट्ट्या नाहीत. शिक्षक वर्ग कमी आहे, अशा ठिकाणी लक्ष देणार आहेत की नाही त्याचा खुलासा द्यावा. नवीन इमारत, नवीन शिक्षक याचा अर्थ महापालिकेस भुर्दंड पडण्याचा हा विषय आहे. असे वाटते. जी मुले शिक्षण घेतात त्यांची परिस्थिती काय आहे. मा. सभापती यांनी शाळेला व्हिजीट दिली तर शिक्षक मुलांना शिकवित नव्हते, शिक्षक जागेवर नव्हते. अशा प्रकारचे मित्र महापालिकेच्या शाळेत सध्या आहे. म्हणून नवीन इमारत नवीन शाळा उघडण्याचा प्रस्तावास माझा विरोध आहे. पूर्वीच्या शाळेकडे लक्ष द्यावे. शाळा बंद कराव्या असे माझे मत आहे. व ज्या संस्था महापालिकेच्या शाळा चालवण्यास तयार असतील गरीब मुलांना चांगले शिक्षण देत असतील तर त्या इमारती संस्थेला हस्तांतर कराव्या. शहरात ५२ स्लम भाग आहे. येथे शाळेला प्राधान्य द्यावे. शाळा उघडतांना आवश्यक तेथेच शाळा द्याव्यात. नुसत्या इमारती बांधून उपयोग नाही तर शाळा सुरू कराव्या, परंतु शिक्षकांनी सुध्दा मुलांना शिकविले पाहिजे. शिक्षकांना काही येत नाही. त्यांनाच प्रशिक्षण देण्याची गरज आहे. अशीच वस्तुस्थिती आहे. जे शिकवीत नाही, त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. खाजगी शाळांचे रिझल्ट का चांगले असतात. पूर्वीच्या ज्या शाळा आहे, तेथे शिक्षक तेच शिक्षक त्यांचा शाळांचा दर्जा कसा सुधारेल यासाठी प्रयत्न करावे, शिक्षण विभाग बळकट कसे होईल याकडे लक्ष द्यावे. चिपळुनकरांना बोलवा, तज्ञांना बोलवावे.

श्री. भरत लकडे : ज्या शाळा चालू आहे त्या शाळेस मुलांची संख्या प्रमाणकानुसार आहेत का? शाळेत शिक्षक व मुलांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत का?

सौ. निखत परविन : सन-९७ मध्ये महापालिकेच्या शाळेसाठी फर्निचर खेरदी करण्यांत आले होते. १ वर्षात शिक्षण समितीची १ बैठक झाली शाळेतील मुलांना बसण्यासाठी पट्ट्या नाहीत. म्हणून प्रश्न केला होता. पट्ट्या खराब आल्या त्या परत करून दुसऱ्या घेण्याची कार्यवाही चालू आहे. अशी उत्तरे मिळाली. अधिकारी यांना वेळोवेळी शिक्षकांच्या बाबीतत प्रश्न केले परंतु योग्य खुलासा मिळू शकला नाही. महापालिकेच्या शिक्षकांना कोणतेही खास असे प्रशिक्षण दिले जात नाही. ज्या पध्दतीने इतर खाजगी शाळेत शिक्षण दिले जात. तस महापालिकेच्या शाळेतील मुलांना दिले जात नाही. काहीही विचारले असता होय म्हटले जाते. परंतु अंमलबजावणी होत नाही. पुस्तके दिली वर्षातील ०६ महिने निघून गेली तेंव्हा दिले काही मुलांना दिले तर काही मुलांना मिळालेच नाही, मुलांसाठी व्यायाम शाळा नाही. शाळेला व्हिजीट देऊ म्हटले होय म्हणून सांगण्यात आले. उद्याच शिक्षणाधिकारी यांनी व्हिजीट देण्यांबाबत मुद्दा उपस्थित केला नाही. मुलावर शिक्षण संस्कार करतात ते उपयोगी पडत नसल्याचे चित्र दिसते.

श्रीमती शाहीन जफर : शिक्षण समितीची आतापर्यंत एक बैठक झाली. फर्निचर किती मागविले माहिती मागविली उत्तर दिले नाही. महापालिकेनी ०५ लक्ष रुपये खर्चून पुस्ताकासाठी महापालिकेने इमारत बांधली. यातून फक्त १,२,४

थीच्या वर्गातीलच मुलांना पुस्तके देण्यात आली. हे मुले इतर शाळेत जाऊन फीस भरून शिक्षण घेऊ शकणार नाही तर पूर्ण सिलॅबस कसे खरेदी करणार. बैठक घेऊन सर्व प्रश्न निकाली लागले असते. शाळेत मुलांना बासण्यासाठी पट्ट्या नाही, मुलांना पिण्यासाठी पाणी नाही. तात्पुरती व्यवस्था म्हणून शाळेत पाणी ठेवण्यासाठी बकेट दिली. त्यात धुळ जाते मुलांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. मुलांना बसण्यासाठी पट्ट्या नाही. युनीफॉर्म दिले नाही. कमी जास्त मापाचे होतात. उपयोगात येणार नाही. या सर्व प्रश्नांवर अगोदर खुलासा व्हावा.

श्री. भगवान रगडे : आताच शाळेच्या नवीन इमारती बाबत व जुन्या शाळेच्या परिस्थिती बाबत सविस्तर चर्चा स. सदस्यांनी केलेली आहे. मी दलित वस्तीत राहणारा व्यक्ती असून माझी मुले महानगरपालिकेच्या शाळेतच शिकतात. महापालिकेने नुसत्या मोठमोठ्या शाळेसाठी इमारती बांधून ठेवल्या. त्या शाळा सुरू झाल्या. काही शाळेसाठीच्या इामरती पूर्ण असून शाळा सुरू नाही. ज्या शाळा चालू आहे त्यात गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात. परंतु जो शिक्षणाचा दर्जा असावयास पाहिजे. तो महानगरपालिकेच्या शाळेत नाही. व त्याकडे प्रशासन व शिक्षणाधिकारी खऱ्या अर्थाने लक्ष देत नाही. वर्ग-७वी पर्यंत असून तेथे ३ शिक्षक शिकवितात. ५-६ वर्षापासून हीच परिस्थिती आहे. काही शाळेत मुख्याध्यापक नाही. माझ्या वॉर्डातील शाळेत मालोदेबाई यांना मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कारभार ५-६ वर्षापासून दिलेला आहे. खाजगी शाळा चांगल्या दर्जाच्या आहेत. तेथे डोनेशन द्यावे लागते, म्हणून लक्ष जात असावे. परंतु महापालिकेच्या शाळेस मजूर लोकांची / गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात. तेही शिक्षण त्यांना बरोबर दिले जात नाही. महापालिकेच्या शाळा ४-५ तासच चालतात. सकाळी ८ ते १२ या वेळातच शाळा आहे. शिक्षक वर्ग ०१ तास वृत्तपत्र वाचतात. एक तास इतर कामात, २ तास मुलांना शिकवितात. हि परिस्थिती बदलली गेली पाहिजे. याकडे सर्व पदाधिकारी मा. आयुकत, उपआयुक्त यांनी लक्ष देण्याची गरज आहे. सर्व शाळेला भेटी दिल्या पाहिजे. परिस्थिती जाणून घेतली पाहिजे. नारेगावच्या शाळेत मुलांना बसण्यासाठी व्यवस्था नाही, झाडाखाली मुले बसतात. या शाळेची शिक्षण पध्दती सुधारली पाहिजे. मिसारवाडीतही गोरगरीबच लोक राहतात. तेथे सुध्दा शाळेची अत्यंत आवश्यकता आहे.

श्री. सुनिल मगरे : नवीन शाळा उघडण्याचा प्रस्ताव आलेला आहे. परंतु ज्या सद्यस्थितीती शाळा चालविल्या जातात त्या शाळांची परिस्थिती काय आहे. याचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहेत. मनपाच्या शाळेची परिस्थिती बघितली तर असे वाटते की, उद्याच्या नागरिकांचे घडविण्याऐवजी त्यांचे जीवन एक प्रकारे उदध्वस्त करीत आहेत. ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्या ते शिक्षक म्हणून पात्र आहेत का? ९०% शिक्षण अधिकारी / कर्मचारी यांचे नातेवाईक आहे. अशी माझी माहिती आहे. पात्र नसतांना त्या शिक्षकांच्या या मनपात नियुक्ती झालेल्या आहे. नंदनवन कॉलनी शाळेत एकूण ८ शिक्षक असून विद्यार्थी संख्या फक्त २० आहे जे वेतन हे उचित आहे का? मनपाच्या वतीने ज्या शाळा चालविल्या जातात त्यावर प्रशासनाचा कोणत्याही प्रकारचा अंकुश राहिलेला नाही. शिक्षणाधिकारी महिन्यातून किती शाळांना भेटी

देतात, किर्ती मुले शाळेत शिक्षण घेतात. किती शिक्षक वेळेवर येतात. कोणत्या पध्दतीने शिकवितात याचा आढावा घेतला जातो का? जिल्हा परिषद शाळा शहरातील अनुदानित शाळा चालविल्या जातात त्या शाळात शिक्षकांची नियुक्ती करावयाची असेल तर तासिक प्रमाणे आठवड्यातून ३२ तास घ्यावे लागते म्हणून ज्या शिक्षकांच्या अतिरिक्त नियुक्त्या केल्या त्यामुळे मनपात आर्थिक भुर्दंड आहे. अशा शाळांची तपासणी करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ज्या ज्या शाळेमध्ये जे जे विद्यार्थी प्रवेश घेतात त्याचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्या कडे आलेला पाहिजे. व ३२ तासिका उपलब्ध होत असतील तर त्या शिक्षकांना त्या शळेत ठेवले पाहिजे नसता तेथील उर्वरित शिक्षक इतर शाळेत दिले पाहिजे.

श्री. प्रशांत देसरडा : बऱ्याच स. सदस्यांनी शाळा सुरू करण्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. जिल्हाधिकारी कार्यालयात जनगणनेनंतर ज्या याद्या तयार करण्यांत आल्या त्या तीन वेळेस चुकलेल्या आहे. म्हणून महापालिकेचे प्रतिनियुक्तीवर पाठवलेले शिक्षक महापालिकेकडे परत आलेले नाही. किती शिक्षक प्रतिनियुक्तीवर, किती दिवसा पासून दिलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जास्त काम नसावे जे शिक्षक त्या कर्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या ओळखिचे आहेत. त्यांना नावानिशी मागणी करून मागवून घेतले जाते. व जिल्हाधिकारी कार्यालयातही काम व्यवस्थित करीत नाही. महानगरपालिकेमध्ये करीत नाही. हजेरी लाऊन घरी त्यांचे वैयक्तिक काम करतात. अशी माझी माहिती आहे. मध्यंतरी मा. आयुक्त यांनी त्यांचा पगार थांबविला, त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितले व त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री. चहल साहेब यांचा फोन महापौर व आयुक्तांना आला, म्हणून अशा शिक्षकांना बोलावून घेऊन पुन्हा त्यांना प्रतिनियुक्तीवर मागणी केल्यास देऊ नये. वसंतभुवन येथील शाळेत शिक्षक व मुलांची संख्या किती आहे. फकिरवाडी भागात महापालिकेची शाळा आहे, विद्यार्थी नाही म्हणून अशा जवळच्या शाळा एकत्रित करून कार्यवाही करता येत असेल व महापालिकेचा होणारा खर्च वाचविता येत असेल तर तशी कार्यवाही करावी. व अशा ठिकाणच्या शाळा बंद करता येतील का? ते पहावे.

श्री भगवान रगडे : महापालिकेच्या शाळा ४ तास चालतात जिल्हा परिषद शाळा सकाळी ०८ ते ०५ वाजेपर्यंत चालतात त्याप्रमाणे महापालिकेच्या सुध्दा चालवाव्यात १ तास मध्यंतराची सुट्टी द्यावी.

डॉ. भागवत कराड : प्रस्ताव शाळा सुरू करायच्या की नाही परंतु चर्चा शिक्षणाचा दर्जा सुधारण्या संदर्भात होत आहे. महापालिकेच्या अगोदरच्या ज्या शाळा आहे, तेथे ज्या प्राथमिक गरजा आहे. त्या पुरविल्या पाहिजे. शिक्षक दिले पाहिजे, मुख्यध्यापक दिले पाहिजे. केंद्र प्रमुख, त्यांचेवर सुपरवायझर कोण आहेत. ज्यांचेकडे ज्या-ज्या वेळेस चार्ज होता त्यावेळेस बघण्याची गरज आहे. या महापालिकेच्या सन ९५ च्या दरम्यान श्री. भोगे साहेब आयुक्त असतांना १० शाळा चांगल्या निवडल्या होत्या त्यानंतर कुणीही लक्ष दिले नाही असे वाटते. ज्या शाळा आहे तेथे लक्ष देण्याची खरोखरच गरज आहे. जो प्रस्ताव आला तो ना मंजूर करू नये. परंतु जेथे शाळा करायाची गरज आहे, तेथेच शाळा होणे आवश्यक आहे.

श्री. स. अली सलामी : महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा दिवसेंदिवस कमी होत आहे. दोन वर्षापूर्वी काही प्रमाणात चांगला होता. दोन वर्षापूवी शाळेत मुलांची संख्या चांगली होती आजच्या परिस्थित किती आहे, खुलासा द्यावा. आज जनतेची अशी भावना झाली किी, महापालिकेच्या शाळेत मुलांना टाकल्यास त्यांचे भवितव्य खराब करणे होय. मुंबई, पुणे अशा शहरात महापालिकेच्या शाळेत प्रवेश मिळत नाही. परंतु येथील शाळांकडे शिक्षक / शिक्षणाधिकारी यांचे संपूर्ण दुर्लक्ष आहे. पगारापुरता विचार केला जातो. परंतु जे शिक्षण घेतात, त्या विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्याचा विचार आपले शिक्षण विभाग करीत नाही. केंद्र शासनाने / राज्य शासनाने एक स्किम काढली किती सदस्यांना माहिती आहे. महात्मा ज्योतिबा फुले स्किम अंतर्गत हॉटेलमध्ये काम करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्या संदर्भात केंद्र शासनाची योजना आहे. कोणत्या संस्थे मार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. ते सदस्यांना अद्यापपर्यंत माहित नाही. पत्र देवून २ ते अडीच महिने झाले, अद्याप उत्तर मला प्राप्त झाले नाही. ज्यांनी अनुमती मागितली त्यांना दिले नाही. मुले शिक्षण घेत आहे. म्हणून पैशाचा वापर होत आहे. माझ्या वॉर्डातील एक मुलाला प्रशिक्षण दिले जात नाही. औरंगाबाद बाहेरील संस्थांना बीड, नांदेड, येथील संस्थाना हे काम दिले. या शहराची परिस्थिती या संस्थाना माहिती नाही. आम्हाला येऊन ट्रस्टी विचारीत होते. कोणते शिक्षक प्रशिक्षणासाठी घ्यावे लागतील ज्यांच्या त्यांच्या सेयीनुसार प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून दिले नाही. आमचे मत असे की, जी केंद्र शासनाची ही योजना आहे, ती चांगल्या पध्दतीने कार्यान्वित करावी जेणे करून गरीब मुलांना त्या संस्था मार्फत प्रशिक्षण दिले जाईल. परंतु शिक्षण विभाग कोणत्याही योजनेला योग्य पध्दतीने हाताळत नाही. तसेच महापालिकेकउे शिक्षण समिती आहे. सभापती यांनी सुध्दा यात सहभाग घेऊन शिक्षणाधिकारी यांना हाताशी घेऊन सर्व शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या पाहिजे. शाळेचा दर्जा काय जाणून घेतले पाहिजे. तसेच त्या समितीतील सदस्यांची सुध्दा तेव्हढीच जबाबदारी आहे. शिक्षक शिकवितात की नाही, तसेच बरेच शिक्षक हे घराजवळच शाळा मागतात, ते सुध्दा बंद झाले पाहिजे. प्रशासनाच्या सोयी नुसारच बदल्या कराव्यात. शिक्षकांच्या सांगण्यावरून नाही. नसता हे शिक्षक शाळेत पूर्णवेळ सेवा करीत नाही. जिल्हा- परिषदेत दुरवरच्या गांवात शिक्षक नौकरी करतात. महात्मा ज्योतिबा फुले जी स्कीम केंद्र शासनामार्फत चालू आहे. त्याची सर्व माहिती स. सदस्यांना देण्यांत यावी. शिक्षण विभागाचा प्रस्ताव आहे. शिक्षणाधिकारी उपस्थित नाही. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी सुध्दा सभागृहात उपस्थित नाही.

श्री. गणेश तांबे : नविन शाळा मंजुरी साठीचा प्रस्ताव आहे. त्यानुषंगाने शाळेचा दर्जा कसा, शिक्षण शिकवितात की नाही. विद्यार्थी संख्या आहे का? असे विविध प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केले. परंतु सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, महापालिकेच्या प्रत्येक वॉर्डात महापालिकेची शाळा बांधलेली असून मुलांची संख्या सुध्दा प्रमाणकानुसार आहे. ज्या ज्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे, तेथे शिक्षक वर्ग कमी आहे. या संदर्भात वेळोवळी प्रशासनाला कळविलेले आहे. स. सदस्य, पदाधिकारी शाळेत शिक्षक देण्याची मागणी करतात. परंतु शिक्षक दिल्या जात नाही. तसेच जे

शिक्षक शिकवितात त्यांनासोयी सुविधा शाळेत उपलब्ध करून दिल्या जात नाही. ज्या शाळेत वर्ग जास्त शिक्षक कमी अशाच शाळेतील विद्यार्थी कमजोर आहेत. पदाधिकारी यांचे मार्फत शाळेतील कार्यक्रम घेतले जातात. शिक्षकांनी चांगले काम केल्याबद्दल अभिनंदन होते. त्यानंतर लगेच १-२ महिन्याने शाळेतील शिक्षक चांगले शिकवीत नाही म्हणून ओरड होते. विद्यार्थी कमकुवत नाही. शिक्षक नसल्यामुळे शिक्षण घेण्याची क्षमता कमी होते. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होते. मी सभापती झाल्यानंतर अनेक शाळांना भेटी दिल्या विद्यार्थी चांगले असून शिक्षक हि चांगले आहे. परंतु आणखी शिक्षणाची आवश्यकता असतांना दिले जात नाही, म्हणून शाळेचा दर्जा खालावत आहे. अनेक वेळा बैठक आयोजन करता येईल. विषय यावेत म्हणून शिक्षणाधिकारी यांना सूचना दिल्या परंतु त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. हि पोकळी भरून काढण्यासाठी प्रशासनास विनंती / मागणी करतो की, ज्या शाळेवर शिक्षक कमी असतील तेथे शिक्षक देण्यांत यावे. या शाळेत गरीब /कष्टकऱ्यांची मुले शिक्षण घेतात. जाणून बुजून प्रशासन दुर्लक्ष करते. असा माझा आरोप असून मी प्रशासनाचा निषेध करतो.

श्री. माणिक साळवे : या शाळा उघडण्यासाठी शिक्षण विभागाची मान्यता आहे का? तसेच जे शिक्षक भरती या शाळेसाठी करावी लागणार त्या पदास मान्यता आहे का?

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात मुले भरपूर आहे. अद्याप पर्यंत शाळाचा नाही. शाळा असणे आवश्यक आहे. मुले सुध्दा मिळू शकतील.

सौ. सलमा बानो : जे शिक्षक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिले त्यांची नांवे वृत्तपत्रात आलेली होती. महिला व बाल कल्याण समितीच्या बैठकीत सदर शिक्षक महापालिकेकडे परत बोलविण्यात म्हणून पूर्ण नावाची यादी उपआयुक्त यांचेकडे दिली होती अद्याप कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

श्रीमती शाहीन जफर : ३६५ दिवसातून शाळेतील विद्यर्थी शिक्षक किती दिवस हजर असतात याचा सुध्दा खुलासा द्यावा. ज्या ठिकाणी शिक्षक संख्या कमी आहेत त्याशाळेत शिक्षक देण्यांत यावेत.

उपआयुक्त (प्र.) जे शिक्षक महापालिकेचे मा. जिल्हाधिकारी यांचे दिले, त्यांची नांवे वृत्तपत्रात सुध्दा आलेली होती. जिल्हाधिकारी यांची आदेशीत केल्यानुसार या शिक्षकांना प्रतिनियुक्तीवर दिले जाते. एकूण ०७ शिक्षक त्यांचेकडे दिले होते. ०४ शिक्षक आले असून तीन शिक्षक महापालिकेत हजर झालेले नाही. जे ०३ शिक्षक महापालिकेकडे पाठविण्याबाबत मा. आयुक्त यांनी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शेळके यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केली. मा. आयुक्तांचे सहीने पत्र व्यवहार करून कार्यवाही केली जाईल. शिक्षण अधिकारी यांचा फॅक्स आला आहे. त्यांनी रजा वाढविली आहे.

श्रीमती शाहीन जफर : माझ्या वॉर्डातील शाळेत दोन शिक्षकांनी आवश्यकता आहे. तात्काळ देण्यांत यावे. या संदर्भात शिक्षणाधिकारी यांना वारंवार मागणी केलेली आहे.

मा. उपमहापौर : ज्या शाळेवर शिक्षक कमी आहे, तेथे शिक्षक देता येतील का? महापालिका प्रशासन जुन्या शाळामध्ये विद्यार्थी / शिक्षक यांना सोयी सुविधा देते का? शाळेची गुणवत्ता काय याचा खुलासा करावा.

श्री. नंदकुमार फुलारी : हा विषय शिक्षण समिती मार्फत आलेला आहे का? शिक्षण समितीची सभा केंव्हा झाली. कोण सदस्य आहेत.

नगरसचिव : दिनांक १६-१०-२००२ च्या शिक्षण समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

मा. उपमहापौर : नवीन शाळांसाठी शिक्षक वर्ग आहे का? शाळासाठी जागा आहे का? जुन्या शाळामध्ये निकषानुसार शिक्षक आहे का? या सर्व बाबींचा विचार व्हावा.

डॉ. भागवत कराड : हा विषय प्रशासनामार्फत आलेला आहे. महारापालिकेच्या दर्जा कसा वाढेल यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. सुविधा दिल्या पाहिजे ज्या स्लम भागात प्रा. शाळेची गरज आहे, अशा भागात शाळा उघडणे जरुरी आहे. म्हणून ठराव मंजूर करावा व यापूर्वी जे शाळा उघडण्याबाबत प्रस्ताव झाले, त्याची सुध्दा अंमलबजावणी या प्रस्तावा बरोबरच करण्यांत यावी.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : गंभीर स्वरुपाची चर्चा या विषयावर होत असतांना बरेच सदस्य जेवण्यासाठी जात आहे. मा. महापौर निर्णय घेण्यात सक्षम आहे. ज्या महापालिकेच्या शाळा चालविल्या जातात, त्यांची दयनीय परिस्थिती झालेली आहे. हा प्रस्ताव सथगित करावा. अगोदरच्या शाळेची परिस्थिती काय आहे. याची तपासणी करण्यासठी एक समिती स्थापन करावी मा. आयुक्तांचा सुध्दा या समितीत समावेश असावा. प्रत्येक शाळेला या समितीने भेटी देऊन अहवाल तयार करावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

सौ. लिलावती घायतिलक : महापालिकेच्या शाळेत गरीब लोकांची मुले शिक्षण घेणार आहे. हा प्रस्ताव स्थगित ठेऊ नये मान्यता द्यावी. यापुढील प्रस्ताव येतांना सर्व माहितीसह सादर व्हावेत.

**ठराव क्र. ६०/२ :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ६१/३ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, दिनांक २०-१२-२००२ च्या सर्व सधारण सभेसमोर विषय क्र. १०/१/४ प्रमाणे जलस्त्रोत पुनर्भरण (Roof top rain water harvesting) विषयी प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात अला होता. सदर प्रस्तावास दिनांक २०-१२-२००२ च्या सर्व साधारण सभेत मंजुरी मिळालेली आहे. मंजूर झलेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

सदर ठरावात जे नागरिक स्वत:च्या घराच्या छतावरील पावसाचे पाणी विंधन विहिरीत किंवा विहिरीमध्ये पुनर्भरण तथा भूजल संवर्धन करण्यासाकरिता आवश्यक ती यंत्रणा उभारतील अशा नागरिकांना त्यांच्या मालमत्ता करात योग्य ती सुट देण्यांत येईल अशी मंजुरी मिळालेली आहे.

मालमत्ता करात (सामान्य करावर फक्त) किती टक्के सुट द्यावयाची? सुट मालमत्ता कराच्या चालू वर्षाच्या मागणीवर द्यायची की कसे? सुट देण्याचा कालावधी (किती वर्षापयात सुट देण्यात येईल) या बाबत निर्णय घेण्याकरिता प्रस्ताव पुनर्र विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : मालमत्ता करात किती टक्के सुट देणे योग्य होईल. प्रशासनाचे मत घ्यावे. महापालिकेचे नुकसान होणार नाही याचा ही विचार व्हावा

करमुल्य निर्धारण अधिकारी-२ : मालमत्ता मध्ये सामान्य कर ३५% असतो यावर ५% सुट करू शकतो. आणि तेही ते त्या वर्षासाठी मर्यादित असेल.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : हि योजना राबविण्यास प्रत्येक नागरिकास किती खर्च येणार आहे.

उपआयुक्त (म.) प्रत्येक घराला पुर्नभरण तथा भूजल संवर्धन करण्याकरिता १४००/- ते १५००/- रु. खर्च येणार आहे. यात ए.सी.पाईप त्यात फिल्टर बसविण्यासाठी वाळूचे व दगडाचे गोटे टाकण्यासाठी व्यवस्था करावी लागते याची बाजारामध्ये १४००-१५००/- रु. किंमत आहे.

डॉ. भागवत कराड : आशी पध्दती सुरू केल्यास महापालिकेचे नुकसान होईल असे वाटते. महापालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. नुकसान होईल हि सुट देणे बरोबर नाही यांनतर बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देतांना ही अट लागू करून त्यात सुट द्यावी.

श्री. जयवंत ओक : शासनाची हि स्कीम आहे. खरोखरच आता उन्हाळा जाणवतो. घरोघरी राबविणार आहेत. जनतेच्या हितांचे आहे. शासनाचे यास मार्गदर्शन आहे किती टक्के सुट द्यायचा तो निर्णय घ्यावा. हि योजना राबविल्यास भविष्यात ओरड होणर नाही. यात ५% सवलत द्यावी व हि योजना घरोघरी कशी राबविता येईल यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न व्हावे.

श्री. भगवान घडामोडे : प्रस्ताव जनतेच्याच हिताचा आहे. प्रसताव आणला प्रशासनाचे अभिनंदन करतो. सर्व जनतेला या योजने संदर्भात कळवावे. ५% करमध्ये सुट देण्यात यावी.

सौ. विजया रहाटकर : एक चांगल्या व महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. शहरात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई आहे. आले तेव्हढे पाणी घ्यायचे, नाही मिळाले तर ओरड करायची कशी परिस्थिती राहिलेली नाही. या प्रस्तावानुसार प्रशासनाने सुध्दा दोन पावले पुढे येऊन कार्यवाही करावी. जेणे करून ही योजना १००% राबविल्या जाईल जी नवीन घरे बांधण्यात येते, त्यांना लागू करावे. तसेच ज्यांची जुनी घरे आहे, त्यांना सुध्दा या योजनेत घेऊन मालमत्ता करात ५% सुट द्यावी. हा विषय ऐच्छिक ठेवू नये बंधनकारक करावे.

श्री. प्रशांत देसरडा : या बाबतीत जे तज्ञ व्यक्ती कुणी असतील त्यांचा सल्ला घ्यावा.

मा. महापौर : आजची सभा अर्ध्या तासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १-३० वा सभा दु. २-३० वा. पुन्हा सुरु.)

श्री. आनंद तांदुळवाडीकर : प्रशासनाचे अभिनंदन चांगल्या प्रस्ताव ठेवला. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मालमत्ता करात १ वर्षासाठी ५% सुट देण्यात यावी.

मा. महापौर : वरील प्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ६१/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झलेल्या चर्चेनुसार जे नागरिक स्वत:च्या घराच्या छतावरील पावसाचे पाणी विंधन विहिरीत किंवा विहिरीमध्ये पुर्नभरण तथा भूजल संवर्धन करण्याकरिता आवश्यकता ती यंत्रणा उभारतील अशा नागरिकांना त्यांच्या मालमत्ता कर आकरणीतील सामान्य करात एक वर्षासाठी ५% सुट देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. : ६२/४**

नगरसचिव प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २५(२) (अ अ) अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेटरवर एक वर्षाचे कालावधीसाठी साखळी पध्दतीने एक पालिका सदस्य नेमण्याची तरतूद आहे. या तरतूदीनुसार विद्यापीठाचे कुलसचिव यांचे दिनांक २०-०३-२००३ चे पत्रकानुसार औरंगाबादच महानगरपालिकेतील पालिका सदस्यांपैकी चार /पाच पालिका सदस्यांची नांव / पत्ता विद्यापीटाचे कुलसचिव यांचेकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : सिनेटवर सदस्य देण्यासठी तरतुदीनुसार ४ सदस्य पाठविण्याचा अधिकार मा. महापौरांना देत आहोत. त्यांनी नांवे द्यावीत.

डॉ. भागवत कराड : मार्केट कमिटीवर सुध्दा एक सदस्य पाठवावयास पाहिजे. ते सुध्दा आपल्या अधिकारात पाठवावे. तसेच शैक्षणिक दृष्टीकोन समोर ठेऊनच पात्रता धारक स. सदस्यांचे नांवे द्यावीत.

मा. महापौर : प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे स. सदस्यांची नांवे देण्यात येतील तसे मार्केट कमिटीवर स. सदस्यांचे नांव देण्यात येईल.

**ठराव क्र. ६२/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २५ (२) (अ अ) अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेटवर एक वर्षाचे कालावधीसाठी साखळी पध्दतीने एक पालिका सदस्यांची निवड करण्यासाठी महानगरपालिकेतील पालिका सदस्यांपैकी पाच पालिका सदस्यसांची नावाचे शिफारस करण्याचे अधिकार मा. महापौर यांना प्रदान करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच मार्केट कमिटीवरही पालिका सदस्य पाठविण्यासाठी पालिका सदस्यांचे नावाची शिफारस करण्याचे अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३/५ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सर्वसाधारण सभा दिनांक १८-१०-२००२ चे विषय क्र. ७१७/१२ अन्वये पैठणगेट येथील मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे महानगरपालिकेच्या शाळेचे बांधकाम करता यावे म्हणून १२ मीटर रुंद रस्त्याची आखणी काही हद्दिपर्यंत बदलावी लागत असल्याने महाराष्ट्र प्रा. न. र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

सदर सभेचे इतिवृत्त दिनांक १८-१२-२००२ च्या सभेत कायम करण्यासाठी ठेवण्यात आले असता इतर सर्व २४ प्रस्तावा बरोबर या प्रस्तावाचे इतिवृत्त कायम करण्यास स्थगिती दिलेली आहे. सदर प्रस्ताव दिनांक १८-१०-२००२ च्या सभेत मंजूर झालेला असल्याने त्याचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव मान्य करण्यात येतो.

**ठराव क्र. ६३/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभ दिनांक १८-१०-२००२ चे विषय क्र. ७१७/१२ चे इतिवृत्त दिनांक १८-१२-२००२ च्या सभेत कायम करण्यासाठी आले असता सदर इतिवृत्त कायम करण्यास स्थगिती दिली होती. सदर स्थगिती याद्वारे उठविण्यांत येत असून सदर इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय*

**विषय क्र. ६४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गारखेडा भागात मुख्य चौक असून या चौकास चारही बाजूंनी रस्ते येऊन मिळतात, जवाहर नगर पोलिस स्टेशन समोरील चौकास आई तुळजा भवानी चौक असे नांव देणे बाबत या विभागातील रहिवाशानी मागणी केली आहे. याच रस्त्यावर गजानन महाराज मंदिर असून मंदिरा समोरून पुढे शिवाजी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यातील या चौकास आई तुळजा भवानी चौक असे नांव दिल्यास या विभागातील रहिवाशांचे मागणीसह न्याय दिला जाईल व त्याचे श्रेय महानगरपालिकेस मिळेल, गारखेडा भागातील चौकास आई तुळजा भवानी चौक असे नांव देणे व महापालिके मार्फत या चौकात या नावाचा फलक लावणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. भरत लकडे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. राधाकृष्ण गायकवाड,
श्री. नंदकुमार फुलारी.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : या चौकास शामा प्रसाद मुखर्जी चौक असे नांव देण्यात आलेले आहे, म्हणून हा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा.

मा. महापौर : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. ६४/१ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ६५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका सभागृहात थोर हुतात्मे व राष्ट्रीय महापुरुषांची तैलचित्र बसविण्यात आलेली आहे. केंद्रीय सभागृहात तसेच राज्य विधानसभा सभागृहात स्वांतत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे पूर्णाकृती तैलचित्र सन्मानपूर्वक बसविण्यात आलेले आहे. पुढील महिन्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सावरकरांचे महत्वपूर्ण योगदान असून अन्य राष्ट्रीय महापुरुषांच्या तैलचित्रा प्रमाणेच याही क्रांती विरांचे पूर्णाकृती तैलचित महानगरपालिका मुख्य सभागृहात ठळक जागी सावरकर जयंती पूर्वी बसविणेस तसेच सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्वत सादर.

सुचक - श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
श्री. भाऊसाहेब ताठे
अनुमोदक - श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले,
श्री. नंदकुमार माधवराव फुलारी
श्री. भगवान घडामोडे, डॉ. भागवत कराड

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : अशाच प्रकारचा प्रस्ताव मा. सभापती श्री. भाऊसाहेब ताठे हे सुचक व अनुमोदक म्हणून माझे नांव व स. सदस्य श्री. घडामोडे यांचे नांव होते, परंतु प्रस्तावातील नांवे या प्रस्तावात आलेली नाही. ती नांवे सुचक व अनुमोदक म्हणून या प्रस्तवात घेण्यात यावे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : स. सदस्य डॉ. भागवत कराड, श्री. भाऊसाहेब ताठे, श्री. भगवान घडामोडे, यांचे सुचक, अनुमोदक म्हणून नांव टाकण्यांत यावे. पुढील महिण्यात २८ तारखेला स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती आहे, त्या निमित्ताने सभागृहात तैलचित्र लावण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ६५/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्य सभागृहात ठळक जागी स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर यांचे पूर्णाकृती तैलचित्र लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

नगरसचिव : ऐनवेळचे प्रस्ताव सभागृहात आलेले, ते वाचून दाखविण्यात येते.

**विषय क्र. ६६/१ :**

महानगरपालिका अस्थापनेवर शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त जागांवर स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना कायम स्वरुपी नोकरी घेणे बाबत काही जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकांनी लेखी अर्ज देऊन मागणी केलेली आहे. या स्वातंत्र्य सैनिकांनी आपआपले पाल्यास महापालिकेत नौकरीत घेणेसाठी राज्य शासनाकडे देखिल लेखी देऊन मागणी केली असता राज्य शासनाने महापालिका प्रशासनास स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांना प्राधान्यक्रमाने नोकरीस घेणे बाबत कळविलेले आहे. त्यांचे पाल्यास महापालिका नोकरीस घेणेसाठी टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर काही स्वातंत्र्य सैनिकांनी महापालिका मुख्यालया समोर बेमुदत आमरण उपोषण देखील केलेले आहे. त्यावेळी त्यांचे पाल्यांना नोकरीस घेणे बाबत प्राधान्याने विचार केला जाईल असे आश्वासन त्यांना महापालिकेच्या वतीने देण्यात आलेले आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदान विचारात घेता त्यांना उतार वयात आधार म्हणून त्यांनी मागणी केल्यानुसार त्यांचे पाल्यानां शैक्षणिक

अर्हतेनुसार महापालिकेत विशेष बाब म्हणून रिक्त जागांवर प्राधान्याने नोकरी घेणे बाबत मंजुरीस्ताव व सदर प्रस्ताव याच सभेत स्विकृतीस्तव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक - श्री. नंदकुमार घोडेले, श्री. नंदकुमार फुलारी

**संवाद :**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : स्वातंत्र्य सैनिक उपोषनांना बसले होते, त्या संबंधात सर्व पक्षीय हा ठराव ठेवलेला आहे. त्यास मान्यता द्यावी.

डॉ. भागवत कराड : स्वातंत्र्य सैनिकांची १९६३ पासूनची पाल्यांना नोकरीत सामावून घेण्याची मागणी होता स्वातंत्र्य सैनिक यांनी मा. आयुक्त व शासन दरबारी विनंती केलेली तस शासनाचे पत्र सुध्दा प्राप्त झालेले आहे. स्वातंत्र्य सैनिक यांनी उपोषण केले, त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी सर्व पदाधिकारी व स. सभासद उपस्थित होते. प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ६६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर मराठवाडा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांना त्यांच्या मागणीनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार विशेष बाब म्हणून रिक्त जागांवर प्राधान्याने नौकरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड येथील महेशनगर ते गादिया पार्क या रोडवरील चौकास महेश चौक असे नांव देण्यात यावे व महेशनगर ते गादिया पार्क या रस्त्यात वीर सावरकर मार्ग असे नांव देण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा, डॉ. आशा बिनवडे
अनुमोदक - डॉ. भगवत कराड, श्री. भरत लकडे

**संवाद :**

मा. महापौरः प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव क्र. ६७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड येथील महेशनगर ते गादिया पार्क या रोडवरील चौकास महेश चौक असे नांव देण्यास तसेच महेशनगर ते गादिया पार्क या रस्त्यास वीर सावरकर मार्ग असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेले आण्णाभाऊ साठे वस्तीगृह हे शहरातील गरजू होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांकरिता

विविध विषयांवर संशोधन करण्याकरिता बांधण्यात आलेले आहे. परंतु सदर वस्तीगृह समाज कल्याण विभागस भाडे तत्वावर देण्याबाबतचा ठराव मंजूर झालेला आहे. त्यामुळे मुळ कल्पनाचा उद्देश सफल होत नाही. सदर ठरावामुळे गरीब कुटुंबातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणेचा वस्तीगृह भाडे तत्वावर देण्याबाबतचा ठराव रद्द करण्यांत यावा व महानगरपालिकेच्या वतीने सदरील प्रकल्प राबवावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमारे मंजूरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे.
अनुमोदक - श्री. माणिक साळवे

**संवाद :**

श्री. संजय शिरसाठ : या बाबत करारनामा झालेला आहे

डॉ. भागवत कराड : हा प्रस्ताव स्थायी समितीने भाडै तत्वावर देण्याबाबत मंजुरी दिली. हा प्रस्ताव रद्द करावा.

मुख्यलेखाधिकारी : अण्णाभाऊ साठे वस्तीगृह समाज कल्याण विभागाला भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही चालू आहे. करारनामा सुध्दा केलेला आहे. भाड्याने दिलेले आहे.

मा. उपमहापौर : आज महापालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणून देत आहोत. भविष्यात आर्थिक परिस्थिती सुधारल्यास महापालिका चालवू शकते. त्यामुळे मुदत ठेवावी. ज्या उद्देशाने वस्तीगृह केले तो उद्देश सफल होतो का?

मुख्यलेखाधिकारी : महापालिकेचा जो उद्देश तोच त्या विभागचा आहे. महापालिकेचा उद्दश सफल होता. त्यात महापालिकेचा आर्थिक फायदा सुध्दा होणार आहे.

डॉ. भागवत कराड : समाज कल्याण विभागात दिल्यास प्रवेश महापालिका देणार की समाज कल्याण विभाग तसेच जे अनुदान मिळणार ते कुणास मिळेल. महापालिकेस भाडे पोटी काही रक्कम मिळणार का?

मुख्यलेखाधिकारी : महापालिकेस बी ॲण्ड सी. च्या दराप्रमाणेच भाडे मिळणार आहे. कर आकरणी सुध्दा महापालिकेस करता येईल. सदर वस्तीगृह बांधतांना ५% कमकुवत घटक कल्याण निधीतून बांधलेले आहे. अनुदानासाठी कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तशी स्वतंत्र्य तरतूद सुध्दा नाही. आपण शासनास सुपूर्द करतो. टॅक्स वसूल करणार आहोत.

श्री. रतनकुमार पंडागळे : सर्वसाधारण सभेने या प्रस्तावात मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीकडे करारनामाही मंजूर झालेला आहे. त्यावर चर्चा करणे बरोबर नाही.

मा. उपमहापौर : देण्यास हरकत नाही पंरतु महापालिकेने लाखो रुपये खर्च करून शॉपिंग सेंटर तसेच मोठमोठ्या इमारती ५-६ वर्षापासून बांधून आहेत, अनेक समाज सेवी संस्था भाडे तत्वावर घेण्यास तयार आहे. त्या संबंधी सुध्दा कार्यवाही करावी.

मुख्यलेखाधिकारी : बांधून झालेल्या परंतु भाडे तत्वावर न दिलेल्या अशा इमारतीचे बरेच प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केलेले आहे. भाडे तत्तवार देण्याचे प्रयत्न करणार आहोत.

मा. महापौरः प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. ६८/३ :**

सदरील प्रस्ताव रद्द करण्यांतस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**संवाद :**

श्री. नंदकुमार फुलारी : सार्स रोगाच्या संदर्भात शहरातील परिस्थिती कशी आहे. खुलासा द्यावा.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : सार्स रोग शहरात होणार नाही यासाठी आरोग्य विभागामार्फत उपाययोजना करण्यात आलेली आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : या संदर्भात आरोग्य सभापती यांचे अध्यक्षतेखाली १० एप्रिल २००३ रोजी तातडीची बैठक बोलावण्यात आलेली होती. उपसंचालक आरोगय विभाग, प्रोफेसर ऑफ मेडीकल घाटी रुग्णालय, सिव्हील सर्जन उपस्थित होते. या बैठकीस महत्वाचे निर्णय घेण्यात आले घाटी रुग्णलय व महापालिका यांचेमध्ये एक प्रश्नावली तयार करण्यात आलेली आहे.परदेशातून आलेले पर्यटक त्यात हाँग-काँग, चायना यांचेसाठी प्रश्नावली तयार केलेली आहे. एक पथक तयार करून प्रश्नावलीची प्रत एअर लाईन यांना सुध्दा देण्यात आली आहे. तसेच मोठमोठ्या हॉटेल मध्ये सुध्दा या प्रश्नावलीची माहिति पुरविली आहे. यात इंटरनॅशनल कोरीस बेसेस आहे. ते घेण्यात आले. घाटीतील वॉर्ड क्र. ६ हा सार्स रोगासाठी ठेवण्यात आलेला आहे.

श्री. सुनिल मगरे : अनधिकृत टावर्सचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते, काय कार्यवाही केली. माझ्यामते अधिकारी टावर्सच्या संदर्भात त्या मालकांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून आता जे अनधिकृत टावर्स असतील ते पाडण्यांत यावे. आपल्या रुंलींगची अंमलबजावणी होत नाही.

श्री. नंदकुमार फुलारी : शहरात अधिकृत / अनधिकृत टावर्स किती?

मा. महापौर : खुलासा करण्यात यावा.

श्री. सुनिल मगरे : पाडण्याचे आदेश द्यावेत.

मा. महापौर : मोबाईल टावर संदर्भात स. सदस्यांच्या म्हणण्यानुसार सहा. संचालक नगर रचना व प्रशासकीय अधिकारी यांनी अनधिकृत टावर्सचा सर्व्हे करून असे टावर्स पाडण्याबाबत आदेश देण्यात येतात. कार्यवाही बाबतचा अहवाल ०८ दिवसाच्या आत महापौरांना सादर करावा.

श्री. सुनील मगरे : महानगरपालिकेच्या काही कर्मचारी यांनी जातीचे बोगस प्रमाणपत्र सादर करून पदोन्नती मिळविल्या. त्या संदर्भात आजच्या दै. लोकमत या वृत्तपत्रात तशी बातमी आलेली आहे. मागच्या एका सभेत मी प्रश्न केला होता की, महापालिका अस्थापनेवर आतापर्यंत किती लोकांनी जातीच्या प्रमाणपत्राचा बोगस दावा करून पदोन्नती घेतल्या. किती प्रकरणे जात पडताळणी समितीकडे दाखल केलेली आहे. किती प्रकरणे वैद्य / अवैद्य ठरविण्यात आलेली आहे. असा प्रश्न होता. संबंधित विभागाकडून अशी माहिती प्राप्त झाली की, १०२ कर्मचाऱ्यांना जातीच्या प्रमाणपत्रा आधारे पदोन्नती दिली. त्यापैकी २३ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जातपडताळणी समिती मार्फत वैद्य ठरविण्यात आलेली आहे. ७० प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याचे कळविलेले आहे. ६ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे

अवैद्य ठरविण्यात आलेली आहे व त्यापैकी ४ कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेतून कमी करण्यात आले. दोन कर्मचाऱ्यांना अद्याप पदावरून काढण्यात आले नाही. शासनाच्या जी.आर.नुसार ज्यांना जातीचा दावा करून काही सवलती फायदे घ्यायचे असेल तर त्या व्यक्तीने त्याचे जातीच्या प्रमाणपत्राची जात पडताळणी समितीकडून पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. या महापालिकेमध्ये जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होऊन येणाच्या अगोदरच पदोन्नत्या व इतर फायदे देण्यात आलेले आहे. ते देण्यात येऊ नये. असे जी. आर. मध्ये दिलेले आहे. अगोदर पदोन्नत्या व इतर सवलती दिल्या जातात नंतर जात प्रमाणपत्र पडताळणी चे प्रकरण जात पडताळणी समितीकडे दिले जाते हि चुकीची पध्दत आहे. ज्यांनी जातीचा दावा करून जे काही फायदे घेतले असतील व तयांचे जात प्रमाणपत्र अवैद्य ठरले असेल तर ज्या तारखेपासून जातीचा दावा करून फायदे घेतले ते संपूर्ण रद्द करण्यात यावे. असे नमूद केलेले आहे. ज्या ६लोकांचे प्रमाणपत्र अवैद्य ठरविले त्यांना सेवेतून काढले, परंतु त्यांनी जे फायदे घेतले ते त्या तारखेपासून रद्द केलेले नाही. म्हणून ही कार्यवाही होत नसेल तर जे जबाबदार अधिकारी यात आहेत त्यांचे पगारातून वसूल करावे. जी प्रकरणे प्रलंबित आहे, त्यांचे बाबतीत प्रशासनाने लवकर निकाली काढण्याची कार्यवाही केलेली नाही. कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम काही जबाबदार अधिकारी करीत आहे. म्हणून जो कुणी प्रमुख अधिकारी असेल त्याची त्या पदावरून बदली करण्यात यावी. व कार्यक्षम अधिकाऱ्यांनी नियुक्ती करावी. शासन परिपत्रकानुसार ज्यांनी जातीचा दावा करून जे फायदे / सवलती घेतल्या असतील त्या सवलती त्या तारखेपासून रद्द कराव्या. शासन परिपत्रकानुसार प्रशासनाने का कार्यवाही केली नाही. खुलासा देण्यात यावा.

सहा. आयुक्त-१ : जात पडताळणी सिमतीकडून जस जसे प्रकरणा संबंधीचे निर्णय येतात, त्यानुसार प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही केली जाते. यापूर्वी श्री. मुमताज अली बेग, ज्येष्ठ लिपिक यांना सेवेतून कमी करण्यात आले. नुकतचे श्री. ताज महमंद खॉन, श्री असदउल्ला खॉन, शे. अन्वर, मेहरुनिसा बेगम यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. त्यांनी जे जे फायदे घेतले ते वसूल करण्याचे बाबतीत आदेशात नमूद केलेले आहे. तसेच दोन शिक्षिका जयश्री कुशी व व शुशिला व्यंकेश्वर यांना पदावन्नत करण्यात आलेले आहे.

मा. उपमहापौर : शासन निर्णयानुसार जातीचे प्रमाणपत्र त्या उमेदवारांनी वैद्य करून आणावयाचे आहे. त्यानंतर त्यांना पदोन्नती द्यायची प्रशासनाने वेळोवेळी त्या उमेदवारांना नोटीसा दिलेल्या आहे. जाहीर प्रगटन दिले तरी सुध्दा अद्याप जात प्रमाणपत्र वैद्य करून आणले नाही. महापालिकेकडे १५ वर्षापासूनचे काही लोक सेवा करतात. त्यांची जातीच्या संदर्भात सेवेपुस्तिकेमध्ये नोंद आहे. त्याआधारे त्यांना पदोन्नत्या दिल्या. म्हणून अशा पदोन्नत्या दिलेल्या उमेदवरांची जात प्रमाणपत्र वैद्य असल्या शिवाय जे फायदे देत आहोत ते बंद करावे. महापौरांनी आदेश दिल्यानुसार कार्यवाही करणार आहे की नाही याचा खुलासा द्यावा.

श्री. सुनिल मगरे : सहाय्यक आयुक्त-१ यांनी जी माहिती आताच दिली ती चुकीची आहे. माझ्याकडील आलेली लेखी माहिती अशी की, १०२ कर्मचाऱ्यांना जातीच्या

दाव्यावर पदोन्नत्या दिल्या अनुसूचित जातीचे ४६ तर विमुक्त जाती व भटक्या जमातीचे ५३ अशी एकूण ९९ लोकांना पदोन्नत्या दिल्या आहेत. या दोन्ही आकड्यामध्ये विसंगतपणा आढळतो. तसेच ७० कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित असून १९८० पासून आहेत. यात जवळपास २३ वर्ष झाले. २३ वर्षापासून ही प्रकरणे प्रलंबित आहे. प्रशासन झोपले का जागे आहे. अधिकारी या प्रकरणाच्या बाबीतीत सक्षमपणे काम करीत नाही म्हणून त्याही तात्काळ त्या विभागातून बदली करावी. सक्षम अधिकारी नियुक्त करावे. जणे करून ही प्रकरणे निकाली लागतील. मा. आयुक्त यांनी या बाबतीत खुलासा करावा की, हि प्रकरणे केंव्हा निकाली लागतील अनेकवेळा मी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केलेला असून तात्काळ कार्यवाही होण्याची गरज आहे.

मा. उपमहापौर : ६ महिण्याच्या आत ज्यांनी प्रमाणपत्र वैद्य करून आणली नाही तर प्रशासन त्यांचे बाबतीत काय निर्णय घेणार आहे.

श्री. सुनिल मगरे : श्री. संजय पवार तसेच एस.ए. गिरी यांचे अधिकारी मध्ये तसेच कार्यालयीन अधिक्षकामध्ये नांव टाकण्यांत आलेले आहे. जी माहिती दिली ती चुकीची दिली.

उपआयुक्त (प्र.) या दोन्ही कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. म्हणून नावे दिली नसतील. सर्व माहिती घेऊन खुलासा देण्यात येईल.

श्री. सुनिल मगरे : १०२ आकड्यात यांचा समावेश नाही. याचा अर्थ १०२ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविलेले नाही.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : स. सदस्य ६ महिन्या पासून माहिती देण्याबाबत कळवित आहे. प्रशासन उडवा उडवीची उत्तर देते. हे बरोबर नाही.

डॉ. भागवत कराड : शासन जी. आर.नुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही. १०-१५ दिवसाचा यासाठी प्रशासनास वेळ द्यावा. अहवाल मागवावा.

मा. उपमहापौर : ६ महिन्यात प्रमाणपत्र वैद्य करून ज्यांनी आणले नसेल त्यांचे बाबतीत प्रशासनाने काय काय कार्यवाही केली आहे. जवळपास १९८० पासून प्रकरणे प्रलंबित आहे. काहीच्या सेवा समाप्त झाल्या असतील परंतु प्रकरण निकाली निघाले नाही.

श्री. सुनिल मगरे : अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करून त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावे.

मा. महापौर : महानगरपालिकेत खोट्या जात प्रमताणपत्राच्या आधारे जे अधिकारी / कर्मचारी पदोन्नती घेवून सद्या कार्यरत आहेत अशा अधिकारी कर्मचारी यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी प्रशासनाने करून महापौरांना अहवाल सादर करावा. व खोटे जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवा करणारे, पदोन्नती घेणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर योगय ती कार्यवाही करावी.

श्री. जयवंत ओक : टेलीफोन विभागाने रस्त्यावर खड्डे केले. त्या रस्त्याचे पुन्हा तात्काळ काम होत नाही. त्या विभागाने महापालिकेकडे पैसे भरले असतील तर ते रस्ते तात्काळ दुरुस्त करावे. तसे आदेश देण्यात यावेत. अल्प मुदतीचे निविदा काढून तात्काळ कार्यवाही करावी.

श्री. नंदकुमार फुलारी : आझाद चौक ते जळगांव रस्ता या रस्त्याचे काम रस्ते विकास महामंडळातर्फे होती घेण्यात आले. एका ठिकाणी नालीचेच काम पूर्ण केले नाही ते होत नाही तो पर्यंत या रस्त्याचे काम थांबविण्याचे आदेश द्यावे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : मुख्य लेखा परिक्षक पदावर श्री. बनसोडे यांना सामावून न घेण्याबाबत प्रस्ताव पारीत केलेला आहे. प्रशासनाने अद्यापपर्यंत काय कार्यवाही केली खुलासा द्यावा.

उप अभियंता-१ (श्री. खमर) एका आठवड्यात पूर्ण शहराच्या रस्त्याचे काम होऊ शकणार नाही. ज्यांचे अंजदापत्रक मंजूर होईल ते होतील. बाकी आहे, त्या कामाचे सुध्दा अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे. अर्थसंकल्पात तरतूद केलेली असून पावसाळ्याचा अगोदर ती ही कामे होतील.

श्री. जयवंत ओक : गुलमंडी, औरंगपुरा, समर्थनगर, खडकेश्वर असे चांगले रस्ते खोंदलेले आहे. वृत्तपत्रात सुध्दा बातम्या प्रसिध्द झाल्या.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : टेलिफोन विभागाने महापालिकेकडे पैसे भरलेले असतील तर अल्प मुदतीची निविदा काढून तात्काळ कार्यवाहीची आदेश द्यावे.

श्री. नंदकुमार फुलारी : काम चालू असतांना विद्युत खांब मध्येच आलेला असून तो काढण्यांत आलेला नाही. तो जो पर्यंत काढण्यात येत नाही तो पर्यंत काम थांबवावे.

उप अभियंता-१ (श्री. खमर) : विद्युत खांब महापालिकेच्या आखत्यातरीत नाही. महापालिका/ रस्ते विकास महामंडळ व एम.एस.ई.बी. या तिन्ही विभागाची संयुक्त बैठक घेतलया नंतर कार्यवाही होईल.

श्री. जयवंत ओक : माजी महापौर यांनी मालमत्ता कर व पणीपट्टीवरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतलेला होता. व्याज माफ झाले नाही. म्हणून लोक पैसे भरीत नाही. अंमलबजावणी का झाली नाही.

सौ. जयश्री कुलकर्णी : दोन वेळेस महापौरांनी व्याज माफ करण्याबाबत रुंलींग दिले अद्याप कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : प्रशासनाने सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.

यानंतर जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |